# “शिवकाल व शिवकालोत्तर महसूल व्यवस्था: एक तौलनिक अभ्यास”

नेहरु सामाजिकशास्त्र विद्यास्थान
टिळक महाराष्ट्र विद्यापीठ

## विद्यावाचस्पती (पीएच्.डी.)

पदवीसाठी सादर केलेला प्रबंध.
(राज्यशास्त्र)


संशोधक

**प्रा. सौ. हेमलता आनंद सावंत**

भाऊसाहेब नेने महाविद्यालय, पेण.

मार्गदर्शक

**डॉ. शरद वासुदेव खरे**



नेहरु सामाजिकशास्त्र विद्यास्थान
टिळक महाराष्ट्र विद्यापीठ,पुणे.
फेब्रुवारी २०११

# घोषणापत्र

मी असे घोषित करते की, **“शिवकाल व शिवकालोत्तर महसूल व्यवस्थाः एक तौलनिक अभ्यास”** हा माझा स्वतःचा प्रबंध असून मी हा प्रबंध भारतात किंवा भारताबाहेर कोणत्याही विद्यापीठाला सादर केलेला नाही.

सदर शोध प्रबंधामध्ये नमूद केलेली माहिती आणि संशोधनात्मक विधाने ही मी स्वतः अभ्यासून घेतलेली आहेत.

ठिकाण-पुणे

दि.

सौ. हेमलता आनंद सावंत

संशोधक

# प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या नेहरु सामाजिकशास्त्र विद्यास्थानांतर्गत राज्यशास्त्र या विषयाच्या विद्यावाचस्पती या पदवीसाठी सौ हेमलता आनंद सावंत यांनी **“शिवकाल व शिवकालोत्तर महसूल व्यवस्थाः एक तौलनिक अभ्यास”** या शोध प्रबंधाचे काम माझ्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केलेले आहे.

सदर शोध प्रबंधामध्ये त्यांनी नमूद केलेली माहिती आणि संशोधनात्मक विधाने ही माझ्या माहितीप्रमाणे बरोबर आहेत.

ठिकाणः पुणे

दिनांक

डॉ. शरद वासुदेव खरे

मार्गदर्शक

# ऋणनिर्देश

प्रस्तूत संशोधनात औंध, वरसई, नागाव या तीन गावांचा सूक्ष्म अभ्यास करावयाचा असल्याने या तीन्ही गावांशी जवळचा संबंध आला. या गावांमधील काही अभ्यासू व्यक्तींनी यासाठी विशेष सहकार्य दिले. वरसई येथील व्यवसायाने डॉक्टर असणारे पण ऐतिहासिक नोंद साहित्याची जाण असणारे कै. डॉ विजय भावे यांनी वरसईसंबंधीची अनेक हस्तलिखिते, कागदपत्रे, पत्रे यांसंबधीची जंत्रीच मला उपलब्ध करुन दिली. तसेच त्यांनी गावासंबंधीची माहिती दिली. त्याबदद्ल मी त्यांची ॠणी आहे. तसेच गागोदे ता. पेण, जि. रायगड येथील आचार्य विनोबा भावे यांच्या आश्रमातील सर्वोदय गांधीवादी कार्यकर्ते श्री विजय दिवाण यांनी 'भावे' या घराण्याकडे असणाऱ्या सनदेसंबंधीची माहीती दिली. याबद्दल त्यांचीही मी आभारी आहे. चौल-नागाव येथील श्री. विश्वास जोशी यांची प्रत्यक्ष भेट व चर्चा याबद्दल त्यांची मी आभारी आहे. औंधमधील श्री भवानी चित्रसंग्रहालय व ग्रंथालय येथील उपअभिरक्षक यांनी ग्रंथालयातील काही कागदपत्रे व गौरवग्रंथ अभ्यासासाठी उपलब्ध करुन दिले, त्याचा या संशोधनासाठी अत्यंत उपयोग झाला. त्याबद्दल त्यांचीही मी आभारी आहे. मौजे अवसरी बु।। ता. आंबेगाव, जिल्हा पुणे येथील श्री. मुलाणा यांच्याकडील आलमगीर बादशहा यांनी दिलेल्या इनाम जमीनीचे १६० वर्षे जुने हस्तलिखित श्रीमती सुन्ना रशीद शेख यांनी अभ्यासासाठी उपलब्ध करुन दिले. याबद्दल मी श्रीमती सुन्ना शेख यांची आभारी आहे.

या संशोधन कार्यात अनेक ऐतिहासिक संदर्भग्रंथांचे संदर्भ घेतलेले आहेत. हे संदर्भग्रंथ पुणे, कोल्हापूर, पेण येथील ग्रंथालयातून उपलब्ध झाले. पुणे येथील 'भारत इतिहास संशोधक मंडळ' आणि 'गोखले अर्थशास्त्र व राज्यशास्त्र सामाजिक संशोधन संस्था', तसेच 'विवेकानंद इन्स्टिटयूट ऑफ सोशल सायन्सेस रीसर्च'(पुणे विद्यापीठ संलग्न राज्यशास्त्र विषयाचे Ph.D. केंद्र व पदव्युत्तर संशोधन संस्था) यांचे ग्रंथालय पुणे, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथालय पुणे, जयकर ग्रंथालय पुणे विद्यापीठ, पुणे, बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालय शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, महात्मा गांधी सार्वजनिक वाचनालय, पेण, भाऊसाहेब नेने महाविद्यालय ग्रंथालय, पेण या सर्व ग्रंथालयांची, आणि तेथ्ील ग्रंथपाल, त्या संस्थांची मी आभारी आहे. तसेच भाऊसाहेब नेने महाविद्यालयातील ग्रंथपाल श्री. गोपाळ जोशी यांनीही अनेक संदर्भग्रंथविषयक सूचना देऊन मार्गदर्शन केले. त्यांचीही मी आभारी आहे.

प्रस्तुत संशोधनात ऐतिहासिक पत्रे, हस्तलिखिते, दस्तऐवज यांचा आढावा घेण्यासाठी काही सरदार घराण्यातील व्यक्तींच्या भेटी घेतल्या आहेत. यात कोल्हापूर मधील सरदार यादव, सरदार

निंबाळकर विद्यमान कुटुंबियांनी त्यांच्या घराण्यांकडे असणारे ऐतिहासिक दस्ताऐवज, कागदपत्रे यांची माहिती दिल्याबदद्ल त्यांची मी आभारी आहे. प्रस्तूत संशोधन जरी लोकप्रशासन या अभ्यासशाखेच्या दृष्टीकोनातून केलेले असले तरी त्यासाठी मुख्यत्वे इतिहासाचा आढावा घेतला आहे. त्यामुळे ऐतिहासिक अभ्यास आणि कागदपत्रे या दृष्टीने जेष्ठ इतिहास संशोधक म्हणून टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे माजी कुलगुरु कै. डॉ. अ. रा. कुलकर्णी यांची भेट घेतली होती. या भेटीत त्यांनी या संशोधनासंबंधी महत्वाच्या सूचना केल्या त्या बदद्ल मी त्यांची सदैव ऋणी आहे. भाऊसाहेब नेने महाविद्यालय, पेण येथील डॉ. विजय गुम्मा, यांच्याशी वेळोवेळो केलेली चर्चा आणि सूचना संशोधन कार्यात अत्यंत उपयोगी ठरल्या. संशोधनाचे टिपण संगणकावर पूर्ण करण्यासाठी भाऊसाहेब नेने महाविद्यालय, पेण येथील प्रा. बाळासाहेब वाळुंज यांनी सहकार्य केले. भाऊसाहेब नेने महाविद्यालय, पेण येथील प्रा.जनार्दन वाणी यांनी मराठी लेखनातील दुरुस्तीविषयक सुचना दिल्या तसेच अन्य सह अध्यापक यांनी या अभ्यास काळात प्रोत्साहन दिले. भाऊसाहेब नेने महाविद्यालय, पेण येथील विद्यार्थीनी कु. प्रज्ञा वाणी व कार्यालयीन सेवक श्री हिरामण आवास्कर यांनी टायपिंगचे सहाय्य केले. या सर्वांच्या सहकार्याबद्दल मी त्यांची आभारी आहे. याशिवाय महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सदानंद धारप यांनी या अभ्यास काळात बहुमोल मार्गदर्शन केले त्याबद्दल मी त्यांच्या प्रती कृतज्ञ आहे.

या संशोधन कार्यात टिळक महाराष्ट्र विद्यापीठातील माझे संशोधन मार्गदर्शक डॉ. शरद वासुदेव खरे यांनी अत्यंत मोलाचे मार्गदर्शन तर दिलेच पण त्याबरोबरच अनेक सर्वसामान्य गोष्टींविषयीही संशोधनकर्त्याची भूमिका व दृष्टीकोन विकसित कसा करावा यासंबंधी मार्गदर्शन केले. सातत्याने एखादया गोष्टीचा ध्यास घेणे, पराकोटीची चिकाटी निर्माण करणे यासाठी कसा प्रयत्न करावा याचे मार्गदर्शन त्यांनी केले. त्याबद्दल मी त्यांची शतशः ऋणी आहे. सर्वात शेवटी माझे वडील कै. श्री विश्वास मारुतराव भोसले माध्यमिक शिक्षक असल्याने त्यांची आकांक्षा होती की मी डॉक्टरेट करावी. त्यामुळे मला या संशोधनाची प्रेरणा मिळाली. मी अध्यापक म्हणून भाऊसाहेब नेने महाविद्यालय, पेण येथे कार्यरत आहे आणि टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुण्यात असल्याने या काळात अनेक जबाबदाऱ्या माझे पती श्री. आनंद सावंत यांनी पार पाडल्याने मी संशोधनाचे काम पूर्ण करु शकले.

पेण सौ हेमलता आनंद सावंत

दि. संशोधक

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| प्रकरण १ | संशोधन रुपरेषा | ०१ - २५ |
| प्रकरण २ | राज्य आणि महसूल व्यवस्था. | २६ - ९४ |
| प्रकरण ३ | मोगलकालीन महसूल व्यवस्था. | ९५ - १२० |
| प्रकरण ४ | शिवकालीन महसूल व्यवस्था. | १२१ - १६४ |
| प्रकरण ५ | पेशवेकालीन महसूल व्यवस्था. | १६५ - १८९ |
| प्रकरण ६ | ब्रिटिश व ब्रिटिशकालोत्तर महसूल व्यवस्था. | १९० - २२६ |
| प्रकरण ७ | सूक्ष्म अभ्यास | २२७-३३४ |
| | I. औंध संस्थान. | २३२ - २५२ |
| | II. नागाव. | २५३ - २७६ |
| | III. वरसई. | २७७ - २९० |
| | IV. अर्थ व महसूल विषयक निवडक पत्रे. | २९१ - ३३४ |
| प्रकरण ८ | सारांश व निष्कर्ष. | ३३५ - ४०० |
| परिशिष्ठ १ | ऐतिहासिक दस्तऐवजातील शब्दार्थ. | ४०१ - ४१० |
| परिशिष्ठ २ | संदर्भ ग्रंथ सूची | ४११ - ४२२ |
| परिशिष्ठ ३ | करीमबेग मुलाणा सनद (इनाम A कमीशन) दस्ताऐवज | ४२३ - ४६२ |
| परिशिष्ठ ४ | नकाशे- | |
| | i. मुस्लिम इंडिया -१२०० ते १५०० | ४६३ |
| | ii. मोगल एम्पाअर | ४६४ |
| | iii. मराठा राज्य १६८० | ४६५ |
| | iv. मराठा राज्य १६८० | ४६६ |
| | v. मराठा साम्राज्य १७२०ते १७४० | ४६७ |
| | vi. ब्रिटिश एम्पाअर १७९६ ते १८०५ | ४६८ |
| | vii. ब्रिटिश इंडिया १९४७ | ४६९ |
| | viii. भारत | ४७० |

# तक्ता


| तक्ता क्र. | प्रकरण | तक्त्याचे नाव | पान नं. |
|---|---|---|---|
| १. | २ | महसूल पध्दती कालशः वर्गीकरण | ५३,५४ |
| २. | ३ | १६९७ मधील जमीन महसूल | ११९ |
| ३. | ४ | स्वराज्यातील महसूल विभाग व अधिकारी | १२५ |
| ४. | ४ | स्वराज्यातील सेनापती व सैन्य | १२७ |
| ५. | ४ | जमीनीच्या प्रकारानुसार सारा | १३९ |
| ६. | ५ | पेशवेकालीन साऱ्याचे दर | १७३ |
| ७. | ५ | पेशवेकालीन जिराईत जमीनीवरील साऱ्याचे दर | १७४ |
| ८. | ५ | पेशवेकाळातील जमीनी व पिकांना लावलेले साऱ्याचे वेगवेगळे दर | १७५ |
| ९. | ५ | पेशवेकाळातील मावळ भागात असणारे साऱ्याचे दर | १७६ |
| १०. | ६ | ब्रिटीश काळात दक्षिण आर्कोट जिल्हयांतील एकूण महसूल आणि जमीन महसूलाचे प्रमाण | १९५ |
| ११. | ६ | ब्रिटीश भारतातील जमीन महसूल पध्दतीची सुरुवात | १९८ |
| १२. | ६ | जमीनीपासून मिळणाऱ्या उत्पन्नात झालेली वाढ | २०३ |
| १३. | ६ | जमीन महसूलाचे एकूण करपध्दतीतील प्रमाण | २०९ |
| १४. | ६ | विद्यमान महसूल विभाग व महसूल अधिकारी | २१८ |
| १५. | ६ | जकातीच्या भाराचे प्रकार | २२६ |
| १६. | ७-१ | निवडक ३ गावांमधील निरनिराळया घटकांवरील कर | २२९ |

| | | | |
|---|---|---|---|
| १७. | ७-१ | निवडक ३ गावांमधील उत्पन्न देणारे निरनिराळे घटक | २३० |
| १८. | ७-१ | निवडक ३ गावांमधील जमीन महसूलाचे दर | २३१ |
| १९. | ७-१ | निवडक ३ गावांमधील वस्तू रुपात घेतले जाणारे कर | २३१ |
| २०. | ७-१ | औंध संस्थानाचे स्वरुप | २३७ |
| २१. | ७-१ | गोसावी यांना दिलेल्या इनाम जमीनी | २४९ |
| २२. | ७-२ | नागावमधील घरटक्का देणारी घरे व आकार | २६० |
| २३. | ७-२ | नागावमधील वनटक्का व आकार | २६१ |
| २४. | ७-२ | नागावमधील मोहतर्फा वसूली | २६१ |
| २५. | ७-२ | जमीनीच्या प्रकारानुसार महसूल दर | २६३ |
| २६. | ७-२ | चौलमधील आयात-निर्यात व्यापार | २६६ |
| २७. | ७-२ | नागावमधून आंग्रे सरकारला उत्पन्न मिळवून देणारे घटक | २६७ |
| २८. | ७-३ | १८०६-०७ मध्ये कुळकर्ण्यांच्या भाताचा मुशाहिरा (वेतन) | २६८ |
| २९. | ७-३ | अ- इनाम जमीनी व इनामदार | २७० |
| | | ब इनाम जमीनी व इनामदार | २७१ |
| | | क- इनाम जमीनी व इनामदार | २७१ |
| ३०. | ७-४ | शिवकालीन महसूल प्रशासनातील पत्रव्यवहार/आज्ञा यात वापरलेल्या संज्ञा | ३२४-३२८ |
| ३१. | ७-४ | शिवकालीन महसूल प्रशासनातील पत्रव्यवहारात वापरलेल्या संज्ञा व संज्ञांची संख्या | ३२९ |

| | | | |
|---|---|---|---|
| ३२. | ७-४ | करीमबेग मुलाणा यांना बादशहाने दिलेल्या इनाम दस्ताऐवजाचे वर्गीकरण | ३३१ |
| ३३. | ७-४ | औरंगजेबाच्या दरबारातील कार्यालयीन कामकाजा संदर्भातील अहवाल व नोंदी | ३३२ |
| ३४. | ७-४ | औरंगजेबाच्या दरबारातील मंदिरे पाडण्याचा हूकूम देण्याच्या नोंदी | ३३२ |
| ३५. | ७-४ | औरंगजेबाच्या दरबारातील धर्मांतरासंबंधीत अहवाल व नोंदी | ३३३ |
| ३६. | ८ | विविध काळात घेतले जाणारे कर | ३५७ |
| ३७. | ८ | सूक्ष्म अभ्यासाकरीता निवडलेल्या ३ गावांमधील तुलनात्मक कर व्यवस्था | ३६३ |
| ३८. | ८ | जमीनीचे इनाम आणि इनामाचे कारण | ३८१ |
| ३९. | ८ | विविध काळात राज्यकर्त्यांना उत्पन्न देणारे घटक | ३८९ |
| ४०. | ८ | जकातीमधून राज्यकर्त्यांना उत्पन्न देणारे घटक | ३९० |
| ४१. | ८ | क्षेत्रनिहाय व्यवस्था | ३९४ |
| ४२. | ८ | विविध काळातील प्रशासकीय अधिकारी | ३९५ |
| ४३. | ८ | सर्व काळात आढळून येणारे वतनदार | ३९७ |

# प्रकरण एक

## संशोधन रुपरेषा

"शिवकाल व शिवकालोत्तर महसूल व्यवस्था- एक तौलनिक अभ्यास" या संशोधन प्रबंधामध्ये भारतात विविध काळांत अस्तित्वात असलेल्या महसूल व्यवस्थांचा संदर्भ घेण्यात आला आहे. सदर अभ्यास करताना काही विशिष्ट संशोधन पध्दतींचा वापर करण्यात आला आहे. हा अभ्यास ज्या विविध पध्दतींवर आधारीत आहे त्याचा पुढे दिल्याप्रमाणे विचार करण्यात आला आहे. अर्थात प्रस्तुत अभ्यासाचा संशोधन आराखडा पुढीलप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| अ. | विषयाचे महत्व | त. | संशोधन पद्धती. |
| ब. | अभ्यासविषयाच्या मर्यादा | थ. | साहित्याचा आढावा |
| क. | संशोधनाची उद्दीष्टये. | द. | संदर्भ ग्रंथ |
| ड. | गुहितकृत्ये. | | |

व्यक्तीच्या विकासामध्ये राज्यसंस्थेची भूमिका अत्यंत महत्वाची असते. समाजाला स्थैर्य प्राप्त झाल्यानंतर मानवाचे संरक्षण आणि विकासासाठी मानवाने राज्यसंस्था निर्माण केली. या राज्यसंस्थेने आपले कार्य व कर्तव्य पार पाडण्यासाठी निर्माण केलेली व्यवस्था म्हणजे प्रशासन. प्रशासनामुळे राज्यव्यवस्थेची अनेक प्रकारची कार्ये सुरळीतपणे चालविली जाऊ शकतात. म्हणूनच आजवर राज्याच्या सर्वांगीण विकासाबरोबरच प्रशासन व्यवस्थेचाही विकास झालेला दिसतो.

प्रशासन व्यवस्था सुरळीत पार पाडण्यासाठी राज्यव्यवस्थेत उत्पन्नाची साधने आवश्यक असतात. महसूल व कर राज्याचे एक महत्वाचे उत्पन्नाचे साधन असलेले दिसते. तसेच शत्रुंबरोबर युध्द, लढाया किंवा नव्या प्रदेश प्राप्तीसाठी आक्रमणे हे देखील उत्पन्नाचे महत्त्वाचे साधन होते. जगात सर्वत्र प्राचीन काळापासून आजपर्यंत राज्यांबरोबरच प्रशासन व्यवस्था विकसित करण्यासाठी महसूल व्यवस्था महत्वपूर्ण ठरलेली दिसते. प्राचीन काळापासून प्रशासन व्यवस्थेमध्ये महसूल व्यवस्थेला असणारे महत्व अधोरेखित होते. भारतात वैदिक काळात, शिवकाळात तसेच आधुनिक काळात ही महसूल व्यवस्थेला महत्व दिले गेल्यामुळे या सर्व काळातील राज्यकर्त्यांना आपापली राज्यव्यवस्था कार्यरत ठेवणे शक्य झालेले दिसते.

आधुनिक काळाच्या तुलनेत प्राचीन काळामधील राज्यव्यवस्थेला संरक्षण यंत्रणा आत्यंतिक महत्व द्यावे लागत असे. आपली सत्ता, आपले प्रदेश टिकविण्यासाठी राज्यकर्ते सतत व्यस्त असत, त्यामुळे आजच्या राज्य व्यवस्थेपेक्षा प्राचीन काळापासून विशेषत: मराठेशाहीतील राज्यकर्त्यांना संरक्षण यंत्रणा निर्माण करणे, तिचे व्यवस्थापन करणे यासाठी प्रचंड प्रमाणात उत्पन्नाची आवश्यकता भासत असे. म्हणजेच राज्याच्या उत्पन्नाची गरज पूर्ण करण्याच्या दृष्टीने राज्यकर्त्यांना वेगवेगळया स्वरुपाचे कर प्रजेवर लावावे लागत असत. वैदिक काळापासून राज्यव्यवस्था असे अनेक प्रकारचे महसूल, कर आकारुन आपली गरज पूर्ण करीत. परंतू प्रजेला हे सर्व कर जाचक ठरणार नाहीत याची राज्य खबरदारी घेताना दिसते. तसेच सामान्यातील सामान्य लोकांनी त्यांच्या यथाशक्तीप्रमाणे राज्याला महसूल द्यावा याबाबत सर्व काळातील राज्यकर्त्यांचे धोरण सारखेच असल्याचे दिसते.

महसूल किंवा कर रुपाने काही प्रमाणात उत्पन्न, वस्तू किंवा सेवा राज्यव्यवस्थेकडे जमा करणे हे प्रजेच्या दृष्टीने एक कर्तव्यच होते. म्हणूनच या विविध काळात प्रजेकडून कर अर्थात महसुलाच्या देयाला सर्वसंमती असलेली दिसते. राज्य हे ज्याप्रमाणे व्यक्ती विकासासाठी आवश्यक असते त्याप्रमाणे महसूल वसूली राज्याच्या कार्यवाहीसाठी आवश्यक असते हेच या अभ्यासासाठी महत्वाचे आहे.

## अ. विषयाचे महत्व :

आधुनिक काळातील राज्याची जबाबदारी मोठया प्रमाणात वाढलेली आहे. राज्याचे स्वरुप कल्याणकारी झाल्यामुळे राज्यातील लोकांच्या कल्याणाची जबाबदारी राज्याकडेच येते. त्यासाठी राज्याला लोककल्याणकारी धोरणे, योजना, कार्यक्रम आखणे क्रमप्राप्त ठरते. अशा योजना, कार्यक्रमांना कार्यान्वित करण्यासाठी राज्याकडे पुरेसे उत्पन्न असणे आवश्यक ठरते. असे उत्पन्न मिळविण्यासाठी आधुनिक काळात राज्याकडून जनतेवर प्राप्तीकर, विक्रीकर यासारखे कर लादण्यात येतात. प्राचीन काळात तसेच शिवकाळात आणि ब्रिटिश काळातही असे विविध प्रकारचे कर प्रजेकडून घेतले जाताना दिसतात. म्हणजेच सर्व काळात राज्य कर किंवा महसूलाच्या माध्यमातून जमा होणाऱ्या उत्पन्नाच्याआधारे आपली प्रशासकीय व्यवस्था चालविते.

आधुनिक काळात जगात सर्वत्र व भारतात "विकासासाठी प्रशासन" या दृष्टीकोनाला महत्त्व प्राप्त झाले आहे. व्यक्तीच्या जन्मापासून मृत्यूपर्यंत व्यक्तीचा प्रशासनाशी संबंध निर्माण झालेला असतो. राज्यात निर्माण होणाऱ्या बऱ्या-वाईट परिस्थितीला तोंड द्यावे लागते. तसेच राज्याच्या दैनंदिन कामकाजाकरिताही पैसा आवश्यक असतो. त्यामुळे आधुनिक राज्यात महसूलाचे महत्त्व वाढले आहे. राज्याचे महसूली उत्पन्न वाढणे हे राज्याच्या दृष्टीने उपयुक्त ठरते. महसूलाद्वारे मिळणाऱ्या उत्पन्नातूनच राज्य नागरिकांच्या सामूहिक गरजा भागविण्यासाठी काही सेवांची निर्मिती करते. उदा. वाहतूक व दळणवळण, करमणुकीची साधने, सार्वजनिक उद्याने, पोस्ट, टेलिग्राफ, इ. सेवा. या सेवा राज्य सार्वजनिक खर्चाच्या माध्यमातून पुरविते. यासाठी राज्याला महसूली उत्पन्नाची आवश्यकता असते.

प्राचीन भारतीय राज्यशास्त्रात "राज्य" या संज्ञेचा अर्थ "आपल्या सत्ताधिकार क्षेत्रात येणाऱ्या भूभागाचे योग्य ते रक्षण व तेथील जनतेच्या पालनपोषणाचे कार्य म्हणजे राज्य" असा आढळतो.[१] जनतेचे संरक्षण आणि पालनपोषण करणे या उदिद्ष्टांचा विचार सर्व काळातील राज्यकर्त्यांनी केलेला दिसतो. म्हणूनच मनू, रामायण, महाभारत या सर्व काळात प्रजा, महसूल आणि राज्य यामध्ये एक सहसंबंध निर्माण करण्याचा प्रयत्न सत्ताधिशांनी केलेला दिसतो. महसूलाच्या माध्यमातून प्रजेवर जर खूप मोठा भार टाकण्यात आला तर राज्याचे उत्पन्न वाढते. पण प्रजा कराचा भार सहन करु शकत नाही परिणामी ती कमजोर होते, ज्याचा राज्यावर परिणाम होतो. म्हणूनच राज्यकर्त्यांनी नेहमी कोशाबरोबर प्रजेचाही विचार करणे आवश्यक असते. या अभ्यासातून असे स्पष्टपणे आढळते की, प्राचीन काळापासून आजपर्यंतच्या राज्यकर्त्यांनी याचा विचार केलेला आहे.

राज्यसंस्थेच्या उगमापासून राज्य लोकांसाठी कार्य करते. प्रजेच्या संरक्षणासाठीच राज्य निर्माण झाल्याचे इतिहासातून स्पष्ट होते. प्राचीन काळात किंबहुना राज्यसंस्थेच्या प्राथमिक अवस्थेमध्ये लोकांनी राज्य चालविण्यासाठी आपल्या उत्पन्नातील काही भाग स्वेच्छेने दिला आणि त्यातून राज्यसंस्था चालविली जाऊ लागली. परंतु राज्यसंस्थेच्या वाढत्या कार्यामुळे हा उत्पन्नाचा भाग अपुरा पडू लागल्याने उत्पन्न वाढविण्यासाठी राज्याने प्रजेवर वेगवेगळया स्वरुपांत कर लादण्यास सुरुवात केली. प्राचीन काळापासून भारतात

१ प्राचीन भारतीय राजनीती, प्रा. सुधाकर देशपांडे, दास्ताने प्रकाशन, पुणे, १९८७, प्रथमावृत्ती, पा. १४.

प्रामुख्याने मनु, कौटिल्य, शेरशहा, अकबर, मलिकअंबर, शिवाजी महाराज, पेशवे, ब्रिटिश यांच्या प्रशासकीय व्यवस्थांनी तत्कालीन समाजावर वेगवेगळया प्रकारचे कर लावले आणि त्यातून राज्याचे उत्पन्न वाढविले. महसूल व्यवस्थेचा अभ्यास करताना प्राचीनकाळ, शिवकाळ म्हणजेच संपूर्ण मराठा काळ, ब्रिटिश काळ, आणि आधुनिक काळ या काळातील महसूल व्यवस्थांची वैशिष्टये स्वतंत्र स्वरुपाची असलेली दिसतात. पण या सर्व काळात महसूल व्यवस्थेचे एकमेव दिसणारे ठळक वैशिष्टय म्हणजे “राज्य चालविण्यासाठी लोकांच्या उत्पन्नातील काही भाग राज्याकडे वसूल करुन घेणे.” हे होय. प्रत्येक काळातील राज्यकर्त्यांना राज्य चालविण्यासाठी पैशाची आवश्यकता होती म्हणूनच प्रत्येक काळातील राज्यकर्त्यांनी प्रजेवर वेगवेगळया स्वरुपात कर किंवा महसूल लावलेला दिसतो.

शिवकाळात शेतीवरील साऱ्याशिवाय सराफपट्टी, धनगरपट्टी, मागटका, पायपोसी, तेलपट्टी, मोहतर्फा, हेजिबपट्टी, सादिलवार पट्टी, लग्नटका, खर्चापट्टी, जकात यासारखे अनेक प्रकारचे कर लावलेले आढळतात. या करांच्या माध्यमातून मिळणाऱ्या उत्पन्नातून शिवाजी महाराजांना स्वराज्याचे रक्षण करणे शक्य झाले असावे. विविध काळातील प्रशासकीय व्यवस्थेने महसूलाला महत्त्वाचे स्थान दिल्यामुळे राज्याचे उत्पन्न वाढविणे हा राज्याचा मुख्य हेतू साध्य झाला असला तरी त्याद्वारे समाजातील श्रीमंत गरीब यांच्यातील दरी कमी करण्याचा प्रयत्न करण्यात आलेला दिसतो. त्यामुळेच शिवकाळ आणि विविध काळात प्रशासन लोकाभिमुख बनलेले दिसते.

शिवकाळ आणि पेशवेकाळ या संपूर्ण मराठा कालखंडात अनेक गरीब आणि गरजू लोकांना इनाम देण्याची पद्धत, धर्मादाय इनाम देण्याची पद्धत अस्तित्वात होती तसेच जमीनदार किंवा इनामदारांवर इनामपट्टी, मिरासपट्टी, इनाम तिजाई, इनाम चौथाई असे कर लावण्याची पद्धत ही समाजातील दरी नष्ट करण्यासाठी अस्तित्वात आली असावी. या काळामध्ये अनेक कारणांसाठी सत्ताधिशांनी इनामे दिलेली दिसतात. इनामे देताना राज्यकर्त्यांनी ती बक्षीसांच्या स्वरुपात दिलेली दिसतात. म्हणूनच इनाम मिळणाऱ्यांनाही तो आपला सन्मान वाटत असलेले दिसते. असे इनाम सरसकट सर्व गावकऱ्यांना दिलेले दिसत नाही तर ज्यांनी राष्ट्रासाठी, सत्ताधीशांसाठी, जनतेसाठी काही महत्वपूर्ण कार्य केलेले आहे अशा लोकांना दिले जात असे. तसेच ज्यांना मदतीची आवश्यकता आहे त्यांनाच हे इनाम दिले जात असे. यामध्ये कोणत्याही प्रकारच्या कायदयापेक्षा राजाची इच्छा, राजाची कृपा

महत्वाची ठरलेली दिसते. यावरुन असे म्हणता येईल की, महसूल व्यवस्थेत राजाची इच्छा, राजाची कृपा याला महत्व दिल्याने इनाम देण्याची पध्दत काही वेळा कायदा बाहय ठरत असे आणि या पध्दतीमधून अनेकांना करापासून सूट मिळत असे. त्याचा राज्याच्या करापासून मिळणाऱ्या उत्पन्नावरही परिणाम होत असे.

इनाम देताना एखादे जमिनीचे क्षेत्र, गाव, किंवा काही हक्क दिलेले दिसतात. असे इनाम एका कडून काढून घेऊन दुसऱ्याकडे दिले जात असे किंवा ते वंशपरंपरेने त्याच कुटुंबाकडे ठेवलेले दिसते. हे एक प्रकारे मालकीचे हस्तांतरणच होय. यातून संपत्ती किंवा मालमत्तेवरील मालकीमध्ये बदल होताना दिसतात. परंतू हे बदल होताना कोणत्याही प्रकारचा विरोध झालेला दिसून येत नाही. ऐतिहासिक पत्रांमध्ये असे आढळते की, एखादया ठिकाणची जमिन काही कालावधी पुरती एका व्यक्तीकडे असेल तर तीच जमीन काही कालावधी नंतर दुसऱ्या कोणाला तरी दिली जात असे. पण काही वेळा असेही दिसते की, अनेक पिढयांपासून एकच क्षेत्र एकाच कुटुंबाकडे इनाम दिलेले आहे.

मौजे अवसरी बु।। ता. आंबेगाव, जिल्हा पुणे येथील १८५३ मधील मशीदीबद्दल वहिवाटदार असणारे करीमबेग मुलाणा यांना आलमगीर बादशहाने जमीन इमान म्हणून दिली असली तरी त्यासाठी त्याला राज्याकडे काही रक्कम पटटी म्हणून जमा करावी लागत असे.

औंध संस्थानातील पंतप्रतिनिधींनी अनेकांना जे इनाम दिलेले दिसते, त्या इनामामध्ये एक किंवा अनेक गावे दिलेली असली तरी त्याचे सर्व प्रकारचे कर त्या इनाम दिलेल्या इनामदारास मिळत असल्याचे दिसते. त्या बदल्यात इनामदारांने एक ठरावीक रक्कम संस्थानात जमा करावी असे दिसते. यावरुन असे म्हणता येईल की याबाबत निश्चित स्वरुपाचे नियम या काळात बनविण्यात आलेले दिसतात.

मराठा आणि मोगल राज्यकर्त्यांनी इनाम देताना समाजाचा विचार केलेला आढळत असला तरी राज्याच्या उत्पन्नावर त्याचा काय आणि कसा परिणाम होणार आहे याचा विचार केलेला आढळून येत नाही. एकदंरीत अस्तित्वात असणा-या महसूल व्यवस्थेचा विचार करता राज्यकर्त्यांनी समाजातील प्रत्येकाला, जो श्रीमंत आहे त्यालाही आणि जो गरीब आहे त्यालाही कोणत्या ना कोणत्या स्वरुपात महसूल किंवा कर देणे भाग पाडलेले दिसते. उदा. शिवाजी महाराजांनी गावातील वतनदार, अधिकारी, इनामदार यांच्या उत्पन्नातील काही भाग

कररुपाने वसूल करण्यासाठी इनामपट्टी, मिरासपट्टी, देशमुखपट्टी, असे नैमितिक कर वसूल केलेले दिसतात. इनामदारांना इनाम म्हणून दिलेल्या जमिनी या सारासूट स्वरुपाच्या असल्या तरी आणिबाणीच्या परिस्थितीत राज्याला जादा पैसा उभा करावयाचा असेल तर तो इनामदारांकडूनही वसूल केला जात असे. म्हणजेच ज्यांना इनाम म्हणून जमिनी दिलेल्या आहेत, जे त्याचा शेतसारा भरत नाहीत आणि ज्यांना त्यांच्या जमिनीपासून भरपूर फायदा मिळतो त्यांच्याकडूनच या पट्टया वसूल केल्या जात असल्याचे दिसते. याउलट ज्यांच्याजवळ अर्थार्जनाचे साधन नाही म्हणून ज्यांना इनाम दिलेले आहे अशा गोसावी किंवा ब्राम्हणांना, मठांना आणीबाणीच्या परिस्थितीतही कर देण्यास भाग पाडलेले दिसून येत नाही.

ऐतिहासीक पत्रांमध्ये इनाम या संकल्पनेला अतिशय महत्व असलेले दिसते. या पत्रांवरुन असे दिसते की, तत्कालीन राज्यकर्त्यांनी समाजातील दुर्बलांना मदत करण्यासाठी अनेक प्रकारची इनामे दिलेली दिसतात. इनाम देताना इनाम तिजाई, चौथाई अशा स्वरुपातही दिलेले आढळते. सर्वसामान्य जनतेकडूनही कर घेण्याची पद्धत या काळात दिसून येते. ज्यांच्याजवळ शेती आहे त्यांच्याकडून शेतसारा व ज्यांच्याजवळ शेती नाही त्यांच्याकडून श्रम आणि वस्तूंच्या स्वरुपातही महसूल जमा केलेला दिसतो. म्हणजेच मनूने स्पष्ट केल्याप्रमाणे इतिहासात महसूल किंवा कर वसूल करताना तो मधमाशी ज्याप्रमाणे फुलातील मध शोषून घेताना फुलाला त्याचा उपसर्ग होऊ न देता मध शोषते. त्याप्रमाणे लोकांकडून महसूल वसूल करताना त्याचा लोकांना उपसर्ग न होता वसूल करण्याची काळजी घेऊनच वसूल केलेला दिसतो. परंतू समाजातील ज्या लोकांकडे पैशाच्या स्वरुपात महसूल देणे अशक्य आहे अशा लोकांना महसूल किंवा कर भरण्यातून सूट दिलेली दिसत नाही तर पैशाऐवजी त्यांना वस्तू अथवा श्रमांच्या स्वरुपातही आपले कर दयावे लागत असल्याचे दिसते. उदा. कारुक नावाचा कर गावातील कारागिरांना भरावा लागत असे. वेठबिगार हा एखाद्याकडून मोफत चाकरी करुन घेणे देखिल एक अप्रत्यक्ष करच अस्तित्वात असल्याचे दिसते. कारागीर किंवा मजूर यांच्याकडून मोफत किंवा बाजारात प्रचलित असलेल्या दरांपेक्षा कमी दराने त्यांची सेवा सक्तीने घेणे म्हणजे एका प्रकारे उत्पन्नावरील करच होय. म्हणूनच त्याची गणना डॉ.अ.रा. कुलकर्णी यांनी व्यवसाय करांमध्ये केलेली आढळते. मौर्यकाळात देखिल श्रमांच्या स्वरुपात विष्टी हा कर वसूल केल्याचे दिसते.

याशिवाय शिवाजी महाराजांनी उत्पन्न मिळविण्यासाठी अनेक मार्ग अंगिकारलेले दिसतात, या उत्पन्नाच्या साधनांमध्ये पुढील गोष्टींचा समावेश होतो. [२]

| | | |
|---|---|---|
| १. जकात | २. ने आण करण्यावरील कर | ३. अबकारी कर |
| ४. न्यायालयीन शुल्क | ५. जंगलखात्याचे उत्पन्न | ६. टांकसाळ |
| ७. नजराणा | ८. महत्वाच्या जागांच्या लिलावाचे उत्पन्न | ९. चाचेगिरी |
| १०. युध्दातील लूट | ११. इतर राज्यांकडून मिळणारी खंडणी | १२. वारसाविषयक कर |
| १३. जहाजफुटी | १४. शत्रुच्या प्रदेशातील लूटमार | १५. जप्ती |
| १६. मक्तेदारी | १७. मच्छिमारी व इतर खाणीचे उत्पन्न | १८.सागरी व्यापार |
| १९.चौथ आणि सरदेशमुखी | २०. इतर विविध कर | |

या सर्व उत्पन्नाच्या साधनांमध्ये युध्दातील लूट, शत्रुच्या प्रदेशातील लूटमार यासाठी शिवाजी महाराजांनी शत्रुच्या प्रदेशावर स्वाऱ्या केलेल्या दिसतात. पण त्यांच्या स्वाऱ्यमधून निरपराध जनतेला कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही याची खबरदारी घेतली होती म्हणून त्यांना कल्याणकारी राजा म्हटले जाते.

खाफीखान हा तत्कालीन इतिहासकार लिहितो, शिवाजी महाराजांनी आपल्या सैनिकांना असा नियम केला होता की, सैनिक ज्या ज्या ठिकाणी लुटालुट करण्यास जातील तेथे तेथे त्यांनी मशिदी, कुरण, ग्रंथास अथवा कोणत्याही स्त्रीस तोशीस अगर त्रास देऊ नये. जर एखादा कुराण ग्रंथ त्यांच्या हाती लागला तर उच्चभाव दाखवून तो आपल्या मुसलमान नोकरांच्या स्वाधीन करत असे. त्याचप्रमाणे इतिहास संशोधक श्री. गो.स.
सरदेसाई यांनी 'मराठी रियासत'मध्ये हा मुददा पुढीलप्रमाणे मांडला आहे. शिवाजीने लूट केली ती युध्दमान परिस्थितीत शत्रु मुलखांत केली. स्वतःच्या मुलाखांत किंवा ताब्यातील जागिरींत कधी केली नाही. शहाजहान व मुराद दिल्लीवर चालून गेले, तेव्हा त्यांनी आपलेच सुरत शहर लुटले तसा प्रकार शिवाजीने कधी केला नाही. खाफीखान म्हणतो, 'शिवाजी पुष्कळ संपत्ती लुटून आणी, परंतु त्याचा असा नियम होता की, मशिदीला व कुराणाला हात लावू नये किंवा कोणा बायकापुरुषांची अब्रु घेऊ नये. कुराणाचे पुस्तक लुटीत त्याचे हाती आलें असता ते तो मोठया सन्मानाने आपल्या हाताखालील मुसलमानांस देऊन टाकी, लुटीकरिता कोणीही इसम पकडलेला असल्यास, मग तो हिंदू असो वा

२. मराठेकालीन संस्था व विचार : प्रा.आर.डी.गायकवाड, प्रा.डी.डी.थोरात, प्रा.बी.एन.सरदेसाई, प्रा.व्ही.एन.हनमाने, प्रकाशकः फडके बुकसेलर्स, कोल्हापूर, द्वितीयावत्ती, १९८७, पान २६१.

मुसलमान असो त्याची यथायोग्य काळजी घेण्यास येऊन, त्यास कोणताही त्रास देण्यात येत नसे. लुटीसंबंधाचे शिवाजीचे नियम असे सक्त होते की, कोणतीही लूट लोकांनी पैदा करुन आणिली तर ती सरकारांत भरावी लागे. एखादया शहरी गेल्यावर तेथील धनसंपन्न लोकांजवळून ज्याच्या त्याच्या लायकीप्रमाणे तो रकमा मागे व वसूल करी. हा स्वराज्यप्रीत्यर्थ भरावयाचा एक प्रकारचा कर होता. पण राज्य संस्थापकास असले प्रसंग आल्याशिवाय राहत नाहीत. राज्यस्थापन करितांना युध्द करावे लागते. युध्दास खर्च लागतो, व अर्थात तो खर्च कोणत्या तरी रुपाने लोकांवरच बसतो. मग त्या रुपास झोळी, लूट, कर, दंड, शिक्षा म्हणून लोकांवर बसविलेला खर्च अगर दुसरे वाटेल ते नाव दयावे. सीझर व सिकंदर यांनी जिंकलेल्या देशातून अपार संपत्ति स्वदेशास नेली हे मशहूर आहेच. शिवाजी लूट करी. तो नेहमी शत्रुच्या मुलखांत युध्द चालू असतांना करी. सुरत, जालना, जुन्नर इत्यादी शहरांची लूट मोगल व विजापूरकर यांजबरोबर युध्द चालू असताना शिवाजीने केलेली आहे. त्यातही शत्रूच्या मुलखांतील शेतकरी पेशाची गावे लुटुन शिवाजीने सामान्या रयतेस त्रास कधी दिला नाही. शत्रुची धनाढय शहरे, तेथील पैसेवाले सावकार, शत्रूंचे ठिकठिकाणचे खजिने व लष्करास लागणारा पैसा व सामान लुटून किंवा पाडाव करुन त्याने आणिली. परंतु पेशवाईत पुढे दुसऱ्या बाजीरावाने ज्याप्रमाणे आपलेच सावकार व आपलीच रयत लुटण्याचा सपाटा चालविला तशा प्रकारे स्वराज्यात शिवाजीने कधीच लूट केली नाही. एवढेच नव्हे तर स्वराज्यात शत्रूंनी लूट केली असता ती भरुन देणे तो आपले कर्तव्य समजे. युध्द चालू असता शत्रूच्या मुलखांची लूट करणे हे शत्रुला कमजोर करण्याचे एक साधन होय.[३]

तसेच प्रा.एच.बी.वशिष्ठ यांनी देखील शिवाजी महाराज निरपराध प्रजेवर स्वारीच्या दरम्यान अत्याचार होता कामा नयेत यासाठी कसे दक्ष असत याबाबत प्रा.एच.बी.वशिष्ठ यांच्या "Land Revenue & Public Finance in Maratha Administration" या ग्रंथात पुढीलप्रमाणं संदर्भ दिला आहे

"During his campaigns of plunder, Shivaji was never wantonly cruel. Though he in inflected death and torture to force confessions of concealed treasure(he) was never personally guilty of any useless cruelty"[10] Khafi Khan, who calls Shivaji as a 'sharp son of Devil', 'an entrepreneur of rapine'. 'a Hindu edition of Alauddin khilji of

---

३.मराठी रियासत-खंड १ःइतिहासकार श्री.गो.स.सरदेसाई, केशव ढवळे प्रकाशन,गिरगाव,मुंबई, १९३५,पान २५३.

Taimur', 'a father of fraud', and 'a hell-dog' even, testifies shivaji's pity, humanity and tolerance. He says, "He made it a rule that whenever his followers went plundering, they should do no harm to the mosques, the Book of God(viz., Quran) of the women of any one whenever a copy of sacred Quran came into his hands he treated it with respect and gave it to some of his Mussaiman followers.When the women of any Hindu of Muhannadan were taken prisoners, by his men, he watched over them until their relations came with a suitable ransom to buy their liberty."[11]

"The same author further adds that "Shivaji had always striven to maintain the honour of the people in his territories. He persevered in a course of rebellion in plundering caravans and troubling mankind, but he entirely abstained from other disgraceful acts and was careful to maintain the honour of women and children and of Muhammadans when they fell into his hands. His injunctions upon this point were every strict and anyone who disobeyed received punishments.[12] [४]

याउलट शत्रूच्या प्रदेशावर स्वाऱ्या करुन व लूट करुन उत्पन्न मिळविणे हे तंत्र जरी शिवाजी महाराजांनी मोगलांकडून स्विकारलेले दिसले तरी मोगलांनी स्वराज्यात लूटालूट करुन जनतेचे किती अनन्वित हाल केले हे औरंगजेबाच्या दरबाराचे अखबार या बादशहाच्या दरबारी नोंदीत पुढील दोन अखबारातून लक्षात येते. [५]

अखबार क्र ३६५

जु. २६ जिल्काद २३ इ.१६८२ नोव्हेंबर १३

शिहाबुददीनखान याने शत्रूच्या तालुक्यातील जवळजवळ २० गावे लुटली व जाळली. अनेकांना मारले व कित्येक जनावरे त्याच्या हाती आली त्याने विचार केला की शनिवारी इतर काही गावे लुटून घाटाबाहेर यावे. [६]

अखबार क्र ३६७

जु. २६ जिल्काद २४ इ.१६८२ नोव्हेंबर १४

शिहाबुददीनखानाने तळकोकण खोऱ्यांतील काही गावे लुटली व ४०० लोकांना मारले, १००० लोक कैद केले व ४००० जनावरे लुटली. उपर्युक्त खान खोऱ्याच्या बाहेर आला आहे. त्याचा विचार आहे की शत्रुच्या मुलुखांत जाऊन लुटालुट करुन परतावे यावर हुकूम झाला की, शिहाबुददीनखानासाठी खिलत वेगळी करुन ठेवावी. [६]

---

४ Land Revenue & Public Finance in Maratha Administration: Prof.H.B.Vashishta, Oriental Publishers & Distributions, Delhi, 1975 lst edition Pg 17.

(10 Elphinstone: The History of India page 607-8

11 Khafi Khan, Quoted in Ellor and Dowson's History of India: Volume VII: page 260

12 Ibid: page 350)

५. ऐतिहासीक फार्सी साहित्य खंड ६वा : औरंगजेबाच्या दरबाराचे अखबारः संपादकः प्रा.गणेश हरी खरे, भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे. १९७३ पान नं २१६.

६. ऐतिहासीक फार्सी साहित्य खंड ६वा : औरंगजेबाच्या दरबाराचे अखबारः संपादकः प्रा.गणेश हरी खरे, भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे. १९७३ पान नं २१८.

शिवाजी महाराजांच्या काळात जे जमाबंदीचे तत्त्व अस्तित्त्वात होते ते फार पुरातन होते. त्याकाळात आजच्याप्रमाणेच शेती हा प्रमुख उद्योग होता. त्यामुळे जमीन महसूल हीच छत्रपतींची आणि पेशव्यांची उत्पन्नाची बाब होती. शिवाजी महाराजांच्या काळात लोकांच्या उत्पन्नातील आपला हिस्सा घेणे महाराजांना अधिक श्रेयस्कर वाटत होते असे दिसते. तर पेशव्यांच्या महसूल पद्धतीची खास वैशिष्टये म्हणजे दीर्घ मुदतीची आणि निश्चित स्वरुपाची साराबंदी ही होती. प्राचीन काळापासून महसूल व्यवस्थांची अंमलबजावणी केली जाते. त्यामागे सर्व काळात एक तत्त्व प्रचलित असल्याचे दिसते ते म्हणजे "एकंदर उत्पन्नाचा काही भाग दरवर्षी सरकारला दिला पाहिजे."

वैदिक काळातील रामायण, महाभारत या काळामध्येही राज्यसत्ता मिळविण्यासाठी आणि टिकविण्यासाठी राज्यकर्त्यांना सतत संघर्ष करावे लागलेले दिसतात. मौर्य, गुप्त काळातही राजसत्तेला आपल्या प्रदेशाचे रक्षण करणे आणि ते वाढविणे यासाठी लढाया कराव्या लागलेल्या दिसतात. शिवकाळात शिवाजी महाराजांना तर मोगल राज्यकर्त्यांबरोबर आपल्या ताब्यात असणाऱ्या प्रदेशाचे रक्षण करण्यासाठी सतत लढाया कराव्या लागलेल्या दिसतात. त्यामुळे एकच प्रांत किंवा प्रदेश कायमचा एकाच राजसत्तेकडे राहिलेला दिसत नाही. उदा. सन १६४९ मध्ये शिवाजी महाराजांना पुणे, इंदापूर, बारामती, चाकण, व सुपे या प्रांतांची वडिलोपार्जित जहागिरी मिळाली होती. पण त्यानंतर शिवाजी महाराजांनी कोकण मिळविले. सन १६५९ पर्यंत माहूलीपासून, वाईपर्यंतचा प्रदेश शिवाजी महाराजांनी मिळविला. पण सन १६६० मध्ये पन्हाळा सिद्दी जौहरने, सन १६६५ मध्ये पुरंदर किल्ला दिलेरखानाने काबीज केला. पुरंदरच्या तहात शिवाजी महाराजांना २३ किंल्ले आणि त्याला लागून असणारा ४ लाख होनांचा मुलूख मुघल राज्यकर्त्यांकडे सोपवावा लागला. पण सन १६७० ते १६७४ मध्ये शिवाजी महाराजांनी सिंहगड, पुरंदर, माहुली, कल्याण, भिवंडी, अहमदनगर, जुन्नर, परेंडा इ. प्रांत परत जिंकून घेतले. ज्याप्रमाणे शिवाजी महाराजांच्या कारकिर्दीत त्यांना स्वराज्य टिकविण्यासाठी सतत प्रयत्न करावे लागले तसेच ते संभाजी महाराजांच्या काळातही करावे लागलेले दिसतात. या काळात प्रांत रचनेत फारसा बदल झालेला दिसत नाही. [७]

पेशव्यांच्या काळात विशेषतः "नानासाहेब पेशव्यांनी महाराष्ट्राबरोबर पाटणा, बिहारपर्यंत चौथाई वसूल केलली दिसते. नागपूरच्या रघुजी भोसलेंनी तर बंगालच्या नवाबावर स्वाऱ्या करुन बंगालपर्यंतचा प्रदेश काबीज केला आणि चौथाई वसूल केली." [८] एकूणच राज्य

---

७ मराठयांची प्रशासन व्यवस्थाः अनु. विजया कुलकर्णी, मुंबई, प्रथमावृत्ती, २००३ पान ३४.

८ भोसल्यांच्या बंगालवरील स्वाऱ्याः बाळकृष्ण नारायण सहस्त्रबुध्दे, (गोंदिया), राजवाडे संशोधन मंडळ, धुळे, १९४४, पान ८.

वाढविणे, सत्ता विस्तार करण्याच्या या सर्व प्रयत्नांमध्ये राज्यव्यवस्था अस्थिर असल्याचे दिसून येते. तसेच राज्यांच्या सीमांची निश्चिती झालेली दिसून येत नाही. कारण याकाळात शिवाजी महाराजांच्या ताब्यात असणारा प्रदेश सतत व कायम त्यांच्याच ताब्यात राहिलेला दिसून येत नाही तर कधी कधी आक्रमणामुळे तो मोगलांच्या ताब्यात गेलेला दिसतो. परंतू ब्रिटिश काळापासून मात्र संपूर्ण भारतावर ब्रिटिशांचे एकछत्री व दीर्घकालीन नियंत्रण प्रस्थापीत झालेले दिसते. त्यामुळे स्वातंत्र्योत्तर काळात राज्याच्या सीमांची निश्चिती झालेली दिसून येते. तसेच स्थिर राज्यव्यवस्था निर्माण झालेली दिसते. .

महसूल व्यवस्थेच्या सुक्ष्म अभ्यासासाठी औंध, नागाव-चौल आणि वरसई या ठिकाणांची निवड करण्यात आलेली आहे. यातील औंध संस्थांन शाहू महाराजांच्या पंतप्रतिनिधींचे संस्थान होते. तर नागाव-चौल, वरसई हे प्रदेश पेशवेकाळातील आंग्रेंच्या वर्चस्वाखाली होते. या तिनही ठिकाणी दिसून येणाऱ्या महसूल व्यवस्थेमध्ये इनामदारी आणि वतनदारी पद्धती अस्तित्त्वात असल्याचे आढळते. या भागातील इनाम देण्याची पद्धत, त्याची कारणे आणि इनामाशिवाय महसूलाची इतर साधने यांचा अभ्यास करण्यासाठी तत्कालीन पत्रांचा वापर करण्यात आलेला आहे. तसेच वरसई या छोटया गावाची प्रशासकीय महसूल व्यवस्था तेथील काही अप्रसिद्ध पत्रांच्याआधारे दृष्टोत्पतीस आली.

शिवकाळ, शिवकालोत्तर महसूल व्यवस्था, मोगलकालीन महसूल व्यवस्था, ब्रिटिश काळातील महसूल व्यवस्था यांचा प्रस्तुत संशोधनात अभ्यास करण्यात आलेला आहे. हिंदू आणि मुसलमान प्रशासनाच्या तत्वांचा परस्परांवर कसा परिणाम झाला आणि ब्रिटिश काळापासून आधुनिक महसूल व्यवस्थेंचा विकास कसा झाला याबाबतचे विवेचनही प्रस्तुत संशोधनात करण्यात आले आहे.

प्राचीन काळापासून १९५०पर्यंत विशेषतः शिवकाळ आणि शिवकालोत्तर कालखंडात महसूल व्यवस्था राज्याच्या दृष्टीने महत्त्वाची ठरणारी बाब असल्याचे दिसते. विविध कालखंडात अस्तित्त्वात असणाऱ्या महसूल व्यवस्थेची अंमलबजावणी वेगवेगळया स्वरुपात कशी झाली याविषयीचा अभ्यास प्रस्तुत संशोधनात करण्यात आलेला आहे.

प्राचीन काळ, मराठा काळ, मोगल काळ, पेशवे काळ, ब्रिटिश काळ या सर्व काळातील महसूल व्यवस्थेचा आणि प्रशासनाचा अभ्यास आजवर अनेक विद्वानांनी सखोल व स्वतंत्रपणे केलेला दिसतो. परंतु या सर्व काळातील महसूल व्यवस्थांचा एकत्रित आणि

तुलनात्मक अभ्यास झालेला नसल्याने संशोधकाने हा अभ्यास विषय संशोधनासाठी निवडला आहे.

आधुनिक काळात कल्याणकारी राज्याचा स्विकार केला असल्याने राज्याच्या वाढत्या कार्यक्षेत्राबरोबर महसूलातून मिळणाऱ्या उत्पन्नाला अधिक महत्त्व प्राप्त झाले आहे. शिवकाल आणि शिवकालोत्तर काळातील राज्याला अनेक प्रकारची कार्य करावी लागत असत. त्यावेळीही महसूल व्यवस्थेला महत्त्व होते का हे तपासून पाहण्यासाठी "शिवकालोत्तर महसूल व्यवस्था एक तौलनिक अभ्यास" हा विषय संशोधनासाठी निवडलेला आहे.

**<u>ब. अभ्यास विषयाच्या मर्यादा</u> -**

१. शिवकालातील प्रशासन व्यवस्थेची स्थिती पाहता त्यातील फक्त महसूल व्यवस्थेचा विशेषतः कर पध्दतीचा अभ्यास प्रस्तुत संशोधनात करण्यात आलेला आहे.

२. प्रस्तुत संशोधनात महसूल व्यवस्थांचा अभ्यास तौलनिक दृष्टिने करण्यात आलेला आहे. परंतू सदर अभ्यासाची मर्यादा इ.स. १९५० पर्यंतच आहे.

३. प्रस्तुत संशोधनात औंध(संस्थान), नागाव आणि वरसई (कोकण प्रांत), अवसरी बु।। ता. आंबेगाव, जिल्हा पुणे, महाराष्ट्र येथील काही प्रकाशित आणि अप्रकाशित पत्रांची निवड अभ्यासासाठी करण्यात आलेली आहे.

४. शिवकाळात महसूल विषयक अनेक पत्रांचे संग्रह अनेक इतिहास संशोधन संस्थांमार्फत प्रसिध्द करण्यात आलेले आहेत परंतू त्यापैकी निवडक पत्रांचा प्रस्तूत संशोधनात अभ्यास करण्यात आलेला आहे.

५. अशा प्रकारच्या अभ्यासात निणार्यकता (finality / final Conculsion)येवू शकत नाही. कारण त्या त्या काळातले समग्र हस्तलिखित, वाङ्मय, साहित्य, दस्ताऐवज इ. उपलब्ध नसते.

**क. संशोधनाची उद्दीष्टये :—**

प्रस्तुत संशोधनात काही महत्वपूर्ण उद्दिष्टे आहेत. ती पुढीलप्रमाणेः

१. प्राचीन भारतातील विविध कालखंडातील महसूल व्यवस्थांचा आढावा घेणे..

२. या काळातील महसूली कर वसूलीच्या पध्दतींचा परामर्श घेणे.

३. शिवकालोत्तर महसूल व्यवस्थेचा अभ्यास करणे

४. शिवकाल आणि शिवकालोत्तर महसूल व्यवस्थेचा इतिहास तपासून पाहणे.

अर्थात शिवकाळ आणि शिवकालोत्तर कालखंडातील महसूल व्यवस्था व विविध कर पध्दतींचा अभ्यास करणे हे या संशोधन अभ्यासातील एक प्रमुख उद्दिष्ट आहे.

### ड. गृहितकृत्ये :-

गृहितकृत्य म्हणजे एखादे गृहित धरलेले विधान, तत्त्व किंवा एखादी गृहित धरलेली अट होय. असे विधान किंवा तत्व त्याचे तार्किक परिणाम काय होऊ शकतील याचा अंदाज घेण्यासाठी गृहित धरले जाते व या पद्धतीने ते विधान वा तत्वज्ञान तथ्यांशी किंवा माहित करुन घेता येणाऱ्या तथ्यांशी कितपत सुसंगत आहे याचा पडताळा घेतला जातो.

प्रस्तूत संशोधनात भारतीय इतिहासामधील, विविध काळातील महसूल व्यवस्थांचा संग्रहित अभ्यास केला आहे. संशोधनकर्त्यापुढील समस्येचे तात्पुरते व संभाव्य असे उत्तर म्हणजेच गृहितकृत्य होय. शिवकाळ आणि शिवकालोत्तर महसूल व्यवस्थेचा अभ्यास करताना काही गृहितकृत्ये स्पष्ट होतात. प्राचीन काळापासून भारतात महसूल व्यवस्था अस्तित्वात असल्याचे दिसते. महसूल व्यवस्था निर्मितीचे अत्यंत महत्वपूर्ण कारण म्हणजे राज्यव्यवस्था चालविण्यासाठी उत्पन्न गोळा करणे. "महसूल प्रशासन राज्यव्यवस्थेचा कणा असतो" इतिहासकालातील कोणत्याही कालावधीचा अभ्यास करताना या गृहितकृत्याचा या संशोधनात सतत संदर्भ लागतो. कोणत्याही काळात महसूल व्यवस्थेशिवाय प्रशासन व्यवस्था अस्तित्वात असू शकत नाही. महसूलासाठी राज्य अनेक नवीन कर संकल्पित करीत असते. यासंबंधीच्या ऐतिहासिक नोंदी प्रस्तूत संशोधनात करण्यात आल्या आहेत.

शिवकाळ आणि शिवकालोत्तर महसूल व्यवस्थांचा आढावा घेताना या सर्व कालखंडाची एकूण ऐतिहासिक पार्श्वभूमि लक्षात घ्यावी लागते. या काळात महाराष्ट्रात आदिलशाही, निजामशाही, कुतुबशाही या सत्ता अस्तित्वात होत्या. तसेच मोगलांच्या आणि मराठयांच्या सत्ता संघर्षामुळे महाराष्ट्रातील राज्यव्यवस्थेला अस्थिर स्वरुप प्राप्त झालेले दिसते. सतत सुरु असणाऱ्या सत्ता संघर्षामुळे या प्रदेशाच्या सीमा निश्चित राहिलेल्या दिसत नाही. उदा. सन १६४९ मध्ये शिवाजी महाराजांना शहाजी महाराजांनंतर पुणे, सुपे, इंदापूर, बारामती, चाकण या प्रांताची काही जहागीरी वंशपरंपरेने मिळाली होती. पण त्यानंतर त्यांनी पुढच्या काळात कोकण, लोहगड, पन्हाळा, कोल्हापूर, वाई असे प्रदेश मिळविले. परंतु सिद्दी जौहर, दिलेरखान यांनी शिवाजी महाराजांच्या अनेक प्रांतावर ताबा मिळविला. त्यामुळे एखाद्या प्रदेशावर एका सत्ताधीशाचे कायम स्वरुपाचे वर्चस्व राहिलेले दिसत नाही. सत्ताधीश

सतत बदलले जात असल्याने प्रशासनाची वीण क्षीण झालेली दिसून येते. तसेच महाराष्ट्रावर या काळात वेगवेगळया स्वरुपातील सार्वभौमत्व निर्माण झालेले दिसते. पुण्याच्या काही भागावर मराठयांचे तर काही भागावर निजामशाहीचे सार्वभौमत्व निर्माण झालेले दिसून येते. ज्या वेळेला दोन सत्ताधीशांचे सार्वभौमत्व एकाच प्रदेशात अस्तित्वात होते त्यावेळी या भागातील प्रशासकीय अधिकारी दोघांचेही आदेश ऐकत नव्हते. त्यांना दोन्हीकडे निष्ठा ठेवणे अशक्य होत असे. अशा वेळेस परगणा किंवा प्रांताचे अधिकारी आपल्या निष्ठा त्या परगणा किंवा प्रांताकडे ठेवत असत. महसूल व्यवस्थेमध्ये महसूल जमा करण्याचे कार्य प्रशासनाला करावे लागत असे. पण त्यासाठी या काळातील लोकांकडे जोरजबरदस्तीने ती वसूल करुन घेतली जात नसे. प्राचीन काळापासून शिवकाळापर्यंत राजाची इच्छा हीच अंतिम इच्छा मानली जात असे. आधुनिक काळात प्रजेच्या बहुमतातून निर्माण झालेले कायदे मंडळ जसे आजच्या काळात कायदे बनविण्याचे कार्य करते तसे त्या काळात प्रजेच्या इच्छा किंवा कला यांना महत्व दिलेले दिसत नाही. शिवकाळात शिवाजी महाराज लोकांचे कल्याण कशात आहे हे पाहून धोरण आखीत असत. पुढे ब्रिटिश काळात काही अंशी लोकांचा विचार केला जाऊ लागला. या सर्व काळांमध्ये महसूल व्यवस्था अस्तित्वात होती आणि ती राज्याच्या उत्पन्नाचे साधन होती. या सर्व काळातील महसूल व्यवस्थांमध्ये एक सातत्य असलेले दिसते. ते म्हणजे लोकांच्या उत्पन्नातील काही भाग सरकारकडे जमा करुन घेणे.

**त. संशोधन पध्दतः**

**१ सूक्ष्म अभ्यास :** प्रस्तुत अभ्यासामध्ये औंध(संस्थान), नागाव, वरसई(कोकण प्रांत),या तीन महसूली गावांचा सूक्ष्म किंवा व्यष्टी अभ्यास केला आहे. नागावमध्ये कान्होजी आंग्रे यांची सत्ता असताना येथील महसूल व्यवस्था विस्तारीत स्वरुपाची होती. या भागातील तत्कालीन कर पध्दतीचा यात अभ्यास केला आहे. तसेच वरसई (पेण) हे इनामदारांचे गाव असलेले दिसते. त्यामुळे पेशवकाळात या गावात मोठया प्रमाणात जमिनी इनाम दिलेल्या दिसतात.त्या इनाम जमीनींचा आणि तत्कालीन कर व्यवस्थेचा अभ्यास यात केला आहे.

औंध (संस्थान) हे सातारचे छत्रपती राजाराम महाराज, शाहू महाराज यांनी पंतप्रतिनिधींकडे दिलेले संस्थान होते. या संस्थानातही जमिनी इनाम दिलेल्या दिसतात. त्यामध्ये असणारी व्यवस्था यांचा यात अभ्यास करण्यात आला आहे.

**२ प्रत्यक्ष भेट :** प्रस्तुत अभ्यासामध्ये शिवकाल व शिवकालोत्तर पत्रांच्याआधारे तथ्य संशोधित करण्यात आले आहे. त्यासाठी औंध(संस्थान), नागाव, वरसई(कोकण प्रांत),या तीन महसूली गावांचा सूक्ष्म अभ्यास केला आहे. तसेच मौजे अवसरी बु।। ता. आंबेगाव, जिल्हा पुणे येथील एका मुसलमान कुटुंबास मोगल बादशहाने दिलेल्या दस्ताऐवजाचा आणि तत्कालीन अर्थ व महसूलविषयक निवडक पत्रांचा अभ्यास यात करण्यात आला आहे. त्यासाठी या गावांना प्रत्यक्ष भेटी देऊन ग्रंथालय आणि काही कुटुंबांकडून ऐतिहासिक कागदपत्रे हस्तलिखित मिळविण्यात आली आहेत.

**३. ग्रंथालयीन संदर्भ :** प्रस्तुत अभ्यास करताना शासकीय महसूल व्यवस्थांचा प्राचीन भारत ते १९५०पर्यंतचा अभ्यास करण्यासाठी अनेक विव्दान इतिहासकारांच्या आणि संशोधकांच्या पुस्तकांचा आधार घेण्यात आला आहे. तसेच प्रस्तुत अभ्यासाकरीता प्रामुख्याने पुणे येथील भारत इतिहास संशोधक मंडळ आणि गोखले अर्थशास्त्र व राज्यशास्त्र सामाजीक संशोधन संस्था, पुणे येथील विवेकानंद इन्स्टिटयूट ऑफ सोशल सायन्सेस रीसर्च(पुणे विद्यापीठ संलग्न राज्यशास्त्र संशोधन संस्था), ग्रंथालय टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे, जयकर ग्रंथालय पुणे विद्यापीठ, पुणे, औंध या संस्थानातील श्री भवानी चित्रसंग्रहालय व ग्रंथालय, बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालय शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, महात्मा गांधी सार्वजनिक वाचनालय, पेण, भाऊसाहेब नेने महाविद्यालय ग्रंथालय, पेण अशा अनेक ग्रंथालयातून संदर्भ एकत्रित करण्यात आले आहेत. तसेच संशोधक, (इतिहासाचार्य वि. का. राजवाडे संशोधन मंडळ धुळे, त्रैमासिक) या मासिकावरुन प्राथमिक स्वरुपाची माहिती संग्रहीत करण्यात आली आहे.

**४.मुलाखती व चर्चा :** कोल्हापूर येथील सरदार यादव, सरदार निंबाळकर, वरसई (कोकण प्रांत) येथील डॉ. भावे आणि गागोदे येथील विनोबा भावेंच्या आश्रमाचे काम पाहणारे गांधीवादी कार्यकर्ते श्री. दिवाण तसेच चौल-नागाव येथील इनामदार श्री. जोशी यांची प्रत्यक्ष भेट व चर्चा, मौजे अवसरी बु ।। ता. आंबेगाव, जिल्हा पुणे येथील श्री. मुलाणा यांच्याकडील १६० वर्षे जुने हस्तलिखित, काही ऐतिहासिक कागदपत्रे, दस्ताऐवज या सगळया कागदपत्रांचा अभ्यास करुन त्याचे प्रस्तूत अभ्यासाकरीता संदर्भ घेतले गेले आहेत. शिवकाळातील सनदा, आज्ञापत्रे यांचा आढावा घेण्यासाठी सरदार घराण्यातील काही

व्यक्तींच्या मुलाखतींचाही अभ्यास करण्यात आलेला आहे. तसेच काही संशोधकांशी चर्चा, त्यांची प्रश्नोत्तरे व निरिक्षण यावरुन तथ्ये प्राप्त करण्यात आलेली आहेत.

**५. ऐतिहासीक कागदपत्रे :** प्रस्तूत संशोधनात सूक्ष्म अभ्यास पध्दतीचा वापर करण्यात आला आहे. यात औंध(संस्थान), नागाव व वरसई(कोकण प्रांत),यांचा क्षेत्रीय अभ्यास करण्यासाठी ऐतिहासीक काळातील १७व्या, १८व्या, १९व्या शतकातील अर्थ व महसूल विषयक निवडक पत्रे यांचा समावेश आहे. वरसई गावातील महसूल व्यवस्था समजून घेण्यासाठी तेथील काही इनामदार मंडळींच्या सनदांचा आणि अप्रकाशित कागदपत्रांचा आढावा घेण्यात आला आहे. औंध येथील श्री भवानी ग्रंथालयामध्ये औंध संस्थानासंबंधीत कागदपत्रांची माहिती येथील उप अभिरक्षकांच्या मदतीने करुन घेतली आहे.

**थ. साहित्याचा आढावाः**–प्राचीन काळापासून आधुनिक काळापर्यंत महसूल व्यवस्था कशी संक्रमित झाली आहे याचा आढावा घेण्यासाठी या सर्व काळातील विद्वान, संशोधक आणि अभ्यासक यांच्या साहित्याची एक जंत्री बनविण्यात आली. त्याआधारे प्रस्तुत विषयाचा अभ्यास करण्यात आला आहे. त्यासाठी संशोधकाने अनेक पुस्तकांचा अभ्यास केला आहे. कालशः त्याचे वर्गीकरण पुढील प्रमाणे करता येईल. प्राचीन काळ, मध्ययुगीन काळ, शिवकाळ किंवा मराठेशाहीचा काळ, ब्रिटिश काळ, आधुनिक काळ (इ.स. १९५०पर्यंत) या कालखंडाचा अभ्यास करताना विविध ग्रंथालयातील विविध ग्रंथ, नियतकालिके, दस्तऐवज यांच्या अभ्यासावरुन एक लक्षात येते की संशोधक अभ्यासकांनी विविध कालखंडातील राज्यव्यवस्थांचा बारकाईने अभ्यास केलेला आढळतो. या अभ्यासातून महसूल व्यवस्थांची स्थिती या विविध कालखंडात कशी होती याची कल्पना येते. निरनिराळया कालखंडातील महसूल व्यवस्थांमध्ये कशी एकसुत्रता होती याचाही अभ्यास झालेला आढळतो. यापैकी काही महत्वाच्या संशोधन साहित्याचा पुढील प्रमाणे आढावा घेतलेला आहे.

1. राजनितीची मुलतत्वेः हेन्री सिजविक, वासुदेव बळवंत पटवर्धन, प्रो. धोंडो केशव कर्वे. आर्यविजय प्रकाशन, पुणे, १८९६.

'The Elements of Politics' लेखक Henri Sizvik या इंग्रजी पुस्तकाचा अनुवाद श्री.वासुदेव बळवंत पटवर्धन व प्रो. धोंडो केशव कर्वे यांनी "राजनितीची मूलतत्वे" या ग्रंथात जमीनीवर सरकारची मालकी असते, पण तिचा उपभोग व्यक्ती घेते. म्हणून व्यक्तीचा वहिवाटीचा हक्क उत्पन्न झाला असून प्राचीन काळापासून जमीनीच्या उत्पन्नावरील कर सरकारच्या उत्पन्नाच्या बाबीत धरल्याचे व कराचा सरकारमार्फत उपयोग स्पष्ट केला आहे.

2. भारतीयांची शासनपद्धतीः परशुराम म. लिमये, आर्य संस्कृती, पुणे, १९२८.

परशुराम यांच्या "भारतीयांच्या शासनपद्धती" यात कर या अर्थी बलि हा शब्द योजिलेला दिसतो. राजाशिवाय कोणालाही प्रजेकडून बलि घेण्याचा अधिकार नसे. अशी कर रचनेविषयीचे विवेचन करण्यात आले आहे.

3. प्राचीन भारतीय राजनितीः प्रा. सुधाकर देशपांडे, दास्ताने प्रकाशन, पुणे, १९८७.

प्रा.सुधाकर देशपांडे यांनी 'प्राचीन भारतीय राजनीती' या ग्रंथात राज्यसंस्थेचा उगम, तिचे स्वरुप, तिचा विकास या बरोबरच सांस्कृतिक जडणघडण, अर्थनिती, सामाजिक व्यवहार, राजकीय विचार प्रणाली या सर्वांच्या संदर्भात राजनीतीविषयक तत्वांचा विचार आवश्यक मानला आहे. एकीकडे वेद-पुराणे व दुसरीकडे इंग्रजी भाषेतील भारतीय व विदेशी विद्वानांची मते यांचा यात सखोल अभ्यास केला आहे.

४. Land Revenue Administration under the Mughals': N.A. Siddhiki, Indian Council of Historical Reasearch, Delhi, Trans. Dr. P.L. Saswadkar, Daimond Publication, Pune, I$^{st}$ edition, 2006.

'Land Revenue Administration under the Mughals' (N.A. Sidhiki) या पुस्तकाचा अनुवाद 'डॉ. प्र.ल.सासवडकर' यांनी केला आहे. या पुस्तकात अठराव्या शतकाच्या पूर्वार्धातील मोगलांच्या जमीन महसूल कारभाराचा तपशीलवार अभ्यास केलेला आहे. या मध्ये जमीन महसूल मागणीचे स्वरुप आणि तिचा विस्तार,

जमीनदार संस्था आणि शाखा, वजीराच्या कचेरीचे काम, तिचा शेती पद्धतीवरील परिणाम यांचा तपशीलवार अभ्यास केला आहे.

5. ऐतिहासिक फार्सी साहित्य-खंड ५: इतिहास संशोधक संपा. ग.ह. खरे, भारत इतिहास संशोधन मंडळ, स्वीय ग्रंथमाला, १९७३, पुणे.

इतिहास संशोधक गणेश हरी खरे यांनी 'ऐतिहासिक फार्सी साहित्य' (सहावा खंड) यात औरंगजेबाच्या दरबाराचे अखबार संग्रहीत केले आहेत. मुघल बादशहाच्या दरबारातील पहिल्या २८ वर्षातील बातम्या लिखित स्वरुपात संग्रहीत करण्यात आल्या आहेत.

6. 'The Administrative of the Mughal Empire': I.H. Qureshi, N.V.Publication, Lohanipur, Patna,3

'The Administrative of the Mughal Empire' (I.H. Qureshi.) या पुस्तकात मोगल प्रशासन व्यवस्थांचा तपशीलवार अभ्यास करण्यात आला आहे. प्रा. कुरेशी यांनी 'The Administration of the Mughal Empire' या ग्रंथात मुघलकालीन साम्राज्याचे विभाजन प्रांतवार आणि स्थानिक सरकारमध्ये कशा प्रकारचे आहे हे स्पष्ट केले आहे. तसेच मुघल सरकारने प्रशासन चालविताना महत्व दिलेल्या तत्वांचा आढावा घेतला आहे.

7. 'State Taxation in India' :Dr. Rajendra Jain. Progress Publication, Bhopal, 1st Edition 1972.

डॉ. राजेंद्र जैन यांच्या 'State Taxation in India' या १९७२ मधील पुस्तकात त्यांनी मध्ययुगीन काळापासून आधुनिक काळापर्यंत कर व्यवस्थेत जमीन महसूलाचे असणारे प्रमाण याचा थोडक्यात आढावा घेऊन आधुनिक काळातील करांचे राज्यातील प्रमाण याचे विवेचन केले आहे.

8. 'Administrative System of the Maraths': Dr. S.N.Sen, University of Calcutta, Calcutta,1925.

Administrative System of the Maraths': Dr. S.N.Sen या पुस्तकात शिवकाळातील आणि पेशवेकाळातील प्रशासन व्यवस्था यांचा तपशीलवार अभ्यास करण्यात आला असून प्राचीन काळातील हिंदू ग्रामसंस्थांचा आणि कायदे यांच्या वारश्यामधून हिंदू आणि मुसलमान प्रशासन व्यवस्था निर्माण झाल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. हिंदू

व मुसलमान प्रशासनाच्या तत्वांचा परस्परांवर कसा परिणाम झाला याचे मराठयांचे प्रशासन एक उत्तम उदाहरण आहे.

9. 'मराठयांचा इतिहास': डॉ. अ.रा. कुलकर्णी, संपादक श्री. ग.ह.खरे, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथसंपदा निर्मिती, पुणे १९१८.

   डॉ. अ.रा. कुलकर्णी व इतिहास संशोधक प्रा. ग.ह. खरे यांनी 'मराठयांचा इतिहास' यात चौथाई व सरदेशमुखी याचे आणि कराचे उत्पन्न रोकड स्वरुपात प्रत्येक सुभ्यातून जमा करण्याच्या व्यवस्थेचे चित्रण केले आहे.

10. 'रामचंद्रपंत अमात्यांचे आज्ञापत्र': संपादक डॉ. अ.रा. कुलकर्णी, डायमंड प्रकाशन, पुणे, २००७.

   डॉ. अ.रा. कुलकर्णी यांचा रामचंद्रपंत अमात्यांचे आज्ञापत्र अथवा शिवकालीन राजनीती हा ग्रंथ मराठयांच्या इतिहासाचे एक अव्वल साधन म्हणून मानला जातो. शिवकालीन राज्यकारभार स्पष्ट करणारा असा हा ग्रंथ आहे. यामध्ये शिवाजी महाराजांची काही अस्सल पत्रे आहेत. अधिकाऱ्यांना शिवाजी महाराजांनी केलेला उपदेश यात सविस्तरपणे सांगितला आहे.

11. 'Land Revenue & Public Finance in Maratha Administration': Prof. H.B. Vashishta, Oriental Publishers, Delhi, I$^{st}$ Edition ,1975.

   'Land Revenue & Public Finance in Maratha Administration'या ग्रंथात प्रो.एच्. बी. वशिष्ट यांनी मुलुखगिरी, चौथ, घासदाणा यासारख्या महसूल स्त्रोतांची चर्चा केली आहे. तसेच जमीन महसुलाची व्यवस्था, सरदेशमुखी अशा अनेक महसूल व्यवस्थेविषयक बाबींचे विवेचन केले आहे.

12. 'Shivaji & His Time': Dr. B.K. Kamble, Shivaji University, Kolhapur, 1982

   डॉ. बी. के कांबळे यांच्या 'Shivaji & His Time'या इंग्रजी ग्रंथामध्ये शिवाजींनी स्वराज्याचे प्रांत आणि परगणा असे विभाजन केल्याचे दिसते. तसेच शिवाजीने युध्दाचा वापर राज्याच्या उत्पन्न प्राप्तीसाठी केला असल्याचे दिसते. त्यांनी चौथ आणि सरदेशमुखी यांचे ही यात वर्णन केले आहे.

13. 'शिवचरित्र साहित्य', खंड ७: संपादक इतिहास संशोधक श्री. कृ.वा. पुरंदरे व ब. द. आपटे भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे.

इतिहास संशोधक श्री. कृ.वा. पुरंदरे व ब. द. आपटे यांनी पेशवेदप्तरातील अनेक कागदपत्रे यात एकत्रित केली आहेत. मुलकी खात्याविषयीचा अभ्यास करण्यास उपयोगी पडणारी कागदपत्रे यात एकत्रित केली आहेत.

14.शिवकालीन पत्रसार संग्रह, खंड १, २, ३: संपादक शंकर नारायण जोशी, भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे,१९३७.

इतिहास संशोधक शंकर ना. जोशी यांनी १९३७ मध्ये 'शिवकालीन पत्रसार संग्रह' (खंड १, २, ३) संपादीत केला. महाराष्ट्राच्या इतिहासाची साधने असणाऱ्या या ग्रंथात ऐतिहासिक पत्रे साररुपाने संग्रहीत केली आहेत.

15.जिजाबाईकालीन कागदपत्रे :संपादक डॉ. अप्पासाहेब पवार, शिवाजी विद्यापीठ, ऐतिहासिक ग्रंथमाला, पुष्प पाचवे, १९७८, किं. १५ रु.

डॉ. अप्पासाहेब पवार यांनी संपादित केलेला 'जिजाबाईकालीन कागदपत्रे' खंड ५ यामध्ये महाराणी जिजाबाई (करवीर राज्य निर्माण करणारी महाराणी) यांच्या कारकिर्दीशी संबंधीत २७७ कागदांचा अंतर्भाव करण्यात आला आहे. जिजाबाईंनी शिवाजी राजे यांच्या लहानपणी करवीर राज्याचा गाडा मोठया कुशलतेने आणि धोरणीपणाने चालविला. हे या खंडातील पत्रांवरुन दृष्टोत्पतीस येते.

16. नागाव-आर्थिक सामाजिक जीवन, १७६० ते १८४० : इतिहास संशोधक शां.वि. आवळसकर, गोखले अर्थशास्त्र संस्था, पुणे, १९६८.

इतिहास संशोधक शां.वि. आवळसकर यांनी 'नागाव-आर्थिक व सामाजिक जीवन'(१७६०-१७४०).यात नागावच्या राजकीय इतिहासाचे वर्णन करुन तेथील ब्राम्हण समाजाच्या परिस्थितीचा आढावा ठळकपणे करण्यात आला आहे. तसेच इतर जाती जमातींच्या परिस्थितीचे चित्र रेखाटण्याचा प्रयत्न करताना तत्कालीन नागावमधील आंग्रेंनी लावलेल्या कर पद्धतीचे वर्णनही करण्यात आले आहे.

17. कुलाबकर आंगरे सरखेल (आंगरे शकावली): इतिहास संशोधक दा.गो. ढबू, शं.ना.जोशी, कर्नाटक प्रि.प्रेस, मुंबई,शके १८६१.

इतिहास संशोधक दा.गो. ढबू यांनी 'कुलाबकर आंगरे' यामध्ये कुलाब्याच्या आंगऱ्यांचा इतिहास सविस्तर स्पष्ट केलेला दिसतो. यामध्ये आंगरे यांच्या कुलाब्यातील राजवटीविषयीचे सविस्तरपणे विवेचन केले आहे.

18. आंगरेकालीन अष्टागरः संपादक व प्रकाशक शां.वि. आवळसकर, यशोदा चिंतामणिनिधी पुरस्कृत ग्रंथमाला क्र. १६, अ.वि.गृह पुणे, १९४७.

'आंगरेकालीन अष्टागर' या इतिहास संशोधक शां.वि. आवळसकरांच्या पुस्तकातही कुलाबा भागातील अष्टागरांचा अभ्यास आलेला दिसतो. यात आठ आगारांचा उल्लेख सविस्तरपणे करण्यात आला आहे.

19. आंगरेकालीन पत्रव्यवहार, इतिहास संशोधकः शां.वि.आवळसकर,भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे, १९४८.

इतिहास संशोधक शां.वि. आवळसकरांच्या 'आंगरेकालीन पत्रव्यवहार'यामध्ये कुलाबा प्रांतातील सर्व पत्रे संग्रहीत करण्यात आली आहेत. या पत्रांमध्ये कुलाबा प्रांतातील चौल, महाल, अलिबाग, राजपूरी, महाड, पेण या तालुक्यांसंबंधी आंगरेकालीन पत्रांचा संग्रह करण्यात आला आहे.

20. शिवकालीन महाराष्ट्रः डॉ. अ.रा. कुलकर्णी, राजहंस पुणे, १९९७, किं. १२० रु.

डॉ. अ.रा. कुलकर्णी यांचे 'शिवकालीन महाराष्ट्र' यात १७ व्या शतकातील आर्थिक जीवन विस्तृतपणे मांडले आहे. मराठयांचे राज्य म्हणजे लुटारुंचे राज्य अथवा लष्करी राजवट अथवा सरंजामशाही नसून ते 'बहुत जनांसी आधारु' असे लोकांचे राज्य होते. त्या राज्याच्या राजमुद्रेत 'भद्राय राजते' अशी अक्षरे होती. शिवाजीं महाराजांनी निर्माण केलेल्या 'कल्याणकारी' राज्याचा विस्तार जरी छोटा असला तरी 'आर्थिक दृष्टया' त्याला स्थैर्य देण्यासाठी त्यांनी केलेल्या प्रयत्नांचे विवेचन यात केले आहे.

21. रायगडची जीवनकथाः इतिहास संशोधक शां.वि. आवळसकर, महाराष्ट्र शासन, मुंबई, १९६२.

इतिहास संशोधक शां.वि. आवळसकरांनी लिहिलेले 'रायगडची जीवनकथा पुस्तक' हे रायगड किल्ल्याबरोबर रायगडच्या परिसरातील ऐतिहासिक परिस्थितीची विवेचन करणारे आहे. यात रायगडविषयक ऐतिहासिक माहिती एकत्रित करण्यात आली आहेत.

22. Rise of the Maratha Power: M.G. Rande, Mahiti Prasaran Mantralay, .
Government of India, New Delhi, 1967
इतिहास संशोधक म.गो.रानडे यांनी 'मराठयांचा उत्कर्ष' (१९००) Rise of Maratha Power यात शिवाजी महाराजांची राज्यव्यवस्था, चौथ, सरदेशमुखी पद्धती या महत्वांच्या बाबींचा उल्लेख केला आहे. भारतीय दृष्टीकोनातून इतिहासाचे विवेचन करुन मराठयांच्या इतिहासाचे सत्य स्वरुप मर्म स्पष्ट केले आहे.
23. New History of the Marathas, Vol.II: G.S. Sardesai, Phoenix Publi.,
. Mumbai,1957
इतिहास संशोधक गोविंद सखाराम सरदेसाई यांनी 'New History of the Marathas' याचे तीन खंडात लेखन केले आहे. मराठयांच्या विषयीचे गैरसमज दूर करणे हा त्यांच्या लेखनामधील प्रमुख हेतू होता. मराठयांच्या इतिहासाविषयीचे सविस्तर विवेचन यात करण्यात आले आहे. साध्या व सोप्या शैलीत त्यांनी मराठी इतिहास मांडला आहे. त्याबरोबर त्यांनी मुसलमानी रियासत, (खंड २) मराठी रियासत (खंड ८) आणि ब्रिटिश रियासत (खंड दोन) याचे लेखन केले आहे. मराठयांच्या इतिहासावर विस्तृत व विपुल असे लेखन यांनी केले आहे.
24. House of Shivaji: Sir J.N. Sarkar, 3rd edition, Culcutta, 1955
इतिहासकार जदुनाथ सरकार यांच्या 'House of Shivaji' या १९४० मधील ग्रंथात विविध प्रकारचे मराठयांच्या इतिहासातील विविध प्रकारचे शोध निबंध, राजवाडे, खरे, साने, पारसनीस या इतिहासकारांवरील समीक्षात्मक लेख यांचे लेखन करण्यात आले आहे. यात त्यांनी मलिक अंबर, शहाजी यांच्यावरचे संशोधनात्मक लेख यात अंतर्भूत करण्यात आले आहेत.
25. Military System of the Marathas: Dr. S.N. Sen., Calcutta 1928.
डॉ. एस्. एन्. सेन यांनी १९२८ मध्ये 'Military System of the Marathas' हा ग्रंथ मराठयांची सनदी आणि लष्करी व्यवस्थेचा अभ्यास करुन प्रसिद्ध केला आहे. मराठयांच्या लढायांचे वृत्तांत, नकाशे यांचा यात अंतर्भात करण्यात आला आहे.
26. Shivaji - The Great, Parts I and II: Dr. Bal Krishna, Taraporewala and Sons, Bombay, 1932.

डॉ. बाळकृष्ण यांनी (१९३२) 'Shivaji the Great' या ग्रंथाचे चार भागात लेखन केले आहे. यातील चौथ्या भागात प्रामुख्याने सनदी आणि लष्करी आर्थिक व्यवस्थेसंबंधीची माहिती स्पष्ट करण्यात आली आहे. शिवकालीन अर्थव्यवस्थेचे वर्णन करताना त्यांनी शिवकालीन समाज पूर्णपणे स्वयंनिर्भर असल्याचे स्पष्ट केले आहे.[९] तसेच डॉ. बाळकृष्ण यांनी लष्करी छावण्याच्या खर्चाबाबत असे म्हटले आहे की, "मोगल किंवा दक्षिणेकडील मुस्लिम सत्ताधीश यांच्याशी तुलना करता शिवाजीचा या गोष्टीवरील खर्च कमी असला पाहिजे याचे कारण शिवाजीच्या लष्कराची व शिवाजीची साधेपणाची राहणी हे होय."[१०]

27. नरहर शुंभराव भावे : वि.प्र. दिवाण, साहित्य प्रकाशन, मुंबई, १९८९, किं. ३० रु.

विजय प्र. दिवाण यांनी आपल्या 'नरहर शंभुराव भावे' या पुस्तकामध्ये आचार्य विनोबा भावे यांचे वडिल नरहर भावे यांचे चरित्र रेखाटले आहे. नरहर शंभुराव भावे यांच्या घराण्यातील एका वंशजाला आंग्रेंनी शके १७२९ मध्ये सनद दिली होती. त्याप्रमाणे भावे यांच्याकडे गागोदे हे गाव इनाम असण्याची सनद या पुस्तकातून देण्यात आली आहे.

28. मराठा आणि महाराष्ट्रः डॉ.अ.रा. कुलकर्णी, डायमंड, पुणे, प्रथमावृत्ती, २००७.

डॉ. अ.रा. कुलकर्णी यांचे 'मराठे आणि महाराष्ट्र' यात मराठयांच्या इतिहासाच्या साधनांचा परिचय करुन दिला आहे. वास्तव इतिहासाचे लेखन अस्सल साधनांच्याशिवाय करता येत नाही. हे मूलतत्व इतिहासाच्या अभ्यासकांना दर्शवून देण्यासाठी प्रमाणभूत अस्सल साधने जोडलेली आहेत.

29. शिवाजी व शिवकालः डॉ. जयसिंग पवार, फडके प्रकाशन, कोल्हापूर, १९८७.

डॉ. जयसिंगराव पवार यांनी 'शिवाजी व शिवकाल' यात शिवाजी महाराजांच्या स्वराज्याचे चित्रण केले आहे. राज्य कारभाराची विभागणी १८ कारखाने, १२ महाल यांचे वर्णन करुन चौथाई आणि सरदेशमुखीविषयक व्याख्या केल्या आहेत.

---

९. Shivaji- The Great, Part I & II, Dr. Bal Krishna, Taraporewala and Sons, Bombay, 1932. p 41.

१०. Shivaji- The Great, Part I & II, Dr. Bal Krishna, Taraporewala and Sons, Bombay, 1932. p 41.

30. 'मराठे व ब्रिटिशकालीन भारत': इतिहास संशोधक नी. सी. दीक्षित, पिंपळापुरे प्रकाशन,

१९९२.

इतिहास संशोधक नी.सी.दीक्षित यांनी 'मराठे व ब्रिटिशकालीन भारत' यामध्ये चौथाई आणि सरदेशमुखीबरोबर मराठे काळातील महसूल व्यवस्थेचे चित्रण केलेले आहे.

31. महाराष्ट्राचा इतिहास - मराठा कालखंड - शिवकाल (१६३०-१७७३): डॉ. वि. गो. खोबरेकर, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृति मंडळ, मुंबई, २००६, किं. २७

डॉ. वि.गो. खोबरेकर यांनी 'शिवकाल' (१६३०-१७०७), भाग २, या ग्रंथात शिवकालीन स्वराज्याची कारभार यंत्रणा याविषयीची सविस्तर माहिती स्पष्ट केली आहे. शिवकालीन राज्यव्यवस्था, ग्रामशासन व्यवस्था, शेती, महसूल व्यवस्था, स्वराज्याचे उत्पन्न याविषयीची माहिती या ग्रंथातून सविस्तरपणे प्राप्त होते.

32. Organization of State Govt. and Maharashtra: Dr. S.S. Gadkari, Indian Public Administration Institute (Maharashtra), Mumbai, 1990.

डॉ. एस. एस. गडकरी यांचे १९९०मधील 'Organisation of the State Government of Maharashtra' याचा अनुवाद श्री. वि. खांदेवाले यांनी केला आहे. शासनाचा कारभार हजारी सरकारी कार्यालये, स्थानिक स्वराज्य संस्था व शासकीय उपक्रम यातून चालत असल्यामुळे व सरकारच्या संघटनात वारंवार बदलही होत असल्यामुळे ही माहिती अद्ययावत दृष्टया गडकरी यांनी मांडली आहे.

33. श्री. राजा शिवछत्रपती (१ व २ भाग): इतिहासकार श्री. गजानन भा. मेंहदेळे, डायमंड पब्लीकेशन्स, पुणे, मार्च २००७.

इतिहासकार श्री. गजानन भास्कर मेंहदळे यांनी 'श्री. राजा शिवछत्रपती' या ग्रंथ्राच्या ३ भागामध्ये विविध कागदपत्रांच्या पुराव्यासह शिवाजी महाराजांच्या कारकिर्दीचा आढावा घेतला आहे. त्यामध्ये शिवाजी महाराजांच्या अनेक मोहीमा, आक्रमणे याचे कागदोपत्री पुरावे दिलेले आहेत. उदा. कल्याण-भिवंडी लूट, दंडाराजपूरीची मोहीम.

34. भोसल्यांच्या बंगालवरील स्वाऱ्याः इतिहास संशोधक श्री. बाळकृष्ण नारायण सहस्त्रबुध्दे, (गोंदिया), राजवाडे संशोधन मंडळ, धुळे १९४४.

इतिहास संशोधक श्री. बाळकृष्ण नारायण सहस्त्रबुध्दे यांनी 'भोसल्यांच्या बंगालवरील स्वाऱ्या' या ग्रंथामध्ये मराठी साम्राज्याचे एक प्रमुख सरदार नागपूरकर भोसले यांचा बंगाल प्रांताशी जो संघर्ष झाला त्याविषयीची ऐतिहासिक माहिती दिली आहे. या ग्रंथातून मराठयांचा व बंगाल प्रांतातील लोकांच्या संबंधाची स्वतंत्रपणे तपशीलवार माहिती दिलेली आहे. मराठे राज्यकर्त्यांनी चौथाई वसूलीच्या अधिकाराने हिंदूस्थानांत मोठा साम्राज्य विस्तार केल्याचे वर्णन श्री.बाळकृष्ण नारायण सहस्त्रबुध्दे यांनी पुढील शब्दात केले आहे. "या चौथाईनेंच पुढे जवळजवळ एक शतक सर्व हिंदुस्थानांत या चिमुकल्या मराठी राज्यांचे साम्राज्यांत रुपांतर झाले. मराठी राज्याची हद्द उत्तरेस यमुना नदी, दक्षिणेस कर्नाटक, पश्चिमेस गुजराथ, व पूर्वेस जगन्नाथपुरी पर्यंत वाढली." [११]

---

११. भोसल्यांच्या बंगालवरील स्वाऱ्याः इतिहास संशोधक श्री. बाळकृष्ण नारायण सहस्त्रबुध्दे,(गोंदिया),राजवाडे संशोधन मंडळ, धुळे १९४४.

**संदर्भ-**


१. प्राचीन भारतीय राजनीती, प्रा. सुधाकर देशपांडे, दास्ताने प्रकाशन, पुणे, १९८७, प्रथमावृत्ती,

२. मराठेकालीन संस्था व विचार : प्रा.आर.डी.गायकवाड, प्रा.डी.डी.थोरात, प्रा.बी.एन.सरदेसाई, प्रा.व्ही.एन.हनमाने,फडके बुकसेलर्स, कोल्हापूर, द्वितीयावृत्ती, १९८७,

३. मराठी रियासत खंड २ इतिहासकार श्री.गो.स.सरदेसाई, प्रकाशकः केशव ढवळे प्रकाशन,गिरगाव,मुंबई, १९२३

४. Land Revenue & Public Finance in Maratha Administration Prof.H.B.Vashishta Oriental Publishers & Distributions, Delhi, 1975 lst edition

५. ऐतिहासीक फार्सी साहित्या खंड ६वा - औरंगजेबाच्या दरबाराचे अखबारः संपादकः प्रा.गणेश हरी खरे, प्रकाशकः चिटणीस, भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे. १९७३

६. ऐतिहासीक फार्सी साहित्या खंड ६वा - औरंगजेबाच्या दरबाराचे अखबारः संपादकः प्रा.गणेश हरी खरे, प्रकाशकः चिटणीस, भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे. १९७३

७ मराठयांची प्रशासन व्यवस्था अनु. विजया कुलकर्णी, मुंबई, प्रथमावृत्ती, २००३.

८ भोसल्यांच्या बंगालवरील स्वाऱ्या, बाळकृष्ण नारायण सहस्त्रबुध्दे, (गोंदिया), राजवाडे संशोधन मंडळ, धुळे, १९४४, किं. २ रु,

९. Shivaji- The Great, Part I & II, Dr. Bal Krishna, Taraporewala and Sons, Bombay, 1932. p 41.

१०. Shivaji- The Great, Part I & II, Dr. Bal Krishna, Taraporewala and Sons, Bombay, 1932. p 41.

११.भोसल्यांच्या बंगालवरील स्वाऱ्याः इतिहास संशोधक श्री. बाळकृष्ण नारायण सहस्त्रबुध्दे, (गोंदिया), राजवाडे संशोधन मंडळ, धुळे १९४४.


-------♦ ♦ ♦ ♦-------

# प्रकरण दोन

## राज्य आणि महसूल व्यवस्था

राज्य आणि महसूल व्यवस्था एकमेकांशी संलग्न असल्याचे प्राचीन काळापासून स्पष्टपणे दिसते. राज्य व्यवस्था निर्माण झाल्यानंतर महसूल व्यवस्था निर्माण झालेली आहे. जिथे राज्यच अस्तित्वात नसेल तिथे महसूल व्यवस्थेचे अस्तित्वच असणार नाही. तसेच प्राचीन काळापासून असे दिसून येते की ज्या काळापासून राज्यसंस्था निर्माण झाली. त्या काळापासूनच राज्याची महसूल व्यवस्था निर्माण होत गेली. पूर्व वैदिक काळ किंवा ब्राम्हण्यकाळात असे दिसते की सुरुवातीला लोकांनी राज्य चालविण्यासाठी आपल्या उत्पन्नातील काही भाग स्वेच्छेने दिला आणि त्यातून राज्यसंस्था चालविण्यास सुरुवात झाली पण जसजसे राज्याचे कार्य वाढत गेले तसतसे राज्याला स्वेच्छेने मिळणारा उत्पन्नाचा भाग अपुरा पडू लागला. म्हणून मग राज्याने सक्तीने लोकांकडून उत्पन्नाचा काही भाग वसूल करण्यास सुरुवात केली. यातूनच हळूहळू आर्थिक प्रशासनाची निर्मिती होत गेली.

प्रशासन म्हणजे लोकांची काळजी घेणे किंवा लोकांची सेवा करणे किंवा कार्याची व्यवस्था पाहणे. राज्याच्या प्रशासनात आर्थिक प्रशासन हा अत्यावश्यक घटक मानला जातो. शासनसंस्थेला, राज्याला विविध स्वरुपाची कार्ये पार पाडण्यासाठी पैशाची व्यवस्था करावी लागते. लॉर्ड जॉर्ज यांनी असे म्हटले आहे की, शासन म्हणजे वित्तपुरवठा किंवा वित्तव्यवस्था होय. (Government is Finance)

रिचव्यूच्या मते- पैशाची व्यवस्था किंवा वित्ताच्या योजना म्हणजे राज्याचे स्नायू, मज्जातंतू आहेत. (Finance are the Nerves of the state)

राज्य चालविण्यासाठी राज्याला पैशाची आवश्यकता असते. हा पैसा उपलब्ध करुन देण्याचे कार्य मुख्यत्वे महसूल किंवा कर व्यवस्था करत असते. त्यामुळे महसूल व्यवस्था हा राज्याचा आत्मा आहे असे म्हणता येईल. आधुनिक काळात राज्यव्यवस्थेची जबाबदारी वाढलेली आहे. राज्याला लोककल्याणाची कार्ये पार पाडण्यासाठी पैशाची व्यवस्था करावी लागते. त्यासाठी आधुनिक काळात व्यक्तिगत करापासून अनेक प्रकारे कराचे मार्ग उपलब्ध केलेले दिसतात.

प्रो. एल्.डी. व्हाईट यांच्या मते राज्याच्या प्रशासनाची प्रत्येक कृती पैशाच्या व्यवस्थेतून चालते. वित्ताची व्यवस्था ठेवणे म्हणजे राज्याच्या प्रशासनाची व्यवस्था कार्यक्षमतेने पार पाडणे होय. वित्त आणि प्रशासन या दोन्ही गोष्टी एकमेकांपासून वेगळया

करता येत नाहीत. ज्याप्रमाणे मनुष्याची सावली त्याच्यापासून अलग करता येत नाही त्याप्रमाणे प्रशासनापासून वित्तव्यवस्था वेगळी करता येत नाही. करांच्या माध्यमातून जमा होणाऱ्या पैशाचे व्यवस्थापन वित्तव्यवस्थेमार्फत केले जाते. राज्याचे प्रशासन चालविण्यासाठी महसूल व्यवस्था महत्वपूर्ण भूमिका बजावित असते. राज्याकडे कराच्या माध्यमाशिवाय इतरही काही उत्पन्नाचे मार्ग असतात. पण त्या सर्वांपेक्षा महसूल व्यवस्थेतून राज्याकडे उत्पन्न जमा होत असते.

प्राचीन काळी कौटिल्याच्या अर्थशास्त्र ग्रंथात याचे दाखले मिळतात. कौटिल्याचे मत असे होते की, "राज्याची सर्व कार्ये वित्तावर अवलंबून असतात."[१] त्यामुळे त्या काळातही कौटिल्याने राज्याला अनेक उत्पन्नाचे मार्ग सुचविले होते तसेच कर व्यवस्था विस्तारीत बनविली होती. अनेक छोटया आणि मोठया व्यवसायांवर, सेवांवर त्यांनी कर लावलेला दिसतो. समाजातील प्रत्येकाने राज्याकडे कोणत्या ना कोणत्या स्वरुपात कर द्यावा याला प्राचीन काळी महत्व देण्यात आलेले दिसते. तसेच चौल-नागावमध्ये ही प्रत्येक व्यक्तीच्या घरासमोर असणारे माड (नारळाचे झाड) याचे नारळ, सुपारीच्या सुपाऱ्या, नारळाचे झाप या स्वरुपात आंग्रे सरकारने कर जमा केल्याचे दिसते. शिवकाळात आणि पेशवेकाळातही समाजातील जवळजवळ सर्व व्यवसायांवर कमी-अधिक प्रमाणात कर लादलेले दिसतात. म्हणजेच राज्याची व्यवस्था चालविण्यासाठी पैसा, सेवा या स्वरुपात कर जमा करुन राज्यव्यवस्था वृध्दींगत करण्याचे प्रयत्न झालेले दिसतात.

यासाठी आधुनिक भारतात स्वतंत्र अशा महसूल विभागाची निर्मिती करण्यात आली आहे. महसूल गोळा करण्याची ध्येय धोरणे व योजना या संबंधीचे कार्य महसूल विभाग करतो. केंद्रीय महसूल मंडळामार्फत (Central Board of Revenue) महसूल जमा करण्याचे काम केले जाते. जकात, आयकर, केंद्रीय अबकारी कर, विक्रि कर, स्टॅम्प डयुटीज, इन्शुरन्स, प्रॉमिसरी नोटस् इ. बाबत हा विभाग कार्य करीत असतो.

केंद्रीय अर्थमंत्रालयाकडून कराची आकारणी व वसूलीचे कार्य केले जात असते. त्यासंबंधीचे विशिष्ट नियम व पध्दती ठरविली जाते. करांची आकारणी करणे, प्रत्यक्ष वसूली करणे असे या संबंधीच्या कार्याचे दोन भाग आहेत. यापैकी करांची आकारणी कशी, किती, कशाप्रकारे, कोणी कर द्यावा या विषयीचे धोरण ठरविणे आणि करदात्याकडून कर वसूल

१. Kautilyan Arthasastra : M.B.Chande, Atalantic Publisher, New Delhi, 2004. P.44

करुन तो एकत्रित ठेवणे ही दोन्ही कार्ये स्वतंत्र भारतात अर्थमंत्रालयाकडून राजस्व विभाग (Dept.of Revenue), केंद्रीय राजस्व मंडळ (Central Board of Revenue) या दोन विभागांकडून केली जातात. प्राचीन काळी देखिल काही अंशी अशा प्रकारच्या महसूल व्यवस्था अस्तित्वात असलेल्या दिसतात. मौर्य काळात असा स्वतंत्र विभाग असलेला दिसतो तसेच मोगल काळात, शिवकाळातही यासाठी स्वतंत्र यंत्रणा निर्माण केलेली दिसते.

**महसूल व्यवस्था -**

महसूल हा राज्याला उपलब्ध असलेला अत्यंत महत्वाचा आर्थिक स्त्रोत असतो. महसूलाच्या आधारे राज्य आपली सामाजिक, आर्थिक, राजकीय उद्दिष्टे साध्य करण्याचा प्रयत्न करत असते. महसूल म्हणजे संपत्तीचा काही भाग सरकारला देणे होय. कर हे सरकारच्या उत्पन्नाचे प्रमुख साधन आहे. वेगवेगळया अर्थशास्त्रज्ञांनीं कराच्या व्याख्या केलेल्या आहेत. [२]

ब्लॅक स्टोनच्या मते, कराच्या रुपाने संपत्तीचा काही भाग सरकारला देऊन त्याच्या मोबदल्यात इतर संपत्ती उपभोगण्याची खात्री नागरिकाला प्राप्त होते.लोकांनी महसूल किंवा कर दिल्यामुळे राज्य स्वतःच्या वेगवेगळया व्यवस्था बनविते आणि त्यातून लोकांचे संरक्षण करते. लोकांच्या कल्याणाचा विचार करुन अनेक सुविधा-सोई निर्माण करते. म्हणूनच कर किंवा महसूल राज्याचा अत्यंत महत्वपूर्ण आर्थिक स्त्रोत आहे. ज्यातून राज्याला पैसा मिळतो.

प्रा. डाल्ट यांनी, “कर सक्तीचे देणे आहे व त्याचा सममूल्य सेवेशी काही संबंध नाही.” प्रा. डाल्टच्या व्याख्येनुसार कर म्हणजे सार्वजनिक सत्तेला अनिवार्यपणे द्यावी लागणारी रक्कम, की ज्यामध्ये करदात्याला तेवढयाच प्रमाणात सेवा प्राप्त होत नाहीत, कराची रक्कम करदात्याला कोणत्याही प्रकारच्या कायदेशीर अपराधाबद्दल दंड म्हणून बसविली जात नाही. सेलिग्मन यांच्या मते, सार्वजनिक खर्च चालविण्याकरिता जेव्हा सरकार व्यक्तीकडून कोणताही प्रत्यक्ष मोबदला न देता, सक्तीने रक्कम वसूल करते त्याला कर म्हणतात. सेलिग्मनेच्या व्याख्येनुसार, कर हा व्यक्तीकडून सक्तीने घेतला जातो व सर्व हितासाठी खर्च केला जातो आणि वैयक्तिक लाभाशी त्याचा काही संबंध नाही. फ्रेडरिक टेलर यांच्या मते, प्रत्यक्ष फलाची अपेक्षा न धरता करदात्याने सरकारला सार्वजनिक खर्चासाठी जी सक्तीची रक्कम दिलेली असते त्याला कर म्हणतात. ॲडम्स

---

२. राजस्व प्रा.सु.रा. ओझरकर, विद्या प्रकाशन, नागपूर, १९६९, पा. ९०.

स्मिथ यांच्या मते, कर म्हणजे राज्यासाठी नागरिकांनी केलेले अंशदान होय. म्हणजेच नागरिकांनी राज्यासाठी काही प्रमाणात कर देणे आवश्यक असते. कौटिल्य यांच्या मते, प्रत्येकाने राज्याला दिलेला हिस्सा म्हणजे कर.

राज्यामध्ये राहणारा प्रत्येक जण खेडयात असो किंवा शहरात राहणारा असो आणि त्याची इच्छा असेल अगर नसेल पण त्याला राज्याकडे कर जमा करावाच लागतो. या विचारवंताच्या व्याख्यांवरुन असे म्हणता येईल की, कर देणारा आणि राज्य यांच्यात कोणताही करार न होता देखिल करदाता उत्पन्नाचा काही भाग राज्याला देतो आणि या भागामधूनच राज्य आपले व्यवहार चालविते. आधुनिक काळ असो की प्राचीन काळ असो नागरिकांना आपल्या उत्पन्नातील काही भाग कर म्हणून राज्याला द्यावा लागतो.

सर्व काळात अस्तित्वात असलेल्या करपध्दतीची काही वैशिष्टये आहेत.[३] कराची वसुली सक्तीने केली जाते. स्वेच्छेने जर लोकांनी कर दिला नाही तर प्रशासनाकडून कर वसूलीसाठी सक्ती केली जाते. यासाठी कर भरणे हे व्यक्तीचे सार्वजनिक कर्तव्य आहे. याची जाणीव ठेवणे आवश्यक आहे. कराचा मोबदला सामुदायीक असल्याने जितका कर भरला आहे तितका मोबदला असे समीकरण कर व्यवस्थेत नसते. कराच्या प्रमाणात सार्वजनिक सेवा, संरक्षण यांचा मोबदला असे मोजमाप करुन राज्य सेवा देत नाही, तर राज्याकडून सर्वांना सारख्याच प्रमाणात सेवा, संरक्षण दिल्या जातात. कर देये हे एका प्रकारे राज्याच्या आज्ञा, कायदा याला मान्यता देणेच असते आणि राज्यात राहणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला कायदयाचे पालन करावेच लागते. म्हणूनच कर न देणे किंवा कर चुकविणे हा कायदेशीर गुन्हा असतो. कर भरणे हे महत्वाचे सार्वजनिक कर्तव्य आहे. व्यक्तीचे सर्व उत्पन्न कर म्हणून कधीच घेतले जात नाही, तर कर हा उत्पन्नाचा काही भाग असतो. कर हे सरकारी उत्पन्नाचे प्रमुख साधन आहे. सरकारच असे कर वसूल करु शकते. सार्वजनिक कार्याकरिता व्यक्तीच्या किंवा संस्थांच्या उत्पन्नचा जो भाग सक्तीने वसूल केला जातो त्याला कर असे म्हणतात. आधुनिक सरकारला कर आकारणे हे अतिशय आवश्यक झाले आहे. कर आकारताना काही मार्गदर्शक तत्वांचा अवलंब केला जातो. [४]

ॲडम स्मिथ या सनातनवादी अर्थशास्त्रज्ञाने लाभ तत्वाची मांडणी केली आहे. या तत्वानुसार प्रत्येक नागरिकाला सरकारने केलेल्या कार्याचा अगर खर्चाचा लाभ ज्या

3. Modern Economic Theroy : K.K. Dewette, Shyam Lal Charitable Trust, New Delhi, 1992, P. 102.
४. तत्रैव, पान ११०.

प्रमाणात मिळत असेल त्या प्रमाणात त्याने कर द्यावा. लाभाच्या प्रमाणात कर-आकारणी करावी. म्हणजे ज्यांना जास्त लाभ मिळतो त्यांनी जास्त कर द्यावा व कमी लाभ मिळणाऱ्यांनी कमी कर द्यावा. सरकारला कराद्वारे मिळणाऱ्या उत्पन्नातून सार्वजनिक खर्चाद्वारे नागरिकांच्या "सामूहिक गरजा" भागविण्यासाठी काही सेवा व वस्तूंची निर्मिती करावी लागते. सार्वजनिक उद्याने, क्रीडांगणे, करमणुकीची साधने, रस्ते, वाहतूक व दळणवळण, पोस्ट, टेलिग्राफ यांसारख्या सेवांचा लाभ नागरिकांना ज्या प्रमाणात मिळतो त्या प्रमाणात नागरिकांकडून कर वसूल करणे योग्य ठरते. १७व्या शतकातही या तत्वावर भर देण्यात आला होता. करापासून सरकारला मिळालेल्या उत्पन्नाचा व सार्वजनिक खर्चाद्वारे उपलब्ध केल्या जाणाऱ्या सेवांचा संबंध या तत्वात स्पष्ट केला आहे. या तत्वामुळे एकाच वेळी करांची पातळी आणि सरकारी खर्चाची पातळी निश्चित केली जाते. ज्यांच्यासाठी सरकारने खर्च केला आहे त्यांच्याकडून होणारा खर्च वसूल करणे हे नैतिकदृष्टया समर्थनीय ठरेल.

कर आकारणीचे सर्वात महत्वाचे असे आणखीन एक तत्व म्हणजे करदेयक्षमता तत्व होय. या तत्वानुसार सरकारी खर्च आणि उत्पन्न हे वेगवेगळे भाग असल्याने सरकारने आपला खर्च अगोदर निश्चित करावा आणि त्यासाठी आवश्यक असणारे उत्पन्न प्रत्येक नागरिकाची कर भरण्याची क्षमता पाहून कराच्या माध्यमातून वसूल करावे. कल्याणकारी राज्यात सरकारला अनेक गोष्टीसाठी खर्च करावा लागतो. सरकारच्या या खर्चाचा वाटा लोकांनी उचलला पाहिजे. परंतु प्रत्येकाने खर्चाचा किती वाटा उचलावयाचा हा प्रश्न निर्माण होतो. या सिध्दांतानुसार प्रत्येकाने आपल्या कुवतीनुसार सरकारला कर देऊन खर्चाचा वाटा उचलावा. व्यक्तीच्या कर देण्याच्या क्षमतेनुसार कर आकारणी करावी असे तत्व करदेयक्षमता तत्वात सांगितले आहे.

फार पूर्वीपासून कराची विभागणी "न्याय्य" असावी आणि ती न्याय्य होण्यासाठी क्षमतेनुसार कर आकारणी करावी हे तत्व मान्य करण्यात आले आहे. जे. एस्. मिलच्या मते समता याचा अर्थ सर्व नागरिकांनी सारखीच रक्कम सरकारला द्यावी असा होत नाही तर सर्वांनी सारखाच स्वार्थत्याग करावा असा घ्यावा. श्रीमंताकडे जास्त पैसे असल्याने त्यांना पैशाचे महत्व कमी वाटते म्हणून त्यांनी कर रुपाने जास्त रक्कम द्यावी. उलट गरीबांजवळ पैसे कमी असल्याने त्यांनी कर रुपाने कमी पैसे द्यावे. कुवतीनुसार कर घेण्याचे तत्व मान्य करण्यात येत असले तरी कर देण्याची क्षमता किंवा पात्रता कशी ठरवायची याबाबत

निरनिराळी मते मांडली जातात. सामान्यतः करदेयक्षमता ही व्यक्तीच्या मालमत्ता, उत्पन्न, उपभोग खर्च आणि समान त्याग यावरून ठरविण्याचा प्रयत्न केला जातो.

सुरूवातीच्या काळात मालमत्ता महत्वाची मानली जात असून करदेयक्षमता व्यक्तीच्या मालमत्तेवरून ठरविली जात असे. परंतू ज्यांच्याकडे मालमत्ता जास्त असूनही उत्पन्न कमी मिळण्याची शक्यता असते किंवा मालमत्ता जास्त नसणाऱ्यांना ही भरपूर उत्पन्न मिळू शकते. म्हणून व्यक्तीची कर देण्याची कुवत मालमत्तेवरून ठरविण्याऐवजी ती उत्पन्नावरून ठरविली जावी असे मानण्यात आले.

कर भरण्याची कुवत व्यक्तीच्या उत्पन्नावरून ठरविता येते. औद्योगिक प्रगतीनंतर मालमत्ता ही कर भरण्याची कुवत ठरविण्याऐवजी उत्पन्नाच्या संदर्भात ठरविली जाते. ज्यांचे उत्पन्न जास्त त्यांची कर देण्याची कुवत किंवा पात्रता जास्त असते, म्हणून त्यांच्याकडून जास्त कर घेणे योग्य ठरते. उलट ज्यांचे उत्पन्न कमी असते त्यांची कर भरण्याची कुवत कमी असल्याने त्यांच्याकडून कमी कर घेणे योग्य ठरते. उत्पन्नामध्ये कष्ट करून मिळविलेले उत्पन्न, भांडवलाच्या साहाय्याने मिळालेले उत्पन्न, अनर्जित उत्पन्न, पैशातील उत्पन्न, वास्तव उत्पन्न असा भेद केला जातो. विशिष्ट उत्पन्न करमाफ ठरवून त्यावरील उत्पन्नावर वाढत्या दराने करआकारणी करावी असे सुचविले जाते. परंतु बऱ्याच वेळा दोन व्यक्तींचे उत्पन्न सारखे असूनही कुटुंबाचा आकार लहान-मोठा असेल तर उपभोग खर्चात तफावत पडून व्यक्तीच्या कर देण्याच्या क्षमतेत फरक पडतो.

व्यक्ती जो खर्च करते त्यावरून व्यक्तीची कर भरण्याची कुवत ठरविता येते. ज्या व्यक्तीचा खर्च जास्त आहे त्या व्यक्तीची कर भरण्याची कुवत जास्त आहे असे समजले जाते आणि जास्त कर आकारला जातो. उदा. दोन व्यक्तींचे उत्पन्न समान असेल आणि एक अविवाहित असेल तर त्याचा दुसऱ्यापेक्षा खर्च कमी  होणार म्हणून त्याच्या वर कमी कर आकारणे योग्य ठरणार नाही. अशाप्रकारे वस्तुनिष्ठ दृष्टिकोनाच्या संदर्भात करदेयक्षमता ठरविण्यासाठी मालमत्ता, उत्पन्न आणि उपभोग यांचा आधार घेतला जातो. परंतु व्यक्तिनिष्ठ दृष्टिकोनातून समान स्वार्थत्याग हीच कसोटी योग्य ठरते.

आधुनिक काळात राज्य व्यक्तीकडून निरनिराळया प्रकारे कर वसूल करते. प्रा. डाल्ट यांनी कराचे प्रत्यक्ष कर आणि अप्रत्यक्ष कर असे वर्गीकरण केले आहे. जेव्हा कराघात आणि करभार एकाच व्यक्तीवर पडतात तेव्हा त्यास प्रत्यक्ष कर असे म्हटले जाते. जी व्यक्ती प्रथमदर्शनी कर भरते त्या व्यक्तीवर कर भरण्याचा आघात झाला असल्याने त्याला कराघात

झाला असे म्हणतात. जेव्हा व्यक्तीच्या जीवनातील कराचा हिस्सा त्याच्याकडून प्रत्यक्षरित्या वसूल केला जातो तेव्हा तो प्रत्यक्ष कर होय. उत्पन्नातील कराची वसुली न कळत व्यक्तीच्या खर्चातून केली तर तो अप्रत्यक्ष कर होय. प्रत्यक्ष करात कराघात आणि करभार एकाच व्यक्तीवर असतो. उदा. जे.एस्.मिलच्या मते, ज्या व्यक्तीने कर भरावा अशी सरकारची अपेक्षा असते अशा व्यक्तींकडून वसूल केला जाणारा कर म्हणजे प्रत्यक्ष कर होय. प्रत्यक्ष कराचे संक्रमण होत नाही.

ज्या कर पध्दतीत कराघात एका व्यक्तीवर आणि करभार दुसऱ्या व्यक्तीवर पडतो त्यास अप्रत्यक्ष कर असे म्हणतात. उदा. करमणूक कर, वस्तूवरील कर ही अप्रत्यक्ष कराची उदाहरणे होत. अप्रत्यक्ष करात कराचे एका व्यक्तीकडून दुसऱ्याकडे संक्रमण होत असते. ज्या व्यक्तीवर कर आकारलेला असेल ती व्यक्ती आकारलेला कर दुसऱ्याकडून घेऊन सरकारला देईल. त्या करास अप्रत्यक्ष कर असे म्हटले जाते. उदा. करमणूक कर सरकारला देण्याची कायदेशीर जबाबदारी थिएटर मालकाची असते. म्हणून कराघात त्याच्यावर झाला असे म्हणता येईल. परंतु ही करमणूक कराची रक्कम प्रेक्षकांकडून वसूल करण्याचे कार्य थिएटर मालक करतो. म्हणजे कराचा खरा भार प्रेक्षकांवरच जातो. अशा तऱ्हेने जो कराचे अंतिम ओझे सोसतो त्याच्यावर करभार पडला असे म्हणतात. म्हणजेच ज्याच्या उत्पन्नातून कराची रक्कम जाते त्याच्यावर करभार पडला आहे असे म्हणता येईल. उदाहरणात कराघात थिएटर मालकावर आणि करभार प्रेक्षकांवर पडला आहे.

कर आकारणीच्या तत्वानुसार जे कर आकारले जातात त्यामध्ये प्रमाणशीर कर हा एक प्रकार होय. करदात्याचे उत्पन्न हा घटक विचारात घेऊन उत्पन्नाच्या प्रमाणात जेव्हा कर आकारला जातो तेव्हा त्यास प्रमाणशीर कर असे म्हणतात. या करपध्दतीत गरीब-श्रीमंताचा विचार न करता सर्व करदात्यांना एकाच दराने कर द्यावा लागतो. कर आकारणीमुळे कर भरणाऱ्या व्यक्तीची सापेक्ष स्थिती बदलू नये असे तत्व प्रमाणशीर करांच्या बाबतीत आधारभूत मानले जाते.

प्रमाणशीर कर आकारणीमुळे करदात्यांची उत्पन्नाची सापेक्ष स्थिती कायम राहते. उदा. कराचा दर १० टक्के असेल तर १०० रूपये उत्पन्न असणाऱ्यांना १० रू. कर भरावा लागतो. त्यामुळे त्यांचे ९० रू. उत्पन्न शिल्लक राहते. म्हणजे प्रमाणशीर कर आकारणीमुळे करदात्यांची उत्पन्नाची सापेक्ष स्थिती कायम राहते.

व्यक्तीचे उत्पन्न जसजसे वाढत जाते तसतसा कराचा दर कमी होत गेल्यास त्याला प्रतिगामी कर असे म्हणतात. उदा. सरकारने मिठावर प्रत्येक किलोला १ पैसा याप्रमाणे कर बसविला आहे. देशात ५० रूपये, ५०० रूपये आणि ५००० रूपये उत्पन्न मिळवणाऱ्या ३ व्यक्ती आहेत. प्रत्येकाला महिन्याला २ किलो मीठ लागते तर वरील तिन्ही उत्पन्न गटातील व्यक्ती प्रत्येकी २ पैसे कर भरतील या तिघांचेही उत्पन्न चढत्या क्रमाचे आहे. त्यामुळे कराचे दर उतरत्या क्रमाने असल्याचे आढळेल. अशा करांना प्रतिगामी कर असे म्हणतात. उद्योगधंद्यांच्या विकासाला काही वेळा प्रोत्साहन म्हणून अशी करपध्दती सुचविली जाते.

प्रतिगामी कर उद्योजकांना हिताचे वाटतात, कारण जसजसे औद्योगीकरण आणि शेती क्षेत्राचा विकास होत जातो तसतसा कराचा दर कमी होत जातो त्यामुळे देशाच्या आर्थिक भरभराटीला चालना मिळते. आर्थिक भरभराटीच्या दृष्टीने असे कर हितकारक ठरत असले तरी कमी उत्पन्न गटातील गरिबांना आणि मध्यम वर्गीयांना कराचा दर जादा असल्याने सामाजिक हिताच्या दृष्टीने तो गैरवाजवी ठरतो. म्हणून अशा कर पध्दतीचा सहसा अवलंब केला जात नाही.

एखाद्या देशातील लोकांची कर भरण्याची जास्तीत जास्त कुवत म्हणजे करभार पात्रता होय. सरकारच्या वेगवेगळया कराचे ओझे देशातील करदात्यांवर पडते. समाजातील प्रत्येक व्यक्तीच्या करदेय क्षमतेचा विचार करून समाजाची करभार पात्रता ठरविता येते. विशिष्ट परिस्थितीत देशातील नागरिकांकडून सरकारला जास्तीत जास्त किती रक्कम कर रूपाने वसूल करता येईल याला उद्देशून करभार पात्रता हा शब्द वापरला जातो. शांतता काळात किंवा आणीबाणीच्या प्रसंगी सरकारला नागरिकांकडून जास्तीत जास्त किती रक्कम कर रूपाने मिळविता येईल याची माहिती असणे आवश्यक आहे. जोशिया स्टँप यांच्या मते लोकांच्या व्यक्तिगत उत्पन्नातून कौटुंबिक गरजा भागविण्यासाठी आवश्यक असणारा भाग सोडून उरलेल्या उत्पन्नाचे प्रमाण करदात्याची आर्थिक क्षमता दर्शविते. त्या उर्वरित उत्पन्नावर व्यक्तीची करभार पात्रता अवलंबून असते. परंतु निर्वाहासाठी आवश्यक असणाऱ्या गरजा प्रत्येकाच्या दृष्टीने भिन्न असतात. त्यांची तीव्रता व्यक्तिपरत्वे भिन्न असते. त्यामुळे निर्वाहासाठी किती उत्पन्न लागेल हे निश्चित ठरविणे अवघड व अशक्य होते. साहजिकच करदात्याची आर्थिक क्षमता किंवा करदेय पात्रता ठरविणे कठीण होते, शिवाय गरजा हया स्थल, काल, व्यक्तीपरत्वे बदलत असतात. त्यामुळे समाजाची करभार पात्रता ठरविणे अवघड होते. लॉर्ड स्टँप यांच्या मते, नागरिकांचे जीवन दुःखी कष्टी न होता व देशातील

अर्थव्यवस्थेची घडी विस्कटू न देता देशातील लोक सरकारला, आपला खर्च भागविण्यासाठी जेवढी जास्तीत जास्त रक्कम देऊ शकतात तेवढी त्या देशाची करभार पात्रता होय.

प्राचीन भारतात वैदिक काळापासून विविध राज्यांत कर व्यवस्था अस्तित्वात होती.

**वैदिक काळ ते मौर्य पूर्व काळ** - राज्यव्यवस्थेच्या प्रारंभिक काळापासून लोक स्वेच्छेने राजाला संपत्तीचा काही भाग देत असत. आर्यकाळातही राज्यकारभाराचा खर्च भागविण्यासाठी धान्याच्या स्वरूपात व्यावसायिकांकडून आणि प्रजेकडून कर घेतला जात असे. [५] जसजसे राज्यव्यवस्थेचे महत्व समाजात वाढत गेले तसतसे मग जनतेकडून अनिवार्य स्वरूपात वेगवेगळया सेवांच्या बदल्यात कर वसूल करण्याची व्यवस्था रूजली. प्रजेच्या खाजगी उत्पन्नातून कर स्वरूपात ठराविक वाटा घेण्याचा हक्क राजाला आहे ही भावना भारतात पूर्वापार चालत आली आहे. वैदिक काळापूर्वीही राज्याचे प्रशासन आणि महसूल ठरविणे, तो वसूल करणाऱ्या अधिकारी वर्गांची व्यवस्था असणे हे इतर सर्व बाबींपेक्षा महत्त्वाचे ठरत होते. भारतीय धर्मग्रंथ व नीतीविषयक ग्रंथामध्ये कराची संकल्पना स्पष्ट केल्याचे आढळते. राजाकडून लोकांचे संरक्षण केले जात असल्यामुळे राजाला कर लावण्याचा हक्क देण्यात आला होता. [६]

**मनूकाळ** - "प्रजावात्सल्यामुळे प्रजेकडून करादी न घेणे हा आपला मुलोच्छेद केल्याने कोशक्षय होतो त्यामुळे त्या राजास पीडा होते." असे मनू म्हणतो. [७] याचा अर्थ या काळात प्रजेकडून आवश्यक तेवढेच कर घ्यावेत ज्यामुळे राज्याचा खजिना टिकून राहील पण लोकांना त्रासदायक होतील असे कर घेतले जाऊ नयेत यालाही महत्व देण्यात आल्याचे स्पष्ट होते. जो राजा प्रजेचे संरक्षण करत नाही व आपले उत्तरदायित्व टाळतो त्या राजाची मनूने निर्भत्सना केली आहे त्याला दंड देण्यांत यावा असेही तो म्हणतो. [८] राजाने कोणते कर कसे आकारावेत या संदर्भात मनूने मनूस्मृतिमध्ये प्रकाश टाकला आहे. राजाने लोकांकडून कर घेताना त्याची लोकांना कोणत्याही प्रकारे त्रास होऊ नये यासाठी मनुस्मृतित काही उपमा दिल्या आहेत. ज्याप्रमाणे जळू, वासरू व भ्रमर हे आपले भक्ष

५. प्राचीन भारताचा इतिहास : प्रा.रं.ना.गायधनी, के. सागर प्रकाशन, पूणे, २००१, पा. ५९.
६. मनुस्मृतिः वि.वा.लेले, श्लोक १३०,
७. मनुस्मृतिः वि.वा.लेले, श्लोक १३९, ७/१३९.
८. मनुस्मृतिः वि.वा.लेले, श्लोक १३९, ८/३३६.

रक्त, दूध व मध थोडे थोडे खातात, त्याप्रमाणे मूल धनाचा उच्छेद न करणाऱ्या राजाने राष्ट्रातील लोकांपासून थोडा थोडाच वार्षिक कर घ्यावा.[९] तसेच असेही प्रकतपादन केले जाते की, सूर्य ज्याप्रमाणे समुद्रातील पाणी वाफेच्या स्वरुपात घेतो व पर्जण्य रुपाने परत करतो, त्याप्रमाणे राजाने प्रजेवर कर लावावेत आणि त्यातून मिळणाऱ्या पैशाचा विनियोग प्रजेच्या कल्याणासाठी करावा.[९अ] या सर्व उपमामुळे असे म्हणता येईल की, या काळात घेतले जाणारे कर अशा पध्दतीने घेतले जात असत की ज्यामुळे कर देणाऱ्याला कराचा भार होणार नाही आणि त्यामुळे कर देणे, करदात्याला त्रासदायक होणार नाही. मनूस्मृतित कराचे प्रमाण भूमिच्या उत्कर्षाप्रमाणे निरनिराळे स्पष्ट केले आहे. प्रजेने राजाला धान्याचा सहावा भाग, आठवा भाग किंवा बारावा भाग द्यावा असे सांगितले आहे.

याबाबत ॲडम् स्मिथ असे म्हणतात की, "प्रत्येक कर अशा वेळी आणि अशा तऱ्हेने लावला जावा की, कर देणाऱ्याला ते सोईचे होईल." [१०] राज्यातील प्रत्येकांकडून काही स्वरूपात कर घ्यावा हे स्पष्ट करतानाच मनूने श्रोत्रिय ब्राम्हणांना मात्र कर मुक्त केले आहे. त्यांच्या मते, वृक्ष, मांस, मध, गंध, औषध, रस, पुष्प, पाने, फळे, भाज्या, गवत, चामडे, बांबु, माती, दगडाची पात्रे या सर्वांच्या नफ्यापैंकी सहावा भाग राजाने घ्यावा. [११] पण राज्याची संपत्ती नष्ट होऊन तो आपत्तीत सापडला असला तरी त्याने श्रोत्रिय ब्राम्हणांपासून कर घेऊ नये. तसेच त्याच्या राज्यात जेव्हा श्रोत्रिय क्षुधेने व्याकुळ होतो तेव्हा त्याचे राज्य दुर्भिक्षादिकांच्या योगाने शीघ्र नाश पावते. [१२] म्हणूनच अशा श्रोत्रियांचे ज्ञान व अनुष्ठान जाणून घेऊन त्यानुसार त्यांची धर्मरूप वृत्ती पहावी आणि त्यांचे पोटच्या पुत्राप्रमाणे रक्षण करावे. [१३] तसेच अगदी कमीत कमी उत्पन्न असणारा असा राज्यातील जो वर्ग आहे त्यांच्याकडूनही मनूने थोडा थोडा वार्षिक कर घ्यावा असे म्हटले आहे. जे लोक देहक्लेशाचे काम करणारे आहेत (लोहार, भार वाहणारे) त्यांच्याकडूनही प्रत्येक महिन्यास एक एक दिवस काम करवून घेऊन कर वसूल करण्याचे स्पष्ट केले आहे. म्हणूनच मनूने राजाला निश्चित स्वरूपात कर घेणारा असे म्हटले आहे. मनुस्मृतिमध्ये प्रतिभाग, पशुपालनावरील कर, भाग बलि इ. करांचा उल्लेख आढळतो. या काळात राजकिय अधिकाऱ्यांचा आदर सत्कार करण्यासाठी गावकऱ्यांनी प्रतिभाग हा कर द्यावा लागत असे.

---

९. मनुस्मृतिः विष्णू वामन बापट, मोदवृत्त प्रेस प्रकाशक, शके १८२९,(१९०७) श्लोक १२९,पा. १६७.
९अ. Revenue System in Ancient India with Special Reference to the Chola Dynasty:Its Relevance is Modern Urban Local Government: Dr. S.K. Jaiswal. Article Published in Nagarlok. Vol>XLII, IIPa New Delhi, pg. 78-85.
१०. The wealth of Nations (Vol. II): Adam Smith, P. 3
११. मनुस्मृतिः वि.वा.बापट, श्लोक १३१, १३२.
१२. मनुस्मृतिः वि.वा.बापट, श्लोक १३४, १६८.
१३. मनुस्मृतिः वि.वा.बापट, श्लोक १३५.

या करातून गावात जमा होणाऱ्या निधीतून येणाऱ्या अधिकाऱ्यांचा आदर सत्कार केला जात असे. तसेच पशुंच्या विक्री किंवा पालनावर कर घेतला जात असे. त्याशिवाय भाग हा उत्पन्नावरील साधारण कर होता आणि बलि हा अतिरिक्त कर होता. मनुस्मृतित हा भागासमान मानला गेलेला दिसतो. मनूने संकट समयी लोकांनी करभार सोसायला हवा असे म्हटले आहे. प्रजेचे पालन हाच राजाचा व क्षत्रियाचा श्रेष्ठ धर्म असल्याचे मनू स्पष्ट करतो आणि "जो राजा करादी फळाचा भोग घेणारा तोच धर्माशी संबंध असणारा राजा असतो," असे मनूने म्हटले आहे. [१४]

अतिप्राचीन काळातील या राज्यव्यवस्थेत अनेक प्रकारचे कर घेतले जात असत. आणि कर हे सरकारचे उत्पन्न मिळविण्याचे महत्वपूर्ण साधन होते. त्यामुळे अगदी कमीत कमी उत्पन्न असणारा समाजातील वर्ग देखील याकाळात श्रमांच्या स्वरूपात कर देत असे.

**रामायण काळ :-**

राजाची सेना, त्या करीता लागणारे पशु व इतर कारभार पाहणारे, राजाजवळचे व राज्यांत सर्वत्र असलेले सेवक यांची सर्व व्यवस्था राज्याच्या उत्पन्नातून व्हावयाची आणि ते सर्व संतुष्ट असल्याचे रामायणात लिहिले आहे. [१५] तेंव्हा "पीनो देवदत्तो दिवा न भुंक्ते" या न्यायाप्रमाणे उत्पन्न असले पाहिजे हे निर्विवाद आहे.

राजाला राज्याचा कारभार चालविण्यासाठी लागणारे उत्पन्न कोणत्या बाबींतून मिळत असे हे कळण्यास रामायणात स्पष्ट पुरावे आढळत नाहीत परंतू अप्रत्यक्षरित्या असाही उल्लेख आढळतो की, जेव्हा राम शरभंगांच्या आश्रमात जातो तेव्हा शरभंग रामाला उपदेश करतात "जो राजा प्रजेकडून कर रूपाने षड्भाग वसूल करतो पण त्यांना सुरक्षा देऊ शकत नाही असा राजा नरकयात्री ठरतो." [१६]

तसेच आणखी एक कराविषयीचा अप्रत्यक्ष निर्देश रामायणात आलेला आहे. दशरथ मृत झाल्यावर भरताने अयोध्येमध्ये आल्यावर ज्या अनेक शपथा घेतल्या त्यातील एक शपथ पुढीलप्रमाणे होती. "कराच्या रूपाने एकंदर उत्पन्नाचा सहावा अंश घेऊनही प्रजेचे परिपालन न करणाऱ्या राजांना जे पातक लागते ते पातक ज्यांच्यामुळे राम वनात गेला असेल त्याला लागेल."[१७]

---

१४. मौर्यकाल में वित्तीय अर्थशास्त्रः शशि आनंद, क्लासिकल पब्ली. कं., नवी दिल्ली, १९९७, पा.५७.
१५. श्री. रामायण समालोचनः करंदीकर ज. स. (१८४९) पा. ७७.
१६. रामायण : अरण्यकांड ६/११, पा. १४.
१७. श्री रामायण समालोचनः २/७५/२५.

यावरून असे स्पष्ट होते की, राजाला कर रूपाने उत्पन्न मिळत असे. तसेच रामायणात प्रजेकडून भागाच्या स्वरूपात १/४ कराचा उल्लेख आढळतो. [१८] भासांच्या प्रतिनाटयकम्‌मध्ये राम भरताला म्हणतो, 'जर तू राज्याचे रक्षण करू शकला नाहीस तर तुझा मी धिक्कार करतो.'[१९] प्रजेचे रक्षण करणे हे राजाचे महत्वाचे कार्य होते.

रामायणात राजकोशाचे महत्वही स्पष्ट करण्यात आले आहे. त्याचे उदाहरण म्हणजे वनवास संपल्यानंतर राम अयोध्येला परतल्यावर राज्याच्या कोशाचे वर्णन सांगताना भरत रामाला म्हणतो की, आता राज्यात दहा पटीने समृध्दी वाढली आहे. [२०] म्हणजेच राज्यात सुरूवातीला असणाऱ्या उत्पन्नापेक्षा नंतरचे उत्पन्न निश्चित वाढल्याचे स्पष्ट होते.

एकूणच रामायण काळातही राजा प्रजेकडून कर घेत असे आणि त्यातूनच आपला राज्य कारभार पाहीला जात असे हे स्पष्ट होते. कराचे प्रमाण १/४ किंवा १/६ असल्याचे आढळते.

**महाभारत काळ -**

राजाने प्रजेचे पालन पोषण करावे हे राजाचे उत्तरदायित्त्व होते. त्याने राज्याचे रक्षण करावे, बाहेरून होणारी आक्रमणे थांबवावी, अंतर्गत संकटे वितुष्टे नष्ट करावी, देशात सुव्यवस्था राखावी. प्रजेच्या संपत्तीचे, जिवीताचे रक्षण करावे ही सर्व कार्ये करण्यासाठी राजाला धनाची आवश्यकता होती. राजा प्रजेकडून कर रूपाने ती पूर्ण करत असे. आणि त्या बदल्यात राज्याच्या सेवा लोकांना देत असे. महाभारतामध्ये कर आणि दंड स्वरूपात मिळणाऱ्या धनास राज्याचे उत्पन्न म्हटले गेले आहे. [२१]

राज्याकडून लोकांना संरक्षण मिळत असे. त्याबदल्यात लोक राजाला कर देत असत हा एक सामाजिक करारच होता. प्राचीन काळापासून भारतीय व्यवस्थांमध्ये हा करार प्रत्यक्षात आणला गेलेला दिसतो. या प्रमाणे सर्व काळात जे राजे लोकांना संरक्षण देऊ शकत नाहीत असे राजे पापी किंवा चोर असतात. त्यांचा त्याग करावा किंवा त्यांचा पिसाळलेल्या कुत्र्याप्रमाणे वध करावा.असे स्पष्ट केलेले दिसते. [२२] महाभारतामध्ये कराच्या प्रमाणात विभिन्नता आहे.

---

१८. रामायण : अरण्यकांड ६/११ ,पा. १४.
१९. प्रतिनाटयकम् , भास, पा. १८४.
२०. रामायण, युध्दकांड.
२१. महाभारत, शांतीपर्व ७७/१०.
२२. महाभारत, शांतीपर्व ७१/१०, अनुशासन पर्व.

स्वतःची शेती कसणाऱ्या शेतकऱ्यांना भूमिकर १/६ (षड्भाग) द्यावा लागत असे. राजाने शेतातील उत्पन्नाचा १/६ अंश कर म्हणून घेऊन शत्रुपासून त्याचे संरक्षण करावे. महाभारतात शांतीपर्वात यासंबंधात पुढीलप्रमाणे उल्लेख आहे.

आददीत वलि चापि प्रजाभ्यः कुरूनंदन ।

स षड्भागमपि प्रज्ञास्तासामनाभिगुप्तये ।। [२३]

या काळात कमीत कमी करांचा दर १/१० हिस्सा असल्याचा उल्लेख करण्यात आलेला आहे. प्रतिभाग, हिरण्य, पशुकर, विष्टी असे अनेक कर लोकांकडून घेतले जात असत.

प्रतिभाग हा कर राजा किंवा राजाचे अधिकारी यांच्या आदर सत्कारासाठी घेतला जात असे. तसेच हिरण्य हा कर पिकांच्या ऐवजी पैशाच्या स्वरूपात घेतला जात असे. हा कर पिकाच्या ५० वा भाग इतका घेतला जाई. पशुकर हा पशुपालनावर लावण्यात आलेला कर होय. याशिवाय विष्टी हा कर उत्पन्नाऐवजी श्रमाच्या स्वरूपात घेतला जात होता. ज्यांच्याकडे उत्पन्न नाही त्यांनी श्रमांच्या स्वरुपात राज्याला कर दयावा. मग ज्या ब्राम्हणांना वेदविद्या ज्ञात नव्हती आणि जे शुद्रासमान होते त्यांच्यांवर विष्टी हा कर लावला जात असे.यासाठी त्यांना युध्दात सैनिक म्हणूनही लढवले जात असे.

महाभारतात शास्त्राने संमत केलेल्या करानांच धर्म मानले गेले आहे आणि राजा धर्माने सांगितलेले करच घेऊ शकत होता. [२४] यासंबंधीचे विवेचन वेगवेगळया उदाहरणातुन स्पष्ट केले आहे. जर गाईचे दूध गाईच्या वासराला जास्त दिले तर ते धष्टपुष्ट होईल शक्तिशाली होईल आणि अधिक बोजा उचलण्यास सक्षम होईल. त्यासाठी गाईचे दूध धन्यास कमी मिळाले तरी हरकत नाही, पण जर गाईचे दूध जास्त काढले आणि वासराला कमी दिले तर ते वासरू दुर्बल बनेल. अशीच स्थिती प्रजेपासून जास्त कर वसूल केल्यास होईल. प्रमाणापेक्षा जास्त कर प्रजेकडून घेतल्यास उत्पन्न वाढेल पण प्रजा शक्तिहिन होईल.[२५] जसे मधमाशी फुलांतून हळूहळू मध घेते, तसेच राजाने प्रजेकडून कर घ्यावेत. सुरूवातीला थोडे थोडे कर घेऊन हळूहळू त्याचे प्रमाण वाढवावे आणि प्रजेला आर्थिकदृष्टया समृध्द बनवावे. अशा प्रकारे जनतेवर करांचा भार सावकाश पण सुसंबंधपणे वाढवावा.[२६]

२३. महाभारत, शांतीपर्व ६९.
२४. महाभारत, शांतीपर्व, ७०/२.
२५. महाभारत, शांतीपर्व – ८७/२०, २१
२६. महाभारत, शांतीपर्व – ८८/४

तसेच ज्याप्रमाणे माळी बागेतील फळे-फुलें तोडतो पण झाडे तोडत नाही त्या प्रमाणे राजाने प्रमाणात कर घ्यावा त्याचा अतिरेक करू नये तसे केल्यास राजाचाच तोटा होईल. राज्याचा भाग वसूल करणाऱ्या अधिकाऱ्यास द्रोणमापक म्हटले जाई.

महाभारतात राजाला स्पष्ट सांगण्यात आले आहे की, त्याने आपल्या अधिकाऱ्यांवरही लक्ष ठेवावे. जे अधिकारी आपली भिती दाखवून, दबावाखाली आणून शेतकरी, व्यापारी, प्रजेकडून चुकीच्या पध्दतीने कर वसूल करत असतील, त्यांना पदच्युत केले पाहिजे. जे अधिकारी योग्य पध्दतीने योग्य कर घेत असतील अशांचीच नियुक्ती करावी. म्हणजेच प्रजेला आत्यंतिक महत्व या काळात देण्यात आलेले दिसते. आणि कर पध्दतीमध्ये धर्माला महत्व दिले गेल्याने प्रशासन चालविणाऱ्यांवर नैतिक बंधने आलेली दिसतात.

त्यामुळेच राजाच्या प्रत्येक कृतीमध्ये प्रजेचा विचार महत्वपूर्ण ठरला होता. जर राज्यावर आर्थिक संकट आले तर लोकांनी करभार सोसायलाच हवा असा महाभारतात उल्लेख आढळतो. यज्ञ करणारे, ब्राम्हण यांना महाभारत काळात करमुक्त केले होते. पण राज्यातील जे ब्राम्हण धर्मच्युत होते त्यांना बलि, विष्टी हे कर द्यावे लागत असत.[२७] या काळात राजाने अनेकविध कर लावून राज्याकडे उत्पन्न जमा केलेले दिसते. प्रजेवर कर लावताना ते अन्यायकारक असू नयेत याचा विचार राजाने करावा तरच कर रूपाने राज्याकडे उत्पन्न जमा होईल असे म्हटल्याचे आढळते.

**मौर्यपूर्व काळ :-**

मौर्यपूर्व काळात मगध, कोसला, अवंती येथील राजे सतत राज्यविस्तारासाठी प्रयत्नशिल होते पण त्यांचा दरबार, प्रचंड सैन्य व मुलकी अधिकाऱ्यांचा ताफा यासाठी राजांना नेहमीच पैशाची आवश्यकता होती. त्यासाठी लहान राजांनां सत्ता टिकविण्यासाठी मोठया राजांकडे खंडणी दयावी लागत असे. काही प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष प्रकारचे कर ही लावले जात असत. त्यामुळेही राज्याकडे उत्पन्नही जमा होत असे. खेडी स्वयंपूर्ण असत त्यामुळे महसूल गोळा करण्यापूरता खेडयांचा राजाशी संबंध येई.

---

२७. महाभारत, शांतीपर्व – ७१/२०

या काळात कर वेगवेगळया स्वरूपात घेतले जात असत. शेतकऱ्यांकडून भाग हा जमिन महसूल खळयावरच वसूल केला जाई. व्यापाऱ्यांकडून अनेक जकाती वसूल केल्या जात असत. राजाला मुलगा झाल्यास प्रजेकडून राजाच्या मुलासाठी म्हणजेच दुधासाठी खीरमुल नावाचा कर आकारला जाई.[२८] तसेच प्रजेकडून वेठबिगारी करवून घेण्याचा अधिकारही राजाकडेच असे. एकूणच मौर्यपूर्व काळात घेतले जाणारे अनेकविध कर यातून राज्याचा खर्च चालविला जात असे.

मौर्यपूर्व काळात महसूल व्यवस्थेचे कामकाज चालविण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा निर्माण केलेली दिसते. जमीनीची मोजणी करून राजाचा महसूल ठरविणाऱ्या अधिकाऱ्यास रज्जूग्राहक म्हटले जाई.[२९] तसेच काही महसूल गोळा करणारे अधिकारी होते. त्यांना द्रोणमापक म्हटले जात असे. ग्रामभोजक हा गावच्या महसूलाधिकाऱ्याचे काम पहात असे.

म्हणजेच मौर्यपूर्व काळात महसूल व्यवस्था स्वतंत्रपणे चालविली जात असे. कर आणि जकातीच्या मार्फत उत्पन्न मिळविले जात असे. भारतात अतिप्राचीन काळापासून जमीन किंवा जमिनीच्या उत्पादनावर कोणत्या ना कोणत्या स्वरूपात कर लावण्यात आलेले दिसतात. तसेच मौर्यपूर्व काळात व्यापारी, शेतकरी, सामान्य प्रजा यांच्याकडून विविध स्वरुपात कर वसूल केलेले दिसतात.राजा आणि प्रजा यांच्यातील एक सामाजिक करारांची भावना मनूस्मृती, महाभारत आणि त्यानंतर मौर्यकाळातील अर्थशास्त्रामध्ये महत्वपूर्ण असल्याचे दिसते.

मौर्यपूर्वकाळापासून निर्माण झालेली कर व्यवस्था मौर्यकाळातही टिकून राहिल्याचे दिसून येते एवढेच नाहीत तर या कर व्यवस्थेचा या काळात विस्तार झालेला दिसून येतो. मौर्यपूर्व काळात स्वतंत्र महसूल व्यवस्था निर्माण करण्यांत आली होती.

---

२८. प्राचीन भारताचा इतिहास : प्रा.रं.ना.गायधनी, के. सागर प्रकाशन, पुणे, २००१,पा. २०३.

२९. Aspects of political Ideas & institutions in Ancient India : Prof. Ram Sharan Sharma, Motilal Banarasidass pub. Delhi, I ed., 1959, P.132.

**मौर्यकाळ :-**

मौर्यकाळापर्यंत आलेल्या राज्याच्या उत्पन्नाच्या स्त्रोतामध्ये बलि या भूमिकराची व्यवस्था निर्माण झालेली दिसते. कौटिल्याने आपल्या अर्थशास्त्र या ग्रंथामध्ये ग्रामीण क्षेत्रातून मिळणारे कर-सीता, भाग, बलि, कर असे स्पष्ट केले आहेत. [३०] मौर्यांच्या शासन व्यवस्थेत त्यांनी आपली राजनिती आणि अर्थनिती यात परिवर्तन केले. त्यांनी आपल्या साम्राज्याचा विस्तार केला. परिणामतः जमीनीचा असा मोठा भाग, जो प्रत्यक्ष लोकांच्या मालकीचा नव्हता तो राज्याच्या अधिकारात आणला गेला आणि त्या जमीनीद्वारे राज्याच्या वाढणाऱ्या गरजा पूर्ण करण्यासाठी उत्पन्नाचा मार्ग बनविण्यात आला. म्हणजे यातून असे स्पष्ट होते की, राज्याच्या संपूर्ण जमीनीवर राजाची मालकी स्विकारलेली होती. यातील एक प्रकारची जमीन परंपरेने लोकांकडे असलेली जमीन होती. ज्यावर ते शेती किंवा इतर कार्य करत असत. त्यापासून होणारा फायदा - तोटा याला ते स्वतः जबाबदार असत. त्या जमीनीवर त्यांची मालकी असल्याने तिची खरेदी - विक्री ते करू शकत तिला खाजगी जमिन (Private Property) म्हटले जाई. या जमीनीतून निघणाऱ्या उत्पन्नातील काही भाग राज्याकडे जमा करावा लागत असे. कारण त्या जमीनीवर अंतिम मालकी राज्याचीच किंवा राजाची असे. दुसऱ्या प्रकारची जमिन म्हणजे राज्याची जमिन. या जमिनीवर राज्याकडूनच शेती करवून घेतली जात असे व उत्पन्न काढले जाई. अशा प्रकारे राज्याकडे जमिनीतून २ प्रकारे उत्पन्न गोळा होत असे.

लोकांच्या खाजगी जमिनीपासून मिळणारे उत्पन्न ज्याला 'भाग' म्हणत. राज्याच्या मालकीच्या जमिनीपासून मिळणारे उत्पन्न ज्याला 'सीता' म्हणत असत. तसेच लोक स्वतःच राज्याच्या कार्याचा मोबदला म्हणून आपला हिस्सा बलिच्या स्वरूपात देत असत. [३१] कौटिल्याने अर्थशास्त्रात म्हटले आहे की, गोप (खेडयाचा अधिकारी) याने उत्कृष्ट जमिन, निकृष्ट जमिन यांची नोंद ठेवावी आणि पावसाच्या पाण्यावर आधारीत उत्कृष्ट जमिनीवर ही प्रमाणात कर घेतला जावा. [३२] राज्यातील प्रत्येक घटकाकडून मौर्यकाळात कर वसूल केले जात असत. मौर्यकाळातील किंवा त्या समीपकाळातील संदर्भ ग्रंथामध्ये केलेल्या उल्लेखाप्रमाणे, लोकांनी आपल्या उत्पन्नाच्या षष्ठांग भाग अनिवार्यपणे आणि नियमीतपणे

---

३०. Arthasastra of Kaulitya: Tr. By Dr. R. Shama Sastry, Mysour, 5th Edn., 1956,P. 55.
३१. मौर्यकाल में वित्तीय अर्थशास्त्र : शशि आनंद, क्लासीकल प्रकाशन, नवी दिल्ली १९९७, पा. ६७.
३२. Land revenue in India: Prof..R. S. Sharma, Motilal Banarsidass Publi.,Delhi, 1st ed.,1971, p 6.

राजाला दिला जाण्यास दुजोरा दिला आहे. आश्रमात राहणाऱ्या तपस्विनीदेखिल जमिनीच्या उत्पन्नातील सहावा भाग राजाला द्यावयास पाहिजे, असे कौटिल्यही म्हणतो. [३३] बलि, पिंडकर, हिरण्य, विष्टी, प्रतिभाग असे इतर अनेक कर या काळात घेतले जात असत. मौर्यकाळात वित्त विभागाकडून बलि हा जबरदस्तीने घेतला जाणारा कर असावा. [३४]

विद्वानांमध्ये याच्या अर्थाविषयी मतभिन्नता आढळते. तसेच महाभारत, मनूस्मृति, जातककथा या सर्व साहित्यात याचा अर्थ वेगवेगळा आहे. पिंडकर हा संपूर्ण गावातून वार्षिक कर स्वरूपात वसूल केला जाई. तो वस्तूरूपातही एकत्र केला जात असे याची सुरूवात याच काळात प्रथम झालेली आढळते. विष्टी म्हणजे राज्याचे काम लोकांकडून निःशुल्क करून घेणे. भट्टस्वामींच्या मते जे लोक राज्याचा कर देऊ शकत नाहीत त्यांनी विष्टीद्वारे आपला मोबदला द्यावा. किंबहुना लोकांकडून श्रमाच्या स्वरूपात कराची वसुली करावी. असे श्रम सफाई, वस्तू ने आण करणे, रस्ते बांधणे, सिंचन करणे, प्रसंगी शत्रुंबरोबर लढण्यासाठीही वापरले जात असत.

हिरण्य हा शेतकऱ्यांवर लावला जाणारा कर होता. डॉ. घोंसलांच्या मते, हिरण्य एक अशा प्रकारचा कर होता, जो विशेष अशा पिकांवर अतिरिक्त कर स्वरूपात लावला जात असे आणि तो वस्तूरूपात न घेता पैशामध्ये वसूल केला जात असे. [३५] हा कर १/५० भाग स्वरूपात घेतला जाई. हा भूमिकर जो षष्ठांग भागात घेतला जाई त्यापेक्षा वेगळा होता. प्रतिभाग हा कर राजकिय अधिकारी, प्रमुख व्यक्ती यांचा आदर सत्कार करण्यासाठी गावकऱ्यांनी द्यावा असा प्रघात होता. [३६] पशुकर हा लोकांच्या पशुधनावर लावला जाई. पशुपालन करणाऱ्या लोकांनी हा कर द्यावा असा उल्लेख एरिअन ही करतो. [३७] अर्थशास्त्रांत कौटिल्याने सर्वसामान्यपणे वेगवेगळया पशुंच्या किंमतीच्या प्रमाणात हा कर सांगितला होता. उदा. कोंबडी, डुक्कर यांच्यावर १/२ तर बकरी, मेंढी यांच्यावर १/६ भाग कर द्यावा लागत असे. याचबरोबरच अर्थशास्त्रात चोररज्जू हा एक पोलिसी कर होता. त्या करापासून मिळणारे उत्पन्न राज्यामार्फत सुरक्षा अधिकारी नियुक्त करण्यासाठी आणि गावामध्ये

३३. कौटिल्यीय अर्थशास्त्र : प्रा.र.पं.कंगाले, प्रका. महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळ,मे १९९५, द्वितीयावृत्ती, पा. २०३. कौटिल्यीय अर्थशास्त्र : (संपादक) भट्टस्वामी, जैसवाल, बॅनजी १९२५, पा. ११२.

३५. Contribution to the History of the Hindu Revenue Sysem : Dr. Ghoshal U.N, Calcutta, 1929, p. 76.

३६. प्राचीन भारताचा इतिहास : प्रा.रं.ना.गायधनी, के सागर पब्लीकेशन,पूणे, वर्ष २००१, पा. २०७.

३७. Arrian’s Amabssi Indica: Eng. Tran. E. Hif. Robson London, 1954, p .184.

सुरक्षितता प्रस्थापित करण्यासाठी वापरले जात असे. त्या सुरक्षा अधिकाऱ्यांना चोर रज्जूक असे म्हटले जात असे. ग्रामवासिय काही प्रमाणात वस्तूच्या स्वरूपातही हा कर देत असत. असाच अर्थशास्त्रात पार्श्व कराचाही उल्लेख आहे. सामान्य कर घेतल्यानंतर ही राज्याला प्रजेकडून कर मिळू शकेल असे राजाला वाटत असल्यास रज्जू कर लावला जात असे, असे शामशास्त्री म्हणतात.[३८] एकूणच मौर्यकाळात अनेक प्रकारचे कर लावण्यात आले होते.

दुष्काळ, अतिवृष्टी यासारख्या नैसर्गिक आपत्ती आल्यास राज्याने पैसे कसे उभे करावेत हे स्पष्ट करताना अर्थशास्त्रात अनेक करांमध्ये वाढ करण्याचा तसेच लोकांकडूनच कर्ज घेण्याचा उपाय सांगितला आहे. मौर्यकाळात एखादे आर्थिक संकट निर्माण झाल्यास लोकांना स्वेच्छेने मदतीचे आव्हान केले जाई. जो जास्त मदत करत असे त्याला राजाकडून पदक देऊन सन्मानित केले जाई. पण जेव्हा संकट समयी राज्याला पैसा अपूरा पडत असे, तेव्हा संन्यासी ब्राम्हण सोडून सर्वांकडून बलपूर्वक पैसे प्राप्त केले जात. पण शेती हा लोकोपयोगी व्यवसाय मानला गेल्याने संघर्ष व युध्द काळातही शेतकऱ्यांना त्रास दिला जात नसे.

शेतीच्या समृध्दीसाठी सरकारकडून प्रयत्न केले जात असत. अवर्षण, अतिवृष्टीच्या काळात सारा तहकुबी किंवा सारामाफी दिली जाई. नविन जमीन लागवडीखाली आणणाऱ्यांनाही करातून सुट मिळत असे. त्याचबरोबरच धर्माचे रक्षण हे राज्याचे कर्तव्य मानले जात असल्याने राज्याकडून काही व्यक्ती अथवा संस्थांना करमुक्त केले होते. [३९] यज्ञयाग करणारे श्रोत्रिय ब्राम्हण यांना मौर्यकाळात वैदिक काळात आणि महाभारत काळातही कर मुक्त केलेले आढळून येते. संकटकाळातही विद्वान ब्राम्हण, श्रोत्रिय, पुरोहित यांच्याकडून कर घेतले जात नव्हते. तसेच शस्त्रास्त्रे निर्माते, राज्याचे कारागीर (शेतीची अवजारे बनविणारे) यांना करमुक्ती तर होतीच शिवाय राज्याकडून मदतही मिळत असे. मौर्यकाळात अनेक प्रकारचे कर लोकांवर लादण्यात आलेले दिसतात. कौटिल्याने कर महसूल पध्दतीचा बारकाईने अभ्यास करून अशी विस्तारीत कर पध्दती निर्माण केली होती. ज्या करांना आजही आधुनिक काळात महत्व प्राप्त झालेले दिसते.

---

३८. Arth Sastra of Kautilya : Dr. Shama Shastri, Mysour 5th ed,1956, p. 57.

३९. प्राचीन भारताचा इतिहास : प्रा.रं.ना.गायधनी, के. सागर प्रकाशन, पूणे २००१,पा.२०७.

**गुप्त काळ :-**

गुप्त काळातील राजकिय व्यवस्थेत सर्व जमीन राजाच्या मालकीची होती व तो आपल्या मर्जीप्रमाणे कोणालाही देऊ शकत असे आणि काढून घेऊ शकत असे. त्याला कर बसविण्याचा, करातून सूट किंवा माफी देण्याचा पूर्ण अधिकार होता असे असले तरी व्यवहारतः राजसत्ता अनियंत्रित नव्हती. [४०] गुप्तांनी त्रिस्तरिय प्रशासकिय रचना स्विकारली होती. तसेच विकेंद्रिकरणाचे तत्वही स्विकारलेले होते. प्रांत (मंडळ), विषय (जिल्हा), ग्राम्य (ग्राम) या स्वरूपात संपूर्ण राज्याचे विभाग करण्यात आले होते. शासनव्यवस्थेची सर्वात लहान शाखा-ग्रामशासन होती. ग्राम मुख्य अधिकाऱ्यास ग्रामाध्यक्ष म्हटले जाई. त्याला भोजकही म्हणत. [४१] विषयामध्ये (जिल्हा) पुस्तपाल हा जमीनीची मोजणी व मर्यादा निश्चिती करण्याचे काम पहात असे. गुप्त काळातही आयकर हे मुख्य राजस्वाचे साधन होत. करांची संख्या १८ होती. यातील भूमि कर हा मुख्य कर होता. भूमीचे मोजमाप नियमित होत असे.

शेतकरी शेताच्या सीमांची माहिती ठेवत असे. काही ठिकाणी भूमिकराला उद्रंग म्हणत असत.[४२] तर काही ठिकाणी त्यालाच भाग म्हटले जात असे. तो रोख स्वरूपात किंवा धान्यरूप जमा केला जात असे. त्यासाठी धान्याची गोदामे बांधलेली होती. सरकारी मालकीच्या शेतजमिनींना सीता म्हणत. त्या खंडाने लोकांना कसण्यास दिल्या जात असत. धर्मादाय स्वरूपाच्या जमिनींना अप्रहत म्हणत त्यांना करमुक्त केले जात असे. जमीनीच्या खरेदी विक्रीवरही राजाचे नियंत्रण असे. स्थानिक अधिकाऱ्यांना वेतनासाठी सरकारी उत्पन्नाच्या काही बाबी ठरवून दिल्या जात. संकटसमयी आणि विशेष प्रसंगी प्रजेला जादा कर द्यावे लागत असत. [४३] वरिष्ठ सरकारी अधिकाऱ्यांच्या भेटीचा आदर सत्काराचा खर्च कर रूपाने प्रजेलाच द्यावा लागत असे. गुप्तकाळातही व्यापारी आणि कारागिरांकडून शुल्क हा कर वसूल केला जात असे. तसेच मादक पदार्थ, मद्यार्क यावर ही कर आकारले जात होते.

गुप्त काळात जेव्हा त्या जमीनी वैयक्तिक मालकीच्या होत तेव्हा त्या जमीनींवर कर आकारला जात असे. तो कर मालकाला द्यावा लागे. या काळात प्रशासन पध्दती विकसित करण्यात आली होती. तसेच कर व्यवस्थाही विकसित झालेली दिसते.

---

४०. प्राचीन भारताचा इतिहास : प्रा.रं.ना.गायधनी, के. सागर प्रकाशन, पूणे २००१,पा.२०९.

४१. प्राचीन भारत :डॉ. रा.श्री. मोरवंचीकर,पिंपळापुरे प्र., नागपुर १९९०,पा. २१९.

४२. Land revenue in India : Prof R.S.Sharma, Motilal Banarsidass, Delhi ,1st ed., 1971, p. 16

४३. प्राचीन भारत : डॉ. रा.श्री. मोरवंचीकर, पिंपळापुरे प्रकाशन. नागपुर १९९०,पा. २२३.

**मध्ययुगीन काळ :-**

प्राचीन भारताप्रमाणेच मध्ययुगीन कालखंडात महसूलामध्ये वैविध्य असल्याचे आढळते. मध्ययुगात दिल्लीच्या सुलतानांनी, मोगल सत्ताधिशांनी, विजयनगरच्या व आसपासच्या सम्राटांनी तसेच दक्षिण भारतातील मराठा सत्ताधिशांनी जमिन महसूल पध्दती व दर याबाबतीत वेगवेगळया पध्दतींचा स्विकार केलेला दिसतो. यातील काही सत्ताधिशांनी परंपरागत पध्दतीचा स्विकार केला. तर अकबर, कृष्णदेवराय, छत्रपती शिवाजी महाराज यांनी महसूल पध्दतीमध्ये अनेक मूलभूत बदल घडवून आणले.

सुलतानशाहीने सुन्नी न्यायपध्दतीवर आधारलेली अर्थव्यवस्था स्विकारली होती. त्यानुसार धार्मिक आणि निधर्मी अशा दोन प्रकारच्या कर प्रणालीतून शासनास महसूल प्राप्त होत असे. जकात हा धार्मिक कर फक्त मुसलमानांकडून घेतला जात असे. त्याचे स्वरूप दानधर्मासारखे होते, तो सोने चांदी किंवा अन्य व्यापारी वस्तूंच्या स्वरूपात एकूण मालमत्तेच्या १/४० इतका घेतला जात होता. खरज हा मुस्लिमेतर शेतकऱ्यांच्या जमीनीवर लावलेला कर होता. हा १/१० टक्क्यापासून ते १/२ टक्क्यांपर्यंत घेतला जात असे. [४४] जिझिया हा कर सुलतान काळात मुस्लिमेतर प्रजेकडून वसूल केला जात असे. हिंदूना जेरिस आणून धर्मांतरास भाग पाडावे आणि राज्याच्या खजिन्यात भर पाडावी हा या कराचा उद्देश होता लष्करी कामातून सूट देणे व त्यांच्या वित्त व जिवीताचे संरक्षण करण्याच्या मोबदल्यात जिझिया कर मुस्लिमेतरांकडून घेतला जात होता. [४५] या करापासून सुलतानास मोठा महसूल मिळत असे. [४६] त्याबरोबरच जमीन महसूल हा देखिल सुलतानाच्या उत्पन्नाचा मोठा स्त्रोत होता. शेतीतील एकूण उत्पन्नाच्या १/३ ते १/२ उत्पन्न सरकारी कर किंवा महसूल म्हणून घेतले जात असे.

नंतरच्या काळातील अल्लाउद्दीन खिलजीने या पध्दतीत मोठा बदल केला होता. त्याने सर्व जमिनीची मोजणी केली आणि जमीन महसूल निश्चित केला त्यामुळे सर्व जमीन शासनाच्या अखत्यारित आली व महसूल उत्पन्नही वाढले. त्याने कर वाढवला. चराऊ कुरणावरही कर लादला. वसुलीसाठी विझारत हा नवा विभाग स्थापन केला. त्यांनतरच्या धियासुद्दीन खिलजीने या पध्दतीत थोडा बदल केला. पण अल्लाउद्दीनच्या काळातील कर जमा किंवा वसूल करण्याच्या पध्दतीला धक्का न लावता कर जमा केला जाई.

---

४४. मध्ययुगीन भारतः प्रा.गजानन भिडे, डॉ.नाईकनवरे, डॉ. विजय नलावडे, फडके प्रकाशन, द्वितीयावृत्ती, २००२, पा.१०६

४५. समग्र भारताचा इतिहासः प्रा. य. ना. कदम, फडके प्रकाशन, प्रथमावृत्ती, २००३, पा. ८९.

४६. मध्यकालीन भारत का इतिहासः संपा. शिवकुमार गुप्त, पंचशील प्रकाशन, जयपुर, प्रथमावृत्ती, १९९९, पा.१०८.

महसूल जमा करणाऱ्या व्यक्तिंच्या नावे तो जमा होत असे. त्याची प्रत्यक्षातील पूर्ण माहिती पटवारीकडे असायची. या सुलतानाने १ बैलजोडी, २ म्हैशी, २गाई, १०मेंढया या प्राण्यांना त्यांच्या मालकांना सांभाळण्याची सुट दिली होती.[४७] शत्रुच्या लुटीचा १/५ हिस्सा राज्याला व उरलेला सैनिकाला मिळत असे. अल्लाउद्दीनच्या मृत्यूनंतर घियासुद्दीन खिलजीने करपध्दतीत बदल करून इक्तदार, मुक्ता व बलि या अधिकाऱ्यांसह इक्ता व विलायत या महसूली विभागाकडे महसूल जमा करण्याची जबाबदारी सोपविली. मुक्तांनी मुकादमांच्या माध्यमातून महसूल जमा करावा. प्रत्यक्ष उत्पन्न किती झाले. यावर महसूल वसूल करण्यासंबंधीचे अधिकार मुकादमांना देण्यात येत असत.

दुष्काळ, अवर्षण अशा नैसर्गिक आपत्तीमुळे उत्पादन झाले नसल्यास कर वसुलीत सुट मिळू लागली. [४७] तसेच त्याने हिंदू शेतकऱ्यांवरही इतके जाचक कर लादले नाहीत. महंमद तुघलकाने दिल्लीनजीक असलेल्या सुपीक भागात, दोआबमध्ये करांचे प्रमाण वाढविण्याचा प्रयत्न केला. [४८] परंतु या भागातील लोकांना हे डोईजड कर देणे शक्य नसल्याने ते आपल्या भागातून जंगलात पळून गेले. सैनिकांनी जंगलात व इतरत्र पळून गेलेल्या लोकांना बरोबर टिपले पण एवढे करूनही खजिन्यात फारशी वाढ झाली नाही. शेवटी महंमदला चूक लक्षात आल्याने त्याने शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी सवलती दिल्या, विहिरी खणल्या व पडीक जमीनी शासनातर्फे लागवडीखाली आणल्या. अशा उपाययोजना करून नंतर परिस्थिती सावरण्याचा प्रयत्न केला.

एकुणच सुलतानशाहीत जमीन महसूल वाढविण्याचे प्रयत्न झाले तरी त्यात सातत्य नव्हते, तसेच योग्य अशा सुधारणाही या काळात केल्या गेल्या नव्हत्या. त्यामुळे जमीन महसूलातून शाही खजिन्यात नियमितपणे भर पडत नव्हती.

**मोगल काळ :-**

मोगल सत्तेच्या प्रांरभीच्या काळात धल्ला बक्षी या जमिन महसूलाची पध्दत अस्तित्वात होती. या पध्दतीत रसीबटाई, खेतबटाई व लांकबटाई असे ३ (तीन) प्रकार होते. धल्ला म्हणजे धान्याचा किंवा पिकाचा सरकारी हिस्सा होय. [४९] या काळातच हस्त-ओ-बुद म्हणजे उभ्या पिकाच्या आधारावर जमीन महसूल निश्चित केला जात असे. तसेच कानकुट,

---

४७. History of Indian Administration- Vol.II:B.N.Puri.,Bhartiya Vidya Bhavan Bombay, I ed. P.156.

४८. Land revenue in India: Prof. R.S. Sharma, Motilal Banarsidass Publi.,Delhi, 1st ed.,1971P. 20.

४९. मध्ययुगीन भारतः प्रा. गजानन भिडे, डॉ.नाईकनवरे, डॉ. विजय नलावडे, फडके प्रकाशन, द्वितीयावृत्ती, पा.१०६.

नसक आणि पेरणी क्षमता, नांगर क्षमता अशाही जमीन महसूलाच्या पध्दती अस्तित्वात होत्या. [५०] कानकुट म्हणजे निवडक शेतातील उत्पन्नाचा अंदाज घेऊन पिकाचा दर निश्चित करून तो सर्व क्षेत्राला लागू केला जाई. उत्पन्नाचे सरकार व शेतकरी यांच्यात दोन हिस्से केले जात. सरकारी हिस्सा रोख रकमेत घेतला जाई. नसक म्हणजे पिकाची अंदाजाने केलेली किंमत होय. जमीनीची दरवर्षी मोजणी करण्याऐवजी मागील काही वर्षांचीच मोजणी प्रमाण मानुन त्या महसुलाच्या सरासरीच्या आधारे महसूल ठरविला जात असे. पेरणी क्षमता ही महसूल पध्दत काश्मिरमध्ये प्रचलित होती. यात शेतीतील एकूण उत्पन्नापैकी १/३ भाग सरकारला महसूल म्हणून दिला जात असे. हस्त-ओ-बुद, कानकुट, नसक, पेरणी क्षमता, नांगर पध्दत या जमीन महसूलाच्या पध्दती शेरशहाच्या आधीच्या कर व्यवस्थेत होत्या. [५१]

शेरशहाच्या काळापासून झब्त पध्दत ही क्रमाक्रमाने बदलत जाऊन अकबराच्या काळात पूर्णत्वाला पोहोचलेली दिसते. प्रत्यक्ष शेतीच्या मोजमापावर आधारीत जमीन महसूलाची रोख रक्कमेत आकारणी निश्चित करणे अशी झब्त पध्दत होती. [५२] मोगल सम्राटांनी प्रामुख्याने अकबराच्या कारकिर्दीत या महसूल पध्दतीत मोठया प्रमाणावर सुधारणा करण्याचे प्रयत्न केले. शहाजहानाच्या आणि औरंगजेबाच्या काळात महसूल वाढविण्यात आला. शहाजहानाने उत्पन्नाचा अर्धा भाग शेतसारा ठरविला आणि औरंगजेबाने एकूण उत्पन्नाच्या २५ ते ५० टक्क्यांपर्यंत शेतसारा आकारला. [५३]

शेरशहा हा मोगल काळामधील सुलतान, उत्तम सेनापती आणि उत्तम प्रशासकही होता. त्याने अल्लाउद्दीन खिलजीच्या महसूलाच्या कल्पना प्रत्यक्षात आणल्या. पण अल्लाउद्दीन खिलजीने महसूलाबाबत हिंदू-मुस्लिम भेदभाव केला. शेरशहाला भारतीयांविषयी प्रेम होते. शेतकरी सुखी असेल तर तो अधिक उत्पन्न काढू शकतो. उत्पन्न वाढले तर राज्याला महसूल अधिक मिळू शकतो. यामुळे राज्याच्या खजिन्यात वाढ होते. म्हणून शेतकऱ्यांना सरकारने दुखवू नये. असे शेरशहाला वाटत असे. शेरशहाने दोरखंडाच्या मदतीने आपल्या राज्यातील सर्व जमीनीची मोजणी करून त्याची प्रतवारी ठरविली. त्यात उत्तम, मध्यम आणि कनिष्ठ अशी प्रतवारी केली.

---

५०. मध्ययुगीन भारतः प्रा. गजानन भिडे, डॉ.नाईकनवरे, डॉ. विजय नलावडे, फडके प्रकाशन, द्वितीयावृत्ती, पा.१०६.
५१. Land revenue in India: Prof. R.S. Sharma, Motilal Banarsidass,Publ. Delhi ,1st ed. 1971 P. 26.
५२. मध्ययुगीन भारतः प्रा. गजानन भिडे, डॉ.नाईकनवरे, डॉ. विजय नलावडे, फडके प्रकाशन, द्वितीयावृत्ती, पा.१०७.
५३. मोगलकालीन भारताचा इतिहास : डॉ. दिनकर खाबडे, कैलास पब्ली. औरंगाबाद, १९९७, पा. ६७.

शेरशहाच्या काळात जमीनीची मोजणी बिघ्यांमध्ये केली जात असे. जमीनीच्या प्रतवारीनुसार उत्पन्नाच्या १/३ भाग शेतसारा ठरवला जात असे. राज्यात धल्लाबक्षी किंवा बटाई ,नईक किंवा मुक्ताई, आणि नगदी किंवा जप्ती या ३ पध्दतींनी शेतसारा ठरविला जात असे. [५४] यातील धल्लाबक्षी /बटाई पध्दतीनुसार जमिनीतून आलेल्या उत्पन्नाचा चौथा भाग शेतसारा म्हणून वसूल केला जात असे. म्हणजे शेतकऱ्याने चौथाई सारा पैशाच्या रूपात द्यावा किंवा धान्याच्या रूपात द्यावा. तसेच नईक किंवा मुक्ताई पध्दतीत जमीनीमधील पिक पाहून अंदाज केला जाई आणि त्यावरून शेतसारा ठरविला जात असे. याशिवाय नगदी किंवा जप्ती पध्दतीत जमीनीची सुपिकता बघूनच शेतसारा निश्चित केला जात असे. विशेषतः सुपीक जमीनीच्या बाबतीत हे तंत्र वापरले जात असे. सारा ठरविल्यावर तो सुगीनंतर देण्याचे बंधन शेतकऱ्यांवर होते. शेरशहा शेतकऱ्यांना जमिनी देऊन त्याचा करार (पट्टा) लिहून घेत असे. त्यामुळे जमीनीची मशागत करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहन मिळत असे.

शेतसारा निश्चित झाल्यानंतर शेतसारा दर्शविणारा पट्टा(शिर्षक दस्तावेज) शेतकऱ्याला दिला जात असे व शेतसारा मान्य असल्याची कबूलीयत (संमतीपत्र) शेतकरी देत असे. त्याप्रमाणे कागदपत्रांमध्ये जमिनीची सविस्तर नोंद असे. [५५] शेरशहाच्या राज्यात जमिनीचे उत्पन्न वाढावे आणि शेतकरी, शेतमजूरांना काम करण्यास प्रोत्साहन मिळावे म्हणून पडीक जमीनी शेतकऱ्यांना कसण्यासाठी मोफत दिल्या जात होत्या. पहिली काही वर्षे त्यावरचा शेतसारा घेतला जात नसे. त्यामुळे या काळात शेतकरी सुखी झाले. जमिनदारी किंवा जहागिरी पध्दत बंद करून त्याने रयतवारी पध्दत सुरू केली.[५६] शेरशहाने दुष्काळ, अवर्षण, रोगराई अशा काळात शेतकऱ्यांना साऱ्यात सूट दिली होती.[५७] तसेच नियमितपणे शेतसारा भरणाऱ्या शेतकऱ्यांना उत्तेजन म्हणून साऱ्याचा काही भाग माफ केलेला आढळतो. याशिवाय शेरशहाने शेतीच्या मशागतीसाठी शेतकऱ्यांना तकावी नावाने शासनातर्फे कर्जे दिली आणि वसूलीसाठी हफ्त्यांची सोय केली.

जमीन महसूलाव्यतिरिक्त अनेक कर शेरशहाच्या काळात वसूल केले जात असत. व्यापाऱ्यांकडून मोठा कर घेतला जात असे. तसेच जंगले, टांकसाळी, नजराणे यापासूनही सरकारला उत्पन्न मिळत असे. जकात वसुली, बेबारस मालमत्ता, लष्करी मोहिमेमुळे

५४. मध्ययुगीन भारत : प्रा. अनिल कठारे, कल्पना प्रकाशन, १९९८, नांदेड, प्रथमावृत्ती, पा. १७६.
५५. मोगलकालीन भारताचा इतिहासः डॉ. दिनकर खाबडे, कैलास पब्ली, औरंगाबाद, १९९७, पा. ६९.
५६. History of Indian Administration,(vol. II):B.N.Puri,Bhartiya Vidya Bhavan,Bombay, Ied. P.205 .
५७. मध्ययुगीन भारत: प्रा. अनिल कठारे, कल्पना प्रकाशन, नांदेड, प्रथमावृत्ती, १९९८, पा. ३०५.

मिळालेली लूट हे उत्पन्नाचे इतर मार्ग होते. शेतकऱ्याला जमीन महसूलाशिवाय जरिबाना आणि महासिलाना हे दोन कर द्यावे लागत. यापैकी जरिबाना हा कर म्हणजे जमिनीची मोजणी केल्याबद्दलचे शुल्क किंवा फी होय. हे शुल्क उत्पन्नाच्या २.५ टक्के इतके असे. महासिलांना हे जमीन महसुल वसूल करणाऱ्या अधिकाऱ्याला द्यावे लागणारे शुल्क होते. हे शुल्क उत्पन्नाच्या ५ टक्के इतके असे.

दाहअस्त्री कर म्हणजे दुष्काळात आणि संकट काळात वापरण्यासाठी धान्य रूपाने हा कर शेतकऱ्यांकडून वसूल केला जाई. हा कर म्हणून प्रत्येक शेतकऱ्याला प्रत्येक बिघ्या मागे सात छटाक (१ छटाक = ५० ग्रॅम) इतके धान्य शासनाला द्यावे लागत असे. हे धान्य सरकारी गोदामात साठवले जावून संकटकाळात कमी दराने शेतकऱ्यानां दिले जात असे.

अकबराच्या काळात साम्राज्यातील सर्व जमीन खालसा आणि जहागिर अशा दोन विभागात विभागली गेली होती. खालसा म्हणजे सरकारच्या मालकीची जमीन आणि जहागीर म्हणजे व्यक्तिगत मालकीची जमीन. हया व्यक्तिगत मालकीच्या जमीनी समाजातील श्रीमंतांकडे होत्या ते दरवर्षी निश्चित सारा सरकारला देत नसत.

म्हणूनच अकबराने महसूल पध्दतीत शास्त्रीय पाया निर्माण करण्याच्या दृष्टीने इ.स. १५६० ते १५७५ या कालावधीत निरनिराळया अधिकाऱ्यांवर महसूल पध्दतीच्या दुरूस्तीची जबाबदारी सोपविली.[५८] इ.स. १५७५ मध्ये अकबराने आपल्या साम्राज्यातील सर्व प्रांतांचे १८२ परगणे बनविले आणि प्रत्येक परगण्याचे उत्पन्न एक कोटी रूपये ठरविण्यात आले ते वसूल करणाऱ्या अधिकाऱ्याला 'क्रोडी' म्हणत असत.[५९] या काळातील झब्त पध्दत शास्त्रीय तत्वावरील जमीनीची मोजणी आणि पिक दराचे नियोजन करणारी पध्दत होती. [६०] इ.स. १५८२ मध्ये अकबराने तोडरमलची नेमणूक दिवाण म्हणून केली त्यानंतर त्याने महसूल पध्दतीत केलेल्या सुधारणांना तोडरमल पध्दत म्हणतात.[६१] या पध्दतीनुसार मागील दहा वर्षाच्या उत्पन्नाची सरासरी काढून त्यावर महसूलाची रक्कम निश्चित करण्यांत येत असे. तिलाच झब्त पध्दत म्हणत. [६२] जमीनीचे पोलज (उत्तम) परौती (चांगली) चाचर किंवा

५८. मध्ययुगीन भारतःप्रा.गजानन भिडे, डॉ.नाईकनवरे, डॉ. विजय नलावडे,फडके प्रकाशन ,द्वितीयावृत्ती,२००२, पा.१७७.

५९. मोगलकालीन भारतः डॉ. दिनकर खाबडे, कैलास पब्ली. औरंगाबाद, १९९७, पा.१८०.

६०. Land revenue in India :Prof R.S. Sharma Motilal Banarsidass Publi, Delhi 1st ed. 1971, p. 29

६१. मोगलकालीन भारतः डॉ. दिनकर खाबडे, कैलास पब्ली. औरंगाबाद १९९७, पा. १८३.

६२. मध्यकालीन भारतीय सभ्यता एवं संस्कृतिः डॉ. बिपिन विहारी सिन्हा, ज्ञानदा प्रकाशन,नई दिल्ली, पृ १४८.

छच्छद (मध्यम) बंजर (पडीक किंवा कनिष्ठ) असे ४ प्रकार ठरविण्यात आले. यात दोरी किंवा बांबुने जमीन मोजणी करण्यात येऊ लागली व जमीनीचे बिघा यात मोजमाप होऊ लागले. शेतकऱ्यांकडे असणाऱ्या जमीनीच्या एकूण उत्पन्नाच्या १/३ भाग महसूल ठरविण्यात येत असे. ठरविण्यात आलेला महसूल किंवा शेतसारा रोख रक्कम अथवा धान्याच्या रूपात जमा केला जात असे. या पध्दतीत अवर्षण किंवा दुष्काळाच्या वेळी साऱ्यात माफी किंवा सूट देण्यात येई. शेतसारा एकदाच निश्चित केलेला असल्याने वसूली अधिकाऱ्यांच्या भ्रष्टाचाराला पायबंद बसत असे. पटवारी, मुकादम, पोतदार, कांनूगो, अमीन, बितीकची, (सर्वात वरिष्ठ अधिकारी)नुसार अशी श्रेणीबध्द अधिकाऱ्यांची रचना केली होती. [६३]

यादव्यतिरिक्त अकबराच्या काळात महसूलाशिवाय व्यापारापासूनचे उत्पन्न, बेवारशी मालमत्ता, जकातीपासूनचे उत्पन्न, नजराणे, जंगल-खाणीचे उत्पादन इ. पासून राज्याला फायदा होत असे. अकबराने जिझीया कर रद्द केला. एकूणच अकबरकालीन महसूल व्यवस्थेतील सुधारणांमुळे शहाजहानच्या काळातील सुवर्ण युगाची प्रस्तावना तयार झाली. [६४] अकबराने घालून दिलेली महसूल पध्दती फायदेशीर असल्याने हीच पध्दत नंतरच्या सर्व मोगल राज्यकर्त्यांनी कायम ठेवली. अकबराच्या काळात महसूली उत्पन्न रू १७ कोटी ५० लाख होते. इ.स.१६०५ मध्ये अकबराच्या मृत्यूनंतर सलीम जहांगीर मोगल गादीवर बसला. त्याने दिलेल्या १२ आदेशांमध्ये लोकांवरील अन्यायी कर वसुलीस बंदीचा आदेश जाहीर केला. पण तो आदेश प्रत्यक्षात आलाच नाही. जहांगीरानंतर शहाजहानचा पुत्र औरंगजेब दक्षिणेतील सुभेदार झाला. त्याने खानदेश, वऱ्हाड, तेलंगण, अहमदनगर अशा ४ विभागात मोगल राजवट स्थिरस्थावर केली. इ.स.१६५३ चे इ.स.१६५८ या काळात मुर्शिद कुलीखानने जमीनीची मालकी कायमधारा पध्दतीने दिली. औरंगजेबाच्या काळात, मुस्लिम व्यापाऱ्यांवर २ टक्के कर लावला जात असे. तर हिंदू व्यापाऱ्यांवर ५ टक्के कर लावला जात असे. काही काळानंतर तर मुस्लिमांवरील विक्रीकर रद्द करण्यात आला होता. [६५] मोगल राजवटीमधील अनेक राज्यकर्त्यांनी महसूल पध्दतीमध्ये थोडे बदल केलेले दिसतात. परंतू शेरशहाने निर्माण केलेल्या महसूल पध्दतीला या सर्व काळात पायाभूत मानलेले दिसून येते.

---

६३. मध्ययुगीन भारत: प्रा.गजानन भिडे, डॉ.नाईकनवरे, डॉ. विजय नलावडे, फडके प्रकाशन ,द्वितीयावृत्ती,२००२,पा. १०६.

६४. मोगलकालीन भारतः डॉ. दिनकर खाबडे, कैलास पब्ली. औरंगाबाद, १९९७, पा.१८४.

६५. मध्ययुगीन भारत: प्रा. अनिल कठारे, कल्पना पब्ली. नांदेड, प्रथमावृत्ती, १९९८,पान १४५.

**विजयनगरचे साम्राज्य -**

दक्षिण भारतातील आणखी एक महत्त्वपूर्ण साम्राज्य म्हणजे विजयनगरचे साम्राज्य. येथे जमीन महसूल पध्दतीच्या बाबतीत हिंदू परंपरेचा स्विकार केलेला दिसतो. तर महाराष्ट्रात मराठा सत्तेमध्ये अहमदनगरची निजामशाही व विजापूरची आदिलशाही यांच्या महसूल पध्दतीचा काही प्रमाणात प्रभाव जाणवतो. [६६] विजयनगरच्या साम्राज्यात जमीनीचे स्वरूप, त्या जमिनीतील पिकाचे स्वरूप, पाणी पुरवठयाची सोय, जमीनीची सुपिकता इ. घटकांचा विचार करूनच महसूलाची आकारणी केली जात असे. या साम्राज्यात ठोक पध्दत, पेरणी क्षमता पध्दत, नांगर पध्दत, क्षेत्र पध्दत या चार पध्दती प्रचलित होत्या.[६७] ठोक पध्दत साधी महसूल पध्दत होती. या पध्दतीमध्ये सामान्यतः शेतीतील एकूण उत्पन्नापैकी काही भाग जमीन महसूल म्हणून घेतला जात असे. हा महसूल एकदाच ठरविला जात असे. शेतीतील उत्पन्नाच्या चढ-उताराप्रमाणे त्यात बदल होत नसे. त्यामुळे शासनाच्या दृष्टीने ही पध्दती तोटयाची होती. तसेच पेरणी क्षमता पध्दती ही अशास्त्रीय पध्दत होती. जमीन पेरण्यास आवश्यक बियाणांच्या प्रमाणावर महसूल आकारला जात असे. बियाणांचे ठराविक प्रमाण सारख्याच परिस्थितीत सर्व क्षेत्रात सारखेच उत्पन्न देईल याची खात्री देता येत नाही. त्यामुळे या पध्दतीनुसारही उत्पन्न व पेरणी क्षमता यांच्यात चढ-उतार आढळतात. याशिवाय नांगर पध्दतीत शेत नांगरण्यास आवश्यक नांगरांच्या संख्येवरून जमीन महसूल आकारला जात असे. यात पाणी पूरवठा, पिके, सुपिकता यांचा विचार केला जात नव्हता. शेवटची क्षेत्र पध्दती म्हणजे सरकारने मंजूर केलेल्या मोजणीच्या गजाने जमीन मोजून उत्पन्नाचा अंदाज घेऊन दर ठरविला जात असे. आजही ही पध्दत वापरली जाते. पण हा गज सर्वत्र सारख्या लांबीचा सापडत नाही. इ.स. १५०५ साली जमिन मोजणीसाठी वापरात आणलेला गज ३४ फूट लांबीचा होता.विजयनगर मधील महसूलाचे दर पाराशर स्मृतीवर आधारून ठरविलेले होते. [६८] शेतीतील एकूण उत्पन्नापैकी शासनाचा हिस्सा १/६ असे. उत्पन्नापैंकी १/४ हिस्सा शेतमालकाचा, १/३० देवालयाचा, १/२० ब्राम्हणांचा, व राहिलेला अर्धा हिस्सा शेतकऱ्यांचा असे. आपला हिस्सा सोडून बाकीचे हिस्से शेतकरी सरकारला देत असे. सरकार सर्वांना हिस्सा वाटून देत असे.

---

६६. मोगलकालीन भारतः डॉ. दिनकर खाबडे, कैलास पब्ली. औरंगाबाद, १९९७, पान १८३.

६७. मध्ययुगीन भारतः प्रा.गजानन भिडे, डॉ.नाईकनवरे, डॉ. विजय नलावडे, फडके प्रकाशन,द्वितीयावृत्ती, २००२,पा.११०.

६८. मध्ययुगीन भारतःप्रा.गजानन भिडे, डॉ.नाईकनवरे, डॉ. विजय नलावडे, फडके प्रकाशन,द्वितीयावृत्ती, २००२,पा.१११.

सुरूवातीच्या काळात विजयनगरमध्ये महसूल धान्याच्या स्वरूपात दिला जात असे. सम्राट हरिहरच्या काळात तो रोख स्वरूपात घेतला जाऊ लागला. सम्राट शेरशहानेही अशीच पध्दत स्विकारली व अकबराने तिचा विकास केला. यातूनच 'झब्त' पध्दत निर्माण झाली होती. [६९] जमीनीतील दहा-बारा वर्षांचे उत्पन्न पाहून त्याची सरासरी काढून महसूल आकारला जाई तिला 'सिस्त' पध्दत म्हणत. या पध्दतीत उत्पन्नाचा तिसरा हिस्सा सरकार घेत असे. विजयनगरमध्ये महसूल गोळा करण्यासाठी सरकारी अधिकारी नियुक्त करण्यात येत असत. शेतकऱ्यांबरोबर करार करून ते प्रत्यक्ष कर गोळा करत असत. त्यांना ठेका किंवा लिलाव पध्दतीनेही महसूल गोळा करण्याचे काम दिले जात असे. सरदार-जहांगीरदार यांनाही त्यांच्या जमीनीचा महसूल द्यावा लागत असे. विजयनगरमधील महसूल विभागाला "आठवणे" म्हणत असत.[७०] संकटाच्या वेळी करातून सुट, पाणी पूरवठा, दक्षता याचबरोबर आर्थिक सहाय्य देवून पडीक जमीन लागवडीखाली आणल्यास महसूलात काही प्रमाणात सूट दिली जात असे. [७१]

विजयनगरमधील खेडयात पारंपारीक प्रतिनिधी संस्था होत्या. यांना 'सभा' म्हणत. त्यांना बरेच अधिकार होते. सभा गावासाठी जमीन खरेदी किंवा विक्री करू शकत असे. स्थानिक करांची वसूली करण्याचे अधिकार सभेला होते. काही वेळा सभा राजाच्यावतीने खेडयातील लोकांकडून कर वसूल करीत असे. नविन अन्यायकारक कर राजाने जनतेवर लादल्यास सभा निषेध नोंदवित असे आणि नैसर्गिक संकटाचे वेळी कर रद्द करावे अशी विनंती शेतकऱ्यांच्या वतीने राजाकडे करत असे.

विजयनगर साम्राज्यामध्ये जमीन महसूल आकारणीमध्ये साधर्म्य असलेले दिसून येत नाही. जमीन महसूलाच्या आकारणीसाठी वेगवेगळया पध्दतीचा वापर केलेला आढळतो. प्राचीन काळापासून मध्ययुगीन काळापर्यत महसूल आणि कर पध्दतीमध्ये एक अखंडता निर्माण झालेली दिसते. सर्व राजकीय व्यवस्थांकडून कर व्यवस्थेला महत्वाचे स्थान प्राप्त झालेले दिसते. राजकीय व्यवस्था कार्यान्वित करण्यासाठी, प्रगत करण्यासाठी, राज्याच्या सर्व गरजांची पूर्तता करण्यासाठी कर व्यवस्था महत्वाची भूमिका बजावते. कर किंवा

---

६९. मध्ययुगीन भारत: प्रा. अनिल कठारे, कल्पना पब्ली. नांदेड, प्रथमावृत्ती, १९९८,पा. २८०.

७०. मध्ययुगीन भारत: प्रा. अनिल कठारे, कल्पना पब्ली. नांदेड, प्रथमावृत्ती, १९९८,पा. २७६.

७१. मध्ययुगीन भारतः प्रा. गजानन भिडे, डॉ.नाईकनवरे, डॉ. विजय नलावडे, फडके प्रकाशन, द्वितीयावृत्ती, २००२, पा. ११०.

महसूलाच्या माध्यमातून राज्य उत्पन्न मिळविते आणि त्यातूनच राज्यव्यवस्था चालविली जाते.म्हणूनच करव्यवस्थेबरोबर राजकीय व्यवस्था ही महत्वाची ठरते. महसूल व्यवस्था व त्यानुसार असलेली कर पध्दती विविध कालखंडात कश्या प्रकारे अस्तित्वात होती हे पुढे दिलेल्या तक्यातून स्पष्ट होते. **तक्ता क्र .१ महसूल पद्धती कालशः वर्गीकरण –**

| **कालखंड** | **कर प्रकार** | **कर प्रमाण (Rate)** | **कर देणारा घटक/ करदाता** | **करमुक्ति** |
|---|---|---|---|---|
| मनुस्मृती इ.स. पूर्व | प्रतिभाग, भाग, बलि, याशिवाय पशुपालना वरील कर, विक्रीवरील कर. | धान्याचा सहावा भाग, आठवा किंवा बारावा भाग.सेवेच्या स्वरुपात- महिन्यातून १ दिवस. | प्रत्येकाकडून - व्यापारी,शेतकरी, कारागीर, लोहार, सेवक | क्षत्रिय ब्राम्हण. (वेदशास्त्र पारंगत) (वेदपठण / वेदाध्ययन करणारा) |
| रामायण इ.स.पूर्व ५०० | | षट्भाग | लोकांकडून/ प्रजेकडून | |
| महाभारत इ.स. पूर्व ५००-४०० | भूमिकर,प्रतिभाग,हिरण्य, पशुकर, विष्टि इ. कर | १/६ कमीत कमी १/१० | सामान्य नागरीक, शेतकरी | यज्ञ करणारे ब्राम्हण |
| मौर्यपूर्व काळ इ.स. पूर्व ६००-३१२ | भाग, जकात, छोटया राजाकडून खंडणी. खीरमूल | १/६ भाग | शेतकरी,व्यापारी, छोटे राजे. | |
| मौर्यकाळ इ.स. पूर्व ३२१-२९८ | भाग, सीता, बलि, पिंडकर, हिरण्य विष्टि, प्रतिभाग, पशुकर, उत्पादन कर. चोर रज्जू (पोलिसी कर) आयात-निर्यात कर, प्रतिमापनावरील, व्यवस्थापनविषयक कर, जुगारी वरील कर, पारपत्राचा कर. | १/६ भाग | शेतकरी, पशुपालक, गावकरी, तपस्वी, व्यापारी, कारागीर, जुगारी | १. नवीन तलाव बांधणाऱ्या शेतकऱ्याला ५ वर्षे सूट. २.चांगले उत्पन्न काढणारा. ३. विद्वान ब्राम्हण, क्षत्रिय, पुरोहित ४. कारागीर (शेती, अवजारे व शस्त्र बनविणारा) |
| गुप्तकाळ इ.स. पूर्व ३२०-५४४ | भूमिकर(उद्रंग) आयकर, शुल्क कर, मद्यार्क कर | १/६ भाग | शेतकरी, व्यापारी, कारागीर | धर्मादाय जमीनीनां करमूक्त |
| सुलतान शाही इ.स.पू ७११-१५२६ | धार्मिक / निधर्मी कर, जकात,खरज, जिझिया, खस्म,शर,जमीनमहसूल, कुरणांवरील कर. पाणी पट्टी | कृषी वगळता अन्य उत्पादकांच्या उत्पन्नाच्या १/४०, १/१०, १/२, शेती उत्पन्न – १/३, ह. | शेतकरी, व्यापारी | दुष्काळ, अवर्षण काळ, महापूर काळ. |

| कालखंड | कर प्रकार | कर प्रमाण (Rate) | कर देणारा घटक/ करदाता | करमुक्ति |
|---|---|---|---|---|
| शेरशहा इ.स. १५४०-४५ | जमीन महसूल ३ पद्धती १. खेत बटाई २. लंक बटाई ३. रास बटाई. नश्क, झब्त, दाह अस्तरी, जरीबाना,महासिलाना | १/३ भाग. दाह अस्तरी प्रति बिघा ७ छटाक धान्य | शेतकरी | नैसर्गिक आपत्ती – दाह अस्तरी कर. |
| अकबर इ.स.१५५६-१६०५ | जमीन महसूल – नसक, कानकुट, धल्लाबक्षी. | १/३ भाग. | शेतकरी | दुष्काळ, पूर, नैसर्गिक आपत्ती खंडमाफी |
| जहांगीर शहाजहान इ.स.१६२८-५८ | इजारा - ठेकेदारी | १/२ भाग. | शेतकरी | --- |
| औरंगजेब इ.स.१६५८-१७०७ | कानकूट, भावोली | १/२ भाग. | शेतकरी | --- |
| शिवकाळ इ.स.१६३०-१७०७ मराठेशाही चा काळ | जमीन महसूल- (रयतवारी)<br>**प्रत्यक्ष कर** - इनामपट्टी, मिरासपट्टी, सराफपट्टी, धनगरपट्टी, भाग टका, पायपोसी, तेलपट्टी, कारागिरांवरील कर, मोहतर्फा, हेजिबपट्टी<br><br>**अप्रत्यक्ष कर** – जकात, शिंगोटी कर,गुलाम-खरेदी-विक्रीकर, मिठागारांवरील कर.<br>**इतर कर** - सादिलवार पट्टी, खर्चापट्टी, वराडटका / लग्नटका, तूटपट्टी, नूकसान पट्टी, दसरा पट्टी, जंगमपट्टी, ठाणेपट्टी. | २/५ सारा.<br>प्रत्यक्ष कर, अप्रत्यक्ष कर, इतर कर यांचे प्रमाण वेगवेगळे आहे. | शेतकरी, इनामदार, मिरासदार, वतनदार, व्यावसायिक, सराफ, धनगर, विणकर, चर्मेकार, तेली, कारागीर, व्यापारी, पोर्तुगीज-मुस्लीम व्यापारी, जनावरे जाळणारे, मिठागरांचे मालक इ.आणि गावातील लोक | दुष्काळ, महापूर, वादळ, रोगराई यासारख्या नैसर्गिक आपत्तीमुळे आणि शत्रुपक्षाच्या आक्रमणामुळे पिकाच्या नुकसानीचा अंदाज घेऊन करात सूट दिली जात असे. |

प्राचीन कालखंडापासून भारतीय प्रशासनात महसूल व कराच्या स्वरुपात राजकीय व्यवस्थेचे अस्तित्व आढळते. परंतू विसाव्या शतकाच्या सुरुवातीपासून राज्यशास्त्राच्या अभ्यासाला नवीन वळण प्राप्त झाल्यानंतर “राजकीय व्यवस्था” ही संकल्पना महत्वाची ठरली. पारंपारिक राज्यशास्त्रात ‘राज्य’ ‘शासनव्यवस्था’ व ‘राष्ट्र’ या राजकीय संज्ञा राजकीय जीवनासंबंधी प्रचलित होत्या. त्यांचे स्थान आधुनिक राज्यशास्त्रात ‘राजकीय व्यवस्था’ या संज्ञेने घेतलेले आहे. कारण पारंपारिक राज्यशास्त्रात वापरल्या जाणाऱ्या ‘राज्य’, ‘शासनसंस्था’, व ‘राष्ट्र’ या संज्ञा एका मर्यादित अर्थाने वापरल्या जात. ‘राजकीय व्यवस्था’ या संज्ञेला आधुनिक काळात अत्यंत व्यापक असा अर्थ आहे.

‘System’ हा शब्द जीवशास्त्रातून घेण्यात आला असून त्याचा आधुनिक सामाजिक शास्त्रात फार मोठया प्रमाणात वापर करण्यात येतो. कारण त्यामुळे सामाजिक शास्त्रातील विवेचन चांगल्या पध्दतीने आणि सूत्रबध्दतेने मांडता येते. आधुनिक राज्यशास्त्रात ‘राजकीय’ या शब्दाची व्याप्ती फारच व्यापक आहे. राजकीय सत्तेचा संबंध आज्ञैक्य या तत्वप्रणालीशी असतो. त्यामुळे आज्ञा करणाऱ्या सत्तेशी संबंधीत अशा सर्व प्रक्रिया, संस्था, रचना आणि त्यांच्या कार्यात अडथळे निर्माण करणाऱ्या घटना यांचा अभ्यास राजकीय व्यवस्थेत करण्यात येतो.

समाजातील सर्व राजकीय क्रिया व घडामोडी यांच्याशी राजकीय व्यवस्थेचा संबंध येतो. समाज व्यवस्थेत अशा क्रिया व घडामोडी घडण्याचे स्थान कोठेही असू शकते. राजकीय व्यवस्था संपूर्ण समाजाकरीता काही गोष्टी बंधनकारक ठरवू शकते व अधिकृत निर्णय घेऊ शकते.“विशिष्ट सीमाअंतर्गत कार्य करणाऱ्या घटकांच्या परस्परसंबंधामुळे निर्माण होणाऱ्या कार्यकारी यंत्रणेला व्यवस्था असे म्हणतात.”

System is a distinct but integrated consite whole having structural unity in terms of interrelated and interactive components, having a purpose and objective and having a formulative and functional basis in termes of a principle or set of principles.

डेव्हिड इस्टन यांच्या मते, अधिकृत निर्णय घेऊन त्याची बंधनकारकरीतीने अंमलबजावणी करण्याचा अधिकार प्राप्त असलेल्या अशा समाजातील क्रिया-प्रतिक्रियात्मक व्यवस्थेला “राजकीय व्यवस्था” असे म्हणता येईल.(Politcal system is that system of interactions in

any society through which binding or authoritative allocations are made and implemented.)

मॅक्सवेबर यांनी राजकीय व्यवस्था म्हणजे असा मानवी समुदाय की ज्याला विशिष्ट भूप्रदेशावर स्वाभाविक व मान्यतापूर्वक पद्धतीने त्याचा वापर करण्याची मक्तेदारी प्राप्त झालेली असते.असे म्हटले आहे.(Political system is a human community that successfully claims monopoly of the legitimate use of physical force within a given territory.)

रॉबर्ट ढाल यांच्या मते, राजकीय व्यवस्था ही मानवी संबंधाशी अशी अर्थपूर्ण आहे की जिच्या घडणीत सातत्याने शासन व सत्ता हया गोष्टी अंतर्भूत झालेल्या असतात.(Polictical system is any persistent pattern of human relationship that involves, to a significant extent, power, rule and authority.) गॅबिएल आल्मंड यांच्या मते, स्वतंत्र समाजात आढळणारी, संकलन आणि जुळणीची कार्ये पार पाडणारी अशी क्रिया प्रतिक्रियात्मक व्यवस्था की जिला ही कार्ये पार पाडण्यासाठी, मान्यता प्राप्त पाशवी बळाचा वापर करुन कमी अधिक प्रमाणात धाक निर्माण करण्याचा अधिकार प्राप्त होतो, अशा व्यवस्थेला राजकीय व्यवस्था म्हणतात.[७२](Political system is that system of interactions to be found in all independent societies which performs the functions of integration and adaptation by means of the employment or thret of employment of more or less legitimate physical compulsion.)

राजकीय व्यवस्थेच्या काही पूर्वअटी महत्वपूर्ण असतात. राजकीय व्यवस्थेतील सर्व घटकांमध्ये परस्पर पूरकता असणे आवश्यक असते. विविध भागांचा परस्परपूरक संबंध हे व्यवस्थेचे मुख्य लक्षण होय. कायदेमंडळ, कार्यपालिका, न्यायपालिका, नोकरशाही, राजकीय पक्ष, दबाव गट, हितसंबंधी गट इ. राजकीय व्यवस्थेच्या रचना आहेत. राजकीय व्यवस्था संचलित करण्यासाठी त्यांची कार्ये निर्धारित झालेली असतात. रचनांच्या कार्यात परस्परसंबंध व सहकार्य असल्यामुळेच राजकीय व्यवस्थेला स्थिर स्वरुप प्राप्त होऊ शकते. राजकीय व्यवस्थेच्या हेतूने अनावश्यक ठरलेल्या रचना नष्ट होऊन परिस्थितीशी सापेक्ष ठरणाऱ्या नवीन रचना निर्माण होतात.

राजकीय व्यवस्था स्वयंपूर्ण असेल तर सीमा निश्चितपणे लक्षात येतात. प्राचीन काळात प्रत्येक राजाचे राज्य व सीमा निश्चित होत्या पण आधुनिक काळात राजकीय व्यवस्थेचे

---

७२. तुलनात्मक रा. व्यवस्थाः प्रा. चिं.ग. घांगरेकर, मंगेश प्रकाशन, नागपूर, प्रथमावृत्ती, १९९०, पा. ३.

कार्यक्षेत्र व्यापक झाल्यामुळे राजकीय व्यवस्थांच्या सीमा निश्चित करणे कठीण झाले आहे. राजकीय व्यवस्थेमध्ये काही वैशिष्टये आढळतात. राजकीय व्यवस्थेला सीमा असते. त्या सीमेच्या अंतर्गतच राजकीय व्यवस्थेचे कार्य चालते तसेच प्रत्येक राजकीय व्यवस्थेकरीता ही सीमा सारखी असते असे नाही. ती स्थल, काल, परिस्थितीनुसार बदलणारी असते. म्हणजेच राजकीय व्यवस्थेतील घटकांचा परस्परांशी परिणामकारक असा संबंध असतो. राजकीय व्यवस्थेतील घटक परस्पर पूरक असतात. राजकीय व्यवस्थेचा संबंध कायम सत्तेशी येतो. सत्ता आणि राजकीय व्यवस्था एकमेकांशी निगडीत असतात. राजकीय व्यवस्थेत मागणी किंवा धोरणाच्या आदान, प्रदान, प्रत्यादान यांचा समावेश होतो.

फ्रेंच शास्त्रज्ञ मॉंटेस्क्यू यांनी 'दि स्पिरीट ऑफ दी लॉज' या ग्रंथामध्ये विधी निर्मिती, विधी नियमांची अंमलबजावणी, विधी नियमानुसार न्यायदान ही शासन व्यवस्थेची तीन कार्ये सांगितली आहेत.

आधुनिक काळात 'व्यवस्था' परिस्थितीच्या संदर्भात काय व कसे कार्य करते याला महत्व असते. उदा.आर्थिक व्यवस्थेचे कार्य उत्पादन व वितरण हे आहे, तर राजकीय व्यवस्था ही कार्यक्षमतेच्या दृष्टीने कार्य करते. परंतु मानवाच्या प्रत्येक मागणीची पूर्तता करणे राजकीय व्यवस्थेला अशक्य असते. त्यामुळे कार्यक्षमतेच्या दृष्टीने राजकीय व्यवस्था विचार करते. अशी कार्यक्षमता निरनिराळया स्वरुपाच्या राजकीय व्यवस्थेत भिन्न भिन्न असते. उदा. लोकांच्या गरजा व आवश्यकता पूर्ण करण्याची कार्यक्षमता साम्यवादी राजकीय व्यवस्थेत असते. कारण सधन लोकांकडून प्राप्त केलेली संपत्ती, साधनसामुग्री निर्धन व्यक्तीकडे पोहचविण्याचे कार्य साम्यवादी व्यवस्था दंडशक्तीच्या आधारावर करु शकते. लोकशाही स्वरुपाची राजकीय व्यवस्था लोकाभिमुख असते. त्यामुळे लोकांच्या गरजा आणि आवश्यकता या आधारावरच तिचे प्रदान स्वरुप निर्धारित होते. त्यानंतर राजकीय व्यवस्थेच्या कार्यक्षमतेच्या आधारावर रुपांतरीत प्रक्रिया सुरु होते. राजकीय व्यवस्थेला आपले स्थैर्य टिकविण्याच्या दृष्टीने स्थिर स्थापनेची आणि परिवर्तनीयतेची ही कार्ये करावी लागतात. डेव्हिड इस्टन यांच्या मते देशातील वातावरणाचा परिणाम राजकीय व्यवस्थेवर होतो. स्थल, काल आणि परिस्थितीनुसार लोक राजकीय व्यवस्थेकडे अनेक मागण्या सादर करतात. परंतू प्रत्येक मागणी पूर्ण करणे राजकीय व्यवस्थेला शक्य नसते. तेव्हा अशा परिस्थितीशी जुळवून घेण्याचा प्रयत्न राजकीय व्यवस्था करते. कारण राजकीय व्यवस्थेला स्वतःचे अस्तित्व टिकवायचे असते. राजकीय व्यवस्थेला देशातील सर्वच लोकांचा पाठिंबा असतो

असे नाही. काही लोक तिला विरोध करतात तर काही लोक राजकीय व्यवस्थेला आव्हानेही देतात. राजकीय व्यवस्थेकडे लोकांकडून अनेक मागण्या सादर होतात परंतू साधारणतः क्षमतेच्या दृष्टीकोनातून विचार करता राजकीय व्यवस्था फक्त मुलभूत स्वरुपाचीच मागणी पूर्ण करते. कारण अशा मागणीला जनतेने जास्तीत जास्त संख्येने पाठिंबा दिलेला असतो. अशा मागणीला पाठिंब्यांचे आव्हान असे म्हणतात. अशा मागण्यांच्या पूर्ततेसाठी राजकीय व्यवस्थेवर जनता, संस्था, दबाव गट, हितसंबंधी गट, राजकीय पक्ष यांच्याकडून सतत दडपणे येत असतात. अशी दडपणे आल्यानंतर निर्णय घेण्याची प्रक्रिया सुरु होते. मंत्रीमंडळाचे धोरण, निर्णय, कायदे आणि न्यायालयीन निर्णय हया स्वरूपात त्याचे रूपांतर होते. जनतेच्या मागण्यांचे धोरणात रूपांतर होणे हयाला प्रदान प्रक्रिया म्हणतात. या प्रदान प्रक्रियेमुळे सर्वच लोकांचे समाधान होते असे नाही किंवा नवीन मागण्या येणे बंद होत नाही. त्यामुळे राजकीय व्यवस्थेवर प्रत्यादान स्वरुपाची कार्ये करावी लागतात.

राजकीय व्यवस्था कोणती ना कोणती कारणे दाखवून मागणीचा प्रवेशच होऊ देत नाही किंवा मागण्यांवर नियंत्रण ठेवते. मागण्या योग्य मार्गाने मांडण्याचा आग्रह राजकीय व्यवस्था धरते. लोकांनी केलेल्या असंख्य मागण्या राजकीय व्यवस्था मान्य करुच शकत नाही. लोकांना कमीत कमी, अत्यावश्यक, मागण्या कराव्या लागतात. गॅब्रीयल आल्मंड यांच्या मते, राजकीय व्यवस्थेला आपले अस्तित्व कायम टिकविण्यासाठी काही अत्यावश्यक कार्ये पार पाडावी लागतात. राजकीय व्यवस्थेला आदान प्रक्रियेतील कार्ये करावी लागतात. मानवाच्या गरजा असंख्य असतात त्यामुळे मागण्याही असंख्य असतात. आपल्या मागणीच्या पूर्ततेसाठी मानवाकडून निरनिराळया हितसंबंधीय गटांकडून, पक्षांकडून राजकीय व्यवस्थेवर सतत दडपणे येत असतात.

लोकांच्या हितसंबंधाचे प्रगटीकरण त्यांच्या मागण्यांमधून होते. जीवनाची आवश्यकता आणि गरजा हया दृष्टीने लोकांकडून शासनाला अनेक मागण्या सादर होतात. हया मागण्या शासनांकडून पूर्ण व्हाव्यात यासाठी लोक प्रयत्नशील असतात. उदा. शेतमालाला योग्य भाव मिळणे, निरनिराळया वस्तूवरील वाढवलेले कर कमी करणे, फी वाढ रद्द करणे. अशा मागण्या मान्य करुन घेण्यासाठी त्या सुस्पष्ट स्वरुपात निर्णय निर्धारित करणाऱ्या राजकीय श्रेष्ठीजंनासमोर मांडावयास हव्यात. ज्या पद्धतीने हया मागण्या राजकीय श्रेष्ठीसमोर मांडल्या जातात. त्या प्रक्रियेला हितसंबंधाचे प्रगटीकरण म्हणतात. ते कधी शांततेच्या तर कधी हिंसाचाराच्या मार्गाने होते. उदा. मागण्या मांडण्यासाठी सभा, संमेलने, निदर्शने,

राजकीय श्रेष्ठींच्या भेटीगाठी घेणे शांततेत होते. पण मागण्या मांडण्यासाठी कधी दंगेधोपे, जाळपोळ, लुटालूट, धाकदडपशाही अशा मार्गाचा ही वापर होतो. परिस्थिती आणि मागणीची गरज लक्षात घेऊनच हया मार्गांचा वापर केला जातो. मागण्यांचे रुपांतर धोरणात करण्यासाठी अनेक पर्याय निर्माण करणे म्हणजे हितसंबंधाचे सुसुत्रीकरण होय. उदा. एस.टी ने केलेली भाडेवाढ रद्द करण्यासाठी सरकारी अधिकाऱ्यांच्या भेटी घेवून भाडेवाढ रद्द करण्याचे निवेदन देणे, बहिष्कार घालणे, एस.टी चक्का जाम करणे, हरताळ करणे असे पर्याय सुचविले जातात. राजकीय पक्ष किंवा हिंतसंबंधी गटाकडून त्याचा विचार होतो. सहयोग, तडजोड, देवाण-घेवाण याद्वारे एक निश्चित धोरण आखण्यात येते. त्यालाच हितसंबंधाचे सुसुत्रीकरण म्हणतात. लोकशाहीमध्ये हितसंबंधीय गटांकडून होणाऱ्या मागण्यांच्या आधारेच विधीमंडळात कायदे निर्माण करण्याचे कार्य केले जाते.

राजकीय व्यवस्थेत राजकीय संसूचन महत्वाचे असते. निर्णय कसे घेतले जातात व त्याचा परिणाम काय होतो याला राजकीय व्यवस्थेत फार महत्व असते. निर्णय निश्चिती करण्याच्या दृष्टीने आवश्यक ती माहिती राजकीय व्यवस्थेला पुरविणे, त्या माहितीचे संस्करण करणे ही कार्ये अनेक घटकांद्वारे केली जातात. वरील माहितीच्या आधारावर घेतलेले निर्णय योग्य प्रकारे अंमलात येतात. निर्णयाची अंमलबजावणी करताना ज्या नवीन गोष्टी लक्षात येतात त्या राजकीय व्यवस्थेकडे संसूचनेद्वारे पाठविणे, हया दृष्टीने राजकीय व्यवस्थेच्या कार्यात संसूचनाला विशेष महत्व आहे. वृत्तपत्रे, मासिके, रेडिओ, दूरदर्शन, चित्रपट, संपर्क साधणारे बातमीदार, मध्यस्थी, लोकमत बनविणारे पुढारी, सभा संमेलने इ. संसूचनाचे घटक आहेत. संसूचनाचे यशापयश जास्तीत जास्त लोकांशी संपर्क साधण्यावर अवलंबून आहे.

राजकीय व्यवस्थेतून राजकीय सामाजीकरण घडून येते. राज्यातील व्यक्तीची इच्छा असो वा नसो त्याचा राजकारणाशी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष संबंध येतोच. राजकीय व्यवस्थेची स्थिरता टिकविणे, लोकांना राजकीय प्रश्नांची माहिती करुन देणे, राजकीय समस्यांची उकल करणे, त्यासंबंधी निर्णय घेणे. राजकीय व्यवस्थेसंबंधी लोकांना जाणीव करुन देणे हयालाच राजकीय सामाजीकरण म्हणतात. लोक राजकीय दृष्टया जितक्या जास्त प्रमाणात जागृत असतील तितक्या प्रमाणात राजकीय व्यवस्थेची स्थिरता भरभक्कम होते. राजकीय सामाजिकरणामुळे व्यक्ती राजकारणात भाग घेते आणि त्यामुळेच राजकीय व्यवस्था गतिशील होते.

जनतेकडून केलेल्या मागण्यांचे धोरणात रुपांतर करणे. त्याला प्रदान प्रक्रिया म्हणतात. राजकीय व्यवस्थेतील प्रदान प्रक्रियची काही कार्ये असतात. राज्यातील धोरणाच्या अंमलबजावणीसाठी कायदयाची निर्मिती करणे, तसेच प्रत्यक्षात धोरण अंमलात आणणे किंवा कार्यवाही करणे आणि राज्याचे धोरण अंमलात आणताना येणारे अडथळे दूर करणे अशी ही कार्ये असतात. धोरणाच्या अंमलबजावणीसाठी कायदयाची निर्मिती करण्याची जबाबदारी विधीमंडळावरच असते. आधुनिक काळात विधीमंडळाच्या कायदे निर्मितीच्या कार्यावर प्रभाव पाडणारे अनेक घटक आहेत. उदा. दबाव गट, लॉबी, वृत्तपत्रे इ. विधिनियमांच्या अंमलबजावणीचे कार्य कार्यकारी मंडळाला करावे लागते. त्यादृष्टीने शासकीय कर्मचारी वर्गाला फार महत्व प्राप्त झाले आहे. धोरण अंमलात आणताना येणारे अडथळे दूर करण्याचे कार्य न्यायमंडळ करते. प्रचलित कायदयानुसार न्यायदानाच्या माध्यमातून असे अडथळे दूर केले जातात.

राजकीय व्यवस्थेची प्रत्यादान स्वरुपाची काही कार्ये असतात. जनतेकडून येणाऱ्या अनेक प्रकारच्या मागण्या राजकीय व्यवस्थेला पूर्ण करणे शक्य नसते. त्यामुळे राजकीय व्यवस्थेला स्वतःचे अस्तित्व टिकविण्यासाठी काही कार्ये करावी लागतात. मागण्या प्रशासनापर्यंत येऊ न देणे, मागण्यांवर नियंत्रण ठेवणे, मागण्या कमी करणे इ. कार्ये करावी लागतात.

एकूणच राजकीय व्यवस्था जनतेसाठी कार्य करणारी व्यवस्था असते. त्यामुळे प्रत्येक कालखंडातील राजकीय व्यवस्थेची कार्ये निरनिराळी असलेली दिसतात. राजकीय व्यवस्थेचे म्हणजे राज्याच्या प्रशासनाचे कार्य राज्य प्रमुखाच्या नियंत्रणाखाली चालते. आधुनिक काळात ज्याप्रमाणे प्रशासनाचे कार्ये पंतप्रधानाच्या नियंत्रणाखाली चालते त्याप्रमाणे पूर्वी ते राजाच्या नियंत्रणाखाली चालत असे. पंतप्रधान किंवा राजा यांच्याकडून जसे नियंत्रण राखले जात असते तसेच प्रशासनाची सर्व कार्येही केली जात असतात. त्यासाठी राज्य प्रमुखाला प्रशासकीय मदतनीसांची आवश्यकता असते. अशा मदतनीसांची नियुक्ती करणे म्हणजेच निरनिराळया खात्यांची निर्मिती करणे. भारतात रामायण, महाभारत म्हणजे उत्तर वैदिक काळात अशा खात्यांची निर्मिती करण्यात आलेली दिसते. कौटिल्याच्या अर्थशास्त्रातही खातेपद्धतीचा उल्लेख आढळतो. मोगल आणि मराठा प्रशासनात देखील खाते पध्दती अस्तित्वात होती, हे नवरत्न दरबार, अष्टप्रधान मंडळ यावरुन दिसून येते. म्हणूनच राजकीय व्यवस्था कार्यान्वित करणारी खाते पध्दत्ती ही आवश्यक ठरते.

प्रशासनाची कार्ये करणाऱ्या विभागांमधून खाते (Department) बनते. कोणत्याही स्वरुपाच्या कार्याच्या यशस्वीतेसाठी श्रमविभागणीच्या तत्वाचा वापर करुन कार्याचे विभाग पाडावे लागतात. शासनाची कार्ये पार पाडण्यासाठी विविध स्वरुपाचे विभाग आवश्यक असतात. राज्याच्या प्रशासनासाठी जे विभाग पाडले जातात. त्यांना खाते असे म्हटले जाते. प्रो. एल्. डी. व्हाईट यांच्या मते, "खाते म्हणजे प्रशासनाचा एक प्रमुख घटक असून प्रशासकीय कार्य करण्याची जबाबदारी त्याच्यावर असते". राज्याची कार्ये पार पाडण्यासाठी विविध खाती निर्माण केली जातात. आधुनिक काळात राज्याची जबाबदारी प्रचंड प्रमाणात वाढल्यामुळे राज्य अनेक प्रकारची कार्ये करते. त्यासाठी राज्याकडून अनेक प्रकारच्या खात्यांची निर्मिती केलेली दिसते. एकटया राज्य प्रमुखाला संपूर्ण प्रशासनाची जबाबदारी पार पाडणे कठीण आहे. त्यामुळे अनेक विभाग निर्माण करुन विभागांच्या माध्यमातून प्रशासनाचे कार्य सुरळीतपणे चालविले जाते.

प्राचीन काळी व्यक्तिनिहाय खात्यांची निर्मिती झालेली दिसून येते. परंतू लोकशाहीमध्ये आधुनिक काळात कार्यानुसार खातेपद्धती स्विकारण्यात आल्यामुळे शिक्षण खाते, संरक्षण खाते, आरोग्य खाते ही खाती कायम असतात. पण व्यक्ती मात्र बदलत असतात. आधुनिक काळात प्रत्येक देशात मंत्रिमंडळ तयार करुन मंत्र्यांकडे खात्याची जबाबदारी सोपविली जाते. प्रत्येक खात्यामध्ये मंत्री, राज्यमंत्री, उपमंत्री, संसदीय सचिव हे खात्याचे राजकीय कार्यकारी प्रमुख असतात. तसेच सचिव, साहाय्यक सचिव, अतिरिक्त सचिव, कनिष्ठ सचिव, अधिक्षक, उप-अधिक्षक, मुख्य लिपीक व इतर लिपिक असा सेवक वर्ग कायमस्वरुपी असतो. मुख्य सचिव संबंधीत खात्याच्या मंत्र्याला जबाबदार राहून कार्य करीत असतो. खात्याची स्तररचना निर्माण करताना अधिकार पद परंपरा आणि श्रमविभागणीच्या तत्वांना महत्व असते. प्रत्येक खात्यात वरिष्ठापासून कनिष्ठापर्यंत अशी स्तररचना निर्माण करण्यात आलेली असते. तसेच खात्याच्या कार्यात नियंत्रण कक्षा, अधिकार प्रदान, समन्वय, केंद्रीकरण, आज्ञेची एक वाक्यता या प्रशासकीय तत्वांचा स्विकार गरजेनुसार करण्यात आलेला असतो.

खात्याची निर्मिती काही घटकांवर अवलंबून असते. राज्याच्या कार्याचा उद्देश काय आणि तो उद्देश कसा सफल होईल यांचा विचार खात्याची निर्मिती करताना केलेला असतो. कार्य हे खाते निर्मितीचे सार्वत्रिक स्वरुपाचे तत्व मानले जाते. उदा. शिवाजीच्या राज्यात स्वराज्य राखणे या उद्देशाला महत्व दिले गेल्याने अष्टप्रधानापैकी पंडितराव आणि न्यायाधिश

यांना सोडून इतर सर्व प्रधानांना लष्करी मोहिमेवर जावे लागत असे. आधुनिक काळात मात्र कल्याणकारी राज्यव्यवस्थेमुळे लोकांच्या कल्याणाचा विचार करुन लोकांना शिक्षण, आरोग्य, संरक्षण याबरोबरच उच्च व तंत्र शिक्षण, व्यापार व दळणवळण, अनुसुचित जाती जमातींचा विकास व्हावा म्हणून त्या स्वरुपाची खाती निर्माण करण्यात आलेली दिसतात.

प्रशासनातील विविध प्रकारच्या प्रक्रिया विशिष्ट तंत्राद्वारे किंवा कौशल्याद्वारे पार पाडल्या जातात. प्रशासनातील प्रक्रिया तांत्रिक व व्यावसायिक स्वरुपाच्या असतात. तेव्हा विशिष्ट तंत्राने, कौशल्याने त्या प्रशासकीय प्रक्रिया घडवून आणाव्या लागतात. शासकीय कार्ये पार पाडताना विशिष्ट तंत्राचा, कौशल्याचा वापर करावा लागतो. आधुनिक काळात कायदा खाते, अभियांत्रिकी खाते, हिशेब तपासणी खाते इ. खाती या घटकावर आधारलेली आहेत. शिवकाळात लष्करी नैपुण्यामुळेच शिवाजी महाराजांनी अष्टप्रधानांपैकी सहाजणांना ही पदे दिली होती. त्याकाळात लष्करी प्रशासनाला अत्यंत महत्व होते. ती त्या काळाची गरज होती. त्यामुळे लष्करी कौशल्य असणाऱ्या मंत्र्यांचीच शिवाजी महाराजांनी आपल्या अष्टप्रधान मंडळात नेमणूक केली होती.

प्रशासनातील वेगवेगळी खाती निर्माण करताना काही विशिष्ट वर्गाच्या किंवा लोकांच्या विकासासाठी, हितासाठी खाती निर्माण केली जातात. म्हणजेच प्रजा हा आधारभूत घटक मानून अशा खात्यांची निर्मिती केली जाते. उदा. भारतात आधुनिक काळात जसे बालक-विकास खाते, शेती विकास खाते, आदिवासी विकास खाते अशी खाती निर्माण करण्यात आली आहेत. मौर्यपूर्व काळात महसूल व्यवस्थेचे कामकाज पाहणारा स्वतंत्र विभाग होता कारण राज्याच्या उत्पन्नाचा मुख्य स्त्रोत महसूल हाच होता. जमीन महसूल सर्व लोकांकडून कसा वसूल करता येईल पण त्याचा लोकांना त्रासही होणार नाही याविषयी या विभागामार्फत विचार केला जात असे. म्हणजेच आधुनिक काळ असो की प्राचीन काळ असो राज्यव्यवस्था प्रजेला डावलून कार्य करु शकत नाही. विशिष्ट प्रदेशाच्या काही समस्या व गरजा लक्षात घेवून काही खात्यांची निर्मीती केलेली असते. प्रशासनाच्या सोयीसाठी प्रदेश या घटकाचा विचार आधुनिक काळात केला जातो.

जेव्हा खात्याच्या प्रमुखपदी एक व्यक्ती असते. तेव्हा तिला एकल पध्दती म्हणतात. भारतात एकल प्रमुख पध्दतीवर आधारित खाती निर्माण केलेली दिसतात. शिक्षण, गृह, संरक्षण, आरोग्य अशा खात्यांवर राजकीय प्रमुख खात्याचा मंत्री नियंत्रण ठेवतो. सचिव हा प्रशासकीय कार्यकारी प्रमुख असतो. खात्याचे मंत्री व सचिव दोघेही खात्याच्या कार्याला

जबाबदार असतो. जेव्हा खात्याच्या प्रमुखपदी अनेक व्यक्तींचे मंडळ असते तेव्हा त्यास मंडळ पध्दती म्हणतात. उदा.भारतात सेंट्रल बोर्ड ऑफ रेव्हेन्यू या मंडळाच्या नियंत्रणाखाली कस्टम्स, सेंट्रल एक्साईज, इन्कम टॅक्स ही खाती कार्य करतात. जेव्हा खात्याच्या प्रमुखपदी मंडळ किंवा आयोग असते तेव्हा त्याच्या कारभारावर राजकीय दडपण येत नाही.

आधुनिक काळात खाते पध्दती लोककल्याणाची कार्ये पार पाडण्यासाठी अत्यंत उपयुक्त ठरते. परंतु निरुत्साही व बेजबाबदार कर्मचारी वर्ग, अकार्यक्षमता, दफ्तर दिरंगाई, सत्तेचा दुरुपयोग अशा दोषांचा खात्यांच्या प्रशासनात समावेश होतो. या दोषांमुळे खात्याच्या कार्यक्षमतेवर परिणाम होतो. इ.स.१८८७ साली अमेरिकेचे तत्कालीन राष्ट्राध्यक्ष प्रो. वुडो विल्सन यांनी प्रशासन आणि धोरण हे एकमेकांपासून वेगळे आहेत असे म्हटले. त्यांच्या मताप्रमाणे धोरण आखणी ही एक राजकीय कृती आहे तर प्रशासनाचा संबंध धोरणाच्या अंमलबजावणीशी आहे. प्रशासनाचे कार्यक्षेत्र व्यावसायीक आहे. राजकारणाच्या वर्तुळापासून प्रशासन बाहेर असते आणि त्यामुळे प्रशासकीय प्रश्न हे राजकीय प्रश्न होऊ शकत नाही. यानंतर प्रो. गुडनो यांनी या विषयाचा सखोल अभ्यास करुन धोरण आणि प्रशासन हे वेगवेगळे आहेत याचे समर्थन केले. त्यांच्या मताप्रमाणे राजकारणाचा संबंध धोरण आखणीशीच असतो. धोरण निश्चित झाल्यानंतर राजकारणाचे कार्य संपते आणि प्रशासनाचे कार्य सुरु होते आणि यामुळे प्रशासकाचा धोरण आखणीशी संबंध नसतो. यामुळे प्रशासन व राजकारण हे एकमेकांपासून वेगळे आहेत. अलीकडच्या काळात या मताविरुद्ध टीका करण्यात आली आहे. नवीन विचारांप्रमाणे धोरण आणि प्रशासन हे वेगवेगळे असू शकत नाही. त्यांचा परस्पर घनिष्ठ संबंध असतो. ल्यूथर गुलीक आणि पॉल ॲपलबी यांनी या विचारांचे समर्थन केले आहे. प्रशासन हे धोरणापासून वेगळे असू शकत नाही असे त्यांनी सांगितले. प्रशासनाचा संबंध धोरण आखणीशी असतो. मात्र त्यांचा सहभाग वेगळया प्रकारचा असतो. प्रशासनातर्फे विधीमंडळाला कायदे करण्यासंबंधीच्या शिफारशी करण्यात येतात. अशा प्रकारे आजचे प्रशासकीय कर्मचारी धोरण आखणी आणि त्याची अंमलबजावणी ही दोन्ही कामे करतात. पीटर ओडगार्ड यांनी ही "धोरण आणि प्रशासन ही राजकारणाची जुळी मुले आहेत" असे म्हटले आहे.

वरील विचारांपैकी कोणत्याही एका विचाराचे समर्थन करणे बरोबर नाही. धोरण आखणीचे कार्य राजकारणाचे आणि त्यांच्या अंमलबजावणीचे कार्य प्रशासनाचे आहे. तरीही आधुनिक युगात प्रशासनाच्या मदतीशिवाय धोरण आखणे अवघड आहे. धोरण आखण्याची

प्रक्रिया गतिशील आणि सतत चालणारी प्रक्रिया आहे. धोरणे विविध पातळीवर निश्चित केली जातात असे ग्लॅडन यांचे मत आहे. त्यांनी चार पातळीवर धोरण निश्चितीच्या पातळया स्पष्ट केल्या आहेत. उच्च पातळीवरील धोरण निश्चित करण्याचे कार्य संसद करीत असते. त्यानंतर मंत्रीमंडळाचा आणि सामान्य प्रशासनाचे उच्च प्रशासकीय अधिकारी यांचा संबंध धोरण निश्चितीशी येत असतो. काही वेळा तांत्रिक स्वरुपाचे निर्णय घेण्यासाठी तांत्रिक तज्ञांची मदत घेण्यात येते.

प्रशासकीय कार्यात सर्वात महत्वाची प्रक्रिया म्हणजे धोरण-आखणीची प्रक्रिया होय. असे पॉल ॲपलबीं यांनी म्हटले आहे. कृतीच्या योजनेत धोरणाला महत्व असते आणि धोरणामुळे व्यवस्थापक किंवा प्रशासक कायद्याच्या चौकटीत, निर्धारित उद्दिष्टांच्या पूर्तीसाठी योग्य नियोजन करु शकतो. धोरणामुळे उद्दिष्टांना अर्थ प्राप्त होतो म्हणजेच या उद्दिष्टांना विशेष आकार देण्याचे कार्य धोरण करते.

धोरण शब्दाचा अर्थ बऱ्याचदा योग्य लावला जात नाही. नियम, रुढी आणि निर्णय या शब्दांना धोरणाशी जोडून त्यांचे एकच अर्थ लावण्यात येतात ते योग्य नाही. नियमांमुळे कोणते कार्य करावे किंवा कोणते कार्य करु नये याची माहिती मिळते. मात्र धोरण हे निश्चित स्वरुपाचे असते. रुढी ही सतत केल्या जाणाऱ्या वर्तनामुळे अस्तित्वात येते आणि कायम होते. मात्र धोरण हे विचारपूर्वक केलेली कृती असते. तसेच धोरण आणि कार्यपध्दती यातही फरक असतो. धोरणाचा संबंध मूलभूत प्रश्नांशी असतो आणि कार्यपध्दतीद्वारे त्याची अमंलबजावणी होते याचा अर्थ असा की कार्यपध्दती हे एक माध्यम आहे. धोरण ही संकल्पना स्पष्ट करण्याचा अनेक विचारवंतांनी प्रयत्न केला आहे.

जी. आर. हेन्री यांच्या मते धोरण म्हणजे प्रत्यक्ष कृतीसाठी व्यवस्थापकाने मान्य केलेले आणि अनुसरलेले शाब्दिक, लेखी किंवा गर्भित मूलभूत मार्गदर्शक होय. (A policy is a verbal, written of implied basic geode to action that is adopted and followed by a manager)

डिमॉक आणि डिमॉक यांच्या मते प्रशासकीय निर्णयास मार्गदर्शन करणारे व जाणीवपूर्वक स्वीकारलेले कृती करण्याचे नियम म्हणजे धोरण होय. (The conseiously acknowledged rules of conduct that guide administrative decisions.)

येझेकील द्रोर (Yehezkel Dror) या लोकप्रशासन तज्ञाने "शासकीय धोरण भविष्यकाळामधील शासकीय कृतीची प्रमुख उद्दिष्टे निश्चित करते" अशी व्याख्या केली आहे. [७३] शासकीय धोरण सार्वजनिक हित, सर्वोत्कृष्ट मार्गांनी साध्य करते, असेही द्रोर लिहितो. शासन किंवा प्रशासन लोकांना जबाबदार असल्यामुळे त्याने वापरलेल्या मार्गाची चिकित्सा वा परीक्षण लोक व लोकप्रतिनिधी करु शकतात. म्हणून हे बंधन शासनावर वा प्रशासनावर येते, हे स्पष्ट आहे. राल्फ चॅन्डर व जॅक प्लॅनो यांनी "राष्ट्रीय समस्या वा शासकीय प्रश्नांचे निवारण करण्यासाठी साधनसामग्रीचा (strategic) केलेला उपयोग म्हणजे सार्वजनिक धोरण होय," अशी व्याख्या केलेली आहे. [७४] ही व्याख्या फारच त्रोटक आहे, कारण तिच्यामध्ये फक्त शासकीय समस्येचे निवारण कमीत कमी साधनसामग्रीमध्ये करण्यावर भर दिलेला आहे. मूल्ये, तार्किकता, वगैरे घटकांचा विचार या व्याख्येने केलेला नाही.

शासनाची साधनसामग्री मोठया प्रमाणावर ज्या ज्या कार्यामध्ये वा कृतीमध्ये गुंतलेली असते अथवा बऱ्याच मोठया जनसमुदायाच्या हितसंबंधावर त्याचा परिणाम होणार असतो, त्या कार्याला किंवा कृतीला धोरण संबोधण्याचा प्रघात आहे. या व्याख्येमध्ये मोठया प्रमाणावरची शासनाच्या साधनसामग्रीची गुंतवणूक वा मोठया जनसमुदायाच्या हितावर प्रभाव असा उल्लेख करण्यात आला आहे. परंतु धोरणाचा प्रभाव (उदा. आयकराचा दर कमी करण्याचा) छोटया गटांवर, (उदा. उद्योगपतींवर) पडू शकतो, अथवा साधन सामग्रींची गुंतवणूक कमी प्रमाणावरही (उदा.वृद्ध कलाकारांना वित्तीय सहाय्य देणे) असू शकते. म्हणून ती धोरणे नाहीत असे म्हणता येत नाही.

शासकीय धोरणामध्ये एकामागून एक अशा संबंधित निर्णयांचे आकृतीबंध समाविष्ठ होतात. राष्ट्रीय उद्दिष्टांना कृतीत आणण्याचे कार्य धोरण आखणीमुळे होत असते. जर राजकीय व सामाजिक उद्दिष्टे निश्चित स्वरुपाची नसतील तर धोरण आखणीत अडचण होते आणि कायदे मंडळाने केलेले कायदे सामान्य स्वरुपाचे होऊ शकतात. वेगवेगळया देशात उद्दिष्ट प्राप्त करण्याचे मार्ग वेगवेगळे असू शकतात. प्रत्येक देशाला आपली परिस्थिती पाहून मार्ग शोधावा लागतो. अस्पष्ट ध्येयांना मूर्त स्वरुप देण्याचे कार्य धोरणामुळे होते. प्रशासनात प्रत्यक्ष कोणते कार्य करावयाचे आहे ते धोरणामुळे माहीत होते. धोरण

---

७३. Public policy making Re-examined: Chevndler, Scraton, U.S.A. 1968, p. 12.

७४. The Public Administration Dictionary: John Wiley & Sons,New York, 1982, p.96

आखणी शिवाय प्रशासनात कार्य होऊ शकत नाही. प्रशासन हे ध्येयप्राप्तीची सांघिक प्रक्रिया असते. धोरण स्थिर नसून गतिशील असते आणि बदलत्या परिस्थितीत बदलत असते. धोरण आखणीची प्रक्रिया राजकीय व सामाजिक परिस्थितीवर अवलंबून असते. बदलत्या परिस्थितीतील देशाचे ध्येय बदलता येते आणि त्याप्रकारे धोरणे आखली जातात. म्हणूनच लोकप्रशासनाचे अभ्यासक सेकलर हडसन यांनी प्रत्येक धोरणात्मक निर्णयाला "प्रक्रियेतील एक क्षण" असे म्हटले आहे. धोरण आखणीची प्रक्रिया अनेक गोष्टींवर अवलंबून असते. धोरण आखणीची प्रक्रिया प्रशासनातील सतत चालणारी प्रक्रिया आहे आणि अनुभवाच्या आधारे धोरणाची पुर्नआखणी ही पहिल्या सारखीच महत्त्वाची असते. तसेच धोरण आखणी करीत असताना काही गोष्टी लक्षात घेणे आवश्यक असते. स्वैराचार पद्धतीने धोरण आखणी होऊ शकत नाही. धोरण आखणीच्या वेळी विविध घटकांच्या प्रभावाचा विचार करावा लागतो. उदा. देशाची राजकीय विचारसरणी, सामाजिक चालीरिती, प्रथा, परंपरा, आर्थिक परिस्थिती, लोकमत इत्यादींचा विचार करणे जरुरीचे असते. तयार केलेले धोरण घटनेशी सुसंगत असणे जरुरीचे आहे अन्यथा कोणीही व्यक्ती त्या धोरणाविरुद्ध कायदेशीर तक्रार करू शकते. त्याबरोबरच विविध प्रकारचे हितसंबंधी गट आपले हित साधण्यासाठी धोरण आखणीच्या वेळी निरनिराळया मार्गानी दबाव टाकीत असतात. परंतू हितसंबंधी गटांचे हित जनहिताविरुद्ध जाणार नाही हे पाहणे जरुरीचे असते. म्हणजेच धोरण आखणीचे कार्य हे विविध लोकांच्या सहकार्याचा परिणाम असतो आणि त्यामुळे धोरण आखणीची प्रक्रिया ही सांघिक प्रक्रिया असते.

धोरण विश्लेषण हे (Policy Analysis) शासनाचे म्हणजेच प्रशासनाचे एक प्रमुख कार्य आहे. शासनाचे वा प्रशासनाचे एक प्रमुखच, नव्हे तर प्रारंभीचे सूत्ररुपी, कार्य धोरणांच्या रुपाने स्पष्ट किंवा मूर्त झालेले असते. शासनाच्या धोरणांमधून शासनाचे कार्यक्रम, निर्णय व कार्यवाही यांची निष्पत्ती होते. धोरणामध्ये प्रस्ताव (आयकर वाढविण्याचा), कार्यक्रम (फळबागांचा विकास करण्याचा) किंवा उद्देश (दारिद्रय कमी करण्याचा) असे वेगवेगळे आशय ग्रंथित झालेले असतात. या निर्णयांना वेगवेगळी परिस्थिती, आणि वैयक्तिक, गटांचे व संघटनांचे प्रभाव कारणीभूत असतात. धोरणांची निर्मिती व कार्यवाही बऱ्याच कालावधीमध्ये होऊ शकते. धोरणाची उद्दिष्टे या कालावधीमध्ये थोडयाफार फरकाने बदलूही शकतात. धोरणाचा परिणाम उद्दिष्टांच्या अपेक्षेप्रमाणे होईलच याचाही भरवसा नसतो.

निरनिराळया व्यक्ती व समाजामधील गट शासनाच्या विविध पातळयांवर आपल्या मागण्या व पाठिंबा कळवितात आणि सार्वजनिक धोरणांच्या द्वारे कृतींमधून साध्य करुन घेण्यासाठी प्रयत्न करतात.[७५] शासकीय धोरणाचा, ज्या व्यक्तीं किंवा गटांच्या संदर्भात शासकीय धोरण तयार केलेले असते, त्यांच्यावर निश्चित परिणाम होतो, निजी क्षेत्रामधील धोरणांचा तसा परिणाम होत नाही.

हेतू किंवा उद्देश विशिष्ट धोरणाच्या पाठीमागे प्रेरक शक्ती म्हणून आधारभूत असतात. उदाहरणार्थ, वस्तीवस्तींमधून एकत्रित शाळा स्थापन करण्याच्या धोरणामागील हेतू समाजामध्ये किमान क्षमता निर्माण करुन व्यक्तीव्यक्तींमध्ये समता निर्माण करणे हा असावा. हे भारतामधील १९६८च्या (कोठारी) शिक्षण आयोगाने निर्दिष्ट केले होते. तर विशिष्ट धोरणांची फोड वेगवेगळया कृती (tasks) मधून होते. वस्त्यांमधून एकत्रित शाळा निर्माण करणे हे धोरण म्हणून आखले तर तशी शहरांमधून व नगरांमधून योजना तयार करणे ही प्रारंभिक कृती होईल, तर त्या नंतर प्रत्यक्ष शाळा स्थापणे ही नंतरची कृती होईल.

धोरण मनुष्यांच्या गरजांमधून स्फुरते, या गरजांची मोजदाद लोक करतात आणि त्याच्याही पाठीमागे वेगवेगळया मूल्यांमधील निवड असते. मनुष्यांच्या गरजा वास्तव वा वास्तव सदृश असतात. गरजांची मोजदाद तर्कावर आधारलेली वा अतार्किक असते. लोक हुशार, अनुभवी अथवा मर्यादित दृष्टीकोनाचे, चालत्या घडीला दाद देणारे असतात. व्यक्तीव्यक्तींची मूल्ये मानवतावादी, स्वार्थी, ध्येयवादाने प्रेरित झालेली वा गोंधळलेल्या मनःस्थितीतून उगम पावलेली असतात. मूल्याधिष्ठित गरजेमधून साकारलेले धोरण स्थिर असते, असे मानले जाते.

प्रशासनाच्या दृष्टिकोनामधून धोरण-प्रक्रिया (Policy Process) महत्वाची असते, तिच्यामध्ये धोरण-निश्चिती वा निर्मिती (Policy Making), धोरणाची कार्यवाही (Policy Implementation) आणि मूल्यमापन (Policy Evaluation) या तीन अवस्था किंवा टप्पे असतात. प्रो. वुड्रो विल्सनच्या म्हणण्याप्रमाणे आणि ब्रिटीश संसदीय पद्धतीमधील प्रथेप्रमाणे धोरण-निर्मिती राजकारणी व्यक्ती करतात तर धोरणाची कार्यवाही प्रशासन अधिकारी करतात. परंतु ही विभागणी वास्तवावर आधारलेली नाही असा राजकारणी व प्रशासक यांचा अनुभव नाही किंवा जाणकारांचे मत नाही. धोरण-निर्मितीसाठी राजकारणी व्यक्ती जबाबदार असल्या तरी धोरण निर्मितीमध्ये प्रशासन अधिकाऱ्यांचा अनुभव व प्रशासकीय ज्ञान यामुळे

७५. Public Policy: Winthrop, Peter Woll, Cambridge, Mass Pub., U.S.A., 1974, p 14.

सहभाग असतो. धोरण कार्यवाहीसाठी प्रशासन अधिकारी जबाबदार असले तरी त्या कार्यवाहीवर यु.एस.ए. मध्ये काँग्रेस व ब्रिटनमध्ये संसद टीका करते. यु.एस.ए. मध्ये हितसंबंधी गटाचे (Interest Groups) व काँग्रेसचे सदस्य व समित्या यांचा अर्थसंकल्प मंजुरीच्या व विधेयकांच्याद्वारे धोरण आखणीमध्येही सहभाग असतो. ब्रिटनमध्ये संसद या बाबतीत अंतिम प्राधिकारी असली तरी मंत्रिमंडळाचा प्रभाव आणि वर्चस्व असते.

आधुनिक काळात लोकप्रशासन समाजाचा एक अविभाज्य घटक झाला आहे. राज्याने लोककल्याणाची जबाबदारी स्विकारल्याने लोकप्रशासन महत्वपूर्ण बनले आहे. पण प्राचीन काळापासून लोकहितकारक कार्ये करीत असल्याने लोकप्रशासनाचे अस्तित्व सर्व काळात असल्याचे दिसते. लोकांचे हित विचारात घेणारे आणि त्यानुसार कार्य करणारे प्रशासन म्हणजे लोकप्रशासन होय. लोकप्रशासनाच्या अनेक विचारवंतांनी लोकप्रशासनाच्या व्याख्या केल्या आहेत. व्यवस्थापनाचा पंडित हरबर्ट सायमनच्या मते 'राष्ट्र, राज्य आणि स्थानिक संस्थांच्या प्रशासकीय विभागांच्या कार्याला लोकप्रशासन असे म्हणतात.' व्यापक अर्थाने लोकप्रशासनाचे कार्य शासनाच्या प्रत्येक विभागाशी संबंधित असते. पण अमेरिकन विचारवंत मि. डब्लू. एफ. विलुबी यांच्या मते 'लोकप्रशासनाचे कार्य हे केवळ कार्यकारी मंडळाच्या कार्याशी संबंधित असते.' म्हणजेच राज्याच्या धोरणांची अंमलबजावणी करणारी यंत्रणा म्हणजे लोकप्रशासन होय.

एकोणिसाव्या शतकाआधी लोकप्रशासनाची मुख्य कार्ये शांतता व सुव्यवस्था राखणे. देशाचे संरक्षण करणे, न्यायदान करणे अशी मर्यादित स्वरुपाची होती. एकोणिसाव्या शतकापासून मात्र शिक्षण, आरोग्य, औदयोगिक विकास यासारखी अनेक कार्ये करण्याचे धोरण राज्याने स्विकारले. या सर्व कार्यांची पूर्तता करण्यासाठी व्यापक स्वरुपाची प्रशासन व्यवस्था राज्याला निर्माण करावी लागली. त्यामुळे लोकप्रशासन व्यापक बनत गेले.

मानवाच्या विकासाच्या टप्प्यामधील शेती अवस्थेपासून मानवी जीवन स्थिरावण्यास सुरवात झाली. मानवाचे परस्पर संबंध, देवाण घेवाण यातून मानवाच्या गरजांची पूर्तता होत गेली. त्यानंतर काही ठिकाणी राजेशाही, तर काही ठिकाणी साम्राज्ये उदयास आली. या राजेशाही व साम्राज्यांच्या रक्षणासाठी आणि विस्तारासाठी प्रशासनाचाही विस्तार होत गेला. सैन्याची वाढ, तसेच देशात आणि देशाबाहेर व्यापार यावर नियंत्रण अशा अनेक जबाबदाऱ्यां मुळे प्रशासन विस्तारत गेले. त्यामुळे लोकप्रशासनाच्या कक्षाही विस्तारल्या.

आधुनिक काळात राज्याचे कार्यक्षेत्र व्यापक बनले आहे. सामाजिक, आर्थिक, राजकीय अशा अनेक प्रकारची कार्ये आधुनिक काळातील शासन संस्थेला करावी लागतात. कायदे बनविणे, त्याची अंमलबजावणी करणे आणि न्याय देणे याचाही समावेश प्रशासनात झालेला आहे. त्यामुळे लोकप्रशासन व्यापक बनले आहे. अशा व्यापक लोकप्रशासनाचा अभ्यास करणे कठिण असल्यामुळे काही विचारवंतांनी लोकप्रशासनाची व्याप्ती संकुचित केली आहे. यापैकी एक विचारवंत म्हणजे ल्युथर ग्युलिक यांच्या मते लोकप्रशासनाची व्याप्ती प्रशासकीय कार्याशी निगडीत आहे. ल्युथर ग्युलिक यांनी प्रशासनाच्या सात प्रमुख कार्यांच्या इंग्रजी भाषेतील आद्याक्षरांतून पोस्ड्कॉर्ब या शब्दाच्या आधारे ही व्याप्ती स्पष्ट केली आहे. यातील प्रशासनाचे एक प्रमुख कार्य म्हणजे नियोजन किंवा योजना (Planning) हे होय. कार्याचे स्वरुप, कार्य करण्याची पध्दत त्यासाठी लागणारी साधने किंवा साहित्य, कालावधी या सर्व गोष्टींचा विचार नियोजनात केला जातो. नियोजनामुळे कार्य यशस्वी होण्यासाठी आवश्यक गोष्टी ठरविता येतात आणि अनावश्यक गोष्टी टाळता येतात. म्हणूनच प्रशासनाचे हे महत्वाचे कार्य ठरते. नियोजनाप्रमाणेच प्रशासनाचे कार्य पूर्ण करण्यासाठी संघटना(Organization) निर्माण करावी लागते. संघटना निर्माण केल्यामुळे कामामध्ये समन्वय साधून नियोजित कार्य पूर्ण करता येते. संघटनेचे कार्य करण्यासाठी त्यात विभाग, उपविभाग यांची रचना केली जाते. या सर्व विभागांचे, उपविभागांचे काम पहाण्यासाठी कर्मचारी वर्गाची व्यवस्था (Staffing)करणे आवश्यक असते. कुशल व पात्र कर्मचारी वर्गाची भरती करणे, त्यांना प्रशिक्षण देणे, पदोन्नतीची योग्य पध्दत अवलंबिणे या आधारे प्रशासनाचे कार्य चांगल्या प्रकारे केले जाते. प्रशासनाचे कार्य चांगल्या प्रकारे होण्यासाठी योग्य नोकर वर्गाबरोबर कुशल मार्गदर्शकाचीही (Directing)गरज असते. प्रशासनात कर्मचारी वर्गाला आदेश, सूचना देण्यासाठी मार्गदर्शन करण्या साठी अनुभवी अनुभवी मार्गदर्शक असल्यामुळे प्रशासनाच्या नियोजित उद्दीष्टांची पूर्तता होते. त्यामुळे प्रशासनामध्ये विभाग प्रमुखांचे मार्गदर्शन महत्वपूर्ण असते. प्रशासनाच्या कामामध्ये समन्वय(Co-ordination)साधून विविध विभागांमध्ये चालणा-या कामामध्ये सूसूत्रता राखणे आवश्यक असते. त्यामुळे प्रशासनातील दुहेरी कार्य टाळता येते. सर्व विभागांचे कार्य एकत्र करुन त्याला पूर्ण रुप देता येते. सर्व विभागात परस्पर संबंध प्रस्थापित करुन संघर्ष टाळता येतात व प्रशासनाचे कामकाज सुरळीत होते. प्रशासनाचे कामकाज करताना तपासणी, संशोधन, विशिष्ट प्रकारची माहिती एका विभागाकडून दुस-या विभागाकडे पाठवावी लागते.

अशी माहिती किंवा अहवाल (Reporting)बनविल्यामुळे प्रशासकीय कामातील अडचणी स्पष्ट होतात आणि त्यासाठी उपाय योजना करता येतात. प्रशासनासंबंधीची माहिती जनतेला या अहवालातून मिळते. तसेच प्रशासन चालविण्यासाठी आवश्यक असणाऱ्या निधीसाठी अंदाजपत्रक(Budgeting)आवश्यक असते. अंदाजपत्रकातून निधी किती, कसा उपलब्ध करायचा, तो कसा खर्च करायचा याविषयीचे पूर्व नियोजन करता येते. म्हणूनच प्रशासकीय कार्यामध्ये अंदाजपत्रक अत्यंत उपयुक्त ठरते. ल्युथर ग्युलिक यांनी या ७ प्रशासकीय कार्यांच्या आधारे लोकप्रशासनाची व्याप्ती स्पष्ट केली आहे.

लोकप्रशासन हे एक शास्त्र असून त्याच्या कक्षा विस्तारल्या आहेत. आधुनिक काळात लोकप्रशासनात प्रशासकीय क्रिया-प्रक्रियांचा, प्रशासकीय वर्तनाचा अभ्यास केला जातो. त्यामुळेच लोकप्रशासनाचा राज्यशास्त्र, इतिहास यासारख्या अन्य सामाजिक शास्त्रांशी संबंध येताना दिसतो.

राज्याने लोकांसाठी ज्या व्यवस्था बनविल्या त्या व्यवस्थांचा म्हणजेच शासन पध्दतींचा, राजकीय व्यवस्थांचा, शासनाचा राज्यशास्त्रात समावेश केला जातो. राजकीय व्यवस्थेमधील धोरणे, कार्यक्रम, निर्णय यांच्या अंमलबजावणीची (पूर्ततेसाठी) प्रशासनात व्यवस्था केली जाते. प्रशासनाचा अभ्यास लोकप्रशासनात केला जातो. त्यामुळे राज्यशास्त्र आणि लोकप्रशासन या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. वस्तुतः लोकप्रशासन ही राज्यशास्त्राच्या अभ्यासाची एक शाखा मानली जाते. तसेच वित्तीय प्रशासनाचा अभ्यास समविष्ट असलेले अर्थशास्त्र याचाही लोकप्रशासनाशी संबंध असतो. राज्यशास्त्र आणि अर्थशास्त्र या दोन्ही सामाजिक शास्त्रांचा अंतर्भाव लोकप्रशासनात होतो. उदा. कौटिलीय अर्थशास्त्रात राज्यातील आर्थिक व्यवहारांचे केलेले विवेचन होय. यात अर्थशास्त्र या दोन्ही सामाजिक शास्त्रांचे अभ्यास विषय आढळतात. म्हणजेच लोकप्रशासनाच्या कक्षा राज्यशास्त्र व अर्थशास्त्र या सामाजिक शास्त्रामध्ये विस्तारलेल्या आहेत. तसेच प्रशासकीय कार्य, रचना, प्रशासनाचे स्वरुप भूतकाळात कसे होते. प्राचीन काळापासून आधुनिक काळापर्यंतच्या प्रशासकीय संघटना, तत्वे, कार्ये याविषयीची माहिती इतिहासातून मिळते. त्यामुळे लोकप्रशासनाचा इतिहासाशीही संबंध निर्माण झालेला दिसतो. लोकप्रशासनाचा अभ्यास करताना इतिहासातील विविध माहितीचा आणि ऐतिहासिक घटनांचा संदर्भ घ्यावा लागतो. त्यामुळेच लोकप्रशासनाचा अभ्यास करताना अर्थशास्त्र, राज्यशास्त्र व इतिहास या सामाजिक शास्त्रांची मदत घ्यावी लागते. ज्याप्रमाणे आधुनिक काळात लोकप्रशासनाच्या

कक्षांचा विस्तार झालेला दिसतो त्याप्रमाणे लोकप्रशासनाचे महत्वही आधुनिक काळात वाढलेले दिसते. प्राचीन काळातील राज्यसंस्थेचे स्वरुप मर्यादित होते. राज्यसंस्थेची कार्ये प्राथमिक स्वरुपाची म्हणजे शांतता व सुव्यवस्था, कायदा, न्यायदान करणे यासारखी होती. आर्थिकदृष्टया या काळातील खेडी स्वयंपूर्ण होती. राज्यसंस्थेचे खेडयांवरील नियंत्रण नगण्य होते. राज्यसत्ता अस्तित्वात आल्यानंतर प्रजेकडून जमीन महसूल, कर यांच्या वसुलीला सुरवात झाली. राजाला राज्याच्या संरक्षण यंत्रणेसाठी व शांतता सुव्यवस्था राखण्यासाठी द्रव्याची आवश्यकता भासत असे. त्यासाठी राजाला प्रजेवर विविध प्रकारचे कर लावावे लागलेले दिसतात. राज्यसत्ता जसजशी प्रबळ होत गेली तसतसे राज्यातील प्रजेवर राजसत्तेचे नियंत्रण वाढत गेले. या परिस्थितीत आधुनिक काळातील औदयोगिक क्रांतीनंतर बदल घडून आला. आधुनिक उदयोग मोठया प्रमाणावर उत्पादन करणारे आणि कमी किमतीत वस्तू बनविणारे असल्याने खेडयातील कारागिरांकडून चालविणारे जाणारे हस्तोउदयोग बंद पडू लागले. त्यानंतरच्या काळातील उदयोग, व्यापार, व्यवसाय, दळणवळणाची साधने यात प्रगती झाली. यामुळे सर्व खेडी, नगरे, समाज किंवा प्रजा यांच्यावर आधुनिक राष्ट्र राज्यांची सत्ता प्रभावी ठरत गेली. या सत्तेबरोबर लोकप्रशासनही प्रभावी व सर्वस्पर्शी झाले. शासन संस्था प्रगत बनत गेल्या. प्रशासकीय यंत्रणा कार्यक्षम, अद्ययावत बनविण्याचे प्रयत्न सर्वत्र होऊ लागले. त्यातून लोकप्रशासनाचे महत्व वाढत गेले. आधुनिक लोकप्रशासनाचे अभ्यासक व विचारवंत याबाबत संशोधन, विश्लेषण करुन नवनवीन पध्दती, नवीन तत्वे निष्कर्ष काढताना दिसतात. लोकप्रशासनामुळे लोककल्याण जनतेचे हित, संरक्षण, विकास या गोष्टींना विशेष महत्व दिलेले दिसते. त्यामुळे आधुनिक काळात लोकप्रशासनाचे महत्व वाढलेले दिसते. लोकप्रशासन व प्रशासनाच्या अभ्यासात काही तत्वांना विशेष स्थान आहे असे दिसते. प्राचीन भारतातील मौर्य, गुप्त नंतर अकबर, मराठेकालीन प्रशासन व्यवस्था, पेशवेकालीन प्रशासन व्यवस्थेमध्ये लोकप्रशासनाच्या तत्वांचा आढळ दिसून येतो. कौटिलीय अर्थशास्त्र या ग्रंथातही प्रशासनातील पदसोपन, विशेषीकरण, समन्वय या तत्वांचा आढळ दिसतो.

प्रशासनातील कार्यपध्दतीमध्ये आज्ञेची एकता आज्ञैक्य साधलेली असल्यास प्रशासकीय आज्ञा एकाच प्रमुखाकडून दिल्या जातात त्यामुळे कर्मचारी वर्गाला प्रशासनाचे कार्य आज्ञेप्रमाणे पूर्ण करता येते. आज्ञैक्य हे तत्व शिवकाळातही अस्तित्वात असल्याचे दिसते. या काळात आज्ञा शिवाजी महाराजांकडून निघत असत आणि त्यांच्या साथीदारांची

म्हणजेच मावळयांची त्यांच्यावर असलेली गाढ निष्ठा म्हणजेच आज्ञेची स्थिरता यामुळे प्रसंगी जिवावर उदार होऊनही शिवाजी महाराजांच्या आज्ञेचे पालन केले जात असे. आज्ञैक्य या तत्वामुळे प्रशासनात आज्ञेचा उगम एकाच ठिकाणाहून किंवा मुख्य पदाधिका-यांकडून होत असल्याने प्रशासनाच्या कामकाजात एकसंधता निर्माण होते. प्रशासनाच्या कार्यामध्ये प्रशासकीय कर्मचा-यांकडे विशेष कौशल्य, गुणवत्ता असल्यास तसेच त्यांच्याकडे निष्णातपणा असल्यास त्याचा प्रशासनाला निश्चितच फायदा होतो. प्रशासकीय कर्मचा-यांचे ज्ञान व कौशल्य यावर लोकप्रशासनातील विशेषीकरण आधारीत असते. त्यांच्या निष्णातपणामुळे प्रशासनातील कार्यक्षमता वाढते. प्रशासकीय अधिका-यांच्या अभ्यास व अनुभवांचा प्रशासनाला उपयोग होत असतो. प्रशासकीय व्यवस्थेत किंवा प्रशासनातील अधिकारी वर्गामध्ये वरिष्ठ-कनिष्ठ स्तर रचना अस्तित्वात असते. म्हणजेच पदसोपान हे तत्व प्रशासनात आढळते. वरिष्ठ-कनिष्ठ अशा प्रकारे प्रशासनात श्रेणीबध्द स्तर रचना केल्यामुळे कामाचे योग्य पध्दतीने वाटप होते. संबंधित कामाची जबाबदारी प्रत्येकाला स्विकारावी लागते. तसेच दोन्ही घटकांमध्ये संवाद साधणे पदसोपान तत्वामुळे शक्य होते. वरिष्ठ अधिकाऱ्याला आपल्या कनिष्ठांना तात्पुरत्या स्वरुपात आपल्याकडील सत्ता देता येते. प्राचीन भारतात अस्तित्वात असलेल्या राजासत्तांनी देखील पदसोपान या तत्वांचा वापर केलेला आढळतो. या राजसत्तांमध्ये वरिष्ठांबरोबर कनिष्ठांची नियुक्तीही राजाच करीत असे. त्यामुळेच प्रशासनातील सर्व कर्मचारी किंवा सेवक वर्गाला जबाबदारीची कायम जाणीव असे. राजा किंवा प्रमुख सत्ताधीशांनीच त्यांची नियुक्ती केलेली असल्याने त्या सेवकाला स्थानपरत्वे अधिकार मिळत असत. आजही प्रशासकीय कर्मचा-यांना अधिकार आणि जबाबदारी मिळते. तसेच शासनव्यवस्थेत पंतप्रधान, मुख्यमंत्री आपल्या जबाबदा-या पार पाडण्यासाठी मंत्रीमंडळाचे गठन करतात आणि मध्ययुगीन प्रशासन व्यवस्थेत राजा हाच प्रशासनाचा मुख्याधिकारी असल्याने तो आपल्या अधिकारात काही प्रमुख व्यक्तीकडे जबाबदारीचे वाटप करीत असे. यातूनच अकबराचा नवरत्न दरबार, शिवाजी महाराजांचे अष्टप्रधान मंडळ यांची निर्मिती झाली असावी. आधुनिक लोकप्रशासनाचा अभ्यास करताना या सर्व बाबींच्या संदर्भ विचारात घ्यावा लागतो.

आधुनिक युगात लोकप्रशासन समाजाचा एक अविभाज्य घटक बनला आहे लोकप्रशासनाच्या मदतीशिवाय कोणतेही कार्य करणे अशक्य आहे. लोकप्रशासनाचा संबंध मानवाच्या विकासाच्या विविध अंगाशी आहे. लोककल्याणाची संकल्पना स्वीकारल्यामुळे

मानवाच्या स्वास्थ्याची, शिक्षणाची, खेळाची, करमणूकीची, संरक्षणाची जबाबदारी राज्यावर येऊन पडली आहे. राज्याने स्वीकारलेल्या विविध कार्यांमुळे आजचे राज्य हे “प्रशासकीय राज्य” बनले आहे.

लोककल्याणासाठी धडपडणाऱ्या लोकांसाठी विविध मार्गांनी प्रशासन हातभार लावीत असते. लोकप्रशासन या अभ्यास विषयाची निर्मीती राज्यशास्त्रामधून झाली आहे. राजकीय धोरणाप्रमाणे प्रशासनिक धोरणे आखणे आणि त्यांचा विस्तार करणे. हे कार्य प्रशासक वर्गाकडून केले जाते म्हणजेच राजकीय पक्ष आणि निर्वाचित प्रतिनिधी हे राजकीय धोरणे आखतात. एकोणीसाव्या शतकाच्या अखेरीस प्रो. वुड्रो विल्सन यांनी राजकारण आणि लोकप्रशासन विभक्तीकरणाचा विचार मांडला. प्रशासनामध्ये लोकप्रतिनिधी व राजकीय प्रमुखाने हस्तक्षेप करु नये अशी विचारसरणी त्यांनी मांडली. प्रत्यक्षात राजकारणापासून लोकप्रशासनाच्या विभक्तीकरणाचे प्रतिबिंब लोकप्रशासनाच्या व्याख्यांमधून दिसून येते. अनेक लेखकांनी केलेल्या व्याख्यांमध्ये लोकप्रशासनाचे राजकारणापासून वेगळे अस्तित्व पटवून देण्यात आले आहे. काही राज्यशास्त्रज्ञांनी शासनाच्या धोरणांची व निर्णयाचीं आखणी व कार्यवाही लोकप्रशासन करते यावरच भर दिला आहे. एनसायक्लोपीडिआ ब्रिटानिकामध्ये “लोकप्रशासन ही राज्याच्या धोरणांची शासनाच्या द्वारा केलेली प्रयुक्ती होय.”[७६] असा उल्लेख आढळतो तर इंटरनॅशनल एनसायक्लोपीडिआ ऑफ सोशल सायन्सेसमध्येही “लोकप्रशासनाच्या प्रक्रियेमध्ये शासनाचा उद्देश अगर इच्छा प्रत्यक्षात आणण्यासाठी केलेल्या सर्व कृतींचा समावेश होतो.” [७७] असे स्पष्ट केले आहे.

या दोन्ही व्याख्यांमध्ये शासनाने धोरणे ठरविल्यानंतर त्यांची कार्यवाही लोकप्रशासन करते. त्यासाठी ज्या कृती कराव्या लागतात त्यांचा समावेश लोकप्रशासनाच्या अभ्यासात होतो हे स्पष्ट करण्यात आले आहे. या व्याख्यांमध्ये लोकप्रशासनाचे राजकारणापासून वेगळे अस्तित्व दर्शविले आहे.

डब्ल्यु.एफ.विलुबी यांच्या मते, राज्यशास्त्रामध्ये “प्रशासन” ही संज्ञा दोन अर्थानी उपयोजिली जाते. सर्वात व्यापक अर्थानुसार “शासनाच्या विशिष्ट शाखेचा विचार न करता

७६. एन्सायक्लोपीडिआ ब्रिटानिका, यू. के.,१९६७.
७७. इंटरनॅशनल एन्सायक्लोपीडिआ ऑफ सोशल सायन्सेस, यू. एस. ए., १९६८.

प्रत्यक्ष शासकीय कारभारामध्ये अंर्तभूत असलेल्या कार्यांचा विचार प्रशासनात केला जातो. संकुचित अर्थाने प्रशासनात केवळ प्रशासकीय शाखेच्या कार्यांचा आणि कृतीचा विचार केला जातो." यांनी प्रत्यक्ष शासकीय कारभार म्हणजेच शासनसंस्थेच्या तीनही शाखांना महत्वाचे स्थान दिले आहे.

एफ.ए.निग्रो यांनी, "लोकप्रशासनामध्ये कार्यकारीणी, विधिमंडळ आणि न्यायपालिका या शासनसंस्थेच्या तिन्ही शाखांच्या अन्योन्य संबंधांचा समावेश होतो."असे स्पष्ट केले आहे. तर ल्युथर ग्युलिक यांच्या मते, "लोकप्रशासनाचा संबंध शासनसंस्थेच्या कार्यकारी विभागाशी येत असतो. कारण कार्यकारी विभागाद्वारे शासनाचे संपूर्ण कार्य चालते म्हणून लोकप्रशासनात कार्यकारी विभागाचाच विचार केला जातो." तसेच हरबर्ट सायमन यांच्या मते, "राष्ट्र, राज्य आणि स्थानिक संस्थांच्या प्रशासकीय विभागाच्या कार्याला लोकप्रशासन असे म्हणतात." (By Public administration is meant, in common usage, the activities of the executive branches of national, State and local governments")[७८] आणि एफ.एम. मार्क्स यांनी "लोकप्रशासनाचा संबंध शासनाच्या कार्यकारी शाखेशी येत असतो. संघटन, सेवक प्रशासन, कार्यपध्दती आणि प्रत्यक्ष कृती याद्वारे कार्यकारी शाखा नागरी स्वरुपाची कार्ये पार पाडीत असते, यालाच लोकप्रशासन असे संबोधता येईल."असे म्हटले आहे.

लोकप्रशासकीय विचारवंत वाल्डो यांच्या मते, "लोकप्रशासन ही एक अशी कला आणि व्यवस्थापनाचे शास्त्र आहे की ज्याद्वारे राज्याची कार्ये पार पाडली जातात." प्रो. वुड्रो विल्सन यांनी देखिल "कायदयाची सविस्तर आणि व्यवस्थित अमंलबजावणी म्हणजे लोकप्रशासन." ("Public Aministration is detariled and systematic application of law. Every particular application of law is an act of administration")[७९] अशी लोकप्रशासनाची व्याख्या स्पष्ट केली आहे. ग्लॅडन यांनी "सरकारची कार्ये लोकप्रशासनाशी संबंधित असतात." असे म्हटले आहे. पिफनर यांनी "सरकारच्या निर्धारित कार्यांना, सहकार्याने समन्वय साधून पूर्ण करुन घेण्याच्या कार्याला लोकप्रशासन" म्हटले आहे. एल्. डी. व्हाईट यांच्या मते "सार्वजनिक

---

७८. Public Administration:Herbert Simon, p 10.

७९. The Study of Aministration Science: Wilson, Political Quarterly, 1941. P 481-566.

धोरणाच्या उद्‌दिष्टांच्या पूर्ततेसाठी जी यंत्रणा वापरण्यात येते, तिला लोकप्रशासन असे म्हणतात." (Public administration "consists of all those operations having for their purpose the fulfillment or enforcement of public policy as declared by competent authority.") [८०]

लोकप्रशासन शास्त्राच्या विविध व्याख्यांचा आशय विचारात घेता असे दिसून येते की, लोकप्रशासनाच्या व्याख्या व्यापक आणि मर्यादित अशा दोन दृष्टिकोनातून केलेल्या आहेत. व्यापक अर्थाने लोकप्रशासनाकडे पाहिले तर सार्वजनिक हिताच्या दृष्टीने शासनाला करावी लागणारी सर्व प्रकारची कार्ये विचारात घ्यावी लागतात. राजकीय, आर्थिक, सामाजिक, प्रशासकीय अशा स्वरुपाची जी विविध कार्ये राज्यशासनाला करावी लागतात, त्या सर्व कार्यांचा समावेश लोकप्रशासनात केला जातो.

प्रशासनात होणारे संपूर्ण कार्य, शारीरिक, कारकुनी, व्यवस्थापकीय, तांत्रिक इ. एका विशिष्ट हेतूने करण्यात येते, त्याचा संबंध लोकप्रशासनाशी असतो. शासनाच्या तिन्ही शाखांकडून (कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ व न्याय मंडळ) जी कृती आणि कार्ये केली जातात त्यांचा समावेश लोकप्रशासनात केला जातो. प्रो. एल. डी. व्हाईट, वुड्रो विल्सन, पिफनर इ. विचारवंतांनी लोकप्रशासनाची व्याख्या व्यापक दृष्टिकोनातून केलेली आहे.

लोकप्रशासनाची व्याख्या मर्यादित दृष्टीकोनातून करताना काही विचारवंत कार्यकारी मंडळ व प्रशासकीय यंत्रणा यामध्ये फरक करतात. प्रशासकीय आणि व्यवस्थापकीय दृष्टीकोन स्विकारणाऱ्या विचारवंतानी कार्यकारी मंडळाच्या कार्याचा लोकप्रशासनात समावेश केलेला नाही. कार्यकारी मंडळ ही राजकीय स्वरुपाची शाखा आहे. कार्यकारी प्रमुख हे कायमस्वरुपी नसतात. प्रशासकीय सेवक वर्ग हा कायमस्वरुपी असते. कार्यकारी मंडळातील कार्यकारी प्रमुख बदलत असतात त्यामुळे त्यांच्या ध्येयधोरणात सातत्य रहात नाही. प्रशासकीय यंत्रणा कायमस्वरुपी असते. या यंत्रणेचा, कार्यपध्दतीचा अभ्यास करताना त्यामध्ये कार्यकारी मंडळाच्या कार्याचा समावेश करु नये असे काही विचारवंतांचे मत होते.

प्रो. विलोबी यांनी तर प्रशासन ही शासनसंस्थेची चौथी शाखा आहे असे म्हटले आहे. शासनाच्या तिन्ही शाखांचा विचार न करता फक्त कार्यकारी विभागाचाच विचार यात केला जातो. कायदे मंडळ व न्याय मंडळ यांना सोडून केवळ कार्यकारी विभागाकडून होणाऱ्या कार्यांचाच विचार लोकप्रशासनात केला जातो.

८०. Introduction to the study of Public Administration: L.D. White' Mcmilan company, New York, 1938, P 12.

ल्युथर ग्युलिक, डब्ल्यु. एफ. विलुबी, सायमन इ. विचारवंतांनी लोकप्रशासनाची व्याख्या मर्यादित अर्थाने केलेली आहे. वास्तविक शासनाकडून जी कार्ये केली जातात त्यांचा संबंध शासनाच्या तिन्ही शाखांशी येत असतो. कोणतेही शासकीय कार्य करताना प्रथम निर्णय घ्यावे लागतात, नियोजन करावे लागते, धोरण निश्चिती, कायदे निर्मिती करावी लागते. प्रत्यक्षात अमंलबजावणी करताना विविध गोष्टींची, कृतीची आवश्यकता भासते. प्रदत्त कायदे, प्रशासकीय कायदे, प्रशासकीय न्याय यांची गरज भासते. अशा प्रकारे शासनाच्या तिन्ही अंगांना स्पर्श करुनच प्रत्येक सार्वजनिक कार्य होत असते. त्यामुळे तिन्ही शाखांच्या कार्याचा समावेश लोकप्रशासनात करणे भाग पडते. परंतु लोकप्रशासनात केवळ प्रशासकीय बाबींचा विचार करणे क्रमप्राप्त व संयुक्तिक ठरते. कारण कायदे मंडळ, कार्यकारी मंडळ व न्याय मंडळ यांचा अभ्यास राज्यशास्त्रात केला जातो. कार्यकारी मंडळाचे प्रमुख कार्य अंमलबजावणी करणे हे असते. त्यामुळे राज्याच्या प्रशासनाशी त्याचा नेहमी संबंध येत असतो. कार्यकारी मंडळ प्रशासनावर नियंत्रण व देखरेख ठेवते. प्रशासनाकडून विविध कायद्यांची, ध्येयधोरणांची अंमलबजावणी करवून घेण्याची जबाबदारी कार्यकारी मंडळावर असते. त्यामुळे कार्यकारी मंडळाच्या कार्याचा समावेश लोकप्रशासनात केला जातो.

सार्वजनिक हित साधण्यासाठी प्रशासकीय वर्ग जे कार्य करतात त्याला लोकप्रशासन असे म्हणतात. प्रशासकीय कार्यात कामाचे नियोजन करणे, आवश्यक संघटना निर्माण करणे आणि कार्याचे समन्वय करुन निर्धारित उद्दिष्टांची पूर्तता करणे यासारख्या कार्यांचा समावेश असतो. प्रस्थापित परिस्थितीत उपलब्ध मनुष्यबळ आणि साहित्याचा योग्य प्रकारे उपयोग करुन व्यवस्थापकीय कौशल्याने उद्दिष्टांची पूर्तता करुन घेणे म्हणजे लोकप्रशासनाचे स्वरुप होय.

विसाव्या शतकातील आधुनिक विचारवंतांनी लोकप्रशासनशास्त्र हे एक स्वतंत्र सामाजिक शास्त्र मानून त्याचा शास्त्रीय, वास्तववादी दृष्टीकोनातून अभ्यास सुरु केलेला आहें. प्रशासकीय व्यवस्थापन हा एक स्वतंत्र विषय म्हणून त्याचा अभ्यास केला जात आहे. एकंदरीत लोकप्रशासनाच्या अर्थासंबंधी स्थूलमानाने पुढील निष्कर्ष काढणे योग्य ठरेल. जेव्हा शासनसंस्था आपल्या सार्वजनिक धोरणाची पूर्तता आणि कार्यवाही करते तेव्हा त्या क्रिया प्रक्रिया घडून येतात त्यांना लोकप्रशासन असे म्हणता येईल. सार्वजनिक हिताच्या दृष्टीने धोरणांची निर्मिती आणि अंमलबजावणी करण्यासाठी सरकारला जी कार्ये पार पाडावी लागतात त्यांचा समावेश लोकप्रशासनात केला जातो.

लोकांच्या हितासाठी शासनातर्फे ज्यावेळी कार्ये करण्यात येतात त्यावेळी त्या कार्यांना लोकप्रशासन असे संबोधले जाते. लोकप्रशासनाचा मुख्य हेतू जनकल्याण असतो आणि त्यासाठी लोकप्रशासन कार्य करीत असते. संघटन, व्यवस्थापन, कार्यपध्दती याद्वारे शासनसंस्था आपल्या धोरणांची पूर्तता आणि कार्यवाही करते तेव्हा त्यास लोकप्रशासन असे म्हणतात. शासनसंस्थेच्या कृतीना आणि कार्यपध्दतींना लोकप्रशासन असे संबांधले जाते.

आधुनिक काळात लोकप्रशासनाची व्याप्ती व्यापक बनलेली दिसते. विसाव्या शतकापर्यंत, लोकप्रशासनाची व्याप्ती प्रामुख्याने दोन घटकांवर अवलंबून होतीः देशांच्या अर्थव्यवस्थांचा प्रादेशिक विस्तार व सघनता आणि राज्यसंस्थेचा विस्तार व शक्तीची कक्षा. मानवी संस्कृती शिकारी, वनचराऊ, शेती व औद्योगिक या चार अवस्थांमधून उत्क्रांत झाली. शेतीच्या अवस्थेला प्रारंभ झाल्यानंतर मानवी कुटुंबे एका जागी स्थिरावली, त्यामुळे त्यांच्यामध्ये आंतरसंबंध व देवघेव वाढली आणि त्यांच्या भौतिक व सांस्कृतिक गरजा वाढल्या. सर्वसाधारणरीत्या असे म्हणता येईल की, शेती युगामध्येच राजेशाही अस्तित्वात आली व विकसित झाली. काही देशांमधून निरंकुश राजेशाहीचे रुपांतर साम्राज्यांमधून झाले. चीन, ईजिप्त, भारत, मॅसिडोनिया, रोम या भागांमध्ये सम्राट व साम्राज्ये उदयास आली. देशांतर्गत व देशाबाहेरील व्यापार विस्तारला. प्रथमतः राजेशाहीच्या व नंतर साम्राज्याच्या रक्षणासाठी व शक्य झाल्यास विस्तारासाठी लोकप्रशासनाचा विस्तार झाला व काही ठिकाणी त्याच्या कार्याची सधनताही वाढली. भारतामधील गुप्तसाम्राज्य, रोमन साम्राज्य, इंग्लंडमधील टयूडर साम्राज्य ही साम्राज्याची काही उदाहरणे होती. राजा वा सम्राटाच्या प्रासाद प्रशासनाचाही तत्कालीन लोकप्रशासनात समावेश करावयास हवा. सैन्यांची वाढ तसेच आंतरराष्ट्रीय व्यापारी मंडळांच्यावर नियमन व नियंत्रण यामुळेही लोकप्रशासनाच्या कक्षा विस्तारल्या. याच काळामध्ये न्याय, गृहसंरक्षणे वगैरे मूलभूत खात्यांची स्थापना झाली.

औद्योगिक क्रांतीनंतर उद्योगधंद्यांचा विस्तार, त्याचे परिसर स्वच्छता व कामगार कल्याण इत्यादी दृष्टींनी त्यांचे नियमन झाले. स्थानिक प्रशासने, शिक्षण व आरोग्य या सार्वजनिक क्षेत्रांमधील सेवांची स्थापना, या दिशांनी लोकप्रशासनाचा विकास झाला. औद्योगिक क्रांतीबरोबरच शहरे व नगरे वाढीस लागली. शहरीकरणाचा वेग नियंत्रित करणे, अठराव्या व एकोणिसाव्या शतकांमध्ये आर्थिक विशेषतः औद्योगिक विकासाच्या इष्टतेमुळे व अपरिहार्यतमुळे शक्य नव्हते. पण शहरीकरणाने लोकांच्या जीवनाच्या गुणवत्तेवर

प्रतिकूल परिणाम होऊ नये यासाठी लोकप्रशासनाला अधिक सकारात्मक भूमिका घेणे क्रमप्राप्त झाले.

औद्योगिक क्रांतीनंतर पाश्चात्य साम्राज्यशाहया, पूर्वीच्या साम्राज्यांप्रमाणे केवळ प्रादेशिक विस्तारासाठी व सत्ता वृद्धिंगत करण्यासाठी अस्तित्वात आलेल्या नव्हत्या. साम्राज्यातील वसाहतींमधून कच्चा माल आयात करावा व यंत्राधिष्ठित उद्योगांमधील उत्पादित पक्का माल निर्यात करावा, हा मुख्य उद्देश या आधुनिक पाश्चात्य साम्राज्यशाहयांचा होता, त्याचबरोबर बँकिंग, विमा, नौकानयन इत्यादी क्षेत्रांमधील सेवा त्यांनी या वसाहतींमधून स्थापन केल्या. त्यांमधून युरोपीय सेवक व अधिकाऱ्यांना नोकऱ्या तर मिळाल्याच पण शिवाय नफ्याच्या रुपाने संपत्तीचा ओघ पश्चिमेकडे सुरु झाला. लोकप्रशासनाच्या विस्ताराच्या दृष्टीने महत्वाची घटना म्हणजे युरोपीय सनदी सेवक, तज्ञ व अन्य नोकरांना सेवेची संधी या वसाहतींमधून प्राप्त झाली. आधुनिक प्रशासनाशी वासाहतिक जनतेचा संपर्क आला ही जमेची बाजू असली, तरी एतद्देशीय उद्योगधंदे, व्यापारी, कारागिरी, सैन्य यांमधील लाखो लोक बेकार झाले ही वजेची बाजूही लक्षात घ्यावयास हवी. वसाहतीतील लोकसेवांमध्ये काही तुरळक देशीय सुशिक्षितांना नोकऱ्या मिळाल्या, पण एकूण तोटयाच्या तुलनेत हा लाभ अत्यल्प होता.[८१]

आधुनिक काळामध्ये लोकांची लोकप्रशासनाविषयीची जाणीव व त्यांच्या प्रशासनापासूनच्या अपेक्षा उंचावल्या आहेत. समाजाच्या व राज्याच्या लोकशाहीकरणाचा हा परिणाम होय. लोकशाही राज्यव्यवस्थेच्या छत्राखाली लोकप्रशासन तिचे महत्वाचे, लोकांपर्यत पोहोचणारे व राज्यव्यवस्थेचा लाभ लोकांना देणारे, अंग म्हणून कार्य करते, लोकशाहीकरणाचा प्रभाव लोकप्रशासनावरही पडतो व ते लोकशाहीप्रवण होते. लोकशाहीप्रवण लोकप्रशासनामुळे समाजाच्या लोकशाहीकरणाची प्रक्रिया स्थिर राहण्यास मदत होते.

दुसऱ्या महायुध्दानंतर संचरणाची क्रांती झाली आहे. वर्तमानपत्रे, रेडिओ, दूरदर्शन, बिनतारी संदेशवाहक, दूरध्वनि, उपग्रहमाध्यम, इ. संचरणाच्या द्रुतगती माध्यमांमुळे देशातले वेगवेगळे भाग एकत्रित होण्यास मदत झाली आहे. त्यामुळे प्रादेशिक दृढता, भावनिक संघटन व लोकप्रशासनाचे प्रमाणीकरण झाले आहे. संचरण माध्यमांचा उपयोग शासन व

---

८१. लोकप्रशासनः डॉ. एन्. आर. इनामदार, डॉ. सुनीता काळे, दास्ताने प्रकाशन.,पुणे,१९९७, प्रथमावृत्ती, पा. ५४.

प्रशासन लोकांना प्रशासनाच्या कार्यक्रमांची व निर्णयांची, प्रशासनाच्या धोरणाविषयी, प्रशासनाच्या कृतीविषयी माहिती देण्यासाठी व अप्रत्यक्षरीत्या प्रचार करण्यासाठी करु शकते.

एकोणीसाव्या शतकापर्यंत सर्वसाधारणरीत्या लोकप्रशासनाची कार्ये कायदा व सुव्यवस्था राखणे, न्यायदान, देशाचे संरक्षण यासाठी आवश्यक असणारी करयोजना करणे, यापुरती मर्यादित होती. एकोणिसाव्या शतकापासून शिक्षण, आरोग्य, औद्योगिक विकास, पाणी, वीज व गॅस यांचा पुरवठा, गरीब लोकांना आश्रय इ. लोककल्याणाची व आर्थिक विकासाची कार्ये, लोकप्रशासनाने अंगिकारिली. लोकप्रशासनाने नवीन उद्योगांना एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीपासून आर्थिक सहाय्य, आयात निर्यातीचे कर, वित्तीय सूट, आयात-निर्यातीच्या आकाराचे नियमन इ. मार्गांनी प्रोत्साहन देण्यास प्रारंभ केला. विसाव्या शतकात प्रगत देशांनी आपली प्रगती स्थिर रहावी म्हणून आपापल्या साम्राज्यांमध्ये याच मार्गाचा अवलंब करावयास सुरुवात केली. पहिल्या व दुसऱ्या महायुध्दामुळे, प्रशासनाच्या कार्याचा शस्त्रात्रे व अन्य युध्दसामग्रीचे उत्पादन, आवश्यक वस्तूंचे व त्यांच्या किंमतींचे नियंत्रण, शास्त्रीय व तांत्रिक संशोधनाला आर्थिक सहाय्य व त्यामध्ये सक्रिय सहभाग इ. क्षेत्रांमध्ये विस्तार झाला.

आधुनिक काळात लोकप्रशासनशास्त्राची व्याप्ती व्यापक स्वरुपाची बनलेली आहे. कारण आधुनिक समाज गुंतागुंतीचा व व्यापक स्वरुपाचा बनलेला असल्यामुळे राज्याचे कार्यक्षेत्र वाढलेले आहे. सामाजिक, राजकीय, आर्थिक अशा विविध स्वरुपाची कार्ये शासनसंस्थेला करावी लागत आहेत. शासनसंस्थेच्या तिन्ही विभागाची कार्ये लोकप्रशासनात समाविष्ठ केली जातात. कायदे निर्मिती, त्यांची अमंलबजावणी आणि न्यायदान या कार्यक्षेत्रांचा अभ्यास लोकप्रशासनात केला जातो. लोकप्रशासनाचे क्षेत्र व्यापक बनलेले असले तरी लोकप्रशासनाचा हा व्यापक दृष्टिकोन अभ्यासाच्या दृष्टीने उपयुक्त ठरणार नाही. व्यापक दृष्टिकोनातून लोकप्रशासनाचा अभ्यास करणे कठीण असल्यामुळे काही विचारवंतानी लोकप्रशासनाची व्याप्ती संकुचित केलेली आहे. लोकप्रशासनाच्या अभ्यासाला मर्यादा आणल्या आहेत. त्यांनी कायदेमंडळ, न्यायमंडळ या शाखांना वगळून केवळ कार्यकारी मंडळाच्या अभ्यासालाच महत्व दिले आहे. शासनसंस्थेचा कार्यकारी विभाग आणि प्रशासकीय व्यवस्थापन यांचा अभ्यास लोकप्रशासनात केला जातो.

अर्थात ल्युथर ग्युलिकच्या मते, प्रशासनातील सर्व कार्ये आणि क्रिया पोस्डकॉर्ब या शब्दाद्वारे स्पष्ट होतात. सामान्यतः पोस्डकॉर्बमधील तत्वे आणि प्रक्रिया अनेक आस्थापनात आढळून येतात. राष्ट्रीय, प्रांतीय व स्थानीय पातळीवरील अशा सर्व प्रशासनात पोस्डकॉर्ब दृष्टिकोन आढळतो. [८२]

प्रो. वॉलकर यांनी लोकप्रशासनाची व्याप्ती अधिक व्यापक दृष्टिकोनातून स्पष्ट केलेली आहे. त्यांनी लोकप्रशासनाच्या अभ्यासाचे दोन विभाग पाडलेले आहेत. यातील पहिल्या विभागात प्रशासकीय सिध्दांतातील विषयांचा अभ्यास समाविष्ट केला आहे. यात राष्ट्रीय, प्रांतीय, स्थानीय अशा सर्व प्रकारच्या सार्वजनिक प्रशासनासंबंधीच्या संघटना, रचना, कार्यपध्दती इत्यादींचा अभ्यास केला जातो. तसेच पार्लमेंट, मंत्रीमंडळ यांचे प्रशासनावरील नियंत्रण, अंतर्गत प्रशासकीय यंत्रणेतील नियंत्रण, प्रशासनावरील न्यायसंस्थेचे नियंत्रण, प्रशासकीय न्यायालये इत्यादीविषयक अभ्यास. याशिवाय प्रशासनातील नियोजन, कार्यक्रम, अमंलबजावणी, कर्मचारी वर्गाची भरती, प्रशिक्षण इत्यादी संबंधीचा अभ्यास आणि प्रशासकीय संशोधन, माहितीचे संकलन, जनसंपर्क इत्यादी विषयक अभ्यास लोकप्रशासनात केला जातो.

लोकप्रशासनात केवळ सिध्दांत, तत्वे यांचा स्विकार करून चालत नाही, तर ती तत्वे प्रत्यक्षात कशाप्रकारे स्विकारली जातात, याचा अभ्यास केला जातो. व्यवहारवादी प्रशासनात काही प्रशासकीय कार्यांचा समावेश होतो. राजकीय (कार्यकारी विभाग व कायदे मंडळ यातील संबंध, मंत्रिमंडळाची राजकीय -प्रशासकीय स्वरुपाची कार्ये, मंत्री, व सनदी सेवक यांतील संबंध), कायदेविषयक (प्रदत्त कायदे, विधेयकाची निर्मिती आणि अंमलबजावणी याविषयीचे प्रशासकीय अधिकाऱ्याचे कार्य इत्यादी.), आर्थिक (अंदाजपत्रक निर्मिती, मंजुरी, अंमलबजावणी, आर्थिक नियंत्रण इ.) संरक्षणविषयक (संरक्षणविषयक प्रशासन), शैक्षणिक प्रशासन(शिक्षण खाते, शिक्षणविषयक प्रशासन.), सामाजिक क्षेत्रातील सर्व प्रकारचे प्रशासन (उदा. घरबांधणी, सामाजिक सुरक्षितता, अन्न पुरवठा, उद्योग-विनिमय केंद्र इत्यादी.),आर्थिक क्षेत्रातील प्रशासकीय कार्ये (शेती, उद्योग क्षेत्र, सार्वजनिक उद्योगधंदे इ. क्षेत्रातील प्रशासकीय कार्ये.), परराष्ट्रीय संबंध (आंतरराष्ट्रीय संस्था, संघटना यातील प्रशासन, परराष्ट्राशी होणारा व्यापार, आंतरराष्ट्रीय शांतता, सहकार्य आणि विकास,

---

८२. लोकप्रशासनः डॉ. अर्जुनराव दर्शनकार, कैलाश पब्लीकेशन्स, औरंगाबाद, १९८५, प्रथमावृत्ती, पा. ६४.

राजनय, साम्राज्यवादी धोरण, वर्चस्व यांसंबंधीचे प्रश्न, स्थानिक स्वराज्य संस्थांतील प्रशासन यांचा अभ्यास लोकप्रशासनात केला जातो.

ज्या परिस्थितीत प्रशासनाचे कार्य चालते ती परिस्थिती, तसेच त्या प्रशासनातील मानवी वर्तन यांचा अभ्यास लोकप्रशासनात केला जातो. विविध देशातील प्रशासकीय पध्दतींचा तुलनात्मक अभ्यास, प्रशासनाचा विकास, प्रशासकीय पध्दती, प्रशासकीय कौशल्य, प्रशासकीय नैतिकता इत्यादींविषयक अभ्यास व्यवहारवादी प्रशासनात केला जातो. लोकप्रशासनाच्या व्याप्तीसंबंधी कोणत्याही एका विचारवंताचा दृष्टिकोन परिपूर्ण वाटत नाही. कारण लोकप्रशासनशास्त्र हे गतिशील व विकासवादी शास्त्र आहे. औद्योगिकीकरण, नागरिकीकरण, वाढती लोकसंख्या, राज्याचे वाढते कार्यक्षेत्र, आंतरराष्ट्रीय संघर्ष, तणाव आणि सहकार्य, सामाजिक परिवर्तन, राजकीय बदल, कल्याणकारी राज्याची कल्पना व त्यांची प्रत्यक्ष वाटचाल, प्रगत राष्ट्रे आणि अप्रगत राष्ट्रे यांतील प्रशासन अशा विविध गोष्टींमुळे लोकप्रशासनशास्त्राचा अभ्यास अधिक व्यापक बनलेला आहे. आधुनिक काळातील राज्याची प्रशासकीय कार्ये पाहिली असता लोकप्रशासनाची व्याप्ती निश्चित व मर्यादित करणे कठीण झाले आहे. पण प्रशासनशास्त्राच्या अभ्यासाच्या दृष्टीने लोकप्रशासनाची व्याप्ती स्पष्ट करणे आवश्यक व गरजेचे ठरते. (The differences of opinion centre round the crucial points whether public administration is only the managerial part of the government work, or the entire complex of activities of only the executive branch of government.)

लोकप्रशासन हे एक शास्त्र असून त्याच्या कक्षा विस्तारल्या आहेत. लोकप्रशासनाचा सामाजिक शास्त्रांशी असणारा संबंध अनेकविध असा आहे. लोकप्रशासन हे इतर सामाजिक शास्त्रांप्रमाणेच एक सामाजिक शास्त्र आहे. लोकप्रशासनात प्रशासकीय क्रिया-प्रक्रियांचा तसेच प्रशासकीय वर्तनाचा अभ्यास केला जातो. अर्थात लोकप्रशासनाचा अभ्यास करताना त्याचा इतर शास्त्रांशी असणारा संबंध विचारात घ्यावा लागतो. कारण मानवाच्या प्रशासकीय क्रिया-प्रक्रियांवर राजकीय, सामाजिक, आर्थिक, नैतिक अशा विविध गोष्टींचा प्रभाव पडत असतो. त्यातून लोकप्रशासनशास्त्राचे स्वरूप जाणून घेता येते. राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, इतिहास इ. सामाजिक शास्त्रांशी लोकप्रशासनाचा संबंध येत असतो.

लोकप्रशासन ही राज्यशास्त्राच्या अभ्यासाची एक शाखा मानली जाते. लोकप्रशासनशास्त्र राज्यशास्त्रामधूनच विकसित झाले आहे. पिफनर यांच्या मते, राज्यशास्त्र

आणि लोकप्रशासन याचा परस्पर संबंध अधिक जवळचा असल्यामुळे त्यांच्यात स्पष्टपणे फरक दाखविणे अशक्य आहे.

राज्यशास्त्रात राज्य आणि शासनपध्दती याचा अभ्यास केला जातो. राज्याचा उदय, विकास, विविध शासनपध्दती इत्यादीविषयक अभ्यास राज्यशास्त्रात केला जातो. सरकार हे राज्याचे एक महत्वाचे अंग असून सरकारच्या प्रशासकीय विभागांचा, त्यांच्या रचनेचा आणि कार्याचा अभ्यास लोकप्रशासनात केला जातो. सरकारकडून जी ध्येयधोरणे ठरविली जातात, जे कायदे पास केले जातात त्यांची कार्यवाही प्रशासकीय विभागाकडून होते. सामान्यतः राज्यशास्त्रात राजकीय सिध्दांत, राजकीय तत्वे, शासनपध्दती याचा समावेश होतो तर लोकप्रशासनात प्रशासकीय संघटना, प्रशासकीय तत्वे व प्रत्यक्ष कार्यपध्दती यांचा समावेश केला जातो. कायदेमंडळातील सदस्य तसेच मंत्री यांना शासकीय ध्येयधोरणे ठरविण्याच्या कार्यात प्रशासकीय अधिकाऱ्यांची मदत घ्यावी लागते. तसेच सरकारकडून संमत होणारी विधेयके, अंदाजपत्रक यांची अमंलबजावणी प्रशासकीय सेवक वर्गाकडून होते.

राज्यशास्त्राचा संबंध राजकीय व्यवस्थेच्या आदानांशी असतो तर लोकप्रशासनाचा तिच्या प्रदानांशी असतो. राजकीय व्यवस्थेमध्ये राजकीय धोरणे व कार्यक्रम, राजकीय पक्ष व दबाव गट यांच्या माध्यमातून आणली जातात आणि मग राजकीय व्यवस्था त्या आदानांचे परिवर्तन शासनाची व लोकप्रशासनाची धोरणे व निर्णय यांच्यामध्ये करते. त्यानंतर या शासकीय आणि प्रशासनिक धोरणाची व निर्णयांची कार्यवाही लोकप्रशासन आपल्या यंत्रणेद्वारे करते. म्हणजेच लोकप्रशासनाचा ही शासनाची धोरणे ठरविण्यामध्ये सहभाग असतो. इतकेच नव्हे तर राजकीय पक्ष व दबाव गट आपली धोरणे ठरविण्यापूर्वी लोकप्रशासनाने तयार केलेल्या सांख्यिकी व अन्य माहितीचा, अहवालांचा, उपयोग करतात. थोडक्यात राज्यशास्त्र आणि लोकप्रशासन यांचा संबंध अधिक निकटचा असलेला दिसतो.

वित्तीय प्रशासनाचा अभ्यास समाविष्ठ असलेले अर्थशास्त्र याचाही लोकप्रशासनाशी संबंध असतो. राज्यशास्त्र लोकप्रशासनाचे जनक मानले तर अर्थशास्त्र हे सहोदर आहे असे मानता येईल. लोकप्रशासनशास्त्राचा एक मोठा भाग आर्थिक आशयाचा असतो. आर्थिक प्रशासन आणि वित्तीय प्रशासन हे विषय या भागात मुख्यतः मोडतात. औद्योगिक क्रांतीनंतर शासनाला औद्योगिक व आर्थिक क्षेत्रात हस्तक्षेप करणे भाग पडले. आर्थिक नियंत्रण हे शासनाचे एक महत्वाचे कार्य मानले जाऊ लागले. आधुनिक काळातील सर्वच राज्ये लोककल्याणाची कार्ये करताना दिसतात. लोककल्याणासाठी, समाजविकासासाठी

शासनाला जी कार्ये करावी लागतात ती सर्व आर्थिक स्वरूपाची असतात. भांडवलशाही, साम्यवादी, समाजवादी अशा सर्वच समाजव्यवस्थांमध्ये शासनाला आर्थिक स्वरूपाची कार्ये करावी लागतात. अंदाजपत्रक निर्मिती, अंदाजपत्रकाची अंमलबजावणी, आर्थिक नियंत्रण, व्यापार, वाणिज्य, आयात-निर्यात, हिशेब व्यवस्था, हिशेब तपासणी, विकास योजना इत्यादी स्वरूपाची आर्थिक कार्ये शासनाला पार पाडावी लागतात. आधुनिक काळातील प्रत्येक देशात शासनाला आर्थिक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. देशातील आर्थिक समस्या सोडविण्यासाठी विविध उपाययोजना कराव्या लागतात.

राज्याची व प्रशासनाची क्षमता आणि ताकद त्यांच्या आर्थिक बळावर काही अंशी अवलंबून असते. भारतीय लोकशाही आता परिपक्व झालेली आहे, पण अजूनही प्रचंड लोकसंख्येच्या ओझ्यामुळे आर्थिक दृष्टया तिची प्रगती लक्षणीय ठरत नाही. पण शेती, औद्योगिक क्षेत्रे प्रगत अवस्थेत आहेत.

लोकप्रशासनाच्या कार्यांना व कृतींना आर्थिक निकष लावून त्यांची कार्यक्षमता तपासण्याची पध्दत आधुनिक काळात सुरू झालेली दिसते. निरनिराळे बाजार सिध्दांत, सार्वजनिक निवड सिध्दांत यांना आधुनिक काळात महत्व प्राप्त झाले आहे. एकोणीसाव्या शतकामधील ब्रिटिश विधिज्ञ जेरेमी बेन्थॅमच्या उपयुक्ततावादावर "सार्वजनिक निवड सिध्दांत" आधारलेला आहे. व्यक्ती कोणतीही कृती करण्यापूर्वी तिचा लाभ व तोटा यांचे अंकगणित मांडते. त्याचप्रमाणे प्रशासनाचे कार्य व कृती यामधून व्यक्तीचा व समाजाचा लाभ किती व तोटा किती याचेही गणित केले पाहिजे, असे बुकॅनन व टुलक यांनी म्हटले आहे.[८३] म्हणजेच अर्थशास्त्रातील अनेक सिध्दांत लोकप्रशासनात उपयोगी मानले जात आहेत. अशा प्रकारे लोकप्रशासन आणि अर्थशास्त्र याचा अत्यंत जवळचा संबंध निर्माण झालेला आहे. त्यामुळे प्रशासकीय अधिकाऱ्यांना अर्थशास्त्राचे ज्ञान असणे आवश्यक असते.

लोकप्रशासनाचा अभ्यास करताना इतिहासातील विविध माहितीचा आणि घटनांचा आधार घ्यावा लागतो. त्यामुळे लोकप्रशासनाचा इतिहासाशी संबंध असलेला दिसतो. भूतकाळात घडलेल्या विविध घटनांची नोंद इतिहासात केलेली असते. भूतकाळात प्रशासनाचे स्वरूप कसे होते, प्रशासकीय संघटनांची रचना व कार्यपध्दती कशी होती इत्यादी माहिती इतिहासाच्या अभ्यासाने मिळते. इतिहासाच्या अभ्यासामुळे भूतकाळात घडलेल्या प्रशासकीय

---

८३. The calculus of consent: Buchanan and Tullock, Ann Arbor Mich, University of Michigan, Press, 1962, p.182.

चुका भविष्यकाळात होऊ नयेत याविषयी जाणीव करून देण्याचे कार्य इतिहासाकडून होत असते. तसेच भूतकाळातील अनेक चांगल्या प्रशासकीय संघटनांची, तत्वांची आणि कृतीची माहिती भविष्यकाळात उपयुक्त ठरते. प्रशासकीय संघटनांची, तत्वाची आणि कृतीची माहिती भविष्यकाळात उपयुक्त ठरते. प्रशासकीय विचारवंतांनी लोकप्रशासनाचा अभ्यास ऐतिहासिक दृष्टिकोनातून केलेला आहे. प्राचीन काळातील प्रशासन पध्दतीची माहिती इतिहासामुळे मिळते. उदा. प्राचीन भारतातील स्थानिक प्रशासनाचा इतिहास, मोगल प्रशासनाचा इतिहास. अशा रीतीने लोकप्रशासन व इतिहास यांच्यातील परस्परसंबंध अधिक जवळचा असला तरीही अशा स्वरूपाचा अभ्यास मर्यादित स्वरूपात करणे योग्य ठरते. कारण प्रशासनाचे जे सिध्दांत भूतकालीन शास्त्रपध्दतीत उपयुक्त ठरले ते सिध्दांत वर्तमानकाळात किंवा भविष्यकाळात उपयुक्त ठरतीलच असे नाही. जेव्हा राज्यात राजकीय परिवर्तन घडून येते तेव्हा तेथील प्रशासनातही आमूलाग्र बदल घडून येतात. परंतू प्रशासनाविषयी माहिती देण्याचे महत्वपूर्ण कार्य इतिहासामधूनच मिळते. म्हणूनच लोकप्रशासन आणि इतिहास यांत जवळचे परस्परसंबंध असतात असे म्हणता येईल.

आधुनिक काळात लोकप्रशासनाला विशेष स्थान व महत्व प्राप्त झाले आहे. कारण व्यक्तीचे जीवन पूर्वी जसे स्वतंत्र होते तसे राहिलेले नाही. प्राचीन काळामध्ये खेडेगावं आर्थिकदृष्टया स्वयंपूर्ण होती आणि राज्यसंस्थेचे म्हणजे लोकप्रशासनाचे गावांवरील नियंत्रण नगण्य होते. जमीन महसुलाचा काही हिस्सा राजाला गावे देत असत, अन्य कर राजा आपल्या गरजेनुसार गावांकडून वसूल करीत असे. त्यामुळे राज्यसत्ता दुर्बळ असे. सरंजामशाहीत राजाला सरंजामदारांवर सैनिक पुरवठयासाठी व अन्य रसदीसाठी तसेच करवसुलीसाठी अवलंबून राहावे लागत असे. राजसत्ता जशी प्रबळ होऊ लागली तशा व्यक्ती तिच्या अधिकारकक्षेत येऊ लागल्या. पण या परिस्थितीत खरा फरक औद्योगिक क्रांतीनंतर घडून आला. खेडयांची आर्थिक स्वायत्तता संपुष्टात आली.

आधुनिक उद्योग मोठया प्रमाणावर व कमी किंमतीत वस्तूंचे उत्पादन यंत्रावर करू लागले, त्यामुळे खेडयातील कारागिरांनी चालविलेले हस्तोद्योग बंद पडू लागले. आधुनिक शस्त्रास्त्रे, प्रशिक्षित व सुसंघटित सैन्ये व पोलिस, द्रुत दळणवळणाची व संचरणाची साधने, यामुळे सर्व प्रदेशांवर, खेडी व नगरे आणि व्यक्तींवर आधुनिक राष्ट्र-राज्याची सत्ता प्रभावीपणे गाजू लागली. प्रभावी राज्यसत्तेबरोबर लोकप्रशासनही प्रभावी व सर्वस्पशी झाले. आधुनिक समाज व्यापक स्वरूपाचा तसेच अधिक जटिल व गुंतागुंतीचा बनलेला आहे.

व्यक्तीच्या जन्म व बालपणापासून ते वृध्दोपकाळापर्यंत नव्हे तर मृत्यूपर्यंत तिच्या जीवनाच्या सर्व अवस्थांमध्ये, लोकप्रशासनाशी व्यक्तीचा संबंध येत असतो. व्यक्तीच्या जन्म व मृत्यूची नोंद प्रशासनाकडेच करावी लागते. तसेच प्रशासनाचे नियंत्रण असणा-या शिक्षणसंस्था मार्फत शिक्षणाची सुविधा उपलब्ध होते. गरीब वर्गासाठी आरोग्यसेवा प्रशासन पुरविते. रोजगार, व्यवसायावर नियंत्रण ठेवणे अशा मानवी गरजांची पूर्तता करण्यासाठी आधुनिक समाजात विविध संस्था, समुह आणि संघटना निर्माण झालेल्या आहेत. आर्थिक, धार्मिक, सांस्कृतिक, राजकीय, शैक्षणिक अशा स्वरूपाच्या संस्था परस्परांच्या सहकार्याने समाजाचे संरक्षण, संवर्धन आणि नियमन करीत असतात. राज्यसंस्था ही आधुनिक समाजातील महत्वाची संस्था असून ती समाजजीवनाचे नियमन करीत असते. समाज विकासासाठी, मानवी गरजांची पूर्तता करण्यासाठी राज्यसंस्था विविध स्वरूपाची कार्ये करीत असते. अर्थात ही कार्ये पार पाडण्यासाठी राज्यसंस्था शासनयंत्रणा निर्माण करते. कोणत्याही स्वरूपाच्या शासन पध्दती मध्ये प्रशासनव्यवस्था निर्माण केलेली आढळते. सर्वच प्रगत आणि अप्रगत देशात प्रशासनव्यवस्थेचे महत्व मान्य झालेले आहे.

आज विसाव्या शतकात लोकप्रशासनाच्या अभ्यासाचा विकास जलद गतीने होऊ लागला आहे. आशिया, आफ्रिका खंडातील नवोदित विकसनशील राष्ट्रात प्रशासनाचे महत्व वाढू लागले आहे. ही राष्ट्रे पाश्चात्य राष्ट्रांच्या प्रशासकीय पध्दतीचे अनुकरण करू लागलेली आहेत. परंतू प्रशासनावर भौगालिक, आर्थिक, शैक्षणिक अशा विविध घटकांचा प्रभाव पडत असल्यामुळे तेथील प्रशासनाची उद्दिष्टे अयशस्वी होऊ लागली आहेत. त्यामुळे आशिया खंडातील देशांच्या प्रशासनासंबंधी नव्याने अभ्यास करण्याची गरज निर्माण झाली आहे. साहजिकच तुलनात्मक प्रशासन, विकसनशील प्रशासन असे नवे विषय लोकप्रशासनाच्या अभ्यासात येऊ लागले आहेत. प्रत्येक राज्याची भौगोलिक स्थिती, आर्थिक स्थिती, सांस्कृतिक वारसा, इतिहास अशा घटकांचा विचार करून प्रशासनाची यंत्रणा आणि कार्यपध्दती तेथे स्वीकारावी लागत आहे.

आधुनिक काळात लोकप्रशासनाचे स्वरुप व्यापक बनलेले आहे. आधुनिक प्रशासन यंत्रणा अधिक गुंतागुंतीची बनलेली आहे. त्यामुळे विविध स्वरूपाच्या प्रशासकीय समस्या निर्माण होऊ लागलेल्या आहेत. त्यामुळे प्रशासनाची जबाबदारी, कार्यक्षमता आणि प्रशासकीय वर्तन यांचा विचार करण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. अलीकडे लोकप्रशासनशास्त्राचा अभ्यास मानसशास्त्रीय दृष्टिकोनातून होऊ लागला आहे. प्रशासकाची

भूमिका, प्रशासकाचे कौशल्य, कार्यक्षमता, प्रशासक व कर्मचारी यांचे संबंध अशा गोष्टींचा अभ्यास मानसशास्त्रीय दृष्टिकोनातून केला जात आहे. कारण प्रशासनाचे यश हे प्रशासकीय कौशल्यावर आणि कार्यक्षमतेवर अवलंबून असते. साहजिकच आधुनिक विचारवंतानी लोकप्रशासनाचा अभ्यास अधिक चिकित्सक आणि संशोधक पध्दतीने सुरु केलेला आहे. आधुनिक राज्ये ही लोककल्याणकारी राज्ये म्हणून ओळखली जातात. लोकशाही व्यवस्थांमध्ये राज्याचा प्रधान हेतू लोककल्याण हा असतो. एवढेच नव्हे तर साम्यवादी राज्यातही लोककल्याणाचीच कार्ये शासनसंस्थेकडून पार पाडली जातात. तेथील प्रशासनव्यवस्था स्थिर व कार्यक्षम स्वरुपाची आहे. सर्व प्रकारची आधुनिक राज्ये प्रशासन व्यवस्था आणि प्रशासकीय पध्दती यांना अधिक महत्व देताना दिसतात.

आधुनिक काळात शासनसंस्थांचे स्वरुप वारंवार बदलत असते. परंतु प्रशासकीय यंत्रणा कायमस्वरुपी असलेल्या दिसतात. क्रांती किंवा उक्रांती अशा कोणत्याही मार्गाने शासनपध्दतीत बदल झाला तरी तेथील प्रशासकीय यंत्रणेमध्ये स्थैर्य, सातत्य आणि गतिशीलता आढळते. यातून लोकप्रशासनाची आवश्यकता आणि महत्व समजून येते. सामान्यतः राज्याची शासनपध्दती कोणतीही असली तरी राज्याची कार्ये ही सारखीच असतात. राज्यसंस्थेला लोककल्याणाची कार्ये करावी लागतात आणि ही कार्ये सार्वत्रिक स्वरुपाची असतात. कोणताही देश आणि कोणतीही शासनपध्दती विचारात घेतली तरी त्या राज्यसंस्थेचा अंतिम हेतू लोकांचे कल्याण हाच असतो. प्रजेचे संरक्षण आणि संवर्धन या गोष्टी राज्यकर्त्याला कराव्या लागतात. त्यासाठी प्रशासकीय यंत्रणा उभारावी लागते आणि ती प्रशासकीय यंत्रणा योग्य प्रकारे राबवावी लागते. प्राचीन काळातील राजेशाही, सरंजामशाही, ब्रिटिशकाळातील साम्राज्यशाही आणि स्वातंत्र्योत्तर काळातील लोकशाही अशी अनेक सत्तांतरे घडून आली तरीही प्रशासकीय यंत्रणा ही कमी-अधिक फरकाने तिच राहिलेली आहे. राजेशाहीत राजा, प्रधान, मंत्री आणि त्यांची खाती असे प्रशासन होते. ब्रिटिश काळात गर्व्हनर जनरल आणि त्याची प्रशासकीय यंत्रणा होती तर आधुनिक काळात राष्ट्रपती, पंतप्रधान, त्यांचे मंत्री आणि खाती असा राज्यकारभार चाललेला आहे. राज्याची उदिद्ष्टये, कार्ये तसेच प्रशासकीय यंत्रणा तशीच होती. केवळ प्रशासकीय पध्दतीत बदल झालेला आहे.

आधुनिक काळात लोकप्रशासनाचे महत्व वाढण्याचे आणखी एक कारण असे की, आधुनिक काळातील सामाजिक बदल आणि सुधारणा यामुळे अद्ययावत प्रशासनाची

आवश्यकता अधिक भासू लागला आहे. औद्योगिक विकास, नागरीकरण, सांस्कृतिक देवाण घेवाण, कल्याणकारी योजना इत्यादी कारणांमुळे योग्य व कार्यक्षम लोकप्रशासन व्यवस्थेची गरज भासू लागली आहे. नवनवीन ध्येयधोरणे, योजना यांची निर्मिती आणि कार्यवाही करण्यासाठी लोकप्रशासनाची गरज भासू लागली आहे. राष्ट्रांना आपल्या सर्वांगीण प्रगतीसाठी प्रशासकीय यंत्रणेत आमूलाग्र बदल करणे आवश्यक झाले आहे. केवळ प्रशासकीय यंत्रणा बदलून चालणार नाही तर ती यंत्रणा चालविणारे राज्यकर्ते आणि प्रशासकीय नोकरवर्ग यांच्यात ही सुधारणा घडवून आणली पाहिजे. राज्यकर्त्यांनी उपलब्ध साधनसामग्रीचा योग्य प्रकारे वापर करून राष्ट्रांच्या विकासासाठी प्रयत्न केले पाहिजेत आणि त्यासाठी सनदी सेवकांनी विकास योजनांची आणि ध्येयधोरणांची कार्यवाही अत्यंत जबाबदारीने, जाणिवेने केली पाहिजे. अर्थात यासाठी राष्ट्रांच्या जनतेचे सहकार्य अधिक महत्वाचे ठरणार आहे. जनतेच्या सहभागावर, सहकार्यावर आणि पाठिंब्यावर प्रशासनाचे यश आणि स्थैर्य अवलंबून असते. त्यासाठी राज्यकर्ते व जनता सुजाण, सुशिक्षित आणि सुसंस्कृत असणे गरजेचे आहे. प्रशासकीय यंत्रणेला, प्रशासकीय कार्याला सहकार्य करणारी जनता आवश्यक असते. अनेक देशांच्या प्रशासनात भ्रष्टाचार, लाचलुचपत, दफ्तर दिरंगाई, अकार्यक्षमता, बेजबाबदारपणा असे दोष निर्माण झालेले दिसतात.तेव्हा प्रशासनातील या दोषांचे निर्मूलन करणे आवश्यक झाले आहे. थोडक्यात अप्रगत राष्ट्रांच्या प्रशासनात सुधारणा घडवून आणणे गरजेचे झाले आहे. प्रशासकीय यंत्रणा अद्ययावत कार्यक्षम आणि सुव्यवस्थित झाल्याशिवाय या राष्ट्रांचा विकास  होणे अशक्य आहे. प्रत्येक समाजव्यवस्थेत शांतता, सुव्यवस्था प्रस्थापित करण्यासाठी प्रशासनव्यवस्थेची आवश्यकता असते. त्यामुळे प्रत्येक शासनसंस्था आपली प्रशासकीय यंत्रणा कार्यक्षम व अद्ययावत बनविण्याचा प्रयत्न करीत आहे. तसेच आधुनिक विचारवंत प्रशासकीय पध्दतीबाबत संशोधन, विश्लेषण करून नवननवीन पध्दती, तत्वे आणि निष्कर्ष काढताना दिसतात.

थोडक्यात आधुनिक समाजव्यवस्थेत लोकप्रशासन शास्त्राच्या अभ्यासाचे महत्व वाढत असलेले दिसते. आधुनिक समाजव्यवस्था लोकप्रशासनामुळे अधिक स्थिर झालेली आहे. [८४] लोकप्रशासन व्यवस्थेमुळेच आधुनिक समाजाचे संरक्षण व संवर्धन होत असते असे म्हणता येईल.

---

८४. लोकप्रशासनः डॉ. अर्जुनराव दर्शनकार, कैलाश पब्लीकेशन्स, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, १९८५,पा. १०८.

लोकप्रशासन व प्रशासनाच्या अभ्यासात काही तत्वांना विशेष स्थान आहे असे दिसते. कौटिलीय अर्थशास्त्रात प्रशासनाचा अधिकार, आज्ञापालन, शिस्त, कर्तव्य, हित आणि जबाबदारी या तत्वांना महत्व दिलेले दिसते. तसेच श्रमविभागणी, संयोजन, पदसोपान, विशेषीकरण आणि समदृष्टी या तत्वांचा आढळ ही यात दिसतो. यात उच्च स्तरावरील अमात्य, मंत्री, अध्यक्ष इ प्रशासन अधिकाऱ्यांचा, त्यांच्या वेतनाचाही उल्लेख आहे तसेच नगर, ग्राम पातळीवरील प्रशासनही यात वर्णिलेले आहे.

मौर्य साम्राज्यानंतरचे गुप्त साम्राज्य यातही काही अंशी वरीलप्रमाणे प्रशासकीय सिध्दांत व तत्वांचा आढळ दिसतो. अकबराच्या साम्राज्यातही प्रशासनाचा विकास झालेला दिसतो. अकबराने मनसबदारी पध्दत सुरु केली मनसबदार हे एकाच वेळी, सैन्याचे अधिकारी, प्रशासक, दरबारी जमीनदार होते. त्यामुळे त्यांची सत्ता व अधिकार विस्तीर्ण होते. मनसबदारांना त्या काळात रोख व जमिनीच्या जहागिरीच्या स्वरूपात वेतन मिळत असे. आज्ञैक्य, पदसोपान व जबाबदारी ही प्रशासकीय तत्वे अकबरकालीन प्रशासनात अस्तित्वात होती. त्याप्रमाणेच ती शिवकाळातही अस्तित्वात होती. रामचंद्रपंत अमात्यकृत “आज्ञापत्र” यास लोकप्रशासनावरील साहित्यकृती म्हणता येईल.[८५] छत्रपती शिवाजी महाराजांनी अष्टप्रधान पध्दती, जमीन महसूल पध्दती, किल्ल्यांचे प्रशासन यामध्ये आज्ञैक्य, पदसोपान व जबाबदारी या तत्वांचा वापर केलेला दिसतो.

प्राचीन भारतामधील मौर्य, गुप्त, अकबर, मराठेकालीन प्रशासन व्यवस्थांमध्ये लोकप्रशासनाची काही तत्वे अस्तित्वात असलेली दिसतात. प्रशासनातील कार्यामध्ये आज्ञैक्य (Unity of Command) (आज्ञेची एकता) साधलेले असल्यास प्रशासकीय कार्याची वेळेत पूर्तता होते. आज्ञैक्य या तत्वामध्ये आज्ञेचे स्थैर्य व स्वतंत्रता यांचे महत्व विशद केलेले आहे. राजाच्या अधिकारामुळे राज्यामध्ये आज्ञेचे व आदेशांचे ऐक्य सांभाळले जाते हे कौटिल्याने स्पष्ट केले आहे. प्राचीन व मध्ययुगीन काळी राजा हाच एकमेव आज्ञेचे उगमस्थान होता. या काळात “राजा” हा एकमेव आज्ञा देणारा असल्याने आज्ञैक्य तत्व मोठया प्रमाणात वापरले जात असे. परंतु आधुनिक प्रशासनात आज्ञा देणाऱ्या वरिष्ठ शाखा एकापेक्षा जास्त असतात. उदा. डॉक्टर आपल्या कार्यक्षेत्रातील स्थानिक विभागीय समितीच्या अध्यक्षांच्या

८५. लोकप्रशासनः डॉ. ना. र. इनामदार, डॉ. सुनीता काळे, दास्ताने प्रकाशन, पुणे, १९९७, पा. १०६.

नियंत्रणाखाली कार्य करतात पण ते राज्याच्या सार्वजनिक आरोग्य विभागाच्या संचालकांच्या आदेशांचेही पालन करतात.

आज्ञैक्य या तत्वाच्या पालनामुळे लोकप्रशासनात पुष्कळ लाभ होतो. शिस्त, कार्यक्षमता, संघटन व एकत्रिकरण, सेवकांमधील एकसंघता इ. फायदे प्रशासनाला होतात. आज्ञैक्यामुळे कनिष्ठ सेवकांना एकाच ठिकाणाहून किंवा अधिकाऱ्यांकडून आज्ञा होतात त्यामुळे आज्ञापालन व्यवस्थित होते. जेव्हा आज्ञा अनेकांकडून मिळतात तेव्हा कोणती आज्ञा पाळावी असा कनिष्ठ सेवकांचा गोंधळ होतो. त्यामुळे आज्ञापालन व्यवस्थित होत नाही. आज्ञैक्य तत्वामुळे आज्ञांमध्ये क्रम निश्चित केलेला असतो त्यामुळे त्यांच्यात आंतरविरोध निर्माण होत नाही.

आज्ञैक्याच्या जोडीला आज्ञेची स्थिरता व सातत्य ही दोन उपतत्वे महत्वाची ठरतात. आज्ञा निघाल्यापासून तिची कार्यवाही होईपर्यंत प्रशासनामधील ही साखळी तुटता कामा नये हे आज्ञेचे सातत्य. एकाच स्थानामधून आज्ञा निघावी आणि सेवकांची तिच्याशी असलेली निष्ठा स्थिर असावी ही आज्ञेची स्थिरता. आज्ञैक्य या तत्वामुळे प्रशासनात संघर्ष, गोंधळ निर्माण होत नाही. सेवक वर्गात कार्याची जबाबादारी वाढते तसेच वरिष्ठ अधिकाऱ्यांना कनिष्ठ सेवकांवर पर्यवेक्षण व नियंत्रण करणे सुलभ होते. शिवकाळात आज्ञेचे सातत्य आणि आज्ञेची स्थिरता या दोन्ही तत्वांचा आढळ असलेला दिसतो. या काळात आज्ञा शिवाजी महाराजांकडून निघत असत आणि त्यांच्या सेवकांची त्यांच्यावर असलेली गाढ निष्ठा म्हणजेच आज्ञेची स्थिरता असल्याने आज्ञेचे सातत्य राखले जात असे. प्रसंगी जिवावर उदार होऊनही त्यांच्या आज्ञेचे पालन केले जात असे.

आधुनिक प्रशासनात साहाय्यक संस्थांची आणि विशेष तंत्राधिकाऱ्यांची वाढ झालेली आहे. त्यामुळे प्रशासन कार्यात अधिक गुंतागुंत निर्माण झालेली दिसते. कनिष्ठ पातळीवरील सेवक वर्गाला अधिकारी व विशेषतज्ञ यांच्या आदेशांचे पालन करावे लागते. एकूणच आज्ञेची एकता हे तत्व आज प्रशासनात कालबाहय झाले आहे.

प्रशासकीय कार्यामध्ये विशेषीकरण (Specialization) या तत्वाला महत्व असते. प्रशासनातील कार्यामध्ये निष्णातपणाचा वापर केल्यामुळे कार्यक्षमता वाढते. व्यक्तीचा निष्णातपणा एखाद्या ज्ञानशाखेमधील व व्यावसायिक क्षेत्रामधील अभ्यास व अनुभव यामुळे प्राप्त झाला असेल तर त्याचा प्रशासनात निश्चितच फायदा होतो. लोकप्रशासनात काही खाती, विभाग किंवा उपविभाग वा सार्वजनिक उद्योग एखाद्या विशिष्ट कार्याला, हेतूला

वाहिलेली असतात. त्यावेळी ते विशेषीकरणाचे लक्षण आहे. विशेष अनुभवामुळे विकसित होणाऱ्या निष्णाततेचा उपयोग लोकप्रशासनामध्ये विविध ज्ञान शाखांमधील वा व्यवसायांमधील कुशल व अनुभवी सेवक व अधिकारी नेमण्यामध्ये होतो.

समाजाचा ऐतिहासिक काळापासून ज्ञानाच्या उपयोगाच्या, व्यवसायांच्या, शहरीकरणाच्या, युद्धसज्जतेच्या इ. दृष्टीकोनांमधून जसजसा विकास होत गेला. तसतसे लोकप्रशासनाचे अधिकाधिक 'विशेषीकरण' होत गेले. आदीम अवस्थेतून शेतीच्या अवस्थेमध्ये समाजाने प्रवेश केला, तशी राज्यसंस्था स्थिरावली. राजपदाच्या भोवती लोकप्रशासन विकसित झाले. राजवाडा, सैन्य, दरबार व दरबारी अभिजन, कर गोळा करणारी व्यवस्था, कायदा व सुव्यवस्था राखणारी यंत्रणा आणि न्यायाधीश व स्थानिक न्याय देणाऱ्या पंचायती हा कृषिप्रधान समाजामधील लोकप्रशासनाचा पसारा होता. त्याकाळी सैन्य व न्यायदान या क्षेत्रांमध्ये विशेषीकरण झालेले होते, अन्य विभागांमधून सामान्य ज्ञान, लोकांशी परिचय व जवळीक यांच्या बळावर शासनाचे सेवक व अधिकारी कार्य करीत. विशेषीकरणाचा मोठया प्रमाणावरील अवलंब औद्योगिकरण व अनुषंगिक शहरीकरण यामुळे पश्चिमेकडे अठराव्या शतकापासून सुरु झाला. त्यापूर्वी शास्त्रीय ज्ञानाची प्रगती व प्रसार आणि जागतिक व्यापारामधील वाढ, यामुळेही विशेषीकरणाचा प्रादुर्भाव लोकप्रशासनात वाढत्या प्रमाणात होऊ लागला. औद्योगिकरण व शहरीकरणामुळे या प्रक्रियेला अधिक चालना मिळाली. भारतासारख्या साम्राज्यशाहीच्या जोखडाखालील वसाहतींमधून एकोणीसाव्या शतकापासून, लोकप्रशासनामध्ये वेगवेगळे विभाग स्थापन झाले. शहरीकरण व औद्योगिकरणामुळे निर्माण झालेल्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी वा त्यांना चालना देण्यासाठीही प्रशासनाने विशेषीकरणाचा आधार घेतला. त्याचप्रमाणे जागतिक युद्धांमधील सहभागामुळे संरक्षणाच्या तीन दलांमध्ये कामगिरी केलेल्या सैनिक, अधिकारी व तंत्रज्ञ यांच्यामुळे प्रशासनामधील विशेषीकरणाला नवीन आयाम प्राप्त झाले. स्वातंत्र्यानंतर विकास वेगाने होऊ लागला, त्यामुळे लोकप्रशासनामध्ये विशेषीकरणाची गती अधिकच वेगवान झाली. लोकप्रशासनातील श्रमविभागणीमुळे विशेषीकरणाला अधिक वाव मिळाला. त्याचप्रमाणे विशेषीकरणामुळे श्रमविभागणी मोठया प्रमाणावर होऊ लागली. श्रमविभागणीनंतर संयोजनाद्वारे पुनर्संघटन व्हावे लागते कारण केवळ श्रमविभागणी व विशेषीकरण या प्रक्रियांमुळे प्रशासन विस्कळीत होते आणि त्यासाठी ते पूर्ववत प्रगत अवस्थेमध्ये एकत्रित करावे लागते. व्यक्तींचे ज्ञान व कौशल्य यांवर लोकप्रशासनातील विशेषीकरण आधारलेले

असते, त्याचप्रमाणे संस्थात्मक विशेषीकरणालाही लोकप्रशासनाच्या विकासाबरोबर चालना मिळते. संस्थात्मक विशेषीकरण तीन प्रकारचे असते. प्रशासनातील विविध कामे व कर्तव्ये यांचे विशेषीकरण प्रशासनास उपयुक्त असते. लोकप्रशासनामधील मूलभूत प्रक्षेत्रीय विशेषीकरणात विविध कामांचे विभाजन व्यक्तींच्या गटांमधून व त्यानंतरचे विभाजन व्यक्तींव्यक्तींमधून करण्यात येते. उदा. शेतकी खात्यामधील खरीप हंगामातील प्रक्षेत्रीय कार्ये व शेतकऱ्यांना खरीप हंगामात अधिक प्रमाणात पीके घेण्यासाठी त्यांनी कोणती कामे हाती घ्यावयाची, याचे प्रशिक्षण देणे, पिकांसाठी आवश्यक सुधारीत बी, बियाणे, खते, जंतुनाशके व कर्जे यांच्या पुरवठयाची सहकारी संस्था, बँका यांच्यामार्फत व्यवस्था करणे आणि पिकांची पेरणी, त्यांची वाढ व पिके घेणे याकरिता कार्य करणे ही कामांची विभागणी वैयक्तिक सेवकांमधून कर्तव्यांच्या रुपाने अधिकारी करतात. प्रशासनात आडव्या आणि उभ्या पातळीवरील विशेषीकरण उपयुक्त ठरते. मुख्य प्रशासकीय पातळीवर धोरण ठरविले जाते, नियोजन आर्थिक योजना तयार केली जाते आणि मुख्य उद्दिष्टे पार पाडण्यावर लक्ष केंद्रित केले जाते. मंत्री, सचिव व काही प्रमाणात विभाग प्रमुख यांचा या पातळीमध्ये समावेश होतो. उच्च-प्रशासकीय पातळीमध्ये विभाग प्रमुख आणि उच्च तंत्रज्ञ अधिकारी यांचा समावेश होतो. धोरणांच्या कार्यवाहीचे तपशील या पातळीवर ठरविले जातात. मध्यम-प्रशासकीय पातळी प्रक्षेत्रीय पातळी व उच्च पातळी यांमधील दुवा असतो, तिच्यामुळे वरील धोरणे प्रत्यक्षात आणण्यामध्ये मदत होते. भारतासारख्या खंडप्राय देशात राज्यप्रशासनांचाही प्रादेशिक पसारा विस्तृत असल्यामुळे विशेषीकरणाची आवश्यकता असते. अधिक्षक पातळीमध्ये तहसील व खेडी यांचा समावेश होतो, तपशिलांची प्रत्यक्ष कार्यवाही या पातळीवर होते. त्या त्या पातळीवरील कामांचे विशेषीकरण जरी होत असले, तरी काही प्रमाणात सेवकांच्या वरच्या पातळीवरील बढत्यांमुळे विशेषीकरणावर मर्यादा पडते.

उभ्या पातळयांवरील विशेषीकरणामध्ये विशेषज्ञ व कार्यकारी वा अधिक्षक यांच्यामधील संयोजनाला संरचनेमध्ये महत्व दिले जाते. भारतामधील रेल्वे मंडळामध्ये रेल्वे प्रशासनाचे अत्युच्च पातळीवर निर्देशन करण्यासाठी अभियांत्रिकी व्यापारभाग, वित्त विभाग, इ.चे विशेषज्ञ सदस्य म्हणून नेमले जातात, रेल्वे मंडळाचा अध्यक्ष त्यांच्या कार्याचे संयोजन करतो. विभागीय पातळीवर विशेषीकरण नसते, विभागीय व्यवस्थापक संयोजन करतो. दुसरा प्रकार म्हणजे, विभागीय पातळीवरही विशेषज्ञ व कार्यकारी अधिकारी असतात तर 'साचा' पद्धतीमध्ये प्रक्षेत्रामधील प्रकल्प अधिकारी किंवा व्यवस्थापक अत्युच्च किंवा समांतर

पातळीवरील विशेषज्ञ व कार्यकारी अधिकारी यांच्या संयोजनावर भर दिलेला असतो. विशेषज्ञ अधिकारी उदा. कायदा अधिकारी, वित्त अधिकारी, अभियंते लोकप्रशासनाच्या वेगवेगळया विभागांमधून नेमलेले असतात. तसेच काही विभाग विशेषज्ञांचेच असतात, उदा. आयकर विभाग, वित्त व हिशेब विभाग इ. आधुनिक काळामध्ये नवीन शास्त्रीय व तांत्रिक ज्ञानाच्या वेगवान प्रसारामुळे व संचरण प्रक्रियेमुळे लोकप्रशासनात विशेषज्ञांच्या मोठया प्रमाणावर नेमणुका झालेल्या आहेत. तसेच शास्त्रीय संशोधन, अणुशक्ती, अवकाश संशोधन, परिसर-संरक्षण, इ. नवीन विभाग निर्माण करण्यात आले आहेत.

प्रशासनातील अधिकारी, कर्मचारी वर्गात पदसोपान (Hirearchy) हे तत्व उपयोगात आणले जाते. प्रशासकीय कार्य करणाऱ्या कर्मचा-यांत कामाचे वाटप करण्यात येत असते आणि त्या त्या कामासाठी संबंधित कर्मचारी जबाबदार असतात. कामाच्या उभ्या वाटपामुळे व्यवस्थापनाचे विविध स्तर तयार होतात. त्यांना उच्च व्यवस्थापन, मध्यम व्यवस्थापन आणि कनिष्ठ व्यवस्थापन अशा नावे देण्यात आली आहेत. हे स्तर कामाच्या आधारावर असतात आणि त्यामुळे गुणात्मकदृष्टया ते उच्च किंवा कमीपणाचे नसतात. तथापि, व्यवहारात मात्र त्यांच्या पगारव्यवस्थेमुळे आणि शैक्षणिक पात्रतेमुळे आपोआप फरक निर्माण होतो आणि जास्त जबाबदारी किंवा कमी जबाबदारी अशी भाषा वापरण्यात येते. अशा प्रकारे पदसोपान व्यवस्थेत वरिष्ठ आणि कनिष्ठ कर्मचा-यांचे संबंध विविध स्तरांपासून एकमेकांपर्यंत पोहोचत असतात. प्रशासकीय संघटनेत कार्य करणाऱ्या वरिष्ठ आणि कनिष्ठ कर्मचाऱ्यांत संवाद साधण्यासाठी पदसोपानाची गरज असते. कोणत्याही कार्यबद्दल कर्मचाऱ्याचे मत अजमावता येते आणि वरिष्ठ अधिकाऱ्याला आपल्या कनिष्ठ अधिकाऱ्यांना तात्पुरत्या स्वरुपात सत्ता प्रदान करता येते. पॉल ॲपलबीच्या मताप्रमाणे पदसोपानामुळे काही गोष्टी साधता येतात.[८६] जसे की, अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करता येते. विविध स्तरांवर प्रशासकीय नेतृत्व प्रदान करण्यात येते. कनिष्ठ कर्मचाऱ्यांवर प्रभाव टाकून काम करुन घेता येते. कामाचे स्वरुप लक्षात घेऊन प्रशासकीय संघटना तयार करण्यात येते. निर्णय प्रक्रियेला पदसोपान मदत करीत असतो. पदसोपानाच्या कार्यपध्दतीमुळे वरिष्ठ आणि कनिष्ठ कर्मचारी असा वाद निर्माण होतो आणि त्यामुळे काही काही वेळा विनाकारण तेढ निर्माण होते. प्रत्येक काम पध्दतीनुसार होत असते. आणि त्यामुळे विलंब होतो. दिरंगाईमुळे भ्रष्टाचारासारख्या गोष्टींना

---

८६. Policy & Administration: Paul Appleby, Oxford & IBH Publishing Company, New Delhi, 1970, p 120.

वाव मिळतो. प्रत्येक कागदपत्र प्रत्येक कर्मचा-याकडे जात असते आणि त्यामुळे दिरंगाई होण्याची शक्यता असते.

कार्याची जटिलता, संचरणातील अडचणी, तातडीने निणेय घेण्याची गरज इत्यादींमुळे पदसोपानाच्या तत्वांच्या तंतोतंत कार्यवाहीवर मर्यादा पडतात. अनेक वेळा औपचारिक अधिकारी नसलेला, खालच्या पातळीवरील अधिकारी निर्णय घेतात व त्यांची कार्यवाही करतात. मुख्य कार्यकारी अधिकारी किंवा प्रशासकीय प्रमुखाकडून जेष्ठ अधिकाऱ्यांना परस्पर आदेश दिले जातात. भारतात निर्णय घेण्याच्या प्रक्रियेत राजकीय हस्तक्षेप फार मोठया प्रमाणात होत असल्याने अशा प्रकारच्या घटना अनेक वेळा घडतात. त्यामुळे केंद्रस्थानातील विभागप्रमुख आणि विभागीय किंवा जिल्हापातळीवरील अधिकारी यांच्यात निर्णयाविषयी किंवा आज्ञपालनासंबंधी तणाव निर्माण होतात. कारण राजकीय अभिजन परस्पर निर्णय घेतात, जिल्हापातळीवरील अधिकाऱ्यांना आदेश देतात आणि असे निर्णय खात्याच्या धोरणाशी विसंगत स्वरुपाचे असतात किंवा विभागप्रमुख असलेल्या खात्याच्या सचिवाला त्याची माहितीही नसते. शिवाय प्रशासनात विशेषज्ञांची संख्या व त्यांचे महत्व वाढल्याने पदसोपानाच्या तत्वाचे महत्व कमी झाले आहे.

प्राचीन काळापासून भारतात आस्तित्वात असलेल्या राज्यसत्तांनी पदसोपान या तत्वाचा वापर केलेला आढळतो. सर्व राज्यसत्तामध्ये वरिष्ठापासून कनिष्ठापर्यंत स्तररचना निर्माण केलेली दिसते. परंतू वरिष्ठाबरोबरच कनिष्ठ पदाधिकाऱ्यांची नियुक्ती राजामार्फत केली जात असे. तसेच पेशवेकाळात, (वरिष्ठ आणि कनिष्ठ) पदसोपान तत्वाप्रमाणे मुलकी, लष्करी, आरमार अशा सर्व प्रशासकीय व्यवस्थांमध्ये हे सर्व पदाधिकारी अंतिमतः राजाला किंवा राजसत्तेला जबाबदार असत. शिवकाळात, अधिकारी वर्गाच्या कामाची विभागणी केलेली दिसून येते. प्रशासनातील अधिकार आणि जबाबदारी (Responsibility) या तत्वांना प्रशासनात विशेष महत्व असते. औपचारिक अधिकार सत्तेपासून निर्माण होतो. पण अनौपचारिक अधिकाराला मात्र सत्तेचा आधार लागत नाही. व्यक्ती व गटांच्या समजुती किंवा कृती घडवून आणण्याचा अथवा त्यांच्यावर प्रभाव पाडण्याच्या व्यक्तींच्या वा गटांच्या क्षमतेला सत्ता म्हणतात. तर अन्य व्यक्तींवर वा गटांवर परिणाम करणारे निर्णय घेण्यासाठी आवश्यक तो स्वेच्छा निर्णय घेण्याचा हक्क संघटनेबाहेर असू शकतो पण अधिकार मात्र संघटनेशीच निगडीत असतो. अधिकार म्हणजे आज्ञा देण्याचा हक्क असेही म्हटले जाते आणि एखाद्या व्यक्तीच्या मुल्यांचा वा उद्दिष्टांचा प्रभाव पाडण्याच्या क्षमतेला सत्ता असे म्हटले जाते.

औपचारिक अधिकाराबरोबर, नैतिक अधिकार आणि कार्यात्मक अधिकार प्रशासनात आवश्यक असतात. अधिकार व सत्ता यांचे द्वैत जसे असू शकते त्याचप्रमाणे त्यांची साखळी, सातत्य वा एकरुपताही असू शकते. उदाहरणार्थ सैन्याच्या अधिकाऱ्यांकडे शत्रूंशी लढण्याचा कायदेशीर अधिकार असतो त्याचप्रमाणे सक्षम शस्त्रास्त्रे त्याच्यापाशी असल्यामुळे त्याच्याजवळ योग्य ती सत्ताही असते.

अधिकार वरून खाली, बाजूला, तसाच खालून वर चालतो. वरून खाली गाजवावयाचा अधिकार, आज्ञैक्य आणि पदसोपान वा श्रेणीतत्वानुसार, वरिष्ठ अधिकाऱ्याकडे असतो, पण खालून वर चालत असलेला अधिकार प्रशासनामधील कनिष्ठ सेवकांकडे असतो. असे चेस्टर बर्नार्डने आपल्या "कार्यकारी अधिकाऱ्याची कार्ये" या पुस्तकात म्हणतो. वरिष्ठांच्या निर्णयांची एक चौकट कल्पिली तर तिच्या एका भागामधील निर्णय कनिष्ठांना मान्य असतात, मधल्या पट्टयातील निर्णयासंबंधी ते उदासीन असतात तर उरलेले निर्णय त्यांना अमान्य असतात. उदासीन निर्णयांच्या पट्टयाला "उदासीनतेचा पट्टा" असे नाव देण्यात आले आहे. [८७]

प्रशासनातील सेवकांच्या भूमिकेचा अधिकार ही एक बाजू मानली तर जबाबदारी ही दूसरी बाजू समजता येईल. वरिष्ठांची जबाबदारी पार पाडण्यासाठी त्याला अधिकार दिलेले असतात. तर वरिष्ठांच्या आज्ञा वा आदेश मान्य करण्याची जबाबदारी कनिष्ठांची असते त्याचप्रमाणे त्याला ती जबाबदारी पार पाडण्यासाठी अधिकार स्थानपरत्वे दिलेले असतात. प्रशासनातील वरिष्ठ आणि कनिष्ठ दोन्ही स्तरावरील सेवकांवर कमी-अधिक प्रमाणात जबाबदारी असते परंतू सर्वात जास्त जबाबदारी प्रशासनातील मुख्याधिकाऱ्यांवर असते.

प्राचीन आणि मध्ययुगीन काळातील प्रशासन व्यवस्थेत राजा हाच प्रशासनाचा मुख्याधिकारी असलेला दिसतो. त्याने आपल्या अधिकारात काही प्रमुख व्यक्तींकडे जबाबदारी सुपूर्द केलेली दिसते. यातूनच नवरत्न दरवार, अष्टप्रधान मंडळ यांची निर्मीती झालेली दिसते. राज्य चालविताना अनेक प्रकारची कार्ये राजाला किंवा राजसत्तेला करावी लागतात. त्यामुळे अशा कार्यांच्या पूर्ततेसाठी काही महत्वपूर्ण कार्यांचे वाटप करण्याबरोबरच ते जबाबदारीचेही वाटप ठरते. मोगलकालीन महसूल पध्दतीमध्ये देखिल हेच स्पष्ट होते.

८७. लोकप्रशासनः डॉ. ना. र. इनामदार, अनु.डॉ. सुनीता काळे, दास्ताने प्रकाशन, पुणे, १९९७, पा. ७८.

-------◆ ◆ ◆ ◆-------

# प्रकरण तीन

## मोगलकालीन महसूल व्यवस्था

भारतामध्ये मोगलपूर्व सुलतानशाहीच्या काळात कृषिप्रधान अर्थव्यवस्था होती. बल्बन, खिलजी, तुघलक अशी सुलतानांमध्ये सत्तास्पर्धा चालूच असल्याने या काळात महसूल व्यवस्था स्थिर प्रकारची नव्हती. कारण सततची आक्रमणे आणि आक्रमकांची लूटीची ओढ यामुळे महसूल गोळा करण्याचा प्रयत्न राज्यकर्त्यांकडून कमीच झाला. हनाफी शाखेच्या सुन्नी न्यायपद्धतीवर आधारलेली अर्थव्यवस्था सुलतानशाहीने स्विकारली होती. त्यानुसार धार्मिक आणि निधर्मी अशा दोन प्रकारच्या करप्रणालीतून शासनास महसूल प्राप्त होत असे.[१]

उदा. 'जकात' हा धार्मिक कर फक्त मुसलमानांकडून घेतला जात असे. त्याचे स्वरुप दानधर्मासारखे असून तो सोने -चांदी वा अन्य व्यापारी वस्तूंच्या स्वरुपात एकूण मालमत्तेच्या १/४० इतका घेतला जात होता.

जिझिया-खरज हे अन्यधर्मीय कर मुस्लिमेत्तर लोकांकडून वसूल केले जात असत.[२]

खरज-मुस्लिमेतर शेतकऱ्यांच्या जमीनीवर लावलेला कर होता. हा उत्पन्नाच्या १/१० टक्यांपासून घेतला जात असे. जिझिया-मुस्लिमेत्तर प्रजेला लष्करी कामातून सूट देणे व त्यांच्या वित्त व जिवीत संरक्षणाच्या मोबदल्यात जिझिया कर मुस्लिमेत्तरांकडून घेतला जात होता. या करापासून सुलतानास मोठा महसूल मिळत होता.[३]

जेव्हा मुसलमानांनी गुजरात जिंकला तेव्हा तिथे कोळी व रजपूत या आदिवासी जमातींच्या वसाहती होत्या. सुलतानांनी त्यांना जिंकले आणि त्यांनी सैनिकी सेवा व जमीन महसूल किंवा मालगुजारी देण्याचे कबूल केले. धान्याचा सरकारी वाटा घेण्याची व्यवस्था विशिष्ट पध्दतीने करण्यात आली होती. असे ठरले की त्यांच्या वतनाचा व खेडयांचा चौथा हिस्सा त्यांच्या उपजिवीकेसाठी त्यांच्याकडे ठेवावा. ज्याला बांथ म्हणू लागले. तरीही त्यांना बांथ जमीनीपासूनचे उत्पन्न सलामी म्हणून एका ठराविक रकमेत द्यावे लागे. याचा परिणाम असा झाला की वेगवेगळया आकाराच्या जमीनदाऱ्या निर्माण झाल्या. त्यात कधी एक कधी

१. मध्ययुगीन भारत १२०७-१७७७ :प्रा.भिडे, प्रा.नाईकनवरे, डॉ. नलावडे, फडके प्रकाशन, द्वितीयावृत्ती, २००२, पा.१०४

२. The Administration of the Mughul Empire: Dr. Ishtiq Husain Qureshi, N.V. Publications, Lohanipur, Patna, pg.14., History of Indian Administration: B.N.Puri, Bhartiya Vidya Bhavan, Bombay,pg.93.

३. समग्र भारताचा इतिहासः प्रा. य.ना. कदम, फडके प्रकाशन, २००१, पान २१०.

अनेक खेडी तर कधी परगणाही असायचा. ज्यांच्याकडे अनेक खेडी किंवा परगणा असे त्यांना इस्मी जमीनदार म्हणत व त्यांना सैनिकी सेवा करावी लागत असे.[४]

खिलजी घराण्यातील अल्लाउद्दीनने जमिनीची पहिल्यांदा मोजणी केली व शेतसारा ठरविण्याचा प्रयत्न केला. जमीनीची प्रतवारी ठरवून सकस जमीन, निकस जमीन असे प्रकार करुन शेतसारा बसविला. त्याने सर्व जमिनी सरकारच्या ताब्यात घेतल्या होत्या. जमीनीचे उत्पन्न आणि सारा निश्चित करण्यासाठी आपल्या राज्यातील संपूर्ण जमीनीची मोजणी केली होती. खेडयातील पटवाऱ्यांच्या सर्व दप्तरांची तपासणी करुन त्याच्या उत्पन्नाचा हिशेब ठेवण्याची पद्धत सुरु केली. शेतसारा वसूल करण्यासाठी त्यांनी 'विझारत' हा नवा विभाग आणि 'मुस्तक राजा' या नावाचे अधिकारी नेमले होते. [५] या त्यांच्या कार्यामुळे शेतसारा व्यवस्थितपणे सरकारकडे पोहोचू लागला आणि महसूल व्यवस्थेला आकार आला. त्याने चराऊ कुरणावरही कर लादला होता.

सुलतानशाहीमध्ये पुढीलप्रमाणे काही कर आकारले जात.

१. भूमी कर - हे साम्राज्याला उत्पन्न देणारे प्रमुख साधन होते. भूमीची चार भागात विभागणी करण्यात आलेली होती. भूमी कर उत्पन्नाच्या एक पंचमांश होता. अल्लाउद्दीन खिलजी व महंम्मद तुघलक या सुलतानांनी मात्र भूमी कर वाढवून उत्पन्नाचा अर्धा भाग केला. खस्म - ही युद्धाच्या वेळी लूटीत मिळालेली संपत्ती असे. या लुटीचा एक पंचपांश भाग सुलतानास आणि चार पंचपांश भाग सैनिकास दिला जात असे. [६]

२.खिराज - हा हिंदू जमीनदाराकडून घेतला जाणारा कर होता तो उत्पन्नाच्या अर्धा भाग असे.

३.जकात -जकात हा एक धार्मिक कर होता. तो श्रीमंत मुसलमानांकडून त्यांच्या उत्पन्नाच्या अडीच प्रतिशत घेतला जात असे. जमा झालेला पैसा धार्मिक कार्यावर खर्च केला जात असे.

४.शर – कर मुस्लिम जमीनदारांकडून घेतला जात असे. तो उत्पन्नाचा एक दशांश भाग

---

४. मोगलकालीन महसूल पध्दतीः श्री. एन्. ए. सिद्दीकी, अनु. डॉ. प्र. ल. सासवडकर, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, २००६ पान १९. (Mirat-i-Ahmudi: Ali Muhammad Khan, Oriental Institute, Baroda, 3 Vols, 1923.Pg 224, 225)

५. समग्र भारताचा इतिहास : प्रा.य.ना. कदम, फडके प्रकाशन, २००१, पान २१०.

६. मध्यकालीन भारत का इतिहास, (१०००-१५२६): संपादक शिवकुमार गुप्त, पंचशील प्रकाशन, जयपूर, प्रथम संस्करण, १९९९, पान ३१६.

होता.[७] इतर कर म्हणजे चुंगी कर हा पशु, पक्षी, घर आणि व्यापाऱ्यांवर लावला जात असे. जमीन महसूल हा सुलतानाच्या उत्पन्नाचा मोठा स्त्रोत होता. सुलतानशाहीत जमीन चार प्रकारे विभागण्यात आली होती.

१ खालसा प्रदेश.

२ इक्ता - तह हयात किंवा मर्यादित काळासाठी मुक्तींना दान केलेल्या जमीनी.

३ हिंदू सरदारांकडे सोपविलेला प्रदेश.

४ मुस्लिम विद्वान आणि संत फकीर यांना दान केलेल्या जमीनी.

खालसा प्रदेश प्रत्यक्ष सुलतानाच्या नियंत्रणाखाली होता. ज्या प्रदेशाचा महसूल सुलतानाच्या खाजगी कोशामध्ये जमा केला जात असे त्या प्रदेशाला खालसा म्हटले जात असे.[८] याचा दर केंद्रिय सरकारद्वारे निश्चित केला जात असे.[९]

चौधरी किंवा मुकादम यांची नेमणूक महसूल वसूलीसाठी नियुक्त करण्यात आली होती. इक्ता एक प्रकारची मुक्तींना दिलेली जबाबदारी होती. इक्ताची वसूली मुक्ती या अधिकाऱ्यांकडे देण्यात आली होती. मुक्ती सुलतानाला भुमिकर व इतर कर योग्य पद्धतीने वसूल करुन देत असे. प्रत्येक इक्त्यात १ ख्वाजा (लेखनीक) यावर देखरेख ठेवत असे. अल्लाउद्दीनच्या काळात काटेकोरपणे हिशेब पाहिले जात असे. कठोर दंड केले जात असत. अधिकारी वर्गाच्या वारंवार बदल्या केल्या जात असत आणि वेगवेगळया कारणांवरुन इक्ताद्वारे निश्चित केलेला कर वाढविला जात असे. युद्धात जादा खर्च झाला की शेतकऱ्यांवर अधिक कर बसवून तो खर्च भरुन काढला जाई.[१०] अनेक वेळा दुष्काळ, अवर्षण यामुळे पिकांचे नुकसान होत असे. परंतु याकडे सुलतान दुर्लक्ष करीत असे.

अल्लाउद्दीनच्या मृत्यूनंतर घियासुद्दीनने या पद्धतीत थोडासा बदल करुन इक्तदार-मुक्ती व बलि यांच्याकडे इक्ता व विलायत या विभागातून महसूल जमा करण्याची जबाबदारी सोपविली. मुक्ती खल आणि मुकादम यांच्या माध्यमातून महसूल जमा करत असे. केंद्रीय

७. समग्र भारताचा इतिहासः प्रा. य.ना. कदम, फडके प्रकाशन, २००१, पान २१०.

८. सल्तनतकालीन भारत का आर्थिक इतिहासः संपादक डॉ. आर.के. परुथी, अर्जुन पब्लिशींग हाऊस, नई दिल्ली, प्रथम संस्करण, २००५.पृष्ठ१६६. (वह क्षेत्र जिसका राजस्व सीधे सुल्तान के निजी कोष के लिए वसूल किया जाता था, खलिसा कहलाए।)

९. मध्यकालीन भारत का इतिहास, (१०००-१५२६): संपादक शिवकुमार गुप्त, पंचशील प्रकाशन, जयपूर, प्रथम संस्करण, १९९९,पृष्ठ ३१७.(खालसा भूमि से कर वसूल करने की दर केंद्रीय शासनद्वारा निश्चित कीए जाते थी।)

१०. मोघलकालीन भारताचा इतिहासः दिनकर खाबडे, कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद, सप्टेंबर १९९७, पान १७८.

वित्त मंत्रालयाद्वारे एका वर्षासाठी अंदाजीत कर १/१० किंवा १/११ भाग यापेक्षा जास्त होऊ दिला जात नसे.[११] प्रत्यक्ष उत्पन्न किती झाले यावर महसूल वसूल करण्यासंबंधीचे अधिकार मुकादमांना देण्यात आले. त्यामुळे दुष्काळ, अवर्षण अशा नैसर्गिक आपत्तीमुळे उत्पादन कमी झाले असल्यास कर वसुलीत सुट मिळू लागली. तसेच त्याने हिंदूंनाही जाचक कर लादले नव्हते. याने १ बैल जोडी, २ म्हैशी, १० मेंढया या प्राण्यांना त्यांच्या मालकांना सांभाळण्याची सूट दिली होती. [१२]

महंमद तुघलक (१३२५-५१) याच्या काळात केंद्रीय हस्तक्षेप मोठया प्रमाणात वाढला होता. याने वली आणि अमीर या अधिकाऱ्यांची नियुक्ती केली होती. वली याने महसूल जमा करण्याचे काम करायचे, आणि आपले वेतन त्यातून काढून उरलेली रक्कम सरकारकडे जमा करायची अशी पद्धत प्रचलित होती.[१३] महंमद तुघलकाने दिल्लीनजीक असलेल्या सुपीक भागात, दोआबमध्ये करांचे प्रमाण वाढविण्याचा प्रयत्न केला.[१४] परंतु या भागातील लोकांना हे डोईजड कर देणे शक्य नसल्याने ते आपल्या भागातून जंगलात पळून गेले. सैनिकांनी जंगलात व इतरत्र पळून गेलेल्या लोकांना बरोबर टिपले. पण एवढे करुनही खजिन्यात फारशी वाढ झाली नाही. शेवटी महंमदला चूक लक्षात आल्याने त्याने शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी सवलती दिल्या. विहीरी खणल्या व पडीक जमीनी शासनातर्फे लागवडीखाली आणल्या. अशा उपाययोजना करुन नंतर परिस्थिती सावरण्याचा प्रयत्न केला.

फिरोझ तुघलकाने धरणे व कालवे बांधून जमीन उत्पादन वाढविण्याचा प्रयत्न केला. त्यासाठी त्याने पाणीपट्टी बसविली आणि उत्पन्नाच्या १/१० करवसुली सुरु केली. त्याच्या कर विषयक धोरणात दोन मुख्य त्रुटी होत्या. त्याने त्याच्या प्रांतातील शेतीतील कर वसूल करण्यासाठी निर्माण केलेली व्यवस्था पूर्णतः स्थानिक व्यवस्थेकडे सुपुर्द केली आणि नेमणूक योजनेमुळे राज्याचे नुकसान झाले. एकूणच सुलतानशाहीत जमीन महसूल वाढविण्याचे प्रयत्न झाले तरी त्यात सातत्य नव्हते, तसेच योग्य अशा सुधारणाही या काळात केल्या गेल्या नव्हत्या. त्यामुळे जमीन महसूलातून शाही खजिन्यात नियमितपणे भर पडत नव्हती.

---

११. सल्तनतकालीन भारत का आर्थिक इतिहासः संपादक डॉ. आर.के. परुथी, अर्जुन पब्लिशींग हाऊस, नई दिल्ली, प्रथम संस्करण, २००५, पृष्ठ १६७.(केंद्रीय वित्त मंत्रालयद्वारा अनुमानित राजस्व आय में वृद्धि, एक वर्ष के लिए, १/१० वा या १/११ वा भाग से अधिक नहीं हो सकती थी।)

१२. History of Indian Administration Vol. 3: B.N.Puri,Bhartiya Vidya Bhavan, Bombay I[ed] Pg.71.

१३. सल्तनतकालीन भारत का आर्थिक इतिहास : सम्पादक. डॉ. आर.के. परुथी, अर्जुन पब्लिशिंग हाऊस, नई दिल्ली, प्रथम संस्करण, २००५, पृष्ठ १७०.

१४. History of Indian Administration Vol 3: B.N.Puri, Bhartiya Vidya Bhavan,Bombay I[ed],Pg.79.

**<u>शेरशहा</u> (१५४०-४५)** शेरशहा हा मोगलकाळातील अफगाण-पठाण वंशीय सुलतान होता. हूमायूनच्या काळातच त्याने सत्ता प्रस्थापित केली होती. तो जसा उत्तम सेनापती होता तसा उत्तम प्रशासकसुद्धा होता. म्हणूनच त्याने जमिन महसूलाची व्यवस्था अत्यंत काटेकोरपणे लावली. याच्या काळात प्रजा आणि बादशहा यांच्यातील संबंधात पध्दतशीरपणा आला.[१५] शेरशहाचे साम्राज्य पूर्वेकडे सोनार गावापासून पश्चिमेकडे सिंधू नदीपर्यंत आणि उत्तरेकडे हिमालयापासून दक्षिणेकडे विंध्य पर्वतापर्यंत पसरले होते.[१६] काश्मीर, गुजरात आणि आसाम सोडून हिंदुस्थानच्या उत्तरेकडील सर्व भागांचा समावेश होता. याच्या काळात प्रजा आणि बादशहा यांच्यातील संबंधात पध्दतशीरपणा आला.

**प्रांतिक प्रशासन व्यवस्था -** शेरशहाच्या प्रांतिक प्रशासन व्यवस्थेबद्दल डॉ. कानुगो म्हणतात, 'शेरशहाचे साम्राज्य प्रांतामध्ये विभागले नव्हते. सरकार हा त्याच्या साम्राज्यातील मोठा विभाग होता. या विभागाला ते जिल्हा मानतात. [१७] पण डॉ. शरण यांच्या मते, 'प्रांत हा विभाग अकबरापूर्वीपासून अस्तित्वात होता व त्या प्रांतावर शेरशहाने सुभेदार नेमले होते.'[१८] शेरशहाच्या एकूण राज्यव्यवस्थेचा निष्कर्ष काढला तर प्रांत आणि सरकार अशा दोन्ही प्रकारची प्रशासन व्यवस्था असावी असे वाटते. विभाग छोटा असेल तर उदा. पंजाब, माळवा, अजमेर अशा ठिकाणांना केवळ प्रांत मानले जाई. त्याची सरकारमध्ये विभागणी केलेली नसावी व मोठा विभाग, प्रांत असेल तर त्याची सरकारमध्ये विभागणी केली जात असे. या शिवाय अंकित राजाचा विभाग वेगळा होता. अंकित राजाकडून दर वर्षी विशिष्ट खंडणी घेऊन तेथील प्रशासन व्यवस्थेची जबाबदारी त्याच्याकडेच सोपविली जाई. शेरशहाने बदली पध्दतीचाही वापर करुन शासकीय अधिकाऱ्यांची २-३ वर्षांनी बदली केलेली दिसते.[१९]

सरकार - शेरशहाने प्रांताचे विभाजन सरकारमध्ये केले होते. त्याच्या साम्राज्यात एकूण ४७ सरकार होते. सरकारचे प्रमुख अधिकारी शिकदार आणि मुन्सिफ हे होते. जमीन महसूल <u>गोळा करण्याचे काम मुन्सिफला करावे लागत असे.</u>

१५. "Sher Shah of Sur",Encyclopedia BritannicaE.B. Ultimate Refernce Suit, Chicago, 2010.(For the first time during the Isamic conquest the relationship between the people and the ruler was systematized with little oppression or corruption.)
१६. मोगलकालीन भारताचा इतिहासः संशोधक मा.म.देशमुख,विश्वभारती प्रकाशन, सिताबर्डी, नागपूर, प्रथमावृत्ती, १९७०.पा.१४७.
१७. Shershah And his Times, Kalika Ranjan Kanungo.
१८. Land Revenue in India, Dr. R.S. Sharma, Motilal Banarasidas Publi.Delhi, 1st ed., 1971, P 28.
१९. "Sher Shah of Sur",Encyclopedia Britannica E.B. Ultimate Reference Suit, Chicago, 2010.(Sher Shah also devised the system of transferring government officers after 2-3 years to prevent undue influence of the officers in oner place.)

परगणा - सरकारची परगण्यांमध्ये विभागणी केलेली होती. तेथे शिकदार, मुन्सिफ व अमीन हे प्रमुख अधिकारी व त्यांच्या मदतीला पोतदार किंवा खजिनदार आणि दोन कारकून असत.

मौजा प्रशासन – प्रत्येक परगण्यांमध्ये अनेक गावांचा समावेश केलेला होता. ग्राम हा प्रशासन व्यवस्थेतील सर्वात लहान व शेवटचा राजकीय घटक होय. मुकादम किंवा पाटील व चौकीदार किंवा कोतवाल हे गावाचे प्रमुख अधिकारी होते.

**जमिन महसूल व्यवस्था** – जमीन महसूलाचे उत्पन्न राज्यात महत्त्वाचे असते. जमीन महसूलावरच राज्याच्या तिजोरीचे भवितव्य ठरत असते आणि ते उत्पन्न प्रामुख्याने शेतकऱ्यांकडून येत असते. म्हणून शेतकऱ्यांचे सामर्थ्य लक्षात घेऊन शेतसारा आकारला जावा असे शेरशहाला वाटत असे. शेतकऱ्यांवर त्यांच्या कुवतीपेक्षा अधिक कर बसविणे हे त्याला मान्य नव्हते.शेतकऱ्यांनी महसूल टप्प्याने भरण्याची सुविधाही शेरशहाने दिली होती.[२०]

शेतकऱ्यांच्या परिस्थितीकडे शेरशहाचे बारकाईने लक्ष होते. प्रजा सुखी तर राज्य सुखी अशी त्याची भावना होती.[२१] हस्त-ओ-बुद, कानकुट, नसक, पेरणी क्षमता, नांगर पद्धत या जमिन महसूलाच्या पद्धती शेरशहाच्या आधीच्या कर पद्धती होत्या. [२२] म्हणून त्याने महसूलाची नवी व्यवस्था केली. शेरशहाने झब्त ही अतिशय शास्त्रबद्ध असलेली व जमीनीच्या मोजमापाला महत्व देणारी पद्धत प्रचलित केली होती. त्याने आपल्या साम्राज्यातील सर्व जमीनींचे शिकंदरी यार्डाच्या सहाय्याने मापन केले. [२३] बिघा हे त्या काळाचे सर्वसामान्य प्रमाण ठरविण्यात आले. एक बिघा म्हणजे ३६०० चौरस शिकंदरी यार्ड होय. भूमापनानंतर सर्व जमीनींची रजिस्टरमध्ये नोंदणी होत असे.

जमीनीच्या सुपिकतेनुसार जमीनीची चार भागात विभागणी –

१. लागवडीखाली असलेली उत्तम जमीन - होलज
२. थोडया काळासाठी पडीक असलेली जमीन – परोती.
३. तीन ते चार वर्षे पडीक राहिल्यास तिला चाचर म्हणत.
४. पाच वर्षापेक्षा अधिक काळ पडीक असलेली बंजर.

---

२०. "Sher Shah of Sur",Encyclopedia Britannica E.B. Ultimate Refernace Suit, Chicago, 2010.(The peasants given the facility to pay their revenue in installment in a year according to crop seasons.)
२१. मोघलकालीन भारताचा इतिहासःप्रा.दिनकर खाबडे,कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद, १९९७,पान १८०.
२२. Land Revenue in India : Prof.R.S. Sharma, Motilal Banarasidas Publi.,Delhi, 1st ed., 1971. P 35.
२३. मुघल भारत :प्रा. य.ना. कदम, डॉ. प्र.न.देशपांडे, प्रा. श्या.र. कायंदे, मेहता पब्लिशिंग,पुणे, प्रथमावृत्ती,१९७९-८०,पान ११८.

यांचे पुन्हा उत्तम, मध्यम, कनिष्ठ असे ३ प्रकारात वर्गीकरण केले जात असे. त्यांचे प्रतिबिघा उत्पन्न निश्चित करण्यात आले. जमीनीतून निघणाऱ्या धान्याची प्रतवार सुचीही करण्यात येई. निघणाऱ्या एकंदर उत्पन्नाच्या आधारे प्रत्येक बिघ्यातून निघणारे सरासरी उत्पन्न काढण्यात येत असे. त्यानंतर महसूल ठरविण्यात येत असे. राज्याला द्यावयाचा हिस्सा निश्चित झाला म्हणजे ती रक्कम दर्शविणारा 'पट्टा' शेतकऱ्यांना सरकार मार्फत देण्यात येत असे. शेतकऱ्यांना कबुलीयात शेतकऱ्याच्या सहीसह दिला जात असे.

**कराचे प्रमाण -** उत्पन्नाचा १/३ भाग सरासरी हिस्सा ठरविण्यात आला. हा कर नगद अथवा धान्याच्या स्वरुपात घेतला जाई. शेतकऱ्यांना जमिन सोपविताना त्यांच्याकडून महसूलासंबंधी करार पत्र करवून घेतले जात होते. शेरशहाच्या साम्राज्यात जमिन महसूलाची ही पद्धत, कराचे प्रमाण सर्वच ठिकाणी सारखेच नव्हते. त्यात प्रदेशानुसार भिन्नता नव्हती. जमिनीच्या एकूण उत्पन्नाच्या एक चतुर्थांश भाग शेतसारा म्हणून घेण्यात येत असे. शेतकऱ्याने दिलेल्या शेतसाऱ्याची त्याला पावती दिली जात असे.

जमिन महसूलाच्या तीन पद्धती शेरशहाने अंमलात आणल्या. [२४]

पहिली पद्धती बटाई याचे तीन प्रकार होते.

१. खेत बटाई म्हणजे शेतात पेरणी झाल्यावर किंवा उभे पिक शेतात असताना शेतकरी व शासन यांच्यात हिस्से वाटप होत असे.

२. लंक बटाई म्हणजे शेतातील पिक खळयात आणल्या नंतरची हिस्सेवाटणी.

३. रास बटाई म्हणजे धान्य साफ केल्यानंतर होणारी वाटणी.

दुसरी पद्धती नश्क अथवा कानकुट होती. त्यात जमिनीचे उत्पन्न ढोबळमानाने लक्षात घेऊन त्यानुसार शेतसारा आकारला जाई. [२५] या पद्धतीत जमिनीचे मोजणीचे कार्य हाती घेतले जात असे. काही निवडक शेतामधील उत्पन्नाचा अंदाज घेतला जाई व त्या जमिनीच्या तुकडयांचा पिकांचा दर निश्चित केल्यानंतर तो सर्व क्षेत्राला लागू केला जात असे. सर्व उत्पन्न सरकार व शेतकरी अशा दोन हिस्स्यात विभागली जाई. या सरकारी हिस्यांचे रोख

---

२४. मध्ययुगीन भारत (सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक इतिहास): प्रा.गजानन भिडे, डॉ. सौ. वैजयंती नाईकनवरे, डॉ. विजय नलावडे, फडके प्रकाशन, कोल्हापूर, द्वितीयावृत्ती, सप्टेंबर २००२, पान १११.

२५. मुघल भारत : प्रा. य.ना. कदम,डॉ.प्र.न.देशपांडे, प्रा.श्या.र.कायंदे, मेहता पब्लिशिंग, पुणे, प्रथमावृत्ती,१९७९-८०, पान ६४.

रकमेत रुपांतर केले जाई. यात पिकाला नुकसान झाल्यास शेतकऱ्यांच्या होणाऱ्या तोटयांमध्ये शासनही सहभागी होत असे. [२६]

जमीन महसूलाची तिसरी पद्धत जब्त किंवा झब्त ही होती. सर्व पद्धतीत शेतकऱ्यांना झब्त पद्धतीच जास्त पसंद होती. जमीन महसूलाशिवाय शेतकऱ्याला जमीन मोजणी शुल्क द्यावे लागत होते. यालाच जरीबाना कर म्हटले जाई. त्याचे प्रमाण महसूलाच्या २ १/२ ते ५ टक्के होते.[२७] प्रत्यक्ष शेतीची मोजणी व मोजमापावर आधारीत जमिन महसूलाची रोख रकमेत आकारणी निश्चित करणे ही झब्त पद्धतीची वैशिष्टये. यात शेतकरी, सरकार किंवा जमीनदारांशी करार करीत असे. जमीनीची प्रत व स्थान यावरुन ३ किंवा त्यापेक्षा जास्त वर्षाच्या एकूण उत्पन्नाच्या सरासरीवरुन महसूल ठरविण्यात येत असे.[२८] यात जमिनीची मोजणी करण्यासाठी सिकंदरी यार्ड वापरला जात असे.

साम्राज्याच्या विभागात हा यार्ड वापरला जात असे.

**शेरशहाच्या जमीन महसूल पद्धतीची वैशिष्ठये-**

१. शेतसारा निश्चित ठरविला गेल्यामुळे शेतकरी निर्धास्त झाला होता. जरुरीच्या वेळी सरकारकडून मिळणाऱ्या मदतीमुळे शेतीचे उत्पन्न वाढले.
२. शेतकऱ्यांच्या अडीअडचणींकडे शेरशहाने पूर्ण लक्ष दिले. शेतकऱ्यांशी नम्र व्यवहार करावा अशा त्याच्या अधिकाऱ्यांना सूचना होत्या. त्यांच्याबरोबर दुर्व्यवहार करणाऱ्याला दंड केला जाई. सरकार व रयत यांच्यात प्रत्यक्ष संबंध प्रस्थापित झाल्याने जमिनदार, जहागिरदार यांच्याकडून होणारी शेतकऱ्यांची पिळवणूक कमी होण्यास मदत झाली.
३. सैनिकांतर्फे पिकाला नुकसान पाहोचले तर शेरशहा त्याची भरपाई करुन देत होता.
४. नैसर्गिक व इतर आपत्तीस तोंड देण्यासाठी उपाययोजना म्हणून 'दाह अस्तरी' कर आकारण्यात येई. प्रत्येक शेतकरी प्रती बिघा सात छटाक धान्य देत असे. [२९] हे धान्य दुष्काळात सरकारी गोदामातून स्वस्त दरात विकण्यात येत असे.

---

२६. मध्ययुगीन भारत (सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक इतिहास): प्रा.गजानन भिडे, डॉ. सौ. वैजयंती नाईकनवरे, डॉ. विजय नलावडे, फडके प्रकाशन, कोल्हापूर, द्वितीयावृत्ती, सप्टेंबर २००२, पान ११९.
२७. भारताचा इतिहास (१५२६-१९४७): प्रा. नी.सी. दिक्षित, पिंपळापुरे प्रकाशन, नागपूर, जून २००४. पान
२८. मुघल भारत (१५२६-१७०७): प्रा. य.ना. कदम, डॉ. प्र.न. देशपांडे, प्रा. श्या.र. कायंदे, मेहता पब्लिशिंग, पुणे, प्रथमावृत्ती, १९७९-८०, पान ६२. मोगलकालीन भारताचा इतिहास : मा.म. देशमुख, विश्वभारती प्रकाशन, सिताबर्डी नागपूर, प्रथमावृत्ती, १९७०, पान ४७.
२९. मोगलकालीन भारताचा इतिहासः संशोधक मा.म. देशमुख, विश्वभारती प्रकाशन, सिताबर्डी, नागपूर, प्रथमावृत्ती, १९७०,पान९७.

५. 'दाह अस्तरी' व जरीबाना कर आणि १/३ महसूल वसूल करण्यामुळे शेतकऱ्यांना जड जात असे. असे कर घेणे शेरशहासारख्या शेतकऱ्यांच्या हितचिंतकास शोभत नाही.

६. महसूल विभागातील भ्रष्टाचार पूर्णपणे नष्ट झालेला नसल्याने शेतकऱ्यांची पिळवणूक थांबली नव्हती. अधिकाऱ्यांच्या बदल्या २-३ वर्षांनी होत असत. एकूणच शेतकऱ्यांना जास्त कर द्यावा लागत होता. तरीही इतर शासकांच्या तुलनेत शेरशहाच्या कारकिर्दीत शेतकऱ्यांना फारसा त्रास नव्हता.

भारतात मोगल राजवटीमुळे केंद्रीय शासन व्यवस्था दृढ झालेली दिसते. त्याची प्रशासकीय रचना पुढीलप्रमाणे होती.

**अ) <u>केंद्रीय स्तर</u>-**

सम्राट - मोगल साम्राज्याची संपूर्ण सत्ता सम्राटाच्या हाती एकवटलेली होती. तो प्रशासनप्रमुख होता. तसेच लष्कर व न्यायप्रमुख ही होता. यासंबंधी इतिहासकार सरकार म्हणतात. "Muslim State was essentially a military state and depended for its existence on the absolute authority of the monarch. Who was also its supreme general" [३०] मात्र इस्लाम धर्मानुसार सम्राटाने कुराणाचे उल्लंघन केल्यास त्याला काढून टाकण्याचा अधिकार उलेमांना होता. पण मोगल सम्राट इतके शक्तीशाली होते की, त्यांना हात लावण्याची कोणाचीही हिंमत नव्हती.

**मंत्री** - सम्राटाला राज्यकारभारात मदत करण्यासाठी वेगवेगळे मंत्री विभाग होते. मंत्री सम्राटाला सल्ला देत असले तरी सम्राटावर ते बंधनकारक नव्हते. मोगलकाळात मंत्र्यांची संख्या ४ पासून ८ पर्यंत होती. [३१]

**वजीर** - हयालाच वेगवेगळया काळात वकिल, प्रधानमंत्री असे म्हणत. अर्थविभाग त्यांच्याचकडे असल्याने तो साम्राज्याचा दिवाणही होता. संपूर्ण प्रशासनाचा प्रमुख वजीर असून सम्राटाला सल्ला देणे त्याचे महत्वपुर्ण कार्य होते. वजीर म्हणजे सम्राट व इतर मंत्री यांच्यातील दुवा होता. सम्राटाच्या अनुपस्थितीत किंवा सम्राट अल्पवयीन असल्यास

---

३०. मुगल ॲडमिनिस्ट्रेशन(सरकारचे ॲडमिनिस्ट्रेशन)ः जदुनाथ सरकार, कलकत्ता, १९५२, मोगलकालीन भारताचा इतिहासः संशोधक मा.म. देशमुख, विश्वभारती प्रकाशन, सीताबर्डी, नागपूर, प्रथमावृत्ती १९७०, पान १८२, मुघल भारत (१५२६-१७०७) :प्रा. य.ना. कदम, डॉ. प्र.न. देशपांडे, प्रा. श्या.र. कायंदे, मेहता पब्लिशिंग, पुणे, प्रथमावृत्ती १९७९-८०, पान १२०.

३१. मोगलकालीन भारताचा इतिहासः संशोधक मा.म. देशमुख, विश्वभारती प्रकाशन, सिताबर्डी, नागपूर, प्रथमावृत्ती, १९७०, पान १०२.

राज्यकारभाराची सुत्रे वजीराकडे राहत होती. साम्राज्यातील संपूर्ण जमाखर्चाची कागदपत्रे त्याच्याकडे येत. खर्च संमत करणे, खजिन्यावर नियंत्रण ठेवणे, कर वसूली संबंधी निर्णय देणे ही कामे वजीराकडे होती. त्याच बरोबर सैन्याधिकाऱ्यांची नियुक्ती व बढती हे अत्यंत महत्वाचे कार्य वजीराचे होते.

१. मीरबक्षी - हा संपूर्ण साम्राज्याचा सेनापती होता. त्या नात्याने महत्वाच्या लष्करी मोहिमांचे संचलन करणे, लष्करावर नियंत्रण ठेवणे, मनसबदारांच्या सैन्याचे निरिक्षण करणे, त्यांना वेतन संमत करणे, इ. कामे त्याची होती.

२. खान-इ-सामान - सम्राटाच्या व्यक्तिगत प्रबंधासाठी हा मंत्री होता. सम्राटाचे खासगी नोकर, दास, सम्राटाचे भोजन, शाही इमारती, कारखाने इ. वर त्याचे नियंत्रण होते.

३. मुख्य काजी - साम्राज्याचा सर्वोच्च न्यायाधीश सम्राट होता. त्या खालोखाल मुख्य काजी होता. इस्लाम कायद्यानुसार धर्मासंबंधी खटल्याची सुनावणी हे त्याचे कार्य होते.

४. सदरुस सद्र - हा धर्मादाय विभागाचा प्रमुख होता. धार्मिक संपत्ती त्याच्याच ताब्यात असून तो दानधर्माकडे लक्ष ठेवित असे. सम्राट साधूसंत, उलेमा, विद्वान हयांच्यासाठी जमीन अथवा संपत्ती वेगळी काढून ठेवित असे.

५. मुहतसिब - हया मंत्र्याला जनतेचा सदाचार निरिक्षक असे म्हणत. समाजातील नीतीमत्तेचा दर्जा राखण्याचे कार्य याच्याकडे सोपविण्यात आले होते. [३२]

६. मीर आतिश - हा तोफखान्याचा मुख्य अधिकारी होता. तोफखान्याची व्यवस्था पाहणे, शाही किल्ल्यांची प्रबंध व्यवस्था ठेवणे त्याचे कार्य होते.

७. दरोगा-ए-डाकचौकी - याच्या हाताखाली अनेक समाचार लेखक, गुप्तहेर संवादवाहक असून त्यांची नियुक्ती संपूर्ण साम्राज्यात केली जाई.

**ब) <u>प्रांतीय शासन</u> –**राज्यकारभाराच्या दृष्टीने साम्राज्याचे जे विभाग होते त्यांना सुभा म्हणत. अकबराच्या कारकिर्दीत सुभ्यांची संख्या १५ तर औरंगजेबाच्या कारकिर्दीत २१ होती. (काबूल, काश्मीर, लाहोर, मुल्तान, ठठ्ठा, गुजरात, दिल्ली, आग्रा, अजमेर, माळवा, अवध, अलाहाबाद, बिहार, ओरिसा, बंगाल, खानदेश, वऱ्हाड, औरंगाबाद, बीदर, विजापूर, हैद्राबाद) त्यावरील मुख्य अधिकारी म्हणजे राज्यपाल होय. अकबराच्या वेळेस त्याला

---

३२. मुघल भारत (१५२६-१७०७) : प्रा. य.ना. कदम, डॉ. प्र.न. देशपांडे, प्रा.श्या.र. कायंदे, मेहता पब्लिशिंग, पुणे, प्रथमावृत्ती १९७९-८०, पान ३३५.

सिपहसालार आणि नंतरच्या काळात नाजिम किंवा सुभेदार म्हणत. प्रांतिय शासन त्याच्या ताब्यात असल्याने हया पदावर सम्राट अत्यंत विश्वासू व्यक्तिचीच निवड करीत असे. प्रांतात शांतता व सुव्यवस्था ठेवणे हे मुख्य कार्य त्याबरोबर कर वसूलीचे काम सुभेदाराचे होते.

**क) जिल्हा प्रशासन –** प्रांतापेक्षा लहान असलेल्या विभागांना जिल्हा किंवा सरकार म्हणत. त्याचा प्रमुख फौजदार होता. तो सुभेदाराच्या आज्ञेनुसार काम करित असे. जिल्हयात शांतता व सुव्यवस्था ठेवणे, जमिनदारांवर नियंत्रण ठेवणे, आपल्या प्रदेशातील चोर, लुटारुंचा बंदोबस्त करणे, शाही आदेशांचे पालन करवून घेणे ही फौजदारांची कर्तव्ये होती. त्याच्या हाताखाली सैन्यदल राहत होते. जिल्हयाचा प्रमुख महसूल अधिकारी अमील होता. The Chief revenue officer of a district under the Mughals was called an amil or amalgauzar. [३३]

**ड) परगणा –**

जिल्हयापेक्षा लहान भागांना परगणा किंवा महाल असे नाव होते. तेथे शिकदार, अमील, अमीन, पोतदार व बितिक्ची असे अधिकारी होते. परगण्याचा प्रमुख शिकदार असून आपल्या प्रदेशात शांतता व सुव्यवस्था राखणे हे त्याचे कर्तव्य होते. त्याच्या नियंत्रणाखाली काही सैन्यदल असे. शिकदाराला फौजदारी अधिकारही होते. कर लावणे व कर वसूली हयासाठी अमिल होता. अमीनाकडे जमीनीचा प्रबंध होता. पोतदार हा अधिकारी म्हणजे परगण्याचा खजिनदार होता. बितिक्ची म्हणजे हिशोब लिहिणारा, लेखनकार्य करणारा होता. [३४]

**प) नगर प्रशासन –**

नगराच्या प्रशासन व्यवस्थेचा प्रमुख म्हणजे कोतवाल होय. एक प्रकारे हा आजचा जिल्हा पोलिस अधिकारी होय. त्याची नियुक्ती थेट बादशहाकडून होत असे. नगर संरक्षणाची व्यवस्था करणे, बाजारावर नियंत्रण ठेवणे, बेवारस संपत्तीची देखभाल करणे, गुन्हे नियंत्रित करणे, जनतेला अनैतिक कृत्यांपासून रोखणे, सामाजिक दुर्व्यवहार थांबविणे इ. कामे कोतवालाकडे होती. त्यासाठी त्याच्या ताब्यात घोडदळ, पायदळ, व स्वतंत्र पोलिस खाते होते. नगरांचे विभाग होते व त्या प्रत्येकावर एकेक अधिकारी नियुक्त केला जाई. आपल्या

३३. मोगलकालीन भारताचा इतिहासः संशोधक मा.म. देशमुख, विश्वभारती प्रकाशन, सिताबर्डी, नागपूर, प्रथमावृत्ती, १९७०, पान १०२.

३४. मुघल भारत (१५२६-१७०७) : प्रा. य.ना. कदम, डॉ. प्र.न. देशपांडे, प्रा.श्या.र.कायंदे, मेहता पब्लिशिंग, पुणे, प्रथमावृत्ती १९७९-८०, पान ३३५.Administrative History of India (1834-1947):Prof.B.B. Mishra,Oxford University Press, 1970. pg79.

विभागातील नागरीकांची माहिती कागदोपत्री ठेवणे त्याचे काम होते. शिवाय नगरात गुप्तहेर फिरत असत. येणाऱ्या जाणाऱ्यांवर नजर ठेवणे, धर्मशाळांवर लक्ष ठेवणे, नर्तकी, मादक वस्तूंचे विक्रेते यांच्या हालचालींवर लक्ष देणे हे गुप्त हेराचे कार्य होते.

**अकबराची शासनपद्धती –** डॉ. ईश्वरीप्रसाद म्हणतात, "Akabers accession to the throne marked a new era in the history of administrative reform. Like everything else the revenue department also felt a master's touch."

जमीन महसूलाच्या बाबतीत अकबराने पुष्कळसे शेरशहाचे अनुकरण केले. शेरशहाच्या पद्धतीमधील दोष काढून टाकून या काळात नवीन कर व्यवस्था निर्माण करण्यात आली. सारा आकारणी व सारा गोळा करणे यांच्या पद्धतीत सुधारणा करण्यासाठी अकबराने अविरत प्रयत्न केले. जमीन महसूल विभागाचे कार्य सुरळीत चालावे म्हणून योग्य ती कारभारविषयक यंत्रणा निर्माण करणे व प्रगत करण्याकडेही त्याने तितकेच लक्ष दिले. प्रांतांची पुनर्घटना, विजारत किंवा महसूल मंत्रालय हे वेगळे मंत्रालय आणि प्रांतीय दिवाण[३५] हा वजीराचा प्रत्यक्ष प्रतिनिधी म्हणून हया अधिकारपदाची निर्मिती करणे. ही जमीन महसूल पद्धतीला मिळालेली अकबराची मौलिक देणगी मानली जाते.

अकबराने इ.स.१५८२ मध्ये महसूलाची नियोजन पद्धती लागू करण्याची जबाबदारी तोडरमलवर सोपविली. तोडरमलच्या सुधारलेल्या महसूल पद्धतीला तोडरमल बंदोबस्त किंवा रयतवारी पद्धती असे म्हणतात. तोडरमलच्या कार्याबाबत लेनपूल म्हणतो, "There is no name in mediavel history more renowned in India to the present day than that of Todarmal and the reason is that nothing in Akbars reforms more nearly touched the welfare of the people than the great fonancies reconstruction of the revenue system."[३६] अकबराच्या २७व्या राज्यारोहणाच्या वर्षापर्यंत नियम होता की जहागीरदाराने जमिन महसूल व इतर कर दस्तूर (विविध प्रकारच्या धान्याच्या किंमतीची किंवा दराची

---

३५. मोगलकालीन महसूल पध्दतीः श्री. एन्.ए. सिद्दीकी, अनु. डॉ. प्र. ल. सासवडकर, डायमंड पब्लिकेशन्स,पुणे, २००६ पान ६२."Central Structure of the Mughal Empire:Ibn-i-Hasan, London, 1936,P 56. (दिवाण या संज्ञेच्या संबंधी श्री इब्न-इ-हसन म्हणतात, मोगलांच्या अंमलात तिचा वापर निश्चित असून महसूल व अर्थ यांच्या प्रमुखापूर्ता तरी मर्यादित असे. अकबराच्या कारकिर्दीत वजीर शब्दाचा उपयोग अधिकारासाठी क्वचित होई. तर दिवाण हा शब्द अधिक प्रचारात होता. जहांगीरच्या कारकिर्दीत ही पद्धत बरोबर उलट होती,वजीर हा शब्द अधीक वापरला जाई आणि शहाजहानच्या कारकिर्दीत या शब्दाला निश्चित अर्थ आला. वजीराला दिवाण-इ-कुल/मुख्यदिवाण/आणि त्याच्या खात्यातील इतर सहकाऱ्यांना दिवाण मानत.)

३६. मोगलकालीन महसूल पद्धतीः डॉ. प्र.ल. सासवडकर, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, प्रथमावृत्ती, २००६, पान ३८०.(Mediaeval India : Lane Pool)

कोष्टके तयार करण्यात येत. त्याला दस्तूर म्हटले जाई.) प्रमाणे गोळा करावेत. [३७]

बहुसंख्य प्रदेशात जमीनदार जमीनींच्या प्रमुखांचे किंवा इतर स्थानिक असामींचे अस्तित्व महत्वाचे होते. त्यांचे अस्तित्व हा या प्रदेशाच्या महसूल व्यवस्थेतील एक निर्णायक घटक होता आणि त्यांना महसूलाची एकूण रक्कम गोळाबेरजेने वसूल करण्याची आणि काही ठिकाणी अकबराच्या महसूल पद्धतीतील दरापेक्षा कमी दराने महसूल घेण्याची त्यांना परवानगी देण्यात आली होती.

**अकबराच्या साम्राज्याची विभागणी** -बंगालपासून काबूल कंदाहारपर्यंत आणि हिमालयापासून दक्षिणेत गोदावरीपर्यंत अकबराच्या साम्राज्याचा विस्तार झाला होता. १६०५ मध्ये त्याच्या साम्राज्यात काबूल, मुलतान, लाहोर, दिल्ली, आग्रा, अवध, अलाहाबाद, बिहार, बंगाल, अहमदनगर, विदर्भ खान्देश, माळवा, गुजरात आणि अजमेर हे प्रमुख १५ सुभे होते. अकबराच्या संपूर्ण साम्राज्यात सर्वत्र एकसारखी कर पद्धती नव्हती. अकबराच्या शासनाचा आराखडा पुढीलप्रमाणे होता.

**साम्राज्याची विभागणी –** प्रांतांमध्ये (सुभा) प्रांतांची जिल्हयांमध्ये (सरकार) आणि जिल्हयाची विभागणी उपविभागांमध्ये (महाल) केलेली होती. [३८] शेवटचा उपविभाग किंवा महाल हा परगणा म्हणून ओळखला जाणाऱ्या पूर्व प्रस्थापित स्थानिक प्रदेशाइतका होता. अकबराच्या कारकिर्दीत सुभ्यांची संख्या १५ तर, महाल आणि सरकार यांची संख्या १३४ ते १९२ पर्यंत, परगण्यांची संख्या २८७४ ते ४१५२ पर्यंत होती.[३९]

अकबराच्या राज्यात दोन प्रकारच्या जमीनी होत्या. एक खालसा व दुसरी जहागीर यातील खालसा जमीन पूर्णतः बादशहाच्या मालकीची असून त्यापासून येणारा महसूल केंद्रीय कोशात जमा होईल. जहागीर जमीन मात्र बहुतांश जमीन असल्याने सम्राटाच्या सरळ नियंत्रणाखाली नसल्याने त्याच्या महसूलाचा काही हिस्सा राज्याच्या कोशामध्ये जमा होत असे. त्यामुळे राज्याचे एकूण उत्पन्न फारच कमी होते. शाही नोकरीत जहागीरदाराला निश्चित स्थान असे आणि त्याला त्याच्या दर्जाचा पगार देण्यासाठी नेमून दिलेला पैसा गोळा

३७. मोगलकालीन महसूल पद्धतीः डॉ. प्र.ल. सासवडकर, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, प्रथमावृत्ती, २००६, पान १२५. (अकरबरनामा, भाग ३, Abul Fazl, Bibilotheca Indica, 3 vols, Calcutta 1873-1887.pg381.)

३८. The Administration of the Mughul Empire: Dr. Ishtiaq Husain Qureshi, N.V. Publication, Lohanipur, Patna, pg.227.

३९. मुघल भारत (१५२६-१७०७) : प्रा. य.ना. कदम, डॉ. प्र.न. देशपांडे, प्रा.श्या.र.कायंदे, मेहता पब्लिशिंग, पुणे, प्रथमावृत्ती १९७९-८०, पान ३३६.

करण्यापूरताच त्याचा अधिकार मर्यादित असे. स्थानिक परिस्थितीला अनुरुप अशा निरनिराळया पद्धती होत्या. एकाच प्रांतात किंबहुना एकाच जिल्हयात निरनिराळया पद्धती अस्तित्वात होत्या. दूरच्या प्रांतामधील उदा. बंगाल, वऱ्हाड, खानदेश आणि सिंध हे प्रांत जेव्हा जिंकले तेव्हा प्रचलित असलेल्या महसूल पद्धतीच कायम ठेवण्यात आल्या. सिंधमध्ये पिकांची प्रत्यक्ष विभागणी पारंपारिक पद्धतीने करण्यात येत होती तर इतर तीन प्रांतात अधिक सोपे आणि अधिक जलद असे पर्याय योजिले आहे. पण त्यांच्या निश्चित स्वरुपाचा उल्लेख कुठेही आढळत नाही.

मुलतान हे बिहार या उत्तरेकडील पठारात तसेच राजपुतांना, माळवा आणि गुजरात या मोठया भागात अकबर आणि तोडरमल यांच्या नावाने ओळखल्या जाणाऱ्या विशिष्ट पद्धतीनुसार महसूल आकारला जात होता. या पद्धतीचे तांत्रिक नाव 'झब्त' असे होते. पण जवळजवळ प्रत्येक प्रांतामध्ये असे काही प्रदेश होते की, जेथे वेगवेगळया पद्धती अस्तित्वात होत्या असे दिसते.

**प्रशासकीय वर्ग -** सुभ्यांवरील मुख्य अधिकारी म्हणजे राज्यपाल होय. अकबराच्या वेळेस त्याला सिपहसालार आणि नंतरच्या काळात नजिम किंवा सुभेदार म्हणत. प्रांतिय शासन त्याच्या ताब्यात आल्याने सम्राट हया पदावर अत्यंत विश्वासू व्यक्तीचीच निवड करीत असे. प्रांतात शांतता व सुव्यवस्था ठेवणे, कायदा व सुव्यवस्था राखणे व कर वसूली करणे इ.मुख्य कार्ये सुभेदाराची होती. [४०] प्रत्येक जिल्हयांतील अंमल गुजार राजस्व वसूल करणारा अधिकारी होता. त्याला मदत करणारा बितीक्ची हा अधिकारी नेमलेला असे. जमिनीचे स्वरुप आणि त्यात निर्माण होणारे पिक यांच्या संबंधातील कागदपत्रे तयार करण्याचे कार्य त्याच्याकडे देण्यात आलेले होते. या कागदपत्रांच्या आधारावरच कर आकारण्यात येत असे. खजिनदार हा राजस्व कर वसूल करुन केंद्रीय कोषागाराकडे पाठविण्याचे महत्त्वाचे कार्य करत असे. प्रत्येक परगण्यामध्ये मुन्सिफ किंवा अमील याच्याकडे राजस्व निश्चित करुन तो वसूल करण्याची जबाबदारी होती. कारकूनाकडे जमिनीच्या मोजणीची नोंद, प्रत्यक्ष पिकांच्या नोंदी, राजस्व आणि त्याच्या वसूलीच्या नोंदी इ. कार्य असे.

अकबराच्या कारकिर्दीत प्रांतीय कारभार पाहण्यासाठी महसूल मंत्रालयाचा प्रत्यक्ष प्रतिनिधी म्हणून दिवाण-इ-सुभा पदाची निर्मिती करण्यात येत असे. याची नेमणूक वजीराच्या

४०. मध्ययुगीन भारताचा बृहत इतिहास : अनु.डॉ.व.तु.देशपांडे,के'सागर पब्लिकेशन, पुणे, प्रथमावृत्ती, २००४. पा. ३८०. (Advanced Study in the History of Medieval India,Vol II,: J.L. Mehta, Sterling Publication, New Delhi, 2001)

शिफारशीने होत असे. प्रांताच्या कारभारावर व आर्थिक बाबींवर याचा अधिकार असे. तसेच परगण्यात सुबत्ता यावी म्हणून जास्तीत जास्त जमीन लागवडीस आणण्यासाठी त्याला उपाययोजना करावी लागे. खजिन्याचे रक्षण व देखरेख हे त्याचे महत्त्वाचे काम होते. दिवाण-इ-सुभालाच अमील आणि करौरी यांना योग्यवेळी पाठवून सारा ठरविणे व महसूल गोळा करणे ही कामे वेळच्यावेळी होतात की नाही यावर देखरेख ठेवावी लागत असे. [४१]

परगण्यातील जमीन महसूल व्यवस्थेचा अमील किंवा अंमल गुजार हा प्रमुख असे. हा सरकारचा मुख्य वसुली अधिकारी असे. सारा आकारणीचे व गोळा करण्याचे प्रमुख काम परगण्यात अमीलच करीत असे. खेडयातील शेतकरी व पाटील यांच्याशी त्याचा प्रत्यक्ष संबंध असे. परगण्याच्या कारभाराकरिता बितिक्ची अंमल गुजारच्या हाताखाली काम करत असे.

**सारा आकारणीची पद्धत** - अकबराच्या राजवटीत एकूण उत्पन्नाच्या १/३ भाग माल (लागवडीस आणलेल्या जमिनीवरील (जमीन महसूलावरील) सारा ठरविण्याच्या पिकांच्या दराच्या पद्धतीला किंवा पैशाच्या दराच्या पद्धतीला 'माल' म्हणत.) म्हणून ठरविला जाई. या मालापेक्षा अधिक उत्पन्नाचा काही भाग वाजहूत (किंवा जिहात) व सैर-जिहात या नावाने गोळा केला जाई. परंतु हा दर फक्त ज्या क्षेत्रात पिकांचा भाव पैशाच्या रुपाने केला जात असे त्या क्षेत्रापुरताच होता. [४२] डॉ. शरण यांचा तर्क आहे की जमिन महसूलाचा म्हणून जो दर शेरशहाचे वेळी १/३ होता तो पुढे न बदलता चालू राहिला.[४३] ज्या क्षेत्रात नसक, (पूर्वीच्या दप्तरावर आधारीत सारा आकारणीची पद्धती) कानकुट (जमिनीची मोजणी व प्रति बिघ्यात किती पिक आले याचा अंदाज करणारी पद्धती), किंवा भावोली म्हणजेच नालाबक्षी अशी पद्धत असे. त्या ठिकाणी जमीनीचा सारा तीन विभागात आकारला जाई किंवा नाही याबद्दलचा पुरावा नाही.

४१. मोगलकालीन महसूल पद्धती, (Land Revenue Administration under the Muhgals- Prof. N.A. Siddiki): अनु.डॉ.प्र.ल. सासवडकर, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, मराठी प्रथमावृत्ती २००६.पान ३८०. (Farhang-i-Kardani: Jagat Rai Shujai, (1090/1679 A.D.) Abdus Salam, Maulana Azad Library, Aligharh. Pg. 28b)

४२. मोगलकालीन महसूल पद्धती, (Land Revenue Administration under the Muhgals- Prof. N.A. Siddiki):अनु.डॉ.प्र.ल. सासवडकर, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, मराठी प्रथमावृत्ती २००६.पान ४१.(ऐन-ए-अकबरी : अबुल फजल, नवल किशोर प्रेस, २ भाग, लखनौ, १८९३, पृ. २०५. मूरलॅडच्या म्हणण्याप्रमाणे अकबराच्या काळात जमीन महसूल मागणी सर्वसाधारणपणे The Agrarian System of Moslem India : W.H. Moreland, Central Book Depo., Allahabad, pg. 135.)

४३. मोगलकालीन महसूल पद्धती, (Land Revenue Administration under the Muhgals- Prof. N.A. Siddiki): अनु.डॉ.प्र.ल.सासवडकर, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, मराठी प्रथमावृत्ती २००६.पान ४१.(The Provinicial Govt. of the Mughals (1526-1558): Dr. R. Saran, Allahabad, Page 397.)

अकबरने तोडरमलला साम्राज्याचा दिवाण बनविल्यानंतर त्याने सर्वप्रथम शेतीयोग्य जमिनीची बांबूच्या साहाय्याने मोजणी केली. मोजण्यासाठी जरीब हे बांबूपासून बनवलेले माप, गज किंवा यार्ड हे मोजमाप वापरण्यात आले. त्याची लांबी ३३ इंच (३६०० चौरस) होती. याला सिकंदरी गज असेही म्हटले जात होते. मोजणीसाठी बिघा हे माप मानक एकक ठरविण्यात आले होते. तोडरमल याने जमीनीची प्रत, उत्पादन क्षमता आणि स्थिती यानुसार जमिनीचे चार भाग पाडले. [४४] —

१. पोलज — दरवर्षी लागवडीखाली येणारी उत्कृष्ट जमीन.

२. परौती — पोलजच्या खालोखाल उत्पन्न देणारी निकृष्ट जमीन.

३. चाचर — एकदा उत्पन्न घेतल्यावर पुन्हा तीन-चार वर्ष उत्पन्न न देणारी निकृष्ट जमीन.

४. बंजर — जी उत्पादनासाठी पाच वर्षांहून अधिक काळ ओसाड असे.

या प्रत्येक प्रकारच्या जमिनीची दहा वर्षांच्या उत्पन्नाची सरासरी काढण्यात आली व त्यावर १/३ कर जमीन महसूल म्हणून लावण्यात आला. यामुळे सरकारला नेमकी किती रक्कम द्यावी लागेल हे शेतकऱ्याला अगोदरच कळत होते आणि वेगवेगळया महसुलाच्या दरांना तसेच इतर परिस्थितीला अनुलक्षून तो पिकांच्या पेरणीची व्यवस्था करु शकत होता.

एकदा हे दर ठरले की, दर हंगामात मशागत केलेल्या जमिनीची मोजणी व नोंद करणे एवढेच काम महसूलाच्या आकारणीसाठी शिल्लक राहत होते. दर आणि जमिनीचे क्षेत्रफळ कळले की प्रत्येक शेतकऱ्याकडून किती सारा वसूल करायचा हे ठरविण्यासाठी अगदी साधा हिशेब करावा लागत होता. स्थानिकरित्या तपासणी करुन एकंदर सरासरी उत्पन्नाच्या एक तृतीयांश किंवा उत्पादनाच्या सरासरी किंमतीवर एकदाच हे दर कायमचे ठरविले जात होते. महसुलाच्या मागणीची वरची पातळी आताच्या मानाने त्यावेळी खूपच जास्त होती. पण इतर बाबतीत झब्तची पद्धती खूप निर्दोष मानता येईल. या पद्धतीच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीतील अडचणी या केवळ ते काम करणाऱ्या नोकरांच्या दर्जामुळे निर्माण झाल्या होत्या. प्रत्येक शेतातील, दर हंगामात झालेल्या, उत्पादनाची नोंद ठेवणे हे कष्टाचे आणि खर्चाचे काम होते. महसुलाच्या भरीला या खर्चाचा बराचसा भार शेतकऱ्यावरच पडला

---

४४. State Taxation in India : Dr. Rajendra Jain, Progress Pub., Bhopal, I[ed]., 1972 , Page 58 .

होता असे दिसते. पण मोजणी करणाऱ्या अधिकाऱ्यांना शेतकऱ्यांची पिळवणूक करण्यास वाव होता, हा या पद्धतीवर खरा आक्षेप होता. त्याशिवाय यापेक्षा वरच्या दर्जाचे अधिकारी शेतकऱ्यांवर आणखी जास्तीच्या रकमा लादणार नव्हते. याबद्दल काहीच शाश्वती नव्हती. अकबराच्या महसूल पद्धतीप्रमाणे जमिनीच्या ठोक उत्पादनाची विभागणी अशी होती. आवश्यक खर्चासाठी १/२ भाग, सरकारी करासाठी १/३ आणि १/६ किंवा त्यापेक्षा थोडे जास्त उत्पादन शेतकऱ्यांच्या सुखसोयीसाठी किंवा प्रतिकूल हंगामासाठी राखून ठेवले जाई.

अकबराने महसूल पद्धतीविषयी दोन सर्वसाधारण तत्वांना महत्त्व दिलेले दिसते. [४५] महसूलाची पद्धत काहीही असली तरी, अधिकाऱ्यांना जमिनीच्या नेमणुका करुन देण्यापेक्षा रोख पगार देण्यात यावा. जेथे शक्य असेल तेथे वैयक्तिक शेतकऱ्यांशी त्यांनी संपर्क साधून व्यवहार करावा. दुष्काळ, पूर आदि नैसर्गिक आपत्तीच्या काळात सरकारकडून खंडमाफीसारख्या सवलती मिळत.[४६] अकबराने शेतकऱ्यांसाठी थोडीशी सूट ठेवली होती ती सरकारी खजिन्यात किंवा अधिकाऱ्यांच्या खिशात गडप झाली होती आणि बहुतांश शेतकऱ्यांना जेमतेम उपजिविका होईल इतकेच उत्पन्न मिळत होते. अकबराने शेतकऱ्याकडून शेतसारा धान्याऐवजी पैशाच्या स्वरुपात घेणे अधिक पसंत केले. यासाठी विविध प्रकारच्या धान्याच्या किंमतीची किंवा दराची कोष्टके तयार करण्यात आली. याला दस्तूर म्हटले जाई.[४७]

पण शेतकरी नगद पैसे देण्यास नाखूष असेल तर धान्यरुपानेही वसुली करावी अशी अमीलला सूचना देण्यात आली होती. तरीही जेव्हा शेतसाऱ्याची मागणी असेल तेव्हा अशी अपेक्षा असे की, शेतकऱ्यांनी तो पैशातच द्यावा आणि त्यांना तसे उत्तेजनही दिले जाई.[४८]अकबराच्या काळातील मोगल साम्राज्यातील एकूण जमा महसूल ५,१३१,३५३,००० दाम होता. [४९]

---

४५. अकबर ते औरंगजेब : अनु. श्री. राजेंद्र बनहट्टी, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, प्रथमावृत्ती, २००६,पान ३१२.(From Akbar To Aurangzeb) W.H. Moorland, Delhi.

४६. मुघल भारत (१५२६-१७०७) : प्रा. य.ना. कदम, डॉ. प्र.न. देशपांडे, प्रा. श्या.र. कायंदे, मेहता पब्लिशिंग, पुणे, प्रथमावृत्ती, १९७९-८०. पान ३४०.

४७. तत्रैव. पान ३४०.

४८. मोगलकालीन महसूल पद्धती, (Land Revenue Administration under the Muhgals- Prof. N.A. Siddiki): अनु.डॉ.प्र.ल. सासवडकर, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, मराठी प्रथमावृत्ती २००६.पान ३८०.(Akbar Nama 1873-1887, 3 vol: Abul Fazl, Bibilotheca Indica, , Calcutta pg 382, 383, Ain-i-Akbari 2 vol, : Abul Fazl, Nawal Kishore Press, Lucknow, 1893 pg. 199, 201; The Agrarian System of Moslem India : W.H. Moreland, Central Book Depo., Allahabad, pg. 114.)

४९. Administration of the Mughal Empire : Ishtiq Husain Qureshi, L.V. Publi.,Lohanipur, Patna, P 155.

**जहांगीर -** अकबराचा तिसऱ्या क्रमांकाचा पुत्र सलीम जो पुढे जहांगीर म्हणून प्रसिद्ध झाला याला लहान वयातच मुलकी प्रशासनाची ओळख करुन देण्यात आली होती. याला बारा वर्षाचा असतानाच दहा हजारी मनसबदारी बहाल करण्यात आली. परंतु पुढील काळात जहांगीराने साम्राज्यावर आपला ठसा उमटवला नाही.

अकबराने महसूल पद्धतीविषयी दोन सर्वसाधारण तत्वांना महत्व दिलेले दिसते. एक म्हणजे महसुलाची पद्धत काहीही असली तरी, अधिकाऱ्यांना जमिनीच्या नेमणुका करुन देण्यापेक्षा रोख पगार देण्यात यावे. दुसरे म्हणजे जेथे शक्य असेल तेथे वैयक्तिक शेतकऱ्यांशी त्यांनी साक्षात संपर्क साधून व्यवहार करावा, पण ही दोन तत्वे पुढील काळात महत्वपूर्ण राहिली नाहीत. उलट जमिनीच्या नेमणूका वाढल्या, ठेकेदारीची पद्धत प्रचारात आली आणि जागच्या जागी महसुलाची वसुली करण्याची प्रथा पडल्याने खेडयापाडयातून जुलूम वाढला. असे हे बदल सामान्य शेतकऱ्यांची परिस्थिती कशी होती हे दर्शवितात. याशिवाय लागवडीचा प्रदेश वाढविण्याकरिता शेतकऱ्यांवर दबाव आणला जात होता असा पुरावा मिळतो. पण शेतकऱ्यांना आर्थिकदृष्टया ही गोष्ट शक्य नव्हती आणि अखेरीला महसुलाच्या आकारणीचे प्रमाण एकंदर उत्पादनाच्या एक तृतीयांश ऐवजी एक द्वितीयांश इतके वाढविण्यात आल्याचे आढळते.

जमिनीच्या नेमणूका करुन देणे ही अधिकाऱ्यांना वेतन देण्याची जुनी पद्धत होती. अकबराने ती बंद करण्याचा प्रयत्न केला. पण जहांगीर आठणींमध्ये अशा नेमणूकांचा उल्लेख वारंवार आढळतो. त्यावरुन त्याच्या कारभारात असे प्रसंग नित्य घडत होते असे दिसते. विल्यम हॉकिन्सच्या जहांगिराच्या दरबारातील अनुभवावरुन हाच निष्कर्ष काढता येतो. रोख पगार देण्याची पद्धत सर्रास प्रचलित असती तर परदेशी प्रवाशांच्या बाबतीत ती निश्चितच पाळली गेली असती. पण बादशहाचा अधिकारी म्हणून नियुक्ती झाल्याबरोबर नेमणूक मिळविण्याच्या धडपडीत त्याला सामील व्हावे लागले. या धडपडीचे सुस्पष्ट वर्णन त्याने केले आहे. [५०] त्याच्या वर्णनावरुन असे दिसते की, त्याकाळी नेमणूका वारंवार बदलल्या जात होत्या. एखाद्या माणसाची नेमणूक झाली की सहा महिन्यातच ती काढून घेण्यात येई व दुसऱ्याला देण्यात येई. म्हणून आपल्या तात्पुरत्या नेमणूकीतुन जास्तीत जास्त उत्पन्न मिळविण्याची पराकाष्ठा नेमलेला प्रत्येक अधिकारी करीत होता.

५०. अकबरकालीन हिंदुस्थान : अनु.सौ.सुनंदा कोगेकर, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे. पान नं.३४.( विल्यम हॉकिन्स-हॉकिन्स व्हॉयेजेस, संपादीत हक्ल्यून सोसायटी, १८७७.,(India at the Death of Akbar : W.H. Moorland. Indian Council of Historical Research, Delhi).

नेमणूकांत वारंवार बदल होत असल्याचे आणि दर वर्षाला नेमणूका रद्द होत असल्याचे टेरीने स्पष्ट केले आहे.[५१] जहांगीराच्या कारकिर्दीत जमीनदार आपली जमीन ठेक्याने देत होते. ती जमीन 'शेतकरी किंवा करोरी यांना दिल्याने चांगल्या किंवा वाईट पिकांमुळे येणारी सर्व जबाबदारी त्यांच्यावरच पडत होती. जहांगीर स्वतः म्हणत असे, "मी, सार्वभौमत्व म्हणजेच राज्याची सर्व सत्ता नूरजहानच्या हाती दिली आहे. जोपर्यंत राज्यकारभाराची सर्व सुत्रे तिच्या हाती आहेत तोपर्यंत मला मजेत राहण्यासाठी एक शेर मद्य आणि अर्धा शेर मांस यांच्यापलीकडे काहीही नको." [५२] इजारा ही जमीन महसूल पद्धती जहांगीराने पुनरुज्जीवीत केली. यात राज्य किंवा जहागीरदाराच्यातर्फे जमीन महसूल गोळा करण्याचा विशिष्ठ काळापुरता हक्क आणि करारात ठरविल्याप्रमाणे जहागीरदाराला किंवा सरकारला निश्चित रक्कम देणे गृहीत होते. जमीन महसूल गोळा करण्यासाठी इजाराधर हा एक मध्यस्थ असे. तरीही जमिनीवर त्याला कोणतेही मालकी हक्क नसत. जहांगीराच्या राजवटीत जमीन महसूल व्यवस्थेवर फारसे लक्षच दिले गेलेले दिसत नाही.

**शहाजहान –**

शहाजहानाच्या कारकिर्दीला गव्हर्नर एल्फिन्स्टन तसेच प्रो. श्रीराम शर्मा सुवर्णयुग म्हणतात.[५३] एल्फिन्स्टन म्हणतो, शहाजहानची कारकीर्द कदाचित भारतातील सर्वात समृद्ध कारकीर्द असावी. अनेक विदेशी युद्धात तो गुंतलेला असूनही त्याच्या राज्यात जवळजवळ अखंड शांतता असून प्रशासनसुद्धा चांगले होते. तर प्रो. श्रीराम शर्मा म्हणतात, शहाजहानच्या काळात वैभव आणि समृद्धी प्रदर्शित करणाऱ्या बऱ्याच गोष्टींचे दर्शन घडते. परंतू त्याच्या कारकिर्दीत फार मोठया प्रमाणावर महसूलाच्या नेमणूका करण्यात आल्या होत्या. नेमणुका देण्याची पद्धत शहाजहानने तशीच पुढे चालू ठेवली होती. शहाजहानच्या काळात नेमणूकात वारंवार बदल होत नव्हते. तीन ते चार वर्षाच्या अंतराने नेमणूका बदलल्या जात होत्या. बादशहाचे दुर्लक्ष झाले की नेमणुका वारंवार बदलल्या जात होत्या आणि त्यापासून शेतकऱ्यांना वाढत्या प्रमाणात धोका निर्माण होत होता. त्याच्या कारकिर्दीत

---

५१. अकबरकालीन हिंदुस्थान : अनु.सौ.सुनंदा कोगेकर, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे. पान नं.१०७. (व्हायेज टू ईस्ट इंडिया : ले. एडवर्ड टेरी, पुनमुर्दित, लंडन,).

५२. मध्ययुगीन भारताचा बृहत इतिहास : अनुवाद डॉ. व.तु. देशपांडे, के'सागर पब्लिकेशन, पुणे, प्रथमावृत्ती २००४. पान २२०.(Advanced Study in the History of Medieval India,Vol I: J.L.Mehta, Sterling Publication, New Delhi, 2001,P98.)

५३. मोगलकालीन भारताचा इतिहास : संशोधक मा.म. देशमुख, विश्वभारती प्रकाशन, सिताबर्डी, नागपूर, . १९७०,पान१२०

एकूण महसूल ८८० करोड दाम दाखविला आहे. खालसा किंवा बादशाही खजिन्यात आलेला महसूल केवळ १२० करोड होता. म्हणजे जवळजवळ ७/८ महसूल नेमणूक झालेल्यांना किंवा इतर धर्मसंस्थांना मिळत होता.

शहाजहानच्या कारकिर्दीत बंगालमधील काही महाल पोर्तुगीजांनी इजाऱ्याने घेतले होते. त्याच्या कारकिर्दीत इजाऱ्याचा प्रचार मोठया प्रमाणावर झाला होता आणि साम्राज्याच्या मोठया भागाला त्यामुळे नुकसान पोहोचले होते. शहाजहानच्या अंमलाखाली असणाऱ्या प्रदेशातील शेतकऱ्यांच्या उत्पादनाचा अर्धा भाग निर्वाहासाठी लागत होता आणि उरलेला भाग सरकारी महसूल आणि इतर मध्यस्थांच्या मागण्या भागविण्यासाठी खर्च होत होता. म्हणजेच शेतकऱ्याजवळ अखेरीला काहीच शिल्लक राहत नव्हते. शहाजहानच्या एकंदर वागणुकीमुळे अभिरुचीमुळे सार्वजनिक खर्चात प्रचंड वाढ झाली. या कारकिर्दीच्या खर्चाशी तुलना करता पूर्वीच्या कारकिर्दीमधील खर्चाचे प्रमाण एक चतुर्थांश देखील भरत नव्हते. याच्या कारकिर्दीच्या अखेरीला मोगल साम्राज्याची आर्थिक परिस्थिती अतिशय वाईट होती. कारण देशातील प्रमुख उद्योगांवर कराचा असहाय्य बोजा होता आणि उत्पादन करण्यात काहीच अर्थ राहिला नव्हता.

**मलिक अंबर - (१५४९-१६२६)**

अहमदनगरचा वजीर मलिक अंबर याने मिरासदारांच्या पिढिजात अधिकारांना मान्यता दिली होती आणि त्यांना जमीनीचे मालक मानले होते. महसूल गोळा करताना त्याने दाखविलेल्या विचारीपणामुळे राजाला थोडाफार कर निश्चितपणे मिळू लागला आणि शेतकऱ्यांचे हित जपले गेले. कारण नांगरणी, पेरणी केलेल्या जमीनीवर शेतकऱ्यांची मालकी निश्चित झाली होती.[५४] मलिक अंबरच्या महसूल वसूलीच्या (तनखा) पद्धतीत जमीनीच्या मगदूराप्रमाणे जमीनीचे ४ वर्ग केले होते. पिकांचा सर्वसाधारण अंदाज करुन एकदाच जमाबंदी निश्चित केली. शेतकऱ्यांकडून धान्यरुपाने करवसूली करणे त्याला मान्य नव्हते. कायमधारा निश्चितीबरोबरच पैशाच्या रुपात सारा निश्चित करणे आणि करमूल्य ठरल्यानंतर त्याने महसूल वसूलीबाबत विशेष लक्ष दिले.

---

५४. मराठयांची प्रशासन व्यवस्था : डॉ.एस. एन. सेन, अनु. विजया कुलकर्णी, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई, २००३, पान २३.

मलिक अंबर निजामशाहीमधील वजीर होता. याने पहिल्यांदा औरंगाबादमध्ये जलव्यवस्थापनाची पद्धती सुरु केली [५५]. याने जमीनीच्या २/५ भाग धान्य रुपाने सरकारला कर म्हणून देण्याची पद्धत सुरु केली. सर्व धान्याच्या उत्पन्नाची किंमत करुन तिसरा हिस्सा रोकड घेण्याची पद्धत सन १६१४ मध्ये सुरु केली.[५६]

**औरंगजेब –**

औरंगजेबाच्या साम्राज्यात २१ सुभे होते. (काबूल, काश्मीर, लाहोर, मुलतान, ठठ्ठा, गुजरात, दिल्ली, आग्रा अजमेर, माळवा, अवध, अलाहाबाद, बिहार, ओरिसा, बंगाल, खान्देश, वऱ्हाड, औरंगाबाद, बीदर, विजापूर, हैद्राबाद)

औरंगजेबाच्या कारकिर्दीच्या अखेरच्या वर्षातील तसेच औरंगजेबाच्या नंतरच्या काळातही साम्राज्याच्या मोठया भागात सर्वसाधारणपणे पैशाच्या रुपाने सारा द्यावा लागत असे. ज्या भागात कानकूट आणि भावोली पद्धत चालू होती. [५७] प्रत्येक शेतकऱ्याकडून घेतला जाणारा भावोली धान्यरुपाने निश्चित केला जात असे. परंतु तो पैशाच्या रुपाने बदलून तो वसूल केला जाई. धान्य मात्र शेतकऱ्याजवळ राहत असे. त्याचप्रमाणे मुकादम, जमीनदार व चौधरी यांनी सही केलेल्या त्या काळातील करारावरुन असे दिसते की सारा पैशात आकारला जाई व करारात ठरविलेला पैसा देण्यासंबंधी सही करणाऱ्यांना जबाबदार मानले जाई. उदा. पंजाबमधील किर्तापूर परगण्यातील औरंगशहापूर हया खेडयाने सव्वा पाचशे रुपये सारा भरावा असे ठरले आणि मुकादमाने भाडे पट्टीत ठरविलेला सारा भरण्याच्या लेखी करारावर सही केल्याचे दिसते. [५८] एकूणच नगदी रुपानेच पैसा द्यावा अशी पद्धत होती. सारा आकारणीची मागणी वर्षात चार किंवा सहा हप्त्यात पूर्ण केली जाईल आणि प्रत्येक हप्त्याची रक्कम लेखी करारात व भाडे पट्टीत उल्लेखलेली असे. [५९]

औरंगजेबाच्या कारकिर्दीत त्याने काढलेल्या एका फर्मानात जमिन महसूल धोरणासंबंधीच्या

---

५५. मलिक अंबर : वि.स. वाकसकर, पुरुषोत्तम चित्रे, बडोदा, सन १९४१, १ली आवृत्ती, पान ५९.

५६. मोगलकालीन महसूल पद्धती, (Land Revenue Administration under the Muhgals- Prof. N.A. Siddiki): अनु.डॉ.प्र.ल. सासवडकर, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, मराठी प्रथमावृत्ती २००६(Khaulasat-us-Siyaq,:Sulaiman Subhanullh, zamimah, Maulana Azad Library, Alighar, British Museum1115 A.H.\1703-4.pg 168.)

५७. तत्रैव पा. ६१ (Dastur-ul-Amal-i-Bekas : Jawahar Mal Bekas, 1144 A.H.\1731, A.D. Suhah Ullah, Maulana Azad Library, Alighar.pg.196.)

५८. मोगलकालीन महसूल पद्धती, (Land Revenue Administration under the Muhgals- Prof. N.A. Siddiki): अनु.डॉ.प्र.ल. सासवडकर, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, मराठी प्रथमावृत्ती २००६पा. ६१(Khaulasat-us-Siyaq, (1115 A.H.\1703-4): Sulaiman Subhanullh, zamimah,: Maulana Azad Library, Alighar, British Museum. pg.287.)

५९. तत्रैव पा.६१,(Farhang-i-Kardani 1098 A.H.\1693 A.D: Jagat Rai Shujai,(1090\1679)A.D. Abdus Salam, Maulana Azad Library, Alighar, pg.34 .)

इजारातील अटी व पद्धतींचा उल्लेख आढळतो. पण पूर्वीच्या कारकिर्दीचा प्रशासकीय वारसा म्हणून हे धोरण अस्तित्त्वात असल्याचे आढळते. प्रत्येक खेडयातील स्थानिक व्यवस्थेला सारा देणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या आणि लागवड करणाऱ्यांची नोंद महसूल दप्तरात सापडते. [६०] त्यात इजारा पद्धतीचा उल्लेख आढळतो.

इजारा म्हणजे राज्य किंवा जागीदारातर्फे जमीन महसूल गोळा करण्याचा विशिष्ट काळापुरता हक्क. करारात ठरविल्याप्रमाणे जागीरदाराला किंवा सरकारला निश्चित रक्कम देणे गृहीत असते. जमीन महसूल गोळा करण्यासाठी इजाराधर हा एक मध्यस्थ असे. पण त्याला जमीनीवर कोणताही मालकी हक्क नसे. या काळात प्रत्येक परगण्यात इजाराधर सापडतात. पण साम्राजातील प्रत्येक खेडयात सापडतातच असे नाही. इजारधरांनी परगण्याची आकारणी केलेला जामा(सारा) देण्यासाठी लांब मुदतीने भाडयाने देण्याचा करार महसूली शेतकऱ्यांतर्फेही करण्यात येत असे. [६१] उदा. अमीन व करोडी काही खेडी भाडयाने देत. एकूणच इ.स.१६७० च्या अखेरीस इजारा ही जमीन महसूलाच्या प्रशासनातील मान्यता पावलेली महसूलाची पद्धती होती. प्रत्येक खेडयातील खालीसा किंवा जागीर जमिनीत इजारा पद्धतीला बंदी करणारा पहिला हुकूम इ.स. १६७६ मध्ये मीरात-इ-अहमदीमध्ये उपलब्ध आहे. उदा. अहमदाबाद प्रांतात शेतजमीन शेतीसाठी चौधरी व मुकादमांना देण्याची पद्धत होती. तिच्यासंबंधी बादशहाकडे निवेदन देण्यात आले होते. अहवालात असे दर्शविण्यात आले होते की या पद्धतीमुळे फार अन्याय होऊन रयतेवर जुलूम होत होता. बादशहाने ही पद्धत नापसंत केली आणि तिला मर्यादित ठेवण्यासाठी त्याने हुकूम सोडला. पण या काळात खालसा जमीनीवर काही अटींनी शेती करण्यास त्याने परवानगी दिली. जिथे जामा (महसूल) खूप कमी झालेला आहे अशा खेडयात महसूली शेतीची व्यवस्था करण्यात आल्याचे दिसते. तसेच जी खेडी उजाड झाली आहेत किंवा जेथे लागवड करणे आणि निश्चित जामा घेऊन शेती करणे अशक्य आहे अशी खेडी निवडण्याचे काम स्थानिक कारभाऱ्याकडे दिलेले दिसते. [६२] अशा रितीने महसूलासाठी शेती करण्याच्या पद्धतीला बंदी घालणे आणि मनाई करणे हे महसूल मंत्रालयाचे धोरण होते. तरी प्रथा म्हणून विशेष

---

६०. तत्रैव पा.१०२,(Nigar Nama-i-Munshi : Munshi Malikzada, Maulana Azad Library, Alighar. pg.120 b-1311b)

६१. तत्रैव पा.१००,(Mirat-i-Ahmudi : Ali Muhammad Khan, Oriental Institute Baroda 3 vols, 1923. pg.98.)

६२. मोगलकालीन महसूल पद्धती, (Land Revenue Administration under the Muhgals- Prof. N.A. Siddiki): अनु.डॉ.प्र.ल. सासवडकर, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, मराठी प्रथमावृत्ती २००६पा. १०३Nigar Nama-i-Munshi 1098 A.H.\1693 A.D : Munshi Malikzada, Maulana Azad Library, Alighar. (Document) pg.189.)

परिस्थितीतच सरकार परवानगी देई. पंरतु जेव्हा हे शेतकरी सरकारी नोकर, चौधरी किंवा मुकादम असत अशा वेळी ही पद्धत बंद व्हावी अशी काळजी महसूल मंत्रालय घेत असे.

जमीन महसूल वाढविण्याचा पहिला उपाय म्हणजे लागवडीखालील प्रदेशाचा विस्तार करणे हा होता आणि हा उपाय प्रकर्षाने अंमलात आणला जात होता. जे अधिकारी लागवडीखालील जमिनीचा विस्तार करण्यात यशस्वी झाले होते. त्यांना खास बढती मिळत होती. या अधिकाऱ्यांनी कोणत्या प्रकारचा दबाव शेतकऱ्यांवर आणला होता याचे स्पष्टीकरण देणारा औरंगजेबाचा इ.स. १६५८ चा आदेश पाहिल्यास समजते. "वर्षाच्या सुरुवातीला प्रत्येक शेतकऱ्याची परिस्थिती काय आहे याची शक्य तेवढी माहिती गोळा करा. ते शेती करतात की नाही याची माहिती मिळवा. जमिनीची लागवड करण्याची साधने त्यांच्याजवळ असतील तर आमिषे दाखवून आणि प्रेमळ अभिवचनांनी त्यांना शेती करण्यास उद्युक्त करा आणि त्यांची कुठलीही इच्छा पूर्ण करण्याची तयारी दाखवा. पण शेतीची साधने उपलब्ध असून आणि हंगाम अनुकूल असूनही जर ते शेती करत नसले तर तुम्ही त्यांना निकड लावली पाहिजे आणि धमकावले पाहिजे आणि जबरदस्तीचा आणि चाबकाचा उपयोग केला पाहिजे."[६३] दुसऱ्या शब्दात सांगायचे तर लागवडीचे प्रमाण शेतकऱ्याने ठरवायचे नसून आकारणी करणाऱ्या अधिकाऱ्याने ठरवायचे होते. ते जास्तीत जास्त असले पाहिजे असा त्याचा आग्रह होता आणि त्याचा आग्रह प्रत्यक्षात आणण्यासाठी आवश्यकता पडल्यास फटक्यांचा उपयोग करण्याचाही त्याला अधिकार औरंगजेबाने दिलेला होता.

याशिवाय महसूलाचे उत्पन्न वाढविण्यासाठी आणखी एक उपाय योजला जात असे. सरकारी शेतसाऱ्याचे प्रमाण एकंदर उत्पन्नाच्या १/२ पर्यंत वाढविण्यात आले होते. पूर्वी सरकारी मागणी १/३ इतकी होती. म्हणजे या मागणीत ५० टक्के वाढ झाली होती. ही वाढ ताबडतोब सर्वत्र लागू करण्यात आली नाही. कारण औरंगजेबाच्या इ.स.१६६८ च्या आदेशामध्ये हे नवे प्रमाण प्रस्थापित झाले होते असे म्हटले असले तरी काही प्रदेशात किंवा काही विशिष्ट वर्गातील शेतकऱ्यांना जुना-कमी दरच लागू होता. असेही त्या आदेशावरुन दिसते. अर्थात महसूल वसूली करणाऱ्यांनी उत्पादनाच्या १/२ साऱ्याचीच मागणी सर्वसामान्यपणे करावी. असाच त्या आदेशाचा रोख होता.

महसूल मंत्रालयाच्या प्रमुखाचे वजीर म्हणून किंवा वजीर-इ-मुअझम असे वर्णन करीत

---

६३. अकबर ते औरंगजेबः'श्री डब्ल्यू. एच्. मूरलॅंड' अनु.श्री राजेंद्र बनहट्टी, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे ३०, प्रथमावृत्ती, २००६, पान १२६.

पण कारभारविषयक आणि हिशेबांच्या पुस्तकात त्याचा दिवाण-इ-आला असा उल्लेख केला. त्याच्या कारकिर्दीत फाजीलखान, जाफरखान आणि आसदखान यांना विपुल कारभार विषयक आणि सैनिकी अनुभव होते. दिवाण-इ-आलाच्या सत्तेचा आणि अधिकाराचा विस्तार साम्राज्याच्या जवळजवळ सर्व कारभाराविषयक कृतीवर झाला होता. साम्राजाचा सर्व महसूल वसूल करणे, खात्यातील अधिकाऱ्यांच्या उदा. सुभेदार, दिवाण, फौजदार, अमीन, करोरी आणि कोशाचे सर्व अधिकारी यांच्या नेमणूकांसंबंधी शिफारशी करणे, सर्व नेमून दिलेल्या कामावर देखरेख आणि नियंत्रण राखणे, याविषयीची सत्ता त्यांच्याकडे केंद्रीत झालेली होती. एकूणच सर्व महसूल व कारभाराविषयक गोष्टीवर त्याची सर्वश्रेष्ठ सत्ता होती. सर्व साम्राज्य त्याच्यावरच अवलंबून असे.[६४] दिवाण-इ-आलाला साम्राजाच्या नोकरांच्या नेमणूका कचेरीतील सार्वजनिक उद्योगांचे कार्य, विविध दस्तऐवज व कागदपत्रे यांच्यावर सहया करणे, लोकांच्या तक्रारी ऐकणे व तसेच वकील, मनसबदार व इतर अधिकारी यांच्या अर्जांचा विचार करणे ही कामे असत. [६५] दिवाण-इ-आला पुढील नेमणुका करत असे. सुभेदार, फौजदार, करोरी अमीन आणि महालाचे मुशरिफ, शाही कोशाचे अधिकारी, उदा. फौजेदार, दारोगा, अमिन आणि मुशरिफ,ज्यांना निरनिराळया अधिकाऱ्यांकडून कागदपत्रे गोळा करण्यासाठी नेमलेले असे बेलीफ, महालाचे अमीन व करोरी (सरकारने नेमलेले पण विशिष्ट कामासाठी नियुक्त केलेले),तहसीलदार किंवा सरकारी बाकी वसूल करणारे, जमीनदार. स्वामीनिष्ठा, कार्य क्षमता, सचोटी आणि स्तुतीस पात्र असा नोकरीतला गुण यामुळे त्यांनी बादशहाचा विश्वास संपादन केलेला असे. परंतु वजीराने केलेल्या कामाच्या तपशीलात बादशहा व्यक्तीशः रस घेई.[६६] त्यामुळे बादशहाच्या इच्छेविरुद्ध काही करण्याची वजीरांना गरज नव्हती.

अकबराच्या काळात चालू केलेली तोडरमलची जमीन महसूल पद्धती औरंगजेबाने निरुपयोगी ठरविली आणि सरकारी अधिकाऱ्यांकडून वसूली करुन घेण्याऐवजी मक्तेदाऱ्यां कडून वसूलीला सुरुवात केली आणि त्यामुळे मक्तेदारांचा जुलूम सुरु झाला. मक्तेदारांनी जनतेची पिळवणूक केली. पण मोगल साम्राजात या पिळवणूकीची दखल घेण्याची गरज मोगल प्रशासनाला वाटलीच नाही. औरंगजेब हा कठोर धर्मशील मुसलमान होता. त्याने

६४. मोगलकालीन महसूल पद्धती, (Land Revenue Administration under the Muhgals- Prof. N.A. Siddiki): अनु.डॉ.प्र.ल. सासवडकर, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, मराठी प्रथमावृत्ती २००६पा. ६४(Farhang-i-Kardani 1090\1679 A.D : Jagat Rai Shujai, Abdus Salam 85\135, Maulana Azad Library, Alighar,pg. 27 b).

६५. तत्रैव पा. ६५,(Dastur-ul-Amal-i-Alamgiri, post 1658 A.D : British Museum, Rieu I, Add. 6599, pg.144b.)

६६. तत्रैव पा. ६८.(Maasir-ul-Umara, Vol-1: Shah Nawaz Khan, Bibliotheca Indica, 3 vols, Calcutta, 1888-91., pg. 310, 311, 312.)

पूर्वीच्या मोगल बादशहांची धार्मिक सहिष्णूता आणि परंपरा खंडित केली. त्याने सर्व बिगर मुसलमान प्रजेवर अर्थात संपूर्ण साम्राज्यात शरीयतचा कायदा लागू केला व सर्व हिंदूनां त्यांचा स्वतःचा धर्म व परंपरा पाळण्यास बंदी घातली. याचाच १ भाग म्हणून हजारो हिंदू मंदिरे जमीनदोस्त केली व हिंदूंवर हिंदू असण्याबद्दल जिझिया कर लागू केला. [६७]

औरंगजेबाच्या साम्राज्यातील जमीन महसूल इ.स.१६९०च्या सुमारास ३३कोटी ४५लक्ष रुपये होता. सम्राट औरंगजेबाच्या खजिन्यात कर, जकात, जमीन महसूल या विविध स्त्रोतांपासून २४ प्रांतातून वार्षिक कराच्या मार्फत १०० मिलियन पौंडची वाढ झालेली आढळते.

**तक्ता क्र.२. इ.स. १६९७मधील जमीन महसूल** - (१ पौंड = १० रुपये )

| क्र. | प्रांत | जमीन महसूल(१६९७) |
|---|---|---|
| १ | विजापूर | £ ५,०००,००० |
| २ | गोवळकोंडा | £ ५,०००,००० |
| ३ | बंगाल | £ ४,०००,००० |
| ४ | गुजरात | £ २,३३९,५०० |
| ५ | लाहोर | £ २,३३०,५०० |
| ६ | आग्रा | £ २,२२०,३५५ |
| ७ | अजमेर | £ २,१९०,००० |
| ८ | उज्जैन | £ २,०००,००० |
| ९ | डेक्कन | £ १,६३०,४७५ |
| १० | बेरार- वऱ्हाड | £ १,५८०,७५० |
| ११ | दिल्ली | £ १,२५५,००० |
| १२ | बिहार | £ १,२१५,००० |
| १३ | खानदेश | £ १,११०,५०० |
| १४ | राजमहल | £ १,००५,००० |
| १५ | माळवा | £ ९९०,६२५ |
| १६ | अलाहाबाद | £ ७७३,८०० |
| १७ | नांदेड | £ ७२०,००० |
| १८ | बागलाण | £ ६८८,५०० |
| १९ | सिंध(तट्टा) | £ ६००,२०० |
| २० | ओरिसा | £ ५७०,७५० |
| २१ | मुलतान | £ ५०२,५०० |
| २२ | काश्मिर | £ ३५०,५०० |
| २३ | काबूल | £ ३२०,७२५ |
| २४ | बकर | £ २४०,००० |
|  | एकूण | £३८,६२४,६८० |

६७. (wikipedia,the free encyclopedia ) (http://www.bbc.co.uk)

औरंगजेबाच्या कारकिर्दीच्या उत्तरकाळात बदलत्या परिस्थितीशी जुळवून घेण्यात जागीरदारी पद्धतीला आलेले अपयश, मनसबदारांच्या संख्येत झालेली बेसुमार वाढ, जागीरदारी संख्येतील घट, प्रचंड फुगलेला कर आणि मनसब आणि जागीरी मिळविण्यासाठी विविध वर्गात झालेली तीव्र स्पर्धा निर्माण झालेली दिसून येते. मोगल बादशहा आलमगीर औरंगजेब याचा मृत्यू ३ मार्च १७०८ रोजी झाला. जागीरदारी पद्धतीतील हया प्रवृत्ती औरंगजेबाच्या मृत्यूनंतरच्या वर्षात वेगाने वाढीस लागल्या. जहागीरीसाठी मनसबदारांच्या येणाऱ्या दडपणास तोंड देण्यासाठी खालीसा जमीनीतील नेमणूका करण्यात आल्या आणि नंतरच्या काळात खालीसा जमिनीचा सर्व साठा जागीर म्हणून देण्यात आला. यानेही परिस्थिती आटोक्यात न आल्याने रोख पगाराच्या करारावर भरती केलेली दिसते. त्यामुळे जागीरदारांवर केंद्रसत्तेचा काहीही ताबा राहिलेला नव्हता. मोठया महसूलाच्या आकडयांनी बहुसंख्य मनसबदारांना आर्थिक अडचणीत आणले होते. त्यामुळे आवश्यक ती फौज ठेवणे त्यांना अशक्य होऊ लागले. अशा रितीने जागीरदारी पद्धतीमध्ये अनेक प्रश्न निर्माण झाले. जहांगिरच्या कारकिर्दीत महसूल शेतीचे पुनरागमन झाले होते. त्यामुळे नंतरच्या काळात महसूली शेतीतून निर्माण झालेला जमिनदार वर्ग प्रबळ बनला आणि शेतकऱ्यांवर त्याचा प्रत्यक्ष परिणाम झाला. शेतकऱ्यांनी खेडी सोडली, पिके गेली, उत्पन्न घटले. अशा रितीने शेतीतील पेचप्रसंग आणि जागीरदारी पद्धतीतील पेचप्रसंग एकत्र आल्याने राज्यात आर्थिक आणि राज्य कारभाराविषयक अस्थिरता निर्माण झाली.

मोगलकालीन महसूल व्यवस्थेमध्ये अस्तित्वात असणाऱ्या महसूल पध्दतीमध्ये काही धार्मिक करांचा अंतर्भाव करण्यात आलेला दिसतो. तसेच हिंदू व मुस्लिम धर्मीयांना वेगवेगळया स्वरुपाचे कर दयावे लागलेले दिसतात. मध्ययुगातील मराठेशाहीत मात्र यासारख्या वेगवेगळया करांची व्यवस्था अस्तित्वात असल्याचे दिसत नाही.

-------♦ ♦ ♦ ♦-------

# प्रकरण चार
# शिवकालीन महसूल व्यवस्था

१७ व्या शतकाच्या सुरूवातीस महाराष्ट्रात अराजकताच दिसून येते. इ.स.१६३६ मध्ये मोगलांनी व आदिलशहाने संयुक्तपणे निजामशाहीचा नाश केला. भोसले घराण्याला वंशपरंपरेने पूणे, सूपे, बारामती व इंदापूर हे परगणे मिळाले होते. शिवाजी महाराजांच्या बालपणी शहाजी आदिलशाहीच्या सेवेत रूजू झाला. त्यावेळीचे वर्णन डॉ. सेन पुढीलप्रमाणे करतात.[१] "शांतता व सुव्यवस्था राखण्याइतके विजापुरचे सरकार प्रबळ नव्हते. युध्दामुळे देश उध्वस्त झाला होता. पुण्याच्या परिसरातील प्रदेशही निर्मनुष्य झाला होता." शिवपूर्व काळात महाराष्ट्रात सर्वत्र अराजक व गोंधळाची परिस्थिती होती. या परिस्थितीतून राज्य निर्माण करणे, प्रशासन व्यवस्था बनविणे, आधीच्या व्यवस्थेतील दोष आणि उणीवा काढून प्रशासन चालविणे कठीण होते. पण शिवाजी महाराजांनी आपल्या प्रशासनात केंद्रसत्ता प्रबळ बनविली. अनेक किल्ले बांधून किंवा किल्ल्यांची दुरूस्ती करून राज्य बळकट बनविले. लोकहितवादी म्हणतात [२] "Shivaji Raja was famous for his forts." सभासदाच्या मते [३] "शिवाजी महाराजांनी आपल्या संपूर्ण कारकीर्दीत २४० किल्ले बांधले, दुरूस्त केले." शिवाजी महाराजांना राज्य निर्मीतीच्या कार्यात अनेक अडचणी आल्या पण त्या सर्वांवर मात करून त्यांनी राज्याची नवी घडी बसवली.

सतराव्या शतकात शिवाजी महाराजांनी मराठी सत्ता प्रस्थापित करून अनेक प्रशासकिय आणि आर्थिक सुधारणा केल्या. परंतु शिवपूर्वकाळात महाराष्ट्रात निजामशाह व आदिलशाह यांचे राज्य होते. गावातील वतनदार मंडळी परकियांच्या चाकरीत होती. पण त्या राजवटीत सुध्दा वतनदारांना स्वतःच्या ईच्छेप्रमाणे राहता येत होते. स्थानिक व्यवहारांचे ज्ञान असलेल्या वतनदार मंडळीच्या जोरावरच परकियांनी सत्ता दृढ करण्याचा प्रयत्न केला. शिवाजी महाराजांनी अखंड चालविलेल्या रणधुमाळीत प्रजेला सुखीसमाधानी ठेवले आणि राज्यातील वस्तीही वाढविली. काळाची गरज लक्षात घेऊन त्याप्रमाणे योग्य ती उपाययोजना करणे हेच व्यवहारकुशल मुत्सद्याचे काम असते. मलिकअंबरच्या महसूल पध्दतीत काही सुधारणा करुन ती पध्दत आपल्या राज्यात स्विकारण्याचा मुत्सद्यीपणा शिवाजी महाराजांकडे

१. Administrative system of the Marathas:Dr. S.N.SEN, Univ.of Calcutta,Calcutta 1925.pg 24.
२. मराठयांची प्रशासन व्यवस्थाः डॉ.एस. एन. सेन. (अनु. विजया कुलकर्णी),मुंबई,प्रथम आवृत्ती, २००३, पा.५४ (ऐतिहासिक गोष्टी : लोकहितवादी देशमुख गो.ह.),
३. सभासद कृष्णाजी अनंत श्री. शिवछत्रपतींचे चरित्रः संपा. शं.ना.जोशी, पूणे, १९६०, पा. ९८.

होता. कृष्णाजी अनंत सभासद हा वतनदारांसंदर्भात म्हणतो, "इदलशाही, निजामशाही, मोगलशाई देश कब्ज केला. त्या देशात मुलकांचे पाटील, कुलकर्णी यांचे हाती कुळ रयत यांनी कमविसी करावी आणि मोघम टक्का द्यावा. हजार दोन हजार जे गावी मिरासदारांनी घ्यावे ते गावी दोनशे-तिनशे खंडमक्ता द्यावा. त्यामुळे मिरासदार पैकेकरी होऊन गावास हुडे, वाडे, कोट बांधून प्यादे बंदुकी ठेऊन बळावले."[४]

म्हणजेच परकिय राजवटीत गावातील वतनदार गावाची पध्दत, रिवाज सोडून वागत होते. परकिय राजवटीत अनेक दोष होते. त्यांचा उगम केंद्र सत्तेच्या दुबळेपणात आहे याची जाणीव शिवाजी महाराजांना असल्याचे आढळते. मुसलमांनी आमदानीत सरदारांना खूष राखण्यासाठी जहागिरी देण्याची पध्दती अस्तित्वात होती. एकदा सरदारांना सरंजाम दिला तर सरकारला न जुमानता स्वतःच्या ईच्छेप्रमाणे कारभार चालवता येतो. हे शिवाजी महाराजांना स्वानुभवे ज्ञात होते. जहागिरी मिळाल्याने सामान्य लोकांची ताकद वाढते. म्हणूनच त्याने वतनदारांचे महत्व कमी केले. सर जदूनाथ सरकार म्हणतात, त्याप्रमाणे "मावळयांसारख्या अप्रसिध्द जमातीला हाताशी धरून शिवाजींनी नव्या राज्याची मुहूर्तमेढ रोवली." [५]

शिवाजी महाराजांनी सामान्य लोकांना कोणत्याही जहागिरी न देता स्वतंत्रपणे पगारी नोकरी दिली. [६] ग्राम रचनेत शिवाजी महाराजांनी मोठया प्रमाणात बदल केले नाहीत, पण पिढीजात वतनदार असणाऱ्या देशमुख, देशपांडयांचे महत्व कमी केले. मुसलमानी अमदानीत असणाऱ्या दोषांना कमी करीत त्यांनी योग्य प्रशासन उभे केले आणि यात राजा हा केंद्रसत्तेचा प्रमुख आधार निर्माण केला.

डॉ. सेन म्हणतात, त्याप्रमाणे मुस्लिम आमदानीत शांतता व सुव्यवस्था फारशी नव्हतीच.[७] अशा स्थितीत जर सामान्य लोकांना शांतता व सुव्यवस्था निर्माण करून दिली तर हेच लोक आपल्याला मदत करतील व एक प्रबळ शासन निर्माण होईल असा शिवाजी महाराजांचा दृढ विश्वास होता.

---

४. सभासद कृष्णाजी अनंतश्री.शिवछत्रपतींचे चरित्रः संपा. शं.ना.जोशी, पूणे, १९६०.पान ९., Administrative system of the Marathas: Dr. S.N. SEN, University of Calcutta, Calcutta 1925. page 26.
५. Shivaji the Great, Vol IV : Dr. Balkrushna, Taraporwala, Bombay, 1932, page 48.
६. Shivaji & His Times: Sir Yadunath Sarkar, Calcutta, 1961, page 51.
७. Administrative system of the Marathas: Dr. S.N. SEN, University of Calcutta, Calcutta, 1925. page 24.

**प्रशासनः-**

कोणतीही राज्यव्यवस्था चालविताना लष्करी आणि मुलकी व्यवस्था या दोन्ही स्वरूपातून ती चालविली जाते. राज्यात शांतता निर्माण करण्यासाठी, परकिय आक्रमणापासून संरक्षण करण्यासाठी, किंवा राज्याचा विस्तार करायचा असेल तर लष्कराचाच उपयोग होतो. आणि राज्यात सुव्यवस्था राखण्यासाठी, प्रजेला सोई व सवलती देण्यासाठी, राज्याच्या आर्थिक स्थितीत सुधारणा घडवून आणण्यासाठी मुलकी किंवा शासकिय व्यवस्थेची आवश्यकता असते. शिवाजी महाराजांच्या स्वराज्यातील म्हणजेच त्यांच्या सार्वभौम सत्तेखाली असणाऱ्या प्रदेशात लष्करी व मुलकी असे दोन विभाग होते. लष्कराची व्यवस्था पूर्णपणे स्वतंत्र होती. यात किल्ले, पायदळ, पागा, आरमार असे उपविभाग होते.

किल्ल्यांमुळे आजूबाजूच्या चौफेरे प्रदेशावर बंदोबस्त राखणे शक्य होत असे. स्वराज्यात किल्ल्यांचे महत्त्व अनन्यसाधारण होते. डोंगराच्या वरच्या किल्ल्यास गड, मैदानातील तटबंदीने संरक्षित भुईकोट आणि पाण्यातील म्हणजे समुद्र किनाऱ्यालगतचे जंजिरे-जलदुर्ग अशी किल्ल्यांची विभागणी करता येईल. शिवाजी महाराजांनी किल्ल्यांचे महत्व पुढीलप्रमाणे केले आहे. "जैसे कुळंबी शेतास माळा घालून शेत राखितो तसे किल्ले राज्यास रक्षण आहेत. तारवांस खिळे मारून बळकट करितात, तशी राज्यास बळकटी किल्ल्यांची आहे. किल्ल्यांच्या मुळेच आपणास धर्मस्थापन व राज्यसंपादन करणे, सर्वांस अन्न लावून, शत्रू प्रवेश न होय. सर्वांचा निर्वाह आणि दिल्लीसारखा शत्रु उरावर आहे. तो आला तरी नवे जुने तीनशे साठ किल्ले हजरतीस आहेत. औरंगजेबाची उमर गुजरून जाईल. एक किल्ला वर्ष वर्ष लढला तरी तीनशे साठ वर्षे पाहिजेत."[८]

शिवपूर्वकाळापासून ग्रामसंस्थांनी अत्यंत व्यवस्थित कामगिरी पार पाडली होती त्यामुळे शिवाजी महाराजांनी ग्रामसंस्थांच्या अंतर्गत व्यवस्थेत कोणताही बदल करावयाचा नाही असा निर्णय घेतला. पूर्वी पासून गावांसारख्या स्वयंपूर्ण घटक समूहांवर देशमुख आणि देशपांडे यांची नेमणूक होत असे. महसूल वसूलीसाठी नेमले गेलेले हे अधिकारी, हळूहळू वारसा हक्काने तो अधिकार बजावू लागले. स्वतःला त्या विभागाचे सर्वंकष सत्ताधारी मानून त्याची अंमलबजावणी करू लागले. यातूनच संरजामशाही निर्माण झाली.

---

८. मराठी रियासत (खंड - २): गो.स.सरदेसाई, केशव ढवळे प्रकाशन, गिरगांव मुंबई, पान २३६.

सरंजामशाही राजसत्तेला जुमानत नाही म्हणूनच शिवाजी महाराजांनी महसूल वसूलीसाठी अधिकारी नेमले, परंतु देशमुख आणि देशपांडे यांचे परंपरागत हक्क आणि इतर सवलती चालू ठेवल्या. देशमुख आणि देशपांडे यांचा लोकांशी प्रत्यक्ष संबंध ठेवला नसल्यामुळे कोणत्याही परिस्थितीत ते पूर्वी प्रमाणे जुलूम करू शकत नव्हते.

**<u>मुलकी व्यवस्था</u>**

मुल्क हा शब्द अरबी असून मुल्की म्हणजे बिनलष्करी. त्यावरूनच मुलुख शब्द प्रचलित झाला. मुलकी व्यवस्था म्हणजेच स्वराज्यातील प्रदेशाची पिकपाणी, करवसुलीची व्यवस्था इत्यादी. सभासद बखरकार म्हणतो की, [९] "इ.स. १६७३मध्ये पन्हाळा जिंकल्यानंतर शिवाजी महाराजांनी आपल्या स्वराज्याचे ३ भाग केले व या प्रत्येक भागावर एक सरकारकून किंवा सरसुभेदाराची नेमणूक केली."

१) उत्तर विभाग—यात साल्हेरपासून पुण्यापर्यंतचा देशावरचा व उत्तर कोकण - मोरोपंत पेशवे.

२) दक्षिण विभाग—दक्षिण कोकण, सावंतवाडी, कारवारचा उत्तर किनारा - अण्णाजी दत्तो सुरनवीस किंवा सचिव.

३) दक्षिण पूर्व विभाग-सातारा, कोल्हापूर, कर्नाटकाचा काही भाग.कोप्पल तुंगभद्रापर्यंत- दत्तोजी पंत वाकनीस

वरील तीन विभागांची पुन्हा सुभा, परगणा, महाल, तर्फ यामध्ये विभागणी केली होती. यापैकी सर्वात मोठया भागास सरसुभा म्हणत. त्यावरील अधिकाऱ्यास सरसुभेदार म्हणत. या सरसुभ्यामध्ये अनेक सुभे असून त्यावरील अधिकाऱ्यांना सुभेदार असे म्हणत.
सुभ्यामध्ये अनेक परगणे असत. परगण्यावरील अधिकाऱ्यांला हवालदार म्हणत. परगण्यामध्ये अनेक मौजे असत. मौजेवरील अधिकाऱ्यांमध्ये देशमुख, देशपांडे, पाटील, कुलकर्णी यांचा समावेश होत असे.

---

९. सभासद कृष्णाजी अनंत श्री. शिवछत्रपतींचे चरित्र : संपा. शं.ना.जोशी, पूणे,१९६० पान २१.मराठेकालीन संस्था व विचारः प्रा.गायकवाड, प्रा. सरदेसाई, प्रा थोरात, प्रा. हनमाने, फडके प्रकाशन, १९९० पान १९०.

**तक्ता क्र. ३. स्वराज्यातील महसूल विभाग व अधिकारी-**

| प्रदेश | करवसूली अधिकारी |
|---|---|
| सरसुभा-अनेक सुभे व्यापणारा प्रदेश | सरसुभेदार |
| सुभा,प्रांत-अनेक परगणे व्यापणारा प्रदेश | सुभेदार |
| परगणा,महाल-अनेक तर्फा व्यापणारा प्रदेश | हवालदार किंवा कमाविसदार |
| मौजे, तर्फ, कर्यात ( गावे, खेडी) | देशमुख किंवा देसाई, देशपांडे किंवा कुलकर्णी आणि पाटील |

प्रांत किंवा सुभा यांचे काम पाहणारा सुभेदार यांच्या हाताखाली आठ अधिकारी असत.[१०]

१) दिवाण २) मुजूमदार ३) फडणीस ४) सबनीस

५) कारखानीस ६) चिटणीस ७) जामदास ८) पोतनीस

एका किंवा अधिक परगण्यांवर सुभेदार या सरकारी अधिका-यांची नेमणूक केलेली असे व त्याच्या मदतीला हवालदार असे. सुभेदार हा सेनाधिकारी व हवालदार हा मुलकी अधिकारी असे. परगण्याचा सुभेदार व हवालदार हे बरेचसे समान दर्जाचे अधिकारी असत. सुभेदाराच्या नियंत्रणाखाली संपूर्ण परगणा असल्याने स्थानिक वतनदारांवर वचक बसवून त्यांच्याकडून जमीन महसूल व इतर कर यांची वसूली करण्याचे काम सुभेदार करीत असे. या अधिकाऱ्यांना अंशतः पगार व अंशतः इनाम मिळत असावे. सुभेदार सेनापती असल्याने त्याला आपला प्रदेश सोडून इतरत्र स्वारीसाठी जावे लागत असे. त्याचा मुक्काम त्याच्या सुभ्यात नियमित नसल्याने सतत सुभ्यात राहणारा हवालदार हा मुलकी अधिकारी नेमण्यात आला असावा. सुभेदाराच्या मदतीला कारकून, दप्तरदार, हवालदार, मुजुमदार हे अधिकारी नेमण्यात येत असत.

परगण्याच्या कामकाजात हवालदारांच्या मदतीला देशमुख-देशपांडेही असत. देशमुख आणि देशपांडे यांच्या मदतीकरता वरिष्ठ प्रतीचे वतनदार नोकर असत. दिवाणी, फडणीस, पोतनीस इत्यादी मूळ देशमुख व देशपांडे यांच्या हाताखालचे असावेत. शेतसारा वसूल करण्याचे अधिकार देशमुखाचे आणि वसूल झाल्यावर त्याचा हिशेब देशपांडे यांनी ठेवायचा. देशमुख हा जातीने बहुदा मराठा असल्यामुळे साहजिकच लिहिणारा व वाचणारा नसल्यामुळे त्याचा कारभार दिवाणाने पहावयाचा, हिशेब मुजुमदाराने तपासावयाचे, दस्तऐवज


१०. स्वराज्याचे छत्रपती आणि अष्टप्रधानः अविनाश सोवनी, पूर्वा प्रकाशन पुणे, प्रथमावृत्ती ४ ए. १९९८, पान ५९., सभासद कृष्णाजी अनंत श्री. शिवछत्रपतींचे चरित्रः संपा.शं.ना.जोशी, पूणे,१९६०, पान २१.

फडणविसाने नोंदावयाचे, जाबजबाब दप्तरदाराने लिहावयाचे, वसूलाचा सांभाळ पोतनिसाने करावयाचा, त्यापूर्वी तो नीट पहायचे काम पोतदाराचे अशी देशमुखाच्या कचेरीतील कामाची व्यवस्था होती. मुलकी व्यवस्थेतील सगळयात छोटा विभाग मौजे. त्याचे मुलकी अधिकारी पाटील व कुलकर्णी. हे वतनी अधिकारी असत व त्यांचे मदतनीस चौगुला, पोतदार, महार हे वतनी नोकर असत.

गावच्या पाटलाची चावडी ही येथील कचेरी होय. पाटलाच्या हुकूमावरून महाराने शेतक-याला चावडीत बोलावून आणावे व त्याने आणलेला पैसा पोतदाराने पहावा आणि पाटलाच्या ताब्यात द्यावा, त्याची पावती कुळकर्ण्याने शेतक-यास द्यावी व पाटलाने बराच पैसा वसूल झाल्यावर तो महाराबरोबर देशमुखाकडे पाठवावा. वसुलाच्या पैशाबरोबर वसूलीची नावे असणारी यादी पाठविली जात असे. त्यामुळे वसुलीची नोंद दोन ठिकाणी पहावयास मिळत असे. [११]

एकूणच मौजे, गाव यावर पाटील व कुलकर्णी हे मुलकी अधिकारी असत. तसेच तर्फ, तपे व परगणा हे जे राजकीय विभाग होते त्या प्रत्येकावर देशमुख हा मुलकी वतनदार अधिकारी असे. ते सर्व समान दर्जाचे नसून विभागाच्या लहान-मोठेपणाप्रमाणे त्यांचे अधिकार लहानमोठे असत. वसुलीबाबत ते गावकामगारांना जरुरीप्रमाणे मदत करीत असत.

**<u>किल्ल्यांची व्यवस्था</u>** [१२]




<u>लष्करातील पायदळ, घोडदळ व आरमार यांची व्यवस्था पुढील प्रमाणे –</u>

११. शिवकालीन महाराष्ट्रः वा.कृ. भावे, वरदा प्रकाशन, पुणे, द्वितीयावृत्ती, १९९८, पान ९३.

१२. स्वराज्याचे छत्रपती आणि अष्टप्रधानः अविनाश सोवनी, पूर्वा प्रकाशन, पुणे, प्रथामावृत्ती १९९८, पान ५९.

**तक्ता क्र.४. सेनापती व सैन्य –**

| पायदळ | आरमार | घोडदळ |
|---|---|---|
| सरनोबत, सेनानायक सुभा, | सरखेल, | सरलष्कर, सेनाकर्ते |
| हजारी सरदार (१० जुमलेदार) १५०० सैनिक | दर्यासारंग | पंचहजारी सरदार(१०सुभेदार) १,२५०० स्वार |
| १जुमलेदार = १५० सैनिक | लढाऊ गलबते | १सुभेदार १२५० स्वार |
| ३ हवालदार (१हवालदार = ५०सैनिक) | आरमारी सैन्य | १० जुमलेदार १जुमलेदार = १२५ स्वार |
| ५ नाईक (१नाईक = १० सैनिक) | | ५ हवालदार |

लष्करातील या सर्वांना पगार दिला जात असे. स्वतंत्र जहागिरी अथवा इनामी गावे नसल्यामुळेच प्रत्येक पदावरील लोक व्यवस्थित कारभार पहात असत.

**<u>शिवाजी महाराजांचे प्रधानमंडळ</u>** -

**राजा –** शिवाजी महाराजांना छत्रपती असे संबोधले जाते. महाराष्ट्रातील प्रचंड राज्ययंत्रणेचे संचालन करणारा बलदंड राजा होता. राजा म्हणजे राज्ययंत्रणेचा मुख्य आधार असे डॉ. सेननी म्हटले आहे. [१३]

शिवाजी राजा हा फक्त नामधारी राजा नसून त्याच्या हाताखाली अष्टप्रधान मंडळ, १८ कारखाने, १२ महाल व सर्व सचिव, फडणीस, सबनीस, चिटणीस यांचा समावेश होता. राज्यव्यवस्थेमध्ये विविध प्रकारचे अधिकारी नेमलेले असून त्या सर्वांच्यामध्ये अधिकाराची विभागणी करण्यांत आलेली होती. या सर्व अधिकाऱ्यांना त्यांच्या अधिकारांची आणि कर्तव्यांची पूर्ण जाणीव शिवाजीने करून दिलेली होती. सर्व अधिकाऱ्यांना स्वतःच्या अधिकारकक्षेमध्ये स्वतंत्रपणे वावरण्याचा अधिकारही होता म्हणजेच अष्टप्रधानांपैकी सेनापती, पंडितराव, न्यायाधीश यांना सर्वांना आपापल्या क्षेत्रात श्रेष्ठ स्थान असले तरी अंतिम सत्ता ही राजाच्याच हातात होती. या सर्व अधिकाऱ्यांची अधिकारपदे ही राजाच्या इच्छेवर अवलंबून असत. एकूणच शिवकाळात राजा हाच सर्व राज्ययंत्रणेचा प्रमुख होता. राजाच्या संमतीशिवाय आणि हुकूमाशिवाय अधिकारी कोणताही निर्णय घेऊ शकत नव्हते.

१३. Administrative system of the Marathas: Dr. S.N. SEN, University of Calcutta, Calcutta 1925. page 18.

शिवाजी महाराजांनी पूर्वपरंपरेला अनुसरून आपली राजनिती आखल्याचे आढळते.[१४] जसे की सामान्य रयतेला संरक्षण देण्यासाठी त्यांनी वतनदारीची पध्दत नष्ट करून सर्वत्र पगारदार अधिकारी नेमले. तसेच रयतेच्या संरक्षणासाठी जहागिरीदारांवर अवलंबून न राहता आपले स्वतःचेच सैन्य उभे केले. शिवाजीने मुलकी आणि लष्करी अधिकाऱ्यांची नियुक्ती करताना सर्व जातीधर्माच्या लोकांना एकत्र घेऊन आपले राज्य बनवले. सरकारी नोकरीत बदलीचे तत्व उपयोगात आणल्यामुळे अधिकाऱ्यांचे लागेबांधे निर्माण होऊ दिले नाहीत.

शिवाजी राजानी राज्यकारभार चालविण्यासाठी प्रधान म्हणजेच सरकारकून नेमले होते. आज्ञापत्रात, रामचंद्र पंत म्हणतात, [१५] "विविध प्रकारची राज्याची कार्ये केवळ राजानेच करणे शक्य नाही तेव्हा राज्यकारभार चालविण्यासाठी प्रधान नेमावेत. आपल्या सत्तेप्रमाणेच त्यांचीही सत्ता सर्वांवर चालावी " याप्रमाणे शिवाजी महाराजांनी अष्टप्रधान मंडळाची निर्मीती केली यातील मुख्य प्रधान किंवा पेशवा हे सर्वात मानाचे आणि अनेक अधिकार असणारे असे पद निर्माण करण्यांत आले.

"सर्वदर्शी प्रधानस्तू राज्यचिन्ता कारभार समुब्दाहन": सर्व दृष्टीने राज्याची चिंता, योग्य कारभाराची व्यवस्था चोख राखणारा असे पेशव्याचे वर्णन केले आहे. शिवाजी महाराजांनी नेमलेल्या सर्व सरकारकुन किंवा मंत्र्यांच्या अधिकार कक्षेत इतर कनिष्ठ अधिकारी किंवा कचेरी असलेली दिसते. म्हणजेच शिवकाळात पदसोपान तत्वाचा प्रत्यक्ष वापर झालेला आढळतो. तो पुढील प्रमाणे होता.

राजा

↓

अष्टप्रधान मंडळ

(पेशवा, अमात्य, सचिव, सेनापती, वाकनीस, सुमंत, पंडितराव, न्यायाधिश)

↓

कारकुन(कचेरी)

{दिवाण, मुजूमदार-लेखापरिक्षक, फडणीस, सबनीस,चिटणीस, कारखानीस, जामदार, पोतनीस}

---

१४. मराठेकालीन संस्था व विचार:प्रा.गायकवाड, प्रा. सरदेसाई प्रा थोरात,प्रा.हनमाने,फडके प्रकाशन, १९९०पान २३७.

१५. आज्ञापत्र शिवाजी राजांची राजनितीः संपादक श्री.ना.बनहट्टी,सुविचार प्रकाशन मंडळ,नागपूर १९७४,चौथी आवृत्ती,पान ८३. रामचंद्र पंताच्या शब्दात "विविध प्रकारची नृपकार्ये केवळ नृपानेच करीन म्हणता होणे शक्य नाही. तेव्हा राज्य कारभार चालविण्यासाठी प्रधान करावे लागतात. प्रधान म्हणजे सरकारकून आपले शासनाप्रमाणे त्यांचे शासन सकळांवर चालवावे."

शिवाजी महाराजांनी प्रशासनामध्ये सुसुत्रता निर्माण करण्यासाठी काही कडक नियम बनविले होते. त्यामुळे प्रत्येक मंत्री व त्याची कचेरी यांचे एकत्रित काम राजाला जबाबदार असे.

शिवाजी राजांचा आपल्या मंत्र्यांवर पूर्ण विश्वास होता.[१६] तसेच मंत्री कार्यात निष्णात असावा. याबाबत कटाक्ष होता. तसे नसल्यास मंत्रीपदावरून त्यांनी अनेकांना काढूनही टाकलेले दिसते. उदा. पेशवा महादेव अकार्यक्षम म्हणून काढले. तसेच सेनापती नेताजी पालकर उद्दाम वृत्तीचा बनला तेव्हा त्यालाही काढून टाकले.

शिवकाळातील प्रशासन व्यवस्थेमध्ये राजा हाच सरकारचा प्रमुख असून तो प्रधानमंडळाच्या मदतीने राज्यकारभार पहात असे. या प्रधानमंडळात आठ मंत्री असल्याने त्या मंडळाला 'अष्टप्रधान मंडळ' असे संबोधण्यात येत असे.

१) पेशवा किंवा मुख्य प्रधान

२) मुजुमदार किंवा अमात्य

३) वाकनीस किंवा मंत्री

४) डबीर किंवा सुमंत

५) सुरनिस किंवा सचिव

६) पंडीतराव किंवा राजपुरोहित

७) सेनापती

८) न्यायाधिश

राज्यारोहण समारंभाच्या शुभमुहूर्तावर हे अष्टप्रधान राजाच्या मस्तकावर गंगाजलाने अभिषेक करण्यासाठी, सुवर्णाचे आणि चांदीचे कलश आणि तस्त घेऊन सिंहासनाच्या दुतर्फा उभे होते.[१७] मल्हार रामराव चिटणीस म्हणतात की, "तेव्हापासूनच अष्टप्रधान मंडळ अस्तित्वात आहे."

त्याचवेळी राज्याभिषेकाच्या पहिल्याच वर्षी अष्टप्रधान आणि इतर विभाग प्रमुखांच्या कामकाजाचे निवेदन करणारे 'कानु जाबता' हे सरकारी कागदपत्र तयार करण्यात आले.[१८]

---

१६. मराठयांचा सामाजिक आर्थिक व सांस्कृतिक इतिहासः डॉ. बी.एन.सरदेसाई, फडके प्रकाशन, मार्च, २००१, पान १२१.

१७. चिटणीस बखरः पा. १६१ ही पदे राज्यरोहणापूर्वीपासूनच अस्तित्वात होती. म्हणूनच चिटणीसास अभिप्रेत असलेला अष्टप्रधान म्हणजेच अष्टप्रधान मंडळ असा अर्थ आहे.

१८. सभासद कृष्णाजी अनंत श्री. शिवछत्रपतींचे चरित्रः संपा. शं.ना.जोशी, पूणे, १९६०. पान ८३.

तो खलिता प्रचलित व्यवस्थेची योग्य अंमलबजावणी करण्यासाठी निघाला असण्याची शक्यता आहे. रावबहादुर काशिनाथ नारायण साने यांनी प्रसिध्द केलेला हा 'कानुजाबता' [१९] यात अष्टप्रधानांपैकी तीन प्रधानांवर कर्तव्यांव्यतिरिक्त मोठया परगण्यांचे कामकाजही सोपविलेले दिसते. ते प्रधान जेव्हा राजधानी बाहेर असत तेव्हा त्यांचे प्रतिनिधी त्यांचा कारभार बघत असत. परंतू अष्टप्रधानांपैकीच्या कनिष्ठ अधिकाऱ्यांची किंवा मुतालिकाची निवड करण्याचाही अधिकार अष्टप्रधानांना नव्हता. या सर्वांची निवडही राजाच करत असे.

---

१९. कानुजाबता सोबत जोडला आहे. कानुजाबता- राज्यकारभाराविषयी माहिती सांगणा-या कागदपत्रास कानू जाबता असे म्हणतात. हा कानू जाबता "सनदापत्रे" व पे.द. सं. पत्रे यादी, इ.स. १९३० या दोन ग्रंथांत मिळून आला आहे. कानुजाबता सनदापत्रेः रावबहादद्दर काशिनाथ नारायण साने इ.स. १९१३ पृ.१२२-१२४.

**।।श्री।।**

राज्यभिषेक कालाच्या पहिल्या वर्षातील कानुजाब्ता आनंद नाम सवंत्स मंगळवार जेष्ठ शुध्द त्रयोदशी,

"मुख्य प्रधान यानी सर्व राजकार्य करावे. राजत्रावरी शिक्का करावा. सेना घेऊन युध्दप्रसंग स्वारी करावी. तालुका ताबिनांत स्वाधीन व्हावे.

येईल त्याचा रक्षून बंदोबस्त करून आज्ञेने वर्तावे व सर्व सरदार सेना त्याच बरोबर जावे. त्यानी सर्वासमवेत चालावे, येणेप्रमाणे.

अमात्य यांनी सर्व राज्यातील जमाखर्च चौकशी करून दप्तरदार फडणीस यांचे स्वाधीन असावे. लिहिणे चौकशीने आकारावे.

सेनापती यांनी सर्व सैन्य रक्षण करून युध्दप्रसंग स्वारी करावी. तालुका स्वाधीन होईल तो रक्षून हिशेब रूजू करून आज्ञेने वतीने व फौजेचे लोकांचे बोलणे बोलावे. सर्व फौजेचे सरदार यांनी त्याजबरोबर चालावे.

अमात्य यांनी सर्व राज्यातील जमाखर्च चौकशी करून दप्तरदार फडणीस यांचे स्वाधीन असावे. लिहिणे चौकशीने आकारावे. फडनिशी; चिटनीशी, पत्रावर निशाणी करावे. युध्दप्रसंग करावे. तालुका जतन करून आज्ञेत चालावे.

सचिव यांनी राजपत्रे शोधन करून अधिक-उणे अक्षर मजकूर शुध्द करावी. युध्दप्रसंग करून तालुका स्वाधीन होईल तो रक्षून आज्ञेत वर्तावे. राजपत्रावर चिन्ह समंत करावे.

पंडितराव यांनी सर्व धर्माधिकार, धर्म, अधर्म पाहून विचिक्षा करावी. शिष्टांचे सत्कार करावे. आचार, व्यवहार, प्रायाश्चित पत्रे होतील. त्याजवर संमत चिन्ह करावे. दान प्रसंग, शांति, अनुष्ठाण तत्काळी करावे.

न्यायाधीश यांनी सर्व राज्यातील न्याय, अन्याय, मनास आणून बहुत धर्मेकरून न्याय करावे. न्यायाची निवाडपत्रे यावर संमत चिन्ह करावे.

मंत्री यांनी सर्व मंत्र विचार राजकारण यांतील सावधतेने विचार करावे. आमंत्रण, निमंत्रण, वाकनिशी यांचे स्वाधीन तालुका जतन करून युध्दादि प्रसंग करावे. राजपत्रावर संमत चिन्ह करावे.

सुमंत परराज्यातील विचार करावा. त्याचे वकिल येतील त्यांचे सत्कार करावे. युध्दादि प्रसंग करावे. राजपत्रावर संमत चिन्ह करावे."

अष्टप्रधानांची कामे म्हणजे-

१) मुख्यप्रधान :मुख्यप्रधानांनी सर्व राज्यकारभार करावा. सेना घेऊन नवीन प्रदेश जिंकण्याचा प्रयत्न करावा. नेमून दिलेल्या प्रदेशाचा कारभार करावा. शत्रूची बातमी काढून त्याचा पराभव करावा. छत्रपतींकडून मुद्रा होऊन आलेल्या पत्रांवर प्रधानाने मुद्रा करावी.

२) अमात्य अर्थमंत्रीः यांनी सर्व राज्यांतील उत्पन्नाचा व खर्चाचा जमाखर्च पहावा. हे काम दप्तरदार व फडणीस यांजकडून करुन घ्यावे. लष्कराचे अधिपत्य करुन युध्दे करावी. छत्रपती जो प्रदेश नेमून देतील त्याचा कारभार दक्षतेने करावा.

३) सेनापतीः सर्व सेनेचे रक्षण करावे. सैनिकांचे वेतन वेळच्यावेळी द्यावे. सेनेत जे पराक्रम गाजवतील त्यांचा गौरव छत्रपतींची मंजुरी घेऊन छत्रपतींच्या हस्ते करावा. त्यांना छत्रपतींकरवी मान-सन्मान व बक्षिसे द्यावीत. सेनेचे अधिपत्य करुन युध्दादिप्रसंग करावे.

४) सचिवः यांनी छत्रपतींचा सर्व पत्रव्यवहार स्वतः पाहावा, महाल परगणे यांच्या हिशेबाची तपासणी करावी. युध्दादिप्रसंग करुन जिंकलेल्या मुलुखाचा कारभार पहावा.

५) मंत्रीः याने राज्याच्या राजकीय व राजनैतिक बाबी सांभाळाव्या. परदरबारांतून आलेल्या पाहुण्याचे आगत - स्वागत करावे. छत्रपतींची दिनचर्या लिहावी. त्यांनी केलेल्या कार्याची नोंद ठेवावी. राजपत्रावर संमत असे चिन्ह करावे.

६) पंडितरावः यांनी सर्व धार्मिक बाबींवर अधिकार चालविणे. पंडित, विद्वान ब्राम्हण यांचे सन्मान करावे. अपराध्यास शिक्षा करावी. समाजातील परंपरा, आचार-विचार, प्रायश्चित संबंधीच्या पत्रावर सहया कराव्या व संमत असे चिन्ह करावे.

७) न्यायाधीशः राज्यांतील सर्व प्रकारच्या खटल्यांवर अधिकार चालवावा, खटल्यांत धर्म-अधर्म पाहून अपराध्यास शिक्षा करावी. न्यायाच्या निवाडपत्रांवर संमत चिन्ह करावे. छत्रपतींच्या चारित्र्यास दोष न लागेल असे निष्पक्षपातीपणे कार्य करावे.

८) सुमंतः यानी परराष्ट्र व्यवहार पहावा. पराराज्यातील राजकारणावर लक्ष ठेवावे. परराज्यांतील वकीलांचे स्वागत करावे व त्यांची व्यवस्था पाहावी. परराज्यांतील राजकारणाचे छत्रपतीस निवेदन करावे. युध्दादिप्रसंग करावे. व राजपत्रावर संमत असे चिन्ह करावे.

कानूजाबत्यावरून असे स्पष्ट होते की, "अष्टप्रधानांच्या अधिकारातील परगणे आणि बाजारपेठांची व्यवस्था पाहण्यासाठी आणि पंतप्रधान (प्रमुख) मोहिमेवर असताना सहाय्यक म्हणून काम बघणाऱ्या दरकदारांनी मंत्र्यांच्याच नावे कारभार करावा. त्यांच्या जागी नेमलेल्या मुतालिकांनी त्यांचे कामकाज पहावे. त्यांनी स्वतः राजदरबारी हजेरी लावावी. प्रधानमंडळात समाविष्ट नसलेला परंतू अष्टप्रधानांचा दर्जा असलेला अधिकारी म्हणजे चिटणीस. हा राजपत्रे लिहिण्याचे, परगण्यातील अधिकाऱ्यांना सनदी दानपत्रे, महाली हुकूम लिहीण्याचे काम करत असे. याशिवाय पोतनीस खजिन्यातील जमाखर्चाचा हिशेब ठेवीत असे. पोतदार हा धातूपरिक्षक अधिकारी होता. अष्टप्रधानांच्या स्वतःच्या सेवक वर्गाप्रमाणेच १८ कारखान्यांचे आणि बार महालांचे अधिकारी त्यांच्या हाताखाली असत.

शिवाजी महाराजांच्या राज्यभिषेकाप्रसंगी पुढील पदाधिकारी अष्टप्रधान होते. [२०] –

१) मोरो त्रिंबक – पेशवे

२) नारो निळकंठ व रामचंद्र निळकंठ - मुजूमदार

३) रघुनाथ पंडितराव – दानाध्यक्ष

४) हंबीरराव मोहिते - सेनापती

५) दत्ताजी त्रिंबक - वाकनीस

६) त्रिंबकजी सोनदेव डबीर यांचे पुत्र रामचंद्रपंत - सुमंत

७) अण्णाजीपंत - सुरनीस (सचिव)

८) निराजी रावजी – न्यायाधीश

---

२०. सभासद कृष्णाजी अनंत श्री. शिवछत्रपतींचे चरित्रः संपा. शं.ना.जोशी, पूणे, १९६०,पान ३६.

अष्टप्रधानांच्या हाताखाली अठरा कारखान्यांवर अधिकारी व बारा महाल असत. ते कारखाने[२१]

१) खजिना २) जवाहिरखाना ३) अंबरखाना (हत्तीचे सामान)

४) शरबतखाना (औषधे) ५) तोफखाना ६) दप्तरखाना

७) जामदारखाना (सर्वप्रकारची नाणी इ.) ८) जिरातखाना (शेती)

९) मुतबखखाना १०) उष्टरखाना (उंट व त्यांचे सामान)

११) नगारखाना १२) तालीमखाना १३) पीलखाना

१४) फरासखाना १७) दारूखाना १८) शरतखाना

हे १८ कारखाने सरकारच्या म्हणजेच शिवाजी महाराजांच्या मालकीचे होते.

बारा महाल – १) पोते (खजिना) २) सौदागिर (माल) ३) पालखी ४) कोठी ५) इमारत

६) बहिली (रथ) ७) पागा ८) शेरी ९) दरूनी (अन्तःपूर)

१०) थट्टी (गोठा) ११) टांकसाळ १२) छबिना

हे १२ महाल राजाच्या मालकीचे होते. बारा महालांचे अधिकारी आपआपली कामे व्यवस्थित करून, त्याचा हिशोब दप्तरात ठेवत असत.

शिवाजी महाराजांनी आपल्या अष्टप्रधानांना सर्व खाती वाटून दिली होती. अष्टप्रधानांची प्रत्येकाची वेगवेगळी कचेरी असून त्यात प्रत्येकाचे कनिष्ठ अधिकारी असत. त्यांना शिवाजी महाराजांच्या खाजगी खात्याशी सहकार्य ठेवावे लागत असे. एकूणच अष्टप्रधान, शिवाजी महाराजांच्या हाताखालचे चिटणीस आणि अधिकारी, अष्टप्रधानांची कचेऱ्यांतील कनिष्ठ अधिकारी यांचे सर्वांचे मिळून सरकार होत असे. अधिकारी वर्ग व इतर नोकरवर्ग याविषयी महाराजांनी काही नियम घालून दिले होते. [२२]

प्रधान म्हणजे कारभारी यांनी ज्यांच्याकडे जे कार्य सोपविले असेल ते कार्य त्यानेच करावे. एकाने दूसऱ्याचे काम करू नये. काही नोकर महाराजांच्या जवळ असत त्यांचा महाराजांशी घनिष्ठ संबंध येत असे, या आधारावर त्यांनी आपल्या वरिष्ठांचा उपमर्द करू नये, प्रत्येकाने आपल्या मर्यादेने वागावे. मर्यादा सोडून वागणाऱ्यास शिक्षा करण्यात यावी. असे स्पष्ट केलेले दिसते.

---

२१. पेशवे बखरः पान ८० – यात १८ कारखान्यांचा उल्लेख आहे.
२२. शिवकालीन महाराष्ट्रः वा.कृ.भावे, वरदा प्रकाशन, द्वितीयावृत्ती, १९९८, पृ. १२६.

**महसूल विभाग** -

शिवाजी महाराजांनी आपल्या सोयीसाठी राज्याचे २९ महसूल विभाग पाडले. [२३] यापैकी सर्वच विभाग सारख्याच आकाराचे दिसत नाहीत. उदा. पूणे परगणा हा प्रचंड दिसतो. तर इतर काही परगणे वेगवेगळया आकाराचे दिसून येतात.

स्वराज्याचे २९ विभाग –

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १) पुणे व वाई | २) मावळ | ३) सातारा | ४) कराड | ५) खटाव | ६) माणदेश |
| ७) मलकापूर | ८) तारळे | ९) पन्हाळा | १०) आजरा | ११) जुन्नर | १२) कोल्हापूर |
| १३) रामनगर | १४) भीमगड | १५) भिवंडी | १६) कल्याण | १७) महाड | १८)जावळी |
| १९) राजापूर | २०) कोळे | २१) कुडाळ | २२) बेळगांव | २३) लक्ष्मीश्वर | २४) गदग |
| २५) कोप्पल | २६) हल्ल्याळ | २७) संपगाव | २८) भुजंगगड | २९) नवलगुंद | |

न्या. म. गो. रानडे यांनी स्वराज्य (स्वतःच्या अंमलाखालील मुलुख) व मोगलाई (स्वराज्याच्या बाहेरील परकीयांच्या अंमलाखालील मुलुख) हे दोन भाग केले होते. [२४]शिवाजी महाराजांच्या अंमलाखालील प्रदेशाचे प्रांत (जिल्हा) असे अनेक भाग केले होते.

पुण्याजवळील वडिलोपार्जित जहागिरीशिवाय त्यांच्या ताब्यातील प्रांत –

१) मावळ प्रांत - सभोवतालचे १८ डोंगरी किल्ले

२) वाई, सातारा आणि कऱ्हाड हे प्रांत - भोवतीचे १५ डोंगरी किल्ले

३) पन्हाळा प्रांत व १३ डोंगरी किल्ले

४) दक्षिण कोकण प्रांत व ५८ डोंगरी किल्ले व जलदुर्ग    ५) ठाणे प्रांत - व १२ किल्ले

६) त्रिंबक    ७) बागलाण प्रांत व ६२ डोंगरी किल्ले    ८) वनगडप्रांत

९) बिदनूर    १०) कोल्हार    ११) श्रीरंगपट्टण व १८ किल्ले

१२) कर्नाटक प्रांत व १८ किल्ले    १३) वेलारेप्रांत – २५ किल्ले

१४) तंजावर प्रांत व ६ किल्ले

मल्हार रामराव चिटणीस यांनीही असेच १४ प्रांत नमूद केले आहेत. [२५]

---

२३. Shivaji the Great Vol IV: Dr. Balkrushna, Taraporwala Bombay, 1932, p. 48. शिवराज्य व शिवकाल : वा.कृ.भावे, वरदा प्रकाशन, द्वितीया आवृत्ती, वर्ष १९९८, पानं ११६.भावेंच्या मते सर्व परगणे सारख्या क्षेत्रफळाचे नसत. पूणे परगणा फार मोठा. त्यात सुपे, रोहिडा, कसबे ओतूर व कर्यात पाटस इ.चा समावेश होतो. म्हणजे नैऋत्येस भोर, पूर्वेस पाटस, उत्तरेस ओतूर व कर्यात पाट्स इतका विस्तीर्ण पट्टा पुणे परगण्यात मोडत होता.

२४. Rise of the Maratha Power : M.G.Ranade, Mumbai,reprint,1961, p. 117 – 118.

२५. The Maratha supremacy : Ed. Majuandar & Dighe, P. 543.

डोंगरी किल्ला व त्याच्या पायथ्याचा सभोवारचा प्रदेश हा राज्याचा १ तुकडा मानणे. हे शिवाजीं महाराजांच्या राज्यपध्दतीचे तत्व होते. असा बखरीमध्येही उल्लेख सापडतो. [२६]

निरनिराळया अभ्यासकांच्या मतानुसार शिवाजींचा स्वराज्यातील प्रदेश वेगवेगळा आहे. पण शाहूंच्या जाबता स्वराज्य यातील प्रांतवार यादी ही शिवाजी राज्याच्या प्रांताची प्रातिनिधीक यादी आहे असे डॉ. एस.एन.सेन म्हणतात.[२७] त्याचे कारण ही ते पुढीलप्रमाणे देतात, प्रशासन कारभारात सुधारणा करण्याचा कल संभाजीचा नव्हता आणि राजारामाला तसा मोकळेपणा मिळालाच नाही. म्हणूनच छत्रपती शाहूच्या राज्यारोहणापूर्वी राज्याच्या प्रांत रचनेत फारसा बदल झाल्याची शक्यता दिसत नाही.

**३.६ <u>महसूल सुधारणेचे तीन टप्पे</u> -** शिवाजी महाराजांच्या कारकीर्दीत जमीन महसूल हाच महसूलाचा मुख्य आधारस्तंभ होता. शिवाजी महाराजांच्या काळात महसूल वसुलीच्या दृष्टीने स्वराज्य व मोगलाई असे दोन विभाग केलेले होते. स्वराज्य याचा अर्थ शिवाजी महाराजांच्या ताब्यात असलेला प्रदेश तर मोगलाई म्हणजे परकियांच्या ताब्यात राहून शिवाजी महाराजांना खंडणी देणारा प्रदेश होय. शिवाजी महाराजांच्या कारकीर्दीत स्वराज्यातील महसूलाची ३ वेळा मोजणी करण्यात आली. शिवाजी महाराजांच्या बालपणी दादाजी कोंडदेव व नंतर मोरोपंत पिंगळे व अण्णाजी दत्तो यांनी जमीनीची मोजणी करुन जमीन महसूलात एकसुत्रीपणा आणण्याचा प्रयत्न केला. दादोजी कोंडदेवने मलिक अंबरच्या तत्वानुसार जमीन महसूलाची आखणी केली होती. जमीनदारी पध्दतीमध्ये योग्य त्या सुधारणा करुन दादोजीने अनेक ठिकाणी जमिनी लागवडीखाली आणल्या व जमीन महसूल वाढवला. त्याने रयतवारीची पध्दत स्वराज्यात सुरु केली. मोरोपंत पिंगळयांनी जमीन महसूलामध्ये सुधारणा करुन ही महसूल पध्दती लोकाभिमुख करण्याचा प्रयत्न केला.

अण्णाजी दत्तोने केलेल्या सुधारणेप्रमाणे या महसूल व्यवस्थेत अनेक बदल करण्यात आले. शिवाजी महाराजांनी राज्यकारभाराच्या सोयीसाठी स्वराज्याचे भाग पाडले होते. मंत्रीमंडळातील एक प्रधान सरकारकून प्रत्येक विभागावर प्रमुख म्हणून नेमला होता. आणि त्या विभागाची संपूर्ण जबाबदारी त्यांच्यावर सोपविली होती असे सभासदाने म्हटले आहे. [२८]

---

२६. Administrative system of the Marathas: Dr. S.N. SEN, University of Calcutta, Calcutta 1925, p. 34.

२७. Administrative system of the Marathas, Dr. S.N. SEN, University of Calcutta, Calcutta 1925, page 24. शाहूंच्या जाबता स्वराज्य यात याचा उल्लेख आहे, हे कागदपत्र अर्धे मराठी अर्धे फारशी भाषेत असलेले शंकरजी मल्हारचे असावेत. पेशवे दफ्तरातून निवडलेले कागद -जाबता स्वराज्यः शंकरजी मल्हार, (वतनपत्रे – निवाडापत्रे), पान ५५.

**शाहूच्या जाबता स्वराज्यातील प्रांत खालीलप्रमाणे –**

१) सुभा रामनगर घणदेवी सहित
२) सुभा जौहर प्रांत
३) सुभा भिवंडी (१२ तालूके)
४) कल्याण (२० तालूके)
५) कल्याण चेऊल (६ तालूके)
६) कल्याण राजपूरी (१२ तालूके)
७) कल्याण जावळी (१८ तालूके)
८) कल्याण दाभोळ (११ तालूके)
९) कल्याण राजापूर (१८ तालूके)
१०) कल्याण कुडाळ (१५ तालूके)
११) कल्याण प्रांत भिमगड (१५ तालूके)
१२) कल्याण प्रांत फोंडे (५ तालूके)
१३) कल्याण प्रांत अकोले (५ तालूके)
१४) कल्याण पूणे (६ तालूके)
१५) बारामती
१६) इंदापूर
१७) सुभा प्रांत मावळ (१३ तालूके)
१८) सुभा प्रांत वाई (४ तालूके)
१९) सुभा प्रांत सातारा (६ तालूके)
२०) सुभा प्रांत कराड (९ तालूके)
२१) सुभा प्रांत खटाव (कसबा खटाव वगळून) (११ तालूके)
२२) सुभा प्रांत माण (४ तालूके)
२३) सुभा फलटण महाल
२४) सुभा प्रांत बेळगाव
२५) सुभा संपगाव
२६) सुभा गदग
२७) सुभा लक्ष्मेश्वर
२८) सुभा नवलगुंद
२९) सुभा कोप्पल
३०) सुभा हल्याळ
३१) सुभा बेटगिरी
३२) सुभा मलकापूर (४ तालूके)
३३) सुभा प्रांत पन्हाळा (१० तालूके)
३४) सुभा तारळे
३५) सुभा आजरा (५१ तालूके)
३६) सुभा प्रांत जुन्नर
३७) सुभा प्रांत कोल्हापूर

२८. सभासद कृष्णाजी अनंत श्री. शिवछत्रपतीचे चरित्रः संपा.शं.ना. जोशी, पूणे, १९६७, पान १३.

**<u>मोरोपंत पिंगळे</u>** या मुख्य प्रधानाकडे कल्याण भिवंडीपासून कोलवण सालेरपर्यंत कोकण व वरघाटचा (घाट) प्रदेश लोहगड, जुन्नर, बारा मावळ आणि हरळयाचे घाटापर्यंत प्रदेश याला (उत्तरविभाग) स्वराज्याचा कणा म्हणता येईल हा यांना सोपविला होता.

**<u>अण्णाजी दत्तो</u>** हे सुरनीस किंवा सचिव होते. त्यांच्याकडे कोकणातील चेऊल ते दाभोळ, राजापूर, कुडाळ, बांदे, फोंडा आणि कोप्पल (कर्नाटकची हद्द) हा सारा प्रदेश दिला होता. याला तळकोकण स्वराज्याचा दक्षिण भाग म्हणता येईल.

**<u>दत्ताजीपंत</u>** हे मंत्री अथवा वाकणीस म्हणून मंत्रीमंडळात होते. त्यांच्याकडे वरघाटावरील वाई प्रांतापासून तुंगभद्रापर्यंत कर्नाटकचा प्रदेश होता.

पन्हाळा हे त्यांचे प्रमुख ठाणे होते. या प्रदेशास देश किंवा नैऋत्य विभाग म्हणता येईल.

आधुनिक महाराष्ट्राचा कुलाबा (रायगड) रत्नागिरी, नाशिक, पूणे, सातारा व कोल्हापूर या जिल्हयाचा बहुतांशी भाग हा स्वराज्यांत मोडत होता.

**<u>शिवकाळातील जमीनीची वर्गवारी</u> -**

शिवाजी महाराजांनी जमीनीची पहाणी करून जमिनीची वर्गवारी केली आणि त्या प्रमाणे सारा आकारला जाऊ लागला. शिवकाळात जमिनीची मोजणी करण्यासाठी 'शिवशाही काठी' वापरली जात असे. या काठीच्या लांबीविषयी सभासद बखरीत म्हटले आहे. [२९]

"पांच हात पांच मुठीची काठी, हात चवदा तसूच असावा हात व तसू मिळून बैंशी तसूंची लांबी काठीची, वीस काठया औरस चौरस त्याचा बिघा एक. बिघे एकशे वीस यांचा एक चावर. अशी जमिन मोजून गावंची गावं चौकशी केली."

या शिवशाही काठीची लांबी सर्व ठिकाणी सारखीच नव्हती. काही ठिकाणी ८२ तसूंच्या ऐवजी ८४ तसूंची काठी असल्याचेही आढळते. या पध्दतीने केल्या जाणाऱ्या जमिनीच्या मोजणीला 'बिघावणी' 'चावराणा' किंवा 'चकबंदी' म्हणत. शिवाजीने मिरासदारांचे अधिकार कमी केले, गावांच्या हद्‌दी ठरवून दिल्या, प्रत्येक शेतक-याकडे असलेल्या जमिनीचे क्षेत्रफळ निश्चित केले. शेतक-याने एकंदर उत्पन्नाचे तीन हिस्से स्वतःकडे ठेवून दोन हिस्से सरकारात द्यावे. याला महत्व दिले.

---

२९. शिवकालीन महाराष्ट्रःडॉ. अ.रा.कुलकर्णी, राजहंस प्रकाशन, पुणे, १९९३, पान ६२.

अण्णाजी दत्तोने एकंदर उत्पन्नाच्या ३३ टक्के कर निश्चित केला होता. परंतू शिवाजी महाराजांनी सर्व कर आणि ज्यादा आकार काढून टाकून ते प्रमाण ४० टक्के असावे असे ठरविले. [३०] नविन येणाऱ्या रयतेस गुरे-ढोरे, बी-बियाणांसाठी पैसे द्यावेत आणि ते नंतरच्या दोन-चार वर्षांनी त्याच्या ऐपतीप्रमाणे वसूल करून घेतले जात असत. [३१] शिवाजी महाराजांचा मंत्री मोरोपंत पिंगळे याच्याकडून करमुक्त जमिनी बाजारपेठ वसविण्यासाठी दान दिल्या जात असत. [३२]

जर्व्हिसने केलेल्या कोकणच्या पाहणीत जी अचूक आकडेवारी आहे त्यात शिवकालीन माहिती आढळते. [३३]

जिल्हयांच्या प्रत्येक महालातील १-२ गावांच्या पिकांची लागोपाठ तीन वर्षे पहाणी करून त्या माहितीच्या आधारावर त्याने तालुकानिहाय प्रत्येक प्रकारच्या जिल्हयावरील कर निश्चित केला. तो देखील निम्मा धान्य रूपाने आणि निम्मा ठराविक रक्कमेत सवलतीच्या दराने अशा स्वरूपात घेतला जाई.

**भात शेतीचे वर्गीकरण-**

मूळ किंवा ठेंप भात शेतीचे वर्गीकरण १२ प्रकारचे केले होते. त्यातील पहिले चार प्रकार आजही त्याच नावाने ओळखले जातात.

अव्वल पहिल्या आणि उत्तम प्रतीच्या भात शेतीवर १२ १/२ मण कर

दूम किंवा दुय्यम म्हणजे दुसऱ्या प्रतीच्या भात शेतीवर १० मण कर

सीम म्हणजे तिसऱ्या प्रतीच्या भात शेतीवर ८ मण कर

चारूम किंवा चार दूम म्हणजे चौथ्या प्रतीच्या भात शेतीवर ६ १/२ मण कर

डोंगरी जमिनीवर सारा बिघ्यावर न आकारता नांगरावर आकारण्यात येत असे.

कोकणातील नाचणी, हरीक, वरी यासाठी पुढीलप्रमाणे दर असलेले दिसून येतात.

| | |
|---|---|
| नाचणी | उच्च प्रतीच्या जमिनीत ३ १/४ मण |
| | कनिष्ठ प्रतीच्या जमिनीत ३ मण |
| वरी | उच्च प्रतीच्या जमिनीत ३ मण |
| | कनिष्ठ प्रतीच्या जमिनीत २ १/२ मण |
| हरीक | ३ मण |

३०. The Statistical survey of Kokuan: Major Jervis- page 94 - 97
३१. सभासद कृष्णाजी अनंत श्री. शिवछत्रपतींचे चरित्रः संपा. शं.ना.जोशी, पूणे,१९६०, पान ३२.
३२. मराठयांच्या इतिहासाची साधनेः वि.का.राजवाडे, म.इ.स.मं.खं. ८, पान २४.
३३. The Statistical survey of Kokuan: Major Jervis, page 94 - 97 .

**तक्ता क्र. ५  जमिनीच्या प्रकारानुसार सारा -**

| | | |
|---|---|---|
| जंगल / कुरण | दरबिघा | ८ मण |
| खारवट(नदी किंवा समुद्रकाठ) | दरबिघा | ६ १/४ मण |
| बैले (मैदान किंवा माळ) | दरबिघा | ६ १/४ मण |
| खडी (खडकाळ – जमिन) | दरबिघा | ६ १/४ मण |
| तुरवट किंवा कटाणी(तागाच्या लागवडीस योग्य) | दरबिघा | ५ मण |
| वटवृक्ष | दरबिघा | ५ मण |
| रूपल | दरबिघा | ८ मण |
| रूही | दरबिघा | ५ मण |

ऋतूमानाप्रमाणे दराचे प्रमाण ठरत असत. जेव्हा एखाद्या खेडयाची जमाबंदी केली जाई तेव्हा तेथील माळ जमिन त्यातून वगळण्यात येई. [३४] परंतू जसजशी लागवड वाढत गेली तसतशी अशा जमिनीची मागणी वाढून गेली आणि सर्व प्रकारची माळराने हळूहळू लागवडीखाली आणण्यात आली. सुरूवातीला अशा जमिनीवर कर माफ असे. परंतू कालांतराने त्यावरही माफक कर आकारले जात. अशा सवलतींमुळे खडकाळ, माळावरील, थोडीशी पानथळ जमिनदेखील गरीब शेतकऱ्यांनी लागवडीखाली आणली. ती भातशेतीला अनुकूल ठरली. जर्व्हिसच्या मते अशा जमिनीवरील कर आकारणी दरबिघा नसून हल किंवा नांगरणी प्रमाणे असे. [३५] काही ठिकाणी अशा प्रकारच्या जमिनीचे ५-६ बिघे म्हणजे १ बिघा मानण्यात येत असे. तसेच जमीनीवरील कराचा पिकनिहाय दर जमीनीच्या प्रत किंवा कसाप्रमाणेच पिकाच्या प्रकारावरही अवलंबून असे. उदा. नाचणीचा कर सुपीक जमीनीवर दर नांगर ३ १/४ मण आणि निकस जमीनीवर दर नांगर ३ मण.

वरीचा दर सुपीक जमीनीवर दर नांगर ३ मण आणि निकस जमिनीवर  नांगर २ १/२  मण.

उसावर पाटस्थळ प्रत्येक बिघ्याला २ ।। होन   व मोटस्थळ प्रत्येक बिघ्याला २ होन.

भाजीपाला पाटस्थळ प्रत्येक बिघ्याला २  होन व मोटस्थळ प्रत्येक बिघ्याला १।। होन.

सुंठ पाटस्थळ प्रत्येक बिघ्याला ३ होन व मोटस्थळ प्रत्येक बिघ्याला २ होन.

केळीची बाग प्रत्येक बिघ्याला २ होन.

तांदुळ सकस जमीनीतून प्रत्येक बिघ्याला १० मण व मध्यम दर्जा प्रत्येक बिघ्यास ८ मण.

३४. मराठयांच्या इतिहासाची साधने खं. २०:  वि. का. राजवाडे, म.इ.स.मं., पान ९४.

३५. The Statistical survey of Kokuan: Major Jervis, pages 94-97.

जर्व्हिसने "कोकणच्या इतिहासात" तांदळाच्या जमीनीचे १२ प्रकार व त्यानुसार केलेली सारा आकारणी स्पष्ट केली आहे. [३६]

एकूणच शिवकाळातील जमीन महसूलाची आकारणी ही कोणत्याही एकाच ताठर अशा नियमानुसार केलेली दिसत नाही. तर जमीनीची प्रत, पाणी, हवामान, पिक यावर सारा आकारणी अवलंबून होती. तसेच शिवकाळात सारा वसूली करताना ती रोख आणि धान्य रूपात झालेली आढळते. प्रत्येक पिकाला वेगळा कर आकारला जात असे. पहिल्या वर्षी सारा ठरल्यानंतर पुढे एखादा वाद उत्पन्न होईपर्यंत साधारणतः त्याच माहितीच्या आधारे सारा आकारला जात असे. म्हणूनच डॉ. कुलकर्णी म्हणतात की, लागवडीखाली असणाऱ्या जमीनीची मोजमापणी दरवर्षी होत नसावी. [३७]

**<u>कर रचना</u> -**

शिवाजी महाराजांनी जमीनी व्यतिरिक्त अनेक बाबींवर छोटया मोठया प्रमाणात कर लावले होते. डॉ. अ. रा. कुलकर्णी यांनी प्रत्यक्ष कर, अप्रत्यक्ष कर आणि संकिर्ण कर असे ३ प्रकार केलेले आहेत.[३८]

**अ) प्रत्यक्ष कर -** वैयक्तिक उत्पन्न, विविध व्यवसाय व मालमत्ता यावर कर लावले जात असत. तसेच परगणा व खेडेगावातील वतनी अधिकाऱ्यांकडून हा कर वसूल केला जात असे. [३९] अशा करांमध्ये इनामपट्टी, मिरासपट्टी, देशमुखपट्टी सरदेशमुखीपट्टी असे संबोधले जाई. परंतु हे सर्व कर नियमितपणे वसूल केले जात होते असे म्हणता येणार नाही. [४०]

**इनामपट्टी -** इनामदारांना दिलेल्या जमीनी सारामुक्त असत त्यांच्या मोबदल्यात हा कर वसूल केला जात असे. परंतु गोसावी, मठाधिकारी यांना मात्र इनामी जमीन असूनही हा कर द्यावा लागत नसे. [४१]

---

३६. The Statistical survey of Kokuan: Major Jervis,, pages 94-97.
३७. शिवकालीन महाराष्ट्रः डॉ. अ.रा. कुलकर्णी, राजहंस प्रकाशन, पुणे, द्वितीयावृत्ती १९९७, पान ६३. मराठयांच्या इतिहासाची साधने खंड २०ः वि.का.राजवाडे, , पान ९४.
३८. शिवकालीन महाराष्ट्र : डॉ. अ.रा. कुलकर्णी, राजहंस प्रकाशन,पुणे, द्वितीयावृत्ती १९९७, पान १०७.
३९. शिवकालीन महाराष्ट्र : डॉ. अ.रा. कुलकर्णी, राजहंस प्रकाशन,पुणे, द्वितीयावृत्ती १९९७, पान १०७.
४०. शिवकालीन महाराष्ट्रः डॉ. अ.रा. कुलकर्णी, राजहंस प्रकाशन,पुणे, द्वितीयावृत्ती १९९७, पान १०७.
४१. शिवकालीन महाराष्ट्रः, डॉ. अ.रा, कुलकर्णी, राजहंस प्रकाशन, पुणे, द्वितीयावृत्ती १९९७, पान ११०., मराठेकालीन संस्था व विचारः प्रा.गायकवाड, प्रा.थोरात, प्रा.डॉ.सरदेसाई, प्रा.हनमाने, फडके प्रकाशन, १९८२, पान २६८.

**मिरासपट्टी –** मिरासदार म्हणजे खेडेगावातील जमीनीचे मालक त्यांच्या फायद्या पैकी काही भाग कराच्या रूपाने वसूल केला जात असे. त्याला मिरासपट्टी असे म्हटले जाई. [४२] "उदा. मावळ भागातील फक्त देशमुख, देशकुलकर्णी, पाटील व कुलकर्णी यांच्याकडून ही रक्कम वसूल केली जात असे". रामचंद्रपंत अमात्य आपल्या आज्ञापत्रात म्हणतात की, राजाने प्रत्येक वर्षाच्या शेवटी किंवा दोन वर्षांनंतर वतनदाराकडून कर गोळा करावेत. हाच कर कदाचित मिरासपट्टी असण्याची शक्यता आहे.[४३]

**व्यवसाय कर -** व्यक्तीच्या व्यवसायावर हा कर आकारला जात असे. हा कर वस्तुच्या व रोख रक्कमेच्या दोन्ही स्वरूपात वसूल केला जात असे.

**सराफपट्टी -** सोन्या चांदीच्या व्यवसायावर बसविला जाणारा कर म्हणजे सराफ पट्टी होय.

**धनगर पट्टी -** शेळया - मेंढया पाळणे, मेंढयांची लोकर काढून विकणे किंवा तिच्यापासून घोंगडी, पासोडी तयार करण्याची काम धनगर करीत असत. या सर्व कामावर त्याला कर द्यावा लागत असे.

**माग टका -** हा कर साळी, कोष्टी, मोमीन या विणकरांच्याकडून वसूल केला जात असे तो रोख रक्कमेच्या किंवा वस्तुच्या रूपाने वसूल केला जात असे. रोख रक्कम म्हणजे प्रत्येक मागाला पाव टक्का कर असे व वस्तूच्या स्वरूपात म्हणजे एक साडी किंवा धोतर किंवा एक पटका असे.

**पायपोसी -** हा चर्मकाराकडून वसूल करावयाचा कर होता. प्रतिवर्षी पाटील व कुलकर्णी यांना एक चप्पल जोड द्यावी लागत असे. [४४]

**तेलपट्टी -** हा कर तेल्याकडून वसूल केला जात असे.

**कारागिरावरील कर -** परीट, सुतार, शिंपी, न्हावी, सोनार, लोहार, तराळ, चांभार, कुंभार, मांग, कोळी या गावातील कारागिरांकडून कर वसूल केला जात असे. त्याचे प्रमाण पाव टक्का असे. [४५]

---

४२. मराठेकालीन संस्था व विचार :प्रा.गायकवाड, प्रा.थोरात, प्रा.डॉ.सरदेसाई, प्रा.हनमाने, फडके प्रकाशन, १९९०, पान २६८.

४३. आज्ञापत्रः अमात्य रामचंद्रपंतः संपा.ग.ह.खरे, स.रा.भिडे, पुणे, १९३४, प्रकरण ६ वे. मराठेकालीन संस्था व विचारः प्रा.गायकवाड, प्रा.थोरात, प्रा.डॉ.सरदेसाई, प्रा.हनमाने, फडके प्रकाशन, १९९०, पा २६.

४४. मराठयांच्या इतिहासाची साधनेः वि.का.राजवाडे (सं.), खंड २०, (१२), शहाजीने आपल्या जहागिरीतील कारकुनाला चांभाराकडून चप्पल जोड वसूल करण्याची अशा एक पत्राद्वारे दिली आहे. (पे. दफ्तर पान ३१:१९)

४५. शिवकालीन महाराष्ट्रः, डॉ. अ.रा, कुलकर्णी, राजहंस प्रकाशन, पुणे, द्वितीयावृत्ती १९९७, पान १११.

**मोहतर्फा** - हा कर व्यापाऱ्यांकडून वसूल करावयाचा कर होता. हा कर खेडेगावातील अधिकाऱ्यांकडून व खेडयातील लोकांकडून वस्तु किंवा रोख रक्कमेच्या स्वरूपात वसूल केला जात असे. यात किराणा भूसार व्यापारी, कापड, दुकानदार, फळ-विक्रेते, भाजी-विक्रेते, खाटिक या किरकोळ विक्रत्यांचा समावेश होत असे. [४६] यातील बरेचसे किरकोळ विक्रेते आठवडयाच्या बाजारात देशमुखाला काही कर देऊन बाजारात बसण्याची परवानगी घेत असत.

**हेजिबपट्टी** - गावाच्या कामासाठी आपला प्रतिनिधी जर सरकारकडे पाठवत असतील तर त्याच्या खर्चासाठी लागणारी रक्कम गावकऱ्यांकडून गोळा केली जात असे त्याला हेजिबपट्टी म्हटले जाई.

**वेठबिगारी** - बाजारभावापेक्षा कमी व कुशल कामागरांच्याकडून काम करून घेण्याची सक्ती म्हणजे वेठबिगारी. वंशपरांपरागत अधिकाऱ्यांचे अशा लोकांकडून काम करून घेणे विशेष उत्पन्न मानले जाई.

**सिंहासनपट्टी** - इ.स. १६७४ मध्ये शिवराज्याभिषेकाच्या वेळी वतनदारावर हा कर आकारण्यात आला होता. [४७]

**ब) अप्रत्यक्ष कर –**

**जकात** – परदेशातून स्वराज्यात येणाऱ्या व बाहेर जाणाऱ्या मालावर जकात कर बसविला जात असे. चौल, दाभोळ, वेंगुर्ला, रत्नागिरी ही शिवकाळातील आयात -निर्यातीची प्रमुख बंदरे होती. पोर्तुगीज व मुस्लिम प्रदेशांचा महाराष्ट्राशी व्यापारी संबंध येत असे. या प्रदेशातून येणाऱ्या व जाणाऱ्या मालावरही जकात आकारली जात असे. राजापूर वखारीतील पिटर मुंडी याने परदेशातून स्वराज्यात येणाऱ्या ब्रिटीशांच्या मालावर २ १/२ टक्के जकात वसूल केली जाते. जकातीमध्ये, कापडावरील जकात, जनावरांच्या खरेदी विक्रीवरील शिंगोटी कर, गुलामांच्या खरेदी-विक्रीवरील कर, मिठावरील कर असे कर होते. बाजारातील जनावरांच्या खरेदी – विक्रीवर आकारला जाणारा कर म्हणजे 'शिंगशिंगोटी' कर. हा कर जनावरांवरील जकातीसंदर्भात खरेदी व विक्रीदार दोघांना दयावा लागत असे. [४८]

---

४६. शिवकालीन महाराष्ट्र : डॉ. अ.रा. कुलकर्णी, राजहंस प्रकाशन, पुणे, द्वितीयावृत्ती १९९७ पान ११२.
४७. मराठयांच्या इतिहासाची साधने खंड २०: वि.का.राजवाडे, पुणे, पान १२.
४८. शिवकालीन महाराष्ट्र : डॉ. अ.रा. कुलकर्णी, राजहंस प्रकाशन, पुणे, द्वितीयावृत्ती १९९७, पान ११६.

स्त्री अथवा पुरूष गुलामांची खरेदी करणाऱ्यास दरडोई ५ लारी कर दयावा लागत असे. [४९] समुद्रकिनारी ज्या ठिकाणी मीठ तयार होते तेथील मीठागरांवर हा कर दर मणाला १२ रूके इतका असे. [५०] उदा, कुडाळ.

**क) <u>संकिर्ण किंवा इतर कर</u>**

**सादिलवार पट्टी –** या करात इनामदारपट्टी, मिरासपट्टी, मोहतर्फा, लग्नटका, इमारत पट्टी इ. समावेश होतो. डॉ.अ.रा.कुलकर्णी म्हणतात,"हा कर नियमितपणे वसूल केला जात असावा." [५१]

**खर्चपट्टी** -सार्वजनिक खर्चासाठी जो कर वसूल केला जात असे त्याला गावखर्च असेही म्हणत.

**वराडटका किंवा लग्नटका –** डॉ. सेन म्हणतात ही संकल्पना अस्पष्ट आहे. हा कर लग्न किंवा लग्नाची वरात यावर पाव रूपया असा बसविला जात असे. [५२]

**घरटका-** हा एक नित्याचा कर असून प्रतिघरटे हा कर लादला जात असे. टका हे एक चांदीचे नाणे असून प्रत्येक घरावर १ टका कर होता.असे म्हणणे योग्य नाही तरी टका या शब्दाचा अर्थ पटट्ी असा घेणे योग्य होईल.

**तुटपट्टी व नुकसानपट्टी –** द्रवपदार्थ (तेल-तुप) किंवा कापड कराच्या रूपाने वसुल केलेले सरकारकडे जाईपर्यंत जी घट, गळती चोरी होत असे ती भरून काढण्यासाठी हा कर बसविला जात असे, असे डॉ. बाळकृष्ण स्पष्ट करतात. [५३]

याशिवाय गावखर्चासाठी गावातील लोकांकडून काही कर वसूल करीत असत. ते म्हणजे उल्फापट्टी (सरकारी अधिकाऱ्यांना मिळणारा शिधा), जंगमपट्टी (जंगम समाजाकडून), दसरापट्टी (सणासाठीचा खर्च), तोरण भेटी (राजा/मोठा पाहुणा-स्वागताचा खर्च), मेजवानीपट्टी (सरकारी अधिकाऱ्यांची खाण्यापिण्याची व्यवस्था - खर्च), ठाणे पट्टी (लष्करी छावणीच्या ठिकाणाच्या खर्च वसूलीसाठी कर) इत्यादी.

---

४९. शिवकालीन महाराष्ट्र : डॉ. अ.रा. कुलकर्णी,राजहंस प्रकाशन, पुणे, द्वितीयावृत्ती १९९७, पान ११६.
५०. मराठयांच्या इतिहासाची साधनेः वि.का.राजवाडे, खंड ८ पृष्ठ २७, शिव चरित्र साहित्य खंड ९ (विविध संपादक) पुणे, १९२६–१९८३ पान ९.
५१. शिवकालीन महाराष्ट्र : डॉ. अ.रा. कुलकर्णी, राजहंस प्रकाशन, पुणे, द्वितीयावृत्ती १९९७, पान ११८(डॉ. आळतेकर अ.स.हे वरील सर्व करांचा समावेश सादिलवार पट्टीत करतात पण डॉ. कुलकर्णी आळतेकरांचे स्पष्टीकरण अमान्य करतात.)
५२. Administrative system of the Marathas: Dr. S.N. SEN, University of Calcutta, Calcutta 1925. page 65.
५३. Shivaji the Great Vol IV: Dr. Balkrushna, Taraporwala, Bombay, 1932, page 117.

**<u>चौथाई व सरदेशमुखी</u> –**

शिवाजी महाराजांची गंगाजळी भरत असे ती जमीन महसूल, जकात कर किंवा टांकसाळीतील उत्पन्न इत्यादीनी नव्हे, तर चौथाई आणि सरदेशमुखी हीच प्रमुख साधने होती. मराठेकालीन महसूलामध्ये दोन वेगळया प्रकारची उत्पन्नाची साधने ही सतत दिसून येतात.चौथाई व सरदेशमुखी या दोन बाबींपासून मराठयांना सतत उत्पन्न मिळत असे. तिचे स्वरुप अनियमित असे. मराठयांना शिवाजी महाराजांच्या काळापासून हे हक्क वसूल करण्यासाठी सतत शस्त्रबळाचा वापर करावा लागत असे. शिवाजी महाराजांनी ही गोष्ट जाणलेली होती की कोणत्याही व्यक्तीला सैन्याची मदत असल्याशिवाय तिच्याकडून शत्रूचा पराभव होणे शक्य नाही. म्हणून शहाण्या राजाने सतत चांगले सैन्य आपल्या पदरी बाळगून शत्रूचा पराभव केला पाहिजे., परंतु असा पराभव करीत असताना अफाट पैसा आवश्यक आहे ही गोष्ट ध्यानात ठेवली पाहिजे. म्हणून हे तत्व लक्षात घेऊन शिवाजी महाराजांनी आपले राज्य चांगले बळकट करण्यासाठी शत्रूच्या प्रदेशातून पैसा वसूल केला. चौथाई व सरदेशमुखी या दोन बाबींपासून मिळणारे उत्पन्न हा शिवाजी महाराजांच्या राज्याचा एक प्रमुख आधार होता. Shivaji supplemented his income by living a contribution on the neighbouring Mughal ternitories. This contribution which came to one fourth of the land revenue began to be called chauthai (one-fourth) or Chauth. [५४]
या अनियमित बाबींच्यामुळे जो पैसा उभा राहिला त्याच्या आधारावरच शिवाजी महाराजांनी आपली अर्थव्यवस्था सुव्यवस्थित राखली.

शांततेच्या काळात देखील आवश्यक त्या अर्थप्राप्तीसाठी शिवाजी महाराजांची भिस्त आपल्या मुलकी अधिकाऱ्यांपेक्षा लष्करी अधिकाऱ्यांवरच अधिक होती. या महान मराठा राजांना या वाचून दुसरा पर्यायच नव्हता. हयातभर त्यांना मोंगलांसारखा मातबर शत्रूशी आणि विजापूरकरांच्या सत्तेविरुद्ध झुंज द्यावी लागली. या शिवाय जंजिऱ्याचा हबशी, गोव्याचे पोर्तुगीज, आणि कोळी राजे या सारख्या लहान लहान राजांच्या आणि मांडलीकांच्या उपद्रवाला तर अंतच नव्हता. नव्याने जिंकलेल्या राज्याचे रक्षण करण्यासाठी त्यांना सैन्याची जमवाजमव करावी लागली, दुर्गमखिंडी लढविण्यासाठी अगणित किल्ले बांधावे लागले. सिद्दी नौदलाच्या चाचेगिरीपासून बचाव करण्यासाठी लढाऊ गलबतांचा ताफा सुसज्ज ठेवावा लागला. त्यासाठी शस्त्रात्रे खरेदी करणे आवश्यक होते. अशा कामासाठी

---

५४. A History of Medieval India: Satish Chandra, Orient Longman, Hydrabad, Re.pub. 2008, pg 362.

त्यांना संपत्तीची गरज होती. या बाबतीत मराठयांना निसर्गाची अनुकूलता नव्हती. मावळयांच्या कष्टाच्या मानाने डोंगरदऱ्यातील पीक फारच तुटपुंजे होते. त्यामुळे शिवाजी महाराजांना अशा मर्यादित साधन संपत्तीवर स्वराज्यातील उत्पादन वाढविण्याची पराकाष्ठा करुनही आपली फौज आणि आरमार पोसणे केवळ अशक्य होते. त्यामुळे फौजफाटा ठेवण्यासाठी लढाया करण्याशिवाय गत्यंतर नव्हते.

परंतु चौथाई आणि सरदेशमुखी ही युद्धातील लुटीपेक्षा पूर्णपणे वेगळी होती. ती बऱ्याच प्रमाणात कायम स्वरुपाची खंडणी होती. चौथाई म्हणजे बलवानाने दुबळयाकडून वसूल केलेली खंडणी होय. बिदनूरचा राजा आणि सोंडयाचा अधिपती यांनी १६७६ साली खंडणी देण्याचे मान्य केले याचे कारण त्यावाचून त्यांना गत्यंतर नव्हते. शिवाजी महाराजांनी आपल्या भक्कम फौजेनिशी त्यांच्या प्रमुख ठाण्यावर हल्ला केला होता, आणि त्यांना प्रतिकार झालाच असता तर त्यांचा पूर्णपणे बीमोड करण्यात आला असता. बाळाजी विश्वनाथाच्या मुत्सद्देगिरीमुळे जेव्हा शाहूला चौथाईचा शाही परवाना मिळाला तेव्हा मराठयांना चौथाई वसूल करण्याचा हक्क मिळाला. अर्थातच मराठा शिलेदारांच्या तलवारीची जरब नसती तर शाही फर्मान निरर्थक ठरले असते.

लष्करी सामर्थ्याच्या अभावी कोणत्याही राजाने किंवा अधिपतीनें, मुसलमान व हिंदु, शिवाजीचा चौथाई हक्क मान्य केला नसता आणि बळकट फौजेच्या अभावी नियमित वसूली मिळणे केवळ अशक्य होते. म्हणूनच चौथाई म्हणजे राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय असे संकेत झुगारुन लष्करी बळावर वसूल करण्यात आलेली लष्करी खंडणी होती असे मानले जाते.

चौथाई ही संकल्पना काही इतिहासकारांच्या मते -

सर जॉन माल्कम यांच्या मते, चौथाई म्हणजे एकंदर महसुलाच्या १/४ इतका महसूल होय. या हक्कालाच मराठयांनी जारी केलेला पारंपारिक कर म्हणावयास हरकत नाही. “Chouth as the term implies, the fourth of the revenue.” [५५]

आर्चीबाल्ड कॉन्स्टेबल म्हणतो की, चौथाई म्हणजे राज्याच्या एकंदर महसुलाच्या १/४ इतके उत्पन्न होय. हा हक्क शत्रू पक्षाकडून त्यांचे नुकसान होऊ नये म्हणून वसूल केला जात असे. “a payment equal to one fourth; hence the name of the actual revenue collections of the state, demanded as the price for forbearing to ravage blackmail, in fact.” [५६]

---

५५. Memoir of Central India ,Vol.I : Major General Sir John Malcolm ,1880, Page 54.

५६. Travels in the Mogual Empire (A.D.1656-68) : by Francois Bernier,Tr. & annotated by Mr. Archibald Constable (A.C. 1891), Page 460.

ए. सी. लॅलच्या मते चौथाईचा हक्क म्हणजे लूटमार, जाळपोळ यांच्या मोबदल्यात द्यावयाची रक्कम होय. “with the laternative of fire and sword.” [५७]

एलफिन्स्टनच्या मते, चौथाई म्हणजे शत्रुपक्षाकडून वसूल करावयाचा कायम स्वरुपाचा महसूल होय. हा महसूल एकंदर महसुलाच्या १/४ असे व जे प्रदेश हा वसूल देत नसत त्यांची लूटमार होत असे. “A permanent contribution of one fourth of the revenue and exempted the districts that agreed to its, from plunder as long as it was regularly paid.” [५८]

रियासतकार सरदेसाईंच्या मते चौथाईचा हक्क हा शिवपूर्व काळापासून अस्तित्वात असणारा असा एक हक्क होता. शिवाजीने पश्चिम किनाऱ्यावर पोर्तुगीजांच्या ताब्यातील प्रदेश जिंकल्यानंतर पोर्तुगीजांनी आपल्या महसुलातील १/४ महसूल शिवाजीला द्यावयाचे कबूल केले. “a practice which existed during pre-shivaji days in some of the territories conquered by the Portuguese on the West Coast, where the Portuguese settlers agreed to pay to the adjoining chieftains to avoid incessant inroads and to ensure their protection, fourth of the revenue of possessions.” [५९] डॉ. सेन यांच्या मते, चौथाई म्हणजे शत्रूपासून आपल्या प्रदेशाचे संरक्षण होण्यासाठी किंवा लूटमारीपासून संरक्षण मिळण्यासाठी द्यावयाचा कर होय.The payment of a quarter of the assessed income, to buy protection or immunity from further attacts or spoliations may be designed as Chauth. [६०]

जर चौथाई या हक्काचा इतिहास पाहिला तर असे दिसून येते की, हा हक्क शिवपूर्वकाळापासून अस्तित्वात होता. म्हणून या हक्काच्या निर्मितीचे श्रेय शिवाजीला देता येत नाही. १५७९ मध्ये पोर्तुगीज व रामनगरच्या राजामध्ये झालेल्या करारामध्ये चौथाईच्या हक्काचा उल्लेख केला आहे. रामनगरचा राजा हा पोर्तुगीजांच्याकडून त्यांच्या प्रदेशाच्या संरक्षणाबद्दल हा हक्क वसूल करीत असे. रामनगरचा राजा हा वारंवार पोर्तुगीजांच्या प्रदेशावर हल्ले करीत असे तेव्हा या हल्ल्यांपासून संरक्षण मिळण्यासाठी पोर्तुगीज लोक चौथाईचा हक्क रामनगरच्या राजाला देत असत. रामनगरच्या राजाला त्याने वारंवार वसूल केलेल्या चौथाईच्या हक्कांमुळे (राजा चौथाई) असे म्हणत असत.

---

५७. Berar Gazetteer: Bombay, 1870, Page 122.
५८. The History of India : Elphinston, 1916 , Page 617.
५९. New History of the Marathas, Vol. II : G.S. Sardesai ,1948, Page 52.
६०. मराठयांची प्रशासन व्यवस्थाः डॉ.एस. एन. सेन. (अनु. विजया कुलकर्णी), मुंबई २००३,पा.४५, Military System of the Marathas ,Chapt II: Dr. S. N. Sen, Calcutta, 1928.pg.39.

चौथाई या हक्कांसंबंधी असेही सांगता येईल की, प्रत्येक वेळेला एकंदर महसुलाच्या २५ टक्के वसूल गोळा करणे असा याचा अर्थ नव्हे. १६३५ मध्ये रामनगरचा राजा व पोर्तुगीज यांच्यामध्ये झालेल्या एका करारानुसार पोर्तुगीजांनी रामनगरच्या राजाला चौथाईच्या हक्कांबद्दल वेगवेगळया परगण्यांतून १२ १/२ टक्यांपासून १७ टक्यांपर्यंत रक्कम द्यावी असा उल्लेख आहे.

चौथाईचा हक्क हा नियमित स्वरुपाचा कर नसून एखाद्या प्रबळ व्यक्तीने शेजारी प्रांतातील जनतेकडून वसूल करावयाचा एक जादा अधिकार आहे. चौथाईच्या हक्कांबद्दल दुसरा एक विचार असा मांडण्यात येतो की, हा हक्क नकारात्मक स्वरुपाचा नाही. कोणत्या ना कोणत्या कारणाने शेजारच्या प्रदेशातून शस्त्राच्या जोरावर पैसा वसूल करणे असेच त्याचे स्वरुप आहे.

सर जदुनाथ सरकार यांच्या मते शिवाजी महाराजांची चौथाई म्हणजे एक प्रकारची खंडणीच होती. ही खंडणी त्याचे सैन्य नियमितपणे दरवर्षी वसूल करीत असे. रियासतकार सरदेसाई 'The Main Current of Maratha History' या ग्रंथात म्हणतात की, चौथाईच्या हक्कांचे स्वरुपच वेगळे असल्यामुळे हा हक्क जिंकलेल्या प्रदेशातून किंवा शत्रूच्या प्रदेशातून वसूल केला जात असे.

अर्थातच या हक्काबद्दल कोणत्याही प्रकारची कायदेशीर संमती दिसून येत नाही. शिवकाळात चौथाईचा हक्क वसूल करीत असताना मराठयांवर एक नैतिक जबाबदारी दिसून येते. ती म्हणजे ज्या प्रदेशातून चौथाईचा वसूल मराठयांना दिला जाईल त्या प्रदेशात मराठयांनी रयतेला कोणत्याही प्रकारे त्रास देऊ नये किंवा जाळपोळ, लुटालूट ही करु नये अशा प्रकारे हा हक्क जारी करणाऱ्या व्यक्तीवर आणखी एक जबाबदारी तत्वतः तरी येत असे. आणि ती म्हणजे संबंधीत प्रांतातील रयतेचे संरक्षण परकिय आक्रमणापासून करावे. शांतता व सुव्यवस्था टिकवण्यासाठी प्रयत्न करावेत. अर्थातच अशा प्रकारची ही संरक्षणाची कल्पना बऱ्याच वेळा शत्रूच्या सामर्थ्यापुढे निष्फळ ठरत असे. शिवाजी महाराजांनी चौथाईच्या हक्कात योग्य ते बदल करुन जिंकलेल्या प्रदेशातील रयतेवर अन्याय होणार नाही अशा प्रकारे हा हक्क बसविला. चौथाईचा हक्क वसूल करण्यामध्ये शिवाजी महाराजांनी लोक जुलूम करीत नसत आणि म्हणून शिवाजी महाराजांनी शेजारच्या प्रदेशातील रयत आपखुशीने शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी चौथाई देत असे.

चौथाईचा हक्क जास्तीत जास्त उदार दृष्टिकोनातून शत्रूच्या मुलखात जारी करण्याबद्दल शिवाजी महाराजांनी आखलेल्या धोरणाबद्दल डॉ. सेन म्हणतात की, शिवाजी महाराजांसारख्या थोर राजाला चौथाईचा हक्क बजावण्याशिवाय दुसरा पर्यायच नव्हता. या पैशाशिवाय स्वतःचे सैन्य व आरमार तयार करणे त्याला शक्यच नव्हते. हा हक्क जर त्याने बजावला नसता तर सर्व प्रकारचे कर अंमलात आणूनसुद्धा त्याला पुरेसा पैसा उभा करता आला नसता. म्हणून त्याच्या काकीर्दीत चौथाई हा हक्क न राहता एक कायम स्वरुपाचा कर या दृष्टीनेच त्याच्याकडे पाहत असत. या कराचे स्वरुप सुद्धा मुलकी न राहता लष्करीच राहिले म्हणून डॉ. सेन पुढे म्हणतात की, “शिवकाळातील चौथाईचा हा कर एका असुरक्षित रयतेने आपल्या सुरक्षितेसाठी दिलेला एक लष्करी स्वरुपाचा कर होता.” [६१] स्वतः शिवाजी महाराजांनी सुद्धा हा हक्क वंशपंरपरागत पद्धतीने वसूल करण्याचा प्रयत्न केला नाही. थोडक्यात, हा हक्क ज्याची हिंमत असेल त्यानेच वसूल करावा असे त्याचे स्वरुप होते.

शाहूला चौथाई हक्काच्या बदल्यात राज्यात शांतता आणि सुव्यवस्था प्रस्थापित करण्यासाठी निरनिराळया जिल्हयातील सुभेदार, फौजदार आणि इतर अधिकाऱ्यांच्या मदतीसाठी १५००० सैनिकांचे घोडदळ ठेवण्याची जबाबदारी पत्करावी लागली ही गोष्ट खरी असली तरी शाहू किंवा पेशवे यांनी आपला फायदा असल्याशिवाय दक्षिणेतील सुभेदारांना मदत करण्याची कधीच तसदी घेतली नाही. शिवाजीने देखील दिल्लीच्या बादशहाला वारंवार अशी कुमक दिली होती, आणि तलवारीच्या बळावरच चौथाई वसूल केली. शिवाजी महाराज मोगलांच्या हिताची काळजी करतील अशी बादशहाचीही अपेक्षा नव्हती. सेनच्या मताप्रमाणे कोणत्याही तहाच्या करारापेक्षा तलवारच उपयोगी पडेल हे शिवाजी महाराजही ओळखून होते. यावरुन मराठे राज्याच्या हिताची कसलीही जबाबदारी न पत्करता चौथाई वसूल करीत ही वस्तुस्थिती नाकारता येणार नाही. त्याचप्रमाणे चौथाई देणाऱ्या राज्यांना आपले राजकीय स्वातंत्र्य गमवावे लागले नाहीं. मांडलीक पद्धती आणि चौथाई यातील मूलभूत फरक तो हाच. ईस्ट इंडिया कंपनी मित्र राज्यांच्या संरक्षणाची जबाबदारी घेत असे तेव्हां त्यांनी इतर राज्यांशी असलेले राजकीय संबंध तोडले पाहिजेत अशी त्यांची अपेक्षा असे. शिवाय मराठे जेव्हां एखाद्या मांडलीकाकडून चौथाई घेत तेव्हां ते

६१. Administration system of the Marathas : Dr. S.N. Sen., University of Calcutta, Calcutta, 1925. मराठयांची प्रशासन व्यवस्थाः डॉ.एस. एन. सेन. (अनु. विजया कुलकर्णी), मुंबई २००३, पान ४५.

ज्यादा फौज ठेवण्याची खबरदारी घेत नसतच. किंबहुना चौथाईची रक्कम आणि चौथ देणाऱ्या प्रदेशाच्या संरक्षणासाठी येऊ शकणारा खर्च यांचा काहीं संबंध असावा असेही दिसत नाहीं. परंतु, मराठा प्रशासकांना अशा तरतूदीची कल्पना नसेल असे मी मानीत नाहीं, पेशव्यांनी अशी व्यवस्था बुंदीच्या राजाच्या बाबतीत केली होती, परंतु ती शिवाजीच्या मृत्युनंतर बऱ्याच वर्षांनी. [६२] यावरुन चौथाई म्हणजे लष्करी अधिकाऱ्याने दहशतीने वसूल केलेली खंडणी, असे म्हणावे लागेल. अशा खंडणीला आंतरराष्ट्रीय कायद्याची मान्यता होती किंवा नाही.

जदुनाथ सरकार यांनी या हक्काबद्दल स्पष्ट शब्दांत असे मत मांडलेले आहे की, शत्रूच्या प्रदेशातील रयतेने मराठयांचे लष्करी व मुलकी अधिकारी यांचे संबंध टाळण्यासाठी मान्य केलेला हा एक कर होता., उलट शत्रूच्या प्रदेशाचे संरक्षण करण्याची कोणतीही जबाबदारी मराठयांवर नव्हती. मराठे फक्त आर्थिक दृष्टीकोनातून या हक्काकडे पाहत असत. The Chauth was only a means of buying of one robber; and not a subsidiary system for the maintenance of peace and order against all enemies. The lands subject to chouth, cannot, therefore be rightly called 'Spheres of influence.' [६३]

**१. चौथाईचा हक्क वसूल करण्यामागची मराठयांची भूमिका** - चौथाईचा हक्क वसूल करण्यामागे मराठयांची एक स्पष्ट भूमिका दिसून येते. शिवाजीने आपल्या हालचाली सुरु केल्यानंतर त्याच्या शेजारी आदिलशाही, कुतुबशाही व मोगलांचे राज्य होते. या तिन्हीही मुसलमान सत्तांशी झगडत असताना त्याला पैशाची गरज वारंवार भासत असे. त्यामुळे शेजारच्या प्रदेशावर हल्ले करुन, लूटमार करुन तो पैसे वसूल करीत असे. अशा वसुलीमध्ये राज्य किंवा मोगली प्रदेश असा फरक तो करीत नसे. रयतेकडून १/२ इतकी रक्कम तो वसूल करीत असे. ही रक्कम बऱ्याच वेळा रोख रकमेच्या स्वरुपात वसूल करीत असे किंवा वचनचिठ्ठी (Promissory Note) च्या स्वरुपात वसूल करीत असे. जी रयत अशा प्रकारे त्याच्याशी व्यवहार करीत असे तिला तो कोणत्याही प्रकारचा त्रास देत नसे., परंतु विरोध करणाऱ्याच्या कडून मात्र सक्तीने पैसा वसूल करीत असे. अशा वसुलीमागची त्यांची भूमिका अगदी स्पष्ट होती. आदिलशहा व मोगल यांच्यामुळे त्याला सतत युद्ध करावे लागत. या युद्धासाठी वारंवार पैसा लागतो. त्याशिवाय खडे सैन्य तयार करता येत नाही. या खडया

६२. तत्रैव, पान ४५.
६३. Shivaji & His Times: Sir Jaduntha Sarkar, Orient Longman Ltd., Bombay, 1973, pg. 250.

सैन्यासाठी लागणारा खर्च हा शत्रूच्या प्रदेशातील रयतेवर बसविणे हाच एकमेव मार्ग आहे. म्हणून ज्यांना आपले संरक्षण व्हावे असे वाटत असेल त्यांनी चौथाईची रक्कम बिनबोभाटपणे द्यावी., अन्यथा जबरदस्तीने पैसे वसूल केले तर त्यांबद्दल कुरकूर करु नये. थोडक्यात म्हणजे आदिलशाही व मोगल यांचे अस्तित्व अमान्य करण्याचा हा एक प्रकार दिसून येतो. चौथाईच्या हक्काबद्दल शिवाजी महाराज पहिल्यापासूनच जागरुक असलेले दिसून येतात. इ.स.१६६५ मध्ये शिवाजी महाराज व जयसिंग यांच्यातील पुरंदर तहामध्ये त्यांनी दक्षिणेकडील सहा सुभ्यांच्या चौथाई व सरदेशमुखी हक्कांची मागणी केलेली होती व त्याच्या मोबदल्यात ४० लाख रुपये १३ हप्त्यांनी दिल्लीच्या बादशहाला देण्याची तयारी दाखविली होती. शिवाजी महाराजांच्या या मागणीला दिल्लीच्या बादशहाने असे आश्वासन दिले की, शिवाजी महाराजांनी आदिलशहाविरुद्ध मोगलांना मदत करावी. या मदतीच्या मोबदल्यात हा हक्क दिला जाईल. बादशहाने शिवाजी महाराजांच्या ताब्यातील तळकोकणातील काही प्रदेशाच्या मोबदल्यात चौथाईचा हक्क देण्याचे मान्य केले व या हक्काची सनद १६६७ मध्ये शिवाजीला बहाल केली. थोडक्यात म्हणजे चौथाईचा हक्क हा एक समझोता होता असे समजावयास हरकत नाही. १६६७ मध्ये दिल्लीच्या बादशहाकडून अशा प्रकारची चौथाईची सनद मिळाल्यानंतर शिवाजी महाराजांनी पश्चिम किनाऱ्यावरील परकीय सत्तांबरोबर चौथाईच्या रकमेबद्दल बोलणी सुरु केली. परिणामी पोर्तुगीज व शिवाजी महाराज यांच्यामध्ये चौथाईबद्दल एक करार करण्यात आला.

आदिलशहाने दरवर्षी तीन लाख रुपये व कुतुबशहाने दरवर्षी ५ लाख रुपये शिवाजी महाराजांना चौथाईचा हक्क म्हणून देण्याचे कबूल केले. यावरुन चौथाई म्हणजे प्रबळ व दुर्बळ यांच्यातील एक करार असेही याचे स्वरुप दिसून येते. दूसऱ्या सुरत लुटीच्यावेळी काही इंग्रज लोकांनी केलेला पत्रव्यवहार उपलब्ध आहे. त्यावरुन असे दिसून येते की, सुरतेचा गव्हर्नर व तेथील श्रीमंत व्यापारी यांच्याकडून चौथाईच्या हक्काबद्दल चार लाख रुपयांची मागणी शिवाजीने केली. मागणी पूर्ण न झाल्यास शहर बेचिराख केले जाईल अशीही धमकी देण्यात आली. या ठिकाणी चौथाईच्या हक्काचे स्वरुप वेगळे दिसून येते. सुरतेतील श्रीमंत व्यापाऱ्यांनी शिवाजी महाराजांना प्रचंड प्रमाणात चौथाईची रक्कम दिली. मागील तीन वर्षांच्या चौथाईच्या थकबाकीबद्दल नऊ लाख रुपये देण्याचे कबूल केले.

शिवाजी महाराजांनी आपल्या कारकीर्दीत जबरदस्तीने शत्रुपक्षाच्या प्रदेशातून चौथाईचा हक्क वसूल केला. हा हक्क वसूल करीत असताना काही प्रदेशातील रयत व

सरकारी अधिकारी हे बिनबोभाट शिवाजी महाराजांना चौथाईची रक्कम देत असत. इंग्रजांच्या फॅक्टरी रेकॉर्डमध्ये या पद्धतीसंबंधी वर्णन करीत असताना असे म्हटले आहे की, "चौथाई वसूल करण्याचा हा पर्यायी मार्ग शिवाजी महाराजांच्या प्रशासनामध्ये अगदी योग्यच होता. याच रेकॉर्डमध्ये पुढे असेही म्हटले आहे की, चौथाई ही प्रामख्याने सरकार किंवा श्रीमंत लोकांच्याकडून वसूल केली जात असे. सामान्य माणसांना या चौथाईचा काहीही त्रास होत नसे." जेम्स फॉर्बेस् (James Forbes) हा आपल्या 'Oriental Memories' या ग्रंथात म्हणतो की, "शिवाजीचे चौथाई वसूल करण्यातील कौशल्य वाखाणण्यासारखे आहे. मोगलांबरोबर सतत युद्ध चालू होते. औरंगजेबासारखा युद्धपिपासू बादशहासुद्धा शिवाजीच्या या धोरणाने गोंधळून गेला व त्याच्या प्रदेशातील लोकांनासुद्धा चौथाई द्यावी लागत असे. यामध्येच शिवाजीचा मोठेपणा दिसतो." [६४] शिवाजी महाराजांच्या राज्याच्या एकंदर उत्पन्नाबद्दल जवळ जवळ समान दृष्टीकोण दिसून येतो. सभासद म्हणतो की, शिवाजीच्या राज्याचा एकंदर महसूल एक कोटि होन असून त्याशिवाय ८० लाख होन हे चौथाईपासून मिळणारे उत्पन्न होते. [६५] सर जदुनाथ सरकार म्हणतात, "शिवाजी महाराजांच्या राज्याचे उत्पन्न ७ कोटि रुपये होते." [६६]

**२. चौथाईचा वसूल करण्याच्या स्वरुपात झालेला बदल** - शाहूंच्या कारकीर्दीत मराठयांना मिळणाऱ्या चौथाईच्या एकंदर स्वरुपात बदल झालेला दिसून येतो. पूर्वी हा हक्क परंपरेने वसूल करीत असत तर आता या हक्काला कायदेशीर स्वरुप प्राप्त झाले. संभाजी महाराजांचा मृत्यू, महाराणी येसूबाई व शाहू राजे यांना औरंगजेबाने अटकेत ठेवले आणि महाराष्ट्रातील अनेक किल्ले घेऊन महाराष्ट्र काबीज केला. पण त्यानंतरही राजाराम महाराजांच्या नेतृत्वाखाली गनिमी काव्याच्या आधारे औरंगजेबाच्या मुघल सत्तेशी लढाई चालू ठेवली. राजाराम महाराजांनी महाराष्ट्र सोडून देवून तंजावरजवळील जिंजीचा आश्रय घेतला व तेथूनच राज्यकारभार चालविला. या काळापासून मोंगलाकडून परत मिळविलेला गाव किंवा परगणा परत मिळविणा-यांच्या ताब्यात देण्याची प्रथा सुरु होऊन पुढे "सरंजामी पध्दत" निर्माण झाली.

---

६४. Oriental Memories Vol. I,: Forbes James, P. 461.

६५. सभासद कृष्णाजी अनंत श्री. शिवछत्रपतींचे चरित्रः संपा. शं.ना.जोशी, पूणे, १९६०,पान ४६.

६६. Shivaji & His Times: Sir Jaduntha Sarkar, Orient Longman Ltd., Bombay, 1973, P.67.

राजाराम महाराजांनी त्यांच्या कारकिर्दीत महाराष्ट्रातील बराचसा भाग पुन्हा स्वराज्यात आणला. राजाराम महाराजांनंतर राणी ताराबाईनेही मोगली अंमलातील प्रांतात घूसन धुमाकुळ घातला. २५ वर्षे लढा देऊनही संपूर्ण महाराष्ट्र ताब्यात घेता आला नाही हा सल मनात ठेवून इ.स. १७०७ मध्ये औरंगजेबाचा मृत्यू झाला. त्यानंतर आजिमशहाने शाहू महाराजांना बुऱ्हाणपूर येथे सोडून दिले. त्यावेळी त्यांच्या दोघांमध्ये एक करार झाला. तो करार पुढीलप्रमाणे होता -

"सरदेशमुखीचे ६ सुभ्याचे वतन चालविण्याचे व चौथाई ६ सुभ्यांचा अंमल चालविण्याचे शाहूस फर्मान. वतन घाट व बाला घाट, महाल विजापूर, दौलताबादचे बादशाहीतील महाल, भीमा, गंगा(गोदावरी) यांच्या हद्दीतील निम्मा भाग, कर्नाटक, गोंडवण, गुजराथ, तंजावरचे राज्य हे सर्व शाहूस चालविण्यास दिले. फक्त जर कधी बादशाहीला गरज पडेल तर शाहूने मदत करावी." [६७]

**३. मराठयांनी चौथाईचे हक्क मिळविले** -

शाहूमहाराजांना सोडल्यावर आपापसांत भांडून मराठयांची सत्ता नष्ट होऊन मोंगली अंमल महाराष्ट्रांत कायमचा राहील, हा जो दिल्लींतील मुत्सद्यांचा डाव होता तो डाव त्यांच्यावरच उलटला व दक्षिणचा सुभेदार हुसेनअल्ली व अबदुल्लाखान वजीर या सय्यद बंधूंनी फरुकशीर बादशहाचें व त्यांचें पटेना, तेव्हां बादशहाने मराठयांची मदत मागितली, ती शाहू महाराजांनी दिली, व या प्रसंगाचा फायदा घेऊन बाळाजी विश्वनाथ यांच्या मुत्सद्देगिरीमुळें महाराणी येसूबाईसाहेबांची मुक्तता होऊन दक्षिणेंतील ६ सुभ्यांत चौथाई व सरदेशमुखींचे हक्क करारान्वयें नवीन बादशाही रफिउद्दरजातचे हस्तें शाहू महाराजांना मिळाले.

या चौथाईमुळेच पुढें जवळजवळ एक शतक सर्व हिंदुस्थानांत या चिमुकल्या मराठी राज्याचें साम्राज्यांत रुपांतर झालें. मराठी राज्याची हद्द उत्तरेस यमुना नदी, दक्षिणेस कर्नाटक, पश्चिमेस गुजरात व पूर्वेस जगन्नाथपुरीपर्यंत वाढली. सहस्त्रबुध्दे म्हणतात, "ज्या ज्या प्रांतांत मराठे चौथाईकरितां जात तेथें चौथाई वसुलीकरितां जुलूम जबरदस्ती करीत असा सर्वत्र बभ्रा आहे, परंतु तसें पाहिलें तर पैसे वसुलीकरितां जुलूमजबरदस्ती कोण करीत नव्हते. बादशहा नबाबसुभेदारांकडून, नबाब, सुभेदार, राजे जमीनदारांकडून, व राजे जमीनदार रयत शेतकऱ्यांकडून, निरनिराळे कर, महसूल, खंडणी इत्यादींचा वसूल जुलूम

---

६७. थोरले शाहू महाराज यांचे चरित्रः का. ना. साने, शके १८१५ ची आवृत्ती, पान ७.

जबरदस्तीनेच घेत असत. मग मराठयांनींही तें थोडें फार केलें तर त्यांत जगाविरहित काय झालें. इतर प्रांतांपेक्षां मराठयांनी बंगाल्यांत जास्त जूलूम अत्याचार केले असे आरोप आहेत. परंतू बंगालचा नबाब अलीवर्दीखान भोंसल्यांचा चौथाईचा हक्कच मानीना म्हणून नबाब व भोंसले यांजमध्ये प्रत्यक्ष लढाईच सुरु झाली व मराठयांकडून जर अत्याचार झाले असले तर ते चौथाई वसुलीकरितां नसून लढाई चालू असतां एका पक्षाने दुसऱ्या पक्षाची लूटफाट व जसे अत्याचार चालतात त्या स्वरुपाचे ते अत्याचार खरेच केले असल्यास येतील." [६८]

मराठयांनी मिळविलेल्या चौथाईच्या सनदेंत दक्षिणेंतील ६ सुभ्यांचा नामनिर्देश होता, परंतु जसजसे बादशहा, वजीर अगर सुभेदार हे मराठयांची मदत मागत किंवा मराठयांशीं काहीं कुरापत काढून लढाई करुन पराजीत होत तसतसे मराठे प्रबळ होऊन त्यांची सत्ता उत्तर हिंदुस्थानांत पसरत चालली व त्यामुळें,चौथाई वसूल करण्याचा प्रदेश वाढत गेला. नानासाहेब पेशवे बिहार पाटण्यापर्यंत चौथाई वसूल करीत असत. परंतु नागपूरच्या रघुजी भोंसल्यानें भास्करपंत कोल्हटकरास बंगालकडे चौथाई वसूल करण्यास पाठविलें, तेव्हां अलीवर्दीखानानें त्यास धुडकावून लावलें. बंगाल व बिहार हे दोन्ही सुभे चौथाई करारांत येत नव्हते व दोन्ही सुभ्यांवरील नबाब अलीवर्दीखान हा एकच मुख्य अधिकारी होता. तो रघूजीच्या सेनापतीस अडथळा करत होता. नानासाहेबांस पाटणा, मोंगीर, भागलपूरपर्यंत खुशाल खंडणी व चौथाई वसूल करुन देत होता. याचा अर्थ इतकाच कीं, नानासाहेब पेशवे हे नबाब अलीवर्दीखानापेक्षा वरचढ व जबरदस्त होते.

बादशाही मुलखांतून चौथाईचे पैसे बाळाजी बाजीराव ऊर्फ नानासाहेब पेशवे यांना मिळत होते परंतु त्यांचेच सरदार नागपूरकर भोंसले यांनी बंगालमध्यें जाऊन धुमाकूळ घातल्यामुळे त्यांचा चौथाईचा हक्क राहिला नाहीं, म्हणून बादशहाने नानासाहेबांस त्यांचा बंदोबस्त करण्यास सांगितले. नानासाहेब पन्नास हजार सैन्याच्या जोरावर जबरदस्तींनें खंडण्या वसूल करत असत. अशीं प्रत्यक्ष उदाहरणें "शेरे मुताखरीन" ग्रंथांत दिलीं आहेत. दाऊदनगर व घाऊसगडचा किल्लेदार अहमदखान याने खंडणी दिली नाही, तेव्हां नानासाहेबानें दाऊदनगर लुटले. व्यापाऱ्यांच्या मध्यस्थीनें नानासाहेबानी पन्नास हजार रुपये वसूल केले, तेव्हाच गांव सोडला. ठिकरी, गया, मणीपूर, बिहार, मोंगीर-भागलपूर या ठिकाणांतून खंडणी वसूल केली.

६८. भोंसल्यांच्या बंगालवरील स्वाऱ्या : श्री.बाळकृष्ण ना. सहस्त्रबुध्दे (गोंदिया), राजवाडे संशोधन मंडळ, धुळें, १९४४, पान ८.

नानासाहेबानीं बिहार-पाटणा प्रांताचा कांहीं वर्षांचा “चौथाईचा” हिशेब दाखवून काही रक्कम येणें बाकी दाखविली. नाइलाजानें नबाबानें मुकाटयानें ती रक्कम दिली व दोघांच्या सैन्यानीं मिळून रघूजीस बंगालमधून घालवून लावण्याचें प्रयत्न केले. रघुजी भोसले आणि नानासाहेब या दोन मराठे सरदारांमध्ये नबाबासाठी आपापसात लढाई झाली त्यात रघुजीचा पराजय झाला. त्याचा जाब नानासाहेबांना शाहूमहाराजांकडे दयावा लागला. त्यानंतर रघुजी भोसलेंचा सेनापती भास्करपंडित कोल्हटकर याने नबाबावर आक्रमण केले पण भास्करपंडिताचा व त्याच्या सरदारांचा नबाबाने बेसावध असताना वध केला. त्यामुळेच रघुजी भोसलेंनी जास्त सैन्य घेऊन बंगालवर स्वाऱ्या केल्या व नबाबास त्यानें “दे माय धरणी ठाय” करुन सोडलें, व शेवटी सन १७५१ मध्यें नबाबाकडून नुसती चौथाईच घेऊन तो थांबला नाहीं तर “मुंडकटाई” नांवाचा आणखी एक कर वसूल करीत संबंध ओरिसा प्रांतच मराठी अंमलाखाली देण्यास त्यानें नबाबास भाग पाडलें. [६९] बंगालच्या चौथाईचे १० लाखांच्या ऐवजीं १२ लाख रुपये ठरुन ते वसूल झाल्यावरच रघूजीनें बंगालमधील छावणी उठवली. तेथील वसूल व राज्यकारभार वास्तविक मराठयांनींच हाती घेतला व आपल्या विश्वासांतला मीर हबीब यास पहिला सुभेदार नेमलें. चौथाईकरितां झालेल्या भोंसल्यांच्या बंगालवरील स्वाऱ्या म्हणजे नबाब अलीवर्दीखान व रघूजी भोंसले यांचें दशवार्षिक युद्धच होते.

शिवाजी महाराजांची राज्यस्थापना व त्याची वाढ म्हणजे, जाधव व विजयनगरचें हिंदू राज्य नष्ट करण्यास कारण झालेल्या मुसलमानी सुलतानशाह्या व त्यांनाही नष्ट करुन नवीन फोफावत येणाऱ्या मोंगली साम्राज्यसत्तेविरुद्धची प्रतिक्रिया होती व मराठयांची “चौथाई” म्हणजे मोंगली सत्तेचा ऱ्हास व मराठयांचा उत्कर्ष हे स्पष्ट होतें.[७०] चौथाई म्हणजे प्रांताच्या वसुलाच्या चतुर्थांश रकमेंत त्या त्या प्रांतात बादशहाला, सुभेदाराला प्रसंगीं मदत करता यावी म्हणून ठराविक फौज जय्यत किंवा तयार ठेवण्याचा करार होय. बाळाजी विश्वनाथानें ज्या दिवशीं ही सनद दिल्ली दरबारांत मिळवली त्याच दिवशीं मोंगली साम्राज्य सत्तेस दुसरा जबरदस्त धक्का बसला. त्याबरोबरच मुसलमानी धर्मप्रसारालाहि आळा बसला. “चंचुप्रवेशे मुसलप्रवेशः” या म्हणीप्रमाणें चौथाई हक्क मिळाल्याबरोबर मुसलमानी सैन्य

६९. भोंसल्यांच्या बंगालवरील स्वाऱ्या :श्री.बाळकृष्ण ना.सहस्त्रबुध्दे(गोंदिया),प्रका.राजवाडे संशोधन मंडळ, धुळें,१९४४,पान ६९.

७०. भोंसल्यांच्या बंगालवरील स्वाऱ्या :श्री.बाळकृष्ण ना. सहस्त्रबुध्दे(गोंदिया), प्रका. राजवाडे संशोधन मंडळ, धुळें, १९४४,पान ८.

मराठी राज्यांत येण्याचें बंद पडून उलट मोंगली अंमलांतील प्रांतांतून मराठी फौजांचीं ठाणीं जिकडे तिकडे बसली. [७१]

चौथाईची सनद मिळवणे, रघूजीनें बंगालवर स्वाऱ्या करुन सैन्य खर्चासाठी ओरिसांत कायमचेंच ठाणें बसवून सर्व सत्ता हातीं घेणें, ईस्टइंडिया कंपनींने पुढील काळांत हिंदुस्थानांतील राजांच्या माथी बसविलेले "तैनाती" फौजांचे करार हे सर्व राज्यविस्तार करण्याच्या मार्गांतील प्राथमिक राजकीय डाव होते. चौथाईच्या हक्कासंबंधी आपल्याला असे दिसून येईल की, हा हक्क म्हणजे राज्याचा विस्तार करण्याचे एक प्रभावी साधन होते. ट्रोजन हॉर्सप्रमाणे या हक्काच्या आधारे संबंध देशभर मराठयांचे राज्य निर्माण होऊ शकले असते. परंतु शाहूच्या ठिकाणी शिवाजीच्या अंगी असणारे नेतृत्वाचे गुण नसल्यामुळे मराठयांच्यात एकसूत्रीपणा राहिला नाही. शाहूच्या ठिकाणी खरोखरच हे गुण असते तर त्याची तुलना अशोक, चंद्रगुप्त, अकबर व शिवाजी महाराज यांच्याशी करता आली असती. चौथाई हेच मराठी राज्याचे प्रमुख सूत्र झाले असते. शिवाजी महाराजांनी इ.स.१६६४मध्ये सुरतेवर स्वारी केली तेव्हा प्रथम सुरत न लुटता तेथील प्रमुख व्यापाऱ्यांपाशी खंडणीच मागितली. ती त्यांनी न दिल्यामुळेच शिवाजी महाराजांना सुरतेची लूट करावी लागली. त्यांनी इ.स. १६७०मध्ये सुरत दुसऱ्यांदा लुटली तेव्हाही तशीच मागणी केली होती. पण तीही सुरतेच्या व्यापाऱ्यांनी पुरविली नाही. म्हणून शिवाजी महाराजांनी सुरत सोडताना तेथील प्रमुख व्यापारी व अधिकारी यांस बजावले कीं, 'दरसाल बारा लाख रुपये न द्याल तर पुनः पुढच्या वर्षी येऊन शहराचा उरलेला भाग जाळून टाकीन'[७२]

**४. सरदेशमुखी** –चौथाईप्रमाणे सरदेशमुखी हा एक हक्क शिवाजा महाराजांनी प्रस्थापित केला मात्र ती बाब त्यांनी नवीन निर्माण केली असे नाही. देशमुखांवर सरदेशमुख हे वतनदार पूर्वीपासून होते. सरदेशमुखीवरील शिवाजी महाराजांचा हक्क कायदेशीर होता. आपल्या प्रांताचे आपण वारसदारीने सरदेशमुख आहोत असा त्यांनी आपल्या कारभाराच्या सुरवातीला दावा केला होता. तो दावा जर मान्य झाला असता किंवा तसे फर्मान मिळविण्यात त्यांना यश मिळाले असते तर, त्याची मागणी बेकायदेशीर ठरली नसती. परंतु शाहू महाराज सिंहासनावर आरुढ होण्यापूर्वी असे शाही फर्मान न मिळाल्यामुळे सरदेशमुखी हे शिवाजी महाराजांचे वतन आहे असे त्यांच्या काळात मानण्यात आले नाही.

७१. भोंसल्यांच्या बंगालवरील स्वाऱ्या : श्री.बाळकृष्ण ना. सहस्त्रबुध्दे(गोंदिया), प्रका. राजवाडे संशोधन मंडळ, धुळें, १९४४, पान ९.

७२. शिवकालीन पत्रसारसंग्रह, खंड २ः संपादक द.वि. आपटे, न. चि. केळकर, भा.इ.सं.मं. प्रका, पुणे १९३०, पान ३८२.

रत्नागिरी जिल्हयात मामले प्रभावळीत मावळणकर हे सरदेशमुख होते. प्रभावळीकरांना जिंकून त्यांचे राज्य शिवाजी महाराजांनी घेतल्यावर त्याने जी वतने अनामत ठेवली. त्यात मावळणकराचे सरदेशमुखीचे वतन असून ते वतन आपणाकडे पुढे चालावे असा अर्ज शिवाजी महाराजांकडे त्यांनी केला होता. (२१ एप्रिल १६६२) व त्याप्रमाणेच शिवाजी महाराजांनी त्यास ते वतन परत दिलेही. त्याच सुमारास शिवाजी महाराज स्वतःस आपल्या राज्यातील देशमुखांचा सरदेशमुख म्हणवू लागले व त्याप्रमाणे कल्याणमध्ये नारो भिकाजी सुभेदार यांच्याकडे सरदेशमुखीचा हक्क वसूल करणे ही कामगिरी दिल्याचे दिसून येते. (शके १५९० माघ शु. ४.)

सारांश, असे सरदेशमुख काही ठिकाणी शिवाजी महाराजांपूर्वी पासूनच होते. शिवाजी महाराजांनी स्वराज्य स्थापल्यावर छत्रपती हेच एकंदर स्वराज्याचे सरदेशमुख झाले. ते हे वतन आपल्या मर्जीप्रमाणे वाटेल त्यास देऊ शकत असत. देशमुखाचे जे काम तेच सरदेशमुखाचे. ठराविक टापूतील जमीन महसूल गोळा करुन सरकारात भरणे, चोरास शिक्षा करणे, ज्याचा माल त्यास देणे ही कामे देशमुखाची असत. तीच देशमुखांवरचा वरिष्ठ म्हणून सरदेशमुखही करीत असे. या कामगिरीबद्दल त्यास सरकारी साऱ्यापैकी दहा टक्के उत्पन्न मिळत असे व ते शिवाजी महाराजांच्या खासगी उत्पन्नाकडे जमा होई. हा वसूल शिवाजी महाराजांच्या स्वराज्यातील होता. परराज्यात असा वसूल जमा करीत असल्याचे दिसून येत नाही. तो हक्क शिवाजी महाराजांच्या पश्चात् शाहूने चौथाईबरोबर मोगल बादशहापासून मिळविला व त्याच्या सनदा दिल्लीहून बादशहापासून बाळाजी विश्वनाथ पेशव्यांनी आणल्या. शिवाजी महाराज मोगलराज्यातही चौथाई वसूल करीत. पण त्यांचा हक्क बादशहाने मान्य केला नव्हता.

सरदेशमुखीचे आणखी एक उदाहरण म्हणजे दादोजी कोंडदेव यांनी इ.स.१६७५ मध्ये बाबाजी झुंझारराव देशमुख तर्फ कानदखोरे यास पत्र लिहिले आहे. यात ते म्हणतात, 'तुझे अंतुरली येथील इनाम सरदेशमुखीस दिले, त्याबद्दल तुला दापोडी येथे इनाम देण्याविषयी लिहिले आहे.' याचा अर्थ असा की, बाबाजी हा कानदखोऱ्याचा देशमुख होता त्याबद्दल त्याला अंतुरली हा गाव इनाम होता. तो त्याच्याकडून दादोजींनी त्याच्यावरील सरदेशमुखास दिला. त्यामुळे बाबाजीचे जे नुकसान झाले ते दादोजींनी बाबाजीस दापोडी गावी इनाम देऊन भरुन काढले. ही गोष्ट अर्थात शिवाजी महाराज पंधरा वर्षांचे असतानाच दादोजींनी केलेली आढळते.

## <u>शिवाजींच्या महसूल व्यवस्थेची काही वैशिष्ट्ये</u> –

### १) <u>मुलकी कारभाराला महत्व</u>:-

स्वसंरक्षणात राज्याची वृध्दी होते आणि बऱ्याच वेळा स्वसंरक्षण करतानाच राज्यवृध्दीची महत्वाकांक्षा वाढते. म्हणूनच शिवाजी महाराजांनी शेजारील राष्ट्रांवर वचक बसवण्यापुरतीच लष्करी सत्ता प्रबळ बनविली. त्यांनी "राज्यकारभारात लष्करी सत्तेला मुख्यस्थानी न ठेवता मुलकी सत्तेच्या ताब्यात लष्करी सत्ता ठेवली. त्यासाठी आठ प्रधानांपैकी एकच प्रधान सेनापती ठेवला आणि त्या वेळच्या स्थितीप्रमाणे सहा प्रधानास मुलकी कारभाराचे मुख्य कर्तव्य सोपविले व प्रसंगतः लष्करी जबाबदारी सोपविली जात असे," असे रियासतकार म्हणतात. [७३] म्हणजेच शिवाजी महाराजांनी मुलकी कारभाराला आपल्या राज्यव्यवस्थेत अत्यंत महत्व दिले व लष्कराचे माहात्म वाढू दिले नाही. मुलकी व लष्करी प्रशासन असे विभाजन केल्याने वतनदारीचा कणाच मोडला.

### २) <u>विभागवार सारा वसूली</u> –

स्वराज्याचे शिवाजी महाराजांनी सन १६७३ मध्ये ३ भाग पाडले होते. सभासदाने प्रत्येक विभागाचा एक प्रधान सरकारकून असल्याचे व त्या विभागाची संपूर्ण जबाबदारी त्याचीच असल्याचे स्पष्ट केले आहे. जमिनीची मोजणी करुन तिचा सारा एकदा कायमचा ठरवून दिला आणि तो गोळा करण्याकरिता सरकारी अधिकारी नेमले.[७४]

---

७३. मराठी रियासत (खंड १) : इतिहासकार गो. स. सरदेसाई, केशव ढवळे प्रकाशन, पुणे, पान ८८.

७४. महाराष्ट्रेतिहासकालांतील राज्यकारभाराचा अभ्यासः शं. ना. जोशी, पुणे विद्यापीठ प्रकाशन, प्रथमावृत्ती, १९५९,

जोशी यांनी सारा आकारणीत तीन टप्पे सांगितले आहेत. चकबंदी, जमिनीची यादी- कुलझाडा,
जमिनीच्या सनदाचे पत्रक -सनदवार,
यात शं. ना. जोशी यांनी अण्णाजी दत्तो या शिवाजींच्या अष्टप्रधान मंडळातील सचिव किंवा सरसुभेदाराच्या सारा आकारणीच्या "कौलनामा" याचा उल्लेख केला आहे. शिवाजींनी सन १६७३ मध्ये स्वराज्याच्या ३ भागांवर प्रत्येकी एक सरसुभेदार नेमला होता. मोरोपंत पिंगळे, अण्णाजी दत्तो, व दत्ताजी वाकनीस यांची स्वराज्याच्या ३ भागांवर नेमणूक केली होती.

जमिन मोजणीसाठी शिवाजींनी काही गोष्टी ठरवून दिल्या होत्या.

- जमिन मोजणी करणाऱ्या प्रत्येक अधिकाऱ्याने प्रत्येक खेडयाला भेट देऊन त्या गावातील एकंदर जमिन किती, पिकाऊ जमिन किती व पड जमिन किती याची नोंद करावी.
- प्रत्येक गावच्या जमिनीची पाहणी करून तिची विभागणी डोंगराळ, दलदलीची व काळी अशा भागात करावी.
- जमिनीची प्रतवारी ठरविताना एक, दोन, तीन व चार अशा प्रति पाडाव्यांत.
- प्रत्येक गावाचा उत्पन्न निश्चित केल्यानंतर त्या खेडयापासून खरीप व रब्बी हंगामात किती उत्पन्न येऊ शकेल याची नोंद करावी.
- एखादया गावाच्या पीक पाण्याचा अंदाज घेतल्यानंतर पूर्वी किती उत्पन्न झाले व त्यातून वसूल किती झाला तसेच सध्या पिक किती येऊ शकेल व उत्पन्न किती मिळू शकेल याची तुलना करावी.
- खेडेगावाची पाहणी करणाऱ्या अधिकाऱ्यांनी भावी काळात श्रम व पैसा यांचा अधिक वापर केल्यास किती वाढीव उत्पन्न येऊ शकेल याचा अंदाज घ्यावा.

मोरोपंत पिंगळे या मुख्य प्रधानाकडे असणारा उत्तर विभाग.

अण्णाजी दत्तो या सचिवाकडे असणारा तळकोकण किंवा स्वराज्याचा दक्षिण भाग.

दत्ताजीपंत या वाकनीसाकडे असणारा देश किंवा नैऋत्य भाग. या स्वराज्याच्या सर्व विभागामधून सारा किंवा वसूल जमा करावा असे शिवाजी महाराजांचे धोरण होते.

३) **लवचिक सारा आकारणी** - जमिनीची मोजणी करून ती खातेदारांच्या नावावर चढविणे व सरकारी साऱ्याबद्दल कबुली लिहून घेऊन जमिन शेतकऱ्यांच्या ताब्यात देणे.[७५] यासंबंधात शिवाजींचे सचिव अण्णाजी दत्तो, मोरोपंत प्रधान यांनी शिवाजीच्या वतीने अंमलबजावणी केल्याचे आढळते. सारा ठरविताना एकूण उत्पन्नाच्या २/५ पेक्षा जास्त सारा केव्हाही घेतला जाऊ नये अशी शिवाजींची शिस्त होती.[७६] सारा पिकनिहाय, जमिनीच्या प्रतिनुसार, जमिनीच्या प्रकारानुसार आकारला जात असे. वाजट जमिनी म्हणजे नापिक जमिनीवर साऱ्याची आकारणी केली जात नसे. डोंगराळ व पड जमिन लागवडीखाली आणल्यावर सारा बसवला जात नसे. काही कालावधीनंतर मात्र माफक आकारणी करण्यात येत असे.[७७] शिवकाळात सारा आकारणी कोणत्याही एकाच ताठर सुत्रावर केलेली नव्हती तर ती लवचिक बनण्यात आलेली दिसते. जमिनीची प्रत, तिला मिळणारे पाणी, काढले जाणारे पीक या सर्व गोष्टींवर सारा आकारणी अवलंबून असावी. सारा वसूलीसाठीही रोख रक्कमेचाच आग्रह न धरता धान्याच्या स्वरूपातही सारा स्विकारला जात असे. सारा किंवा कर हे वार्षीक स्वरूपात वसूल केले जात असत.

४) **रयतवारी पध्दत** - शिवाजींनी पुर्वीची जमिनदारी पध्दत बदलून नवी रयतवारी पध्दत सुरू केली. शिवाजीच्या पुर्वी महाराष्ट्रात वतनदार देशमुख, देशकुळकर्णी, पाटील यांच्या हाती संपूर्ण सत्ता होती. यांनी आदिलशाह, निजामशाह यासारख्या परकियांकडे काही प्रमाणात कर किंवा सारा जमा करून बाकी सर्व पैसे आपल्याकडे ठेवून आपल्या हाती सत्ता ठेवली पण शिवाजींनी मात्र अशा या सरंजामी वृत्तीला विरोध करून राज्यात सार्वभौम सत्ता व शिस्त निर्माण केली. [७८]

---

७५. मराठयांच्या सत्तेचा उत्कर्षःम.गो.रानडेंचे मराठी रूपांतर आपटे, विजापूरकर, इनामदार,चित्रशाळा,पूणे पान९८.

७६. सभासदाने जे २/५ उत्पन्न राजाला द्यावे लागत असे त्या हिश्श्याला राजभाग म्हणत असल्याचे स्पष्ट केले आहे. "बिघेयास पिकाचा आकार करून पाच तक्षिमा (भाग) पिकाचे करून तीन तक्षिमा रयतेस द्याव्या. दोन तक्षिमा दिवाणात द्याव्या. येणेप्रमाणे रयतेपासून घ्यावे." सभासद कृष्णाजी अनंत शिवछत्रपतींचे चरित्रः संपा.शं.ना.जोशी, पुणे, १९६०.पान २०.

७७. मध्ययुगीन भारत : प्रा. गजानन भिडे, डॉ. विजय नलावडे, डॉ. सौ. वैजयंती नाईक नवरे, फडके प्रकाशन, द्वितीयावृत्ती २००२, पान ८६.

७८. सभासद कृष्णाजी अनंत शिवछत्रपतींचे चरित्रः संपा.शं.ना.जोशी, पुणे, १९६०.पान २९-३०.

**५) <u>तगाईची पध्दत</u>** - आपत्कालीन लोकांना जनावरे, अवजारे, धान्य घेण्यासाठी रोख रक्कम सरकारातून देण्याची (तगाईची) पध्दत शिवाजी महाराजांनी सुरू केली. सदर रक्कम हप्तेबंदीनी परत देण्याचे निश्चित करण्यात येत असे. [७९]

**६) <u>साऱ्यात सुट</u>** - दुष्काळ, महापूर, वादळ, रोगराई यांसारख्या नैसर्गिक आपत्तीमुळे किंवा शत्रूपक्षाने उभ्या पिकाचे नुकसान केलेले असल्यास, प्रत्यक्ष पिकाचा अंदाज घेवून लोकांना करात सूट देण्याची पध्दत शिवाजी महाराजांनी स्विकारल्याने शिवाजी महाराजांची व्यवस्था लोकाभिमूख झाली. [८०] दुष्काळ, महापूर, वादळ, रोगराई यासारख्या संकटाच्या वेळी आणि शत्रुपक्षाने आक्रमण केल्याने झालेले नुकसान लक्षात घेऊन रयतेला सारा भरण्यामध्ये सूट दिली जात असे.

**७) <u>वसूली अधिकारी</u>** - मोगलकालीन पध्दतीप्रमाणे देशमुख, देशपांडे या पिढीजात वतनदारांकडे शिवाजी महाराजांनी काहीच अधिकार ठेवले नाहीत. शिवाजी महाराजांनी प्रशासनातील कोणतेही अधिकारपद वारसदारीने चालू ठेवले नाही. वसूलीचे अधिकार राजाने नेमलेल्या अधिकाऱ्यांकडे सोपविण्यात आले. त्यांना त्यांच्या कामाबद्दल दरमहा रोख वेतन (सरकारी खजिन्यातून) दिले जात असे. [८१] या अधिकारी नेमण्याच्या पध्दतीमुळे वतनदार (मोठे) प्रबळ होऊन सरकारविरूध्द उभे राहण्याची भिती नष्ट झाली.[८२] आज्ञापत्रात रामचंद्रपंत अमात्याने वतनदारीबद्दलचे शिवाजीचे धोरण स्पष्ट केले आहे. "प्रचलित वतने चालू ठेवावीत परंतू वतनदारांचा रयतेवरील हक्क काढून घ्यावा." वतनदारांनी लष्कर बाळगण्याची पध्दतही शिवाजी महाराजांनी बंद केली. त्यामुळेच मराठा राज्य राजारामाच्या काळापर्यंत तरी टिकले. [८३]

---

७९. मराठी रियासतः गो.स.सरदेसाई, केशव ढवळे प्रकाशन, गिरगांव, मुंबई १९२९,पान २२१.

८०. मराठेकालीन संस्था व विचारः प्रा.गायकवाड, प्रा.थोरात, प्रा.डॉ.सरदेसाई, प्रा.हनमाने,फडके प्रकाशन, १९९० द्वितीयावृत्ती, पान २४२.

८१. मराठी रियासत : गो.स.सरदेसाई, केशव ढवळे प्रकाशन, गिरगांव, मुंबई पान २३२.

८२. मराठी रियासत :गो.स.सरदेसाई, केशव ढवळे प्रकाशन, गिरगांव, मुंबई १९२९,पान २३२. सरदेसाईंनी शिवचरित्र साहित्यातून, शिवाजीने प्रत्यक्ष आपल्या जावयास वतन देण्यापासून कसे धुडकवले आहे ते स्पष्ट केले आहे. पिलाजी शिर्क्यांनी अर्ज केला, जे मामले दाभोळच्या देशमुखीचे वतन आदिलशहांनी आपणास मऱ्हामत केले त्याचा भोगवटा झाला नाही, ते वतन आपले आपणास देऊन चालवावे. त्यावरून स्वामीनी आज्ञा केली की, आपल्या राज्यात वतने द्यावयाचे दंडक नाही. परंतु तुम्ही स्वामीकार्य केले व सोयरीकही तुम्हासी झाली, तरी चिरंजीव राजकुंबरबाईस पुत्र होईल तेव्हा ते देशमुख वतन आपण तुम्हास देऊ.

८३. आज्ञापत्रः रामचंद्रपंत अमात्यः (संपा.) ग.ह.खरे, स.रा.भिडे, पुणे १९६० पान ६२.

८) **बदलीचे तत्व** - शिवाजी महाराजांनी नेमलेल्या अधिकाऱ्यांच्या एका सुभ्यातून दुसऱ्या सुभ्यांत, प्रांतातून दुसऱ्या प्रांतात बदल्या होत असत. [८४] पंत अमात्य व पंत सचिव सुभा व प्रांतावरील अधिकाऱ्यांच्या कामावर देखरेख ठेवत असत. सुभ्याचे जमाखर्च त्यांच्याकडे पाठवावे लागत असत व ते पडताळून पाहताना काही गैरव्यवहार आढळल्यास त्याबद्दल शिक्षा करण्यात येत असे.[८५]

९) **धर्मादाय वतने** - शिवाजी महाराजांनी काही धार्मिक स्वरूपाची वतने दिली. हिंदु-मुस्लिम देवालये, काही साधुसंतांना एखादया खेडेगावच्या महसूलापैकी काही भाग नेमून दिला. देवालये, मशिदी मठ, धर्मशाळा, अन्नछत्रे यांना त्यांच्या खर्चासाठी वतने दिली. साधुसंताना, वैद्यांनासुध्दा शिवाजी महाराजांनी सनदा दिल्या, वतने दिली. एकूणच वतनदारीची पध्दत शिवाजी महाराजांनी सामाजिक व राजकीय दृष्ट्या मोडून काढली. [८६]

१०) **महालवार रचना** - शिवाजीने प्रांत, महाल अशी रचना केली म्हणूनच सुभ्यावर सुभेदार म्हणून १ मुख्य अधिकारी असे. प्रांताचे दोन - तीन पोटविभाग म्हणजेच महाल. या प्रत्येक महालाचे सरासरी उत्पन्न पाऊण लाख ते सव्वा लाख असावे. असे धोरण शिवाजींनी ठरविले होते.

---

८४. मराठयांच्या इतिहासाची साधने : खंड १५ ते १८ मधील सरकारी पत्रे व सनदा, वि. का. राजवाडे. यावरून भास्कर वामन भट यांनी तयार केलेल्या अधिकाऱ्यांच्या नामावली यादीवरून असे दिसते की, विशिष्ट अधिकारी विशिष्ट काळात निरनिराळया जिल्हयांचा कारभार पहात होते.

| | | |
|---|---|---|
| सुभेदार - वाईप्रांत | येसाजी मल्हार | इ.स. १६७६ |
| -॥- | -॥- | इ.स. १६९० |
| -॥- | -॥- | इ.स. १६९६ |
| -॥- | अण्णाजी जनार्दन | इ.स. १६९७ |
| जावळी | विरोराम | इ.स. १६६४ |
| -॥- | विठ्ठल दत्तू | इ.स. १६७१ |
| -॥- | अंबाजी मोरदेव | इ.स. १६७६ |
| -॥- | गोपाल रायाजी | इ.स. १६७७ |
| प्रांत कोल | गणेश जोगदेव | इ.स. १६७२ |
| -॥- | व्यंकाजी रूद्र | इ.स. १६७७ |
| प्रांत पुणे | त्र्यंबक गोपाळ | इ.स. १६७९ |
| -॥- | विनायक उमाजी | इ.स. १६८१ |

भट म्हणतात की, १६७६ साली जावळीचा सुभेदार असलेला अंबाजी मोरदेव १६७३ ते १६८५ या काळात साताऱ्याचा सुभेदार होता. आणि १७०६ ते १७०८ च्या दरम्यान जावळीचा सुभेदार असलेला महादजी श्यामराज हा तत्पुर्वी सातारा आणि मावळ प्रांताचा सुभेदार होता.

मराठयांची प्रशासन व्यवस्थाः डॉ.एस.एन.सेन (अनु. विजया कुलकर्णी), मुंबई २००३,पान ३६.

८५. मराठयांच्या सत्तेचा उत्कर्ष : म.गो.रानडेंचे मराठी रूपांतर आपटे, विजापूरकर, इनामदार,चित्रशाळा,पूणे. पा ९९.

८६. मराठेकालीन संस्था व विचारः प्रा.गायकवाड, प्रा.थोरात, प्रा.डॉ.सरदेसाई, प्रा.हनमाने, फडके प्रकाशन, १९९० द्वितीयावृत्ती, पान २४६.

सन १६७१ मध्ये शिवाजींने प्रत्येक महालातून मिळालेला पैसा त्या त्या किल्ल्यात किमान १ लाख रू. शिल्लक ठेवण्यासंबंधीचा ठराव सर्व किल्ल्यांवर व सर्व ठिकाणी पाठविलेला दिसतो. [८७]

**११) <u>अनेक प्रकारचे कर</u>** - शिवाजी महाराजांनी साऱ्याव्यतिरिक्त अनेक प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष करांमधून राज्याचे उत्पन्न जमा करावे हे धोरण ठेवले होते. प्रत्यक्ष करांमध्ये अनेक प्रकारचे कर घेतले जात. तसेच चौथाई व सरदेशमुखीच्या आधारे ही राज्य उत्पन्न मिळवत असे.

**१२) <u>शिवकाळात राजा हाच सर्व राज्ययंत्रणेचा प्रमुख आधार</u>** - "राजा म्हणजेच राज्ययंत्रणेचा मुख्य टेकू" असे डॉ. सेन यांनी म्हटले आहे. [८८] राजा हा नुसता नामधारी प्रमुख नसून त्याच्या अधिकारकक्षेत अष्टप्रधान मंडळ, १२ महाल, १८ कारखाने, या सर्वांचा समावेश होत असे. शिवाजींची राजनिती प्राचीन भारतातील पूर्वपरंपरेला अनुसरून होती.

**१३) <u>जमीनीचे वर्गीकरण</u>** - शिवकाळात जमीनीचे वर्गीकरण निरनिराळया प्रकारे केलेले दिसते. प्रत्येक जिल्हयांतील सुभे, प्रांत, महाल यातील एक दोन गावांची जमीन आणि पिकांची लागोपाठ तीन वर्षे पाहणी करून त्या माहितीच्या आधारे तालुकानिहाय प्रत्येक प्रकारच्या बिघ्यावरील कर निश्चित केला. जमीनीची प्रतवारी लावून, पिकाच्या आणि जमीनीच्या प्रकारावरुन, कर निश्चिती केली जात असे. पाणस्थळ जमीन आणि कोरडवाहू जमीन, घाटावरील आणि कोकणातील जमीन अशा अनेक गोष्टी लक्षात घेऊन जमीन महसूलाची आकारणी केली जात असे.

---

८७. मराठयांच्या इतिहासाची साधने, खंड ८ः राजवाडे वि.का.,भा.इ.स.म., पुणे,पान १६ ते १७
सन १६७१ च्या एका पत्रावरील मजकुर असा आहे,

"सन इसन्ने कारणे राजश्री साहेबी तस केला की, जो आपला वतन मुलूक आहे त्यापैकी महालोमहालीहून खजाना करावयास पैके आणावे त्याचा खजानाच करून ठेवावा, जे वख्ती मोंगलाशी झगडा सुरू होईल आणि मोगल येऊन गडास वेढा घालतील, त्याचे मदतीस जरूर आणी की करून ऐवज जुडेना तरीच खजानाचे पैके खर्च करावे. नाहीतरी एऱ्हवी राज्यभागास सर्व खर्च न करावा, ऐसा साहेबी तह केला असे. आणि खजाना करावयाची मोईन केली होन :- १,२५,०००.

**रास –** कुडाळ – २०,००० दाभोळ – १५,००० कल्याण – ५,००० राजापूर – २०,०००

पूणे – १३,००० भिवंडी – १३,००० इंदापूर – ५,००० कोळे – २०,०००

जावळी – ५,००० सुपे – २,००० नागोजी गोविंद–१०,००० कृष्णाजी भास्कर – ५,०००

येणे प्रमाणे एक लाख पंचवीस हजार होन खजाना करावयाचा तह केला असे."

८८. Administrative system of the Marathas: Dr. S.N. SEN, University of Calcutta, Calcutta 1925, page 18.

**<u>शिवकाळातील करपध्दतीमधून मिळणारे एकूण उत्पन्न</u> -**

सभासदाच्या नोंदीप्रमाणे शहाजी महाराजांकडून मिळालेल्या ४०,००० होन उत्पन्नाच्या पुणे महालापासून ते राज्याभिषकाच्या वेळेपर्यंत शिवाजी महाराज्यांचे उत्पन्न सुमारे १ कोटी होन (म्हणजे ३ ते ४ कोटी रूपये) झाले होते. असे दिसून येते. [८९]

जदूनाथ सरकार यांनी आपल्या शिवचरित्रात शिवाजी महाराजांच्या उत्पन्नाचा सभासद बखरीतील आकडा चुकिचा असल्याचे म्हटले आहे. परंतू प्रत्यक्षात सभासदाने दिलेला शिवाजी महाराजांच्या उत्पन्नाचा आकडा चुकिचा वाटण्याचे कारण नाही. शिवाजी महाराजांनी आपले राज्य अर्थिक दृष्टया समर्थ करण्यासाठी शेती व्यवसाय, उद्योग धंदे यांना महत्व दिले तसेच चौथाई, सरदेशमुखी लुट, जकात अशा अनेक उत्पन्नाच्या बाबींमधूनही उत्पन्न वाढविले असण्याची शक्यता नाकारता येत नाही.

पेशवे दप्तरात सापडलेल्या एका अप्रकाशित हिशेबाच्या कागदामूळे शिवाजी राज्यांच्या उत्पन्नाचा अंदाज करणे शक्य आहे.[९०] ह्या अप्रकाशित कागदावर तारीख शिक्का नाही त्यामुळे तो अस्सल मानता येणार नाही. परंतू शिवाजी महाराज्यांच्या सीमा सांगणारा “स्वराज्याचा जाबता” याच्याशी पडताळून पहाता हा अप्रकाशित कागद अस्सल बरहुकुमाची नक्कल असावी.

शिवाजीच्या राज्याचे कमाल उत्पन्न यात पातशाही होनात दिले आहेत-

| | |
|---|---|
| १) तळकोकण (१३ सुभे) | - १,४२,००,००० होन |
| २) वरघाट (८ सुभे) | - ७,२५,००० होन |
| ३) देश (१५ सुभे) | - १५,७५,००० होन |
| एकूण | - १,६५,००,००० होन |

यात बारामती, इंदापूर परगणा आणि जुन्नरच्या १३ तरफांच्या वसूलाचे आकडे नाहीत. (पातशाही होन – विनिमय मुल्य पावणेचार रूपये) होय.

शिवकाळात समाजातील कोणत्याही घटकाला करापासून मुक्तता नसे. सरकारी खजिन्यात प्रत्येकाला काही ना काही भर घालावी लागत असे. गरिब लोक हे देखिल अप्रत्यक्षरित्या कर देत, मीठावरील करही कोणाला चुकवता येत नव्हता. कारागीर, व्यावसायिक ही कर देत असत. शेतकरी शेतसारा नियमित देत असे. मध्ययुगात सरकारची

८९. सभासद बखर, श्री शिवछत्रपतींचे चरित्रः संपा. शं.ना.जोशी, पूणे, आ. ४ थी, १९२३, पान ३१.
९०. शिवकालीन महाराष्ट्र :डॉ. अ.रा.कुलकर्णी, राजहंस प्रकाशन, द्वितीयावृत्ती, १९९७,पान १३९.(पेशवे दप्तर (अप्रकाशित कागद.))

सारी भिस्त जमीन महसुलावरच होती. त्यामुळे तो नियमितपणे वसुल केला जात असे. पण कर लोकांच्याकडून जुलूम जबरदस्तीने वसूल केला गेला म्हणून लोकांनी त्याविरूध्द उठाव केला किंवा शेतसारा देताना कटकटी, विरोध केला अशी उदाहरणे फारशी आढळत नाहीत पण कराचा बोजा लोकांवर त्यांच्या उत्पन्नाच्या किती प्रमाणात पडत असावा हे साधारण सांगणे कठीण आहे.

शिवकाळात संपूर्ण स्वराज्यात एकच एक करपध्दती अस्तित्वात होती असे म्हणता येणार नाही. [९१] प्रत्येक प्रदेशाची आर्थिक परिस्थिती, रूढी, रितीरिवाज पाहून तेथील करपध्दती निश्चित केली जात असावी. उदा. कोकणातील कर हे देशावर आकारल्या जाणाऱ्या करांसारखेच असतील असे नाही. वतनदारांना दिलेल्या सनदा पत्रातून करासंबंधी अथवा करवसूली संबंधी उल्लेख आढळतात. करवसूली कायद्याप्रमाणे (कुलकानू), रोखीने किंवा वस्तू रूपाने, (नकदी अथवा जिन्सी) एखादया व्यक्तीच्या नावे किंवा स्थानिक रिवाजाप्रमाणे लिखित नियमाप्रमाणे (कलमी) ही रूढी प्रमाणे (कदमी) करावयाची याच्या सुचना सनदांपत्रात दिल्या जात असत. कराविषयी वापरल्या जाणाऱ्या शब्दांवरून ही करयंत्रणा किती लवचिक होती याची कल्पना येते. एकूणच अनेक छोटया मोठया करांचा विचार करता, या कालखंडात कराचा बोजा गरिबांवर अधिक पडत असल्याचे दिसते. गरिबांवरील हा बोजा कमी करण्याच्या हेतूने वतनदारांचे हक्क कमी किंवा रद्द करण्याचा प्रयत्न शिवाजी महाराजांनी केलेला आहे पण राजाला पूर्ण उदारपणाचे धोरण स्विकारता येत नाही. रयतेची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी व त्यातून राज्यकारभार सुसह्य करण्याच्या विचाराने शिवाजी महाराजांनी शेती व उद्योग यांच्या विकासाला महत्व दिले. शिवाजी महाराजांनी निरनिराळया उद्योगधंदयांना चालना देण्याचा, ते वाढविण्याचा, व्यापार वृध्दी करण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून येते. राजगड व रायगड या किल्ल्यांवर बाजारपेठा बसविल्या, अनेक बंदरांचा व बाजारपेठांचा विकास व रक्षण केल्याचे दिसून येते. शत्रूंची शहरे व बाजारपेठा लुटून व्यापाऱ्यांना स्वराज्यात येण्याबाबतचे आवाहन केल्याचे दिसते.

**धोरण प्रत्यक्षतेची प्रक्रिया -**

**अ)** शिवाजी महाराजांनी राज्यकारभाराच्या व्यवस्थेमध्ये लष्करी धोरणापेक्षा दिवाणी धोरणाला, कार्याला जास्त महत्व दिलेले दिसते, त्यासाठीच त्याने मंत्रीमंडळातील आठ प्रधानांपैकी प्रधान सेनापती ठेवला. त्यामुळे जवळजवळ सहा मंत्री किंवा प्रधानांना दिवाणी

९१. शिवकालीन महाराष्ट्र :डॉ. अ.रा.कुलकर्णी, राजहंस प्रकाशन, द्वितीयावृत्ती, १९९७,पान १४०.

कारभार पहावा लागत असे आणि प्रसंगानुरूप लष्करी काम पहावे लागे. [९२]

**ब)** शिवकाळात राजा हाच सर्व राज्ययंत्रणेचा मुख्य आधार होता. राजा हा नुसता नामधारी प्रमुख नसून त्यांच्या हाताखाली अष्टप्रधान मंडळ, सर्व कारखाने महाल यांचा समोवश होत असे. सर्व प्रकारच्या अधिकाऱ्यांना त्यांच्या अधिकार व कर्तव्याची पूर्ण जाणीव करून दिली जात असे. सर्वांना त्यांच्या अधिकारक्षेत्रात महत्व होते पण अंतिमतः ते राजाला जबाबदार होते. म्हणजेच अंतिम सत्ता राजाच्याच हाती होती. राजाने राज्यात सर्वत्र कडक शिस्त स्थापण्याचा प्रयत्न केला. [९३] शिवाजी महाराजांनी आपल्या पत्रात सैन्यातील लोकांनी "रयतेस काडीचा आजार द्यावयाची गरज नाही" असे कडक शब्दांत सांगितले आहे. अमात्यांची राजनिती यातदेखील वतनदारांनी कसे रहावे हे सांगताना शिवाजी महाराजांनी पुढील शब्दातून राजाचे सार्वभौमत्व दाखविले आहे. "आहे वतन इतकियावर कालक्रमणा करावी, सर्व देशाचा स्वामी म्हणजे राजा. त्याशी निष्ठेने वर्तावे." [९४] निष्ठा राजावरच ठेवून वतनदारांनी राहिले पाहिजे असे ते म्हणत.

**क)** राज्य बळकट राखण्यासाठी शिवाजी महाराजांनी वतनदारी पध्दत बंद केली. त्यामुळे वतनदारांकडे असणाऱ्या जमीनीवरील सारा मिळण्यास सुरूवात झाली आणि वतनदारांचे महत्वही कमी झाले. याउलट रयतवारी पध्दत स्विकारल्यामुळे पीक पाहणी एका व्यक्तीच्या मर्जीवर अवलंबून न राहता प्रत्यक्ष पीक स्थितीवर अवलंबून राहिल्यामुळे लोकांवरील किंवा रयतेवरील जुलूम कमी झाला. रयतेला २/५ पेक्षासुध्दा कमी सारा सरकारात भरण्याची सवलत मिळाली. त्यामुळेच प्रजेला शांतता व सुरक्षितता व भरभराट प्राप्त झाली व स्वराज्यातील शेतकरी वर्ग खुष झाला. [९५] रयतवारी स्विकारल्यामुळे वतन म्हणून जमीन देण्याची पध्दत बंद झाली व नोकरीच्या माध्यमातून पगार मिळू लागला. जमीन न देण्याच्या पध्द्तीमुळे शिवाजी महाराजांनी एक प्रकारे ब्राम्हणांना ही जमीन देण्याचे, अग्रहार देण्याचे नाकारले. प्रसंगी त्यांनी काही सनदा दिल्या. उदा. कऱ्हाडजवळील सैदापूर येथील एका ब्राम्हणाचे अग्रहार काढून घेतल्यामुळे त्यांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाला. तेव्हा वसंतगडाच्या किल्लेदाराकडून वर्षाचे तांदूळ मागून नेण्याची सनद देण्यांत आली.

---

९२. मराठी रियासत (खंड २):गो. स. सरदेसाई, केशव ढवळे प्रकाशन, पूणे १९२९ पान १२०.

९३. जाबता स्वराज्यः वि. का. राजवाडयांनी प्रसिध्द केलेल्या पत्रव्यवहारात चिपळूण येथील सेनाधिकाऱ्यास लिहीलेले कडक शिस्तीचा आदेश देणारे एक पत्र आहे.( मराठयांच्या इति. साधने खंड ८, पा.२८,)

९४. आज्ञापत्रः रामचंद्रपंत अमात्यः (संपा.) ग.ह.खरे, स.रा.भिडे, पुणे १९६०. पान २२-२३.

९५. Shivaji The Great Vol IV : Dr. Balkrishna, Taraporwala, Mumbai, 1932, Pg 110.

------- ◆ ◆ ◆ ◆ -------

# प्रकरण पाच

## पेशवेकालीन महसूल व्यवस्था

शिवाजी महाराजांच्या कारकीर्दीतील केंद्रीय प्रशासन संभाजी महाराजांच्या काळात बऱ्याचशा प्रमाणात जसेच्या तसे टिकून होते. संभाजी महाराजांना पकडल्यानंतर राजाराम महाराजांना कैदेतून सोडविण्यात आले व त्यांच्यावर संपूर्ण राज्याची व्यवस्था सोपविण्यात आली. राजाराम महाराजांच्या कारकीर्दीत शिवाजी महाराजांचे प्रशासन ढासळले. राजाराम महाराज जिंजीला गेले व महाराष्ट्रात मराठयांच्या स्वातंत्र्ययुध्दाला सुरूवात झाली. मराठे सरदारांना मोगलांच्याविरूध्द लढण्यास हुरूप यावा म्हणून त्यांनी सरदारांना जहागिरी दिल्या. त्यामुळे शिवकालातील अधिकारी नेमण्याची पद्धत बंद झाली हीच परंपरा पेशव्यांनी पुढे चालविली.

इ.स. १७०७ मध्ये औरंगजेब बादशहा मरण पावला. त्याच्या मृत्यूनंतर छत्रपती शाहूची सुटका झाली त्या आधीपासून स्वराज्य चालविणारी ताराराणी आणि शाहू महाराजांचा राज्य प्राप्तीसाठी संघर्ष सुरू झाला. दोघांनीही स्वराज्याचा हक्क प्रस्थापित करण्याचा प्रयत्न सुरु केला. शाहू महाराज शिवाजी महाराजांचा नातू असल्याने १२ जानेवारी १७०८ रोजी सातारा येथे शाहू महाराजांचा राज्याभिषेक झाला. त्यानंतर इ.स.१७१०मध्ये ताराबाईने कोल्हापूरच्या राज्याची स्थापना केली. राजाराम महाराजांच्या काळापासून महाराष्ट्रात अनेक सरदार व जहागीरदार पुन्हा निर्माण झाले होते. त्यापैकी फारच थोडयांच्या मनात स्वराज्याबदद्ल व स्वराष्ट्राबदद्ल निःस्वार्थी प्रेम होते. अशा स्थितीत शाहू महाराज छत्रपती झाल्यानंतरही काही काळ त्यांचे राज्य अस्थिरच होते. १६ नोव्हेंबर १७१३ रोजी बाळाजी विश्वनाथाला पेशवेपद देण्यात आले. शाहू महाराजांनी दिल्लीच्या बादशहाकडून स्वराज्य, चौथाई व सरदेशमुखी अशा तीन सनदा घेतल्या. [१] या सनदा देत असताना एक स्वतंत्रपणे करार केला. त्यावरून त्याचा दुय्यमपणा दिसून येतो. शाहू महाराजांनी त्यांना मिळालेल्या चौथाई व सरदेशमुखी हक्कांच्या मोबदल्यात बादशहाला १५,००० सैन्यानिशी मदत करावी असे बंधन लादण्यात आले. याशिवाय शाहू महाराजांनी दिल्लीच्या बादशाहीचे संरक्षण करावे असे बंधन त्यांच्यावर लादण्यात आले.

---

१. भोसल्यांच्या बंगालवरील स्वाऱ्याः बाळकृष्ण ना. सहस्त्रबुध्दे, (गोंदिया), राजवाडे संशोधन मंडळ, धुळे,१९४४, पान ७.

याबदद्ल डॉ सेन म्हणतात की, "ही व्यवस्था शाहूच्या दृष्टीने सोयीस्कर अशी होती. परंतु काळाची गरज म्हणून ही योजना आखलेली होती व या योजनेमुळेच शाहूने मोगलांचे श्रेष्ठत्व मानले ही गोष्ट सिध्द होते. शाहू हा मूलतःच प्रामाणिक असल्यामुळे त्याने मोगलांचे सर्व हक्क मानले. इतकेच नव्हे तर शनिवारवाडयाच्या प्रवेशद्वाराला दिल्ली दरवाजा असे नाव देण्यास हरकत घेतली नाही." [२]

**पेशव्यांचे प्रधानमंडळ** -

**राजा -** छत्रपती किंवा राजा यांचे स्थान स्वराज्यामध्ये सर्वश्रेष्ठ असूनसुध्दा बदलत्या परिस्थितीमुळे राजाचे स्थान हे मोगल बादशहाच्या तुलनेत संपूर्णपणे दुय्यम झाले. राजा किंवा राजेपद ही संकल्पना मराठेशाहीमध्ये हिंदुधर्मशास्त्राप्रामाणे वंशपरंपरागत चालविण्यात आली. शाहू महाराजांच्या राजेपदाबदद्ल रियासतकार सरदेसाई म्हणतात, "शाहुच्या बाबतीत सर्वात प्रमुख अशी एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की, त्याच्या व्यक्तिमत्व व स्वभावामुळे मराठयांच्या धोरणावर फार परिणाम झाला. शिवाजी महाराजानंतर मराठी राज्याच्या स्थित्यंतरावर परिणाम घडविणारी व्यक्ती म्हणूनच शाहूकडे पाहिले पाहिजे. शिवाजी महाराजांनी मोगलांना विरोध करुन स्वराज्य संरक्षणे हेच आपल्या जीवनाचे प्रमुख कर्तव्य मानले परंतु शाहूने मात्र या तत्वाला तिलांजली देऊन मोगलांचा मनसबदार होणे पसंत केले." [३] शाहू महाराजांनी पेशवा, प्रतिनिधी, सेनापती, सेनासरखेल, सचिव, सुमंत ही सर्व पदे वंशपरंपरागत केल्याचे दुष्परिणाम मराठेशाहीत दिसू लागले. या पध्दतीतील पोकळ डामडौल दिसू लागला. शाहू महाराजांच्या काळात काही प्रमाणात राजेपदाला अर्थ होता पण त्यानंतर मात्र राजाचा अधिकार हा नाममात्र राहिला. १८व्या शतकाच्या शेवटी छत्रपतींचे स्थान हे संपूर्णपणे अधिकारहीन झाले. इतकेच नव्हे तर राजाच्या सेवेतील सेवकांची नेमणूक बढती व पगार या सर्व पेशव्यांच्या अधिकार क्षेत्रात गेल्या. छत्रपतींच्या खाजगीतील हिशेब पेशवा काटेकोरपणे पहात असे. राजाच्या हालचालीवर नियंत्रण ठेवणारी अनेक बंधने पेशव्यांनी घातलेली होती.

---

२. Administrative system of the Marathas: Dr. S.N. SEN, University of Calcutta, Calcutta 1925, pg. 112.
३. Main Currents of Maratha History : Prof. G.S. Sardesai, Mumbai, 1923, pg. 103.

एकूणच राजाचे स्थान, दर्जा हा पेशव्यापेक्षा कनिष्ठ होता असे दिसते. तरीसुध्दा अधिकृतपणे राजा हाच सर्वश्रेष्ठ अधिकारी मानला जात असे. पण राजेपद हे व्यक्तीच्या कर्तबगारीवरच अवलंबून असते.

**पेशवा -** पेशवा हा मूलभूतपणे शिवाजी महाराजांच्या अष्टप्रधान मंडळातील एक मंत्री होता. शिवाजी महाराजांच्या अष्टप्रधान मंडळात पेशव्यांचे स्थान इतर मंत्र्यांच्यासारखेच राजापेक्षा दुय्यम होते. शिवकाळात वेळोवेळी पेशव्यांमध्ये बदल झालेला दिसतो. न्या. रानडयांच्या मते, "पंतप्रतिनिधीपेक्षा पेशवा हा कमी दर्जाचा मानला जात असे. [४] प्रतिनिधीला सालिना १५,००० होन पगार असे. तर, पेशव्याला सालिना १३,००० पगार असे. अशा स्थितीत पेशवेपदाला खरे महत्व व दर्जा बाळाजी विश्वनाथ या पेशव्याने प्राप्त करुन दिला. पहिल्या बाजीरावाने पेशव्याच्या मुत्सदद्‌दीपणाला तलवारीची जोड देऊन पेशवेपदाचा दरारा वाढविला. या दराऱ्यामध्ये प्रतिनिधी व सेनापती हे दोघेही मागे पडले व पेशवा हाच सर्व राज्याचा कार्यकारी प्रमुख झाला. पेशवे हे ब्राम्हण असल्यामुळे स्वाभाविकच धार्मिक व सामाजिक दृष्टया त्यांचे महत्व वाढले व १८ व्या शतकाच्या शेवटी पेशवा हा राजकीय व सामाजिक दृष्टया श्रेष्ठ अधिकारी ठरला. एखादयाला जबरदस्तीने मुसलमान केले असल्यास त्याला पुन्हा हिंदुधर्मात घेण्यासाठी १८ व्या शतकात पेशव्यांकडे परवानगी मागावी लागत असे. म्हणजेच १७ व्या शतकात छत्रपतीनां जे स्थान होते ते १८ व्या शतकात पेशव्यांना मिळालेले दिसते.

**सचिव -** केंद्रीय प्रशासनातील महत्वाची बाब म्हणजे सचिवालय. सचिवालयाला पेशवे काळात हुजुर दप्तर असे म्हणत. या दप्तरात २०० कारकून काम करीत होते. हे कारकून ज्या ठिकाणी काम करीत असत त्याला "फड" असे म्हणत. [५] मराठयांच्या राज्यकारभाराची सर्व कागदपत्रे या ठिकाणी काळजीपूर्वक ठेवत असत. सर्व महसूल व्यवस्थेची, सुभ्याच्या जमाखर्चाची, सुभ्यातील वंशपरंपरागत अधिकाऱ्यांची, खेडेगावातील अधिकाऱ्यांची, अबकारी कागदपत्रे, सार्वजनिक महसूलाची कागदपत्रे, संरजाम, इनाम इ. सर्वाची कागदपत्रे असत. हुजुर दप्तराच्या एकंदर कार्यपध्दतीत नाना फडणिसाने विशेष सुधारणा केल्या. हुजुर दप्तराचे अनेक भाग करण्यात आलेले होते. यापैकी चालते दप्तर व एक बेरजी दप्तर ही दोन दप्तरे सर्वात महत्वाची मानत असत. चालते दप्तर हे स्वतः फडणीसांकडे असे. यात

४. Rise of the Maratha Power: M.G. Ranade, Mumbai, 1961, pg. 72.

५. मराठेकालीन संस्था व विचारः प्रा गायकवाड, प्रा. सरदेसाई, प्रा थोरात, प्रा.हनमाने, फडके प्रकाशन, १९९०, पा. १९०.

राज्यातील लोकांना देण्यात येणाऱ्या सनदा किंवा हुकूम हे फडणीसांच्या नजरेखालून जात असत. एक बेरजी दप्तरामध्ये राज्याचा सर्व जमाखर्च व शिल्लक दाखविली जात असे.
दुसऱ्या बाजीरावाच्या कारकीर्दीपर्यंत हे दप्तर व्यवस्थितपणे ठेवले जात असे. पण त्याच्या काळात कोणालाही कोणतेही दप्तर स्वतःच्या मर्जीप्रमाणे पाहण्याची व त्यातील कागदपत्रे स्वतःबरोबर नेण्याची परवानगी देण्यात आली त्यामुळे हे दप्तर नष्ट झाले.

**४.२ <u>पेशवेकाळातील महसूल व्यवस्था</u> -**

शिवकाळाप्रमाणेच पेशवे काळातसुद्धा जमीन महसूल हीच राज्याच्या उत्पन्नाची मुख्य बाब होती. इतिहासकार वा.कृ.भावे म्हणतात, "पेशवाईत सरकारी वसूलाच्या पुष्कळ बाबी असल्या तरी त्या सर्वात जमीन बाब ही मुख्य होय." [६] पेशव्यांच्या महसूल पद्धतीबद्दल डॉ.सेन यांनी सुद्धा गौरवोद्गार काढलेले आहेत. ते म्हणतात, "पेशव्यांच्या महसूल पद्धतीचे मुख्य सूत्र म्हणजे करदात्यांची भरभराट व्हावी हे होते". [७]

मराठयांच्या राज्यव्यवस्थेचा साकल्याने विचार केला तर असे दिसून येते की, राज्याची भरभराट ही नुसत्या सरकारवरही अवलंबून असत नाही किंवा करदात्यांच्या भरभराटीवरही अवलंबून असत नाही तर राज्याची भरभराट ही सरकार व रयत यांच्यातील सुसंबंधावर अवलंबून असते. सरकार कर आकारणी करून आपले उत्पन्न काहीं काळ वाढवू शकले तरी ती वाढ कायम होत रहावी म्हणून उत्पादनाच्या, संपत्तीच्या वाढीसाठी लोकांना प्रोत्साहन देणे हाच त्यावरील उपाय आहे. हे तत्व ओळखून पेशव्यांचे वित्त अधिकारी भविष्यकाळातील फायद्याचा विचार करून तात्कालिक सुखाचा विचार लांबणीवर टाकत असत.

निकस, ओसाड जमीनी लागवडीखाली आणण्यासाठी किंवा किफायतशीर उद्योगाला उत्तेजन देण्यासाठी त्यांनी इस्तावा पध्दतीने (दरवर्षी कर वाढ) कर आकारणी करणे या धोरणाला महत्व दिले आणि सततच्या अशांतता आणि असुरक्षिततेच्या वातावरणामुळे होणाऱ्या घातक परिणामावर तोडगा म्हणून जमाबंदीचे (वस्तु रूपाने किंवा रोख) तत्व लवचिक केले.

---

६. पेशवेकालीन महाराष्ट्रः वा.कृ. भावे, वरदा प्रकाशन, पुणे १९९८, दुसरी आवृत्ती. पान ३४९.
७. Administrative system of the Marathas: Dr. S.N. SEN, University of Calcutta, Calcutta 1925. pg. 112. (The revenue policy of the Peshwas was based on the principle of securing the prosperity of the tax-payer).

**जमीन महसूल -**

पेशवेकाळातही शिवकाळाप्रमाणेच जमीन महसूल हीच राज्याच्या उत्पन्नाची मुख्य बाब होती. शिवकाळात ज्याप्रमाणे जमीन महसूलाचे तीन निश्चित टप्पे आढळतात त्याप्रमाणे १८ व्या शतकातील महसूल व्यवस्थेचे टप्पे आढळत नाहीत. पेशवेकाळात छत्रपती दुर्बल असल्याने सर्व उत्पन्नाच्या बाबी या पेशवे व सरदार यांच्यामध्ये विभागलेल्या होत्या. पूर्वीचे अर्थकारणाचे एकसुत्री स्वरूप जाऊन त्याठिकाणी विकेंद्रीकरण झाल्याचे दिसते. पेशवेकाळात जमीनीपासून येणारे उत्पन्न हे सर्वात जास्त व पूर्वी उल्लेख केल्याप्रमाणे मुख्य बाब होती.

जमीन महसूलाचे साधारणतः पुढील भाग पाडण्यात येत असत.

१. शेरी जमीन (लागवडीखालील जमीन)

२. कुरण (चराऊ जमीन)

३. बाग (बाग जमीन)

४. आमराई.

या सर्व जमीनी राज्यातील लोकांकडे असत किंवा त्या खुद्द पेशव्यांच्या ताब्यातही असत. पण जिल्हाधिकारी, मामलतदार किंवा कमाविसदाराच्या देखरेखीखाली या जमीनी होत्या. महसूल वसूलीची जबाबदारी पाटीलांवर असे. महाराच्या मदतीने वसूलीच्या वेळी शेतकऱ्याला चावडीवर बोलावले जात असे. पाटीलांच्या कामात मदत करण्यासाठी गावकीर्द लिहिणारा कुलकर्णी कचेरीत असे. कुलकर्णी वसूल भरल्याची पावती देत असे. आणि जमा झालेला प्रत्येक गावचा वसूल चौगुला कमाविसदारापर्यंत पोच करीत असे. चौगुल्याला त्या वसूलाची पावती मिळत असे.

शेतजमीनीचा कस पाहून आणि लागवडीखालील जमीनीची पाहणी करून मगच सारा वसूली ठरविण्यात यावी अशी पेशव्यांची महसूल अधिकाऱ्यांना ताकीद असे. जमीनीची वर्गवारी करताना सरस, मध्यम व कनिष्ठ इ. तीन मुख्य भाग केले जात असत. महसूल सारा हा रोख रक्कमेच्या स्वरूपात किंवा धान्याच्या स्वरूपातही घेतला जात असे. साऱ्याची रक्कम प्रत्येक ५ वर्षात जिराईत व बागाईत जमीनीमध्ये हळूहळू वाढवली जात असे.

तसेच प्रत्येक पिकाला वेगवेगळा महसूल होता. इ.स. १७८८ साली उत्तम बागाईत दरबिघ्यास ६ रू. मळईचे दरबिघ्यास रू. ३ व उत्तम काळीच्या दरबिघ्यास रू. २ व त्याचे

खालोखाल जमीनीस सव्वा रूपया, रूपया, बारा आणे असे दर ठरवून नक्त (रोख) रीत चालू होती. [८] जमीन महसूल सर्व गोष्टींवर लावला जाई. प्रत्येक नारळाचे झाड म्हणजे पेशव्यांच्या खजिन्यात आठ आण्याची भर असे. त्यामुळेच सरकारकडून नारळाच्या लागवडीकडे लक्ष दिले जात असे. पण ती झाडे २० वर्षाची होईपर्यंत पेशवे त्यावर कर घेत नव्हते. तसेच सुपारी १५ वर्षाची होईपर्यंत फणसास १२ वर्षे अशी महसूलात माफी दिली जात असे. [९]

पेशवेकाळातील जमीन महसूलाकडे पाहिले असता असे दिसून येते की, शाहू महाराजांच्या मृत्यूनंतर बाळाजी बाजीराव उर्फ नानासाहेब यांच्या हातात राज्याचे बहुतेक सर्व अधिकार आले. "राज्यातील घोटाळयाचे प्रश्न मिटल्यावर त्याने आपले लक्ष जमीन महसूलाच्या पद्धतीकडे लावून सन १७५८मध्ये वसूलाची घडी नीट बसवून दिली व तीच पद्धती चांगली रुळल्यावर तिच्यात ज्या उणिवा आढळून आल्या त्या नाना फडणिसाने आपल्या कारकीर्दीत दूर करुन तिला पूर्णत्व आणले. शेवटच्या बाजीरावाच्या वेळी ही रुळलेली पद्धती किंचित बिघडली असली तरी पेशवाई बुडाल्यानंतर जुन्या पद्धतींची उपयुक्तता व चोखपणा ओळखून तीच पद्धत थोडया फरकाने इंग्रज सरकारने अंमलात आणली."[१०] महसूल विषयक तत्वे वेळोवेळी पेशव्यांनी आपल्या मामलेदार किंवा कमाविसदार यांना केलेल्या आज्ञांवरुन दिसून येतात. डॉ. सेन यांनी म्हटल्याप्रमाणे या सूचनासुद्धा जनहिताच्या असल्याचे जाणवते. [११] जमीनीच्या मोजमापणीसाठी शिवकालातील काठीचाच वापर केला जात असे.

**सहोत्रा, मोकासा व बाबती -** पेशवेकाळात छत्रपती दुर्बल असल्याने सर्व उत्पन्नाच्या बाबी पेशवे व इतर सरदार यांच्यामध्ये विभागलेल्या असत. पूर्वीचे अर्थकारणाचे एकसूत्री स्वरुप जाऊन त्या ठिकाणी विकेंद्रीकरण झाल्याचे दिसून येते. राज्याच्या एकंदर उत्पन्नापैकी दोन महत्वाचे भाग आपल्याला दिसून येतात. मोकाश्यामध्ये दोन प्रकारच्या उत्पन्नाच्या बाबी असत. त्यापैकी सहोत्रा म्हणजे जमा होणाऱ्या महसूलाच्या ६ टक्के इतके उत्पन्न व नाडगौडा म्हणजे ३ टक्के उत्पन्न हे सुद्धा बाजूला काढून ठेवत असत.

---

८. हिंदुस्थानची राज्यव्यवस्था व लोकस्थिती : : (१८९१-९२ अखेर हिंदुस्थानचे हालहवाले पार्लमेंटमध्ये मांडलेल्या रिपोर्टच्या आधारे) डेक्कन एज्यु., आर्यविजय, पुणे, १८९६, पान १०७,

९. पेशवेकालीन डायरी : खंड ६ वा, पान २४६-२४७.

१०. पेशवेकालीन महाराष्ट्रः वा.कृ. भावे, वरदा प्रकाशन, पुणे, दुसरी आवृत्ती, १९९८, पान ३४९.

११. मराठयाची प्रशासन व्यवस्थाः अनु. विजया कुलकर्णी, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, २००३, पान १४१.

म्हणजे राजाला २५ टक्के अधिक ९ टक्के इतके उत्पन्न स्वतःच्या खर्चासाठी मिळत असे. बाकीचे ६६ टक्के उत्पन्न हे इतर सरदारांमधून वाटून दिलेले असे.

**मोकासा, बाबती -** चौथाईच्या हक्का व्यतिरिक्त उरलेल्या रकमेपैकी ७५ टक्के उत्पन्नाला मोकासा बाबती असे म्हणत.यामध्ये एकाचवेळी एखाद्या गावातील जमीनीबाबत वेगवेगळया लोकांना वेगवेगळया नावांखालीं सनदा दिल्या असण्याची शक्यता असे. काही वेळा एखादे गाव किंवा गावातील काही जमीनी इनाम दिलेल्या असत. अशा स्थितीत त्या गावातून सारा वसूल करणाऱ्याला कोणत्या अडचणींना तोंड द्यावे लागत असे याचे वर्णन डॉ.सेन यांनी केलेले आहे.ते म्हणतात की,"एकाच गावामध्ये एकाचा कारकून सहोत्रा गोळा करण्यासाठी येई, तर दुसऱ्याचा मोकासापैकी निम्मा भाग गोळा करण्यासाठी येई, तर तिसऱ्याचा माणूस मोकासाचा राहिलेला भाग गोळा करण्यासाठी येई, या बाबी पूर्ण होताच खुद्द जहागीरदाराचा मनुष्य आपला हक्क वसूल करण्यासाठी येई."[१२] थोडक्यात सारा वसूलीची ही पद्धत अतिशय क्लिष्ट असल्याचे दिसून येते. तसेच कोणाचीही अधिकार कक्षा निश्चित ठरविल्याचे दिसून येत नाही.

**चौथाई -** चौथाई म्हणजे राष्ट्राच्या वसूलातील उत्पन्नाचा चौथा हिस्सा होय. चौथाईची ही पद्धत म्हणजे परकियांच्यापासून घ्यावयाची संरक्षणात्मक रक्कम असाच त्याचा अर्थ आहे. पेशवेकाळात राज्यविस्तार झाल्यावर दक्षिणेकडील सहा सुभ्यांतून चौथाईचा हक्क वसूल करण्याची तर सनदच दिल्लीच्या बादशहाने मराठयांना दिली. दिवसेंदिवस मराठयांचे राज्य संपूर्ण भारतभर पसरल्यामुळे सर्वच प्रदेशातून चौथाईचा हक्क मराठयांना मिळू लागला. महादजी शिंद्यांनी संपूर्ण मोगल साम्राज्यातून हा हक्क वसूल केला होता.

**सरदेशमुखी -** ज्या वेळी साम्राज्यातील सर्व जमीनी लागवडीखाली आणलेल्या नव्हत्या तेव्हा काही देशमुखांच्याकडे जमीनी लागवडीखाली आणणे व त्यातील सारा गोळा करुन तो सरकारात जमा करण्याची कामगिरी सोपविण्यात आली. अशा प्रकारच्या या कामगिरीबद्दल त्यासंबंधित देशमुखाला त्याने गोळा केलेल्या उत्पन्नापैकी १०टक्के उत्पन्न स्वतःसाठी ठेवून घेण्याचा हक्क असे यास सरदेशमुखीचा हक्क असे म्हणतात.चौथाईचा हक्क शत्रूच्या प्रदेशा तून वसूल करत असत तर सरदेशमुखीचा हक्क हा स्वराज्यामधून वसूल केला जात असे.

१२. Administrative system of the Marathas : Dr. S.N. SEN, University of Calcutta, Calcutta 1925, p 112.

## महसूल आकारण्याची पद्धत -

पेशवे काळातील महसूल आकारणीची पद्धती शिवकालातील पद्धतीप्रमाणेच दिसून येते. जमीन महसूल ही महसूलाची प्रमुख उत्पन्नाची बाब होती. शेतीच्या विकासाकडे सतत लक्ष दिल्याचे दिसून येते. त्यामुळे शेतीच्या व्यवसायाला प्रोत्साहन देऊन रयतेला आनंदी ठेवणे या तत्वाचा पेशव्यांनी जाणीवपूर्वक प्रयत्न केला असे दिसून येते. जमीन महसूलाची निश्चिती करत असताना प्रत्यक्ष पीकपाणी पाहून मगच सारा आकारणी करावी. केवळ चावडीत बसून अंदाजाने सारा आकारु नये. अशा प्रकारच्या सूचना पेशव्यांनी आपल्या अधिकाऱ्यांना दिल्याचे दिसून येते.

इ.स.१७६०-६१ साली वणी-दिंडोरीचा मामलेदार लक्ष्मण भिकाजी याला दिलेल्या सूचनेमध्ये म्हटले आहे की, खेडयांची पाहणी करुन सर्व जमीनीची मोजमापणी करावी. जमाबंदी ही प्रत्यक्ष पाहणीवर आधारलेली असल्याने पेशवे सरकारने लागवडीला प्रोत्साहन दिलेले दिसते. जमीनीच्या मगदुराप्रमाणे सरस, मध्यम व कनिष्ठ असे मुख्य भाग पाडावेत. जिराईत व बागाईत तसेच, पाटस्थळ व मोटस्थळ असेही भाग करावेत. ही पाहणी झाल्यानंतर वरिष्ठ अधिकाऱ्यांमार्फत जमीनीचा सारा ठरवून घ्यावा. वणी-दिंडोरीमध्ये नापीक असलेल्या जमीनी लागवडीखाली आणण्यासाठी दोन ते तीन वर्षात प्रयत्न करावेत जर या प्रयत्नात कसूर झाली तर तेथील कमाविसदाराला कामावरुन दूर करावे तसेच सर्व व्यवस्थित असताना एखाद्या वेळेस पावसाने दगा दिल्यास किंवा शत्रूने हल्ला केल्यास तेथील रयतेला रिवाजाप्रमाणे सूट द्यावी. काही मामलेदारांना केलेल्या सूचनेत असेही म्हटले आहे की जर एखाद्या व्यक्तीस सारा भरता येत नाही म्हणून जर जमीन विकण्याची किंवा जमीन गहाण टाकण्याची आपत्ती येत असेल तर त्याला पाच ते सात वर्षे साऱ्यात सूट देऊन त्या व्यक्तीला अशा प्रकारच्या संकटापासून वाचवावे.

जे शेतकरी पडीक जमीन लागवडीखाली आणतील त्यांना पेरणीच्या हंगामात तगाई मंजूर करावी. दुसऱ्या माधवरावाच्या कारकीर्दीत शेतकऱ्यांना जमीनी कसण्यात कायम उत्साह वाटावा अशी परिस्थिती निर्माण केली. पाच सात वर्षाचा दीर्घ मुदतीचा करार आणि जमीनीची विक्री आणि गहाण ठेवण्यास बंदी केली. त्यातूनही जर जमीन गहाण किंवा विक्री झाली असेल तर ती सोडवून रयतेच्या हवाली करावी आणि पुढे दुसरी जमीन गहाण व विक्री होऊ देऊ नये याला महत्व दिले जात असे. [१३] अशा सुचनाही पेशव्यांनी १७८४-८५ मध्ये दिल्याच्या आढळतात.

**<u>जमीनीची वर्गवारी</u> -** शिवकालाप्रमाणे पेशवेकालातसुद्धा जमीनीची प्रत्यक्ष पाहणी करुन वर्गवारी करण्यात आली होती. या वर्गवारीमध्ये सरस, मध्यम व कनिष्ठ असे तीन मुख्य भाग असून काळी जमीन, डोंगराळ जमीन, बागाईत, जिराईत, मोटस्थळ, पाटस्थळ, आमराई इ. प्रकार असत. याशिवाय स्थल-कालमानानुसार जमीनीवर सारा बसविण्याची पद्धत होती. महसूल सारा हा रोख रक्कमेच्या स्वरुपात किंवा धान्याच्या स्वरुपातसुद्धा घेत असत.

**तक्ता क्र. ६ पेशवेकालीन साऱ्याचे दर पुढीलप्रमाणे.--**

<table>
<tr><th>जमीनीचा प्रकार</th><th>मण</th><th>प्रत्येक बिघ्याला पायली</th></tr>
<tr><td>सरस</td><td>३ ·|·</td><td>१ पायली</td></tr>
<tr><td>मध्यम</td><td>२ ·||·</td><td>२ पायली</td></tr>
<tr><td>कनिष्ठ</td><td>१ ·|||·</td><td>३ पायली</td></tr>
</table>

**जिराईत जमीन -** या जमीनी ज्या वेळी लागवडीखाली आणावयाच्या असतील त्यावेळी खाली दिल्याप्रमाणे सारा आकारणी करण्याची पध्दत होती. ज्या जिराईत जमीनी पहिल्यापासून लागवडीखाली आहेत त्यांना प्रत्येक बिघ्याला दोन रुपये सारा घ्यावा व डोंगराळ जमीनीपासून प्रत्येक बिघ्याला एक रुपया सारा घ्यावा.

**तक्ता क्र. ७ पेशवेकालीन जिराईत जमीनीवरील साऱ्याचे दर-**

| काळी जमीन | प्रत्येक बिघ्याला दर | | | डोंगराळ जमीन | प्रत्येक बिघ्याला दर | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | रु. | आ. | पै. | | रु. | आ. | पै. |
| १ वर्षे | ० | ४ | ० | १ वर्षे | ० | २ | ० |
| २ वर्षे | ० | ८ | ० | २ वर्षे | ० | ४ | ० |
| ३ वर्षे | १ | ० | ० | ३ वर्षे | ० | ८ | ० |
| ४ वर्षे | १ | ८ | ० | ४ वर्षे | ० | १२ | ० |
| ५ वर्षे | २ | ० | ० | ५ वर्षे | १ | ० | ० |

---

१३. पेशवा डायरीः खंड ६ वा, पान २६५-२६.

**बागाईत जमीनी -**

बागाईत जमीनीचे सोयीसाठी पाटस्थळ व मोटस्थळ असे दोन भाग केलेले दिसून येतात. ज्या बागाईत जमीनी पूर्वीपासून लागवडीखाली आहेत. त्यांच्यावर ऊस व इतर बागाईत पिकांसाठी प्रत्येक बिघ्याला १० रु सारा बसवावा. [१४] ज्या पडीक जमीनी बागाईतीखाली नव्याने येतील. त्यांना पाटस्थळ व मोटस्थळ यांच्यासाठी साऱ्यांची पुढीलप्रमाणे दर आकारणी करावी.

पाटस्थळ बागाईत जमीनीचे साऱ्याचे दर

१ वर्षे ५ रु. प्रत्येक बिघ्याला
५ वर्षे १० रु. प्रत्येक बिघ्याला

मोटस्थळ बागाईत जमीनीचे साऱ्याचे दर

१ वर्षे १ रु. प्रत्येक बिघ्याला
५ वर्षे ५ रु प्रत्येक बिघ्याला

प्रत्येक पिकाला वेगवेगळा महसूल आकारला जात असे –

पहिल्या माधवरावाच्या काळात नेरळ तालुक्यातील जमीनीना व पिकांना साऱ्याचे वेगवेगळे दर लावल्याचे दिसून येते ते पुढीलप्रमाणे :-[१५]

**तक्ता क्र.८ पेशवेकाळातील जमीनीना व पिकांना लावलेले साऱ्याचे वेगवेगळे दर -**

| जमीनीचा प्रकार | प्रत्येक बिघ्यास | रु. | आ. | पै. |
|---|---|---|---|---|
| सरस | ” | ५ | ० | ० |
| मध्यम | ” | ४ | ० | ० |
| कनिष्ठ | ” | ३ | ० | ० |
| रब्बी | ” | १ | ८ | ० |
| वरकस | ” | १ | ८ | ० |
| ताग | ” | ५ | ० | ० |
| ऊस | ” | ५ | ० | ० |
| ताड | प्रत्येक झाडाला | ० | ४ | ० |
| नारळ | प्रत्येक झाडाला | ० | ८ | ० |

१४. मराठयांची प्रशासन व्यवस्थाः डॉ. एस्. एन्. सेन, (अनु. विजया कुलकर्णी), महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, २००३, पान १४६. . (Administrative system of the Marathas: Dr. S.N. SEN).
१५. मराठयांची प्रशासन व्यवस्थाः डॉ. एस्. एन्. सेन, (अनु. विजया कुलकर्णी), महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, २००३, पान १५०. . (Administrative system of the Marathas: Dr. S.N. SEN).

**तक्ता क्र.९ पेशवेकाळातील मावळ भागात असणारे साऱ्याचे दर पुढीलप्रमाणे –**

| | |
|---|---|
| भात लहान-मोठे | दरमणी १·। रू |
| वरी | १·।·रू |
| नागली | १·॥· रू. |
| ज्वारी | दर खंडी ३५ रू. |
| गहू | दर खंडी ४० रू. |
| हरभरे | दर खंडी ४० रू. |
| तीळ | १ रूपयास ४ पायली |
| तूप | १ रूपयास ४ शेर |

पेशव्यांनी विशेषतः कोकणात समुद्रकिनाऱ्याला नारळाची झाडे लावण्यास प्रोत्साहन दिलेले दिसून येते. नारळाची झाडे लागवडीपासून ताबडतोब फायदा देत नाहीत त्यासाठी लागणारी मजुरी आणि भांडवल प्रदीर्घ काळ निरूत्पादीत राहते. त्यामुळे त्याची लागवड करणाऱ्या बागाईतदारांना खास प्रोत्साहन व सवलती द्याव्या लागत. नारळाची झाडे लावल्यानंतर १८ ते २० वर्षे त्यांच्यावर कोणताही सारा घेऊ नये. सुपारीच्या झाडापासून १५ वर्षांपर्यंत सारा घेऊ नये. उंडणीच्या झाडापासून १२ वर्षापर्यंत सारा घेऊ नये. वरील कालखंडानंतर नारळाच्या प्रत्येक झाडाला दर वर्षी ४ आणे सारा घ्यावा. सुपारीच्या प्रत्येक झाडाला दर वर्षी १ आणा सारा घ्यावा व उंडणीच्या प्रत्येक झाडाला दर वर्षी ३ आणा सारा घ्यावा. भंडारी लोकांनी जर ताडमाड लावलेला असेल तर त्यांच्याकडून प्रत्येकी १ रु. व झावळयाचा एक भारा घ्यावा. डॉ. सेन म्हणतात, "त्याप्रमाणे नारळाची लागवड ही सरकारला अतिशय फायदेशीर होत असते. यामुळे सरकारच्या उत्पन्नात हमखास भर पडत असे."[१६]

१६. मराठयांची प्रशासन व्यवस्थाः अनु. विजया कुलकर्णी, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, २००३, पान १५०.( Administrative system of the Marathas: Dr. S.N. SEN)

**<u>पडीक जमिनीबद्दलचे धोरण</u>** - पेशव्यांनी लागवडीखाली असणाऱ्या जमीनीबद्दल ज्याप्रमाणे एक स्वतंत्र धोरण आखले होते तसेच पड जमीनीच्या बाबतीतसुद्धा अतिशय लोकाभिमुख धोरण आखल्याचे दिसून येते. ज्या ठिकाणी जमीनी लागवडीखाली आणणे कठीण असे तेथे विशेष प्रयत्न करण्याबद्दल सरकारातून प्रोत्साहन दिले जात असे. कोकणातील अंजनवेल व सुवर्णदुर्ग या दोन तालुक्यांत जमीन ही लागवडीखाली आणता येत नसे. तसेच झाडपालासुद्धा त्या ठिकाणी उगवू शकत नसे. तेव्हा अशी जमीन लागवडीखाली आणण्यासाठी ज्या सूचना दिलेल्या होत्या. त्यांमध्ये अशी एक सूचना होती की, शेतकऱ्यांनी डोंगराळ प्रदेश फोडून काढावा व ती माती खाचखळग्यात घालून एक चांगली सलग जमीन तयार करावी व अशाप्रकारे लोकांना प्रोत्साहन देण्यासाठी पुढीलप्रमाणे आवाहन करण्यात आलेले होते. -

१. जी कोणी व्यक्ती डोंगर फोडून जमीन तयार करेल व त्या जमिनीला बांधबांधोरी करेल त्या व्यक्तीला त्या जमीनीपैकी निम्मी जमीन इनाम दिली जाईल व उरलेल्या निम्म्या जमिनीवर २० वर्षे सारा आकारला जाणार नाही. त्यानंतरच्या पुढील पाच वर्षांत नाममात्र सारा आकारला जाईल. अशा प्रकारे २५ वर्षानंतर त्या जमीनीवर पूर्ण सारा आकारला जाईल.

२. ज्या जमीनी समुद्रकिनाऱ्याला असून पाण्याखाली जातात. त्या जमीनींना जी कोणी व्यक्ती बांध-बांधोरी करेल त्याला १/४ जमीन इनाम दिली जाईल व उरलेल्या जमीनीवर नाममात्र सारा आकारला जाईल व हा सारा त्याला आलेल्या खर्चाच्या प्रमाणात असेल. जी रयत अशाप्रकारे पड जमीनी लागवडीखाली आणेल त्याला पहिली २० वर्षे सारा आकारला जाणार नाही.

तसेच, पडीक जमीन लागवडीखाली आणण्यासाठी विशेष सवलतीनुसार कर आकारणी केली जात असे. पडीक जमीन लागवडीखाली आणणाऱ्यास निम्मी जमीन इनाम होती. पेशव्यांनी पडिक जमीनीवर नवा भराव घालण्यास जसे प्रोत्साहन दिले तसेच त्यांनी पूर्वीपासून लागवडीखाली असलेल्या जमीनीकडे किंवा तेथे कसणाऱ्या रयतेकडे दुर्लक्ष केले नाही. दुष्काळ, कमी जास्त पाऊस, पीक नुकसानीबद्दल ही सरकारकडून कर माफी करण्यात आली.

नुकत्याच लागवडीखाली आलेल्या जमीनीवरील करापेक्षा पूर्वीच लागवड झालेल्या जमीनीवरील कर आकारणी अधिक असे. अशा शेतसाऱ्याचे प्रमाण आणि तो देण्याची पध्दत ही राज्यातील निरनिराळया विभागात भिन्न होती.

उदा. १७४०-४१ मधील हवेली पाल येथील जमाबंदी –

१) भात शेत जमीन दर बिघा – दहा मण

२) ऊस दर बिघा - रू. ५ पूर्ववत कर

३) माळवे (भाजीपाला) जमीन – दर बिघ्यास रू. २

४) उन्हाळी किर्द (पिके) दर बिघ्यास रू. १ ॥·

मौजे कठापूर संमत कोरेगाव प्रांत वाई (१७४०-४१)

१) अव्वल जमीन – ३ $^{१/४}$ मण जमाबंदी दर बिघा.

२) दुम जमीन – २ $^{१/२}$ मण जमाबंदी दर बिघा.

३) सीम (कनिष्ठ) जमीन – १ $^{३/४}$ मण जमाबंदी दर १ बिघा.

अशी जमाबंदी आकारली जात असे. [१७] हा कर रयतेच्या सोयीनुसार वस्तु रूपाने किंवा रोख दोन्ही प्रकाराने दिला जात असे.

**करविषयक धोरण -**

पेशव्यांच्या करविषयक धोरणाचा विचार करत असताना एक गोष्ट जाणवते की, प्रत्येक व्यक्तीला तिच्या उत्पन्नाच्या सम प्रमाणात कर द्यावा लागत असे. पेशव्यांनी अशा सूचना दिलेल्या होत्या की, कोणत्याही व्यक्तीस त्याच्या उत्पन्नापेक्षा एक पै सुद्धा जास्त भुर्दंड बसता कामा नये. जर एखाद्या व्यक्तीने तक्रार केली तर पुन्हा मोजणी करुन त्यानुसार कर बसवावा.

**१. तगाई -** तगाईची पद्धत ही शिवकालापासून अस्तित्वात होती. या पद्धतीचे दोन उपयोग डॉ.सेन यांनी सांगितले आहेत. [१८]

१. शेतकऱ्याला दुष्काळ व टंचाईच्या काळात पैसा उपलब्ध होणे.

२. सावकारी पाशातून रयतेची सुटका होणे.

---

१७. मराठेकालीन संस्था व विचार : प्रा गायकवाड, प्रा.सरदेसाई, प्रा थोरात, प्रा. हनमाने, फडके प्रकाशन, १९९०, पा. २५५.

१८. Administrative system of the Marathas: Dr. S.N. SEN, University of Calcutta, Calcutta 1925, pg. 180-181.

तगाईमुळे रयतेचा पैशाचा प्रश्न मोठया प्रमाणात सोडवला जात असे. तगाई म्हणजे सरकारी कर्ज होय. परंतु कर्ज वसूल करत असताना रयतेवर कोणत्याही प्रकारचा जुलूम किंवा जबरदस्ती होणार नाही याची खबरदारी घेतली जात असे. काही वेळा अत्यंत गरजू व्यक्तीला बिनव्याजी तगाई देत असत व बऱ्याच वेळा व्याजाचा दर अतिशय नाममात्र असे.

तगाईची रक्कम ही त्या भागातील कमाविसदार किंवा मामलेदार यांनी आपल्या वसूलातून द्यावी अशी पद्धत होती. जर काही कारणाने दरम्यानच्या काळात त्या कमाविसदाराची किंवा मामलेदाराची बदली झाली किंवा त्याला काढून टाकले तरी नव्या अधिकाऱ्याने जुन्या अधिकाऱ्याची सर्व जबाबदारी उचलली पाहिजे असा रिवाज होता. तगाईची मुदत ३ ते ७ वर्षांपर्यंत असे. तगाईच्या धोरणानुसार असे दिसून येते की, पेशवाईत जमीन महसूलाच्या वाढीसाठी व विकासासाठी योग्य ते सर्व केल्याचे दिसून येते.

**२. लिलावाची पद्धती -** पेशवेकाळातील जमीन महसूलामध्ये बटाई पद्धत दिसून येते. बटाई पद्धतीमध्ये एक कायम स्वरुपाचा साऱ्याचा दर दिसून येतो. यामुळे सरकार व सामान्य रयत यांच्यामध्ये संबंध चांगले टिकून राहिले. परंतु १७९६ मध्ये दुसऱ्या बाजीरावासारख्या अकर्तबगार पेशवा राज्यप्रमुख झाल्यामुळे पूर्वीच्या राजवटीतील बहुतेक सर्व संपन्नता लयास गेली व पेशव्याकडे येणाऱ्या उत्पन्नात घट झाली. अशा स्थितीत जादा पैसा मिळविण्यासाठी पेशव्यांनी जमीन महसूलाच्या पद्धतीत जमीन लिलावाने देण्याची पद्धती (Farming System) सुरु केली. मामलेदाराचा हुद्दा एखाद्या व्यक्तिला तिची पात्रता पाहून देण्याची पद्धत बंद केली व त्याच्याऐवजी आपल्या विश्वासातील व्यक्तीला हे पद देण्याची पद्धत सुरु केली.

बऱ्याच वेळा अशा अनेक पदांचा जाहीर लिलाव होत असे व जी व्यक्ती मोठयात मोठा लिलाव लावेल त्यालाच हे पद दिले जात असे. अशा स्थितीत असा हा मामलेदार आपण घातलेल्या पैशापेक्षा जास्त पैसा कसा वसूल करता येईल याकडेच लक्ष देत असे. परिणामी मामलेदार व त्याच्या हाताखालील अधिकारी हे आपापल्या भागात सर्व बाबतीत स्वतःच अधिकारी होत असत. त्यांच्याविरुद्ध कोणाला तक्रार करता येत नसे. खुद्द पेशवासुद्धा रयतेची तक्रार ऐकून घेत नसे. महसूल आकारण्यामध्ये सौम्य धोरण स्वीकारले जात नसे. ही पद्धत मराठेकालीन जमीन महसूलाच्या चांगल्या पद्धतीचे विकृत स्वरुप होते.

**<u>पेशवेकालीन सार्वजनिक उत्पन्नाची साधने</u> -**

पेशवेकाळात जमीन महसूल हे उत्पन्नाचे मुख्य साधन असले तरी त्याच्याशिवाय इतरही सार्वजनिक उत्पन्नाच्या बाबी म्हणून ओळखल्या जात.

| | | |
|---|---|---|
| १) जादा महसूल | २) खानेसुमारी | ३) सरकारी अधिकाऱ्यांना दिलेली सूट |
| ४) जंगले | ५) टांकसाळ | ६) जकात |
| ७) जमिन व मामलेदार | ८) जकात मोहतर्फा | ९) नव्या पेठा बसविणे |
| १०) दळणवळण | ११) शेटे - महाजन | १२) मक्तेदारी |
| १३) सरकारी हस्तक्षेप | | |

या सर्व गोष्टींपासून सार्वजनिक उत्पन्न मिळत असे. या व्यतिरिक्त चौथाई व सरदेशमुखी मधून ही मराठयांना उत्पन्न मिळत असे. मराठयांच्या महसूल धोरणाचे मुख्य सुत्र होते की, प्रत्येक माणसावर त्याच्या उत्पन्नाच्या प्रमाणात कर आकारला जावा. [१९]

जमीन महसूलाबरोबरच पेशवे इतर कर ही आकारत असत. डॉ. सेन यांनी अशा विविध करांची यादी एलफिन्स्टनच्या अहवालातून घेतली आहे. [२०]

**१. जादा महसूल -** जादा महसूलामध्ये पुढील करांचा समावेश होतो.

१. धूक पट्टी – देशमुख किंवा देशपांडे यांच्या जमिनीवर एक वर्ष काम करण्याबद्दल कर.

२. हक्क चौथी - रयतेवर बसवलेल्या एकंदर साऱ्यापैकी १/४ सारा.

३. महार माहिली - महारांना इनाम दिलेल्या जमिनीवरील कर.

४. मिरासपट्टी –शिवकालाप्रमाणेच प्रत्येक तीन वर्षांतून मिरासदारांच्याकडून घ्यावयाचा कर.

५. इनाम तिजाई - इनामदारांना त्यांच्या जमिनीवर असणाऱ्या एकंदर साऱ्यापैकी १/३ कर. इनाम तिजाई म्हणून वसूल करणे.

६. इनामपट्टी - आणीबाणीच्यावेळी क्वचित प्रसंगी इनामदारांच्याकडून घ्यावयाचा कर.

७. विहीर हुंडा - सरकारी विहिरीचा जर शेतीला उपयोग करुन घेतला असेल तर विहिरीच्या नावाने जादा कर बसविणे.

---

१९. Administrative system of the Marathas: Dr. S.N. SEN, University of Calcutta, Calcutta 1925, page 112.

२०. Territories Conquered the Paishwa a report : Elphinstone, page 27.

८. घर पट्टी - हा कर ब्राम्हण व खेडयातील परंपरागत अधिकारी यांच्याशिवाय इतरांच्याकडून वसूल करत असत.

९. बात छापणी - व्यवहारात असणाऱ्या वजन-मापाची तपासणी करुन वार्षिक काही ठराविक कर सरकारात भरणे.

१०. तग पट्टी - मोठया वस्तू मोजण्यासाठी वापरायच्या साधनांवरील कर.

११. लगीन टका — खेडेगावात होणाऱ्या प्रत्येक विवाहावर कर बसविणे.

१२. पाट दाम — एखाद्या विधवेने जर पुनर्विवाह केला तर त्याबद्दल सरकारला कर देणे.

१३. म्हैस पट्टी — गावातील प्रत्येक म्हशीवर वर्षाला एक रुपया कर सरकारात भरणे.

१४. बकरा पट्टी — गावातील प्रत्येक मेंढीवर कर बसविणे.

१५. फडमाश — गावातील काही लोकांनी कर न करता सेवेच्या मोबदल्यात त्या कराची भरपाई करणे.

हे सर्व कर गावचा पाटील स्वतः गोळा करत असे. वरील कर हे सरकारच्या जादा महसूलाच्या बाबी असत. परंतु हा महसूल निरनिराळया ठिकाणी निरनिराळा असे. ते एकाच वेळी आकारण्यात आलेले नव्हते. या बाबींच्या शिवाय पुढील काही बाबींच्यापासून अनियमित स्वरुपाचे उत्पन्न सरकारला मिळत असे.त्या बाबी अशा :

१. वनचराई - सरकारी कुरणावर जनावरे चारल्याबद्दल भरावयाचा कर.

२. गवत कापणी - सरकारी जमिनीवरील गवत कापण्याबद्दल द्यावयाचा कर.

३. देवस्थान दुभी — गावातील देवस्थानांना द्यावयाच्या तेलाबद्दलचा कर.

४. खूर बूजवारी — नदीकाठाला असणाऱ्या कलिंगडयाच्या मळयावर आकारायचा कर.

५. वतन जप्ती — एखाद्या जमीनदाराचे वतन जप्त करुन ते सरकारात जमा करणे.

६. कोतवाली — गावच्या संरक्षणाबद्दल नागरी मुलखात रयतेकडून घ्यावयाचा कर.

**२. कर्जपट्टी** - बऱ्याच वेळा सरकारी खर्च हा उत्पनापेक्षा जादा होत असे. तेव्हा खर्चातील तुटीची तोंडमिळवणी करण्यासाठी सरकार जो कर आकारत असे त्याला जास्ती पट्टी किंवा कर्जपट्टी असे म्हणत. गावातील सर्व जमीनधारक इनामदार व कर देऊ शकतील अशा लोकांच्यावर ही पट्टी बसवत असत. ही पट्टी किंवा कराची रक्कम ही त्या व्यक्तीच्या वार्षिक उत्पन्नावर आधारित असे. हा कर रोख रकमेच्या स्वरुपात किंवा धान्याच्या स्वरुपात

घेत असत. पेशवेकाळात अशा प्रकारचा कर गोळा करण्यासाठी एखाद्या अधिकाऱ्याला पाठवून गावातील बहुतेक सर्वांची यादी तयार केली जात असे.

**३. मोहतर्फा** - म्हणजे व्यापारी लोकांच्याकडून त्यांच्या व्यवसायाबद्दल घेतलेला कर होय. हा मोहतर्फा कोळी, दुकानदार, लोहार, चर्मकार, तेली, सोनार, कुंभार, बुरुड, गोंधळी, आंबी इ. लोकांवर आकारला जात असे. हा कर प्रत्येक दुकानदाराकडून मर्जीनुसार व सवडींप्रमाणे वसूल केला जात असे. मोहतर्फा प्रत्येक व्यावसायिकाकडून निरनिराळया दराने आकारला जात असावा. उदा. १७४२-४३ मधील बाळाजी बाजीरावाच्या कारकीर्दीतील एका पत्रात प्रत्येक व्यावसायिकाने कोणत्या दराने मोहतर्फा आकारावा या संबंधीच्या सूचना आहेत. [२१]

**४. जकात** - जकात म्हणजे व्यापारी लोकांनी केलेल्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारावर आकारलेला कर होय. जकातीचे दर प्रत्येक जिल्हयात वेगवेगळे असत. त्यामुळे मालाची वाहतूक जागोजाग थोपवली जात असे. यावर इलाज म्हणून मालवाहतुकीवर एकदाच जकात घेण्याची व्यवस्था स्विकारण्यात आलेली दिसते. [२२] उदा. इ.स. १७४५-४६ साली बाळाजी बाजीराव पेशव्यानी आज्ञा केली की, सिरोज आणि बऱ्हाणपूरच्या मालवाहतुकीवर जकात एकदाच घेण्यात यावी.

पेशवेकाळातील महसूल वसुलीची पध्दत्त काहींशी अकार्यक्षम असल्याने, दुसऱ्या माधवरावाच्या कारकीर्दीत जमाबंदीसाठी आणि जकात वसूलीसाठी सरकारी अधिकारी नेमण्यात आले होते. हे अधिकारी जकातदारांच्या जागी नेमले जात. परंतु बऱ्याच वेळा ते फक्त त्यांच्या कामावर देखरेख करीत असत. जकात वसूली सरकारी खात्यामार्फत होत असे तेव्हा ती कमाविस पध्दती प्रमाणे होत असे. त्यावर देखील जमीनदार उर्फ दरकदार यांचे नियंत्रण होते. ही कामकाज पध्दती दाखवून देणारी काही कागदपत्रे आहेत. त्यापैकी एक पुढीलप्रमाणे -पेण बंदराच्या जकात फडणीसाचे काम -जमा व खर्च कीर्दीस लिहिल्याशिवाय जमाखर्चाची वहिवाट करू नये हे स्पष्ट केलेले दिसते.

१. उदमी म्हणजे व्यापारी यांच्या खंडण्या फडणीसाच्या दाखल्याने कराव्या, त्या शिवाय करू नये.
२. उभे मार्गाचा टिपेचा खर्डा अमदानीचा व रवानगीचा फडणीसाकडे असावा व चिठ्ठया त्याच्या दाखल्याने व्हाव्या.

२१. पेशवा डायरी : खं.२, पान २९९-३०१.
२२. पेशवा डायरी : खं.३, पान ३१२.

जकातीसंबंधी कागदपत्र व जमाखर्चाची चिठ्ठी फडणीसानी लिहावी. इजाऱ्याने जकाती होत्या त्यामुळे फडणीसाचे हातून लिहिण्याचे काम चालत नसे. हल्ली कमाविसीने जकाती आहेत, त्याकरिता लिहिण्याचे काम दरोबस्त फडणीसाच्या हातून घेणे. फडणीसांनी कामकाजाविषयी व लिहिण्याविषयी बोभाटा पाडू नये व चिठ्ठी चपाटीविषयी माणसाची खोटी करु नये. एकूणच संबंधित अधिकाऱ्यांनी जकातीसंबंधीच्या सर्व बाबी लिखित स्वरुपात पूर्ण कराव्यात असे सूचित करण्यात आलेले दिसते. [२३]

**५. अबकारी -** पेशव्याच्या एकंदर उत्पन्नापैकी अबकारी उत्पन्न हे नाममात्र आहे. अबकारी उत्पन्नामध्ये मुख्यतः मद्यापासून मिळणाऱ्या कराचा समावेश होतो. या उत्पन्नाच्या बाबतीत पेशवा हा अतिशय बारकाईने पाहत असे. धर्मशास्त्रानुसार मद्यपानाला बंदी असल्याने आपल्या राज्यात मद्यपान होणार नाही याबद्दल पेशवा जागरुक असे. म्हणजेच पेशव्यांच्या महसूल धोरणावर धार्मिकतेचा पगडा होता असे दिसून येते. "इ.स. १७७५-७६ रोजी बाळाजी गणेश यांचे नावे सनद की, तालुके देवगड येथील भंडारमाडाची वगैरे दारुची बंदी करावयाची आज्ञा केली असे, तरी पेस्तर अवल सालापासून बंदी करणे म्हणोन." [२४] अशाच प्रकारची सनद विजयदुर्गच्या अधिका-यालाही पाठविण्यात आली होती.

परंतु सरकारने अशा धर्माज्ञाची कडक अमंल बजावणी केल्यास लोकांना त्या जाचक ठरल्याशिवाय राहात नाहीत, आणि अशा अडचणींची जाचकता कमी करण्यासाठी सूचनात वेळोवेळी बदल करण्यात आले. उदा. राज्यातील काही रयतेचा उपजीविकेचा व्यवसाय दारू गाळण्याचा होता. प्रामुख्याने पेशव्याच्या फौजेतील पोर्तुगीज आणि ख्रिश्चन सैनिकांचा तो व्यवसाय होता. त्या लोकांची काही व्यवस्था करणे आवश्यकच होते. म्हणून बाळाजी पेशव्यानीं त्याच्या प्रांतामधील भंडारी व कोळी या लोकांना मद्य बनविण्याची परवानगी दिली होती. [२५]

---

२३. पेशवे डायरी :खंड ६, पान २९३.
२४. पेशवे डायरी :खंड ६, पान ३००.
२५. पेशवे डायरी :खंड ६, पान २९४.

**<u>पेशवेकालीन महसूल व्यवस्थेची वैशिष्टये</u> -**

**१.शेतीतील सुधारणांकडे लक्ष देणे महसूल अधिकाऱ्याचे कर्तव्य -** शेतीतील सुधारणा झाल्यास, जिल्हयातील लागवडीच्या क्षेत्रात वाढ होत असे. लागवडीचे क्षेत्र वाढले की महसूल अधिकाऱ्याला त्याचा फायदा होत असे. जमाबंदी ही प्रत्यक्ष पाहणीवर आधारलेली असल्यामुळे पेशवे सरकार लागवडीला प्रोत्साहन देत असे. लागवडीचे क्षेत्र वाढले तर महसूल वाढत असल्याने त्यासाठी प्रयत्न केले जात असत.

ज्या ठिकाणी जमीनी लागवडीखाली आणणे कठीण असे तिथे विशेष प्रयत्न करण्यासाठी सरकारकडून प्रोत्साहन दिले जात असे. उदा. कोकणातील अंजनवेल आणि सुवर्णदुर्ग हे तालुके विशेषतः त्यातील डोंगराळ जमीन ही शेतीच्या दृष्टीने अयोग्य होती. त्या जमीनीत लागवड केल्यास बांध बंदिस्ती केलेल्या त्या व्यक्तीला त्या जमीनीपैकी निम्मी जमीन इनाम दिली जाईल व उरलेल्या निम्म्या जमीनीवर २० वर्षे सारा आकारला जाणार नाही. त्यानंतर पुढील ५ वर्षात नाममात्र सारा आकारला जाईल. म्हणजे २५ वर्षानंतर पूर्ण सारा आकारला जाईल असे पेशव्यांनी आवाहन केले होते. [२६] अशा पध्दतीने पेशव्यांनी शेतीतील लागवडीचे क्षेत्र वाढविलेले दिसते.

**२. साऱ्यात सूट -** लागवडीखाली असणाऱ्या जमीनीनांही पेशव्यांनी सूट दिली होती. एखाद्या वेळेस दुष्काळ पडला, शत्रूने लूटमार केली किंवा शेतात रोगराई वाढली त्यामुळे पीक कमी आले तर अशा वेळी साऱ्यात सूट देण्याची पद्धत होती. प्रसंगानुरुप अशी सूट दिली जात असे. कधी करात सूट दिली जात असे तर कधी सारा पूर्ण माफ केला जात असे.

उदा. १७४५-४६ मध्ये कानू हे गाव आगीमध्ये जळून भस्मसात झाले, तेव्हा त्या गावावर असणारा सर्व सारा माफ करुन त्याच्या मोबदल्यात फक्त १ खंडी १२ मण एवढा महसूल बसविला. १७४७-४८ मध्ये बावडा परगण्यातील रामचंद्र बल्लाळ या अधिकाऱ्याने त्या परगण्यातील दुष्काळाची सविस्तर हकीगत पेशव्यांना कळविली. तेव्हा पुढील चार वर्षे त्या परगण्यावरील सारा रद्द करण्यात आला. सूट देण्याबद्दल साधारणतः पुढील तत्वे स्वीकारलेली होती.

---

२६. मराठयांची प्रशासन व्यवस्थाः अनु. विजया कुलकर्णी, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, २००३, पान १५२.(Administrative system of the Marathas: Dr. S.N. SEN) मराठेकालीन संस्था व विचारः प्रा गायकवाड, प्रा.सरदेसाई, प्रा थोरात, प्रा. हनमाने, फडके प्रकाशन, १९९०,पान ९४.

१. जी गावे पूर्णपणे जाळण्यात आलेली आहेत, ज्या गावातील जनावरे, चारा लूटून नेण्यात आला आहे. त्या गावाला एक वर्ष पूर्ण सारा सूट द्यावी.

२. जी गावे अंशतः जाळली आहेत, त्यांच्या साऱ्यात १ वर्षे ५० टक्के सूट द्यावी

३. जी गावे लूटलेली आहेत. परंतु जाळलेली नाहीत त्याच्या साऱ्यात १ वर्षे १/३ सूट द्यावी.

४. ज्या गावांनी आपला बचाव करण्यासाठी शत्रूला सामुदायिकरित्या पैसा दिला असेल, त्यांना त्यांच्या साऱ्यात १ वर्षे ५० टक्के सूट दिली.

५. ज्या गावांना कोणत्याही प्रकारचा धोका पोहोचलेला नाही. त्यांच्याकडून १०० टक्के सारा वसूल करावा. [२७]

**३. लवचिक पद्धतीने सारा आकारणी -** पेशवेकाळात पाहणीशिवाय जमाबंदी करणे अशक्य होते. महसूल वसूल करण्यासाठी जमीनीची प्रतवार विभागणी, पाटपाण्याची परिस्थिती, पिकाचे स्वरुप, स्थल-कालानुसार सारा बसवणे या बाबींचा सविस्तर विचार केला जात असे. तसेच सारा रोख रकमेच्या स्वरुपात किंवा धान्याच्या स्वरुपातही घेतला जात असे.

जमिनीची प्रत, प्रकार याप्रमाणे सारा आकारला जाई.

उदा. बाळाजी बाजीराव पेशव्यांच्या काळातील कागदपत्रावरुन तर्फ हवेली पाल येथील सारा (१७४०-४१ मधील) पुढीलप्रमाणे होता. [२८]

भात शेत जमीन दर बिघा खेरीज हकदार ·॥· दहा मण

ऊस दर बिघा रु.५ पूर्ववतप्रमाणे कर

माळवे जमीन (भाजीपाला दर बिघ्यास रु.दोन)

उन्हाळी पिके दर बिघ्यास रु १ ·॥· पूर्ववतप्रमाणे कर.

कोकणातील नारळ, आंबा, ताड-माड या झाडांवरही सारा आकारलेला दिसून येतो. पण पहिली १२ ते १५ वर्षे या झाडांवर कोणत्याही प्रकारचा सारा बसविला जात नसे.

---

२७. मराठयांची प्रशासन व्यवस्थाः अनु. विजया कुलकर्णी, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, २००३, पान १५४. (Administrative system of the Marathas: Dr. S.N. SEN)

२८. पेशवा डायरी खंड ३ पान २०२-२०३. मराठेकालीन संस्था व विचारः प्रा. गायकवाड, प्रा. सरदेसाई, प्रा. थोरात, प्रा. हनमाने, फडके प्रकाशन, १९९०, पान २६०.

एकूण सारा आकारणी करताना कोकण, घाटमाथा काळी जमीन, रेताड, डोंगराळ जमीन, बागाईत, जिराईत जमीन, या गोष्टींचा ज्याप्रमाणे विचार केला जात असे. तसेच सारा भरताना तो लोकांच्या सोयीप्रमाणे रोख किंवा ऐनजिनसी (वस्तूंच्या स्वरुपात) स्वरुपात भरण्याची सूट दिली जात असे. म्हणजेच पेशवेकाळात सारा वसूली ही अनेक अंगांनी लवचिक बनविण्यात आली होती.

**४. उत्पन्नाच्या सम प्रमाणात कर -** पेशव्यांनी त्यांच्या महसूल अधिकाऱ्यांना स्पष्ट सूचना दिलेल्या होत्या की, कोणत्याही व्यक्तीस त्याच्या उत्पन्नापेक्षा एक पैसा सुद्धा जास्त कर द्यावा लागू नये. जर एखाद्या व्यक्तीने तशी तक्रार केली तर पुन्हा मोजणी करुन त्यानुसार कर बसवावा. काही वेळा सामुदायिक किंवा काही वेळा वैयक्तिकरित्या तक्रार अर्ज पेशव्यांकडे करीत असत. रयत जेव्हा शेतसाऱ्यामध्ये सुधारणा करण्याची मागणी करत असे तेव्हा रयतेची विनंतीही अशीच असायची की जितके उत्पन्न निघते तितक्याच प्रमाणात कर घ्यावा. बागाईतीमधील नारळ, माड, सुपारी, फणस, उंडी अशा अनेक छोटया-मोठया उत्पन्नावर कर त्याच्या प्रमाणानुसार आकारलेले दिसतात.

**५. लिलावाची पद्धत -** सुरुवातीला पेशवेकाळात बटाई पद्धत होती. म्हणजे कायम स्वरुपात साऱ्याचा दर अस्तित्वात होता. पण बाजीराव पेशव्यांच्या कारकिर्दीपासून लिलावाची पद्धत सुरु करण्यात आली. कारण राज्यातील सर्व संपन्नता नष्ट झाली होती. आणि राज्याला उत्पन्नाची आवश्यकता होती. त्यामुळे एखादा हुद्दा देताना व्यक्तीच्या पात्रतेपेक्षा पैसा महत्वाचा मानला जाऊ लागला. म्हणजेच एखादे पद घेण्यासाठी मोठयात मोठी लिलावाची बोली लावली जात असे. आणि पद मिळाल्यानंतर जितके पैसे लिलावात लावले गेले तितके किंवा त्यापेक्षा जास्त पैसे काढण्याचा प्रयत्न केला जाऊ लागला. त्यामुळे पेशवे सरकार लोकहिताच्या धोरणापासून दूर गेले.

**६. प्रगतीशील दराने कराची आकारणी** - जे इतर कोणत्याच काळात किंवा राजवटीत दिसून येत नाही. त्याचप्रमाणे जिराईत व बागाईत जमिनी ज्यावेळी पहिल्यांदा लागवडीखाली आणल्या जात त्यावेळी अगदी कमी दराने सारा घेतला जात असे. प्रत्येक वर्षी सारा वाढवला जाई आणि ५ वर्षे पूर्ण झाल्यावर त्यावर पूर्ण सारा घेतला जात असे.

बागाईत जमिनीत पाटस्थळ आणि मोटस्थळ जमिन अशी वर्गवारी करुन सारा आकारला जात असे. तसेच पिकांप्रमाणे साऱ्याचे दर वेगवेगळे लावल्याचे दिसून येते. प्रत्येक

पिकाला वेगवेगळा महसूल आकारला जात असे आणि कालावधी प्रमाणे कराचे प्रमाण बदलणारे असे.

**७. जकात व मोहतर्फावरील सूट -** ज्याप्रमाणे पेशव्याने जमीन महसुलात वेळप्रसंगी सूट दिलेली होती. त्याप्रमाणे जकात व मोहतर्फ्यामध्येसुद्धा वेळोवेळी सूट दिल्याचे दिसून येते.

डॉ.सेन म्हणतात की, पेशव्याने जकात व मोहतर्फा याबद्दल कधीही ताठरपणाची भूमिका घेतली नाही. लवचिकता हेच त्याच्या धोरणाचे वैशिष्टय होते. १७६३-६४ मध्ये तूप, तेल, गूळ, हळद या वस्तू अतिशय आवश्यक वाटल्यामुळे त्यांच्यावरील जकात ५० टक्के कमी करण्यात आलेली होती.

**८. राज्यव्यवस्थेचे एकसंधत्व नष्ट -** शिवाजी महाराजांच्या अष्टप्रधान मंडळाने एकसंधता टिकवून ठेवली होती त्यामुळेच शिवाजीचे राज्य  सार्वभौम राहिले. पेशव्याच्या राजवटीत अष्टप्रधान मंडळाची एकसंघता नष्ट झाल्याने मराठयांच्या साम्राज्यातील सरदारांमध्ये दोन स्वतंत्र वर्ग निर्माण झाले. पेशव्यांनाही प्रधान मंडळ टिकविता आले असते आणि छत्रपतींचे प्रतिनिधी म्हणून कामकाज पाहता आले असते. परंतू पेशव्यांच्या महत्त्वकांक्षेमुळे सरकार एक तंत्री बनले आणि एकसंघत्व नष्ट झाले. त्यामुळे वैयक्तिक स्वार्थावर नियंत्रण राहिले नाही. परिणामी पेशव्यांच्या स्वायत्त सत्तेचे अनुकरण करुन आंग्रे, भोसले आणि गायकवाड यांच्यासारख्या जुन्या सरदारांनी सत्ता संपादनाचे प्रयत्न सुरु केले त्यामुळे पेशवे राजमंडळाचे नामधारी प्रमुख राहीले.आणि त्यांची सत्ता त्यांच्या प्रत्यक्ष अधिपत्याखालील प्रदेशापुरती मर्यादित झाली.

**९. प्रशासकीय विभागणी -** प्रशासकीय कारभाराच्या दृष्टीने महाराष्ट्राची  विभागणी, परगणा, सरकार, सुभा अशी करण्यात आली होती. शिवाजी महाराजांनी मौजे, तर्फ आणि सुभा अशी विभागणी केली होती. तर्फेच्या प्रमुखाला हवालदार, सुभ्याच्या प्रमुखाला सुभेदार किंवा मुख्याधिकारी म्हणत. पेशवाईत सुभ्याला प्रांत असा शब्द ही वापरला जाई आणि तर्फ आणि परगणे याला महाल असेही म्हणत. लहान विभागवार कमाविसदाराची नेमणूक केली जात असे आणि मोठया विभागावर मामलतदाराची नेमणूक पेशव्यांकडून केली जात असे.

कमाविसदार आणि मामलेदार यांच्या कार्यक्षेत्राप्रमाणे त्यांना वेतन दिले जात असल्याने सर्वांना सारख्या प्रमाणात वेतन नसलेले दिसते. या सरकारी सेवकांकडून बारा महिने काम करून घेऊन दहा किंवा अकरा महिन्याचे वेतन दिले जाई. ही पध्दत केवळ मुलकी विभागातच अस्तित्वात नव्हती तर लष्कर, आरमार आणि गड इ. ठिकाणी

अवलंबिण्यात आली होती. या सरकारी अधिकाऱ्यांना पालखी भत्ता आणि छत्रीचा मान मिळत असे. जसे ब्रिटिश सरकारने देखील विशेष कुशल लोकायुक्तांना रायबहादुर, खानबहादुर इ. पदव्या दिलेल्या होत्या. आपल्या अधिकाऱ्यांनी पराक्रमाने मिळविलेल्या मानमरातबाचे ओझे होऊ नये म्हणून पेशवेसरकारने योग्य अनुदान दिले होते.

**१०. सरकारी अधिकाऱ्यांना सवलती -** सरकारी अधिकाऱ्यांना पेशव्यांनी घरपट्टी माफ केलेली होती आणि कोकणातील ब्राम्हण आणि प्रभूनांही कराबाबत सवलत मिळत असे.या मागे मुलभूत उद्देश असा होता की, या लोकांच्या उत्पन्नाचा इतर वेळेला सरकारला उपयोग व्हावा. सरकारी अधिकाऱ्यांना कराबाबत जशी सूट होती त्याप्रमाणे जकातीमध्येही सुट होती. यावरुन सरकारचे धोरण कर आकारणी माफक असावी, कर देणाऱ्याच्या उत्पन्नाच्या प्रमाणात असावे आणि हे विविध कर कागदपत्रात पाहताना प्रचंड वाटले तरी ते जाचक असावेत असे वाटत नाही.

**११. नवीन बाजारपेठांची स्थापना -** व्यापाऱ्यांना देण्यात आलेले कौल म्हणजेच करमाफी. पडीक जमीन लागवडीखाली आणण्यासाठी, शेतीच्या सुधारणेसाठी मिळालेले कौल, याशिवाय व्यापाऱ्यांना जुन्या, ओस पडलेल्या बाजारपेठांचे पुनर्वसन करण्यासाठी, नवीन बाजारपेठा वसविण्यासाठी आणि एकंदर व्यापार उदीम याच्या सर्वसाधारण वृध्दीसाठी देण्यात येणारे कौल या सर्वामागे पेशव्यांचे एकच धोरण होते, आपल्या राज्यात, प्रांतात व्यापार वाढावा आणि त्याचा फायदा लोकांना मिळावा. त्यासाठी पेशव्यांनी व्यापाऱ्यांना काही करांमधून सूट देणे, काही कर माफ करणे अशा अनेक सवलती दिलेल्या दिसतात. पेशव्यांच्या पावलावर पाऊल ठेवून आंग्रेनीदेखिल नागाव महालात व्यापार उदीम वाढविण्यासाठी व्यापारांना घरपट्टीतून माफी दिलेली दिसते. व्यापारासाठी नवीन पेठ वसविणे किंवा वसाहत वसविण्याची जबाबदारी एखाद्या कर्तबगार व्यक्तीवर सोपविण्यात येत असे. त्याने आपले काम परिश्रमपूर्वक पार पाडल्यावर त्याला त्या वसाहत किंवा पेठेच शेटेपणाचे वतन बक्षीस देण्यात येत असे. अशा वतनाचे मान ग्रामाधिकऱ्यांच्या हक्क आणि मानाप्रमाणे असत. दुकानदार आणि व्यापारी यांचेकडूनच शेटेनां प्राप्ती मिळत असे. पेशव्यांना शेटेला वेतन दयावे लागत नसे. अशा रितीने व्यापार वाढीला उत्तेजन देणे याला पेशव्यांनी महत्व दिलेले दिसते.

**१२. उत्पन्नाचे अनेक छोटे मोठे मार्ग निर्माण करणे -** पेशव्यांनी राज्यव्यवस्था चालविताना जमीन महसूलाबरोबरच अनेक छोटे मोठे मार्ग निर्माण केलेले दिसतात. टांकसाळ, मक्ता,

जंगले अशा अनेक मार्गांनी पेशव्यांनी उत्पन्न मिळविलेले दिसते. याशिवाय पेशवे काळात घासदाणा आणि मुलूखगिरी या माध्यमातूनही उत्पन्न मिळविले जात असे.

घासदाणा म्हणजे परप्रांतामध्ये मराठी सैन्य गेल्यावर घोडयांच्या उदरनिर्वाहासाठी हा कर वसूल केला जात असे. यातूनच घोडदळाचा खर्च चालविला जात असे. मराठे सरदार जेथे जात तेथे लूट करीत. त्याला मुलूखगिरी म्हणत. मराठयांचे सरदार मुलूखगिरीवर जात तेव्हा आधीपासूनच त्या प्रांतातील सरदारांना ताकीदपत्रे पाठवून पैशाचा तगादा लावला जात असे. याशिवाय अनेक छोटे छोटे कर लोकांवर लादून आणि चौथाई, सरदेशमुखीच्या माध्यमातून पेशवे काळात राज्याचे उत्पन्न वाढविलेले दिसून येते.

पेशवेकाळात राज्याचे वार्षिक साधारण उत्पन्न रू ४ कोटी असावे. यामध्ये पेशव्यांनी बसविलेल्या अनेक प्रासंगिक पट्टया, करांचा वाटा असलेला दिसतो. दारूपट्टी, नजरपट्टी, कर्जपट्टी, बैलपट्टी, दिवाणपट्टी, नहरपट्टी, पालकपट्टी, कोलारपट्टी, भिसारपट्टी, अशा साधारण पंचवीस पट्टया होत्या. ज्यामधून मिळणाऱ्या उत्पन्नातून पेशवेकाळातील राज्याचे उत्पन्न वाढलेले दिसते.

**१३. जमीनी दान देण्याबद्दलचे धोरण -** पेशव्यांनी शिवकालीन जमीन दान देण्याचे धोरण पुढे चालविलेले दिसते. पहिल्या माधवराव पेशव्यांनी विजयागड सरकार (प्रांताचा अधिकारी) कमावीसदार नारो बल्लाळ यास हुकूम केला की, वेदमूर्ती राजश्री विश्वनाथ भट यास सूर्यग्रहणप्रीत्यर्थ एक चावर जमीन द्यावी. ज्या दिवशी जमीन त्याला देण्यात येईल त्या दिवसापासून त्या जमीनीचा वसूल भटजीच्या नावाने करुन द्यावा. पेशव्यांनी ब्राम्हणांबरोबर ख्रिश्चन आणि मुस्लिमांनाही जमीनी दान दिलेल्या होत्या. ज्याचा चरितार्थ चालत नाही, ज्यांच्याकडून सरकारची काही स्वरुपात सेवा झाली आहे, राज्यात जे विद्वान, गरजू आहेत त्यांना जमीन दान देण्याची पध्दत प्राचीन काळापासून अस्तित्वात असलेली दिसते. तीच पध्दत पेशव्यांनीही अवलंबिलेली दिसते. सन १७६३-६४ साली श्री सुंदर क्षेत्र चांगदेव परगणा यदलाबाद प्रांत खानदेश येथील वेदशास्त्र संपन्न परमेश्वर भट वासुदेवभट वामनाचार्य यांना सुर्यग्रहणाच्या अनुष्ठानाबद्दल मौजे मेहूण येथील १ चावर जमीन दान दिली. [२९]

अशा प्रकारे जमीनी दान देण्याची पध्दत तत्कालीन समाजात मोठया प्रमाणात आढळते. त्याचे दाखले कोकण प्रांतात आणि औंध संस्थानातही दिसते. नागाव आणि पेण

---

२९. मराठयांचा सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक इतिहासः प्रा. बी. एन. सरदेसाई, फडके प्रकाशन, प्रथमावृत्ती, २००१, पान १०५.

(सांकसई), याबरोबरच समकालीन औंध संस्थांनातही अशा प्रकारे जमीनी दान देऊन राज्यातील, संस्थानातील काही लोकांनां मदत दिलेली दिसते. आपल्या राज्यातील प्रत्येक व्यक्तीला सुखाने जीवन जगता यावे याची खबरदारी राज्याने किंवा राज्य प्रमुखाने घेणे याला भारतीय प्राचीन परंपरांनी देखिल महत्व दिलेले दिसते. त्यामुळे भारतातील प्राचीन राज्यसत्तांनी देखिल गरजूनां जमिनी दान दिलेल्या दिसतात. प्रजेच्या योगक्षेमाची काळजी घेणे, सोय करणे हे राजसत्तेचे प्रमुख कर्तव्य समजले जात होते. प्राचीन भारतीय राज्यशास्त्राच्या परिभाषेत "योगक्षेम" हा जोडशब्द जीवनाला आवश्यक अशा साधन मार्गाची प्राप्ती आणि त्यांची सुरक्षितता या अर्थाने येतो. मानवी जीवनाला आवश्यक अशा अन्न, वस्त्र, निवारा आदि सुखसोयीची प्राप्ती करुन देणे आणि त्याद्वारे जीवन सुसहय नि समाधानी ठेवण्यासाठी सुरक्षितता देणे हा "योगक्षेम" हया शब्द प्रयोगाचा अर्थ होतो. [३०] यासाठी भारतातील आजवरच्या सर्व राजसत्ता आणि आधुनिक काळातील राजकीय व्यवस्था सतत क्रियाशिल असलेल्या दिसतात.

शाहू महाराजांनंतर छत्रपतीपदाचे महत्व कमी झाले आणि राज्यकारभाराची सर्व सुत्रे पेशव्यांकडे आली होती. पण पेशव्याची राजवट संपताना मात्र ब्रिटिशांनी भारतीय व्यवस्थेमध्ये स्थिरावण्याचे प्रयत्न सुरु केले.

-------♦ ♦ ♦ ♦-------

३०. प्राचीन भारतीय राजनीतीः सुधाकर देशपांडे, दास्ताने प्रकाशन कं., पुणे,१९८७, पान ९६.

## प्रकरण सहा

## ब्रिटिश व ब्रिटिशकालोत्तर महसूल व्यवस्था

**ब्रिटिशांचे भारतातील आगमन** -

ईस्ट इंडिया कंपनीला १७६५ साली बंगालचे दिवाणी अधिकार मिळाले. कंपनीचे राज्य सुरू झाल्यावर पूर्वीची मक्त्याची जुलमी पध्दत रद्द केली आणि कंपनीने माफक दराने सारा घेण्यास सुरूवात केली. जमीन महसुलाच्या जुन्या पध्दती पुष्कळ होत्या. परंतु त्यांचा ताळमेळ घालून इंग्रजांनी तीन पध्दती सुरू केल्या. त्या सर्वांचे मुख्य तत्व असे की, जमीनीची मालकी कुळास देऊन उत्पन्नाचा नियमित अंश मात्र सरकारला मिळावा. इंग्रजांनी चालू केलेल्या मुख्य तीन पध्दती म्हणजे १) जमीनदारी, २) तालुकादारी व ३) रयतवारी या होय. [१]

जमीनदारी पध्दत -बंगाल, बिहार, अयोध्या प्रांत, बनारस व मद्रासचा काही भाग येथे लावण्यात आली. तालुकादारी पध्दत - (मौझावार किंवा महालवार) वायव्य प्रांत, पंजाब, मध्य प्रांत लावण्यात आली. रयतवारी पध्दत - मद्रास, मुंबई व वऱ्हाड, ब्रम्हदेश, आसाम प्रांतात लावण्यात आली. कुळ, जमीनदार, तालुकादार व मालगुजार लोक यांचा जमीनीशी संबंध होता. पहिल्यांदा इंग्रजांनी सारा वसुलीच्या चालू व्यवस्थांची चौकशी सुरू केली. त्यात त्यांच्या लक्षात आले की, जमीनदार वर्ग उपयोगी पडणारे आहेत. १७६५ मध्ये ब्रिटिशांना दिवाणी अधिकार मिळाल्यानंतर त्यांना भारतातील शेतकरी हा छोटा शेतकरी असल्याचे आढळले. हे शेतकरी निश्चित ठरवलेला वाटा कर म्हणून जमा करणाऱ्याकडे देत होता. कलेक्टर जमा केलेल्या करामधून आपला खर्च वजा करुन उर्वरीत रक्कम केंद्रिय सरकारकडे जमा करत असे. जेव्हा केंद्रीय सरकार कमकुवत झाले तेव्हा प्रांतीय अधिकाऱ्यांनी आपल्या अधिकार क्षेत्रात स्वतःकडे सर्व अधिकार घेतले. त्यांच्या कनिष्ठांनीपण त्यांचाच धडा घेतला. अशा सर्व गोंधळात जमीनदार हेच महसूल जमा करणारे झाले. या जमीनदारांनीच कर जमा करण्याचे काम कायम ठेवले. आणि कंपनीला दिवाणी अधिकार मिळाल्यावर त्याच्या कायद्याचे पालन करण्यास सुरुवात केली. कंपनीने या जमीनदारांवर नियंत्रण ठेवण्यासाठी ब्रिटिश सुपरवायझर ठेवले. इ.स. १७७२ साली हेस्टींग्जने साऱ्याबद्दल पहिला ठराव केला.

---

१. Administrative of the East India Company: John Willam Kaye, K.M. publication Allahabad, 1966, Pg.144.

रयतेकडून जमीनदारांना आलेल्या रक्कमेच्या आठ ते नऊ दशांश रक्कम सरकारला देण्यात यावी. [२]

हा ठराव सन १७९३ पर्यंत प्रत्यक्षात आणला गेलेला दिसतो. ज्या ठिकाणी पूर्वीचा सर्व्हेबरोबर व उभय पक्षांस सोईचा असेल तर तिथे पुन्हा मोजणीची जरुरी नाही परंतु तशी नसली तर मोजणी, प्रतबंदी सर्व करुन मगच सारा ठरविला जात असे. या काळात सारा वाढविण्यामागे ३ कारणे आढळतात.-

१. कायमची दरठरोती झाली नसल्यास त्या प्रांतात साधारणतः ३० वर्षाच्या मुदतीचा ठराव असे. (या काळात कोणत्याही कारणाने सारा वाढविण्यात येत नसे.)
२. जमीन धारण करणाऱ्याने आपले खर्चाने सुधारणा केल्या असतील तर त्याबद्दल सारा वाढविण्यात येत नसे.
३. साऱ्याची फेरतपासणी करुन मागील सर्व्हे झाल्यापासून कोणत्या प्रकारचा फरक झाला असेल त्याचा विचार करण्यात येत असे.

भारतात वंशपंरपरेने बक्षिसादाखल जमीन देण्याची, तसेच काही सार्वजनिक संस्थांना त्यांच्या कामकाजासाठी वतने देण्याची पद्धत प्राचीन काळापासून रुढ होती. वतनाच्या रुपात बक्षीस म्हणून दिल्या जाणाऱ्या जमीनी करमुक्त असत. तशा अर्थाचे बक्षिसपत्र शासकांकडून दिले जाई. कंपनी सरकारने सुरुवातीला ही वतने कायदेशीर मानण्याचे जाहीर केले. पण बंगालमध्ये ईस्ट इंडिया कंपनीचे पाय स्थिर होऊ लागताच या धोरणात बदल होऊ लागला. १७९३ व १८१९ साली केलेल्या नियमांनी या वतनांच्या खरेपणा अगर खोटेपणाची शहानिशा करण्याचा अधिकार जिल्हाधिकाऱ्याला दिला गेला. त्यादृष्टीने बक्षिसपत्र तपासणे, साक्षीदारांकडून बक्षिसपत्रांसंबंधी माहिती मिळवणे, पुरावे विश्वसनीय न वाटल्यास वतनांचा ताबा घेणे हे अधिकार जिल्हाधिकाऱ्याला देण्यात आले. त्याच्या निर्णयाविरुद्ध मुलकी न्यायालयात अपील करण्याची मुभा वतनदारांला देण्यात आली. तिजोरीवर भार पडल्याने कंपनीचे उत्पन्न वाढविण्याची कंपनीला गरज वाटत होती. अशा परिस्थितीत वतनाबाबत अधिक कडक धोरण स्विकारण्याचा बेंटिंकने निर्णय घेतला. पण काही वतने या निर्णयानुसार कंपनी सरकारने ताब्यातही घेतली. परंतु हया धोरणाची आवश्यक तेवढी फळे पदरात पडत नाहीत. असा कंपनी सरकारचा समज झाला.

२. Social, Cultural, Economic History of India : S.C. Roy, Chaudhary, Surjit Publication, Delhi, 1978, Pg. 48.

अनेक वर्षांच्या लष्करी फौजांचा भार कंपनीच्या इ.स.१८२८ मध्ये एका आदेशातून जिल्हाधिकाऱ्यांना याबाबत जास्तीचे अधिकार देण्यात आले. त्यासाठी कमिश्नर नेमण्यात आले. जिल्हाधिकाऱ्यांच्या निर्णयाविरुद्ध वतनदारांनी केलेल्या अपीलांचा निकाल कमिशनरांनी तातडीने लावावयाचा होता. अनेक वतनदारांची बक्षिसपत्रे काळाबरोबर नष्ट झाली होती. शेकडो वर्षापूर्वीचे पुरावे त्यांना जिल्हाधिकाऱ्यासमोर मांडता न आल्याने वतने रद्द ठरविली गेली. व त्या सर्व जमीनीवर कंपनी सरकारने ताबा मिळवला. त्यामुळे सरकारचे कराचे उत्पन्न वाढले. (वार्षिक तीस लक्ष रुपये) परंतु त्यामुळे भारतीयांच्या मनात असंतोष निर्माण झाला. वतने नष्ट झाल्याने निर्वाहाचे दुसरे साधन नसल्याने अनेक वतनदारांवर हलाखीचे संकट उभे राहिले. आणि कंपनी सरकारविषयी समाजात रोष निर्माण झाला. त्यामुळे उत्पन्न वृद्धीचा हा मार्ग भविष्यात कंपनी सरकारला हानीकारक ठरला. पण बेंटिंकला त्याची काळजी नव्हती.

कंपनी सरकारच्या उत्पन्नात वाढ करण्याच्या विचारात बेंटिंकची नजर वायव्य प्रांताकडे वळली. अवधच्या नबाबाकडील काही प्रदेश व दौलतराव शिंदे कडून मिळालेला प्रदेश यांचा मिळून हा प्रांत निर्माण झाला होता. अवधमध्ये संचालक मंडळाच्या आदेशानुसार दर ५ वर्षानी नव्याने महसूल आकारला जात असे. प्रत्येक वेळी वाढता महसूल आणि अनिश्चिती यामुळे येथील महसुलाचे उत्पन्न वाढू शकेल अशी कंपनी सरकारला खात्री होती. १८२२ साली अंमलात आणली गेलेली महसूल व्यवस्थाही फलदायी ठरली नव्हती. कायमधारा पद्धती अंमलात आणण्यास बेंटिंकचा विरोध होता. याबाबत निर्णय घेण्यापूर्वी बेंटिंकने या प्रदेशाचा दौरा करुन प्रचलीत महसूल व्यवस्थांचा अभ्यास केला व नवीन महसूल व्यवस्था अंमलात आणण्यासंबंधीचा नियम १८३३ साली संमत केला. प्रथम प्रांतातील जमीनीची पाहणी करण्यात आली. पडिक व लागवडीखालील जमीनीचे प्रमाण पाहून त्यांचे नकाशे बनविले गेले. त्यानंतर तेथील महसूल निश्चित करण्यात आला. व तो खेडयात विभागून देण्यात आला. महसूल जमीनीच्या खंडावर आकारण्यात आला. ३० वर्षासाठी तो खंडाच्या रकमेच्या ६६ % ठरविण्यात आला. [३] हा करार ग्रामप्रमुखांशी किंवा जमीनदारांशी केला गेला. यामुळे कंपनी सरकारच्या उत्पन्नात वाढ झाली. पण रयतेच्या दृष्टीने ती हानीकारक ठरली. शेतकऱ्यांना ती रक्कम न पेलवणारी होती. पीक चांगले आले नाही

३. हिंदुस्थानची राज्यव्यवस्था व लोकस्थिती : (१८९१-९२ अखेर हिंदुस्थानचे हालहवाले पार्लमेंटमध्ये मांडलेल्या रिपोर्टच्या आधारे) डेक्कन एज्यु., आर्यविजय, पुणे, १८९६, पान १७५.

तरी शेतकऱ्यांची अडचण लक्षात न घेता महसूल कडकपणे आकारला गेला. त्यामुळे भारतीयांच्या मनात इंग्रज शासनाविषयी असंतोष वाढत गेला.

**<u>ब्रिटिशकाळातील जमीन महसूल पध्दती</u> -**

**१. ठेक्याची किंवा लिलावाची पद्धत -**

एखाद्या विशिष्ट भागातून सर्वात जास्त कर जमा करुन देण्याचे कबूल करणाऱ्याकडे ५ वर्षे तो भाग सोपवायचा, त्याची ५ वर्षीय बोली लावायची म्हणजे लिलाव किंवा ठेक्याची पद्धत होय. १७७२ मध्ये वॉरन हेस्टिंग्जने करपद्धतीत फार मोठा बदल केला. त्याने लिलाव (ठेक्याची) पद्धत सुरु केली. [४] म्हणजे एखाद्या विशिष्ट क्षेत्रातून सर्वात जास्त कर देण्याचे जो कबूल करील त्याच्याकडे ते जमीनक्षेत्र ५ वर्षासाठी सोपवायचे हीच हेस्टिंग्जची पंचवर्षीय बोलीची पद्धती होय. ही पद्धती जवळजवळ १७७७ पर्यंत चालू होती. हया योजनेची ५ वर्षे पूर्ण झाल्यावर हीच पद्धती हेस्टिंग्जने दरवर्षी राबविण्यास सुरुवात केली १७८६ मध्ये कॉर्नवालिस गव्हर्नर जनरल म्हणून भारतात आला. त्यावेळी वरील पद्धती सुरु होती. परंतु एकवर्षीय बोलीची करपद्धती दोषपूर्ण होती. आपलाच अधिकार रहावा हया स्वार्थापोटी जास्त बोली बोलली जाई तेवढी रक्कम कंपनीच्या कोषात जमा करावी लागत असे. त्यासाठी ठेकेदारांचे शेतकऱ्यांवर अत्याचार करणे सुरु झाले म्हणूनच जमीनदार व शेतकरी हयांच्या दृष्टीने ही पद्धती फायदेशीर नव्हती. महसुलातून मोठी रक्कम जमा होत नसल्याने कंपनीच्या उत्पन्नात घट होऊ लागली.

वरील स्थिती कंपनी, जमीनदार व शेतकरी तिघांच्या दृष्टीने चांगली नव्हती जमीनदार व शेतकरी निर्धन बनत गेल्याने शेती व्यवसायाला धक्का पोहोचला. म्हणून कंपनीच्या संचालकांनी या पद्धतीतील दोष काढून स्थायीपद्धती बनवण्याच्या कॉर्नवालिसला सूचना दिल्या. त्यादृष्टीने कॉर्नवालिसने, जॉन शोअर, जेम्स ग्रँट व जोनाथन डंकन हयांच्या मदतीने संपूर्ण बंगाल प्रांताचा दौरा केला व जमीनीची पहाणी करुन कर निश्चित केला. परंतु करनिर्धारण करताना अनेक प्रश्न उभे राहिले. कॉर्नवालिस, जॉन शोअर, जेम्स ग्रँट व जोनाथन डंकन यांचे मतैक्य न झाल्याने शेवटी ही योजना इंग्लडला प्रधानमंत्री विल्यम पिट यांच्या मान्यतेसाठी पाठविण्यात आली.

---

४. Social Cultural Economic History of India: S.C. Roy, Chaudhary, Surjit Publication, Delhi, 1978, Pg. 47.

**२. कायमधारा पद्धत** - बंगाल, बिहार, ओरिसा या प्रांतातून कंपनीला दरवर्षी निश्चित स्वरुपाचा शेतसारा मिळावा म्हणून कॉर्नवालिसने कायमधारा पद्धत सुरु केली. [५] या पद्धतीनुसार जमीनदारांना शेत जमीनीचे मालक बनवण्यात आले. जमीनदारांना शेतकऱ्यांकडून कंपनीने ठरवून दिलेला शेतसारा वसूल करण्याचे अधिकार दिले. कंपनी सरकारने ठरवून दिलेला शेतसारा वसूल करणे तो सरकारकडे जमा करणे व राहिलेले उत्पन्न स्वतः घेणे. या पद्धतीमुळे शेतकऱ्यांचा जमीनीवरील मालकी हक्क नष्ट झाला. या पद्धतीत शेतसारा १० % ते ११ % शेतसारा ठरवून देण्यात आला होता. जमीनदाराने जर महसुलाची रक्कम वसूल केली नाही तर जमीनदारांच्या जमीनीचे लिलाव करुन जमीन विकण्याचा अधिकार कंपनी सरकारला होता.

या पद्धतीमुळे दरवर्षी कंपनीला निश्चित आणि जास्त महसूल मिळू लागला. जमीनदार जमीनीतून जास्तीत जास्त उत्पन्न काढण्याचा प्रयत्न करु लागले. या पद्धतीमुळे कंपनीच्या वसूली अधिकाऱ्यांचा खर्च वाचला. परंतु जमीनदार व शेतकरी यात आणखी एक मध्यस्थ दिवाण नेमला जाऊ लागला. त्यामुळे महसुलाचे प्रमाण जास्त झाले आणि शेतकऱ्यांची आर्थिक पिळवणूक होऊ लागली. शेतकऱ्यांकडून येणाऱ्या शेतसाऱ्याच्या रकमेचा ८९ % हिस्सा ब्रिटिश सरकारला तर ११ % हिस्सा जमीनदाराला मिळावा अशी तरतूद होती.[६] शेतकऱ्यांपासून तो वसूल करण्याची जबाबदारी जमीनदारांची होती. ठरलेली रक्कम त्यांनी कंपनीच्या कोषात भरणा करुन उरलेली रक्कम स्वतःजवळ ठेवायची. मुख्य म्हणजे जमीन महसूल निश्चित करण्यात आला होता. त्यात परिस्थिती नुसार बदल होणार नव्हता. जोपर्यंत जमीनदार ठरलेली रक्कम नीटपणे देतील तोपर्यंत त्यांचा जमीनदारीचा अधिकार कायम होता. ते ठराविक रक्कम देण्यास बांधील होते. कमी उत्पन्नाशी किंवा शेतकऱ्यांकडून कर वसूली न झाल्याशी जमीनदारांचा संबंध नव्हता. शेतीतून जास्त उत्पादन झाले तर तो जमीनदारांचा फायदा होता. १७६५ च्या करापेक्षा जास्त कर निश्चित करण्यात आला होता. गोळा झालेल्या कराच्या ८/९ भाग कंपनीला देऊन उरलेला १/९ हिस्सा आपल्या कामाचा मोबदला म्हणून जमीनदार स्वतःजवळ ठेवित असे. वाढत चालल्याने प्रशासन कार्यासाठी कर्मचारी वर्ग हया सुधारणेमुळे उपलब्ध झाला. पण शेतकऱ्यांची स्थिती मात्र अत्यंत दैयनीय झाली. म्हणूनच ही पद्धती बंगालच्या बाहेर लागू करण्यात आली नाही.

---

५. Administration system of the Marathas: Dr. S.N. Sen., University of Calcutta, Calcutta, 1925, Pg. 485.

६. आधुनिक भारतः प्रा. नी.सी. दिक्षित, पिंपळापूरे अँड पब्लिशर्स, नागपूर, प्रथमावृत्ती, जून,२००३, पान १२८.

पण सन १७९३ मध्ये लॉर्ड कॉर्नवालिस यांनी ती बदलून जमीनदारांकडून घेण्याचा साऱ्याचा दर कायमचा ठरविण्यात आला. ही पध्दत १७९५ पर्यंत बनारसमध्ये व १८०२ साली मद्रास इलाख्यातील भागांना लागू करण्यांत आली. हिच कायमधारा पध्दत म्हणून ओळखली जाते. ब्रिटीश काळात तामिळानाडूमधील जिल्हयात इ.स. १८०८मध्ये कायमधारा पध्दतीचा अवलंब सुरु झाला. त्यावेळी तामिळनाडूमधील खेडयांमध्ये ३ वर्षांसाठी जमीनीचा लिलाव करण्यात आला व त्यासाठी ठरावीक रक्कम निश्चित करण्यात आली. इ.स. १८११मध्ये ही पध्दत रद्द केली गेली आणि त्यानंतर इ.स. १९२१मध्ये रयतवारी पध्दत स्विकारण्यात आली. चार वर्षांनंतर पुन्हा एका वर्षांसाठी धारा निश्चितीची पध्दत ब्रिटीशांनी सुरु केली.

**तक्ता क्र. १०. ब्रिटीशकाळात दक्षिण आर्कोट जिल्हयातील एकूण महसूल आणि जमीन महसूलाचे प्रमाण पुढीलप्रमाणे** [७] -

| | १८८०-१ | १८९०-१ | १९००-१ | १९०३-४ |
|---|---|---|---|---|
| जमीन महसूल | ३२,०२ | ३९,६५ | ४६,०१ | ४९,५७ |
| एकूण महसूल | ४१,४८ | ५२,१२ | ६०४० | ७१,६७ |

**३. रयतवारी पद्धती** - कायमधारा पद्धतीमध्ये दोष दिसू लागल्यामुळे रयतवारी पद्धती मद्रास, मुंबई, पूर्व बंगाल, आसामचा काही भाग व कर्नाटकचा एक भाग कूर्ग या प्रांतात कॅप्टन रीड आणि थॉमस मन्रो यांच्या मदतीने सुरु करण्यात आली. रयत म्हणजे प्रजा यांचा प्रत्यक्ष संपर्क असणारी पद्धती म्हणजे रयतवारी पद्धती होय. जमीन प्रत्यक्ष कसणाऱ्या शेतकऱ्यांना 'रयत' म्हणत. रयतेला या पद्धतीप्रमाणे शेतसारा सरकारकडे जमा करावा लागत असे. रयतेला जमीन विकण्याचा अधिकार देण्यात आला. या पद्धतीत शेतकऱ्यांना ४५ ते ५५ % शेतसारा सरकारला द्यावा लागत असे. हा जमीन महसूल २० ते ३० वर्षासाठी ठरवला जात असे. नैसर्गिक आपत्तीच्या काळातही शेतकऱ्याला सारा द्यावा लागत असे. एकूणच रयतवारी पद्धतीमुळे शेतसारा सतत वाढवला गेल्याने शेतकऱ्यांवर त्याचे विपरीत परिणाम झाले.

१८२० ते १८२७ या काळात थॉमस मन्रो मद्रास प्रांताचा गव्हर्नर होता. जुनी करव्यवस्था अयोग्य मानून त्याने १८२० मध्ये कायमधारा पद्धतीचा प्रदेश वगळून उरलेल्या

७. The Imperial Gazetteer of India, Vol. V: Abazal To Arcot, Today & Tomorrow's Printers &Publication, New Delhi. Pg.435.

प्रदेशात ही नवी व्यवस्था लागू केली. या पद्धतीनुसार भूमीकराचे प्रमाण उत्पन्नाच्या १/३ होते. ही व्यवस्था पुढे ३० वर्षे सुरु राहिली.

१८१९ ते १८२७ या कालखंडात एल्फिस्टन मुंबई प्रांताचा गव्हर्नर होता. तिसऱ्या इंग्रज-मराठा युद्धात इंग्रजांना पेशव्याचा मोठा प्रदेश मिळाला होता. त्यामुळे एल्फिस्टनने अनेक तज्ञांच्या मदतीने जमीनीची पहाणी करुन ही जमीनीची उपजक्षमता निश्चित झाली नव्हती. जमीनीतून मिळणाऱ्या उत्पादनाच्या अंदाजाचे आकडे चुकीचे होते. त्यामुळे या पद्धतीनुसार सुचविलेला भूमीकरही अवाजवी व जादा होता. त्यासंबंधी गोल्डस्मीड व विंगेटने १८३५ मध्ये अत्यंत काळजीपूर्वक भूमीचे सर्वेक्षण केले. त्यांनी आपला अहवाल १८४७ मध्ये सादर केला. त्यानुसार प्रत्येक जिल्हयाचा भूमीकर त्या जिल्हयाची उपजक्षमता व जनतेची स्थिती हयावर आधारीत होता. भूमीकराची वसूली सरकार थेट शेतकऱ्यांकडून करणार होते. शेतकऱ्यांवर कर लावताना संपूर्ण जमीनीवर न लावता त्याच्या ताब्यात असणाऱ्या जमीनीच्या तुकडयावर स्वतंत्रपणे लावण्यात आला. त्यामुळे कोणताही तुकडा कसण्याचे किंवा तसाच ठेवण्याचे स्वातंत्र्य शेतकऱ्याला होते. ही व्यवस्था ३० वर्षासाठी लागू करण्यात आली. परंतु या पद्धतीमध्येही अनेक गोष्टी अंदाजावर आधारीत होत्या. रयतवारी पद्धत सुरु करण्याचा मूळ उद्देश सरकारला नियमितपणे महसूल मिळावा व शेतकऱ्यांची परिस्थिती सुधारली जावी हा असला तरी यातील पहिला उद्देश सफल झाला. परंतु शेतकऱ्यांची परिस्थिती सुधारली न जाता तो जास्तच दीन झाला आणि याचे मुख्य कारण म्हणजे सरकारने मुळात महसूल खूपच जास्त ठरविला होता. साधारण साऱ्याचा आकार जमीनीच्या उत्पन्नाचा १५ वा अंश असा होता. सन १८५३ मध्ये साऱ्याचा दर दरएकरी २ रु ८ आणे होता आणि १८९०-९१ मध्ये १ रु १४ आणे होता. सरकारचा सारा कुळांकडून नियमितपणे येत आहे तोपर्यंत त्यांचे ताब्यातून जमीन काढायची नाही हे रयतवारी पध्दतीचे तत्व होते.[८] कुळे जमीनीच्या मालकासारखे होते. शेती क्षेत्र वाढत जाणे आवश्यक असल्याने साधारण उत्पन्नाच्या जमीनीही लागवडीखाली आणल्या. त्यांस सारा कमी असल्यामुळे (दर एकरी) सरकारला पैसे कमी द्यावे लागत होते.

**४. महालवारी पद्धती** - महाल म्हणजे खेडे किंवा ग्राम होय. संपूर्ण खेडे किंवा महाल याचा शेतसारा गावप्रमुख किंवा नंबरदार व गावकरी मिळून ठरवित असत. कंपनीने गावाचा जो शेतसारा ठरविला असेल तो वसूल करणारा अधिकार नंबरदार होय. हा सारा देण्याची

८. हिंदुस्थानची राज्यव्यवस्था व लोकस्थितीः (१८९१-९२ अखेर हिंदुस्थानचे हालहवाले पार्लमेंटमध्ये मांडलेल्या रिपोर्टच्या आधारे)डेक्कन एज्यु., आर्यविजय, पुणे, १८९६, पान १६९.

वैयक्तिक व सामुहिक जबाबदारी गावातील सर्वांवर होती. सरकारने भूमीकराची वसूली संपूर्ण खेडे किंवा महाल एकक मानून करणारी म्हणजे महालवारी पद्धती सुरु केली. [१] उदा. पंजाब, आग्रा या प्रांतात महालवारी पद्धत सुरु केली. ही पद्धती विशेषतः उत्तर प्रदेशात लागू करण्यात आली.

१८०३ ते १८१८ या दरम्यान उत्तर भारतातील प्रदेश कंपनी सरकारच्या ताब्यात आला. सुरुवातीची काही वर्षे येथील भूमिव्यवस्था तात्कालिक स्वरुपाची होती. १८२२ साली आयुक्त मंडळाचा सचिव होल्ट मॅकन्झीच्या सल्ल्यानुसार उत्तर प्रदेशात नवी महसूलव्यवस्था-महालवारी व्यवस्था अंमलात आणली गेली. या व्यवस्थेनुसार रयतेकडून प्रत्यक्ष महसूल गोळा करण्याऐवजी सरकारने गावकऱ्यांशी सामूहिक करार केले. प्रत्येक गावाने किती महसूल द्यावा हे ठरवून देण्यात आले आणि जमीन महसुलाची गावाने देय असलेली रक्कम ग्रामप्रमुखाने, पाटलाने किंवा मुखियाने सरकारला द्यावी असे ठरविण्यात आले. गावाच्या एकूण उत्पन्नाचा अंदाज घेऊन गावाचा महसूल निर्धारित केला गेला. गावातील प्रत्येक शेतकऱ्याने एकूण गावाच्या महसुलाचा किती भाग द्यावयाचा हे त्यांनी ग्रामप्रमुखाच्या नेतृत्वाने, सल्ल्याने आपापसात विचारविनिमय करुन ठरवावयाचे होते. महालवारी पद्धतीनुसार कराचे निर्धारण ३० वर्षासाठी करण्यात आले. आणि कराच्या पुनर्निर्धारणाचे अधिकार कलेक्टर व तहसीलदार यांना देण्यात आले. पंजाबमध्ये स्विकारण्यात आलेल्या महालवारी पद्धत्तीनुसार पाच सहा गावांचा मिळून एक गट बनविण्यात आला. या गटाच्या एकूण उत्पन्नाचा अंदाज घेऊन या गटाच्या स्थानिक प्रमुखाकडे महसूल भरण्याची जबाबदारी सोपविण्यात आली. या गटप्रमुखाने प्रत्येक गावाच्या उत्पन्नानुसार त्यांच्यात जमीन महसूल वाटून द्यावा असे ठरले. अशा प्रकारे पंजाबमधील महालवारी व्यवस्थेत महसूल भरणे ही सामूहिक जबाबदारीची बाब बनली. या महालवारी व्यवस्थेतही महसुलाचे प्रमाण कायमधारा पद्धतीपेक्षाही बरेच जास्त होते. मध्यप्रांतातील महसूल व्यवस्था म्हणजे मालगुजारी पद्धती होय. ही जमीनदारी पद्धती सारखीच होती. फक्त येथे शेतसारा कायमचा निर्धारित न करता त्याच्या पुनर्निर्धारणाची तरतूद करण्यात आली होती. ब्रिटिशांनी भारताच्या सर्व भागात एकच पद्धती लागू केलेली दिसत नाही तर प्रत्येक ठिकाणी त्यांनी वेगवेगळया काळात वेगवेगळया प्रदेशात कायमधारा, रयतवारी आणि महालवारी पद्धती लागू

१. State Taxation in India: Dr. Rajendra Jain, Progress Pub. Bhopal, Ied. 1972., Pg. 55 ( Settlement was concluded with village communities and the villagers were held jointly and severally responsible for the payment of revenue. This came to be known as the mahalwari system)

केल्या. त्यामागील उद्देश अर्थातच जास्तीत जास्त कर वसूल करुन आपला खजिना भरणे हा होता.

**५. खोती पद्धती –** कोकण प्रांतात खोती पद्धत अनेक शतकापासून चालू असलेली दिसते. खोत हे गावातील वजनदार जमीनदार व श्रीमंत असत. ते वंशपरंपरेने शेत जमीनीचा खंड वसूल करुन तो सरकारला भरणा करीत असत. तसेच ते रुढीपरंपरेने गावातील मानपान व हक्क उपभोगित असत. कुलाबा, रत्नागिरी या जिल्हयात अस्तित्वात असणारी खोती हे सरकारी नोकरीचे वतन पेशवे काळापासून अस्तित्वात होते. ब्रिटिशांनी खोती पद्धतीला सुरुवातीला खूप महत्व दिले. त्यामुळे १८२० ते १८९० पर्यंत खोत हे जणू गावाचे मालक सुभेदार बनले. खोतीचे २ प्रकार होते. - (१) मिराशी खोती (२) वतनी खोती.
या प्रांतातील कुलाबा व रत्नागिरी जिल्हयांत खोतीची पद्धती होती. [१०]

बंगालमधील जमीनदारांप्रमाणेंच हे खोत पहिल्यांपासून साऱ्याचे मक्तेदार होते व पुढे मालक ठरले होते. गावच्या सर्व साऱ्याला खोत जबाबदार असे. त्याकाळात काही नवीन ठराव करुन खोती गांवातील कुळांस काही हक्क दिले गेले. साऱ्याची फेरतपासणी झाल्यावर सारा देण्यास खोत जबाबदार असत.

**तक्ता क्र. ११. ब्रिटिश भारतातील जमीन महसूल पध्दतीची सुरुवात -**

| वर्ष | प्रांत | महसूल पध्दती |
|---|---|---|
| १७६५ | मद्रास | कायमधारा पध्दत जाहीर |
| १७६५ | आसाम | वैयक्तिक लागवड व वैयक्तिक धारा पध्दत जाहीर |
| १७७५ | उत्तर पश्चिम प्रांत | कायमधारा पध्दत जाहीर |
| १७९३ | बंगाल | लॉर्ड कॉर्नवालिसने कायमधारा पध्दत जाहीर केली |
| १८३५ | मुंबई | वैयक्तिक धारा पध्दत जाहीर |
| १८४६-४९ | पंजाब | खेडयातील व्यवस्थांमार्फत धारा घेण्याची पध्दत |
| १८५० | केंद्रीय प्रांत | वैयक्तिक लागवड व वैयक्तिक धारा पध्दत जाहीर |
| १८५६ | बेरार (वऱ्हाड) | मुंबई सर्व्हेपध्दतीवर आधारीत महसूल पध्दत जाहीर |
| १८५६ | अवध | लॉर्ड डलहौसीने खेडयातील व्यवस्थांमार्फत धारा घेण्याची पध्दत सुरु केली. |

१०. हिंदुस्थानची राज्यव्यवस्था व लोकस्थितीः (१८९१-९२ अखेर हिंदुस्थानचे हालहवाले पार्लमेंटमध्ये मांडलेल्या रिपोर्टच्या आधारे) डेक्कन एज्यु., आर्यविजय, पुणे, १८९६, पान १७३.

वरील तक्त्यामध्ये ब्रिटिशांनी भारतात जमीन महसूल पध्दतींची सुरुवात प्रत्येक प्रांतात कोणत्या वर्षी किंवा काळात केली आणि कोणती पध्दत यासाठी वापरली गेली. याचे विवेचन करण्यात आले आहे. यावरुन असे दिसून येते की, प्रत्येक प्रांतात ब्रिटिशांनी तत्कालीन काळात आणि त्या त्या प्रांतात योग्य ठरेल अशी पध्दत स्विकारलेली दिसते. संपूर्ण भारतात एकाच वेळी आणि एकाच महसूल पध्दतीचा वापर करण्यात आलेला दिसून येत नाही.

मराठेशाहीतील राज्यकर्त्यांनी व मोगल राज्यकर्त्यांनी अनेक गावे इनाम दिली होती. इनाम गावांमधील सारा इनामदारांना मिळत असे. त्यामुळेच ब्रिटिशांनी इनामांची चौकशी करण्यासाठी एक इनाम कमिटी नेमली.

त्यात इनामांचे चार प्रकारात विभागीकरण करण्यात आले होते.

१. मुसलमानांनी दिलेल्या जहांगिरी व मराठयांनी कामगिरीबद्दल बक्षीस दिलेली इनामें किंवा सरंजाम किंवा नेमणूका.
२. नोकरांची इनामें.
३. देवस्थांनांची इनामें.
४. जातइनामें.

ही सर्व इनामें साधारणतः बिनशर्तीने वंशपरंपरेने दिलेली होती. यांची चौकशी केली गेली. तसेच काही इनामदारांबरोबर समरी सेटलमेंट (चौकशीशिवाय आपसांत ठराव) करण्यात आले होते. पहिल्या तीन वर्गाच्या इनामाबद्दलही चौकशी होऊन किंवा चौकशीशिवाय गार्डनसाहेबांनी ठराव केले.[११] याच काळात मुंबई प्रांतात जमीन धारण करणाऱ्यांची नोंदवही बनविण्यात आली होती. त्यात कुळांची नांवे, त्यांच्याकडे असलेली जमीन व तिचा सारा स्पष्ट केलेला होता.

१७६५ मध्ये बंगाल, बिहार, ओरीसा या प्रांतात ईस्ट इंडिया कंपनीचे राज्य स्थिर झाले आणि संपूर्ण नागरी आणि लष्करी शासन प्रस्थापित करुन ऐत्तदेशीय राजांच्या स्वातंत्र्यावर बंधने टाकली गेली व तेव्हापासून त्यांचा ईस्ट इंडिया कंपनीशी महसूलाबाबत संबंध आला. भारतात वंशपरंपरेने बक्षिसादाखल जमीन देण्याची, तसेच काही सार्वजनिक संस्थांना त्यांच्या कामकाजासाठी वतने देण्याची पद्धत प्राचीन काळापासून रुढ होती.

११. हिंदुस्थानची राज्यव्यवस्था व लोकस्थितीः (१८९१-९२ अखेर हिंदुस्थानचे हालहवाले पार्लमेंटमध्ये मांडलेल्या रिपोर्टच्या आधारे) डेक्कन एज्यु., आर्यविजय, पुणे, १८९६, पान १७३.

वतनाच्या रुपात बक्षिस म्हणून दिल्या जाणाऱ्या जमीनी करमुक्त असत. तशा अर्थाचे बक्षिसपत्र शासनकर्त्यांकडून दिले जाई. कंपनी सरकारने सुरुवातीला ही वतने कायदेशीर मानण्याचे जाहीर केले पण बंगालमध्ये कंपनीचे पाय स्थिर होऊ लागताच या धोरणात बदल झाला. १७९३ व १८१९ साली केलेल्या नियमांनी या वतनांच्या खरेपणा अगर खोटेपणाची शहानिशा करण्याचा अधिकार जिल्हाधिकाऱ्याला दिला गेला. त्यादृष्टीने बक्षिसपत्र तपासणे, साक्षीदारांकडून बक्षिसपत्रांसंबंधी माहिती मिळवणे, पुरावे विश्वसनीय न वाटल्यास वतनांचा ताबा घेणे हे अधिकार जिल्हाधिकाऱ्याला देण्यात आले. कंपनीला बंगाल, बिहार, ओरिसा प्रांतांचे दिवाणी हक्क मिळाले असले तरी येथील कृषिव्यवस्थेची माहिती कंपनीला नसल्यामुळे आणि महसूल यंत्रणा राबविण्याची क्षमता असलेला ब्रिटिश अधिकारी वर्ग उपलब्ध नव्हता. त्यामुळे कर वसुलीचे प्रत्यक्ष कार्य कंपनीने स्वतःकडे न घेता ते भारतीयांकडे राहू दिले.

फासेट व मिल याच्या मते, ‘हिंदुस्थानांत सरकार हे जमीनीचे मालक आहेत, व ती लागवडीस दिल्याबद्दल जे स्वामित्व घेण्याचे व खाजगी मनुष्याने जमीन केली तर त्यास जो कर द्यावाच लागतो ती जमीनबाब होय.’ [१२]

ब्रिटिश काळात मुख्यत्वे करुन शेतीवर उपजीविका करणारा समाज होता. सन १८९१ मधील लोकसंख्येच्या मोजणीवरुन असे दिसून आले आहे की, एकंदर लोकसंख्येपैकी शेकडा ६० लोक जमीनीवर उपजीविका करत. याशिवाय गावाच्या, रयतेच्या उपयोगी पडणाऱ्या धंदेवाल्या लोकांचा अप्रत्यक्षतः जमीनीवरच निर्वाह चालत असे. या लोकांचे प्रमाण जमीन धारण करणाऱ्या लोकांच्या १/५ इतके होते. यावरुन सामाजिक दृष्टीने हिंदुस्थानांत शेतीचे किती महत्व होते हे दिसून येईल. जमीनबाब वसूल करणारा अंमलदार हाच रयतेस सरकारची प्रत्यक्षपणे दिसणारी मूर्ती होता. रॉबर्ट क्लाईव्हने महमंद रजाखॉ व राजा सिताबराय यांना नायब दिवाण म्हणून नियुक्त केले. त्यांनी आपल्या हाताखाली अमिल (दलाल) ठेवले प्रत्यक्षात शेतकऱ्यांपासून अमिल कर वसूल करीत परंतु त्यांच्या अत्याचाराबाबत तक्रारीचे प्रमाण वाढले तेव्हा १७६९ मध्ये कंपनीने अमीलांच्या कार्यावर देखरेख ठेवण्यासाठी इंग्रज निरीक्षकांची नियुक्ती केली. गव्हर्नर जनरल वॉरन हेस्टिंग्जने प्रचलित महसूल यंत्रणेचा फेरविचार सुरु केला.

१२. हिंदुस्थानची राज्यव्यवस्था व लोकस्थितीः (१८९१-९२ अखेर हिंदुस्थानचे हालहवाले पार्लमेंटमध्ये मांडलेल्या रिपोर्टच्या आधारे) डेक्कन एज्यु., आर्यविजय, पुणे, १८९६, पान १८०.

**१. जमाबंदी** - रयतवारी पद्धतीत जमाबंदी ही महत्वाची गोष्ट होती. या प्रांतात दरसाल जमाबंदी केली गेली. सारा जरी तीस वर्षाचे मुदतीत ठरलेला असतो तरी जितकी जमीन कुळाने लागवडीस घेतलेली असे त्यावरच तो द्यावा लागत असे व त्या रकमेंत ठरलेल्या नियमाप्रमाणे दरसाल काही रक्कम कमीजास्त करण्यात येत असे. जमाबंदीमध्ये त्या वर्षी कुळाच्या खात्यात किती जमीन होती हे पाहिले जात असे. क्षेत्राप्रमाणे मग सारा निश्चित केला जात असे. त्यानंतर बागाईत जमीनीत दुसरे पीक केले असल्यास त्याबद्दल सारा ठरविण्यात येत असे, पाटबंधाऱ्याचे पाणी घेऊन पीक केले असल्यास त्याबद्दल सारा ठरविण्यात येत असे. म्हणजेच ज्या प्रकारची जमीन, ज्या प्रकारच्या सोई त्याप्रमाणे सारा आकारला जात असावा असे दिसून येते. जमाबंदीच्या वेळीसच प्रसंगाप्रमाणे सूट देण्याची पद्धत असलेली दिसून येते. सरकारी पाटाचे पाणी न मिळाल्याने किंवा दुसऱ्या काही कारणांनी कुळाचे नुकसान झालेले असल्यासही साऱ्यात सूट देण्यात येते असे. साऱ्याच्या दरात फेरतपासणी न झाल्यासही काही वेळा साऱ्यात सूट दिलेली दिसून येते.

ब्रिटिश सरकारने जमीनीच्या सर्व्हेचे काम केले. जमीनीच्या मोजणी पासून शेते मोजणे, त्यांच्या हद्दी ठरविणे, त्यांना खुणा करणे या सर्व गोष्टी सर्व्हेमधून केल्या गेल्या. पहिल्यांदा केलेल्या सर्व्हेमध्ये फक्त गावे आणि गावांच्या जमीनी यांचा नकाशा बनविण्यात आला होता. परंतु फेरमोजणीच्या नंतर मात्र जिल्हयाचे नकाशे, ज्यात त्या संपूर्ण भागाची पूर्ण माहिती देण्यात आली होती. प्रत्येक शेतावर सर्व्हेनंबर टाकून सारा बसविण्यात आला होता. साधारणतः एक सर्व्हे नंबर म्हणजे दोन बैलांनी जितकी जमीन लागवड केली जात असे तेवढी जमीन होय. [१३] विशेष मोठा नंबर म्हणजे त्याच्या दुप्पट जमीनीचा होता. शेताच्या हद्दी बांध किंवा दगड लावून केलेल्या जमीनींचे गाववार नकाशे बनविलेले दिसतात. मोजणीनंतर जमीनीची प्रत लावताना जमिनीच्या गुणाप्रमाणे प्रतवारी केलेली आढळते. जमीनीच्या गुणदोषाप्रमाणे जमीनीची प्रतवारी लावण्यात येत असे. गाळाची जमीन, बागाईत जमीन, बारमाही पाणी असणारी जमीन, पाणी पुरवठा नसणारी जमीन अशा अनेक घटकांनुसार सारा ठरविण्यात येत असे. एकूणच साऱ्याचा आकार ठरविण्यासाठी त्या तालुक्याच्या तीस वर्षाच्या जमाबंदीची माहिती काढली जात असे. साऱ्याचे या आधीचे प्रमाण कसे होते, तो कसा वसूल होत असे. हवापाण्याची स्थिती, दळणवळणमार्ग, पाटबंधारे,

१३. हिंदुस्थानची राज्यव्यवस्था व लोकस्थिती : (१८९१-९२ अखेर हिंदुस्थानचे हालहवाले पार्लमेंटमध्ये मांडलेल्या रिपोर्टच्या आधारे) डेक्कन एज्यु., आर्यविजय, पुणे, १८९६, पान १७१.

मालविक्रीस बाजाराची सोय अशा अनेक गोष्टी विचारात घेऊन तालुका किंवा गावावर सारा बसविला जात असल्याचे दिसते.

१८५५ मध्ये जमीन महसूल स्थानिक परिस्थितीनुसार ठरविण्याचे अधिकार महसूली अधिकाऱ्यांकडे सोपवण्यात आले. परंतु त्यामुळे परिस्थिती जास्तच बिघडली. महसुलाचे वेगवेगळे दर, जमीनीच्या उत्पादन वाढीसाठी करावा लागणारा खर्च व मजूर यासंबंधीची निराशा इत्यादीमुळे शेतकरी निराश झाला. महसूल भरण्यासाठी शेतकरी सावकार, शेट्टीच्या सापळयात अडकले. महसूल गोळा करण्याची पद्धती अतिशय कठोर होती. अनेक प्रकारच्या यातना आणि अत्यंत अपमानास्पद वागणूक शेतकऱ्यांना दिली जात असे. याचे पडसाद त्यावेळी ब्रिटिश संसदेतही पडले होते.

ब्रिटिशांकडून लावण्यात आलेल्या साऱ्याची वसूली हप्त्यांनी केली जात असे. त्यांच्या मुदती प्रत्येक प्रांतात वेगवेगळया होत्या. पिकाचे काही कारणांनी नुकसान झाले तर सारा घेण्याचे तहकूब करण्यात येत असे. सारा माफ करावयाचा की नाही हे तेथील पुढच्या पीकावर अवलंबून असे. अशी तहकुबी किंवा माफी देण्याची पद्धती दक्षिण व पश्चिम भारतातील साऱ्याच्या पद्धतीत अंतर्भूत होती.

ब्रिटिशांनी अंमलात आणलेल्या महसूल व्यवस्थेमुळे भारतातील प्रचलित व्यवस्था साफ कोलमडून पडली. ब्रिटिशांनी प्रस्थापित केलेल्या नव्या व्यवस्थेत जमीन ही एक खाजगी मालमत्तेची वस्तू बनली. साहजिकच त्यामुळे जमीन गहाण टाकणे, विकणे, किंवा जमीनधारकाच्या हातून ती काढून घेणे शक्य झाले. जमीन ही खाजगी मालमत्ता मानल्यामुळे जमीनदार जंगले साफ करुन कृषियोग्य जमीन लागवडीखाली आणतील, कृषिउत्पादन वाढवतील अशी ब्रिटिश सरकारची अपेक्षा होती, परंतु तसे न होता बहुसंख्य जमीनदार चैनी, विलासी, आळशी, सुखलोलूप बनले. हा सधन वर्ग ब्रिटिश सत्तेचा खंदा समर्थक बनला आणि त्यांच्या माध्यमातून ब्रिटिशांना हुकुमी जमीन महसूल मिळू लागला. जमीनीवर मालकी मिळाल्यावर शेतकरी धान्योत्पादन वाढविण्यास प्रवृत्त होतील अशी कल्पना होती. परंतु शेतसारा रोख पैशाच्याच रुपाने देण्याची सक्ती करण्यात आल्यामुळे जमीन कसणारा शेतकरी अडचणीत आला. आपल्या आर्थिक अडचणी सोडविण्यासाठी तो जमीन विकू लागला किंवा गहाण ठेऊ लागला. परिणामी कृषि व्यवस्थेतील स्थैर्य, सातत्य नष्ट होऊन ग्रामीण समाज व्यवस्थाच मोडकळीस आली.

गावातील पाटील फक्त सरकारमार्फत शेतसारा गोळा करणारा मध्यस्थ बनला. खेडयांची स्वयंपूर्णता नष्ट झाली. सावकार आणि जमीनदार यांचे महत्व अतोनात वाढले, कारण शेतकरीवर्ग त्यांच्याच कृपेवर जगत होता. खेडयांमध्ये छोटे शेतकरी, शेतमजूर, भूमिहीन शेतकरी यांची संख्या उत्तरोत्तर वाढत गेली.

ब्रिटिशांनी अनेक प्रांतात सर्व्हे केले होते पण त्याबद्दलचा कायदा १८६५ मध्ये करण्यात आला.[१४] यासाठी देशातील शेतीकडे विशेष लक्ष देण्यासाठी १८७० मध्ये हिंदुस्थान सरकारने शेतकी खाते वेगळे स्थापन केले. तसेच ते प्रांतातूनही निर्माण केले. या खात्यामुळे प्रांतांच्या कामामध्ये आणि मोजणी, तपासणी, कागदपत्र ठेवणे यात सुधारणा होत गेली. त्यानंतर १८७९ मध्ये ही जमीन महसूलाबाबत कायदा केला गेला. पुन्हा १८८६ मध्ये सुधारणांच्या संबंधाने सारा वाढवायचा नाही हे तत्व कायद्यात ठरविण्यात आले. जमीनीची किंमत आणि शेतीतील फायदा यानुसारचे साऱ्याची तपासणी केली जाईल असे निश्चित केले गेले.

लॉर्ड मेयोच्या मते, “भारताच्या सुधारणेत व संपत्तीवर्धनाचे कामी पाउल पुढे पडणे आणखी काही शतके तरी शेतकीचे सुधारणेवर व विस्तारावर अवलंबून राहील, व्यापार सुधारणा झाली पाहिजे किंवा व्यापारोपयोगी अथवा कालोपयोगी होण्यासारखे पदार्थ या देशांत नवीन उत्पन्न करु लागले पाहिजे. शेतकीशी इतका निकट संबंध असणारे दुसऱ्या कोणत्याही सरकारचा नाही, हिंदुस्थान सरकार हे नुसते राज्यशास्ते आहेत इतकेच नाही, तर ते मोठे जमीनदारही आहेत. जमीन सुधारण्याचे प्रत्येक बाबीने सरकारचे मिळकतीची किंमत वाढत जाते.”

१८४० मध्ये असणाऱ्या जमीनीच्या उत्पन्नातही दुप्पट वाढ होत गेलेली दिसून येते.

**तक्ता क्र. १२. जमीनीपासून मिळणाऱ्या उत्पन्नात झालेली वाढ –** [१५]

| वर्ष | १८४०-४१ | १८५०-५१ | १८६०-६१ | १८७०-७१ | १८८०-८१ | १८९०-९१ | १८९२-९३ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| उत्पन्न (रुपये मध्ये) | १२ कोटी | १५ कोटी | १८ कोटी | २१ कोटी | २१ कोटी | १४ कोटी | २४ ९/१० कोटी |

१४. Social Cultural Economic History of India : S.C. Roy, Chaudhary, Surjit Publication, Delhi, 1978, Pg. 51.

१५. हिंदुस्थानची राज्यव्यवस्था व लोकस्थिती :(१८९१-९२ अखेर हिंदुस्थानचे हालहवाले पार्लमेंटमध्ये मांडलेल्या रिपोर्टच्या आधारे) डेक्कन एज्यु., आर्यविजय, पुणे, १८९६, पान १८१-१८२.

एकूणच १८४०-४१ पासून १८९२-९३ पर्यंत जमीनीपासूनचे उत्पन्न वाढत गेलेले दिसते. परंतु १८५८ पर्यंत ब्रिटिश राजवटीत अनेक नवीन प्रांत सामील होतच होते. सन १८६० च्या सुमारास इंग्रजी राज्याच्या हद्दी ठरल्या. तेंव्हा त्या नंतरचे आकडे ही वाढ सुमारे ३३ टक्के असलेली दर्शवितात. यातील १८९१-९२ मध्ये मद्रास प्रांतात दुष्काळ पडल्यामुळे येथील उत्पन्न कमी होते.

साऱ्याचा आकार ठरविताना तालुक्याची पूर्वीची तीस वर्षाची जमाबंदीची माहिती काढली जाई. साऱ्याचे प्रमाण, वसुलीचे प्रमाण, शेतीक्षेत्रातील वाढ, धान्याची किंमत वाढ, दळणवळण, पाटबंधारे, जमीनीची किंमत या सर्व गोष्टींचा विचार करूनच तालुक्यावर सारा लावला जात असे. साधारण साऱ्याचा आकार जमीनीच्या उत्पन्नाचा पंधरावा अंश असा होता. हे ठराव ३० वर्षे मुदतीचे होते.

सारा नियमित रितीने दिला जात असेल तर ती जमीन कसणाऱ्याकडून काढून घेतली जात नसे. साऱ्याची फेरतपासणी झाल्यावर जो सारा ठरेल तो देण्याची जबाबदारी कुळावर होती. काही भागामध्ये जमीन धारण करणारे आपल्या साऱ्याबद्दल जबाबदार असून शिवाय ते सर्वांचे साऱ्याबद्दलही सामुहिकरित्या जबाबदार असत. उदा. खोती, पट्टीदारी पध्दत, कुलाबा, रत्नागिरी जिल्हयांत खोतीची पध्दत अस्तित्वात होती.

**२. साऱ्यात सूट -** साऱ्याचा वसूल हफ्त्यांनी करणाऱ्यात येत असे. त्यांची मुदत वेगवेगळी असे. पावसाची कमतरता किंवा इतर कारणांमुळे पीकाचे नुकसान झाल्यास सारा तहकुब केला जाई. पुढचे पीक आल्यानंतर सारा माफ करण्याचे ठरविले जाई. [१६] सरकारी पाटाचे पाणी बरोबर न मिळाल्याने किंवा दुसऱ्या कारणाने शेतकऱ्याचे नुकसान झाल्यास त्याबद्दल साऱ्यात सूट देण्यात येत असे. [१७]

**३. पड जमीनीबाबतचे ब्रिटिशांचे धोरण -** ब्रिटिश काळात पडीक जमीनी लागवडीखाली आणण्यासाठी प्रत्येक प्रांतात धोरण वेगळे होते. मद्रास व मुंबई या इलाख्यातील सर्व्हेच्या पद्धतीप्रमाणे सर्व जमीन, लागवडीखाली असो की पडीक, ती मोजली जावून तिचा सारा ठरविला जात असे. त्या जमीनीत लागवडीस सुरुवात झाली की त्यावर सारा सुरु होत असे. उत्तर हिंदुस्थानात साऱ्याचा ठराव गावाबरोबर असल्याने पडीक जमीन लागवडीस

१६. ईस्ट इंडिया कंपनी, कंपनी सरकार : डॉ.अ.रा.कुलकर्णी, राजहंस पब्लिकेशन्स, पुणे, मे २०००, द्वितीयावृत्ती, पा. ८७.
१७. हिंदुस्थानची राज्यव्यवस्था व लोकस्थिती : (१८९१-९२ अखेर हिंदुस्थानचे हालहवाले पार्लमेंटमध्ये मांडलेल्या रिपोर्टच्या आधारे) डेक्कन एज्यु., आर्यविजय, पुणे, १८९६, पा. १७०.

आणल्यावर जेव्हा फेरसर्व्हे होत असे तेव्हा सरकारला त्याचा फायदा होत असे. या भागात गाववार ठरलेला असल्याने लागवडीसंबंधीचा कोणताही फरक केला गेला तरी ठरलेला सारा त्या गावांत जमा करुन भरावाच लागत असे.

एलफिन्स्टनने कमिशनर या नात्याने मराठी मुलुखात जी प्रशासन व्यवस्था निर्माण केली. त्यातील महसूल व्यवस्थेमध्ये जुन्या ग्रामसंस्था व्यवस्थीत चालविण्याचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांना दिले. लागवडीखाली जेवढी जमीन असेल तेवढाच सारा आकारणीसाठी विचार करावा. सारा हलका असावा, नवे कर लादू नयेत. जुने अन्यायकारक कर रद्द करण्याच्या सूचना जिल्हाधिकाऱ्यांस दिल्या.

पेशवाईत दारुच्या दुकानावर निर्बंध घातल्याने अबकारी उत्पन्नात बरीच घट पडली होती. एलफिन्स्टनला मराठयांची ही पद्धती मान्य होती. मादक दारु विक्रीवर जुन्या सरकारने घातलेली बंदी यातून सरकारच्या उत्पन्नावर परिणाम होतो. पण या बाबीपासून उत्पन्न फार अल्प प्रमाणात येते. त्यामुळे ही कायमची बंद केली. जहागीरदार वर्गावर ईस्ट इंडिया कंपनीच्या सुरुवातीला विशेष फरक पडला नाही. त्याने मोठया जहागीरदारांची वतने वंशपरंपरा चालू ठेवली व दुय्यम दर्जाच्या जहागीरदारांना कमीशनरच्या वर्चस्वाखाली आणले. मोठया जहागीरदारांना आपल्या अंतर्गत कारभारात स्वातंत्र्य असले तरी कमिशनरच्या पूर्व संमतीशिवाय इतर जहागीरदारांशी बोलणी करता येत नसत. इ.स. १८१७ ते १८३० या काळात मद्रास व कलकत्ता येथील प्रतिनिधींच्या साहाय्याने रस्ते व भुयारी गटारे बांधण्याची योजना तयार करण्यात आली. परंतु, पैसा अपुरा पडल्याने प्रांतीय सरकारने अधिक पैसा दिला. मुंबईच्या प्रतिनिधींनी वाहन कर बसविला.[१८] परंतु हा कर गोळा करण्याचे काम प्रमुख दंडाधिकाऱ्याला करावे लागले. इ.स. १८४० व इ.स. १८४१ मध्ये कलकत्ता व मद्रास येथील करांच्या रकमेचा विनियोग करण्यासंबंधीचे कायदे करण्यात आले. कर वसुलीचे अधिकार स्थानिक प्रतिनिधींना देण्यात आले. अशाच प्रकारचा कायदा १८४५ मध्ये मुंबईसाठी करण्यात आला. मोगल आणि शिवाजींच्या काळातील जुन्या जहागिरी तशाच ठेवल्या आणि पेशव्यांच्या काळातील जहागिरी किमान दोन पिढया चालू ठेवण्याचा निर्णय घेतला. . इ.स. १८४०-४१ मध्ये रू. १२ कोटी तर इ.स. १८९२-९३ मध्ये रू. २४ कोटीपेक्षा जास्त जमीनीचे उत्पन्न (दुप्पट) वाढलेले दिसते

---

१८. महाराष्ट्रीय ज्ञानकोश, पान ११५.

## १८५७ च्या स्वातंत्र्ययुद्धानंतरचा ब्रिटिश भारत –

१८५७ च्या स्वातंत्र्ययुद्धानंतर आणि पहिल्या व दुसऱ्या महायुद्धानंतरच्या काळात करण्यात आलेले बदल अत्यंत महत्वाचे आहेत. कंपनी सरकारला उत्पन्नापेक्षा खर्च जास्त येत असल्याने (कारण राज्यात निरनिराळे कर नव्हते व लढाया कराव्या लागत.) कर्ज काढावे लागत असे. १८५७ पर्यंत या कर्जाची रक्कम ६० कोटी रु. झाली. १८५७ चे बंड मोडून काढण्यासाठी सरकारला खूप मोठी रक्कम खर्च करावी लागली. अठराव्या शतकात हिंदुस्थानात लहान-मोठी अशी सुमारे ५६५ संस्थाने होती.[१९] १८५८ नंतर सुमारे १६० संस्थानिकांना सनद देण्यात आल्या व त्यांच्या रक्षणाची हमी भरण्यात आली. पेशव्यांनी दिलेली इनामे आणि वर्षासने रद्द करुन लोकांवर उपासमारीची वेळ आणण्यापेक्षा जुन्या व्यवस्थेत थोडे फार फेरबदल करुन ती काही काळ चालू ठेवण्याचा ब्रिटिशांनी निर्णय घेतला.

१८६० पर्यंत सरकारच्या तिजोरीत ९० कोटींची तूट निर्माण झाली. या काळातच विल्सन यांनी लष्करात काटकसर करुन ६॥· कोटी कमी केले आणि उत्पन्नावर पाच वर्षाकरीता म्हणून कर बसविला. जकातीमध्ये वाढ केली. परंतु आयात मालावरची जकात शेकडा १० वरुन ७॥· केली आणि दोन वर्षात बरीच तूट भरुन काढली.१८६०-७० या काळात झालेले दोन दुष्काळ आणि सरकारचा वाढणारा खर्च यामुळे उत्पन्न न वाढता पुन्हा ६ कोटींची तूट निर्माण झाली. ही तूट भरुन काढण्यासाठी उत्पन्नावरील कर जो ५ वर्षांचा कालावधी संपल्याने बंद केला होता तो पुन्हा चालू केला. स्टॅम्प डयुटी वाढविण्यात आली. मीठावरील कर आणि जकात ही वाढविण्यात आली. परंतु आयात मालावरील काही वस्तूंवरील कर सरकारने काढून टाकले. तसेच प्रांतिक सरकारला लागतील तसे पैसे यावेळेपर्यंत हिंदुस्थान सरकार देत होते पण मेयोसाहेबांनी प्रांतिक सरकारांना एक ठराविक रक्कम देण्यास सुरुवात केली. ती अपुरी पडल्यास त्यांनी ती प्रांतिक जनतेकडून वसूल करण्याच्या सूचना देण्यात आल्या. अशा पद्धतीने सरकारच्या खर्चाला आळा बसल्याने सरकारची तूट भरुन निघाली व शिल्लक वाढली. त्यामुळे १८७३ मध्ये पुन्हा उत्पन्नावरील कर काढून टाकण्यात आला. शेतीचा स्वतंत्र विचार करण्यासाठी सन १८७० मध्ये हिंदुस्थान सरकारने शेतकी खाते स्थापन केले. पुढे हे खाते प्रांतातही स्थापन करण्यात आले.

---

१९. अर्वाचीन भारताचा इतिहासः प्रा. सुधाकर पंडित, प्राची प्रकाशन, १९९१, तृतीयावृत्ती, मुंबई, पान २२५.

१८७३ ते ७६ या काळातच बिहारमध्ये आणि दक्षिणेकडे पडलेल्या दुष्काळाने पुन्हा तूट निर्माण झाली. पण या काळातही सरकारने आयात मालाची जकात शेकडा रु ७ वरुन रु ५ केली. १८७७ ते ८३ या काळातही दुष्काळ, अफगाणिस्तानबरोबरची लढाई यामुळे पुन्हा तूट निर्माण झाली. ही तूट आणि मागील काळाची तूट भरुन काढण्यासाठी सरकारने जमीनीवरील कर, लायसेन्स टॅक्स वाढविले. मालावरील जकात दर मणास २ रु. करण्यात आली व प्रांतिक सरकारकडे ठरीव रक्कम देत गेल्यामुळे सरकारी खजिन्यात बरीच शिल्लक राहू लागली. त्यामुळे १८८१ पर्यंत हिंदूस्थान सरकारकडे बरीच रक्कम शिल्लक राहिली. [२०] इ.स. १८८१ मध्ये निवडणूक पद्धतीचा उपयोग करण्याची तरतूद करण्यात आली. ३२ सदस्यांपैकी १६ सदस्य करदात्यांतर्फे निवडले जात.

१८८२-८३ पर्यंत शिल्लक वाढल्यामुळे सरकारला कोणता तरी एक कर कमी करावा असे वाटू लागले. त्याप्रमाणे पटवारी कर कमी करण्यात आला. हा कर सर्व हिंदुस्थानातून २४ लक्ष रु. येत होता. १८८४-९१ मध्ये रशियासारख्या नवीन शत्रूपासूनच्या संरक्षणासाठी आणि उत्तर ब्रम्हदेश जिंकल्यामुळे युद्ध आणि शांतता खर्च ६० लक्ष रु. झाला. रुपयांमध्येही तूट निर्माण झाली त्यामुळे ५०० रु. उत्पन्नावर पुन्हा कर बसविण्यात आला. मीठावरील जकात मणापाठीमागे २॥ रुपये ठेवण्यात आली. रॉकेलवरही जकात बसविली गेली. लष्करातही काटकसर केल्यामुळे शिल्लक जमा झाली. १८९२-९४ मध्येही मागील शिल्लकीमुळे तूट भरुन निघाली नाही. आयात मालावरील जकातीमध्ये शेकडा मालावर रु ५ जकात बसविली. यामुळे वार्षिक उत्पन्नात ३ कोटींची भर पडू लागली. १८९५-९६ या काळात दुष्काळ, प्लेग यासारख्या संकटातही सरकारच्या जमाखर्चात तूट न पडता बरीच शिल्लक राहिली. आयात होणाऱ्या कपडा, सूत इ.वरील जकात शेकडा ५ वरुन ३॥करण्यात आली व साखरेवर थोडी जकात बसविली. इ.स. १८९९ मध्ये कलकत्ता महानगरपालिकेसाठी काही कायदे पास केले गेले. या महानगरपालिकेचे अधिकार मर्यादित करुन फक्त कराचे दर ठरवून सामान्य कामे करण्याची तरतूद करण्यात आली. कार्यकारी अधिकार नगराध्यक्षास दिलेले होते.

---

२०. ईस्ट इंडिया कंपनी, कंपनी सरकार : डॉ.अ.रा.कुलकर्णी, राजहंस पब्लिकेशन्स, पुणे, मे २०००, द्वितीयावृत्ती, पा.८७.

१९०१-०२ मध्ये सरकारच्या तिजोरीत शिल्लक राहिल्याने शाळा, दवाखाने, कॉलेज इ.साठी पैसा वापरला गेला. पण तरीही ५.५ कोटी शिल्लक राहिले. त्यासाठीच सरकारने १९०३-०४ मध्ये मीठावरील जकात २.५ रु. वरुन मणाला २ रु. केली. १००० रु च्या वर उत्पन्न असणाऱ्यांवर कर बसविला.

१९०४-०५ मध्येही मीठावरील जकात २ वरुन १.५ केली. उत्तर हिंदुस्थानातील दुष्काळ कर काढून टाकण्यात आला. प्रांतिक सरकारला शिक्षण, पोलिस, शेती सुधारणा इ. साठी देणग्या दिल्या गेल्या.१९०६-०७ पोलिसी खर्चाची तरतूद करुनही १.३ कोटी सरकारकडे शिल्लक राहिले.

१९०८ मध्ये मार्लेमिंटो सुधारणांची घोषणा केली गेली. १९०९ मध्ये करण्यात आलेल्या या कौन्सिल ॲक्टने प्रातिनिधिक शासनव्यवस्था निर्माण करुन ती खिळखिळी केली. "फोडा आणि राज्य करा" या तत्त्वाचा वापर करुन हिंदू आणि मुसलमान यांना विभक्त मतदारसंघ निर्माण करण्याची संधी देवून फुटीरतेला खत पाणी घातले. या मतदारसंघात मतदानाचा हक्क मिळविण्यासाठी हिंदुंनी ५००० रु. व मुसलमानांनी फक्त ७५० रु. चा महसूल द्यावयाचा होता.

१९१४च्या इंग्लडमधील हाऊस ऑफ कॉमन्समध्ये पारित झालेला आयकर कायदा, १९१४ अनुसार वैयक्तिक प्राप्तीकराची आकारणी, मालमत्तेच्या साहाय्याने मिळणाऱ्या उत्पादनावर (जमिनीपासून मिळणारे धान्य), उद्योगसंस्थांच्या उत्पन्नावर, जमिन विमा कंपन्यांच्या उत्पन्नावरील कर असे काही कर व त्याबाबतची कार्यवाही सुचविण्यात आली होती. त्याशिवाय प्राप्ती करात सूट सुचविण्यात आली होती.

१९ व्या शतकाच्या अखेरीपर्यंत जमीन महसूल हा भारत सरकारचा एक महत्वपूर्ण कर होता. पण २० व्या शतकातील मॉटेस्क्यू सुधारणेनुसार (१९१९) जमीन महसूल हा प्रांताच्या अखत्यारितील विषय ठरला. डिसेंबर १९१९ मध्ये भारतमंत्री मॉटेस्क्यूने ब्रिटिश पार्लमेंटमध्ये एक विधेयक सादर केले. याला रौलेट कायदा म्हटले गेले. [२१] पण हा कर भारताच्या अर्थव्यवस्थेतील महत्त्वपूर्ण घटक असला तरी त्याचे एकूण कराच्या तुलनेत प्रमाण मात्र अत्यंत कमी कमी होत गेलेले दिसते.

---

२१. आधुनिक भारतः प्रा. नी.सी. दिक्षित, पिंपळापुरे अँड पब्लिशर्स, नागपूर, प्रथमावृत्ती, जून २००३, पा.३४०

**तक्ता क्र. १३. जमीन महसूलाचे एकूण करपध्दतीतील प्रमाण –** [२२]

| वर्ष | जमीन महसूलाचे प्रमाण |
|---|---|
| १७९३-९४ | ६९.० टक्के |
| १८७१-७२ | ४५.७ टक्के |
| १९१९-२० | २७.८ टक्के |
| १९३७-३८ | २०.४ टक्के |
| १९३९-४० | १९.९ टक्के |
| १९५४-५५ | १४.५ टक्के |

आधुनिक काळाशी तुलना करता प्राचीन काळात जमीन महसूल हा जमीनीच्या उत्पादनावर आकारला जात होता. परंतु स्वातंत्र्य प्राप्तीनंतर हा कर केवळ जमीनीचा मालकी हक्क विचारात घेऊन शेतसाऱ्याच्या रूपाने वसूल केला जातो. प्राचीन काळात ज्या जमीन महसुलाचा एकूण महसुलातील वाटा महत्वपूर्ण होता त्याच जमीन महसुलाचे कर साधन म्हणून असणारे महत्व आधुनिक काळात नगण्य झालेले दिसते.

१९१९ च्या कायदयाने राज्यात द्विदल राज्यपध्दतीची निर्मीती करण्यात आली. ही प्रांतिक राज्यकारभाराची विभागणी होती. या कायदयानुसार द्विगुही कायदेमंडळ निर्माण करण्यात आले. राज्यपरिषद या वरिष्ठ सभागृहासाठी मतदानाचा अधिकार अतिशय मर्यादित होता. वार्षिक १० हजार रु पेक्षा जास्त उत्पन्नावर आयकर देणारे किंवा वार्षिक ७५० रु. पेक्षा जास्त भूमीकर देणारे मतदानास पात्र होते. तसेच केंद्रीय विधानसभेसाठी मतदानाच्या पात्रतेमध्ये वार्षिक १५ रु पेक्षा जास्त कर देणारा नागरिक, वार्षिक २००० रु पेक्षा जास्त उत्पन्नावर आयकर देणारा किंवा वार्षिक ५० रु. पेक्षा जास्त भूमीकर देणारा नागरिक यांचा समावेश करण्यात आलेला दिसतो. [२३]

भारतातील ब्रिटिश प्रशासनाचा महत्वाचा कणा असलेली जिल्हा व्यवस्था स्वातंत्र्योत्तर भारतात सुद्धा तशीच ठेवण्यात आली. प्रशासकीय भागाच्या नामकरणाव्यतिरिक्त संपूर्ण व्यवस्था तशीच ठेवण्यात आली. ब्रिटीशकालीन भारतात (संपूर्ण) तांत्रिक दृष्टया जिल्हा हाच प्रशासनाचा मुख्य घटक होता. जिल्हयांमधील वसूलीसाठी प्रांतांची निर्मीती केलेली होती.

---

२२. Indian Public Finance :Prof. S.N. Agarwala, Vora and company publication, Bombay, Ist ed., 1967, pg. 293.
२३. आधुनिक भारतः प्रा. नी.सी. दिक्षित, पिंपळापूरे अँड पब्लिशर्स, नागपूर, प्रथमावृत्ती, जून,२००३, पा. ३४१.

सर्व जिल्हयातील प्रांत वेगवेगळे होते. पण सगळीकडे तत्त्व सारखेच वापरण्यात आले होते. ब्रिटीशकालीन भारतात शासनाचे अधिकार न्यायाधीश व कलेक्टर यांच्याकडे सुपूर्द केलेले होते. (आग्रा,बंगाल,मद्रास,मुंबई या सर्व प्रांतात)पंजाब, अवध, बर्मा आणि इतर नियमित न केलेल्या प्रांतात मात्र सर्व अधिकार डेप्युटी कमिशनरकडे देण्यात आले होते.[२४]

या कायद्यानुसार भारतात केंद्र व राज्य किंवा प्रांतिक सरकार यांच्या अधिकारकक्षा स्पष्ट करण्यात आल्या होत्या. त्या हेतूने प्रशासनाची खाती आणि उत्पन्नाची खाती यांची केंद्रिय व प्रांतिक अशी विभागणी केली गेली. यात महसुलाची खाती केंद्रिय व प्रांतिक अशा दोन गटात विभागली गेली. संरक्षण, परराष्ट्रसंबंध, आयकर, रेल्वे, पोस्ट, टेलिग्राफ, दिवाणी व फौजदारी कायदे हे महत्त्वाचे विषय केंद्राच्या अधिकारात ठेवण्यात आले आणि प्रांतिक सूचीमध्ये स्थानिक स्वराज्य संस्था, सार्वजनिक आरोग्य, शिक्षण, भूमीकर, कृषी, वन, सहकारी संस्था इ. विषय होते. यातही राखीव विषय आणि सोपीव विषय अशी विभागणी करण्यात आली होती.भूमीकर हा राखीव विषय होता त्यामुळे या विषयीचा कारभार गव्हर्नर आपल्या कौन्सिलच्या मदतीने पहात असे. ही कौन्सिल कायदेमंडळाला जबबादार नव्हती म्हणजेच कर निर्णयाच्या बाबतही गव्हर्नरचा निर्णय अंतिम होता.

ब्रिटिश काळात भारतातील कर पध्दती प्रांताप्रांतात वेगवेगळी आढळते. उदा. १७९३ मध्ये बंगाल, बिहार, आसाममध्ये निर्माण करण्यात आलेली कायमधारा पध्दत आणि उर्वरित भारतात असणारी तात्पुरती कर पध्दती. १९२१ पर्यंत भारतात सर्वत्र ३० वर्षांकरिताचा कालावधी गृहित धरून कर लावलेले दिसतात. मुंबई प्रांतातील रयतवारी पध्दतच मद्रास, पंजाब व आसाम मध्ये लावण्यात आली. ब्रिटिश काळातील महसूल पध्दतीची वैशिष्टये -

- ब्रिटिश काळात कर हे निव्वळ उत्पन्नावर लावले गेले.
- सर्व प्रकारच्या जमीनीवर सारखाच कर द्यावा लागे.
- तात्पुरत्या स्वरूपाची करपध्दती लागू केलेल्या भागातही कर म्हणून भाडे घेतले जाई.
- जमीनदारावरील कर पध्दतीचे ओझे कमी होऊन ते सामान्यांवर वाढलेले दिसते.

**१९३५ चा कायदा (Govt. of India Act, 1935) -**

भारत सरकारच्या संघीय वित्त व्यवस्थेमध्ये Govt. of India Act, 1935नुसार संस्थानांच्या वित्तिय परिस्थितीमध्ये सुधारणा घडवून आणण्यात आली. या कायद्याने केंद्र

२४. History of Indian Administration: Prof. B.N. Puri, (Vol. 3), Bhartiya Vidya Bhavan, Bombay, I[ed], Pg. 169.

आणि राज्यांच्या महसूल साधनांची सीमा निश्चित करण्यात आली. या कायद्याने कर विभाजन (केंद्र व राज्य) पद्धत सुरु करण्यात आली. या कायद्यानुसार कोणते कर केंद्राने आकारावेत आणि वसूल करावेत. तसेच वसूल केलेला महसूल राज्यांमध्ये कसा वाटावा याबाबत कायद्याने काही मार्गदर्शक तत्वे सांगितली.

याचबरोबर या कायद्यामध्ये असेही सांगण्यात आले आहे की राज्यांच्या अंदाजपत्रकात समतोल साधण्यासाठी आवश्यक असलेली मदत अनुदानाच्या स्वरुपात केंद्रसरकारने द्यावी. या कायद्याने राज्यांची कर्ज घेण्याची क्षमता वाढविली.

Government of India Act, 1935 हा कायदा राज्यांकरिता असलेल्या वित्तीय स्वातंत्र्याच्या सर्वसाधारण तत्वावर अवलंबून होता. संघीय वित्त व्यवस्थेचे हे मुलभूत तत्व स्वतंत्र भारताच्या घटनेने स्विकारले. याचबरोबर पुढील गोष्टी स्विकारण्यात आल्या.

(१) वित्तीय दृष्टया बळकट केंद्रसरकार पुढील उपायाद्वारे वित्तीय ताकद वाढवण्याचा प्रयत्न करेल.-

१) करापासून मिळणारी शक्ती /अधिकार हाताळणे.

२) केंद्राला अधिक लवचिक आणि अधिक उत्पन्न देणारी महसूली साधने देणे.

३) तूटीच्या अर्थभरण्याच्या साधनाचे अधिकार, चलनी नोटा, नाणी, पैसा आणि बँकिंग बाबतचे सर्व अधिकार केंद्राला देण्यात आले आहेत.

४) केंद्र सरकारला काही विशेष महसूली साधनांचा अधिकार देण्यात आला आहे. या व्यतिरिक्त सर्व अधिकार केंद्राला देण्यात आले.

(२) भारतीय राज्यघटनेतील वित्तीय अधिकार आणि शासकीय व प्रशासकीय अधिकारांच्या कार्यक्षेत्रांचे वाटप ३ याद्यांमध्ये केले आहे. अ) केंद्रीय यादी –Union List**.** ब) राज्यीय यादी – State List**.**क) समवर्ती यादी– Concurrent List.

याप्रमाणे केंद्र आणि राज्य यांच्यात वित्तीय अधिकारांचे विभाजन करण्यात आले आहे.

(३) महसूली साधनांच्या बदलीची तरतूद **-** भारतीय राज्यघटनेत ३ साधने देण्यात आली आहेत.

१) करातील वाटा २) अनुदान ३) कर्ज.(४) महसूली साधनांच्या बदलीची लवचिकता **-** वित्त आयोगामार्फत केंद्राकडून राज्यांकडे साधनाच्या बदलीसाठी दर पाच वर्षातून

शिफारस केली जाते. त्यासाठी आयोगाचे काही निकष नाहीत. यामुळे वित्तीय प्रणालीला लवचिकता प्राप्त होते.

**स्वातंत्र्योत्तर काळातील महसूल व्यवस्था-** १९४७ साली भारत ब्रिटिश सत्तेतून मुक्त झाला. २६जानेवारी १९५० रोजी भारतीय संसदेत भारतीय राज्यघटनेतील कलम ३९५ अनुसार इंडियन इंडिपेंडन्स ॲक्ट, १९४७ व गव्हर्नमेंट ऑफ इंडिया ॲक्ट, १९३५ हे कायदे रद्द होऊन भारत सार्वभौम प्रजासत्ताक घोषित झाले.

स्वातंत्र्योत्तर भारतात त्रिस्तरीय संघीय कर रचना स्विकारण्यात आलेली आहे. (केंद्र, राज्य, स्थानिक) भारतीय राज्यघटनेतील तरतूदीनुसार केंद्र व राज्य सरकार यांच्यात कर आकारणीच्या अधिकारांचे विभाजन करण्यात आले आहे.

केंद्र सरकारमार्फत आकारले जाणारे कर पुढील प्रमाणे –प्राप्ती कर(शेती उत्पन्नावरील कर वगळता(शेती उत्पन्न कर-राज्य)),जकात (आयात-निर्यात कर),उत्पादन शुल्क(दारु, सिगारेट, मादक द्रव्य, कोकाकोला यावर आकारला जाणारा), विक्री कर,सेवा कर.

राज्य सरकारांमार्फत आकारले जाणारे कर – विक्री कर (आंतरराज्य),स्टँम्प डयूटी (संपत्ती हस्तांतरण), राज्य उत्पादन शुल्क, जमीन महसूल, करमणूक कर, व्यवसाय कर.

स्थानिक स्वराज्य संस्थामार्फत आकारले जाणारे कर –स्थानिक स्वराज्य संस्थांना काही कर आकारण्याचे अधिकार घटनेने दिलेले आहेत. उदा. ग्रामपंचायती, शहरी स्थानिक स्वराज्य संस्था. जमिन महसूलावरील अधिभार, जमिन आणि इमारतीवरील कर, भाडेपट्टीवरील कर, सुधारणा कर, अचल मिळकतीवरील कर (स्टॅम्प डयूटीबरोबर मिळकतीच्या मूल्यावर घेतला जातो.)

स्थानिक स्वराज्य संस्था या महसूल व्यवस्थेतील प्रमुख साधन आहे. स्वातंत्र्योत्तर काळात स्थानिक स्वराज्य संस्था या ग्रामीण आणि नागरी क्षेत्रात निर्माण करण्यात आल्या. प्रत्येक राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रशासनासाठी स्वतंत्र कायदा निर्माण केला गेला. यात मुंबई ग्राम पंचायत कायदा,१९५८, जिल्हा परिषदा व पंचायत समिती कायदा,१९६१, महाराष्ट्र नगर परिषद व नगर पंचायत कायदा,१९६१ या कायदयांचा समावेश केला गेला आहे या कायदयांनुसार स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मार्फत त्या त्या भागातील करवसूलीची व्यवस्था अस्तित्वात आली. तसेच केंद्र शासनाच्या पुढाकाराने

भारतीय राज्यघटनेत कलम २४३छ आणि कलत २४३ब मध्ये ७३वी व ७४वी घटनादुरुस्ती होऊन स्थानिक स्वराज्य संस्थांनां घटनात्मक अधिकार व संरक्षण दिले गेले आहे.स्थानिक स्वराज्य संस्थांनी कर आकार न वाढविता कर आकारणीची व्याप्ती अधिक विस्तृत करावी असेही प्रतिपादन केले जाते. [२५]

ग्रामीण आणि नागरी क्षेत्रात प्रशासकीय स्तर निश्चित केले गेले. ग्रामीण भागातील प्रशासकीय स्तर म्हणजे ग्रामपातळीवरील ग्रामपंचायत, तालुका पातळीवरील पंचायत समिती आणि जिल्हा पातळीवरील जिल्हापरिषद. नागरी भागातील प्रशासकीय स्तर म्हणजे नगरांसाठी नगरपालिका आणि महानगरांसाठी महानगरपालिका होय. या प्रशासकीस स्तरातून महसूल व्यवस्थेचे कामकाज चालविले जाते.

**आयकर कायद्याचा इतिहास** - भारतात ब्रिटिशांनी सर्वप्रथम आयकर आकारण्यास सुरुवात केली. इंग्रजांचे भारतावर राज्य असताना ग्रेट लिबरेशन मुव्हमेंट आणि १८५७ चे स्वातंत्र्ययुद्ध यामुळे आर्थिक अडचण निर्माण झाल्यामुळे भारतात आयकर आकारण्यास सुरुवात झाली. काही प्रयोग केल्यानंतर १८८६ पासून आयकर कायदा कायम स्वरुपात लागू झाला. पहिल्या महायुद्धामुळे झालेल्या आर्थिक त्रुटीमुळे जास्त तरतुदी असलेला आयकर कायदा १९१८मध्ये त्याचबरोबर सुपर टॅक्स १९१७ मध्ये अस्तित्वात आला आणि १९२०मध्ये ही अंमलात आला. आयकर आणि सुपर टॅक्स दोन्ही कायदे एकत्र करुन १९२२ चा आयकर कायदा अस्तित्वात आला. १९४७ साली भारताला स्वातंत्र्य मिळाल्यावर लोकोपयोगी योजनेसाठी सरकारला पैशाची आवश्यकता वाटल्यामुळे आणि वारंवार झालेल्या कायद्यातील सुधारणांमुळे १९२२चा कायदा फारच गुंतागुंतीचा झाला होता त्यामुळे १९५६ मध्ये लॉ कमिशन नेमण्यात आले. त्याचे फलस्वरुप १९६१ चा आयकर कायदा १-४-६२ पासून अंमलात आला, म्हणजेच आकारणी वर्ष १९६२-६३ पासून अंमलात आला.

योग्य आणि खरे उत्पन्न दाखविणे आपल्या हिताचेच आहे, कमी उत्पन्न दाखविल्याने भांडवल निर्माण न झाल्यास घर, जागा, शेती व अन्य गुंतवणुका करणे अवघड होते. कर्ज देताना पण बँका, कर्ज देणाऱ्या अन्य संस्था, भांडवल, उत्पन्न आणि अन्य मालमत्ता विचारात घेऊन कर्ज देतात.

आयकर कायद्यातील तरतुदी संपूर्ण भारताला लागू आहेत. आयकर कायद्याखालील

---

२५. Revenue System in Ancient India with Special Reference to the Chola Dynasty- Its Relevance in Modern Urban Local Government: Dr.S.K. Jaiswal, Article Published in Nagarlok, Vol. XLII, July-Sept.2010, IIPA, New Delhi, pg. 78-85.

तरतुदींप्रमाणे दोन महत्वाच्या गोष्टी आहेतः करपात्र उत्पन्न आणि त्यावरील कराचा भरणा करणे. आयकर कायद्याप्रमाणे १ एप्रिल ते ३१ मार्च हे महसूली वर्ष असते. सर्व करदात्यांसाठी वर्ष सारखेच असते. आयकर पत्रक दाखल केल्यानंतर त्याची आकारणी, अपील, दंड आणि शिक्षा अशी एकूण कायद्याची रचना आहे.

आयकर कायद्यातील बदल साधारणतः अर्थसंकल्पाद्वारे केले जातात. अर्थसंकल्प दरवर्षी मांडला जातो. तसेच सुधारणा कायदा आणि ऑर्डिनन्स द्वाराही वेळोवेळी बदल केले जातात. अर्थसंकल्पामध्ये पुढील वर्षाकरिता कराचे दर घोषित केले जातात.

**भारतातील करांचे वर्गीकरण-**

**१. प्रत्यक्ष कर –**

प्रत्यक्ष कर म्हणजे उत्पादनावरील कर. याबाबत अर्थशास्त्रज्ञ जे.एस्.मिलची व्याख्या महत्वाची आहे. जे.एस्.मिलच्या मते, ज्या व्यक्तीवर कराचा भार पडावा अशी अपेक्षा असते. तिच्याकडून वसूल केलेला कर म्हणजे प्रत्यक्ष कर. प्रत्यक्ष कर म्हणजे असा कर की ज्याच्या बाबतीत कर भरण्याची कायदेशीर जबाबदारी असणारी व्यक्तीच तो कर देत असते किंवा त्याची आर्थिक जबाबदारी देखील स्विकारीत असते. म्हणजेच सर्वसाधारणपणे उत्पन्न, संपत्ती, मालमत्ता इ. वर आकारल्या जाणाऱ्या करांचे संक्रमण होऊ शकत नसल्याने त्यांना प्रत्यक्ष कर म्हटले जाते. करांपासून करदात्याला कोणताही विशिष्ट लाभ प्राप्त होत नाही. शिवाय ते देणे सक्तीचे असल्यामुळे कोणताही कर हा नागरीकांच्या दृष्टीने ओझेच असते. परंतु कर हा कोणत्याही सरकारचा महसूलाचा प्रमुख मार्ग असल्याने कर बसवणे टाळता येणार नाही. म्हणजेच सरकारला जास्तीत जास्त उत्पन्न आणि करदात्यांना कमीत कमी त्रास हा कोणत्याही कराचा मुख्य गुण असतो. प्रत्यक्ष करांचे गुण पुढीलप्रमाणे आहेत.

१. प्रत्यक्ष कर हे कर देण्याच्या पात्रतेवर अवलंबून असतात. म्हणजेच ज्याचे उत्पन्न जास्त त्याला कर जास्त द्यावा लागतो. ज्यांचे उत्पन्न कमी त्यांना प्रत्यक्ष करातून वगळले जाते. एकूणच प्रत्यक्ष कराचा पाया करदात्याचे उत्पन्न असतो असे म्हणता येईल.

२. प्रत्यक्ष करांची आकारणी करण्याची पध्दती प्रगतीशील ठरते. जसे उत्पन्न वाढते त्या प्रमाणात कराची रक्कमच वाढते असे नाही तर कराचा दर देखील वाढतो.

उदा. वार्षिक १ लाख उत्पन्नापर्यंत उत्पन्न कराचा दर शून्य असतो. म्हणजे हे उत्पन्न करमुक्त असते. या पुढील उत्पन्नावर उत्पन्न वाढीप्रमाणे कराचा दर दहा, वीस, तीस टक्के अशा चढत्या प्रमाणात असतो. म्हणजे ज्यांचे उत्पन्न जास्त त्यांच्यावरच हा कराचा बोजा पडतो.

३. प्रत्यक्ष कराला लवचिक व उत्पादक म्हणता येईल. कारण समाजाचे उत्पन्न वाढते तेव्हा सरकारचे उत्पन्न वाढते. याउलट समाजाचे उत्पन्न घटले तर सरकारचे उत्पन्न घटते.जसा

देशाचा आर्थिक विकास होत जातो तसे नागरिकांचे उत्पन्न वाढते. आणि नागरिकांचे उत्पन्न वाढले की या करामुळे देशाच्या खजिन्यात वाढ होते. म्हणून याला उत्पादकही म्हणता येईल. सरकारला भरीव उत्पन्न देणारे कर हे उत्पादक असतात.

४. आर्थिक विषमता कमी करण्याचे सरकारच्या हातातील प्रमुख शस्त्र म्हणजे कर होय. आधुनिक कल्याणकारी शासनाचे मुख्य उद्दिष्ट असते, समाजातील आर्थिक विषमता कमी करणे. त्यासाठी या कराद्वारे श्रीमंतावर जास्त आणि गरीबांवर अल्पभार हे सूत्र वापरले जाते. त्यामुळे श्रीमंताकडील जास्तीचा पैसा वसूल करणे सरकारला शक्य होते.

प्रत्यक्ष करांचे दोष पुढीलप्रमाणे आहेत.

१. प्रत्यक्ष करांतून अल्प उत्पन्न गटांना वगळावे लागत असल्याने कर भरणाऱ्यांची संख्या मर्यादित असते. उच्च उत्पन्न गटात असणाऱ्या लोकांकडूनच प्रत्यक्ष कर दिले जात असल्याने सरकारला फार मोठे उत्पन्न मिळत नाही.

२. प्रत्यक्ष करांना प्रामाणिकपणावरील कर म्हटले जाते. कारण आपले खरे उत्पन्न लपवून त्यातून मूक्तता करवून घेणारे अप्रामाणिक व्यावसायिक या करातून सूटू शकतात. पण खरे उत्पन्न उघड करणारे नोकरदार प्रामाणिकपणे कर भरतात आणि कायम भरतच राहतात. कर बुडवेगिरीपणामुळे प्रत्यक्ष करातून मिळणारे उत्पन्न नेहमी कमीच असते.

३. प्रत्यक्ष करांच्या वसूली आणि कर निर्धारणासाठी प्रचंड नोकरशाही उभारावी लागते. त्यासाठी सरकारला येणारा खर्च प्रचंड आहे. त्या प्रमाणात जमा होणारा कर कमी आहे असे म्हणता येईल. कारण व्यावसायिक व स्वयंरोजगारदार यांची कर निश्चिती करावी लागते. त्यानंतर वसूली करता येते. यात भ्रष्टाचार मोठया प्रमाणात आहे. त्यामुळे प्रत्यक्ष करांचा पाया संकुचित आहे असे म्हणता येईल.

४. प्रत्यक्ष करांच्या चूकवेगिरीतूनच काळया पैशाची निर्मिती होते. कर बुडवेगिरीतून म्हणजे आपले खरे उत्पन्न न दाखवता, उत्पन्न लपविल्यामुळे कर कमी द्यावा लागतो. आणि त्यातून काळया पैशाची निर्मिती होते व सरकारचे उत्पन्न बुडते.

प्राप्ती कर, संपत्ती कर, खर्च कर, भांडवल आणि मिळकतीवरील इतर कर, व्यवसाय कर.

**२.अप्रत्यक्ष कर-**

अप्रत्यक्ष कर म्हणजे उपभोगावरील कर. खर्चावरील कर म्हणजे अप्रत्यक्ष कर. याबाबत अर्थशास्त्रज्ञ जे.एस्.मिलची आणि प्रा. डाल्टन यांच्या व्याख्या महत्वपूर्ण आहेत.

जे.एस्. मिलच्या मते, ज्या व्यक्तीकडून कर वसूल केला जातो. ती व्यक्ती त्याचा भार दुसऱ्या व्यक्तीवर टाकेल अशा हेतूने बसविलेला कर म्हणजे अप्रत्यक्ष कर.

प्रा. डाल्टनच्या मते, जो कर देण्याची कायदेशीर जबाबदारी एकाची असते. पण तो अंशतः किंवा पूर्णतः दुसरीच व्यक्ती भरत असते. असा कर म्हणजे अप्रत्यक्ष कर.

उदा. विक्रीकर, करमणूक कर, पथकर, आयात-निर्यात कर वस्तू व सेवांच्या किंमतीमध्येच हा कर समाविष्ट होत असल्याने व्यक्तीला हा कर भरत असण्याची कल्पना येत नाही. याच्या वसूलीसाठी स्वतंत्र यंत्रणा नसते. अप्रत्यक्ष कर हे गुंतागुंतीचे आहेत हे कर स्वतंत्रपणे वस्तु, सेवा आणि आंतर राज्य विक्रीवर आकारले जातात.

अप्रत्यक्ष करांचे गुण पुढीलप्रमाणे आहेत.

१.अप्रत्यक्ष कर हे करदात्यांच्या दृष्टीने सोईचे असतात. कारण हे कर किंमतीच्या स्वरुपात वसूल केले जातात. जसे कौटिल्याने मधमाशीचे वर्णन केले आहे तसाच हा कर वसूल केला जातो.

२.या करापासून सरकारला भरपूर उत्पन्न मिळते आणि त्यासाठी यंत्रणाही उपलब्ध केलेली नसते. कमी खर्चात जास्त उत्पन्न मिळते.

३.देशातील सर्व नागरिकांना हा कर भरावा लागतो.

४.या कर व्यवस्थेत न्यायता असते. प्रत्येक व्यक्ती आपल्या शक्तीनुसार वस्तू व सेवांचा उपभोग घेतो. त्या प्रमाणात त्याला कमी-अधिक कर भरावा लागतो. जीवनावश्यक वस्तूंवर कमी कर किंवा चैनीच्या वस्तूंवर जास्त कर भरावा लागतो.

अप्रत्यक्ष करांचे दोष पुढीलप्रमाणे आहेत.

१.अप्रत्यक्ष कराचा भार श्रीमंतापेक्षा गरीबांवर अधिक पडतो. हा कर श्रीमंत/गरीबांकडून एकाच दराने वसूल केला जातो.

२.या करापासून मिळणारे उत्पन्न स्पष्ट होत नाही.

३.या करामुळे वस्तूच्या किंमतीत वाढ होते. किंमत वाढीपेक्षा कर वाढ जास्त होत असल्याने भाव वाढतात. परिणामी लोकांचा खर्च वाढतो. बचत कमी होते.

आयात-निर्यात कर, केंद्रीय उत्पादन शुल्क कर, सेवा कर, विक्री कर हे अप्रत्यक्ष कराचे प्रकार आहेत.

**महाराष्ट्र राज्यातील सध्याच्या महसूल खात्याची योजना** -

सध्या राज्याला पुढील मार्गांपासून महसूल मिळतो.

१) राज्याचा स्वतःचा कर महसूल.

२) राज्याला मिळणारा केंद्रीय करातील हिस्सा.

३) राज्याचा कराव्यतिरिक्त महसूल.

**१. राज्याचा स्वतःचा कर महसूल** :- राज्य सरकारला विक्रीकर, मुद्रांक व नोंदणी फी, राज्य उत्पादन शुल्क, विजेवरील कर व शुल्क, उत्पन्न व खर्च यावरील इतर कर, वाहनावरील कर, विक्रेय वस्तू व सेवा यावरील इतर कर व शुल्क, माल व उतारुंवरील कर आणि जमीन महसूल इत्यादी मार्गाने मिळणारा महसूल म्हणजे राज्याचा स्वतःचा कर महसूल होय.

**२. राज्याचा केंद्रीय करातील हिस्सा**:- केंद्र सरकारच्या निगम कराव्यतिरिक्त इतर उत्पन्नावरील कर, निगम कर, संपत्ती कर, जकात, केंद्रीय उत्पादन शुल्क आणि सेवा कर महसूलातील काही हिस्सा वित्त आयोगाने निश्चित केलेल्या निकषांच्या आधारे राज्यांना देण्यात येतो. यास राज्याचा केंद्रीय करातील हिस्सा असे संबोधतात. परंतु दहाव्या वित्त आयोगापर्यंत मात्र केवळ आयकर आणि केंद्रीय उत्पादन शुल्क या दोन प्रमुख करांच्या महसूलातील हिस्साच राज्यांना देण्यात येत असे.

**३. कराव्यतिरिक्त किंवा करेतर महसूल** :- राज्य शासनाला मिळणाऱ्या व्याजाच्या जमा रकमा, नफा व लाभांश, केंद्रीय अनुदाने आणि कराव्यतिरिक्त मिळणारा इतर महसूल (उदा. शुल्क,दंड) याद्वारे मिळणारी प्राप्ती म्हणजे राज्यांचा करेतर महसूल होय.

**प्रशासनाचे स्वरुप -**

आधुनिक काळातील जमीन आणि जमीन महसूल, व शेती संबंधीच्या इतर काही कराची आकारणी करण्याचे, व त्यातून आलेले उत्पन्न, जंगले, राष्ट्रीय उद्याने आणि वन्यपशु संरक्षण इत्यादी विषयांचा समावेश होतो. या खात्याच्या राजकीय प्रमुखास महसूल मंत्री असे म्हणतात. त्याच्या हाताखाली इतर प्रशासकीय नोकर वर्ग असतो.

जमीन महसुलामध्ये खालील बाबींचा समावेश होतो. १) जमीन व त्यावरील हक्क २) जमीन मुदत, जमीन मालक व कुळ यांच्यातील संबंध, जमीनीचे हस्तांतरण, तसेच सार्वजनिक उपयोगाकरिता जमीनीचा ताबा व त्याबद्दलचा मोबदला, शेतीवरील कर्ज, मासेमारीचे हक्क, जमीन महसूल, लँड रेकॉर्डस्, लॅण्ड सर्व्हे, कुळकायदा व त्यासंबंधीचे प्रकरण, वनखात्याने उपलब्ध करुन दिलेल्या जमीनीचे वाटप, शेतमजूरांचे पुर्नवसन, भूमीहीनांना जमीन, भटक्या जमातींचे पुनर्वसन, स्टँप डयूटी, दुष्काळ ग्रस्तांना मदत नैसर्गिक आपत्तींचे बळी बनलेल्यांना मदत इत्यादी.

महसूल खात्याचा प्रमुख महसूल मंत्री असतो व सचिव(सेक्रेटरी) प्रशासकीय प्रमुख असतो. या सचीवाच्या हाताखाली चार डेप्यूटी सेक्रेटरी व अन्य अव्वर सचिव/सेक्रेटरी असतात. त्याचप्रमाणे दोन लॅण्ड रिफॉर्मर इंप्लीमेंटेशन अधिकारी, टाऊन प्लॅनिंग विभागातील तीन अधिकारी असतात.

महाराष्ट्राचे महसूल प्रशासनाच्या सोईच्या दृष्टीने चार विभाग केले होते. १) मुंबई २) पुणे ३) नागपूर ४) औरंगाबाद. सध्या महाराष्ट्रात आठ महसूल विभाग आहेत. या विभागांचे विभाजन जिल्हयात आणि तालुक्यात करुन प्रशासकीय कार्य सोईचे केले आहे. विभागीय आयुक्तांचे आपल्या विभागावर प्रशासकीय नियंत्रण असते. जमीन महसूल स्थानिक सरकार, पोलीस प्रशासन, नियोजन व विकास इत्यादींवर आयुक्तांचा अधिकार चालतो. या आयुक्तांना जिल्हाधिकारीचे ऑफीस, तहसिलदार-ऑफीस व नगरपालीका इत्यादींच्या कार्यालयाची तपासणी करावी लागते. प्रशासनातील कार्यक्षमता वाढवण्यासाठी व इतर खात्यांच्या कार्यालयांत समन्वय निर्माण करण्याच्या दृष्टीने भेटी द्याव्या लागतात. त्यांच्या या प्रशासकीय कार्यात उप-आयुक्तांची त्यांना मदत होते.

**तक्ता क्र. १४. विद्यमान महसून विभाग व महसूल अधिकार-**

| | |
|---|---|
| जिल्हाधिकारी/ कलेक्टर | जिल्हयाच्या महसूल प्रशासनाचा प्रमुख |
| तहसीलदार | तालुक्याच्या महसूल प्रशासनाचा प्रमुख |
| सर्कल इन्स्पेक्टर (३-४) | तालुक्यांच्या गटांचा प्रशासकीय प्रमुख |
| तलाठी (७-८) | ग्राम पंचायतींच्या प्रशासनाचा प्रमुख |

महसूल खात्याच्या प्रशासनाच्या दृष्टीने जे विभाग पाडण्यात आले आहेत, त्यामध्ये जिल्हयाचा जिल्हाधिकारी (कलेक्टर) हा महसूल प्रशासनाचा प्रमुख असतो. जिल्हयातील जमीनींचा महसूल गोळा करणे व त्याच्यावर नियंत्रण ठेवणे इत्यादी कामे जिल्हाधिकाऱ्यास करावी लागतात. त्याचप्रमाणे राज्य व केंद्र सरकारच्या कायद्यांनी त्याला प्रशासन योग्यरितीने चालवण्यासाठी अधिकार मिळालेले असतात. तसेच प्रत्येक जिल्हयाची विभागणी २ ते ३ सबडिव्हीजन मध्ये केली जाते. या सबडिव्हीजनची विभागणी तालुक्यामध्ये केली जाते. तालुक्याच्या महसूल प्रशासनाचा प्रमुख तहसीलदार असतो. प्रत्येक तहसिलदाराच्या हाताखाली ३ ते ४ सर्कल इन्स्पेक्टर्स असतात त्यातील प्रत्येक सर्कल इन्स्पेक्टरच्या हाताखाली ६ ते ७ तलाठी असतात. अशा रीतीने हे सर्व प्रशासकीय अधिकारी महसूल खात्याचे काम पहात असतात.राज्यातील इतर खात्यांच्या प्रशासनात या महसूल खात्यास महत्त्वाचे स्थान आहे. राज्याची आर्थिक स्थिती महसूल गोळा करुन बळकट करण्याचे कार्य

हे खाते करीत असते त्यादृष्टीने महसूल खात्यातील अधिकारी कार्यक्षम असल्याचे दिसून येते.

**जमीन महसूलाची आकारणी व जमाबंदी -**

जमीनीचा प्रकार, तिचे स्थान, पाणी व इतर फायदे लक्षात घेऊन जमीनीची सापेक्ष किंमत किंवा मूल्य भू-मापन अभिलेखात दर्शविण्यात येते. जमीनीच्या वर्गवारीच्या मंजूर योजनेत समाविष्ट केलेल्या जमीनीच्या प्रत्येक प्रकाराचे (उदा. वरकस, कोरडवाहू, भाताची जमीन किंवा बागायत जमीन) सापेक्ष मूल्य आकारले जाते. राज्य शासनाने ठरावीक मुदतीसाठी जमाबंदी अंमलात राहील असे जाहीर केलेले असते. [२६]

“जमीन” या संज्ञेत, जमीनीपासून मिळावयाच्या फायद्याचा आणि भूमीस संलग्न असलेल्या वस्तूंचा किंवा भूमीस संलग्न असलेल्या वस्तूंशी कायम जोडलेल्या कोणत्याही वस्तूंचा किंवा त्यावरील आकार, यांचा समावेश होतो. [२७]

“जमीन महसूल” या संज्ञेचा अर्थ, कोणत्याही व्यक्तीने धारण केलेल्या किंवा तिच्याकडे असलेल्या जमीनीबद्दल, राज्य शासनाने त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कायद्याच्या तरतुदींअन्वये अधिकृत केलेला कोणताही उपकर किंवा पट्टी असा होतो आणि त्यात कोणत्याही जमीनीबद्दल इनामदाराकडून देण्याजोगे पट्टामूल्य (प्रिमियम), खंड, पट्टयाची रक्कम, कोणत्याही नियमाप्रमाणे दयावयाची रक्कम यांचा समावेश होतो.[२८]

महाराष्ट्र राज्याच्या विभागांमध्ये मुंबई शहर धरुन एका किंवा अनेक जिल्हयांचा समावेश करण्यात आला आहे, आणि प्रत्येक जिल्हयामध्ये एका किंवा अनेक उप-विभागांचा समावेश होतो आणि प्रत्येक उप-विभागामध्ये एका किंवा अनेक तालुक्यांचा समावेश केला जातो आणि प्रत्येक तालुक्यामध्ये संबंधित गावांचा समावेश केला जातो.

महसूल देण्यात कोणतीही कसूर केल्यामुळे त्यावेळी अंमलात असलेल्या कायद्यान्वये जमीन महसूलाची थकबाकी वसूल करण्यासाठी लेखी नोटीस बजावणे, व्यक्तीची जंगम किंवा स्थावर मालमत्ता जप्त करुन, व्यक्तीला अटक करुन, किंवा कैदेत ठेवून वसूली केली जाते.जमीन महसूलाची रक्कम स्विकारणारा प्रत्येक महसूल अधिकारी आणि प्रत्येक तलाठी अशी रक्कम स्विकारतेवेळी त्याबद्दल लेखी पावती देतात. राज्य शासनास, पिके न आल्यामुळे, पुरामुळे किंवा इतर कोणत्याही नैसर्गिक आपत्तीमुळे किंवा कोणत्याही अन्य

२६. महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ः शासकीय मुद्रणालय आणि ग्रंथागार, नागपूर २०००, पान ५१.
२७. महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ः शासकीय मुद्रणालय आणि ग्रंथागार, नागपूर २०००, पान ३.
२८. महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ः शासकीय मुद्रणालय आणि ग्रंथागार, नागपूर २०००, पान ६.

कारणामुळे, कोणत्याही भागात, कोणत्याही वर्षी, या बाबतीत केलेल्या नियमानुसार किंवा विशेष आदेशानुसार जमीन महसूल संपूर्णतः किंवा अंशतः कमी करता येतो, तो तहकूब करता येतो किंवा त्यापासून सूट देता येते. [२९]

जमाबंदी तीस वर्षे अंमलात राहील आणि अशी मुदत संपल्यानंतर, नव्या जमाबंदीची मुदत सुरु होईपर्यंत अंमलात असेल. ज्या जमिनीच्या संबंधात जमाबंदी करण्याबद्दल निर्देश देण्यात आलेला असतो आणि ज्या जमिनींना महसूल देण्याबाबत संपूर्णतः सूट देण्यात आलेली नाही अशा सर्व जमिनीची राज्य शासनाकडून जमाबंदी करण्यात येते. अशा नियमांनुसार गट पाडून, आणि प्रत्येक गटासाठी प्रमाण दर ठरवून ते निर्धारित करण्यात येतात.

जमीन महसुलाची आकारणी जमाबंदी अधिकारी त्याच्या वर्गीकरणाच्या किंमतीवरुन ठरवतात. कोणत्याही जमिनीत, ती धारण करणाऱ्याने, किंवा त्याच्या खर्चाने कोणत्याही सुधारणा केलेल्या असतील तर वरील सुधारणांमुळे अशा जमिनींच्या पिकांच्या सरासरी उत्पन्नातील वाढ जमिनीची फेरआकारणी ठरविताना विचारात घेण्यात येत नाही. अधिकारी जमाबंदी करावयाच्या जमिनींची काही गटांमध्ये विभागणी करतात. जमाबंदी करण्यांसाठी जमिनीच्या पिकांचे सरासरी उत्पन्न निश्चित केले जाते. प्रत्येक गटांतील जमिनीच्या प्रत्येक वर्गासाठी प्रमाण दर ठरविले जातात. [३०]

प्रत्येक गावात एक मराठी भाषेत नोटीसही प्रसिद्ध करण्यात येते व अशा नोटिसमध्ये संबंधीत गावातील जमिनींच्या प्रत्येक वर्गासाठी चालू असलेला प्रमाण दर आणि जमाबंदी अधिकाऱ्याने त्यात सुचविलेली वाढ किंवा घट नमूद करण्यात येते. तसेच या नोटिशीत, कोणत्याही व्यक्तीस अशा नोटिशीच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या आत जमाबंदीच्या योजनेसंबंधी असलेल्या त्याच्या हरकती जिल्हाधिकाऱ्यांकडे लेखी सादर करता येतात, असे नमूद करण्यात येईल. जमाबंदीनुसार असलेला जमीन महसूल राज्य शासन निर्देश देईल त्या दिनांकापासून बसविण्यात येतो. ज्यावर्षी प्राथमिक जमाबंदी किंवा सुधारित जमाबंदी सुरु करण्यात येईल त्यावेळी ज्या जमिनीवरील नवीन आकारणी ही पूर्वीच्या आकारणीपेक्षा अधिक असेल अशा सर्व जमिनींवरील जुन्या व नवीन आकारणीत जो फरक असेल

२९. महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ःशासकीय मुद्रणालय आणि ग्रंथागार, नागपूर २०००,पान ५२-५३.
३०. महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ःशासकीय मुद्रणालय आणि ग्रंथागार, नागपूर २०००,पान ५४-५६.

त्याची सूट देण्यात येईल आणि फेरतपासणी केलेली आकारणी ही लगतच्या पुढील वर्षापासून बसविण्यात येईल. [३१]

राज्य शासनाच्या आदेशांस अधीन राहून, भू-मापन, जमाबंदी, अधिकार-अभिलेख यासंबंधीच्या सर्व बाबींची दखल घेणे हे भू-मापन अधिकाऱ्यांच्या अधिकारात असते आणि ते या संहितेअन्वये किंवा त्या त्या वेळी अमंलात असलेल्या कायद्यान्वये तरतूद करण्यात येईल अशा सर्व अधिकारांचा वापर करतात व अशी सर्व कर्तव्ये पार पाडतात. मंडलाचा प्रभारी असलेला मंडल अधिकारी व मंडल निरीक्षक त्याच्या मंडलामधील तलाठयाच्या बाबतीत वेळोवेळी स्पष्ट करण्यात आलेल्या अशा अधिकारांचा वापर करतात व अशी कर्तव्ये व कामे पार पाडतात. तलाठी जमीन महसूल व जमीन महसूलाची थकबाकी म्हणून वसूल करण्या योग्य सर्व रकमा गोळा करण्यासाठी व अधिकार अभिलेख ठेवण्यासाठी जबाबदार असतात व ते त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कायद्यान्वये किंवा राज्य शासनाच्या आदेशान्वये तरतूद केलेली सर्व कर्तव्ये व कामे पार पाडतात. [३२]

राज्यशासन, प्रत्येक विभागाकरिता एक आयुक्त निवडते, आणि आयुक्तास सहाय्य करण्यासाठी एक अपर आयुक्त आणि योग्य वाटतील तितके सहाय्यक आयुक्त नियुक्त करते. राज्य शासन प्रत्येक जिल्हयाकरिता (मुंबई शहर धरुन) एक जिल्हाधिकारी नियुक्त करते व त्याच्याकडे त्या जिल्हयाच्या महसूली कारभाराचे काम असते आणि प्रत्येक तालुक्याकरिता एक तहसीलदार नियुक्त करुन आणि तो तालुक्याच्या स्थानिक महसुली कारभाराचे काम सोपवण्यात आलेला मुख्य अधिकारी असते. राज्य शासनाला, प्रत्येक जिल्हयात (मुंबई शहर धरुन) एक किंवा अधिक अपर जिल्हाधिकारी आणि त्यास योग्य वाटतील इतके सहाय्यक जिल्हाधिकारी आणि उप-जिल्हाधिकारी, तालुक्यात एक किंवा अधिक नायब-तहसीलदार आणि एक किंवा अधिक अपर तहसीलदार किंवा नायब तहसीलदार आणि महसूल अधिकाऱ्यांना सहाय्य करण्यासाठी त्यास योग्य वाटतील अशा इतर व्यक्तीची नियुक्ती करता येते.

कोणत्याही जमिन मालकाकडून (भूमिधारक) जमीन महसूल म्हणून येणे असलेली थकबाकी ही त्या धारण केलेल्या जमीनीवरील आणि तिच्या प्रत्येक भागावरील सर्वश्रेष्ठ भार असेल आणि ती देण्यात कसूर केल्यास, दुमाला म्हणून धारण केलेली जमीन धारकाच्या त्या

---

३१. महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ः शासकीय मुद्रणालय आणि ग्रंथागार, नागपूर २००० पान ७७
३२. महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ः शासकीय मुद्रणालय आणि ग्रंथागार, नागपूर २०००, पान ११.

जमीनीवरील सर्व झाडे, पिके, इमारती आणि जमीनीस जोडलेल्या सर्व वस्तू किंवा जमिनीस जोडलेल्या कोणत्याही गोष्टीस कायम बांधलेल्या वस्तू त्यांवरील सर्व हक्कांसह जप्त होण्यास पात्र असतात., आणि त्यानंतर जिल्हाधिकाऱ्यास पोट-कलमे (२) आणि (३) च्या तरतुदींना अधीन राहून, भोगवटयाची किंवा दुमाला जमीनीची विक्री करुन, थकबाकी म्हणून असलेल्या सर्व रकमा वसूल करता येतात, किंवा याबाबत केलेल्या नियमान्वये अशा भोगवटयाचा किंवा दुमाला जमिनीचा विनियोग करता येतो आणि अशा भोगवटयाचा किंवा दुमाला जमिनीचा विनियोग (विक्री करुन करण्यात आलेला असो,) करण्यात येईल तेव्हा ती जमीन जिल्हाधिकारी शासनाखेरीज इतर कोणत्याही व्यक्तीच्या नावे केलेले सर्व धारणाधिकार, हक्क, भार आणि समन्याय भाग यापासून मुक्त झाली आहे, असे समजण्यात येते. [३३]

प्रत्येक महसुली मोजणीवरील नियंत्रण हे राज्य शासनाकडे असते आणि राज्य शासन त्याचा वापर करते. भू-मापन अधिकाऱ्याने, भू-मापन ज्या जमिनीस लागू आहे अशा जमिनींच्या मोजणीच्या किंवा वर्गीकरणाच्या कामात, मदत करणाऱ्या व्यक्ती देऊन सहाय्य देण्यासाठी जमीन धारण करणाऱ्या सर्व व्यक्तींना, हितसंबंध असणाऱ्या सर्व व्यक्तींना बोलविणे हे कायदेशीर असेल, आणि भू-मापन कार्याशी आनुषंगिक अशा इतर कारणांसाठी पैसे देऊन मजूर कामावर लावणे आवश्यक असेल तेव्हा महसूल मागणी गोळा करण्यासाठी त्याबाबतच्या सर्व खर्चाची आकारणी जमिनीची मोजणी करण्यावर झालेल्या सर्व आकस्मित खर्चाबरोबर करणे कायदेशीर असेल. [३४]

**नगरपालिकेची कर आकारणी** -कर आकारणी हे नगरपालिकेच्या कामांपैकी एक काम आहे तसेच तो तिच्या उत्पन्नाचा एक मार्गही आहे. राज्यशासन सर्वसाधारण किंवा विशेष आदेशांद्वारे घालून देईल अशा प्रकारचे सक्तीचे किंवा ऐच्छिक कर बसविणे हे नगरपालिकेचे काम असते.

सर्वसाधारणपणे कर आकारणी आणि कर वसूली ही कामे राज्य शासनाची असतात, त्यानुसार काही प्रकारचे कर आकारण्याचे काम नगरपालिकांकडे देण्यात आले आहे. अशाच प्रकारे नगरपालिका जकात आकारणी, बसवणी व वसूली ही कामे करते. वस्तुतः हे काम

---

३३. महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ः शासकीय मुद्रणालय आणि ग्रंथागार, नागपूर २०००, पान ७
३४. महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ः शासकीय मुद्रणालय आणि ग्रंथागार, नागपूर २०००, पान ४८.

राज्य शासनाचे असूनही नगर पालिका केवळ दुय्यम कराधान या स्वरुपाचे हे काम पार पाडीत असते.

सक्तीचे कर लागू करणे –

१. राज्य शासन याबाबत जे कोणतेही सर्वसाधारण अथवा विशेष आदेश देईल त्यास अधीन राहून नगरपालिका या अधिनियमाच्या प्रयोजनाकरिता खालील यादीत देण्यात आलेले कर लागू करते -

अ. नगरपालिका क्षेत्रातील जमिनी किंवा इमारती यांवर अथवा दोहोंवर, त्यांच्या करयोग्य मूल्यावर आधारलेला मालमत्तेवरील एकत्रित कर.

ब. नगरपालिका क्षेत्रातील जमिनी उपभोग, वापर किंवा विक्री यासाठी त्या नगरपालिका क्षेत्राच्या हद्दीमध्ये होणाऱ्या मालाच्या प्रवेशावर लावयाचा उपकर.

क. चित्रपट, नाटयगृहे, सर्कशी, आनंदबाजार व इतर प्रयोग व प्रदर्शने यांवरील कर

ड. वृत्तपत्रात प्रकाशित करण्यात आलेल्या जाहिरातींव्यतिरिक्त इतर जाहिरातींवरील कर.

परंतु, निरनिराळया वर्गाच्या नगरपालिका क्षेत्रात उपरोक्त कर ज्या कमाल व किमान दराने बसविण्यात येतील ते दर आणि वरील कर बसविणे, त्यांची आकारणी, ते गोळा करणे व त्यांपासून सूट या संबंधातील इतर गोष्टी या नियमांद्वारे निश्चित करण्यात येतात त्याप्रमाणे असतात. मालमत्तेवरील एकत्रित कर क्रमशः वाढत्या प्रमाणात बसवता येईल.

२. मालमत्तेवरील एकत्रित करात पुढील गोष्टी अंतर्भूत असतील – सर्वसाधारण कर, सर्वसाधारण पाणीपट्टी, दिवाबत्ती कर, सर्वसाधारण स्वच्छताविषयक कर, विशेष शौचकूप कर, अग्निशमन कर, पर्यावरण कर, जकात कराची आकारणी करणे.

कराचा कमाल व किमान दर व त्याची आकारणी व वसुली यांचा थेट परिणाम नगरपरिषदांच्या निधीवर होणे अपरिहार्य असते. तसेच करदात्यांनाही कमाल व किमान दरांच्या मधल्या दराने कर द्यावा लागत असल्यामुळे त्याच्यावरही त्या गोष्टीचा परिणाम होतच असतो. राज्य शासन ठरवून देईल त्या कमाल व किमान दरांना विचारात घेऊन आणि जनहित व स्वहित विचारात घेऊनच कराची आकारणी करावी लागते.

**नगरपालिकेस आकारता येतील असे इतर कर-** पुढीलपैकी कोणताही कर बसविता येईल.

अ) स्वार होण्यासाठी, ओढण्यासाठी किंवा ओझे वाहण्यासाठी वापरण्यात येणारी व नगरपालिका क्षेत्रामध्ये उपयोग करण्यासाठी ठेवलेली सर्व वाहने, नावा किंवा जनावरे यांवरील कर, मग ती प्रत्यक्षरीत्या अशा क्षेत्रात ठेवण्यात येत असोत किंवा बाहेर ठेवण्यात येत असतो.

ब) नगरपालिका क्षेत्रामध्ये प्रवेश करणाऱ्या करपात्र नसणाऱ्या वाहने व जनावरांवरील पथकर.

क) नगरपालिका क्षेत्रामध्ये ठेवलेल्या कुत्र्यांवरील कर, ड) विशेष स्वच्छता कर, इ) जलनिःस्सारण कर, फ) पाण्यावरील विशेष पाणीपट्टी, ग) यात्रेकरुंवरील कर, ह) विशेष शिक्षण कर.

नगरपालिकेस विशेष सभेत संमत केलेल्या ठरावाद्वारे असा कर ज्या रकमेने किंवा ज्या दराने बसविता येईल ती रक्कम किंवा तो दर वाढविण्याचा किंवा कमी करण्याचा निर्णय घेता येईल. राज्य शासनाने पूर्वीच मंजूर केलेले उपविधी त्या मर्यादेपर्यंत योग्यरीत्या दुरुस्त करण्यात आले आहेत असे समजण्यात येईल.

जेव्हा नगरपालिकेने संमत केलेल्या ठरावाद्वारे, कोणताही कर ज्या रकमेने किंवा ज्या दराने बसविता येईल ती रक्कम किंवा तो दर वाढविण्याचा किंवा कमी करण्याचा निर्णय घेतला असेल तेव्हा, अशा नगरपालिकेने नगरपालिका क्षेत्रामध्ये असा ठराव व त्यासोबत एक नोटिस प्रसिद्ध केली पाहिजे. अशा नोटिशीत, असा कर ज्या रकमेने किंवा ज्या दराने बसविण्यात येत असेल ती रक्कम किंवा तो दर ज्या तारखेपासून वाढविण्यात किंवा कमी करण्यात येईल ती तारीख स्पष्ट केली पाहिजे. नगरामध्ये विक्रिसाठी, वापरासाठी आणल्या जाणाऱ्या वस्तूंवर नगरपालिका जकात आकारणी करते. त्याचे कमाल व किमान दर ठरविते.

१) अधिनियम व केलेले नियम व उपविधी यांच्या उपबंधास अधीन राहून, अनुसूची एक मध्ये स्पष्ट केलेल्या विविध मालाच्या बाबतीत प्रत्येक नगरपालिकेस जकात बसविता येते.

२) कोणत्याही मालावर नगरपालिकेकडून ज्या दराने जकात बसविली जाईल तो दर त्या मालासाठी स्पष्ट केलेल्या कमाल दराहून अधिक नसते. 'क' वर्ग नगरपालिकेस जकात विभागाच्या यथोचित व कार्यक्षम प्रशासनासाठी जो जबाबदार राहील अशा, जकात

अधीक्षक म्हणून संबोधण्यात येणाऱ्या एका अधिकाऱ्याची नेमणूक करता येते. त्याच्या कार्यालयास मध्यवर्ती जकात कार्यालय असे संबोधण्यात येते. जकात अधीक्षकास त्याच्या शक्तीचा वापर किंवा कर्तव्याचे पालन करण्याच्या कामी मदत करण्यासाठी एका किंवा अधिक जकात उपअधीक्षकांची व सहायक अधीक्षकाची, निरीक्षकाची व नगरपालिकेस आवश्यक वाटतील अशा इतर कर्मचाऱ्यांची नेमणूक नगरपालिकेस वेळोवेळी करता येते व एक किंवा अधिक शाखा जकात कार्यालये निर्माण करुन ती चालविता येतात.

जकात बसविण्याच्या, गोळा करण्याच्या प्रयोजनासाठी प्रत्येक नगरपालिका निश्चित केलेल्या जागी जकात नाक्याची स्थापना करते व त्यासाठी पुरेसा कर्मचारी वर्ग नेमते. त्याचप्रमाणे आयात वाहतूक वाटेत अडविण्यासाठी किंवा ती नजीकच्या जकात नाक्याकडे वळविण्यासाठी नगरपालिकेस आणखी जकात नाक्यांची स्थापना करता येते. जकात अधीक्षक व त्या वेळी बसवण्याजोग्या असलेल्या जकातीची कोष्टके, त्यामध्ये ज्या मालावर जकात बसविण्यात येईल तो माल व ज्या दराने ती बसविण्यात येईल ते दर स्पष्ट करुन, मराठीत छापून घेतले जातात व प्रत्येक जकात नाक्याजवळ ते ठळक जागी लावण्याची व्यवस्था करुन घेतलेली असते.

जकातीच्या आकारणीच्या व वसुलीच्या कार्यपद्धतीमध्ये काही गोष्टींचा समावेश होतो. जकात हद्दीमध्ये आयात केलेला कोणताही माल नगरपालिका क्षेत्रात खप, वापर किंवा विक्री करण्याच्या इराद्याने आणला असेल तर त्याबाबतीत, तपासणी केल्यानंतर मालाचे वर्णन, नग, परिणाम, वजनमाप किंवा मूल्य यांच्या अचूकपणाबद्दल खात्री पटल्यानंतर किंवा या नियमामध्ये तरतूद केल्याप्रमाणे रक्कम आकारली जाते व ती भरण्याची मागणी केली जाते, असा भरणा करण्यात आल्यानंतर जकात अधिकारी, भरणा पावती आयातदारास किंवा त्याच्या प्रतिनिधीस देतो, या पावतीमध्ये तारीख व दिल्याची वेळ असते. जकात हद्दीमध्ये आयात करतेवेळी एखाद्या व्यक्तीजवळ जकात अधिकाऱ्याने जकात भरण्याची मागणी केल्यानंतर ती भरण्यासाठी पैसे नसतील तर कोणतीही वस्तू किंवा मालाचा जो कोणताही भाग जकात अधिकाऱ्याचे मते मागणी पूर्ण करण्यासाठी पुरेशा किंमतीचा असेल, ती वस्तू किंवा मालाचा भाग त्याने जकात अधिकाऱ्याकडे अनामत ठेवला पाहिजे.

मालाची आवेष्टने किंवा पात्रे यांसह मालाचे वजन गृहित धरले जाते. मालाच्या एकूण वजनावर किंवा मापावर जकात आकारण्यात येईल. मालाच्या वजनावर जकात आकारावयाची असेल त्या बाबतीत मालाच्या दर १० किलोवर जकात आकारण्यात येईल.

जकातीचा हिशेब करताना पैसे अपूर्णांकात असतील तर त्याऐवजी पूर्ण पैसा मोजण्यात येईल. मालाचा संपूर्ण भार हा एकाच प्रकारच्या मालाचा असेल तो पुढीलपैकी कोणत्याही प्रकारचा असेल त्या बाबतीत आयात केलेल्या मालाचे वजन सामान्यपणे भाराच्या प्रत्येक प्रकाराच्यासमोर दर्शविण्यात आलेल्या वजनाइतके असल्याचे गृहीत धरण्यात येईल.

**तक्ता क्र.१५. जकातीच्या भाराचे प्रकार**

| | | |
|---|---|---|
| (i) | डोक्यावरील भार व सायकलीवरील भार | ३० किलोग्रॅम |
| (ii) | कावड भार | ५० किलोग्रॅम |
| (iii) | तट्टू, खेचर किंवा गाढव यांच्यावरील भार | ८० किलोग्रॅम |
| (iv) | बैलावरील भार | १०० किलोग्रॅम |
| (v) | रेडयावरील / म्हशीवरील भार | १२५ किलोग्रॅम |
| (vi) | उंटावरील भार | २७५ किलोग्रॅम |
| (vii) | एका प्राण्याने ओढलेल्या गाडीतील भार | ३०० किलोग्रॅम |
| (viii) | दोन प्राण्यांनी ओढलेल्या गाडीतील भार | ५०० किलोग्रॅम |

परंतु वर स्पष्ट केलेले प्रमाण समतुल्य वजन आयातदारास मान्य नसेल तर नाक्यावर सर्व पुडक्यांचे वजन केले जाण्याची मागणी करण्याचा अधिकार त्याला असेल. परंतु त्याला स्वतःच्या खर्चाने तो माल वजन करण्याच्या यंत्रापर्यंत किंवा काटयापर्यंत न्यावा लागेल व तेथून हलवावा लागेल. [३५] अशा प्रकारे जकात लागू केली जाते.

अशा प्रकारे प्राचीन काळापासून आधुनिक काळापर्यंत(१९५०पर्यंत)महसूल व्यवस्था अस्तित्वात असलेली दिसते. मध्ययुगीन काळातील महसूल व्यवस्थेमध्ये विशेष स्वरुपात आढळणाऱ्या इनामदारी पध्दतीचे अस्तित्व तपासून पाहण्यासाठी औंध संस्थान, कोकण प्रांतातील नागाव व वरसई या गावांचा सूक्ष्म अभ्यास केलेला आहे.

-------♦ ♦ ♦ ♦-------

३५. महाराष्ट्र नगरपरिषदः नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, व नियम, १९६५.

# प्रकरण ७

# सूक्ष्म अभ्यास

**i) औंध** (सध्याचा सातारा जिल्हा)

**ii) नागाव** (कोकण प्रांत)

**iii) वरसई** (कोकण प्रांत)

**iv) अर्थ व महसूलविषयक निवडक ऐतिहासिक पत्रे**

# सूक्ष्म अभ्यास

भारतीय इतिहासामधील निरनिराळया कालखंडातील महसूल व्यवस्थांचा अभ्यास केल्यानंतर असे स्पष्ट होते की, महसूल प्रशासन हे राज्यव्यवस्थेच्या दृष्टीने अत्यंत महत्वपूर्ण असते. राज्याला प्रशासन चालविण्यासाठी महसुलावर अवलंबून राहावे लागते. अनेक राजवटींमध्ये आणि अनेक सत्ताधीशांकडून महसूल व्यवस्थेला महत्व दिलेले दिसते. एखादया संस्थानामध्ये आणि छोटया गावांमध्ये असणारे महसूल व्यवस्थेचे स्वरुप समजून घेण्यासाठी औंघ, नागाव व वरसई यांचा सूक्ष्म अभ्यास केला आहे.

औंध संस्थान हे सातान्याच्या राज्यकर्त्यांनी निर्माण केलेले संस्थान आहे. छत्रपती श्री. राजाराम महाराज यांनी औंधचे परशुरात त्र्यंबक कुलकर्णी अर्थात पंतप्रतिनिधी यांच्याकडे हे संस्थान सुरुवातीच्या काळात सोपविलेले दिसते. त्यासंबंधीत अधिकार लेखी स्वरुपात दिलेले आढळतात. पुढील काळात छत्रपती श्री. शाहू महाराजांनी हा अधिकार चालू ठेवला. या संस्थानात काही छोटे कर आणि इनाम देण्याची पध्दत अस्तित्वात असलेली दिसते. नागाव आणि वरसई ही दोन्ही गावे कोकण प्रांतातील आहेत. सध्या रायगड जिल्हयात यांचा समावेश आहे. नागाव या गावामध्ये बागायतीचे क्षेत्र असल्याने आंग्रे काळात अनेक छोटे छोटे कर आकारुन धान्य, वस्तू, पैसा या सर्व स्वरुपात राज्यकर्त्यांनी उत्पन्न मिळविलेले दिसते. यातून राज्याचे उत्पन्न मिळविण्याचे साधन महसूल हेच असल्याचे आढळते. वरसई हे पेण तालुक्यातील छोटे गाव आहे. या गावाजवळ असणाऱ्या सांकसई आणि माणिकगड या किल्ल्यांमुळे या भागावर अनेक सत्ताधीशांची आक्रमणे झालेली दिसतात. या गावामध्येही आंग्रे आणि पेशवे यांच्या काळातील अनेक गावकऱ्यांना वरसई परिसरातील छोटी गावे इनाम दिलेली दिसतात. महसूलाचे ठरावीक मार्गच या परिसरात अस्तित्वात असल्याचे दिसते. महसूल प्रशासनाची साधने कोणकोणती असतात आणि महसूल प्रशासन त्यांची अंमलबजावणी कशी करते यासाठी या तीनही गावांचा सूक्ष्म अभ्यास केला आहे.

पुढील तक्त्यांमध्ये औध, नागाव, वरसई या तीनही गावांमध्ये सारख्याच घटकांवर आकारल्या जाणाऱ्या करांचे वर्णन करण्यात आले आहे.यामध्ये असे दिसते की, जमीन हा एकमेव घटक आहे की ज्यावर निवडक तीनही गावांमध्ये कर आकारणी केलेली दिसते. नागाव आणि औंधमध्ये बकऱ्या, मेंढयांवर आणि व्यवसायांवर कर आकारलेले दिसतात.

तसेच घरे आणि भात यावर नागाव आणि वरसईमध्ये कर आकारणी केलेली दिसते. म्हणजेच जमीन हा घटक तत्कालीन महसूल व्यवस्थेचा सर्व ठिकाणी कर आकारणीसाठी महत्वपूर्ण ठरणारा घटक असल्याचे या तक्त्यातून स्पष्ट होते.

**तक्ता क्र.१६. निवडक ३ गावांमधील निरनिराळ्या घटकांवरील कर-**

| घटक | नागाव | वरसई | औंध |
|---|---|---|---|
| **शेतीवर आधारीत उत्पादने** -भात | ✓ | ✓ | X |
| गहू | X | X | X |
| उडीद | X | X | X |
| मसाले | X | X | X |
| ताग | X | X | X |
| ताड, | X | X | X |
| सुपारी | X | X | X |
| पानवेल | X | X | X |
| फळे -नारळ | X | X | X |
| फणस | X | X | X |
| भाजीपाला | X | X | X |
| नारळाचे झाप | X | X | X |
| **इतर उत्पादने**- मीठ | X | X | X |
| गवत | X | X | X |
| बांबू | X | X | X |
| जमीन | ✓ | ✓ | ✓ |
| जंगल | X | X | X |
| तूप | X | X | X |
| **जनावरे**- मेंढी | ✓ | X | ✓ |
| गाय- म्हैस | X | X | X |
| **इतर** – कापड | X | X | X |
| मद्य | X | X | X |
| व्यवसाय | ✓ | X | ✓ |
| स्थावर मालमत्ता-घर | ✓ | ✓ | X |

पुढील तक्त्यामध्ये सुक्ष्म अभ्यासाकरीता निवडलेल्या ३ गावांमधील उत्पन्न देणारे घटक स्पष्ट करण्यात आले आहेत. यातील नागावमध्ये भात, उडीद, मसाले, ताग, ताड, नारळ, नारळाचे झाप, सुपारी, जमीन अशा अनेक घटकांमार्फत आंग्रेंना उत्पन्न मिळत असल्याचे दिसते. या तुलनेत इतर दोन गावांमध्ये इनामदारी असल्याने उत्पन्न देणारे घटक अतिशय मर्यादित असलेले दिसतात.

**तक्ता क्र.१७. निवडक ३ गावांमध्ये उत्पन्न देणारे निरनिराळे घटक-**

| **घटक** | **नागाव** | **वरसई** | **औंध** |
|---|---|---|---|
| **शेतीवर आधारीत उत्पादने** - भात | ✓ | ✓ | X |
| उडीद | ✓ | X | X |
| मसाले | ✓ | X | X |
| ताग | ✓ | X | X |
| ताड, | ✓ | X | X |
| सुपारी | ✓ | X | X |
| पानवेल | ✓ | X | X |
| फळे –नारळ | ✓ | X | X |
| फणस | ✓ | X | X |
| भाजीपाला | X | X | X |
| नारळाचे झाप | ✓ | X | X |
| **इतर उत्पादने**- मीठ | X | X | X |
| जमीन | ✓ | ✓ | ✓ |
| जंगल | X | X | X |
| तूप | ✓ | X | X |
| **जनावरे**- मेंढी | ✓ | X | ✓ |
| गाय- म्हैस | ✓ | X | X |
| व्यवसाय | ✓ | X | ✓ |
| स्थावर मालमत्ता-घर | ✓ | ✓ | X |

पुढील तक्ता क्र.१८मध्ये सुक्ष्म अभ्यासाकरीता निवडलेल्या ३ गावांमधील जमीन महसूलाचे दर स्पष्ट करण्यात आले आहेत. यामध्ये नागावमध्ये जमीन महसूल हा भाताच्या स्वरुपात आकारला जात असल्याचे दिसते तर औंधमध्ये जमीन महसूल पैशाच्या रुपात घेतला जात असलेला दिसतो. वरसई येथील जमीन महसूला विषयीची माहिती उपलब्ध झालेली नाही.

**तक्ता क्र.१८. निवडक ३ गावांमधील जमीन महसूलाचे दर-**

| जमीनीची प्रत | नागाव | वरसई | औंध |
|---|---|---|---|
| १) अव्वल/उत्तम प्रत | १२ मण (भात) | x | दर एकरी- १८ रु. १० आणे १२ पैसे |
| २) दूम/दूय्यम प्रत | १० मण | x | मिश्र-९ रु.५ आणे १२ पैसे पासून |
| ३) तिसरी प्रत- | ८ मण | x | १३ रु. १ आणे २ पैसे पर्यंत |
| ४) चौथी प्रत | ८ ते ५ मण | x | x |

पुढील तक्ता क्र.१९.मध्ये सुक्ष्म अभ्यासाकरीता निवडलेल्या ३ गावांमध्ये वस्तू रुपात काही करांची आकारणी केलेली आढळते. यामध्ये नागाव या गावामध्ये भात, नारळ, नारळाचे झाप, मेंढया, कोंबडया, सुपारी या अनेक वस्तूच्या रुपात करांची आकारणी केलेली दिसते. परंतू वरसई आणि औंध या गावांमध्ये मात्र अगदीच १-२ वस्तूंच्या स्वरुपात कर आकारणी केली गेलेली दिसते.

**तक्ता क्र.१९. निवडक ३ गावांमधील वस्तू रुपात घेतले जाणारे कर -**

| घटक | नागाव | वरसई | औंध |
|---|---|---|---|
| भात | ✓ | ✓ | x |
| नारळ | ✓ | x | x |
| नारळाचे झाप | ✓ | x | x |
| मेंढी | ✓ | x | ✓ |
| कोंबडया | ✓ | x | x |
| सुपारी | ✓ | x | x |

## i) औंध (सध्याचा सातारा जिल्हा)

**पंत प्रतिनिधी घराण्याचा इतिहास -**

प्रतिनिधी घराण्याचे मूळ पुरुष परशुराम त्र्यंबक यांनी शककर्ते श्री शिवाजी महाराज यांच्या कारकिर्दीची शेवटची निदान ४-५ वर्षे तरी प्रत्यक्ष पाहिली होती. त्याचप्रमाणे संभाजी महाराजांच्या कारकिर्दीतील धामधुमीच्या काळात त्यांनी रामचंद्रपंत अमात्य यांच्या हाताखाली काम केले होते. राजाराम महाराजांच्या वेळी पंतांनी साधारण कारकुनापासून समशेर बहादूर बनण्याइतपत चांगले काम पाहिले. प्रतिनिधी पदापर्यंत ते आपल्या कर्तबगारीने पोहोचले. राजाराम महाराजांच्या काळात त्यांनी सैन्याची, मुत्सद्यांची (सरकारी नोकरीसाठी) नेमणूक करताना जहागिरी वंशपरंपरेने तोडुन द्यावयाची नाही या तत्त्वाला महत्व दिले. त्यांनी कोणालाही जहागिरींच्या सनदा दिल्या नाहीत. पण महाराष्ट्र आपल्या अंमलाखाली आणण्याचे राजाराम महाराजांचे सततचे प्रयत्न होते. त्यासाठी राजाराम महाराजांनी जमेदार, मोठे लोक यांना आपल्या बाजूने करुन घेण्याचा सपाटा लावला. या सर्व खटाटोपाकरिता ते तंजावरकडे वास्तव्यास होते. अर्थात स्वराज्यापैकी निदान काही प्रांत तरी आपल्या ताब्यात ठेवण्यासाठी त्यांना देशमुख, देशपांडे देशचोगले, खोत, वगैरे लोकांचे पूर्वीपासून चालत आलेले अधिकार पुन्हा चालू दिले. त्यासाठी आलेली जमीनही, त्यांच्या ताब्यात दिली. यामुळे ते लोक स्वराज्यात राहीले. स्वराज्याचे राखण करताना ते सर्व राजारामाच्या ताब्यात द्यायला विसरले नाहीत.

शिवछत्रपतीच्या कारकिर्दीतील शेवटची ४-५ वर्षे पाहिलेले त्यांचे गुरु रामचंद्रपंत आणि त्यांचे शिष्य परशुराम त्र्यंबक हे शहाणे दूरदर्शी, कर्तबगार होते. परशुराम त्र्यंबक व त्याचे चिरंजीव श्रीनिवास परशुराम प्रतिनिधींच्या कारकिर्दीचा अभ्यास म्हणजे शंभर वर्षाचा अभ्यास.

इ.स. १६६० च्या सुमारास एका गावात एका गरीब कुलकर्ण्यांच्या घरी परशुराम त्र्यंबक कुलकर्णी यांचा जन्म झाला. त्यांना म्हणजे वेदपठण, मोडी उत्तम लिहिता वाचता येणे, जमाखर्च-हिशोब येणे हे सर्व येते होते. त्याबरोबरच काळाची गरज म्हणून तेव्हा गावात तालीममध्ये १०-१२ ते २५ वर्षाच्या मुलांना तालीम देऊन आपला देह कार्यक्षम बनविण्यास

शिकवले जात असे. भरपूर दुधदुभते असल्याने मुले सुदृढ बनत. हे सर्व परशुरामपंतास ही लागू होते. त्यांना उर्दु, मुसलमानी या भाषा येत. त्याबरोबरच ते संस्कृतमध्ये काव्यही करत असत.

राजाराम महाराज जिंजीत असताना महाराष्ट्रामधील अनेक सरदारांनी जिवापाड मेहनतीचे कार्य केले होते. त्या काळात परशुराम पंतांचे शौर्य महत्वाचे ठरले. प्रत्येक किल्ला लढवायचा व बादशाही सामर्थ्य मोडून काढण्याची कामगिरी त्यांनी केली होती. बादशाही मुलूखात लुटालूट करुन अगर बादशाही गोटात जाणारे धान्य व रसद लुटून आपली व सैन्याची पोटापाण्याची तरतूद करावी लागतच असे. [१] याशिवाय धान्याचा पुरवठा करावा लागे. प्रतिनिधींच्या सनदेत “धान्याचा पुरवठा करण्याची तुम्ही शर्थ केली म्हणून तूम्हास प्रतिनिधीपदी सनदी करुन दिले आहे” असे शब्द आहेत.

शाहू महाराज दक्षिणेत येईपर्यंत आपसात फूट पडू न देण्याचे कार्य परशुरामपंतांनी केले. शाहू महाराज अटकेत असताना ताराबाईला शिवाजी (धाकटे) याला गादीवर बसवायचे होते. पण तो थोडा वेडसर असल्याने रामचंद्रपंतानी शाहू व शिवाजी दोघांचे एकत्र मौजीबंध करु असे म्हटल्याचे ताराबाईला पटले नाही. शिवाजींचे राज्य संभाजी महाराजांनी घालविले. नंतर मिळवलेले राज्य राजारामाने मिळवले. त्यामुळे त्यावर शाहूचा अधिकार नाही तर धाकटया शिवाजीचा आहे, असे ताराबाईला वाटत होते.

यावेळेस परशुराम पंतांनी रामचंद्रपंतास म्हणजे गुरुस एक सल्ला दिला की, ‘धाकटे शिवाजी यांची मुंज होऊन ते मंचकारोहण होऊ देत’ तसेच झाले. यावेळेपासून रामचंद्रपंतांचे महत्त्व कमी होऊन परशुरामपंतांचे महत्त्व वाढत गेले.

त्यानंतर शाहूबरोबरच्या लढाईत ही ताराबाईचा पक्ष परशुरामाने सोडला नाही. परशूरामपंत महाराष्ट्र धर्म टिकविण्यासाठी साताराच्या किल्ल्यावर ताराबाईच्या पक्षात राहिले. परशुराम पंतांनी ताराबाई आणि शाहू महाराज यांच्या लढयात ‘तुरुंगात राहून हातापायांना बेडया असतान ही त्याच्या संबंधी निष्ठा दाखविली.’

पुढे इ.स. १८१० मध्ये कोल्हापूरकडील प्रांत घेऊन पावसाळयात शाहू महाराज सातार्‍यास आले. ताराबाई साहेबांनी परशुरामपंतांना त्यानंतर कैदेतून मूक्त केले. त्यानंतर

१. सातारच्या प्रतिनिधि घराण्याचा इतिहास, ग्रंथांक २ - रा अनंत नारायण भागवत व रा वामन परशुराम मेंहेदळे, औंध स्टेट प्रेस, परिशिष्ठ १, पान ८५.

शाहू महाराजांनी परशुरामपंतांना आपल्या बाजूला वश करावे या हेतूने चिटणीसांना परळी किल्ल्यावर पाठविले. तेव्हा काही अटी पुढे करुन परशुरामपंत उघडपणे प्रतिनिधीपदाची वंशपरंपरेची वतनी सनद घेऊन शाहू महाराजांचे प्रतिनिधी झाले. त्यानंतरही त्यांनी शाहू व ताराबाई यात समेट करण्याचा प्रयत्न केला.

परशुराम त्र्यंबक यांचे थोरले सुपुत्र कृष्णाजी परशुराम हे ताराबाईचे प्रतिनिधी झाले. हे वडिलांनी सांगितल्याने झाले असावेत असे शाहूला वाटले. त्यामुळे शाहूनी परशुरामपंताचे डोळे काढण्याचा व मारण्याचा प्रयत्न केला, जो चिटणीसांच्या प्रसंगावधानाने टळला.छत्रपती राजाराम महाराज जिंजीस असताना रामचंद्रपंत अमात्यास आपले अधिकार दिलेले होते. प्रल्हाद निराजी यांच्याप्रमाणे रामचंद्रपंत अमात्य हेही कर्तुत्ववान होते. त्यामुळे त्यांचा शब्द सहसा राजाराम महाराज मोडीत नव्हते. परशुराम त्र्यंबकांनी वरघाटावरुन येऊन राणोजी घोरपडयांची बंडाळी मोडून राजाराम महाराजांचा अंमल बसविण्यासाठी प्रयत्न केले. परशुराम त्र्यंबकाने मोगलांकडील भुदरगड, चंदनगड इ. किल्ले आणि काही प्रांत जिंकून घेतले आणि तेथे मराठयांचा अंमल सुरु झाला. त्याबरोबरच विशाळगड, पन्हाळा, रायगड, रांगणा, मिरज असे भुईकोट किल्ले व मुलूख मोगलांकडून परत मिळवला. पन्हाळा व मिरज हया किल्ल्यांच्या मोगलांबरोबरच्या लढाईत निळोपंत ठार झाले. त्यानंतर रामचंद्र पंत अमात्यांनी राजारामांना परशुराम त्र्यंबक यांना प्रधानपदाची वस्त्रे देण्याचे सांगितले. राजाराम महाराज तेव्हा जिंजीस होते. पण त्यांना महाराष्ट्रातील परशुराम त्र्यंबक आणि शंकरजी नारायण यांचे कर्तुत्व समजले होते. त्यामुळेच रामचंद्रपंत अमात्यांनी सांगितल्यावर परशुराम त्र्यंबकांना पंतप्रधान करण्यात आले. पंतप्रधान पदाची जबाबदारी दिली होती. त्यावेळी त्यांना शिक्का देण्यात आलेला होता. यानंतर परशुराम त्र्यंबकांनी कोल्हापूर प्रांतात, शंकराजी नारायणांनी मावळ प्रांतात, रामचंद्रपंतांनी धनाजी, संताजी सह सातारा व वाई प्रांतात प्रयत्न करुन मोगलांनी घेतलेली सर्व ठाणी काबीज केली आणि इ.स. १६९० पर्यंत महाराष्ट्र पूर्वस्थितीला आणला.

परशुराम त्र्यंबक यांना इ.स. १६९२ मध्ये राजाराम महाराजांनी समशेर बहादूर हा किताब दिला होता. परशुराम पंतांनी पन्हाळा, विशाळगड ही दोन्ही ठाणी पुष्कळ वर्षे त्यांच्या वहिवाटीस असल्याने ती दुसऱ्याच्या ताब्यात गेल्यास त्याचे नुकसान होईल. म्हणून त्यांची व्यवस्था स्वतःकडेच ठेवली. परशुराम पंतांनी विशाळगड येथील सर्व सरपोतदार, सरदेसाई यांना मराठी राज्य राखल्याबद्दल काही गावे इनामे दिलेली दिसतात.

१. धामापूर हा गाव ता. संगमेश्वर राजापूरच्या सरदेसाईंना इनाम दिला.

२. मोरडे ता. देवळे हे देवगावचे सरदेसाई ता. खिळणा यांस इनाम दिला.

३. वरवली बु. ता. देवळे हा गाव व कोकणपट्टीची १ चाहूर जमीन शामजी रंगनाथ यांना दिली. याशिवाय कमगस्ते ता. संगमेश्वर हा गाव कृष्णाजी भास्कर पंडित यास दिला.

याकाळात परशुराम त्र्यंबक आणि शंकरजी नारायण यांनी आपल्या हाताखालच्या लोकांना चांगल्या कामगिरीच्या निमित्ताने वरीलप्रमाणे इनामे, वर्षासने व नेमणूका करुन त्याच्या सनदा दिल्या. त्यांना राजाराम महाराजांनी आणि रामचंद्रपंत अमात्यांनी मान्यता दिली. इ.स. १६९८ मध्ये राजाराम महाराज पुन्हा विशाळगडला आल्यावर मराठी राज्य पूर्व स्थितीत परत मिळाले.

शाहू महाराजांनी परशुरामपंतास इ.स. १७१०-११ मध्ये आपल्या प्रतिनिधिपदाची जबाबदारी सोपविली आणि नवीन शिक्का करुन दिला.



याबरोबरच त्यांना पुढील प्रांत व सुभे देण्यात आले. प्रांत राजापूर, दाभोळ, महिपतगड, जावळी, वाई, सातारा, कराड, मलकापूर, पन्हाळा, तारळे, कोल्हापूर असे एकूण १६ प्रांत आणि विशाळगड, गगनगड, वंसतगड, पन्हाळा यासारखे ३२ किल्ले व महाल दिले. [२] शाहू महाराजांनी हे सर्व परशुराम पंतांस दिल्यावर त्यांचा मोठा मुलगा कृष्णाजी परशुराम यांच्याकडे सर्व सोपविले. त्याच काळात सातारा आणि कोल्हापूर हया दोन मराठयांच्या शाखा निर्माण झाल्या.

---

२. सातारच्या प्रतिनिधि घराण्याचा इतिहास ग्रंथांक १, रा अनंत नारायण भागवत व रा वामन परशुराम मेंहेदळे, औंध स्टेट प्रेस, परिशिष्ठ १ पान २४५ व २४६.

शाहू महाराज व ताराबाई अशा दोन गाद्यांची दोन ठिकाणी वाढ झाली. दोन्ही गाद्यांची ठिकाणे वेगवेगळी, सरदार, प्रधानही निरनिराळे झाले. प्रांत व सरहद्दी निरनिराळया झाल्या नव्हत्या. ज्याच्याजवळ जे किल्ले व प्रांत राहिले ते त्यांच्याकडेच राहिले उलट दुसऱ्या पक्षाचा प्रांत घेण्याचा प्रयत्न दोघांचाही चालूच राहिला.

शाहू महाराजांच्या प्रतिनिधीपदाची जबाबदारी परशुराम पंतांनी सांभाळली. पण त्या आधी गदाधर प्रल्हाद यांच्याकडे प्रतिनिधीपद होते. हे जवळपास २ वर्षे प्रतिनिधीपदावर होते. त्यांनी त्यांच्या काळात काही लोकांना इनामपत्रे, वतनपत्रे, अभयपत्रे दिली होती. ती सर्व परशुराम पंतांनी स्वतःच्या नावे करुन दिली. असेच एक अभयपत्र दादाशेट वायकूळ यांना देण्यात आले होते. [३]

याच सुमारास रामदासस्वामीच्या नंतर महाराष्ट्रात प्रसिद्ध झालेले ब्रम्हेंद्र स्वामी कोकणातून सातारा प्रांतांत आले होते. यांना जंजिरा संस्थानच्या याकूदखान याने पेठे व आंबडस ही दोन गावे इनाम दिली होती. त्यापैकी मौजे पेठे हा गाव मुस्लिमांकडे असल्यामुळे तो इनाम होता. परंतु आंबडस हा गाव अर्धा महिपतगडतर्फेने प्रतिनिधींच्या अंमलात असल्याने तो ब्रम्हेंद्र स्वामींना अर्धा इनाम मिळाला होता. पण ते दरोबस्त इनाम करुन देण्याची विनंती केली. यानंतर इ.स. १७११ मध्ये परशुरामपंतानी राजकारणात ब्रम्हेंद्र स्वामींची मदत झाल्यामुळे त्यांना मौजे डोरले व महाळुंगे तर्फे पावस ही दोन्ही गावे निम्मे इनाम करुन दिली.

श्रीनिवास परशुराम यांचे सर्वात धाकटे बंधू जगज्जीवनराव यांस शाहू महाराजांनी १६ डिसेंबर १७४६ मध्ये प्रतिनिधीपदाची वस्त्रे दिली. त्यांनी शाहू महाराजांकडे सरंजाम, इनाम वगैरे आहे त्याप्रमाणे चालविण्याची विनंती केली. त्याप्रमाणे शाहू महाराजांनी आज्ञापत्र दिले. आज्ञापत्रात चालत आलेला सरंजाम व इनाम चालू राहील हे स्पष्ट केले आहे.

**औंध संस्थान -** पंतप्रतिनिधींचे मुख्य राजधानीचे ठिकाण औंध हे होते. या संस्थानाचे एकंदर क्षेत्रफळ सुमारे ५०१ मैल एवढे होते. इ.स. १९२१ च्या खानेसुमारीनुसार औंध संस्थानची लोकसंख्या ६४५६० होती. या संस्थानाच्या प्रदेशांतून कृष्णा, वेण्णा, वांगना, वेरळा, माण व ढोण या मोठया आणि नान्नी, मांड व तारळी या लहान अशा सुमारे १० नद्या वाहतात.

---

३. सातारच्या प्रतिनिधि घराण्याचा इतिहास ग्रंथांक १, रा अनंत नारायण भागवत व रा वामन परशुराम मेंहेदळे, औंध स्टेट प्रेस, परिशिष्ठ, पान २५०.

औंध संस्थानाचा मोठा भाग माण, कोरेगाव, खानापूर, कऱ्हाड, तासगाव या सातारा जिल्हयाच्या (आग्नेयेकडील २/३ भाग) काही तालूक्यांच्या हद्दीत पसरलेला होता आणि १/३ भाग विजापूर जिल्हयाच्या नैऋत्येस होता.या संस्थानाचे राजकीय विभाग ६ होते. त्यापैकी ३ तालुके आणि ३ ठाणी होती.

तालुके - आटपाडी, कुंडल, गुणदाळ

ठाणी — किन्हई, संगममाहुली, औंध.

एकंदर ७३ गावे होती. यातील ६१ गावे संस्थानाची, १२ गावे इनामी (दुमाले) होती. आटपाडी तालुक्यात ३३ गावे होती. कुंडलमध्ये १८ तर गुणदाळ मध्ये १७ गावे होती. औंध ठाण्यात ३ गावे, किन्हईत १ आणि संगममाहुलीत १ अशा गावांचा यात समावेश होता. दूमाले किंवा इनामी गावांमध्ये आटपाडी तालुक्यातील १० गावे आणि कुंडलमधील २ गावे होती. याव्यतिरिक्त औंध संस्थानातील एकंदर १२ वाडयाही होत्या.

**तक्ता क्र. २०. औंध संस्थानाचे स्वरुप -** [४]

| तालुके | आटपाडी | कुंडल | गुणदाळ | औंध | किन्हई | संगममाहुली |
|---|---|---|---|---|---|---|
| क्षेत्रफळ | ३३७.१ चौ. मैल | ५७.२ चौ. मैल | ८०.१ चौ. मैल | १६.६ चौ. मैल | ७.२ चौ. मैल | ४७ एकर |
| लोकसंख्या | ३३५१२ | १७०४३ | ७६०८ | ४०१८ | १६२९ | ७५० |
| वसूल | ८३०००रु. (१९१३-१४) | ७०००० रु. (१८९५-९६) | ४५००० रु. (१८९५-९६) | ६५०० रु. (१८९५-९६) | ५००० रु. (१९१३-१४) | ५०० रु. |

पंत प्रतिनिधीच्या कृपाछत्राखाली खानापूर आणि विजापूर मोडत असे. यातील कराड, वाळवा, खानापूर आणि विजापूर यांची कर आकारणी १८५१ मध्ये करण्यात आलेली दिसते.

श्रीपतराव प्रतिनिधींनी सातारा येथील मंगळवार पेठ वसविले. गुजर सावकार लोकांची तेथे वस्ती होती. या पेठेच्या संरक्षणासाठी स्वार व शिपाई ठेवलेले होते. सर्व गावासारखी व्यवस्था केली होती. या सर्व व्यवस्थेबद्दल त्यांनी व्यापाऱ्यावर ‘मोहतर्फा’ कर लावला होता. १७ मे १८३३ च्या एका पत्रात या पेठेचा हिशेब रु २५३। इतका देण्यात आला आहे. कराड, वाळवा, खानापूर आणि विजापूर यांची कर आकारणी १०० वर्षापासून

४. Bombay Goverment. Rev. Rec. 22 of 1852, Pg. 154.

झालेलीच नव्हती. १८२१ मध्ये सर्वप्रथम विजापूरच्या उप विभागाचे सर्वेक्षण आणि कर आकारणी केली गेली. यावेळी जमीनीच्या छोटयातल्या छोटया तुकडयावर सुद्धा अल्पसे भाडे आकारले गेले.

इ.स. १८२२ च्या दरम्यान एकरी चांगले पीक देणाऱ्या जमिनीचे दर रु. १८ आणे १० पैसे १२ पासून रु. १ आणे १ पैसे ८ असे बदलणारे होते.

मिश्र जमिनीचे दर रु.९ आणे ५ पैसे १२ पासून रु. १३ आणे १ पैसे २ या प्रकारचे होते. हे सर्व दर खूपच होते.

ज्यामुळे जमीन मालकाला फक्त जमीनीसाठी येणारे खर्च भागवता येत असत.

| | |
|---|---|
| संपूर्ण औंध संस्थानातील गावांचे सर्व बाबींचे मिळून एकंदर उत्पन्न | ३,४१,८०० रु. |
| इनामदार, देवस्थान, धर्मादाय इ. इनामांचा आकार | ६४,००० रु. |
| देशपांडेपण आणि वतनाबाब हक्क खाजगी | ३,००० रु. |
| सरकारचे खाजगी उत्पन्न | ५,००० रु. |

इनामदार, देवस्थान, धर्मादाय इ. इनामांचा आकारापैकी आटपाडी तालुक्यातील करंगणी गावाचा आकार ५००० रुपये प्रतिनिधी सरकारचे खाजगी उत्पन्न होते आणि वतनबाब व देशपांडेपणाचा हक्क मिळून ३००० रुपये हे देखिल प्रतिनिधींचे खाजगी उत्पन्न होते.

राजाराम महाराजांच्या काळात रामचंद्रपंत या त्यांच्या सचिवांनी मुलुखाच्या संरक्षणासाठी आपले अधिकार दोन सरदारांना दिले. ते सरदार म्हणजे परशुराम त्र्यंबक आणि शंकराजी नारायण. इ.स. १६९१-९८ पर्यंत रामचंद्रपंतानी ज्या ज्या सरदारांस आणि लोकांस इनामे देऊन त्यांच्या सनदा करुन दिल्या त्या पुढे छत्रपती राजाराम महाराजांनी मान्य केल्या. तसेच परशुराम त्र्यंबक आणि शंकराजी नारायण यांनीही वेळावेळी आपल्या हाताखालच्या लोकांस कामगिरीबद्दल इनामें, वर्षासन, नेमणुकांच्या सनदा दिल्या. त्यांनाही रामचंद्रपंत आणि राजाराम महाराजांनी पुढे मान्यता दिली.

ज्याप्रमाणे परशुराम पंतप्रतिनिधींना प्रांत व किल्ले छत्रपति शाहू महाराजांना दिले. त्याप्रमाणे प्रतिनिधी घराण्यांतील नंतरच्या वारसदारांना इनामगावे मिळालेली त्यांची यादी पुढीलप्रमाणे -

राजश्री श्रीनिवासराव यांना आधीपासून सरंजाम होता. त्यांना प्रतिनिधीपद दिले. त्यांच्याकडील सरंजाम दूर करुन तो राजश्री सदाशिव परशुरामाला दिला. (२१-१-१७१७)

त्यावेळी मिळालेली इनाम गावे - मौजे कडवे प्रांत शिराळे इनाम व दिविखिंड गाव इनाम नाडगौडीचे वतन, ठाणी ३१. [५]

श्रीनिवास परशुराम उर्फ श्रीपतराव यांना मिळालेले इनाम (जातइनाम श्री छत्रपतींकडून मिळालेले) मौजे २३, तर्फ बिरवाडीपैकी ९ मौजे, ५ तर्फ कोळेपैकी देहे, २ तर्फ संगमेश्वरपैकी १ मौजे, दिविखंड कसबे, १ मौजे (खांबाळे नेर).

सरदेशमुखीचे उत्पन्न - ७ प्रांत कडेवळीतर्फा २, फूट गाव सरदेशमुखीचे ४ प्रांत, कराडपैकी १ कर्यात औंध.

कुलकर्ण्याचे वतन - २.

आडगाव, दाभोळ, उंबरज, मौजे काशीळ, देहायपैकी कुरणे पाच.

परशराम श्रीनिवास यांना मिळालेली इनामगावे - [६]

१ मौजे चारे, १ मौजे नेरले, मौजे दिविखिंड (सदाशिव परशराम मृत्यू पावल्याने परशराम श्रीनिवास यांना इनाम दिला) मौजे पुसेसावळी (श्रीनिवास परशराम प्रतिनिधीना इनाम होता तो इनाम).

परशराम पंडित व श्रीनिवासराव यांनी स्वतःच्या नावे इनाम करुन घेऊन श्री देवस्थानाकडे नैवेद्य नंदादीप व पुजाअर्चा वगैरे खर्च चालविला ती गावे -[७]

श्री देवी औंध - १ कसबे औंध, १ मौजे कडेपूर, १ पारगाव, १ रामापूर,१ व्याहापूर एकूण ५

श्री देवी साखरगड - संमत कोरेगांव प्रांत वाई ५ पैकी देहे-चंचळी, शेंदूरजणे.

श्री देवी देवघराकडे नवरात्र व बारमाही खर्च — कोरेगांव पैकी ५ देहे.

व सिद्धेश्वर, श्री रामेश्वर अशा इतर देवस्थानास देण्यात आलेले इनाम.

**इनाम** - वतन हे एक प्रकारचे इनामच होते. इनामे प्रामुख्याने दोन प्रकारची होती. एक ‘सनदी’ किंवा ‘दिवाण निसबत’ इनाम दुसरे ‘गाव निसबत’ इनाम. सनद अथवा फर्मान

---

५. सातारच्या प्रतिनिधी घराण्याचा इतिहास ग्रंथांक २ रा, अनंत नारायण भागवत व रा वामन परशुराम मेंहेदळे, औंध स्टेट प्रेस, परिशिष्ठ २, पान १७३ व १७४.

६. सातारच्या प्रतिनिधी घराण्याचा इतिहास ग्रथांक २ रा, अनंत नारायण भागवत व रा वामन परशुराम मेंहेदळे, औंध स्टेट प्रेस, परिशिष्ठ २, पान १७५ व १७६.

७. साताराच्या प्रतिनिधी घराण्याचा इतिहास ग्रंथांक २, रा अनंत नारायण भागवत व रा वामन परशुराम मेंहेदळे, औंध स्टेट प्रेस, परिशिष्ठ २, पान १७७ व १७८.

यांच्याद्वारे दिलेले असे. अशा इनामांना काही वेळा संपूर्ण सरकारी शेतसारा माफ केलेला असे, तर काही वेळा त्याचा काही भाग म्हणजे ह, १/३ अथवा १/४ भाग इनामधारकाला द्यावा लागत असे. अशा प्रकारे जेव्हा इनामधारकाला साऱ्याचा काही भाग द्यावा लागत असे तेव्हा त्या इनामाला इनाम निमाई, इनाम तिजाई, इनाम चौथाई असे म्हणत.

शिवाजी महाराजांनीही काही वतने दिलेली होती. राजा आपल्या मुलीला काही इनाम देत असे त्याला 'साडी चोळी' इनाम म्हणत. [८] जिजाबाईने एका कुलकर्ण्याच्या विधवेला १ चावर जमिन इनाम दिली होती. याशिवाय शिवाजी महाराजांनी बाळाजी आवजी चिटणीस आणि रामचंद्र निळकंठ यांना चिटणीसी व सबनिसी वतने दिलेली होती. शिवाजी महाराजांच्या राजवटीपासून किंबहूना प्राचीन काळापासूनच इनामे देण्याची पद्धत महाराष्ट्रात अस्तित्वात असल्याचे दिसते. सतराव्या शतकात धर्माला समाजजीवनात महत्वाचे स्थान होते. त्यामुळे अनेक धार्मिक संस्थाना किंवा धर्माचे रक्षण करणाऱ्या व्यक्तींना गावची काही जमीन इनाम दिलेली असे. शिवाजी महाराजांनी अशा प्रकारची अनेक धर्मादाय इनामे दिलेली होती. आळंदीचे ज्ञानेश्वर मंदिर, इंदापूरचा काजी, रामदासांचा चाफळ मठ, चिंचवडचे मोरया गोसावी, सासवडची सोपान देव समाधी इ. धर्मादाय इनामे शिवाजींनी दिलेली दिसतात.

राजसत्तेत बदल झाला म्हणजे इनामदार आपल्या सनदेचे नव्या राजसत्तेकडून नूतनीकरण करुन घेत असे. आणि सामान्यतः या जुन्या इनामाच्या सनदेवर नवी राजवट शिक्कामोर्तब करीत असे. शिवाजी महाराजानंतरच्या काळातही इनाम देण्याची पद्धत टिकून राहिली. अगदी पेशवे काळातही इनाम देण्याची पद्धत अस्तित्वात होती. इनाम ज्यांना दिलेले असे ते इनामदार. त्यांना समाजात थोडे मानाचे स्थान होते. पेशवे काळानंतरही इनामदार समाजातील महत्वपूर्ण घटक होता.

**औंधमधील कर रचना -** सातारा प्रांतामधील औंध या संस्थानाची संपूर्ण व्यवस्था पंतप्रतिनिधी घराण्याकडून पाहिली गेली. या संस्थानाची राजधानी सुरुवातीला कराड आणि नंतर औंध होती. त्यामुळे या राजधानीच्या सभोवताली असणाऱ्या सर्व भागावर पंतप्रतिनिधीची सत्ता चालत असलेली दिसते. या भागामध्ये शेतीला विशेष महत्व होते. त्यामुळे शेतीचे क्षेत्र इनाम म्हणून देण्याची पद्धत अस्तित्वात असलेली दिसते. औंध संस्थानामध्ये अनेक इनाम गावे

---

८. शिवकालीन.महाराष्ट्रः डॉ. अ.रा.कुलकर्णी, राजहंस प्रकाशन, पुणे, १९९७, द्वितीयावृत्ती, पान ४६.

अस्तित्वात असलेली दिसतात. तसेच पंतप्रतिनिधींनी आपल्या संस्थानामधील अनेकांना अनेक कारणांसाठी इनाम जमीनी दिलेली दिसते. इनाम जमीनीच्या बदल्यात इनामदारांच्या नावे तेवढया रक्कमेचा वसूल मांडून ठेवला जात असे.

**१. इनाम पट्टी -** इनामदारी व्यवस्था अस्तित्वात असल्याने या संस्थानामध्ये इनामपट्टी घेतली जात असावी. हा कर इनामदार किंवा अधिकारी वर्ग यांच्याकडून घेतला जात असे. एखाद्या व्यक्तीच्या एकंदर उत्पन्नापैकी काही भाग सरकार जमा करत असे. इनामदारांना दिलेली जमीन ही सामान्यतः सारासूट यात मोडत असे. परंतू आणीबाणीच्या परिस्थितीत राज्याला जादा पैसा उभा करावयाचा असेल तर तो इनामदारांकडून घेतला जात असे.

इनामपट्टी ही एक नैमित्तिक पट्टी इनामदारांकडून काही प्रसंगी वसूल केली जात होती. [९] इनामपट्टीचे प्रमाण त्या अधिकाऱ्याने किंवा इनामदाराने किती महसूल गोळा केला यावर अवलंबून असे. त्यामुळे प्रत्येक काळात आणि प्रत्येक ठिकाणी इनामपट्टी वेगवेगळया स्वरुपात घेतली जात असे. परंतू यावरुन असे दिसून येते की इनामदार किंवा अधिकारी यांनाही काही प्रमाणात कर द्यावा लागत असे.

औंधमधील पंतप्रतिनिधींनी इनाम दिलेल्या जमीनीवरील सर्व वसूल मुकादमांनी गोळा करावा आणि ज्या इनामदारांना तो ज्या प्रमाणात दिलेला आहे त्या प्रमाणात वाटून द्यावा अशी व्यवस्था केलेली असावी. यासंबंधीचा पुरावा ता. २३-१२-१७०४ कराडकर गिजरे दप्तरातील एक पत्र दर्शविते.

परशुराम त्र्यंबक यांनी काही ब्राम्हणांस अग्रहार (पंडितांच्या, विद्वानांच्या शिक्षणासाठीचा खर्च चालविणेसाठी देण्यात आलेली इनामाच्या स्वरुपातील मदत.) करुन दिलेला दिसतो. पण काही वेळेला मुकादमांनी त्या त्या गावातील वसूल ब्राम्हणास दिला नाही तर त्या संबंधीची ताकीद देण्यासही ते कमी करीत नव्हते हे एका आज्ञापत्रावरुन दिसते. (ऐतिहासिक पत्र क्र. १) मौजे सैदापूर प्रांत कराड मधील सर्व मुकादमांना लिहिलेल्या आज्ञापत्रात वेदमुर्ति मोरेश्वर जोशी गिजरे व गोविंदराव टोणपे यांच्या आज्ञेत राहून सर्व गावांचा सारा सुरळीतपणे वसूल करुन तो त्यांच्याकडेच जमा करण्याची ताकीद देण्यात आलेली आहे. या पत्रावरुन असे दिसते की, पंत प्रतिनिधिंनी दिलेल्या इनाम जमीन

---

९. शिवकालीन पत्रसारसंग्रह, खंड ३ : संपादक द.वि. आपटे, न. चि. केळकर, भा.इ.सं.मं. प्रका, पुणे १९३०, पान ४३१.

वरील सर्व वसूल ज्यांना ती जमीन इनाम दिली त्यांना मिळत असावा. म्हणूनच तेथील मुकादमांना त्यांनी इनामदारांच्या आज्ञेत राहण्याची ताकीद केलली दिसते.

**२. इनाम तिजाई -** इनामदारांना ज्या जमीनी इनाम दिलेल्या असत त्या जमीनीवरील सर्व सारा इनामदार वसूल करीत असत. पण त्या एकंदर साऱ्यापैकी १/३ कर इनाम तिजाई म्हणून सरकारकडून वसूल केले जात असत. म्हणजेच इनाम दिलेल्या जमीनीतील साऱ्याचा काही भाग सरकार वसूल करीत असे.

औंध संस्थांनात इनामदारांना दिलेल्या इनामांमध्ये याचा उल्लेख आढळतो. काही वेळा इनाम देताना इनाम तिजाई, चौथाई ही देखील त्या इनामदारांला दिलेली आढळून येते. परशुराम त्र्यंबक यांनी वेळोवेळी आपल्या हाताखालच्या लोकांस कामगिरीबद्दल इनामें, वर्षासन, नेमणुकांच्या सनदा दिल्या. परशुराम त्र्यंबक यांनी ता. परळी, सुभा, प्रांत सातारा येथील देशमुख आणि देशपांडे यांना लिहिलेल्या पत्रात वेदमूर्ती रा. विश्वनाथ भट बिन केशवभट दिवेकर यांना मौजे अरे येथील अव्वल जमीन १५, दूमजमीन १०, सीम जमीन ५ अशी एकूण पाव चावर जमीन इनाम दिली. या जमीनीवरील तिजाई दिवेकरांना देऊन त्यांच्या चरितार्थासाठी व्यवस्था केलेली दिसते. (ऐतिहासिक पत्र २)

इनाम तिजाई प्रमाणे चौथाई हा वसूल केला जात असे. इनामदारांना ज्या जमीनी इनाम दिलेल्या असत त्या जमीनीवरील साऱ्यापैकी १/४ भाग इनाम चौथाई म्हणून पंतप्रतिनिधी वसूल करीत असत, तरी कधी कधी तो १/४ भाग देखील इनामदारांना दिलेला दिसतो.

**३. शेटेपण वतन -** एखादी नवीन बाजारपेठ निर्माण करण्याची जबाबदारी पार पाडणाऱ्याला सरकारकडून शेटेपणाचे वतन मिळत असे. शिवकाळ, पेशवेकाळातही असे शेटेपणाचे वतन दिले गेलेले दिसते. सरकारातून शेटेपणाचे वतन मिळणाऱ्या व्यक्तीला खेडेगावातील पाटील कुलकर्ण्याप्रमाणे विशिष्ट मानपानाचे हक्क मिळत असत. [१०] शेटे महाजनांना सरकारी तिजोरीतून कसलेही वेतन न देता त्यांच्याकडून महत्वाची सेवा करुन घेता येत असे. दुकानदार आणि व्यापारी यांचेकडूनच शेटेमहाजनांना प्राप्ती मिळत असे. पाटलांप्रमाणे तो त्या नवीन पेठेचा हितकर्ता, पालक असल्याने त्याच्याविषयी तक्रार करण्याचे कारणच नव्हते.

---

१०. शिवकालीन.महाराष्ट्र: डॉ. अ.रा.कुलकर्णी, राजहंस प्रकाशन, पुणे, १९९७, द्वितीयावृत्ती, पान १०७.

साताऱ्यामधील मंगळवारपेठेची नव्याने निर्मीती करताना सुरुवातीला हे शेटेपणाचे वतन पंतप्रतिनिधीकडे होते. पण नंतर ते मामलेदाराने मिळविले. म्हणजेच पेशवेकाळात हे अधिकार काही अधिकारी वर्गालाही मिळत होते.

श्रीपतराव प्रतिनिधींनी सातारा येथील मंगळवार पेठ वसविली. गुजर, सावकार लोकांची तेथे वस्ती होती. या पेठेच्या संरक्षणासाठी स्वार व शिपाई ठेवलेले होते. सर्व गावासारखी व्यवस्था केली होती. या सर्व व्यवस्थेबद्दल त्यांनी व्यापाऱ्यावर 'मोहतर्फा' कर लावला होता. (ऐतिहासिक पत्र ३)

**४. वनचराई -** गावामध्ये असणाऱ्या सरकारी कुरणांवर जनावरे चारल्याबद्दल गावकऱ्यांना कर भरावा लागत असे. त्याला वनचराई कर म्हटले जात असे. यापासून सरकारला मिळणारे उत्पन्न अनियमित असे होते. पण याचा उल्लेख औंध संस्थानात आढळतो. परशराम श्रीनिवास प्रतिनिधिंनी विटयाच्या देशमुख व देशपांडेंना एक पत्र लिहिले आहे, त्यात सिदोजी जानकर यांच्याकडे सर्व वनांची मालकी दिलेली दिसते त्यामुळे कसबे विटेमधील वनचराईची आणि मेंढरे बसविण्याची टीप (कर) सिदोजी जानकर घेतील. त्यास दर शेकडा रुपये सव्वासहा प्रति आकाराबद्दल वसूल देणे असे स्पष्ट केले आहे.
(ऐतिहासिक पत्र ४)

**५. बकरा पट्टी -** ही पट्टी गावामध्ये असणाऱ्या प्रत्येक मेंढीवर लावली जात असे. ज्याच्याकडे जेवढया मेंढया असत तेवढया मेंढयाचा कर त्याला भरावा लागत असे. या मेंढया शेतात बसवून मेंढयाचे मालक पैसा किंवा धान्य मिळवत असत. शेतकऱ्यांना मेंढयाचे खत उपयोगी असल्याने शेतकरी मेंढयाच्या मालकांना पैसे देत असत. त्यातूनच मेढयांचे मालक ही पट्टी भरत असावेत. ही पट्टी महसूलाच्या कायम बाबीमध्ये अंतर्भूत असलेली दिसते. म्हणजेच वर्षोनुवर्षे ही पट्टी एका विशिष्ट व्यक्तीला मिळत असे. तसे आदेश सरकारने सविस्तरपणे दिलेले दिसतात. (ऐतिहासिक पत्र ४)

**कर कोणासाठी -**

शिवाजी महाराजांच्या कारकिर्दीत शेवटची ४-५ वर्षे आणि त्यानंतर राजाराम महाराजांच्या राजवटीत कार्य करणारे पंत परशुराम त्र्यंबक यांनी मराठा राज्यासाठी जिवापाड मेहनतीचे कार्य केले होते. राजाराम महाराजांनी त्यांना त्यांच्या कार्याबद्दल

प्रतिनिधीपद दिले होते. त्यासोबत त्यांना सातारा प्रांतीचा १८००००० चा मुलूख देण्यात आला होता. [११] त्यानंतर १७१०-११ मध्ये शाहूने पंतप्रतिनिधी पदाची वस्त्रे परशूरामपंतास दिली. त्यासोबत काही प्रांत व किल्लेही दिले.

मुलुखगिरी सुभे,प्रांत-राजापुर, दाभोळ, महिपतगड, जावळी, मंगळगड, वाई, सातारा, कराड, व्याघ्रगड, मलकापूर, पन्हाळा, तारळे, कोल्हापूर, खटाव, माण, मिरज एकूण १६ प्रांत.

किल्ले -विशाळगड, मद्रिपंतगड, प्रचितगड, प्रतापगड, मंगळगड, गहनगड, जंजिरे, रत्नागिरी, कमळगड, पांडवगड, वैराणगड, चंदनगड, वंदनगड, कल्याणगड, वर्धनगड, संतोषगड, महिमानगड, वारुगड, भुषणगड, सातारा सज्जनगड, सुंदरगड, गुणवंतगड, वसंतगड, पन्हाळा, पावनगड, गगनगड, एकूण ३५ प्रांत. [१२]

त्यानंतरच्या काळातही पंतप्रतिनिधींना व त्यांच्या वारसदारांना इनामगावे मिळतच राहिली. तसेच त्यांना ३००० रु. चे देशपांडेपणाचे वतन देण्यात आले होते आणि ५००० रु. चे खाजगी उत्पन्न करंगणी, तालुका आटपाडी या गावातून मिळत असे. पंतप्रतिनिधींना दिलेल्या प्रांतामधील काही गावे त्यांनी आपल्या अधिकारात इनाम दिलेली दिसतात. यातील काही इनामे राजाराम, शाहू, शिवाजी महाराज यांच्या नावे असलेली दिसतात.

म्हणजेच या इनामपत्रावरुन असे दिसते की शाहू महाराज, राजाराम महाराज किंवा धाकटे शिवाजी हे सर्व छत्रपती शिवाजी महाराजांचे वारसदार यांनी प्रतिनिधी, पेशवा, अमात्य यांना त्यांच्या प्रांतातील सर्वाधिकार दिले होते. त्यामुळेच प्रत्येक प्रांतामध्ये इनामे देण्याची पद्धती मोठया प्रमाणात निर्माण झालेली दिसते. या इनामपत्रावरुन असे दिसून येते की पंत प्रतिनिधी घराण्यातील परशुराम पंडित, श्रीनिवास पंडित, श्रीपतराव, माधवराव पंडित यांनी सर्वांनी श्री राजा शाहू महाराज, श्री राजा राजाराम महाराज, श्री राजा शिवाजी यांच्या अधिकारात राहून कार्य केले. त्यामुळे या प्रांतामध्ये दिली जाणारी इनामे, इनामपट्‌टी, तिजाई पट्‌टी असे सर्व कर हे त्यांना बांधिल राहूनच लावले जात असत.

पंतप्रतिनिधींना जरी हा सर्व प्रांत इनाम म्हणून दिला असला तरी त्याचे अंतिम अधिकार शाहू महाराज, शिवाजी महाराज, राजाराम महाराज यांच्याकडे होते. म्हणजे जसे पेशवे काळात पेशव्याकडे सर्व अधिकार दिलेले दिसतात. तसेच औंध संस्थानातील अधिकार

---

११. पंतप्रतिनिधी बखर, पान ४१.

१२. सातारच्या प्रतिनिधि घराण्याचा इतिहास ग्रंथांक १, रा अनंत नारायण भागवत व रा वामन परशुराम मेंहेदळे, औंध स्टेट प्रेस, पान २४५ व २४६. (शाहू महाराजांची रोजनिशी),

पंत प्रतिनिधींकडे आलेले दिसतात. त्यामुळे या इनाम गावांचा वसूल देखिल पंतप्रतिनिधीं कडेच जमा केला जात असे. आणि धर्मादाय किंवा अन्य कारणांनी इनाम देण्याचे अधिकार ही त्यांनाच असत. पण ते अधिकार पंतप्रतिनिधी शिवाजी महाराज, शाहू महाराज, राजाराम महाराज यांच्यातर्फे वापरत असलेले दिसते. म्हणजेच सध्या जसे महाराष्ट्र शासनातर्फे महाराष्ट्राच्या मंत्रीमंडळातील संबंधित मंत्र्याना संबंधित खात्याचे अधिकार असतात. तसेच पंतप्रतिनिधींना शिवाजी महाराज, शाहू महाराज, राजाराम महाराज यांच्या तर्फे/वतीने काही अधिकार प्राप्त झालेले दिसतात.

त्यामुळे याकाळात औंध संस्थानात सर्व कारभार जरी पंतप्रतिनिधी पहात असले तरी अप्रत्यक्षपणे तो कारभार शिवाजी महाराज, राजाराम महाराज, शाहू महाराज यांच्याकडून चालविला जात असे.

**कर वसूल करणारे अधिकारी -**

पंतप्रतिनिधीच्या म्हणजेच छत्रपतिंच्यावतीने या सर्व संस्थानातील करासंबंधी काम काही अधिकाऱ्यांमार्फत केले जात असलेले दिसते. या संस्थानात महसूल जमा करणारे इनामदार अनेक असलेले दिसतात. तसेच पाटील, देशमुख, देशपांडे, मुकादम या सर्वांकडून महसूल, सारा जमा करण्याचे काम केले जात असे. म्हणूनच या संस्थानातील ज्या गावांचे इनामपत्र केले गेले ते देशमुख, देशपांडे, शेटे महाजन, मोकादम-पाटील यापैकी संबंधित अधिकाऱ्याकडे पाठविले गेलेले दिसते.

**मुकादम-पाटील -** हा गावचा वंशपरंपरागत अधिकार असे. कागदपत्रातून त्याचा उल्लेख गाव पाटील, मोकदम किंवा मोकादम पाटील असा केलेला दिसतो. मोकादम या शब्दाचा अर्थ पुढारी असाही आहे.

लावणी, संचणी, उगवणी ही मराठाकाळात पाटीलाची प्रमुख कामे होती. गावातील पडिक जमीन लागवडीखाली आणून तिच्यातून पीक काढण्याचे काम काढण्यासाठी प्रयत्न करण्याचे काम पाटीलाला करावे लागत असे. गावचा महसूल निश्चित करण्याची कामगिरी राजसत्तेची असली तरी पाटीलांची संमती घेतल्याशिवाय किंवा त्यांच्याशी विचार विनिमय केल्याशिवाय शेतसाऱ्याबाबत निर्णय घेता येत नसे. म्हणूनच औंध संस्थानात मोकादम पाटील यांना इनामपत्रांच्या प्रति देण्यात आलेल्या दिसतात.

**शेटे-महाजन -** गावकीच्या कामात गुंतलेला आणखी एक वतनदारांचा वर्ग म्हणजे शेटे महाजनांचा होय. गावच्या पेठेचे ते वंशपरंपरागत अधिकारी होत. प्रत्येक गावात पेठ असेच

असे नाही. मात्र गावात पेठ वसवायची असेल तर ते काम शेट-महाजनाकडे असे. या कामासाठी त्यांना सरकारातून जमीन आणि गावकऱ्यांकडून काही हक्क मिळत. त्यांचे स्वरुप सामान्यतः इतर वंशपरंपरागत अधिकारप्रमाणेच असे. गावची वसाहत जशी पाटिलाची जबाबदारी तशी पेठेची जबाबदारी शेटेची असे. कुलकर्णी जसा गावचा हिशेब ठेवत असे तसाच महाजन पेठेचा हिशेब ठेवत असे. पेठेकडून या दोघांना रोख व वस्तूंच्या रुपाने वसूल मिळत असे.

**देशमुख आणि देशपांडे -** हे परगण्याचे वतनदार अधिकारी होत. अनेक खेडयांचा मिळून परगणा होत असे. परगण्यांतील बहूतेक गावांतून देशमुख देशपांडयांची जमीन असल्याने गावाशी त्यांचा निकटचा संबंध असे. देशमुख हा परगण्यांतील सर्व पाटीलांचा नायक आणि देशपांडे हा सर्व कुलकर्ण्यांचा नायक होता. आपल्या परगण्यांतील पाटीलांच्या कामावर देशमुख देखरेख ठेवीत असे. गावची नापीक जमीन गरजूंना लागवडीसाठी देण्याचे काम देशमुख करीत असे. नव्या रयतेला उत्तेजन देण्यासाठी जमीनीचा सारा क्रमशः वाढविला जाई. यालाच 'इस्तावा' पद्धती म्हणत. पहिली काही वर्षे सारा बहुतेक आकारला जात नसे. नंतर त्यात क्रमाक्रमाने वाजवी सारा येईपर्यंत प्रत्येक वर्षी थोडी थोडी वाढ केली जात असे.

"परगण्यातील रयतेची स्थिती पूर्णपणे अवगत करुन घेण्याकरीता देशमुख आपल्या परगण्यात वार्षिक दौरा काढीत असे." नव्याने लागवडीखाली आणलेल्या जमिनीचा सारा जरुर पडल्यास देशमुख निश्चित करीत असे. जमीनीच्या मालकीत बदल झाला असेल तर कुलकर्ण्याच्या दप्तरात त्याची योग्य ती नोंद होते किंवा नाही इकडे तो लक्ष पुरवीत असे.

**कर विषयक धोरण -**

औंध या प्रांतामध्ये इनाम देण्याची पध्दत्त मोठया प्रमाणात अस्तित्वात असलेली दिसते. पंतप्रतिनिधीनी आपल्या संस्थानामध्ये अनेकांना इनामे देवून त्यांचे रक्षण केले, काहींच्या चरितार्थाची जबाबदारी स्विकारली, काहीनां शिक्षणाची सुविधा उपलब्ध करुन दिली. देवस्थानांची व्यवस्था लावली.

१. **पुर्वापार इनामे कायम -** औंध संस्थानामध्ये पंतप्रनिनिधींनी अनेक लोकांना इनामेही पूर्वपरंपरेने दिलेली दिसतात. काही पत्रात इनामे आदिलशाहीपासून चालू असल्याचे उल्लेखही सापडतात. या सर्व इनामांना पंतप्रतिनिधींनी कायम केले होते. त्यामुळे औंध आणि कराड प्रांतातील अनेक कुटुंबे आपल्याला मिळालेल्या इनामांवरच आपला चरितार्थ चालवित

असत. आधीच्या सत्ताधिशांनी दिलेली इनामे पंतप्रतिनिधींनी त्याच कुटुंबांकडे ठेवल्यामुळे अशी कुटुंबे या संस्थानास उपयोगी पडत राहिली. संस्थानाच्या कार्यासाठी झटणाऱ्यांनाही पंतप्रतिनिधींनी वंशपरंपरागत इनामे दिली होती.

२. **सरकारच्या सेवेबदद्लचा मोबदला** - औंध संस्थानामध्ये पंतप्रतिनिधीनी इनाम देताना अनेक बाबींचा विचार केलेला दिसतो. एखादा किल्ला शत्रूपासून सोडविणे किंवा त्याचे रक्षण करणे, शत्रूचे आक्रमण परतून लावणे, छत्रपतींच्या प्रदेशाचे रक्षण करणे अशा अनेक स्वरुपाच्या कामगिरीमध्ये या परिसरातील अनेक शूर लोकांचा सहभाग होता. अशा प्रकारे सरकारी सेवेमध्ये कार्य करणाऱ्या लढवय्यांना देखिल त्यांच्या चरितार्थासाठी इनाम दिलेले दिसते.

शिवाजी महाराजांच्या काळात त्यांना वेतन किंवा कामाचा मेहनताना देण्याची पध्दत सुरु केली होती पण राजारामानंतरच्या काळात वेतन, मोबदला याऐवजी इनामे, वतने देण्याची जुनी पध्दत रूढ झालेली दिसते. त्यामुळेच औंध संस्थानात सरकारच्या सेवेबदद्लही अनेकांना अशी इनामे दिली गेलेली दिसतात. अशा इनाम किंवा वतनाची जमीन जेव्हा एखादया सरदाराला दिली जात असे तेव्हा त्या संपूर्ण जमीनीवरील वसूल किंवा सारा त्या सरदाराला मिळविण्याचे अधिकार दिले जात असत आणि त्याचे नावे तेवढी रक्कम सरकारकडून दिली असे गृहित धरले जात असे. (पत्र क्र. २)

३. **पंडित, विद्वान ब्राम्हणांच्या शिक्षणासाठी** - पंतप्रतिनिधींनी अनेक ब्राम्हणांना वेगवेगळया कारणांस्तव इनामाच्या स्वरुपात मदत दिलेली दिसते. पंतप्रतिनिधिंनी जाणिवपूर्वक आपल्या संस्थानाच्या परिसरात ब्राम्हणांना, वेदशास्त्राला उत्तेजन देण्याचे प्रयत्न केलेले दिसतात. त्यामुळेच या परिसरातील संगममाहुली या गावात ब्राम्हणवस्ती वसविली. त्यांना आजूबाजूच्या गावांची इनामे दिली आणि त्यांच्या विव्दत्तेला वाव देण्याचे प्रयत्न केले. विव्दान ब्राम्हणांना शिक्षण घेता यावे, त्यांचा चरितार्थ चालावा यासाठी इनाम दिलेल्या जमीनीवर इतरांनी हक्क दाखवू नयेत यासाठीही पंतप्रतिनिधी सतर्क असलेले दिसतात.

संगम माहूली या प्रतिनिधिंच्या ताब्यात असलेल्या गावातील ब्राम्हणवस्ती श्रीपतराव प्रतिनिधींनी वसविलेली दिसते. त्यासाठी त्यांनी ब्राम्हणांना जमीनी इनाम दिल्या होत्या. त्या पैकी एका इनामपत्राची सनद श्री निवासराव परशराम प्रतिनिधि हे परशुराम त्र्यंबक यांचे मोठे सुपुत्र होते. यांनीही श्री छत्रपती शाहू महाराजांच्या काळात पंतप्रतिनिधि म्हणून काम पाहिले. या काळात पंतप्रतिनिधींकडे असणाऱ्या १८ लक्ष रुपयांच्या महाली मुलूखातून ९ लक्ष

रुपये धर्मदाय व अग्रहार इनाम देण्यात आले.(काही प्रसंगी एखादे संपूर्ण गाव ब्राम्हणांना दान दिले जाई. अशा देणगीला 'अग्रहार' म्हणत.) [१३]

सातारा जिल्हयात व त्या बाहेरही अनेकांना त्यांनी इनाम दिलेला दिसतो. मराठी साम्राज्याच्या कल्याणासाठी विद्वान ब्राम्हण व श्रींची देवस्थाने यांच्या स्वास्थ्यासाठी ही इनामे दिलेली आहेत.

यातील कराड प्रांतातील काही इनामांची यादी - [१४]

१ मौजे सैदापूर, कराड येथील समस्त ब्राम्हणास अग्रहार

१ मौजे गोवारे - टोपणे या ब्राम्हणास.

१ मौजे नडसी - क्षीरसागर दिक्षीत यांना.

१ मौजे घोणशी - श्रीरंगनाथ स्वामी निगडीकर यांच्या समाधीच्या खर्चासाठी.

१ मौजे पाचुंदे - कराडकर ब्राम्हणास अग्रहार.

१ मौजे शाहापूर - फकीरास इनाम.

१ मौजे वारुंजी - वारुंजीकर ब्राम्हणास.

१ मौजे नांदलापूर - गोखले यास.

१ मौजे कालवडे, सैदापूर येथील श्री पावकेश्वर देवाच्या खर्चासाठी.

१ मौजे पाचुंद्री कराडकर गिजरे यांजकडे.

१ मौजे सवादे - कराडकर देव यांजकडे.

१ मौजे शेणे, कराड येील मटकर ब्राम्हणास.

१ मौजे येणपे, सेलगावकर तीर्थ उपाध्ये यांस

१ मौजे घणसोली - येथील जंगमास १ मौजे भुरभुशी कराडकर वैद्य यास.

१ मौजे टाळगाव - गिजरे भाउपणात.

१ मौजे जिंती उमराणी कराडकर.

१७ एकूण

फुटकळ इनाम

---

१३. शिवकालीन महाराष्ट्रः डॉ.अ.रा. कुलकर्णी, राजहंस प्रकाशक. पुणे, द्वितीयावृत्ती, १९९७, पान ४८,

१४. सातारच्या प्रतिनिधी घराण्याचा इतिहासः ग्रंथांक २, रा अनंत नारायण भागवत व रा वामन परशुराम मेंहेदळे, औंध स्टेट प्रेस, पान १८१ व १८२.

काशीनाथ गोसावी बिन सदाशीव शीवदास गोसावी उपनाव शुल्क, रा. कराड -

**तक्ता क्र. २१. गोसावी यांना दिलेल्या इनाम जमिनी -**

| गावाचे नाव | बिघे | इनामाची तारीख |
|---|---|---|
| १ मौजे करवडी | १० | १५/५/१७३९ |
| १ मौजे कवठे | ५ | १५/५/१७३९ |
| १ मौजे वाठार | १० | ५/१/१७४० |
| १ मौजे काले | १० | १४/१०/१७४२ |
| १ कसबे कराड | १५ | १४/१०/१७४२ |
| १ मौजे भुरभुशी | १० | २५/६/१७४४ |
| १ मौजे कुमटे | १० | २५/६/१७४४ |
| १ मौजे अटके | १० | २५/६/१७४४ |
| १ मौजे शेरे | १० | २५/६/१७४४ |

४. **धर्मादाय कारणासाठी इनाम -** पंतप्रतिनिधींनी सातारा परिसरातील अनेक ब्राम्हण व इतर धर्मीयांचा विचार केलेला दिसतो. शिवाजी महाराजांनी जसे सर्व धर्मीयांचा विचार केला होता. त्याप्रमाणेच पंतप्रतिनिधींनीही ब्राम्हणांना जशी धर्मादाय इनामे दिलेली दिसतात तशी काही मुस्लिमानांही त्यांच्या देवस्थांनांच्या व्यवस्थेबदद्ल इनामे दिलेली दिसतात. उदा. करडी पीर या मुस्लिम पीराच्या देवस्थानास मौजे कोडोली गावी जमीन इनाम दिलेली दिसते. मुस्लिम काजीला मौजे कापील व कसबे औंध या दोन गावात जमीन इनाम दिलेली दिसते.

पंतप्रतिनिधींनी आपली राजधानी म्हणून काही काळाकरिता कराड गाव निवडले होते. कराड मध्ये अनेक छोटया मोठया देवस्थानांची व्यवस्था पाहण्यासाठी ब्राम्हण कुटूंबांना इनाम जमीनी दिलेल्या दिसतात. या इनाम जमीनी आजूबाजूच्या परिसरातील होत्या. इनाम जमीन दिलेल्या गावानुसार प्रत्येकास असे इनामपत्र दिले जात असे आणि या इनामपत्राची एक प्रत त्या गावाच्या देशमुख-देशपांडे यांना दिली जात असे. इनामपत्रांमध्ये काही जणांना संपूर्ण इनाम दिलेले दिसते तर काही जणांना दिलेल्या इनामापैकी तिजाई इनाम सरकारला दिलेले दिसते. काही इनामपत्रात सरकारने गोळा केलेले सध्याचे आणि भविष्यातील सर्व कर, पट्टया आणि तिजाई हे सर्व त्या इनामदारास दिलेले दिसते. एखादया व्यक्तीला किती प्रमाणात मदत देणे आवश्यक आहे हे पाहून त्या प्रकारचे इनाम दिले जात असावे. त्यामुळे

इनामपत्रात वेगवेगळे उल्लेख आढळतात. परंतु या सर्व इनामपत्रांतून धर्मादाय कारणांसाठी इनामे मोठया प्रमाणात दिलेली दिसतात.

श्रीनिवासराव पंडित प्रतिनिधी यांनी कराड येथील श्री संगमेश्वर व श्री आनंदेश्वर मजरे गोटे यांचा जीर्णोद्धार व स्थापना केली त्यांच्या व्यवस्थेसाठी श्री शाहू महाराजांना विनंती करुन इनाम दिले यात कराडमधील १ चावर जमीन, मौजे मुंढेमधील १ चावर अशी एकूण २ चावर जमीन स्वराज्य व मोगलाई दोन्ही काळात, व तिजाई, चवथाई इनाम देउन वतनदारांचे हक्क म्हणून सरकारने गोळा केलेले सर्व कर आणि इतर कर, सध्याची व संभाव्य पट्टी यांचे हक्कदार देवस्थानाचे पुजारी नेमून त्यांना नवीन इनाम करुन दिले.

**विविध प्रकारच्या करांची आकारणी -** जमीनीवरील साऱ्याव्यतिरिक्त, औंधमध्ये व्यापाऱ्यांवर लावला जाणारा मोहतर्फा तसेच कुरणांवर आणि प्राण्यांवर (मेंढरावर) देखिल कर आकारलेला आढळतो. जकातीच्या माध्यमातून अत्यंत अल्प प्रमाणात उत्पन्न मिळत असावे. इनामपत्रातील उल्लेखाप्रमाणे जकाती पैकी काही रक्कम खोताकडून इनाम दिलेल्या व्यक्तीस दिली जात असावी असे दिसते. अनेक छोटे मोठे कर लावून राज्याकडे उत्पन्न जमा करण्याचे धोरण राज्यकर्त्यांचे असलेले दिसते.

## ऐतिहासिक पत्रे -

**पत्र १.**

ता. २३-१२-१७०४ करडकर गिजरे दप्तर

आज्ञापत्र समस्त राजकार्य धुरंधर विश्वासनिधि ताा मोकदमानी मौजे सैदापूर प्राा कराड सुहूरसन खमस मया व आलफ मौजे मजकूर समस्त कराडकर ब्राम्हणास आग्रहार करुन दिल्हा आहे ऐसे असोन तुम्ही गावीचा ऐवज ब्राम्हणास पावत नाही त्यांचे आज्ञेत राहोन सुरलीत वर्तत नाही म्हणउन कळो आले तरी ही गोष्ट कमी पणे साठी आहे या उपर वेदमूर्ति रो मोरेश्वर जोशी गिजरे व गोविंदराव टोणपे वरकड ब्राम्हण त्यांचे आज्ञेत राहोन गावीचा ऐवज सुरलीत वसूल करणे फिरोन ब्राम्हणाचा बोभाट आलियावरी ताकीद होईल. रमजान पाा हुजूर.

(कराडकर गिजरे दप्तर, व सातारच्या प्रतिनिधि घराण्याचा इतिहास, ग्रंथांक २, रा अनंत नारायण भागवत व रा वामन परशुराम मेंहेदळे, औंध स्टेट प्रेस, पान ९)

**पत्र २.**

"कार्तिक व ाा ४ १६३६ ता.१४/११/१७१४

म ा ा अनाम देशमुख देशपांडे ताो परळी सुभा प ा ा सातारा वेदमुर्ती र ा ा विश्वनाथभट बिन केशवभट दिवेकर याजवरी राजश्री छत्रपति स्वामि कृपाळु होउन यासि धरादत्त पड जमीन इनाम दिली असे. मौजे अरे ताो माार अवल जमीन १५, दमू जमीन १०, सीमजमीन ६ एकूण जमीन पाव चावर अवल, दीम, सीम तीन प्रतिची इनाम दिली असे. तरी तुम्ही सदरहू जमीन दुमाला करुन कुलबाब व कुलकानु हालीपट्टी व पेस्तरपट्टी देखील तिजाई यासि व याचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेने इनाम चालविणे प्रतिवर्षि नूतन पत्राचा आक्षेप न करणे येविसी राजपत्रे अलाहिदा सादर आहेत त्याप्रमाणे इनाम चालवणे. या पत्राची प्रति लिहाने घेऊन हे पत्र भोगवटियास भट गोसावी याजवेळी परतून देणे. छ. १७ जिलकाद"

(सातारच्या प्रतिनिधि घराण्याचा इतिहास, ग्रथांक २, रा अनंत नारायण भागवत व रा वामन परशुराम मेंहेदळे, औंध स्टेट प्रेस, पान ४४३.)

**पत्र ३.**

"श्री"

"अज सुभा राजश्री सदाशिव सोमनाथ मामलतीचे काम चालविणार पेटा सातारा ताहा शेटे महाजन पेठ मंगळवार शहर मजकूर सु।। सलास सलासीन भयातैनव आलफ राजश्री परशराम पंडित प्रतिनिधी याणी हुजूर विनंती केली की, पेठ मजकूर पेशजी आम्हाकडे होती ती हाली सरकारात आहे., त्यास पेशजीप्रमाणे आम्हाकडे देण्याविसी आज्ञा व्हावी, पेठेची रखवालीबद्दल म्हणोन चार शिपाई सरकारांत नेहमी आम्ही देतो. त्यांजपासून चाकरी पाहिजे तिकडे घ्यावी., त्यास रोजमुरा आम्ही देत जाऊ, पेठेची रखवाली हाली सरकारातून होत आहे, त्याप्रमाणे नाहाली पाहिजे. म्हणोन त्याजवरुन स्वामी कृपाळू होऊन मंगळवार पेठ पेशजीप्रमाण प्रतिनिधी यांजकडे द्यावयाची ठरावून हे आज्ञापत्र सादर केले असे. तरी सदरहू पेठेची वहिवाट प्रतिनिधी दस्तुरमाफक करतील. त्याचे रजातलबेत वर्तव्याविसी शेटे माहाजन यास ताकीद करणे आणि पेठेच्या प्रति मजकूरचे हिशेबी रुपये २५।। आहेत, त्यापैकी सरदशेमुखीबद्दल पेशजीपासून सरकारांत येत आहेत, ते रुपये ४० व गावखर्च रुपये ७५।।६। एकूण ११५।।६। येकसे साडे पंधरा रुपये सव्वा सहा रेस वजा जाऊन बाकी वसुलीकडे रुपये १३७।। ९३।।। येकसे साडे सदतीस रुपये पावणे चबऱ्याणव रेस आहेत. ते पेस्तर सालापासून हिसेची प्रतिनिधी यांचे नावे दुमाला खर्च लिहित जाणे. या पत्राची नकल ठेवून असलपत्र दाखल्याकरिता प्रतिनिधी याजवळ देणे म्हणोन छ २३ जिल्हेज च्यारशे साहा आखचे आज्ञापत्र सादर जाहले, त्याजवरुन ही ताकीद सादर केली असे, तरी पंत प्रतिनिधी पेठ मजकूर येथील पेशजीप्रमाणे वहिवाट दस्तूरमाफक सरकार हुकूमाअन्वये करतील, त्यासी रुजू होऊन रजातलबेत वर्तणूक करीत जाणे आणि पेठेचे साल मजकूरचे हिशेबी जमा रुपये ४० पेशवीपासून सरकारात येतात. त्याप्रमाणे देत जाऊन पेठेकडील नेमणूकी खर्च रुपये ७५।।६। साडे पंच्याहात्तर रुपये सव्वा सहा रेस येकून येकेस साडे पंधरा रुपये सवासहा रेस वजा करुन बाकी रुपये १३७।।९३।।। येकून येकसे साडे सदतीस रुपये पावणे चवऱ्याहत्तर रेस पेस्तर सालापासून देत जाणे, आणि या ताकीदीची प्रति लिहूनय घेऊन असल ताकीद दाखल्यास परतोन देणे जाणिजे.

छ. २६ जिल्हेज मुरा तारीख १७ मे सन १८३३ इसवी"

मामलेदार सातारा

(सातारच्या प्रतिनिधि घराण्याचा इतिहास, ग्रंथांक २, रा अनंत नारायण भागवत व रा वामन परशुराम मेंहेदळे, औंध स्टेट प्रेस, पान २८८-२९०.)

**पत्र क्र ४**

श्री

माा आनाम देशमुख व देशपांडे काो इटे यांसि परशराम श्रीनिवास प्रतिनिधि सु ाा इहिदे समानीन मया व आलफ. वणीची मामलत सालगु ।। सन समानीनची सिदोजी जानकर देशगावडा प्रांा कराड यांजकडे सांगितली असे, तरी काा इटे येथील गावगना वनचराईची व बसकेची मेंढरे असतील त्याची टीप जानकर घेईल त्यास दर शेकडा रुपये ६ ४ सवासहा प्रोा आकाराबद्दल समानीनचा वसूल सुरलीत देणे व बाकी सन तिसाची वाजवी रुपवातीने निघेल ती देणे. जाणिजे छ १९ माहे सौवाल निदेश समक्ष.

राजते लेखनावधिःबार

(सातारच्या प्रतिनिधि घराण्याचा इतिहास, ग्रथांक ३, रा अनंत नारायण भागवत व रा वामन परशुराम मेंहेदळे, औंध स्टेट प्रेस, परिशिष्ठ ५, पान ४५०.)

**पत्र ५**

स्वस्तिश्री राज्याभिषेक शके ४९ शुभकृत संवछरे आधिक श्रावण शु ाा १४ इंदुवासरे क्षत्रीय कुलावतंस श्रीराजा शाहू छत्रपति स्वामी याणी मोकदमानी मौजे पाठखल तो. वंदन प्राा सातारा यासी आज्ञा केली ऐसीजे. वेदशास्त्रसंपन्न समस्त ब्राम्हण वगैरे वास्तव्य श्री परशराम क्षेत्र श्रीकृष्णावेणी संगम वटसंनिध मौजे खेड तर्फ मजकूर येथे समस्त ब्राम्हण वगैरे क्षेत्रीवास करुन स्नानसंध्यादिक शटकर्मे व तपप्रयोग आचरुन स्वामीस व स्वामीचे राजयास कल्याण चिंतून आहेत यांचे चालवणे आवश्यक जाणून स्वामी याजवरी कृपाळूं होउन मौजे माहुली खालसापैकी अवल दुम सीम तीन प्रतीची जमीन बिघे साडेपाच चाउर सात बिघे कुलबाब कुलकानु देखील स्वराज्य व मोगलाई आमल एकूण हली पटी व पेस्तरपटी खेरीज हकदार तुम्हास व तुमचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेने इनाम करुन देउन नांवनिशिीवार इनाम पत्रे दिली आहेत तर सदरहू प्रमाणे जमिन चतुःसिमापूर्वक तुम्ही आपले दुमाला करुन घेउन इनाम अनुरुप सुखरूप राहणे लेखनालंकार.

मर्यादेर्यविराजते.

(सातारच्या प्रतिनिधि घराण्याचा इतिहास, ग्रथांक २, रा अनंत नारायण भागवत व रा वामन परशुराम मेंहेदळे, औंध स्टेट प्रेस, परिशिष्ठ १, पान १६४ ते १६५).

**पत्र ६**

श्री

स्वस्तिश्री राज्यभिषेक शके ६९ दुंदुभी सवत्सरे जेष्ठ बहुल चतुर्थी भृगुवासर क्षत्रीये कुलावंतस श्री राजा शाहू छत्रपति स्वामी याणी देशमुख व देशपांडे पाा कऱ्हाड यासी आज्ञा केली ऐसिजे श्री. आंनदेस्वर व श्री संगमेस्वर वास्तव्य क्षेत्र कऱ्हाड संगम कृष्णा कुकुदप्रति येविसी राजश्री श्रीनिवास पंडित प्रतिनिधी याणी शाहूनगर नजीक किले सातारा येथील मुकामी स्वामी संन्निध विनंती केली की श्रीचा जीर्णोधार आपण करुन स्थापना केली आहे. ऐसी यासी स्वामीनी श्रीच्या नैवेद्य नंदादीप आभिषेक पुजे उर्जेबदल कांही इनाम जमीन देउन चालविले पाहिजे म्हणून विदीत केले त्यावरुन मनास आणून श्रीचा नैवेद्य नंदादीप आभिषेक पुजे उर्जा चालविलीया स्वामीस व स्वामीच्या राज्यास श्रेयस्कर ऐसे जाणून देहाय पा। कराड येथे जमीन चावर ची तपशील :-

कसबे कऱ्हाड पैकी जमीन चावर १ मौजे मुंढे पैकी जमीन चावर १ एकून दोन चावर जमीन स्वराज्य व मोगलाई एकून दुतर्फा व इनाम तिजाई व चवथाई कुलबाब कुलकानू देखील हालीपट्टी व पेस्तरपट्टी खेरीज हकदार करुन नूतन इनाम करुन दिल्हा असे तरी तुम्ही देहाय मजकूरपैकी सदरहू प्राा दोन चावर जमीन चतुःसीमापुर्वक श्रीच्या पुजार याचे दुमाला करुन इनाम चालवणे प्रतिवर्शी नवीन पत्राचा आक्षेप न करणे या पत्राची प्रति लिहून घेउन हे असल पत्र भोगवटीयास पुजारे याजपासी परतोन देणे जाणिजे लेखनालंकार

मर्यादेयंविराजते.

(सातारच्या प्रतिनिधि घराण्याचा इतिहास, ग्रंथांक २, रा अनंत नारायण भागवत व रा वामन परशुराम मेंहेदळे, औंध स्टेट प्रेस, परिशिष्ठ २, पान १७९ व १८०.)

**पत्र ७**

श. १५८९ श्रावण व.२
इ.स. १६६७ जुलै २७

(फारसी सिक्का पिंपळपानी)

बजानेच कारकुनानी हाल वा इस्तकबाल वा देसमुखानी पाा करहाड बिदानद की हर्ची सुहूर सन समनाम सितैन अलफ दरीविले निलकटभट बिन अमणभट अग्नीहोत्री सेकिन कसबे मजकूर हुजर माळूम केले जे आपणासी इनाम जमीन चावर वा धर्मादाउ बिाा

इनाम चावर पावणा
.।।।.

| मोज गोवारे | कासार-सिबें | खराडे |
|---|---|---|
| पाव .।. | .।. | .।. |

धर्मादाउ नकद वा बदल निमक वा तेल
ताळुक खाते जकात पाा माा दररोजीना रुके ३
धर्मादाऊ गावगना साड चौदा होन १४।।

| | |
|---|---|
| कसबे करहाड होनु १ | मौजे दुह होन १ |
| मौजे तुलसणी होनु १ | मौजे काटिये होन १ |
| मौजे सेभिये होन .।।. | मौजे वारुजी होन .।।. (वारुळी ?) |
| मौज वडिगाउ होन १ | मौजे वालगाउ होन .।।. |
| मौजे कडगाउ होन .।।. | मौजे गुडाले होन १ |
| मौजे सासवाडी होन १ | मौजे पाडली खुर्द होन .।।. |
| मौजे कोणेगाऊ होन .।।. | मौजे गुडी होन १ |
| मौजे कोरटी होन .।।. | मौजे गोवारे होन १ |
| मौजे खराडे होन .।।. | मौजे गोदी होन १ |
| मौजे खोडीद होन .।।. | |

येणेप्रमाणे बरहुकूम फरमान हुमायून वा खुर्दखत मोकासाई (वार?) यानी भोगवटे चालत आहे हाली पाा माा अमानत हवाले साहेबासी जाहले आहे नजर इनायेत करुन खुर्दखत मराहामत होये म्हणून तरी बराये माळुमाती (सी) खातिरेसी आणून सदरहु इनाम दुबाले केले आहे. भोगवटा वा तसरुफात सालबाद ताा साल गुाा चालिले प्रमाणे रुजू पाहून दुबाला कीजे हरसाला खुर्दखताचे उजूर न कीजे तालिक लिहून घेऊन असल परतून दीजे मोर्तब फारसी

रुजु

तेरींख १५ माहे सफर

(शिवचरित्र साहित्य खंड २ः भारत इतिहास संशोधन मंडळ, स्वीय ग्रंथमाला, पुणे, १९३०, पान २४१.)

## ii) नागाव (कोकण प्रांत)

'वतन' या अरबी शब्दाचा वापर महाराष्ट्रात मुस्लीम राजवटीत रुढ झाला. "सरकारकडून एखाद्या गावातील अधिकाऱ्याला मिळालेली जमीनीची देणगी म्हणजे वतन होय." [१] जोपर्यंत तो अधिकारी गावाचे काम पाहात असे तोपर्यंत ती जमीन त्याच्याकडे राहत असे. पण ती जमीन फक्त त्या व्यक्तीच्या मालकीची राहत नसून कुटुंबाच्या मालकीची बनत असे. जोपर्यंत कुटुंबातील एखादी व्यक्ती प्रामाणिकपणे गावाची नोकरी करीत असे तोपर्यंत ती जमीन वंशपरंपरेने त्या कुटुंबातच राहत असे.

"वतन म्हणजे वंशपरंपरेने आणि शाश्वतपणे उपभोगावयाची सारामुक्त जमीन होय."[२]

ज्यांना गावातील वंशपरंपरागत अधिकार दिलेले असत आणि ज्यांना या कामासाठी सरकारातून जमीन मिळत असे आणि ज्यांना गावात मानाचे स्थान असे त्यांना गावापासून काही हक्क मिळत असत. अशा लोकांना "देशक" म्हटले जाई. हे गावाचे कायमचे रहिवासी असत. जमीनीच्या मोबदल्यात ते गावकीची विविध प्रकारचे कामे करत असत. देशक यामध्ये देशमुख अथवा देसाई, सरदेशमुख, देशपांडे / देशकुलकर्णी, पाटील, कुलकर्णी, चौगुला शेटे, महाजन, महार इ.चा उल्लेख आढळतो. थोडक्यात हे राज्याचे अधिकारी शाश्वत होते. ज्या देशकांच्याकडे गावातील सनदी अथवा इतर कामे असत आणि ज्यांना कामासाठी शेतसारा माफ असे अशा लोकांना "वतनदार" म्हणत. [३]

(ऐतिहासिक पत्र ३) वतनदाराला आपल्या गावाची चाकरी करावी लागत असे आणि आवश्यकतेनुसार राजाज्ञेनुसार वतनाच्या बाहेर जाऊनही काम करावे लागत असे. गावचे परंपरागत अधिकारी म्हणजे पाटील आणि कुलकर्णी होय. गावचा ठरलेला सारा वसूल करणे ही या उभयतांची जबाबदारी असे. शेतकऱ्यांकडून, जमीन मालकांकडून वसूल झालेल्या साऱ्याचा हिशेब ठेवणे हे कुलकर्ण्यांचे काम असे. वसूल झालेला सारा (महसूल) पाटील सरकारी कचेरीत भरणा करीत असे. सामान्य रयत आणि सरकार यांचा त्याकाळी प्रत्यक्ष संबंध येत नसे. पाटील हा या दोघांना जोडणारा दुवा होता.

---

१. शिवकालीन महाराष्ट्रः डॉ.अ.रा.कुलकर्णी ,राजहंस प्रकाशन, द्वितीयावृत्ती, १९९७, पान २४.

२. शिवकालीन महाराष्ट्रः डॉ अ.रा.कुलकर्णी ,राजहंस प्रकाशन, द्वितीयावृत्ती, १९९७, पान २३.

३. रामचंद्रपंत अमात्यांचे आज्ञापत्रः डॉ.अ.रा.कुलकर्णी, डायमंड प्रकाशन, पुणे, २००७, पान ६०.

वतनदारांचे पालनपोषण सारा गाव करीत असे. गावकऱ्यांकडून त्याला रोख, नख्त किंवा वस्तूच्या रुपाने ज्याला 'गला' म्हणत. त्याच्या चाकरीचा, कामाचा मोबदला मिळत असे. त्याला राजाकडून किंवा तिथे असणाऱ्या सत्तेकडून दिलेल्या सनदेमध्ये त्याचे सर्व हक्क नमूद केलेले असत.

त्यामुळेच तो गावकऱ्यांकडून त्या सर्व हक्कांची वसूली कायदेशीरपणे करुन घेत असे.वतनदारांच्या या मोबदल्यास 'हकलाजिमा' असेही म्हणत असत. गावचा कारभार कार्यक्षम होण्यास या शाश्वत ग्रामाधिकाऱ्यांची अत्यंत गरज प्रत्येक काळात होती. त्यामुळे राजवटीत जरी बदल झाला तरी वतनदार बदलत नसत. कारण नव्या राजवटीला देखिल या ग्रामाधिकाऱ्यांच्या सेवेची तितकीच गरज असे.

वतन हे एक प्रकारचे इनामच होय. सनदी अथवा दिवाण निसबत इनाम हे राजसत्तेने सनद किंवा फर्मान यांच्याद्वारे निर्माण केलेले असे. अशा इनामांना काही वेळा संपूर्ण सरकारी शेतसारा माफ केलेला असे, तर काही वेळा त्याचा काही भाग १/२ किंवा १/३, १/४ भाग इनामधारकाला द्यावा लागत असे. अशा तऱ्हेने जेव्हा इनाम धारकाला साऱ्याचा काही भाग द्यावा लागत असे. तेव्हा या इनामाला, इनाम निमाई, इनाम तिजाई, चौथाई असे म्हणत.

**मुसलमानी राजवट** - या राजवटीतील राज्यकर्ते आपल्याला पैसा कसा मिळेल आणि आपला अधिकार कसा अबाधित राहिल याचाच विचार करीत असे. त्यामुळे या काळात वतनदारांचे महत्व वाढले. रयतेचे भवितव्य गावातील वतनदारांच्या हातात गेले. वतनदार मुसलमानी राज्यकर्त्यांना द्यावयाचा राज्यभाग ठरवून घेत आणि रयतेकडून भरमसाट वसूल घेत. यामुळे वतनदार श्रीमंत बनले. पैशाच्या सामर्थ्यामुळे हेच त्या भागाचे राजे बनू लागले आणि येणाऱ्या परकीय शत्रूला आधीच्या राज्यकर्त्यांचे जुलूम जोरजबर सांगून शरण जात असत. त्यामुळे या काळात सतत आक्रमणे आणि सत्ताबदल होत असे. ज्याचा फायदा वतनदार करुन घेत पण त्याचा सर्वात विपरीत परिणाम लोकांवर होत असे.

**मराठा काळ -** मध्ययुगीन महाराष्ट्रात निजामशाही किंवा आदिलशाही राजवटीतील वतनदारांनाच शिवाजी राजाच्या काळातही वतनदार म्हणून नेमलेले दिसते.
शिवाजी महाराजांच्या राजवटीत त्यांनी काही वतने निर्माण केल्याची उदाहरणे आहेत. [४]

बाळाजी आवजी चिटणीस आणि रामचंद्र निळकंठ यांना अनुक्रमे चिटणीस आणि सबनिसी वतने राजाकडून मिळाली होती. बकाजी फर्जद या आपल्या विश्वासू सेवकाला महाराजांनी पाटीलकी वतन दिले होते. [५]

जिजाबाईने एका कुलकर्ण्याच्या विधवेला १ चावर जमीन इनाम दिली होती. या प्रकारच्या इनामाला "चोळीखण" इनाम असेही म्हणत.

थोडक्यात वतने किंवा इनामे राजाकडून बहाल केली जात म्हणूनच त्यांना 'सनदी' अथवा 'दिवाण निसबत' इनामे म्हणत. वतनदारांची म्हणजे मुख्यतः पाटील-कुलकर्णी यांची नेमणूक करताना गावकऱ्यांची संमती घेतली जात असे. एखाद्या वतनदाराचा निर्वंश झाला असेल तर ते वतन अथवा इनाम सरकारजमा होत असे आणि योग्य वारस पुढे आला तरच सरकार ते वतन सर्व हक्कासह दुसऱ्या व्यक्तीकडे सुपूर्द करीत असे. वतनदार म्हणजेच गावातील अधिकाऱ्यांना शिवाजी महाराजांनी सूचना दिल्या होत्या की रयतेला सुखी ठेवून त्यांनी गावची जमीन नांगरटीखाली आणावी आणि

लागवडीखाली आणावयाच्या जमीनीत वाढ करावी. [६] शेतीचा विकास साधण्यासाठी शेतसाऱ्याच्या थकबाकीत सूट देणे, सारामुक्त जमीन देणे इ. मार्गांचा अवलंब सरकारकडून केला जात असे. लढाईच्या काळात रयतेचे रक्षण करणे हे परगण्याच्या वतनदारांचे आद्य कर्तव्य मानले जात असे. त्यांच्या कुचराईमुळे शेतकऱ्याला काही इजा पोचल्यास त्यांना जबाबदार धरले जाईल अशी ताकीद देण्यात येत असे.

शिवाजी महाराजांनी वतनदारांच्या सर्व गोष्टींचा अभ्यास केला आणि त्यानुसार वतनदारासंबंधीचे धोरण ठरविले. शिवाजीने देशमुख व देशकुलकर्णी, पाटील, कुलकर्णी यांचे हक्क बांधून दिले. त्यांची गाववार नेमणूक केली आणि त्याबदल्यात त्यांना (नख्त) रोख पगार दिला त्यामुळे रयतेचा आणि त्यांचा प्रत्यक्ष संबंध राहिला नाही. वतनदाराच्या ताब्यात रयतेला राहण्याची आवश्यकताच राहिली नाही.

**चौल नागाव येथील वतनदारी पध्दत्तीचे प्रकार -** पेशवाईनंतर मात्र वतनदारीचे खोती, शिळोत्री वतन असे काही प्रकार कोकण प्रांतात निर्माण झालेले दिसतात.

४. शिवकालीन पत्रसारसंग्रह, खंड ३ः भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे, पान २७०६.

५. शिवचरित्र साहित्य, खंड २ः भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे, पान ६२१, १७८१.

६. शिवकालीन महाराष्ट्रः डॉ.अ.रा.कुलकर्णी ,राजहंस प्रकाशन, द्वितीयावृत्ती, १९९७, पान ४३,सनदापत्रे,पान १०२.

**शिलोत्तरी वतन** - शिलोत्तरी वतनदारी कोकण प्रांतात मुख्यत्वे अलिबाग, पेण, पनवेल व उरण तालुक्यात अस्तित्वात होती. सवलतीच्या अटीवर आधारलेल्या या वहिवाटीनुसार खार जमीनी लागवडीखाली आणण्यास व त्यांची निगा राखण्यास उत्तेजन देण्यात येत असे. अशा प्रकारच्या जमीनी खाडीजवळ असतात. शिलोतरीदार हे त्याकाळी श्रीमंत होते. त्यामुळे त्यांनी अशा प्रकारच्या बऱ्याच जमीनी ताब्यात घेतल्या होत्या. या जमीनींना इस्तावा असेही म्हणत. लहान लहान खाडयांच्या तोडांशी बांध घालून अशा जमीनी लागवडीखाली आणलेल्या होत्या आणि हे बांध टिकून राहिले तरच त्या कायम लागवडीखाली राहू शकत. खारजमीन ही समुद्र किनाऱ्यालगतच आढळते. ज्या ठिकाणी नद्या समुद्राला मिळतात अशा प्रदेशात समुद्राच्या खाऱ्या पाण्यामुळे खारी जमीन तयार होते.

ही जमीन सपाट असली तरी समुद्राचे पाणी पसरल्यामुळे नापीक बनते. खार जमीनीचे पुर्नप्रापण व खाऱ्या पाण्यास प्रतिबंध या मोठया समस्या आहेत. याबाबत अठराव्या शतकापासून प्रयत्न करण्यात येत होते. समुद्राच्या भरतीखालील जमीनी शेतीच्या उपयोगी करण्यास खार पाडणे असे म्हणतात. अशा शेतीस खारेपाट म्हणतात. [७]

या कामी सरखेल कान्होजी आंग्रेच्या काळात उत्तेजन दिले गेले. खाडयांचे पाणी अडविण्यासाठी बंधारे बांधण्याचे कामही आंग्रे काळात केले गेले. (विशेषतः १७५५ ते १७८० दरम्यान) खारे पाणी अडविण्यासाठी बांधलेल्या बंधाऱ्याला एक द्वार असे तेथे शिळा बसविली जात असे. या दाराची व शिळेची देखरेख करण्यासाठी नेमलेल्या व्यक्तीस काही हक्क किंवा वतन दिले जात असे. त्यालाच शिलोत्तरी पाटीलकी म्हणत किंवा शिळोत्री वतन म्हणत.

चौलमध्ये देखिल असे शिलोत्तरी वतन देण्याची पध्दत असलेली दिसते. (ऐतिहासिक पत्र. १) इ.स.१९५५ च्या मुंबई शिलोतरी धारणाधिकार (कुलाबा) निर्मूलन अधिनियमानुसार १ फेब्रुवारी १९५६ पासून ही वतनदारी नष्ट करण्यात आली. [८]

**खोती पद्धत** - ही पेशवाई काळापासून मुख्यत्वे कोकण प्रांतात अस्तित्वात होती. ही पध्दत जहागिरी आणि इनामदारी पध्दत्तीतून सुरु झाली होती. गावचा सारा वसूल करण्यासाठी

---

७. रायगड गॅझेटिअर :महाराष्ट्र शासन, शासकीय मुद्रणालय,मंबई, १९९३, पान ५९६.
८. रायगड गॅझेटिअर :महाराष्ट्र शासन, शासकीय मुद्रणालय,मंबई, १९९३, पान ५९७.

त्यावेळचे सरकार विशिष्ट व्यक्तींना सनदेने काही हक्क देत असे. खोताने जमीन धारकाकडून वसूल करावयाचा सारा ऐनजिनसी देखिल असे. म्हणजेच जमीनीत पिकणाऱ्या पदार्थाचा प्रत्येक जमीनदाराला काही अंश सरकारकडे भरणा करावा लागे. त्याचे प्रमाण १/६ पासून १/३ पर्यंत होते.

पूरातन काळापासून कर वसूलीसाठी अंमलदार नेमण्याची पध्दत होती. त्यात खोतांना सनद दिली जात असे. या वसूली करणाऱ्या अंमलदारास आपला मेहनताना सरकारात भरावयाच्या धान्याच्या प्रमाणातील साऱ्यातून काही प्रमाणात राखून ठेवण्याचा अधिकारही दिलेला असे. तो प्रत्येक ठिकाणी असणाऱ्या वहिवाटीप्रमाणे कमीअधिक असे. काही ठिकाणी दर खंडी सारा वसूली मागे १ कुडव खोतांना घेण्याचा अधिकार असल्याचे दिसते. (कुडव म्हणजे अडीच पायली) काही ठिकाणी सारा वसूलीच्या फक्त १ भाग खोतांना घेण्याचा अधिकार असल्याचे दिसते. परंतू काही ठिकाणी मात्र सारा वसूलीच्या प्रमाणात खोताचा हक्क नसून खोत हा त्याला दिलेल्या हक्कान्वये म्हणजेच सनदेने गावाचा सर्वस्वी मालक असेल तर गावातील जमीन कसणाऱ्यांकडून भाताच्या उत्पन्नाचे 'अर्धेल' व वरकस

उत्पन्नाचे 'तीर्देल' असा वसूल करण्याची वहिवाट होती. [९] शिवाय गावातील लागवड न केलेल्या जमीनीवर तसेच जंगलावर मालकीप्रमाणे खोताचा हक्क असे. त्यातील सर्व उत्पन्न खोतानेच घेण्याची पध्दत्त होती. खोताच्या सर्वांकुश अधिकारामुळे खोत आपापल्या गावात जमीन कसणाऱ्यांकडून वेगवेगळया प्रकारे त्यांच्या श्रमाचा फायदा स्वतःकरिता मिळवीत असे.

कोकणात शिवकाळात अण्णाजी दत्तोनी सुरु केलेली जमीनधारा पद्धत संभाजी राजेंच्या कारकीर्दीनंतर हळूहळू लोप पावली आणि पेशव्यांच्या कारकिर्दीत मुख्यत्वे खोती हे सरकारी नोकरीचे वतन निर्माण झाले. सरकारी सारा वसूल करण्याबरोबरच खोतांकडे पोलिसी अधिकारही होते. ब्रिटीश अमदानीच्या सुरुवातीस ब्रिटीश राजवटीने सर्व्हे सेटलमेंट ॲक्ट लागू करुन गावांचा सर्व्हे केला व जमिनीवर सारा बसविला. साऱ्याच्या आकारणीचे प्रमाण उत्तम जमीनीस एकरी चार आण्यापासून जास्तीत जास्त एक रुपया असे केले. त्यांनी खोती विभागाकरीता १८७० मध्ये खोत सेटलमेंट ॲक्ट लागू केला. [१०]

---

९. शिवकालीन महाराष्ट्रः डॉ.अ.रा.कुलकर्णी ,राजहंस प्रकाशन, द्वितीयावृत्ती, १९९७, पान ४५.
१०. रायगड गॅझेटिअर : महाराष्ट्र शासन, शासकीय मुद्रणालय,मंबई, १९९३, पान ५९५.

या काळात खोती पध्दत फक्त कोकणाच्या दोन जिल्हयात अस्तित्वात होती. आजचा सिंधुदुर्ग, रत्नागिरी व रायगडचा दक्षिण भाग पेण तालुक्यापर्यंत रत्नागिरी जिल्हा पनवेल कर्जतपासून ठाणे जिल्हयाचा दक्षिण भाग हा ठाणे जिल्हा होता. ब्रिटीश सरकारने खोती पध्दतीचा खरा अर्थ लावून खोतांच्या हक्कांची शहानिशा करण्यासाठी १९०७ मध्ये श्री अच्युत भास्कर देसाई या मामलेदारास कमिशनर नेमले. श्री. देसाई यांच्या चौकशीत "खोत हे वंशपरंपरा शेतजमीनीचा खंड वसूल करुन तो सरकारला भरणा करणारे हक्कदार" असल्याचे स्पष्ट झाले. [११] चौल-नागावमध्ये बागायती शेतीशिवाय उत्पन्नाची इतर साधने दिसतात. त्यामुळे येथील लोकांवर आंग्रेसरकारने आणि पेशव्यांनी अनेक कर आकारलेले दिसतात. आंग्रे यांच्याकडे पेशवेकाळात कोकण प्रांतातील चौल या गावांमध्ये असणाऱ्या वतनदार आणि इनामदार खोत या सरकारी अधिकाऱ्यांचे हक्क, अधिकार काही ऐतिहासिक पत्रांआधारे आढळतात. त्यामधून कोकण प्रांतात असणारी महसूली व्यवस्था स्पष्ट होते.

कोकण प्रांतामध्ये पेशवे आणि आंग्रे यांच्या राजवटीमध्ये इनामदारांच्या माध्यमातून छोटया गावातील वसूल जमा केला जात असे. ऐतिहासिक पत्रांच्या आधारे इनामदारांना तसे अधिकार दिलेले दिसतात. इनामदार आणि खोत हे या काळातील वसूली अधिकारी (अंमलदार) असल्यामुळे त्यांना १, २ गावांचा वसूल लावून दिलेला दिसतो.

चौल सुभ्यामध्ये आंग्रेनी अनेक इनामदारांना अशी वतने दिलेली दिसतात. परंतु चौल हा बागायती सुभा होता. त्यामुळे येथील उत्पन्नाचा आंग्रेनी वेगळया पध्दत्तीने विचार केलेला दिसतो. तसेच चौल नागाव परिसरातील बंदरी भागामुळे येथे जकातीसारखे उत्पन्नाचे मार्ग आंग्रेनी निर्माण केलेले दिसतात.

**कर रचना –** कोकण प्रांतातील चौल सुभ्यातील नागाव महाल यात पेशवे आणि आंग्रे या दोन सत्ताधीशांच्या काळात निर्माण करण्यात आलेली कररचना एकसारखी असलेली दिसते.

नागाव महाल बागायती उत्पन्न देणारा आणि समुद्रकिनाऱ्यालगतचा प्रदेश आहे. त्यामुळे बागायती उत्पन्नावर आंग्रे सरकारने अनेक प्रकारे कर आकारलेले दिसतात. तसेच समुद्र किनाऱ्यालगतचा प्रदेश असल्याने बंदराच्या ठिकाणी आंग्रेनी जकातीसारख्या माध्यमातून सरकारला उत्पन्न प्राप्त केले आहे. मराठाकाळात महाराष्ट्रात इतरत्र आढळणारी जशी कररचना होती त्याप्रमाणेच चौल सुभ्यामध्ये ही होती. चौल हा कोकणातील भाग

११. रायगड गॅझेटिअर : महाराष्ट्र शासन, शासकीय मुद्रणालय,मंबई, १९९३, पान ५९५.

असल्याने या भागात खोती पद्धत अस्तित्त्वात होती. जमीन महसूला व्यतिरिक्त असणाऱ्या इतर उत्पन्नाच्या मार्गावरही चौल-नागावमध्ये कर लावण्यात आलेले आढळतात. याशिवाय येथे राहणाऱ्या गरीब ब्राम्हणांना, गरजूंना आंग्रेनी आणि पेशवेंनी इनाम म्हणन भात जमिनी दिल्याचे आढळते.

**करांचे वर्गीकरण -**

नागाव महालामध्ये घेतले जाणारे कर -

**१) घरटक्का -** घरांवर आकारलेला कर म्हणजे घरटक्का. हा महालात जमा करण्याची पध्दत होती. नागाव महालातील घरांची दरवर्षी मोजणी होत असे. त्याला 'घर टीपेस लागणे' अशी संज्ञा होती. टीप झाल्यावर कोणत्या घरास घरटक्का किती लावायचा, कोणाला माफ करावयाचा हे ठरत असे.[१२] घरांची प्रतवारी केलेली असे.

शेती आणि बागायतीसाठी नागावकरांना नोकर ठेवावा लागत असे. बागायती क्षेत्राला पाणी देणे, लागवड करणे, नारळ-सुपारी पाडणे, झाप विणणे या कामांसाठी नोकर किंवा माळी ठेवण्याची प्रथा नागावमध्ये फार पूर्वी पासूनच आढळते. इ.स. १७७२-७३ मध्येही माळयाला पहिली तीन वर्षे घरटक्का व वेठी [१३] माफ असे. तीन वर्षानंतर मात्र त्याच्यावर घरटक्का आकारीत व त्याला दर महिन्याला सरकारला दोन वेठी द्याव्या लागत. नोकर ठेवल्यास त्यालाही सुरुवातीची काही वर्षे घरटक्का माफ असे. [१४]

सनदी नोकर सरकारच्या कामात मदत करणारे, म्हणून ब्राम्हण व प्रभुंचा सुबुध्द सुशिक्षित समाज नागावांत नांदावा म्हणून त्यांना घरटक्का माफ केलेला दिसतो. विशेष संसर्गजन्य रोग झालेला असल्यास वेगळी झोपडी बांधून देवून सर्व कर माफ केले जात असत. गरीब, कुणबिनीं यांची आर्थिक कुवत नाही म्हणून आंग्रे सरकारने यांना घरटक्का माफ केलेला दिसतो. [१५]

---

१२. आंग्रे दप्तर रूमाल नं. ६३७, पान १२०.

१३. वेठ -श्रम देणे, मोबदल्याशिवाय काम करणे.

१४. नागाव-आर्थिक व सामाजिक जीवन, १७६०-१८४०ः शां.वि. आवळसकर, गोखले अर्थशास्त्र संस्था,पुणे १९६२, ८वे प्रकाशन, पान ५७.

१५. नागाव-आर्थिक व सामाजिक जीवन, १७६०-१८४०ः शां.वि. आवळसकर, गोखले अर्थशास्त्र संस्था,पुणे १९६२, ८वे प्रकाशन, पान५८. आंदरु नं. १३४, पान ५०,५६, आंदरु नं. ६३७, पान १३३, आंदरु नं. ६३९, पान १६४, १७४, कोंजरु नं. १३७, पान ३३, म.ना. उप्रपदेश नं. ६३६, ६३७.

१६. नागाव-आर्थिक व सामाजिक जीवन १७६०-१८४०ः शां.वि.आवळसकर, गोखले अर्थशास्त्र संस्था,पुणे, १९६२ आठवे प्रकाशन, पान ५९.

**तक्ता क्र. २२. नागावमधील घरटक्का देणारी घरे आणि आकार -(रूपये)**

| इ.स. | एकूण घरे | घरटक्का देणारी घरे | प्रति घरे २ [illegible] रु | प्रतिघरे १॥रु | प्रतिघरे १ [illegible] रु | प्रतिघरे २ [illegible] रु | प्रतिघरे १ [illegible] रु | आकार रुपये |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १७९८-९९ | ४९४ | २४७ | १६५ | २६ | ४१ | १० | ५ | ४५८ [illegible] |
| १८१९-२० | ६२३ | २९६ | १६६ | ३६ | ७९ | ९ | ६ | ५१५ [illegible] |
| १८२९-३० | ६३२ | ३०९ | १४४ | २८ | ११७ | ७ | ७ | ४९७ [illegible] |

**२) वनटक्का** - वनटक्का म्हणजे गुरांढोरांवरील कर होय. शेतीवर महसूल असल्यामुळे, शेतीचे साधन जे बैल व रेडे, त्यावर कर आकारला जात नसे. पण हा कर प्रामुख्याने म्हशींवर आकारला जात असे. दर म्हशीवर हा कर १५॥ आणे होता. [१६] पण तो सर्वच म्हशींवर आकारला जात नसे. म्हशींच्या स्थितीनुसार हा कर आकारला जात असे. वनटक्का आकारण्यापूर्वी सर्व म्हशींची टीप घेतली जात असे. नोंदीनंतरही संख्या वाढलेली आढळली तर वाढीव संख्येवर वनटक्का आकारीत.

दरवर्षी किती म्हशी नवीन आणल्या व मेल्या याचा हिशेब सरकारजवळ नोंदवलेला असे. उदा. इ.स. १८३८-३९ मध्ये चार म्हशी मेल्या व इ.स. १८३९-४० मध्ये बारा म्हशी नव्या खरेदी केल्याचे टिपण आढळते. [१७]

नागावमध्ये जी गुरे बाहेरुन खरेदी करुन आणली जात असत त्या गुरांवर नजराणा आणि जकात भरावी लागत असल्याचे दिसते. जकात आणि नजराणा आंग्रे सरकार घेत असे. पण तो किती प्रमाणात घ्यावा हे निश्चित केलेले नसावे. उदा. बालाजी काणे यांनी म्हैस खरेदी केली. त्याबद्दल त्यांनी २ रु. नजराणा भरला पण त्यास १ रु. बक्षीस म्हणून परत देवून १ रु. स्विकारण्यात आला. [१८]

---

१७. आंग्रे दप्तर रूमाल, नं. ६३८, पान १६४, १७४, १७५.
१८. आंग्रे दप्तर रूमाल, नं. २४९, पान १०३.
१९. आंदरु नं. १३४, पान ५१ व ५७, आंदरु नं. ६३८, पान १६४, १७४, १७५.

**तक्ता क्र. २३. नागावमधील वनटक्का व आकार -**[१९]

| इ.स. | एकूण म्हैशी | आकार रुपये |
|---|---|---|
| १७९८-९९ | ३३५ | १०० ||| (शंभर रु.३ आणे) |
| १८१९-२० | २९७ | ८३ \|⁻ (त्र्याऐंशी रु. १ आणा १ पैसा) |
| १८३८-३९ | २७१ | ४० ॥≡ (चाळीस रु. २ आण ३ पैसे) |

एकुणच नागावमधील म्हशींची संख्या पाहता असे म्हणता येईल की नागाव महालात दुधदूभतें भरपूर नव्हते. गरजेपुरती गुरेढोरे या भागात पाळली गेलेली दिसतात. पण तरीही जी काही गुरेढोरे होती त्यावर देखील कर आकारला जात असे. अगदी त्याचे उत्पन्न अल्प असले तरी ते एक सरकारचे उत्पन्नाचे साधन होते हे महत्वाचे.

**३) मोहतर्फा** - मोहतर्फा म्हणजे गांवचे कारागीर, दुकानदार यांवरील कर. नागाव महालांत या कराची आकारणी ज्यावर होत असे, ते व्यावसायिक म्हणजे गवंडी, भंडारी, शिंपी, कुंभार, बुरुड, हजाम, दुकानदार, तेली, सोनार, लोहार, चांभार, परीट, साळी, सुतार, कोळी, ज्यांची एकूण संख्या ९० होती.[२०]

**तक्ता क्र. २४. नागावमधील मोहतर्फा वसुली -**

| इ.स. | कर एकूण रु. |
|---|---|
| १७९८-९९ | १४४ ॥= |
| १८०६-०७ | १३७ ·|||≡ |
| १८१६-१७ | १३१ ०≡ |
| १८२९-३० | १३७ ·|||=॥· |

नागावची ही मोहतर्फा वसुली सामान्यपणे फारसा चढउतार नसल्याची दिसते. या रकमेत दोन भाग पडतात. ऐन दस्त व दुसरा बाबती, ऐन दस्त सरकारचा हिस्सा व बाबतीत वतदारांचा वाटा असे. [२१] किराणा, भुसार इत्यादी विविध वस्तु विकणाऱ्या दुकानदारांना हा

२०. महाल नागाव अप्रकाशित पेशवे दप्तर रुमाल नं. ६३६.
२१. आंग्रे दप्तर रूमाल नं. १३४, पान ५०-५७ नं. ६३७ पान १३३, ६३६, पान ११३,११४.
२२. आंग्रे दप्तर रुमाल नं. २४९, पान १०५ ते १०७.

कर द्यावा लागत असे पण नागावात दुकानदारांची संख्या फार थोडी असलेली दिसते.

**४) लग्नटक्का** – नागावचे ब्राम्हण व प्रभू यांना लग्नटक्का माफ होता. पण अन्य जातींच्या प्रथम विवाहाच्या वेळी दोन्ही पक्षाकडून प्रत्येकी १ रुपया लग्नटक्का घेतला गेलेला दिसतो. उदा. १८१९-२० मध्ये नागावांत २३ विवाह झाले. त्यांची नोंद आढळते. [२२]

**५) ठराव पट्टी** –आंग्रेकाळात कारणपरत्वे हा कर घेतला गेला. इ.स. १८०७-०८ मध्ये हा कर घेतला गेला. एकूण ५५८ घरांकडून सरकारने १०८४ रु. ठराव पट्टी वसूल केलेली दिसते. [२२] ठराव पट्टीची कारणे कळत नाहीत. पण ती १ वर्षापूरतीच म्हणजे नैमित्तिक होती असे म्हणता येईल.

**६) संतोष पट्टी** – ज्याप्रमाणे रावबाजी पेशवे झाले. त्यामुळे लोकांना संतोष आनंद झाला. म्हणून पूणेकरांकडून पेशव्यांनी जशी संतोष पट्टी वसूल केली होती. तशीच नागावात दिवाणजी बिवलकरांनी ही पट्टी बसविली. प्रत्येक घरास १ रु. प्रमाणे ती आकारली होती.[२४]

**७) दही-बकरे** - हा कर बकरी पाळणारे व गवळी यांच्या व्यवसायावरील आहे. म्हैशी पाळणाऱ्यांवर दही टक्का आकारीत. ब्राम्हणेत्तर बकरी पाळीत त्यांवर बकऱ्यांचा कर घेतला जात असे.

इ.स. १८०६-०७ मध्ये दहीटक्का १० रु. व बकऱ्यांवरील कर २५ रु. मिळून ३५ रु. वसूल झाले. इ.स. १८०६-०७ मध्ये व १८१६-१७ मध्ये ही रक्कम ३५ रु. जमा झालेली दिसते.

इ.स. १८४०-४१ मध्ये हा कर फक्त ४|||‑ रु. जमा झाला. [२५] हा कर देखिल अत्यल्प असला तरी तो आंग्रे सरकारकडून वसूल केला जात होता हे दिसून येते.

**८) पहीण कोंबडेपट्टी** – नागावचे जे लोक कोंबडी पाळणारे होते त्यांना हा कर द्यावा लागत असे. इ.स. १८४०-४१ मध्ये एकूण ६३२ घरे नागावांत होती. पण त्यापैकी ३५४ घरांवर ही पट्टी नव्हतीच कारण ही घरे ब्राम्हणांची, सरकारी इमारती, मंदिरे अशी होती. उरलेल्या २७८ घरांपैकी सुध्दा फक्त २४ घरांवर हा कर आकारलेला दिसतो. इ.स. १८००-०१ मध्ये १२९ कोंबडया व त्यावर वसूली ८•।।• रु जमा झाल्याचे दिसते. [२६]

२३. आंग्रे दप्तर रूमाल नं. ६३६, पान १५२.
२४. आंग्रे दप्तर रूमाल नं. ६३७, पान १२४.
२५. आंग्रे दप्तर रूमाल नं. ६३७, पान १३३ व आंदरु नं. ६३६, पान ११३,११४.
२६. आंग्रे दप्तर रूमाल नं. ६०१, पान ७७.
२७. आंदरु नं. १३४, पान ५५, आंदरु नं. ६३८, पान १७४.

**९) तुप उडीद मोईन** - मोईन म्हणजे वार्षिक नेमणुक किंवा ठराव होय. तूप आणि उडीद यावर हा कर घेतला जात असे. [२७]

इ.स.१८३९-४० पर्यंत तुपावर मणामागे १० रु. हा कर होता. तो यावर्षी ७ रु. करण्यात आला व उडदावर मणामागे ॥। रु कमी करण्यात आला. [२८]

एकूणच आंग्रे सरकारने अनेक छोटे मोठे कर त्यांच्या प्रदेशात लावलेले दिसतात. या सर्व करापासून मिळणारे उत्पन्न कमी असले तरी ते सर्व सरकारने वसूल केलेले दिसतात.

**१०) जमीन महसूल** - आंग्रे काळात साधारणपणे १२ वर्षानंतर जमीन-मोजणी करण्याची पद्धत होती. अष्टागरात पावसाचे स्वरुप लहरी होते. त्यामुळे आंग्रेंच्या राजवटीतील भाताचे ऐनजिनसी उत्पन्न दरसाल बदलणारे होते.

शेतात पीक उभे असताना सरकार ऐनजिनसी वसूलाची पाहणी करुन सरकारी अंमलदार उत्पन्नाचा अंदाज बांधीत असत. [२९] सारा म्हणून भाताची वसूली करीत असताना त्या काळी दर मणास १ शेर भात जास्त वसूल केला जात असे. इ.स. १८२० पर्यंत ही पद्धत चालू होती. (जास्त भात आकारण्याचे कारण म्हणजे भात सुकून, चोळून कमी होत असे.)

**तक्ता क्र. २५. जमीनीच्या प्रकारानुसार महसूल दर -**

| | |
|---|---|
| अव्वल जमीन | १२ मण भात |
| दुय्यम जमीन | १० मण भात |
| तिसरी प्रत | ८ मण भात |
| चौथी प्रत | ८-५ मण भात |

भात हेच नागावचे मुख्य जिरायती उत्पन्न होते.

इ.स. १७९७-९८ पासूनच नागावमधील काही जमीनींमध्ये दुसरे पीक ही घेतले जाऊ लागले. सरकारने अशा पिकांना उत्तेजन देण्यासाठी दर बिघ्यास १ रु. बाबती घेण्याचा ठराव केला होता.[३०]

२८. आंग्रे दप्तर रूमाल नं. ६३८, पान १७५.
२९. महाल.नागाव. अप्रकाशित पेशवे दप्तर रुमाल नं. ६३६.
३०. बाबती- जमीनदारांचा वाटा, आंग्रे दप्तर रूमाल १३४, पान ६५.
३१. म.ना. अप्रपदेरु नं. ६३६, ६३७.

इ.स.१८०८-०९ मध्ये तागाचे पीक घेण्यात आले. यातून सरकारला ११ ।। रु कर मिळाला. [३१] वरकस जागेत इ.स. १७९८-९९ मध्ये उडीद पेरला होता. त्यापासून ४६ ।। रु उत्पन्न सरकारला मिळाले. [३२] भातशेतीबरोबरच नागावमध्ये बागायती क्षेत्रही होते. सुमारे ४५४ बिघे क्षेत्र बागायतांचे होते. नागावमध्ये सुपारी, नारळ याबरोबर उंडी, फणस, ताड या झाडांचे उत्पन्न महत्त्वाचे मानले जात असे. उंडीच्या तेलाचा उपयोग समईसाठी केला जात असल्याने ते झाड लावण्याची पद्धत नागाव परिसरात दिसते. सुपारी-नारळ यांचे उत्पन्न सरकारकडून जमेत धरण्याची पद्धती होती.

इ.स. १८१२-१३मधील उत्पन्न आकारण्याचा पूर्वशिरस्ता नारळांच्या झाडांच्या प्रकारानुसार त्यावर महसूल आकारला जात असे. [३३] आंग्रेकाळात उत्पन्नास आलेल्या झाडांवरच आकार घेत असत.

बारदार, भंडारमाड आणि सूट माड यांच्या नारळांची बेरीज करून एकूण नारळांचे उत्पन्न काढले जात असे. यातील १/३ प्रजाभाग आणि २/३ राजभाग ठरत असे.

उदा. इ.स. १८१२-१३ मध्ये नारळाची झाडे १०,००८

| | |
|---|---|
| ९८६९ बारदार माडांचे नारळ | १,४१,४१५ |
| ४९ भंडारमाडांचे दर ६५ नारळ प्रमाणे | ३,१८५ |
| ९० सूट माड दर ३५ प्रमाणे | ३,१५० |
| | १,४७,७५० |

यातील १/३ प्रजाभाग (४९१३९ नारळ) आणि २/३ राजभाग (९८६११ नारळ)

राजभाग हे सरकारी उत्पन्न तर प्रजाभाग हे वाडकरांचे उत्पन्न असे. त्याकाळात राजभागाला झूकते माप दिलेले होते. (प्रजाभागाच्या दूपटीहून राजभाग जास्त) नारळ, सुपारीची अशी ऐनजिनसी मोजणी झाल्यावर त्याचे रोख पैशातही रुपांतर केले जात असे.

उदा. राजभागाच्या नारळाचा शेकडा भाव १॥।=रु. (१ रु. बारा आणे २ पैसे)

प्रजाभाग नारळांवर नफा शेकडा ।≡ रु.(चार आणे ३ पैसे) आकारावयाचा तो सरकारला द्यायचा.

राजभाग व प्रजाभाग सर्व उत्पन्नावर जकात शेकडा ॰~रु. (आण्याचा अभाव -१ पैसा) आकारली जात असे व ती सरकारला दिले जात असे.

---

**३२.** आंग्रे दप्तर रूमाल नं. १३४ पान, ५९, नं.६३७, पान १३३.

३३. आंग्रे दप्तर रूमाल नं. ६३७, पान १२२.

३४. नागाव-आर्थिक व सामाजिक जीवन (१७६०-१८४०): शां. वि. आवळसकर, गोखले अर्थशास्त्र संस्था, पुणे, १९६२, आठवे प्रकाशन. पान

सरदेशमुखी शेकडा १० रु. सरकारची पोतदारी दर शेकडा रुपयांवर १॥· आकारावयाची (१ रु. आठ आणे १ पैसा) [३४]

सुपारीच्या झाडांचे उत्पन्न आकारण्याची पद्धत - बारदार झाडाच्या दर शिपटास (सुपारीचा पड) सुपारी वजन दीड शेर प्रमाणे होते. एकूण सुपारीचा तिसरा हिस्सा प्रजाभाग व दोन हिस्से राजभाग अशी वाटणी केली जात असे.

ऐन किंमत दरमणी (प्रत्येक मणास) ३ रु. धरुन त्याची रोख किंमत ठरविली जात असे.

प्रजाभागावर नफा दरमणी ·॥=। रु. (१० आणे १ पैसा)

जकात प्रजाभाग व राजभाग मिळून दरमणी रु. ०=॥(२ आणे २ पैसे)

सरदेशमुखी दर १०० रुपयांवर १० रु. पोतदारी दर रुपयांत ०।· (एक पैसा)

<u>उंडी, फणस यांचे उत्पन्न आकारण्याची पद्धत</u> –

बारदार झाडास ·|· रु. राजभाग

सरदेशमुखी दर शेकडा १० रु.

पोतदारी दरशेकडा १॥- रु

अशा प्रकारे बागायतीचे उत्पन्न सरकारला मिळत असे. [३५]

सरकारी उत्पन्न आकारण्याची ही पध्दती इ.स. १७९८ ते १८४१ पर्यंत एकच होती.

नागावमधील बागायतीचे उत्पन्न १७९९-१८०० नंतर खालावत गेले आणि ही स्थिती आंग्रे सत्तेच्या अखेरीपर्यंत कायम राहिली.

बागायतांतील आणखी एक उत्पन्नाची बाब म्हणजे झाप-नारळाची पाने.

पानांच्या हातांनी बनविलेल्या चटया-झापाच्या उत्पन्नाच्या दृष्टीने माडांची प्रतवारी केलेली दिसते. त्यानुसार प्रत्येक झाडाचे ४,३ किंवा २ झाप हे सरकारी उत्पन्न होते. आंग्रे काळात सरकारी इमारतींच्या शाकारणीसाठी, गलबते बंदरात नांगरलेली असताना त्यावर झाप शाकारणीसाठी वापरले जात.

इ.स. १८०८-०९ मध्ये कुलाब्यात ६१ हजार झाप नेलेले आढळतात.

इ.स. १८१९-२० मध्ये ६० हजार झाप कुलाब्यास नेण्यात आलेले दिसतात.

---

३५. आंग्रे दप्तर रूमाल नं. ६३७, पान १३७.

३६. आंग्रे दप्तर रूमाल नं. ६३७, पान १२१,१२२.

इ.स. १८५२ पर्यंत झापांवर सरकारकडून कर घेतला जात असे. पण इ.स. १८५२ मध्ये कलेक्टर कार याने झापांचा हा कर माफ केला. [३६] इतकी वर्षे नागावातून सुमारे दीड लक्ष झाप कर म्हणून जमा झालेले दिसतात.

जमिन महसूलांमध्ये शेतीव्यतिरिक्त बागायती क्षेत्रातील नारळ, फणस, उंडी यांसारख्या उत्पन्नाच्या मार्गाचाही वापर केलेला दिसतो.

**जकात –** नागावमध्ये जकात पुढीलप्रमाणे आकारली जात असे. गावात उत्पन्न झालेली वस्तू किरकोळीने गावच्या बाजारात विकली जात असताना आकारलेली जकात  चौलमध्ये १७ व्या शतकात आयात-निर्यात व्यापार मोठया प्रमाणात चालत असे. त्या बंदरांत येणाऱ्या व जाणाऱ्या विविध प्रकारच्या वस्तुंवर जकात आकारली जात असे. पेशवाईपर्यंत मात्र आंगरे सरकारने परप्रांतातील जकातीस वाव दिलेला दिसतो. उदा. इ.स. १८१९-२० मध्ये नागावचे १११।।३ खंडी भात मुंबईस विक्रीस पाठविलेले दिसतात.

**तक्ता क्र.२६.चौलमधील आयात-निर्यात व्यापार-**

| **वस्तू** | **आयात कर** | **निर्यात कर** |
|---|---|---|
| भात/नाचणी (गोणी) | १२ रुके | १२ रुके |
| गुळाचे ओझे | २० रुके | ३० रुके |
| मसाले ओझे | ३६ रुके | ३६ रुके |
| ऊस (दरहजारी) | १ १/२ लारी | १ १/२ लारी |
| आले (डोई ओझे) | १० रुके | १० रुके |
| कापड गठ्ठे | ८ रुके | ६ रुके |
| तंबाखू (ओझे) | १ १/२ लारी | १२ रुके |
| सूत ओझे | २४ रुके | २४ रुके |
| कांबळे १ नग | ८ रुके | ६ रुके |
| घोडा | १ लारी | १/४ लारी |
| म्हैस | १ १/४ लारी | १/४ लारी |
| बैल | १८ रुके | १८ रुके |
| कलिंगडवाहू पाटे (दरडोई ओझे) | ३ १/२ लारी १० रुके | -- |

या सर्व वस्तूंवरील कर उत्पादन शुल्क/अबकारी कर असावा. हा अप्रत्यक्ष कर असावा. [३७]

३७. शिवकालीन महाराष्ट्रः डॉ.अ.रा.कुलकर्णी ,राजहंस प्रकाशन, द्वितीयावृत्ती, १९९७, पृ.११५.

३८. मोकासा इनाम म्हणजे जमिनीची पूर्ण मालकी इनामदाराची असून त्या इनामाचे बदल्यात काही रोख रक्कम सरकारात भरावी लागत असे. सन १७९५ मध्ये अमृतराव पेशवे यांनी हरेश्वराहून पुण्यात आलेल्या कर्वेनां करंजगाव इनम दिले होते पण त्यात कर्व्यांचे भागेनासे झाले म्हणून बापूजी कर्वे यांना वरसईजवळचे जावळी हे गाव मोकासा पध्दतीने इनाम दिले.

**करापासून उत्पन्न देणारे घटक** - आंग्रे सरकारने नागावसारख्या बागायती क्षेत्रामध्ये निघणाऱ्या प्रत्येक उत्पन्नाच्या घटकावर कर आकारलेले दिसतात. नागावमध्ये असणा-या अनेक घटकांपासून कर मिळविताना उत्पन्न देणारा घटक किती उत्पन्न देतो यापेक्षा तो उत्पन्न देणारा घटक आहे याकडे  आंग्रेनी विशेष लक्ष दिलेले दिसते. म्हणूनच नारळाचे झाप, उंडी, फणस, सुपारी, ताग, पानवेल, तसेच म्हशी, बक-या, कोंबडया, घरे अश्या सर्व घटकांवर त्यांनी कर लावलेले दिसतात. कराच्या माध्यमातून उत्पन्न जमा करत असताना आंग्रेंनी कराचा पाया विस्तारीत ठेवल्याने छोटया छोटया किंवा वरकरणी कमी महत्वाच्या वाटणा-या घटकांपासूनही कर जमा केलेले दिसतात. भारतात प्राचीन काळातील कौटिल्यापासून अशा प्रकारे कराचा पाया विस्तारीत करण्याची पध्दत अनेक राज्यकर्त्यांनी स्विकारलेली दिसून येते. यामध्ये अकबर, शिवाजी, पेशवे यांचांही समावेश होत असलेला दिसतो.

**तक्ता क्र.२७. नागावमधून आंग्रे सरकारला उत्पन्न मिळवून देणारे घटक –**

| नागाव |
|---|
| धान्ये - भात, कडधान्ये, उडीद |
| तूप |
| नारळ, फणस ही फळे |
| नारळाचे झाप |
| उंडी, ताग, ताड |
| सुपारी, पानवेल |
| जमीन |
| घरे, म्हैशी, कोंबडया |

**कर संकलन अधिकारी** - आंग्रे सरकारने (इनामदारी) वतनदारी या पद्धतीला महत्व दिलेले दिसते त्यामुळे नागाव येथे अनेक वतनदार आणि इनामदार अस्तित्वात असल्याचे दिसते. यांनाच त्या काळातील कर संकलन अधिकारी म्हटले जात असे. यांच्यामार्फत प्रत्येक उत्पन्नाच्या घटकांपासून कर प्राप्त करण्याचा प्रयत्न केला जात असे. नागावमध्ये अशी काही वतनदार, इनामदार मंडळी दिसतात. ज्यांच्यामार्फत करसंकलन केले जात असावे.

नागाव महाल या ठिकाणी आंग्रे सरकार आणि पेशवे सरकार यांची सत्ता असल्यामुळे या भागावर यांच्याकडूनच कर आकारले जात असत.

नागाव प्रांतात आंग्रेचे सरकार अस्तित्वात असल्याचे दिसते. त्यामुळे आंग्रे यांनी नेमून दिलेले वतनदार व इनामदार माने, वर्तक, कुलकर्णी, चौघुले, महाजन यांच्याकडून नागावमधील कर जमा केले जात असत.याशिवाय कर्वे यांना मोकासा इनाम दिलेले दिसते.[३८]

**नागावमधील वतनदार व इनामदार -:**

नागावचे वतनदार वर्तक, महाजन, कुलकर्णी, चौघुले, माने हे होते. त्यांची दरवर्षी महालातून नख्त नेमणूक केली जात असे.

३० रु. महाजनांस, ६० रु कुलकर्णीस
३५ रु. वर्तकांस, १० रु. माने यांस, १० रु. चौघुले.

असे एकूण वर्षाला १४५ रु. महालातून खर्ची पडत असत. या व्यतिरिक्त या वतनदारांस मान दिले जात असत.

**कुलकर्णी** - याने महालात सर्व लिखापढीचे काम करायचे. हे काम वंशपरंपरंने चालविले जात असे.

कुलकर्ण्याचे वेतन नख्त व ऐनजिनसी असे दोन्ही प्रकारचे होते. ऐनजिनसी वसुलीत दर खंडीस अर्धा मण धान्य एवढा हिस्सा होता. [३९] ऐनजिनसी उत्पन्न कायम नसल्यामुळे कुलकर्ण्याचे नख्त वेतन बदलणारे होते.

**तक्ता क्र.२८. इ.स. १८०६-०७ मध्ये कुळकर्ण्यांच्या भाताचा मुशाहिरा (वेतन)-**

| | |
|---|---|
| १८०६-०७ | १ खंडी ३ मण ॥ पायली (आंदरु नं.६३७ पृ.१३५) |
| १८३९-४० | १ खंडी ११ मण ||| पायली (कोंजरु नं.२०१३ पृ.२) |
| १८४०-४१ | २ खंडी ४ मण । पायली (कोंजरु नं.१३७ पृ.३०,३१) |

३९. कोकण जमाव रूमाल नं. १३७, पान ३०, ३१.

**माने** - हे नागावचे पाटील होते. यांचे नख्त वेतन १० रु. होते. त्यांस ऐनजिनसी वेतन मिळत असे.

इ.स. १८०६-०७ मध्ये १ खंडी १४ मण ६॥ पायली वेतन होते. [४०]

इ.स. १८३९-४० मध्ये ते २ खंडी ७ मण ६ ॥ पायली होते. [४१]

पाटील, माने आणि कुलकर्णी यांखेरीज ऐनजिनसी वेतन इतर कोणत्याही वतनदारास नव्हते. पण गावच्या कारभारांत वतनदारास स्थान नव्हते. काही माणसे त्या त्या समाजांतील प्रमुख म्हणून वतनदार झालेले दिसतात.

उदा. भंडाऱ्याचा मुकादम, कुंभारांचा मेहतर, सोनारांतील पोतदार, कासार हे सर्व किरकोळ वतनांचे मानकरी होते. [४२]

**इनामदार** – प्रत्येक गावात सरकारने काही इनामदारांना अधिकार दिलेले असत. त्यांना वाडया व शेते इनाम दिलेली असत. गावांत यांना प्रतिष्ठित मानले जात असे. नागावमध्येही असे इनामदार आढळतात. इ.स. १७९९-१८०० मध्ये नागाव येथे असलेले इनामदार. [४३]

**इनामदार –**

खंडेराव रामचंद्र.
धोंडया हीर पाटील.
महाद साळवी कुंभार
गोम साळवी कुंभार
पांडूशेट सोनार (पोतदार)
फकीरा पेडणेकर
जिवाजी बल्लाळ चिटणीस
लक्ष्मण आप्पाजी डबीर
आनाजी त्रिंबक डबीर
मोरशेट कासार जमीन ६ बिघे (भात जमीन)
गोद म्हात्रे (वैद्य) जमीन ६ बिघे (भात जमीन)
जिवाजी बल्लाळ चिटणीस १६ बिघे (भात जमीन)
लक्ष्मण कृष्ण कोल्हटकर ६ बिघे (भात जमीन)

यातील खंडेराव रामचंद्र हे नागावचे कुलकर्णी होते. चिटणीस व डबीर ही दोन्ही दरबारात वावरणारी, राजकारणात अंतर्भूत असलेली घराणी असल्याने ती इनामदार होती.[४४]

४०. आंग्रे दप्तर रूमाल नं.६३७, पान १३५.
**४१.** कोकण जमाव रूमाल नं. २०१३, पान २.
४२. नागाव आर्थिक व सामाजिक जीवन,शां.वि.आवसकर,गोखले अर्थशास्त्र संस्था, पुणे, १९६२, आठवे प्रकाशन.पा१०
४३. आंग्रे दप्तर रूमाल नं. १३५, पान ४८ व ४९.
४४. नागाव-आर्थिक व सामाजिक जीवन १७६० ते १८४०, शां.वि. आवळसकर,गोखले अर्थशास्त्र संस्था,पुणे १९६२,पान८.

समाजातील गुणवान व्यक्तीस इनाम देणे ही त्याकाळातील पद्धत होती. याशिवाय इतर अनेकांना विशेषतः ब्राम्हणांना त्यांचे उदरनिर्वाहासाठी (ऐतिहासिक पत्र ४) आणि धर्मादाय कार्यासाठी, त्यांच्या घरातील लग्नकार्यासाठी अनेक प्रकारची इनामे आंग्रे राजवटीत दिल्याची आढळून येतात.

इ.स. १८०६-०७ मध्ये नागावचे हरिपंत आठवले व विसाजीपंत जोगळेकर यांना सरकारने इनाम जमिनी (अर्धा बिघे व ३ बिघे भात जमीन) दिल्याचे दिसते. जोगळेकरांना त्यांचे योग क्षेम चालावे यासाठीच आंग्रेनी जमीन दिलेली दिसते. [४५] नागाव व आसपासच्या खेडयांतून आंग्र्यांनी अनेकांना भातजमिनी वंशपरंपरेने इनाम दिलेल्या होत्या. त्यात निघणाऱ्या भातावर ऐनजिनसी वसुली करताना, इनाम दिलेल्या जमिनीचा कर माफ केलेला दिसतो. जिरायतीचा आकार कर १२।। रु. दर बिघा असा होता. १७७०-७१मध्ये गोपाल केशव जोगळेकर यांना ३ बिघे जमिनींचे इनाम दिलेले होते.[४६]

१७९९-१८०० मध्ये अनेक ब्राम्हणांना जमिनी इनाम दिलेल्या होत्या. [४७]

**तक्ता क्र.२९. अ) इनाम जमीनी व इनामदार**

| व्यक्ती | जमिनीचें क्षेत्र बिघे |
|---|---|
| रघुनाथभट्ट वझे | ५ |
| नारंभट्ट फडके | १ |
| कृष्णंभट्ट करंदीकर | ४ |
| त्रिंबकभट्ट बर्वे | २ |
| बालकृष्णभट्टफाटक | २।।। |
| बालकृष्ण लेले | १ |
| कृष्णंभट्ट पटवर्धन | १ |
| आपाभट्ट आचार्य | १ |
| केशवभट्ट करवंत | २ |
| लक्ष्मीबाई मराठीण | १॥॰ |

४५. आंग्रे दप्तर रूमाल नं.१३५, पान ४८,४९.
४६. आंग्रे दप्तर रूमाल .६३७, पान १२९.
४७. नागाव -आर्थिक व सामाजिक जीवन १७६०- ते १८४०, शां. वि. आवळसकर, गोखले अर्थशास्त्र संस्था, पुणे, १९६२,पान ८. आंग्रे दप्तर रूमाल नं.१३५, पान ७, ४८,४९.

**तक्ता क्र.२९. ब) इनाम जमीनी व इनामदार**

१८१९-२० मधील इनाम दिलेल्या गावांची आणि व्यक्तींची यादी – [४८]

| व्यक्ती | जमिनींचे क्षेत्र व गाव-बिघे |
|---|---|
| लक्ष्मी (मराठीण) | कावीर १ ॥ |
| महादेवभट आठवले | कावीर ·॥· |
| रघुनाथशास्त्री फडके | (खानव) १ |
| नारायणशास्त्री फाटक | वणोली १ खानव २॥। |
| बापूभट्ट रिसबूड | वरडें १० |
| रघुनाथभट्ट वझे | सहाण ३ |

इ.स्. १८२९-३० मध्ये दुष्काळ पडल्याने उत्पन्न कमी आले. ब्राम्हणांना आंग्रेंनी प्रत्येक इनाम जमिनीचे आधारे जे ऐनजिनसी इनाम दिले होते ते कमी आले ती तूट भरुन काढण्यासाठी सरकारने भरपाई दिलेली दिसते. [४९]

**तक्ता क्र.२९. क) इनाम जमिनीचें क्षेत्र व इनामदार**

| **व्यक्ती** | **जमिनीचें क्षेत्र गाव, बिघे.** |
|---|---|
| रघुनाथशास्त्री फडके | खानव १ |
| रघुनाथभट्ट वझे | सहाण ३ |
| नारायणशास्त्री फाटक | बेलवली १ खानव २॥। |
| बाबूभट रिसबूड | वरडें १० |
| आपाभट आचार्य | कुणें १ |
| महादेवभट आठवले | कावीर ·॥· |
| पांडू बाल क्रमवंत | वरडें २ कावीर २ |
| गोविंद बाळकृष्ण लेले | कावीर १ |

४८. आंग्रे दप्तर रूमाल नं. २४४, पान ८९.
४९. आंग्रे दप्तर रूमाल नं. ३८४, पान १९४ ते १९६.

**कर रचनेमधील राज्यकर्त्यांचे धोरण** – कोकण प्रांतामधील आंग्रेंच्या आणि पेशवेच्या वर्चस्वाखाली असणाऱ्या प्रदेशामध्ये सर्वसाधारणपणे लोकांच्या हिताला महत्व दिलेले दिसते. कोकण प्रांतामध्ये असणारा समाज पावसावर आधारीत शेती करणारा असल्याने त्याची आर्थिक परिस्थिती बेताची असणारा आहे. पण बागायती क्षेत्र असणाऱ्या नागावसारख्या भागात शेतीबरोबर नारळ, सुपारी यांचे उत्पन्न शेतकऱ्यांना मिळत असे. बारमाही पिके घेण्यासारखी जमीन आणि पाण्याची व्यवस्था नसल्याने कोकणातील समाज काही अंशी गरीब राहिलेला दिसतो. या सर्व गोष्टींचा विचार मराठा काळात पेशवे आणि आंग्रे यांनी केलेला असल्याचे त्यांनी अवलंबिलेल्या धोरणातून आढळते.

**१. लोकांचे हित –** पेशवे आणि आंग्रे यांची सत्ता अस्तित्वात असणाऱ्या या प्रांतामध्ये त्या त्या ठिकाणच्या इनामदारांकडे त्यांच्या आजूबाजूला असणारी गावे सुपूर्द केलेली दिसतात. त्यामुळे या इनामदारांना (त्याच परिसरातील असल्याने) शेतकऱ्यांचे प्रश्न, वार्षिक स्थिती याची जाणीव होती. परिस्थितीप्रमाणे आपल्याकडे देण्यात आलेल्या गावांचा वसूल जमा करण्याचे काम चोखपणे इनामदार करत असत. आंग्रेंनी पडीक जमीन नव्याने लागवडीस आणणा-या शेतक-यांना प्रोत्साहन देण्यासाठी सुरुवातीची काही वर्षे त्या जमीनीवरील सारा पूर्ण सा-यापेक्षा कमी लावून मग दरवर्षी वाढवून घेतलेला दिसतो. सा-याच्या ओझ्याखाली शेतकरी दबला जाऊ नये यासाठी अशी पध्दत्त स्विकारण्यात आलेली दिसते. यातून राज्यकर्त्यांनी लोकांच्या हिताला महत्व दिलेले दिसते.

आंग्रेनी कर वसूली करताना प्रत्येक उत्पन्न देणाऱ्या घटकांचा विचार केलेला दिसत असला तरीही ज्याला कर देणे शक्य नाही त्याला त्यातून सूटही दिलेली दिसते. उत्पन्नाच्या छोटया छोटया घटकांवरही आंग्रेंनी कर लावलेले असूनही ते जाचक असलेले दिसत नाहीत म्हणजेच कर पध्दत्ती शिवकाळासारखी लवचिक होती असेही म्हणता येईल.

**२. सरकारच्या सेवेबद्दलचा मोबदला** - आंग्रे आणि पेशवे यांनी कोकण प्रांतात काही इनामदारांकडे सभोवतालची गावे, गावांचा वसूल जमा करण्याचे अधिकार दिलेले दिसतात. या वसूलीतून मिळणारा पैसा या इनामदारांच्या चरितार्थासाठी वापरण्याचे अधिकार त्यांना देण्यात आलेले दिसतात. सरकारला विशिष्ट प्रकारची मदत करण्याप्रित्यर्थ, सरकारची सेवा केल्याबद्दल हे अधिकार इनामदारांना दिलेले दिसतात. अशा प्रकारची इनामे आणि ती वापरण्याचे अधिकार मराठा काळाच्याही आधीपासून प्रचलित असलेली पद्धत दिसते.युद्धाच्या

प्रसंगी किंवा सरकारच्या कोणत्याही प्रकारच्या कार्यात एखाद्याची मदत झाली असल्यास त्याला असे इनाम दिले जात असे. ज्या इनामाच्या वसूलीमधून इनामदार, वतनदार आपला चरितार्थ चालवित असे. म्हणजेच आंग्रे, पेशवे या सत्ताधिशांनी वेतनाच्या स्वरुपात वतनदारांना, पाटील, देशपांडे, कुलकर्णी यांना नेमलेले दिसत नाही. शिवकाळात मात्र अशा नेमणूका केलेल्या आढळून येतात आणि या वतनदारांना सध्याचे आणि पुढील काळातील असे अधिकार देवून त्यांच्या चरितार्थाची जबाबदारी स्विकारलेली दिसते.

**३. धर्म रक्षण** - आंग्रे आणि पेशवे या राज्यकर्त्यांनी कोकण प्रांतामध्ये असणाऱ्या गरीब ब्राम्हणाच्या चरितार्थासाठी त्यांना काही गावे दिलेली आढळतात. तसेच देवस्थानाची व्यवस्था व्हावी, त्याची स्वच्छता राखली जावी, पंडित विद्वानांचे शिक्षण व्हावे त्याचा समाजाला फायदा व्हावा यासाठी ब्राम्हण कुटूंबाना इनाम जमीनी किंवा गावे दिलेली आढळतात. तसेच, नागावमध्ये ब्राम्हण कुटूंबांचे पालनपोषण करण्याची जबाबदारी राज्यकर्त्यांनी स्विकारलेली आढळते. ज्यांच्या जवळ उत्पन्नाचे साधन नाही त्यांना जमीन किंवा जमीनीपासूनचे उत्पन्नाचे साधन मिळवून दिलेले दिसते. अशा प्रकारचे धोरण आखण्याचे आंग्रे आणि पेशवे यांचे धोरण धर्मरक्षणाचे असलेले दिसते.

**४. विशेष सन्मानाप्रित्यर्थ** - आंग्रे आणि पेशवे यांनी आपल्या सेवेमध्ये असणाऱ्या व्यक्तींना विशेष सन्मान म्हणूनही काही गावे इनाम म्हणून दिलेली दिसतात. कोकण प्रांतातील काही व्यक्तीचे विशेष कर्तृत्व लक्षात घेवून, सरकारला झालेली विशेष मदत लक्षात घेवून अशी इनामे दिलेली दिसतात.

**५. सवलती** - आंग्रे आणि पेशवे यांनी त्यांच्या राजवटीमध्ये अनेक गरीब कुटूंबांना सवलतीदिलेल्या दिसतात. या सवलती विशेषतः कराबाबत असलेल्या दिसतात.

उदा. नागावमधील काही कुटूंबाना करातून सूट देण्यात आलेली आढळते. आंग्रेनी त्यांच्या राजवटीमध्ये अनेक प्रकारचे कर लोकांकडून घेतलेले दिसतात. पण या प्रत्येक प्रकारच्या करामध्ये सवलतीही दिलेल्या दिसतात. म्हणजेच करपद्धती जाचक स्वरुपाची आणि अन्यायकारक असलेली दिसत नाही. इ. स. १८०१-०२ मध्ये नागावमधील संताजी गणेश सहस्त्रबुद्धे यांनी कान राउत नावाचा नोकर परमुलुखातून आणला आणि सरकारला तसे कळविले. आंग्रे सरकारने त्या नोकरास घरटक्का माफ केला होता. [५०]

---

५०. आंग्रे दप्तर रूमाल ६३७, पान १३२.

जसे बागायतीची कामे करणाऱ्या लोकांना आंग्रे सरकारने घरटक्का माफ केला होता. तसेच व्यापार व उदीम वाढविण्यासाठी आंग्रे सरकारने व्यापारी किंवा वाणी लोकांना घर देण्याबाबत सवलती दिलेल्या दिसतात.

इ.स. १८०७-०८ मध्ये शिऊ कुंभार, राहणार गिरी व भगीरथगिरी गोसावी या दोघांनी नागावमध्ये किराणा आणि पंचकेणे दुकाने घातली. यांना सरकारने घर देण्याबाबत सवलत दिली होती. [५१] विशेषतः नागावमधील बागायत भरभराटीस येण्यासाठी इ.स. १८१२-१३ मध्ये आंग्रे सरकार व नागावकर यांच्यामध्ये १ महत्वाची कलमबंदी झाली. नागावमधील बागायतीचे काम पाहण्यासाठी परमुलुखातून माळी आणला तर त्याला आंग्रे सरकारने ३ वर्षे घरटक्का व इतर कर माफ केले. नंतर निम्मी घरपट्टी आकारली जाईल असे सांगितले. नोकरास सहा वर्षे घरटक्का माफ ठरविला. स्वमुलुखी माळयास घरपट्टी द्यावी लागेल पण अन्य कर त्याच्यापासून घेतले जाणार नाही असे या कलमबंदीत स्पष्ट केले होते. [५२]

नागाव महालात नव्याने व्यवसाय सुरु करु इच्छिणाऱ्या व्यावसायिकांना आंग्रे सरकारने काही सवलती दिलेल्या दिसतात. उदा. इ.स. १८०७-०८मध्ये भगीरथगिरी गोसावी या परप्रांतीयांने आंग्रेंकडे किराणा व मसाल्यांच्या पदार्थांचे दुकान टाकण्याची परवानगी मागितली व सुरुवातीला घरटक्का, गादी तंबाखु, मोहतर्फा व दुकानविक्री हे चार कर ५ वर्षे माफ करण्याची सुचना केलेली दिसते. आंग्रेंनी तशी माफी त्याला दिली व त्यानंतरच्या काळातील मोहतर्फा १॥। रु. व ।॰ रू दुकानविक्री एवढा कर देण्याची सवलत दिली. [५३]

---

५१. आंग्रे दप्तर रूमाल नं. ६३७, पान १५१.
५२. आंग्रे दप्तर रूमाल नं. ६३७, पान १२५, १२६.
५३. आंग्रे दप्तर रूमाल नं. ६३७, पान १५१.

# ऐतिहासिक पत्रे

## पत्र १

श्री

शके १६६१
इ.स. १७३९-४०

मामले मुर्तजाबाद उर्फ चेऊल - हकीकती

खार कांचली दरसवा (द) ताो श्री गाव मामले मुर्तजाबाद उर्फ चेऊल सिलोत्री सैद माहामद मीर इमजां. सेकीन कसबे चेऊल बारकुम रकमाला रकम मलिक अचरी कदीम माहाल लाहारी १७५.

सरदहु खार मजकूर बहुत मुदत खराचा दर्यागर्क व विन्हेगर्क व जंगलगर्क असतां बेवारिसी जाणून हालीं बंदिस्त कर्दे राजश्री साबजी तुकाजी व राजश्री कृष्णाजी तुकाजी प्रभू कायेस्त कुलकर्णी माहाल नागावें माा आगसी व ताो अस्टागर मामले मजकूर चिटनीस दिमत मानाजी आंगरे वजारतमाब जजिरे कुलाबा सुाा [मो.जा.] आर्बैन मयां व अलफ सदरहु बयाज हस्ताक्षेर कृष्णाजी माणकाजी अदिकारी मामले मजकूर मशारनिले येहीं आज्ञा केली अैसिजे खार मजकूर कदीम सिलोतर कोण्हाचे व महसूल रकम काये आहे तें लेहूर द्यावें त्यावरुन लेहून दिल्हे.

(कोकणच्या इतिहासाची साधने, आंगरेकालीन पत्रव्यवहार,ले.७ पान १३.)

## पत्र २

शके १६२३ माघ शु. ७
इ.स. १७०२ जानेवारी २४

राजेश्री माहादाजी दादाजी देसाई देसकुलकर्णी चेऊल गाो.

र्द. अखंडित लक्षमी आलकृत राजमान्ये स्नाो सुभानजी मोहिते हवालदार व कारकून जजिरे पदमदुर्ग जोहार व आश्रीवाद सुाा इसने मया व अलफ उपर तुम्ही विनंतीपत्र पाठविले ते पावले साल मजकुरी बाम्हणगाव तर्फ सागरगडकरी यानी जाळून तलख केले यैसीयासि आम्ही व राजश्री मल्हार नारायण यानी रयेतेस धीर भरवसा देऊन कीर्दीस लाविली आहे त्यासी मोगलाचा कौल दिल्हा आहे त्यामोजीब साहेबी जजिराचा कौल दिले पाहिजे म्हणोन तपसिले लिहिले तरी तुम्ही मोगलाचे तर्फेने कौल पेस्तर सालीचे दिल्हे आश त्यास दिवाणाचे दस्तकानसी जमेचा आकार पाठऊन देणे म्हणजे जजिराहूनही रयेतीस दिल्हे जातील तरी अवश्येमेव दिवाणाचे दस्त कानसी आकार पाठऊन देणे मौजे खानूचा कौल सवा खडीप्रमाणे कौल मोगलाचा घेतला आहे त्यामोजीब जजिराचा कौल दिल्हा पाहिजे म्हणोन लिाा तरी सारेच दस्त तुम्हाकडून आले म्हणजे सहजेच तुमचेही गावास कौल दिल्हा जाईल व सालमजकूर बाम्हणतर्फेने पाहाणी जाली त्याचा आकार दिवाणाचे दस्तका...... सत्वर पाठऊन देणे ... (नि.अ.) छ. ६ रमजान हे... मोर

तबसु

(सुभानजी मोहित याचा अस्पष्ट शिक्का. *)

द

(कोकणच्या इतिहासाची साधने, आंगरेकालीन पत्रव्यवहार, ले.१८पान २२.)

## पत्र ३

श्री — श. १६५८ ज्येष्ठ शु।। ९
इ.स. १७३६ जून ६

ई मा। अनाम देशमुख व अधिकारी व देशपांडिये मामले चेऊल यासि मानाजी आगरें सुहुर सन सबा सलासीन मयां व अलफ राजश्री जिवाजी खंडेराऊ यांचे सरदेशमुखीचें वतन मामले जमकुरीचे पुरातन आहे त्यास मा।रनिलेचें वतन चालवणे अवश्यक जाणोन वतनाच्या सनदा तीर्थरुप गजश्री कैलासवासी मो.जा यांच्या सादर जाहाल्या आहेत त्या हाली मनास आणोन मामले मजकुरीचें सरदेशमुखीचें वतन यांचे दुमाला करुन जमाबंदीस हक व इनामजी बातपसील

हक गांवगना नख्ता व गलियास
देखील बागायेत व खंड वगैरु महसूल पैदास
कमावीस जकायेत मोहोत तर्फा व बाजेबाब
यासि दाहोत्रा प्रमाणे दिवाणांत वसूल होत होता
तो रयेतनिसबत देविला असे बा।। सनंद रुजुवात
तीर्थस्वरुप कैलासवासी

इनामती कुलबा (ब) कुलकानु हालीं पटी
व पेस्तरपटी खेरीज हकदार इनाम दिल्हे
असे-
इनामगांव
१ मौजें वरडें बाग राउलवाडी
तर्फे बाम्हणगाव माहाल आगसी
२ तर्फे श्रीगांव
------ १ कुरकुंडी
३ १ कालटेंबी
२

येणेप्रमाणे हक व इनामती सरकारांत जमा होत होता तो याजकडेस द्यावयाची आज्ञा करुन हें पत्र सादर केलें असे तरी तुम्ही यांस रुजु होऊन सदरहुप्रमाणे चालवीत जाणे वतनाचा भोगवटा मा।रनिले पुत्रपौत्रादि वंष परंपरेने करितील दरसाल ताजे सनदेचा उजूर न करणे पत्राची नकल घेऊन असल पत्र भोगवटीयासि फिरोन देणे जाणिजे २।। छ ७ माहे सफर.

(कोकणच्या इतिहासाची साधने, आंगरेकालीन पत्रव्यवहार,ले.४४ पान ४२.)

## पत्र ४

श्री — श. १६६० वैशाख शु।। ९
इ.स. १७३८ एप्रिल १७

ई मा। अनाम बालाजी आपाजी अदकारी मे। मुर्तजाबाद उर्फ चेऊल यांसी मानाजी आंगरे सुहुर सन समान सलासीन मयां व अलफ तुमचा हक सरकारी जमा आहे या मुळे गुजरानी चालत नाहींसी जाहाली याजकरिता हुजूर येऊन अर्ज केला की आम्ही जमीदार आहो आमचे हातोन सेवा घेऊन आमचा योगक्षेम चाले ते आज्ञा करण्हार साहेब धनी आहेत म्हणून त्याजवरुन हकटक पेशजी प्रा। देऊन वतनाची सेवा तुमचे हातोन घ्यावी तरी मा। मा।रचे सारेच जमीनदार हक सरकारी जमा आहे त्याची विल्हे होईल तेव्हा तुमची होईल प्रस्तुत योगक्षेमानिमित्य जमीन करार केली असे बिघे.

१४ वतन समंधे बिघे
६ येकनिष्ट सेवा केलीत सबब
२०

येकूण वीस बिघे पड जमीन चोखी मामले मजकूर पैकी करार केली असे जे गावी अनुकूल पडल ते गांवी कीर्द करणे तुमचे निसबत कीर्द असेल व पेस्तर होईल त्यापैकी दाहाखंडी भात धारे मापे तुम्हांस इनामखर्च सालबसाल पडत जाईल तरी तुम्ही उमेदवार होऊन वतन समंधे सेवा चाकरी येकनिष्टपणे करीत जाणे जाणिजे (नि.अ.) रा। छ ८ माहे मोहरम (मोर्तब सुद)

(कागदामागें *) बारसुद

(कोकणच्या इतिहासाची साधने, आंगरेकालीन पत्रव्यवहार, ले.४५ पान ४२.)

..................

## iii) वरसई (कोकण प्रांत)

**ऐतिहासिक पार्श्वभूमी -**

पेणच्या उत्तरेस लागूनच प्राचीन काळी नलराजाचे साम्राज्य होते. हेरंबपूर हे या राजाच्या राजधानीचे ठिकाण होते. हमरापूर लगतच सांकसई हा किल्ला राणासंक या राजाने बांधला. त्याच्याच नावावरुन या किल्ल्याला साकसई हे नाव पडले. पठारावरील किल्ल्यात खडकात खोदकाम केलेले मोठ मोठे १३ पाण्याचे हौद व ५०० लोक बसू शकतील अशा भुयारी हॉल वगळता सर्व बांधकामे जमिनदोस्त झाली असून इमारतीच्या पायाचे अवशेष तेवढे पहावयास मिळतात. आज किल्ल्याच्या पायथ्याच्या भागात जे कोरीव दगड इतस्ततः विखरुन पडलेले आहेत ते हेमाडपंथी मंदिराचे दगड आहेत असे इतिहास संशोधन सिनक्लेडर यांचे म्हणणे आहे. या काळात तेथे राजधानी ठिकाणची वस्ती होती. राजधानीचे हे ठिकाण पूर्णपणे जमिनदोस्त झालेले आहे. पेणपासून अवघ्या १० किमी अंतरावर साकसई हा किल्ला आहे.

सन १४८९ मध्ये कुलाबा जिल्हयाचा काही भाग बहमनीकडे तर नागोठणे, पेण (सांकसई) व चौल यासह किनाऱ्याचा भाग गुजरातच्या सुलतानाकडे होता. पोर्तुगीजांपुढे आपला टिकाव लागणार नाही म्हणून गुजरातच्या सुलतानाने १५२९ मध्ये पोर्तुगीजांचे मांडलिकत्व स्विकारले. पेणचा सांकसई किल्ला गुजरातच्या सुलतानाच्या अंमलाखाली होता. सन १५४० मध्ये नगरच्या अदिलशहाच्या सुलतानाने पेणचा हा सांकसई किल्ला गुजरातच्या सुलतानाकडून मिळवला. तेव्हा गुजरातच्या सुलतानाने पोर्तुगीजांची मदत मिळवून हा किल्ला पुन्हा जिंकून घेतला. सन १५४० मध्ये अहमदनगरच्या निजामशहाने बुरहान याने साकसई किल्ला (पेण)गुजरातच्या अधिकाऱ्याकडून घेतला. परंतु गुजरातच्या सुलतानाने पोर्तुगीजाच्या मदतीने सांकसई किल्ला परत जिंकून घेतला पण नगरहून खूप मोठी फौज येत आहे असे कळताच, सांकसई हा किल्ला त्यांनी सोडला व पोर्तुगीजाच्या हवाली केला. मोगलांच्या काळात अदिलशाही व गुजरातच्या सुभेदार यांचा या किल्ल्यावर अंमल होता. दहाव्या शतकाच्या अगोदर पेण हे सांकसई परगण्याचे गाव होते.

पोर्तुगीजांचा वसईचा सुभेदार डी मेनेसस याने सांकसईयेथे चांगला फौजफाटा पाठवून सांकसई किल्याचा बंदोबस्त केला. दोन वेळा त्याच्या सैन्याची नगरच्या सैनिकांशी लढाई झाली. पण नगरच्या सैन्याला हा किल्ला घेता आला नाही. डी मेनेससने अधिक सैन्य वसईहून आणून त्यांच्यावर जोरदार हल्ला चढविला व नगरच्या सैन्याचा पूर्ण पराभव केला.

परंतु पुढील लढाया टाळण्यासाठी पोर्तुगीजांनी नगरच्या अदिलशहाला १७५०० रुपये देऊन सांकसई व कर्नाळा किल्ले विकत घेतले आणि पेणवर पोर्तुगीज अंमल सुरु झाला. गुजरातचे सुलतान पेणजवळील सांकसई गडावर १५४० पर्यंत सत्ता टिकवून होते. सन १६२६ पर्यंत कुलाबा जिल्हा अहमदनगरच्या राजाकडे होता. १६३६ नंतर तो प्रदेश मोगलांच्या ताब्यात गेला. हा संपूर्ण प्रदेश शहाजीराजे यांचे अधिपत्याखाली होता. सन १६३६ मध्ये शहाजीराजाने मोगलांशी तोंड देणे शक्य नसल्याने, त्यांना शरणागती पत्करावी लागली. सन १६३६ मध्ये विजापूरच्या अदिलशहाने मोगलांना खंडणी देण्याचे मान्य केल्यावर, कोकणचा ताबा विजापूरकडे परत केला. या प्रदेशामध्ये पनवेल, पेण, चौल, चाकण, आणि दांडा राजपूरीचा समावेश होता.

यादवानंतर ३५० वर्षे मुसलमानी अंमल महाराष्ट्रावर असल्यामुळे हिंदुधर्म व संस्कृती यांचा ऱ्हास झाला. मे १६५६ मध्ये चंद्रराव मोरेचा रायरीचा किल्ला शिवाजीराजांच्या ताब्यात आल्यावर त्याची पुर्नबांधणी करुन त्यास 'रायगड' असे नाव दिले. समृद्ध जावळी आणि रायगड शिवाजीराजांकडे आल्याने त्यांना राज्यविस्तार करण्याची क्षमता प्राप्त झाली. याच कालावधीत विजापूरच्या अदिलशहाचा कोकणावरील बंदोबस्त सैल झाला. शिवाजी राजांनी पेण जवळील गागोदे बुद्रुक व वाकरुळ या गावामधील अरुंद खिंडीत सैतान माळावर कल्याण खजिना लुटला. इ.स. १६७० ला त्या प्रांताचा कारभार पाहण्यासाठी राज प्रतिनिधी व्यंकोजी दत्तो यांची पाच ते सात हजार फौजेसह शिवाजी महाराजांनी नेमणूक केली.

सन १६६० मध्ये औरंगजेबाने शाहिस्तेखानाला शिवाजीराजांविरुद्ध मोहिमेवर पाठविले. कोकणावर स्वारी करण्याकरिता उझबेगी सेनाप्रमुख करतलबखान याची निवड शायिस्तेखानाने केली. करतलबखान पुण्याहून लोहगडमार्गे येऊन बोरघाटाच्या दक्षिणेस असलेल्या उंबरखिंडीत पेणच्या पूर्वेकडे २४ कि.मी.पोहोचला. त्यावेळी शिवाजी महाराजांनी जलद हालचाली करुन मोगल सेनेला उंबरखिंडीत गाठले. त्यामुळे मोगलांचा मार्ग गनिमी काव्याने रोखला गेला. करतलबखान, राजा मित्रसेन व रायबागीण यांना तेथे गाठून शिवाजी महाराजांनी शरण यावयास लावले.(२-२-१६६१) मे १६६१ मध्ये मोगलांनी प्रथम कल्याण आणि नंतर महाड जिंकले. पुढे नऊ वर्षे ते मोगलांच्या ताब्यात राहिले. मोगलसेनानी बुलाकी याने पेण जवळील देयरी किल्ल्यास (वाकरुळ जवळचा रतनगड किल्ला) वेढा घातला.[१] परंतु कावजी कोंढळकराच्या नेतृत्वाखाली वेढा सोडविण्यासाठी आलेल्या मराठी

१. शिवकालीन पत्र सार संग्रह,खंड ३ :संपा. शंकर नारायण जोशी, प्रकाशक भा.इ.सं. मंडळ, पुणे इ.स. १९३७,

सैन्याने ४०० मुघल सैनिक ठार करुन वाकरुळ जवळच्या रतनगडाखाली मोगल सरदार बुलाखी याचा पराभव केला. (१० जून १६६१ ते २१ ऑगस्ट १६६१) शंकरजी नारायण शिवाजी महाराजांचा सचीव यांनी पेण हे समृद्ध शहर लुटले, असा दाखला आढळतो. शिवाजी महाराजांचा मुक्काम पेण येथे तीन वेळा होता. कान्होजी आंग्रे यांचे कारकिर्दीत कोंडाजी शिंदे हा पेणच्या गढीवर गडकरी म्हणून होता. इ.स. १६७० साली शिवाजी महाराजांनी कर्नाळा जिंकला. त्याचबरोबर सांकसईचा ताबा मिळविला. शिवशाहीत हा किल्ला मराठयांच्या ताब्यात होता. चिमाजी अप्पाने पोर्तुगीजांचा पूर्ण पराभव करुन त्यांचा कोकणातील सर्व प्रदेश जिंकून घेतला. मराठी सत्तेच्या पडत्या काळात श्रीवर्धनचे बाळाजी विश्वनाथ भट पेशवे व कान्होजी आंग्रे यांनी मराठी सत्तेला सावरले. किंबहुना ती बळकट केली. आंग्र्यांनी कुलाबा जिल्हयातीलच नव्हे तर आजुबाजूच्या परिसरात वावरणाऱ्या परकिय सत्ता खिळखिळया केल्या व त्यांना जरब बसविली.

ब्रिटिशांचा उत्तर कोकणात सन १७५६ मध्ये शिरकाव झाला. १८१८ मध्ये पेशवाईचा अंत झाल्यानंतर साकसई, राजपुरी आणि रायगड हे तीन उपविभाग ब्रिटिशांच्या अंमलाखाली आले. १८५३ मध्ये कुलाबा संस्थान, सांकसई व रायगड आणि काही लहान लहान महल मिळून (नागोठणे) कुलाबा उपजिल्हा निर्माण करण्यात आला. हा उपजिल्हा ठाणे जिल्हयाशी संलग्न करण्यात आला. त्यानंतरच्या कालावधीत रायगडचे तालुका ठिकाण महाडला, सांकसईचे पेणला, राजापूरीचे रोहयाला असे बदल होऊन १८६९ मध्ये स्वतंत्र कुलाबा जिल्हयाची निर्मिती करण्यात आली.

**वरसई भागातील मुलकी कारभार –** मराठा काळात वरसई या गावाजवळ असणारे सांकसई व माणिकगड हे दोन किल्ले या भागातील महत्त्वपूर्ण किल्ले होते. हे पुरातन किल्ले निजामशहा, गुजरातचा सुभेदार, शिवाजी महाराज, पेशवे, आंग्रे या अनेक बदलांचे साक्षीदार आहेत.वरसई भोवतालची जावळी, करोडी, मोहिली, अष्टे, गागोदे, वाशिवली या गावांना इनाम गावे म्हटले जाते. या गावांचे इनामदारही खद्द वरसईत रहात असत. माणिकगडच्या प्रशासकीय सोईसाठी चिमणखळ, वनखळ, तुंगारतन, आऊरावलीत अशा चार तर्फा होत्या. यातील चिमणखळ तर्फेमध्ये वरसईचा समावेश होतो.[२] तसेच माणिकगड तालुक्यातच इतर सर्व गावांचा अंतर्भाव होत असे. आज ही इतर गावे चौकचा परिसर, मोहपाडा परिसर, उरण म्हणून ओळखली जातात.

२. ऐतिहासीक पत्र क्र. १ (१०-७-७४).पान २८८ पहा.

वरसईजवळील माणिकगड या किल्ल्यावर कधी पेशवे कधी आंग्रे यांचे वर्चस्व होते. २८ मे १७४७ मध्ये माणिकगड मानाजी आंग्रेकडून पेशवेंनी घेतला.[३] १८ ऑगस्ट १८१३ मध्ये रास्तेंकडे असणारा हा किल्ला आंग्रेंनी घेतला. [४] या किल्ल्यावर ज्याचा ताबा तो या सभोवती असणाऱ्या गावांकडून वसूल घेत असे. त्यासंबंधी एका पत्रात असा उल्लेख आढळतो. (ऐतिहासिक पत्र क्र १) [५] हे पत्र पेशव्यांच्या ताब्यात माणिकगड आल्यानंतरचे लिहिलेले आहे. या पत्रावरुन या किल्ल्याला तनखा [६] असल्याचे दिसते. हा तनखा याच्या ४ तर्फांचा [७] लावलेला आहे. यातील एक तर्फ आंग्रेंकडे आहे. तेथे आंग्रेंचा शिपाई (पायदळ) आणि वसूलीदार आहे. आंग्रेंना पेशव्यांनी आज्ञापत्र दिले आहे की त्या भागातील लोकांना त्रास देऊ नये. तरीही आंग्रेचे वसूलीदार चोरुन तेथील लोकांकडून घरपट्टी वसूल करत असल्याची तक्रार या पत्रातून केली आहे. [८]

या पत्रात वसूली करणाऱ्यांना 'स्वामींची आज्ञा नाही' म्हणजे पेशव्यांची आज्ञा नाही. तरीही ते वसूलीदार बळजबरीने वसूली करतात. त्यामुळे या भागातील घरपट्टी व जनावरांची पाहणी पेशव्यांच्या आज्ञेने पुन्हा केली जावी. याबाबत तक्रार करणाऱ्याने हस्तक्षेप करावा की नाही? अशी विचारणा केली आहे आणि आंग्रेनी वसुली करावी की करु नये अशी आज्ञा करण्याची विनंतीही केली आहे. या पत्रावरुन असे दिसते की सत्ता बदल झाला तरी वसूलीच्या पद्धतीत बदल होत नव्हता. पण नव्याने पाहणी करण्याची पद्धती मात्र अस्तित्वात असावी म्हणूनच पत्रात पुन्हा पाहणी करण्याचा उल्लेख आढळतो.

ऐतिहासिक पत्रांवरुन असे दिसते की आंग्रे, पेशवे काळात माणिकगड तालुका खूप मोठा होता. ही सर्व गावे पेणच्या सभोवताली आहेत. पण सध्या पेण तालुक्यात मात्र नाहीत.

---

३. 'इ.स. १७४७ मे २८ माहे जेस्ट शुध प्रतिपदा ब्रपस्तवारी किला माणिकगड दिमत मानाजी आंग्रे सन मजकुरी पेसवे येहीं घेतला'.(आंग्रेकालीन अष्टागर (अधिकारी शकावली) :संपा. शां.वि.आवसकर, भा.इ. संशोधक मंडळ, पुणे, १९४७. पान नं.२०)

४. इ.स. १८१३ ऑगस्ट १८ शके १७३५ श्रीमुख नाम संवछरे माहे श्रावण वद्य ८ बुधवारी ते दिनी राजश्री वजारत (माब) सरखेल बाबूराव आंग्रे याचे निशाण किले माणिकगड रास्ते याजकडेस होता. त्याचवर दोन प्रहरी चढविले कलम १ (आंग्रकालीन अष्टागर (अधिकारी शकावली) :संपा. शां.वि. आवसकर, भा.इ.सं.मंडळ, पुणे. १९४७. पान नं. ९६)

५. शिवचरित्र साहित्य २४ वा खंडः प्रकाशन भा. इ. सं. मंडळ, पुणे.१९६४ पा.७६.

६. तनखा- किल्ल्याच्या सभोवारच्या ज्या गावाचा वसूल त्या किल्ल्याकडे लावून दिला आहे तो त्या किल्ल्याचा तनखा

७. या पत्रात माणिकगडाच्या ४ तर्फांचा उल्लेख आहे. पण यात आलेला 'चिवणखल' हा शब्द चिमणखळ म्हणून इतरत्र वापरण्यात आला आहे व प्रचलित होता. तसेच अंजुरवलित या तर्फचा उल्लेख अनेक शब्दांनी केलेला दिसतो जसे की आऊरावलि, आतुरवलित इ.)

८. कुलाबकर आंग्रे सरखेलः दा.गो.ढबू, शं.ना.जोशी, कर्नाटक प्रि.प्रेस, मुंबई शके १८६१. पा.४०

पूर्वी विशेष सेवा, सन्मान किंवा राजघराण्याकरिता केलेला त्याग अशा अनेक कारणांसाठी जेव्हा माणिकगड तालुका होता तेव्हा या चार तर्फांचा उल्लेख आढळतो. सध्या या गावांना पुढीलप्रमाणे नावे प्रचलित आहेत. चिमणखळ-वरसईचा परिसर, वनखल-चौकचा परिसर. अंजुरवलित किंवा आऊरावलि-उरणचा परिसर, तुंगारतन-मोहपाडा परिसर.

रोख रकमेची, महसूल माफीची, देवस्थान चालविण्यासाठीची इनामे [९] दिलेली दिसतात. इनामे ही बऱ्याचदा झालेल्या कामासाठी संतुष्ट होऊन दिलेली असतात. काही इनामे काम सततचे चालू राहावे म्हणून दिलेली असली तरी त्याचे स्वरुप सामान्यतः धार्मिक असते, व्यवहारमुख नसते म्हणजे देवतार्चन, पुराणकथन किंवा एखाद्या मंदिर, समाधीची व्यवस्था -झाडलोट पहाणे इ. कामाकरिता इनाम दिलेले असते. [१०] वरसईमधील इनामदारांना प्रसंगोपात इनामे दिलेली दिसतात. त्या काळातील सनदा व आज्ञापत्रे यावरुन हे स्पष्ट होते. (ऐतिहासिक पत्र क्र. २) शके १७३५ (इ.स.१८१३) मधील सातारकर इनामदार जोशी यांचे पूर्वज आबाजी नारायण जोशी यांना बाबूराव आंग्रे यांनी मोहिली या गावाचे इनाम दिल्याची सनद आहे. यात जोशी यांना "सरकारला भरपूर उपयोगी पडल्याने सांकसई परगण्यातील चिमणखळ तर्फमधील मौजे मोहिली करिता रु.५० ची नख्त नेमणूक[११] करुन दिली आहे. हे इनाम तात्पुरतें न रहाता वंशपरंपरेने चालूच राहिल" असे स्पष्ट करण्यात आले आहे. [१२]

यासारख्याच एका पत्रात (ऐतिहासिक पत्र क्र. ३) म्हटल्याप्रमाणे करोडी या गावाच्या सध्याच्या आणि पुढील (हल्ली पट्टी व पेस्तर पट्टी) वसूली वर पूर्णतः आबाजी नारायण जोशी यांचाच हक्क राहिल. यामध्ये वसूली किती रुपये असेल याचा उल्लेख केलेला दिसत नाही पण हा वसूल त्यांच्या नावे खर्च धरला जाईल असे स्पष्ट करण्यात आलेले आहे. म्हणजेच आज्ञापत्र दिलेल्या व्यक्तीला त्या गावाचा वसूल जमा करण्याचे अधिकार मिळत असावेत असे दिसते. [१३]

बाबूराव आंग्रे व मानाजी आंग्रें (दुसरे) यांच्या कारकीर्दीतील आज्ञापत्र आणि यादीवरुन माणिकगडा सभोवतालच्या १३ गावांचे इनामदार म्हणून विश्वास खंडेराव रास्ते

९. इनाम-जमीन किंवा गाव दिलेला असणे व तो वंशपरंपरेने चालणे.
१०. मराठेकालीन समाजदर्शनः संपादक शं.ना. जोशी, अ. वि. गृह प्रकाशन, पुणे २, १९६०. पान नं. २२१.
११. नख्त नेमणूक-रोख भरणा करुन घेण्यासाठी केलेली नेमणूक (नख्त या शब्दाचा अर्थ रोख भरणा असा आहे.)
१२. कुलाबकर आंग्रे सरखेल :दा.गो.ढबू.शं.ना.जोशी, कर्नाटक प्रि.प्रेस मुंबई ,१८६१. पान नं.२६७.
१३. कुलाबकर आंग्रे सरखेलः .दा.गो.ढबू,शं.ना.जोशी, कर्नाटक प्रि.प्रेस,मुंबई,१८६१, पान २७१

यांना नेमल्याचे दिसते. तसेच या गावांवर एकूण ५ पोट इनामदार नेमल्याचे दिसते. या सर्व इनाम सनदांच्या भाषेवरुन असे दिसते की ही सर्व इनामे इनामदारांकडे वसूल जमा करण्यासाठी देण्यात आलेली दिसतात. इनामदारांनी जमा केलेला वसूल सरकारांत जमा करण्याऐवजी तो स्वतःच्या चरितार्थाकरीता ठेवावा. ती वसूलाची रक्कम सरकारकडे इनामदारांच्या नावे खर्च धरण्यात येत असावी. या इनामदारांनी आंग्रें सरकारने दिलेल्या सनदेचा उपयोग वंशपरंपरेने केलेला दिसतो. ब्रिटिशकाळात देखिल एल्फिस्टननेही याला हमी दिलेली दिसते. [१४]

**वरसई (सांकसई) येथील वतनदारी पध्दतीचे प्रकार-** पेशवाईनंतर कोकण प्रांतात वतनदारीचे खोती आणि शिलोत्तरी वतन असे वतनाचे काही प्रकार निर्माण झालेले दिसतात. पेशवेकाळात आंग्रे यांच्याकडे पेण, सांकसई या गावामध्ये असणाऱ्या वतनदार आणि इनामदार, खोत या सरकारी अधिकाऱ्याचे हक्क, अधिकार ऐतिहासिक पत्रांच्याआधारे आढळतात. त्यामधून कोकण प्रांतातील महसूली व्यवस्था स्पष्ट होते.

**शिलोत्तरी वतन -** शिलोत्तरी वतनदारी कोकण प्रांतात मुख्यत्वे अलिबाग, पेण, पनवेल व उरण तालुक्यात अस्तित्वात होती. सवलतीच्या अटीवर आधारलेल्या या वहिवाटीनुसार खार जमिनी लागवडीखाली आणण्यास व त्यांची निगा राखण्यास उत्तेजन देण्यात येत असे. अशा प्रकारच्या जमिनी खाडीजवळ असतात. शिलोतरीदार हे त्याकाळी श्रीमंत होते. त्यामुळे त्यांनी अशा प्रकारच्या बऱ्याच जमिनी ताब्यात घेतल्या होत्या. या जमिनींना इस्तावा असेही म्हणत. लहान लहान खाडयांच्या तोडांशी बांध घालून अशा जमिनी लागवडीखाली आणलेल्या होत्या आणि हे बांध टिकून राहिले तरच त्या कायम लागवडीखाली राहू शकत.

खारजमीन ही समुद्र किनाऱ्यालगतच आढळते. ज्या ठिकाणी नद्या समुद्राला मिळतात अशा प्रदेशात समुद्राच्या खाऱ्या पाण्यामुळे खारी जमीन तयार होते. ही जमीन सपाट असली तरी समुद्राचे पाणी पसरल्यामुळे नापीक बनते. खार जमीनीचे पुर्नप्रापण व खाऱ्या पाण्यास प्रतिबंध या मोठया समस्या आहेत. याबाबत अठराव्या शतकापासून प्रयत्न करण्यात येत होते. समुद्राच्या भरतीखालील जमिनी शेतीच्या उपयोगी करण्यास खार पाडणे असे म्हणतात. अशा शेतीस खारेपाट म्हणतात. [१५]

---

१४. कुलाबकर आंग्रे सरखेलःदा.गो.ढबू,,शं.ना.जोशी,, कर्नाटक प्रि.प्रेस,मुंबई,१८६१, पान २७१

१५. रायगड गॅझेटिअर :महाराष्ट्र शासन, शासकीय मुद्रणालय,मुंबई, १९९३, पान नं ५९६.

या कामी सरखेल कान्होजी आंग्रेच्या काळात उत्तेजन दिले गेले. खाडयांचे पाणी अडविण्यासाठी बंधारे बांधण्याचे कामही आंग्रे काळात केले गेले. (विशेषतः १७५५ ते १७८० दरम्यान) खारे पाणी अडविण्यासाठी बांधलेल्या बंधाऱ्याला एक द्वार असे तेथे शिळा बसविली जात असे. या दाराची व शिळेची देखरेख करण्यासाठी नेमलेल्या व्यक्तीस काही हक्क किंवा वतन दिले जात असे. त्यालाच शिलोत्तरी पाटीलकी म्हणत किंवा शिळोत्री वतन म्हणत. इ.स.१९५५ च्या मुंबई शिलोतरी धारणाधिकार (कुलाबा) निर्मूलन अधिनियमानुसार १ फेब्रुवारी १९५६ पासून ही वतनदारी नष्ट करण्यात आली. [१६]

**खोती पद्धत** - ही पेशवाई काळापासून मुख्यत्वे कोकण प्रांतात अस्तित्वात होती. ही पध्दत जहागिरी आणि इनामदारी पध्दतीतून सुरु झाली होती. गावचा सारा वसूल करण्यासाठी त्यावेळचे सरकार विशिष्ट व्यक्तींना सनदेने काही हक्क देत असे. खोताने जमीन धारकाकडून वसूल करावयाचा सारा ऐनजिनसी देखिल असे. म्हणजेच जमिनीत पिकणाऱ्या पदार्थाचा प्रत्येक जमीनदाराला काही अंश सरकारकडे भरणा करावा लागे. त्याचे प्रमाण १/६ पासून १/३ पर्यंत होते.

पूर्वीपासून कर वसूलीसाठी अंमलदार नेमण्याची पध्दत होती. त्यात खोतांना सनद दिली जात असे. या वसूली करणाऱ्या अंमलदारास आपला मेहनताना सरकारात भरावयाच्या धान्याच्या प्रमाणातील साऱ्यातून काही प्रमाणात राखून ठेवण्याचा अधिकारही दिलेला असे. तो प्रत्येक ठिकाणी असणाऱ्या वहिवाटीप्रमाणे कमीअधिक असे. काही ठिकाणी दर खंडी सारा वसूली मागे १ कुडव खोतांना घेण्याचा अधिकार असल्याचे दिसते. (कुडव म्हणजे अडीच पायली) काही ठिकाणी सारा वसूलीच्या फक्त १ भाग खोतांना घेण्याचा अधिकार असल्याचे दिसते. परंतू काही ठिकाणी मात्र सारा वसूलीच्या प्रमाणात खोताचा हक्क नसून खोत हा त्याला दिलेल्या हक्कान्वये म्हणजेच सनदेने गावाचा सर्वस्वी मालक असेल तर गावातील जमीन कसणाऱ्यांकडून भाताच्या उत्पन्नाचे 'अर्धेल' व वरकस उत्पन्नाचे 'तीर्देल' असा वसूल करण्याची वहिवाट होती. [१७] शिवाय गावातील लागवड न केलेल्या जमिनीवर तसेच जंगलावर मालकीप्रमाणे खोताचा हक्क असे. त्यातील सर्व उत्पन्न खोतानेच घेण्याची पध्दत होती. खोताच्या सर्वांकुश अधिकारामुळे खोत आपापल्या गावात जमीन कसणाऱ्यांकडून वेगवेगळया प्रकारे त्यांच्या श्रमाचा फायदा स्वतःकरिता मिळवीत असे.

**१६.** रायगड गॅझेटिअर :महाराष्ट्र शासन, शासकीय मुद्रणालय,मुंबई, १९९३, पान नं ५९७.

१७. शिवकालीन महाराष्ट्रः डौ. अ.रा.कुलकर्णी ,राजहंस प्रकाशन, द्वितीयावृत्ती, १६ एप्रिल १९९७, पान ४५.

कोकणात शिवकाळात अण्णाजी दत्तोनी सुरु केलेली जमीनधारा पद्धत संभाजी राजेंच्या कारकीर्दीनंतर हळूहळू लोप पावली आणि पेशव्यांच्या कारकिर्दीत मुख्यत्वे खोती हे सरकारी नोकरीचे वतन निर्माण झाले. सरकारी सारा वसूल करण्याबरोबरच खोतांकडे पोलिसी अधिकारही होते.

ब्रिटीश अमदानीच्या सुरुवातीस ब्रिटीश राजवटीने सर्व्हे सेटलमेंट ॲक्ट लागू करुन गावांचा सर्व्हे केला व जमिनीवर सारा बसविला. साऱ्याच्या आकारणीचे प्रमाण उत्तम जमीनीस एकरी चार आण्यापासून जास्तीत जास्त एक रुपया असे केले. त्यांनी खोती विभागाकरीता १८७० मध्ये खोत सेटलमेंट ॲक्ट लागू केला. [१८] या काळात खोती पध्दत फक्त कोकणाच्या दोन जिल्हयात अस्तित्वात होती. आजचा सिंधुदुर्ग, रत्नागिरी व रायगडचा दक्षिण भाग पेण तालुक्यापर्यंत रत्नागिरी जिल्हा पनवेल कर्जतपासून ठाणे जिल्हयाचा दक्षिण भाग हा ठाणे जिल्हा होता.

ब्रिटीश सरकारने खोती पध्दतीचा खरा अर्थ लावून खोतांच्या हक्कांची शहानिशा करण्यासाठी १९०७ मध्ये श्री अच्युत भास्कर देसाई या मामलेदारास कमिशनर नेमले. श्री. देसाई यांच्या चौकशीत "खोत हे वंशपरंपरा शेतजमीनीचा खंड वसूल करुन तो सरकारला भरणा करणारे हक्कदार" असल्याचे स्पष्ट झाले. [१९] सांकसई परगण्यातील वरसई या गावामध्ये शेतीशिवाय दुसरे उत्पन्नाचे साधन दिसत नाही. त्यामुळे येथील लोकांवर आंग्रेसरकारने आणि पेशव्यांनी मोजकेच कर आकारलेले दिसतात.

**सांकसई परगण्यातील करांचे मार्ग पुढीलप्रमाणे -**

**(१) घरपट्‌टी** - घरांवर आकारलेला कर म्हणजे घरपट्‌टी. ही या परगण्यात जमा करण्याची पध्दत होती असे दिसते. माणिकगडावर ज्याचा ताबा ते राज्यकर्ते सभोवती असणा-या गावांकडून वसूल घेत असावेत. -ऐतिहासिक पत्र १ यातील उल्लेखाप्रमाणे या परगण्यात घरपट्‌टी वसूल केली जात असल्याचे दिसते परंतू तिचे प्रमाण किती होते आणि ती कोणा कोणाकडून वसूल केली जात असावी याचे उल्लेख मात्र आढळून येत नाहीत. माणिकगडावरील सत्तेमध्ये बदल झाल्यानंतर या परगण्यातील घरांची आणि म्हैशींची पाहणी करण्याची पध्दत या काळात असल्याचा संदर्भ या पत्रातून दिसून येतो. चिमणखळ म्हणजे सध्याच्या वरसईमध्ये असणा-या घरांवर घरपट्‌टी लावली जात असावी असे दिसते.

१८. रायगड गॅझेटिअर :महाराष्ट्र शासन, शासकीय मुद्रणालय,मुंबई, १९९३,पान ५९५.

**१९.** रायगड गॅझेटिअर :महाराष्ट्र शासन, शासकीय मुद्रणालय, मुंबई, १९९३,पान ५९५.

**(२) जमीन महसूल** - सांकसई परगण्यातील चिमणखळ म्हणजे सध्याच्या वरसई परिसरातील अनेक गावे आंग्रे यांनी इनाम दिलेली दिसतात. इनाम दिलेल्या गावातील जमीन महसूल जमा करण्याचे अधिकार इनामदारांना दिलेले दिसतात. इनामदारांनी संबंधीत गावातील ठरवून दिलेला वसूल जमा करावा पण तो सरकारात भरणा करण्याऐवजी स्वतःच्या चरितार्थासाठी वापरावा. इनामदारांना नेमून दिलेली रक्कम सरकारकडे त्यांच्या नावे खर्च धरण्यात येत असे. अशा स्वरुपाची लेखी तरतूद इनामदारांनां दिलेल्या सनदांमध्ये किंवा पत्रांमध्ये आढळून येते. हंगामापूर्वी सरकारतर्फे पाहणीदार जाऊन पीक पाहणी तयार करीत असे. त्यानुसार सारा लावला जात असावा.या प्रदेशात शेती ही फक्त पावसाच्या पाण्यावर केली जात असल्याने वर्षातून एकच पिक घेतले जात असे. त्यामुळे जमिनीतून निघणाऱ्या उत्पन्नावर त्या प्रमाणात जमीन महसूल घेतला जात असे.

**(३) जकात** - चिमणखळ म्हणजे सध्याच्या वरसईमध्ये बाजाराच्या दिवशी जकात घेतली जात असे. सांकसे किल्ल्यावरील अधिकारी ही जकात जमा करीत असे. चिमणखळ म्हणजे सध्याच्या वरसई येथे दर गुरूवारी बाजार भरतो. त्यावर पूर्वी जकात भरावी लागत असे. पण सन १७९९ साली सांकसई (सांकसे) किल्ल्याच्या अधिका-याला वरसई येथील ब्राम्हणांनी विनंती केली व जकात रद्द करून घेतली असा उल्लेख आढळतो. [२०] म्हणजेच ज्याप्रमाणे आंग्रेकाळात सवलती दिल्या जात असत त्याप्रमाणे लोकांचे हित पाहून काही कर रद्द केलेलेही दिसतात.

**करापासून उत्पन्न देणारे घटक –**

कराच्या माध्यमातून उत्पन्न जमा करत असताना आंग्रेंनी कराचा पाया विस्तारीत ठेवल्याने छोटया छोटया किंवा कमी महत्त्वाच्या वाटणाऱ्या घटकांपासूनही कर जमा केलेले दिसतात. भारतात प्राचीन काळातील कौटिल्यापासून अशा प्रकारे कराचा पाया विस्तारीत करण्याची पद्धत अनेक राज्यकर्त्यांनी स्विकारलेली दिसून येते. वरसई (चिमणखळ) येथे पेशवेकाळात आंग्रे सरकारने अश्याच प्रकारे अनेक घटकांपासून कर जमा केले असावेत. परंतु, ऐतिहासिक पत्रांच्या आधारे सांकसई - वरसई येथे जमीन महसूल आणि घरांवरील घरपट्टी आणि म्हैसपट्टी वसूल केली जात असल्याचे आढळते. म्हणजेच सांकसई येथे करापासून उत्पन्न देणारे जमीन, घरे आणि म्हैशी इ. घटक असल्याचे दिसून येते.

---

२०. हा उल्लेख वरसई येथील कै. र.ल. टिळक यांच्याकडील खाजगी कागदपत्रात आढळतो. श्री वैजनाथ देवस्थान (वरसई) – वार्षिकांक १९९८ मधील डॉ. विजय भावे यांचा “वरसई परिसरातील इनामे व इनामगावे” हा लेख.

## कर संकलन अधिकारी –

आंग्रे सरकारने (इनामदारी) वतनदारी या पद्धतीला महत्त्व दिलेले दिसते. त्यामुळे सांकसईमधील वरसई येथे अनेक वतनदार आणि इनामदार असल्याचे दिसते, ज्यांच्यामार्फत कर संकलन केले जात असे. यामध्ये भावे, जोशी, रास्ते, नातू, कानडे, सहस्त्रबुध्दे अशा इनामदार मंडळींचा समावेश असलेला दिसतो. [२१]

वरसईजवळील माणिकगड या किल्ल्यावर कधी पेशवे कधी आंग्रे यांचे वर्चस्व होते. २८ मे १७४७ मध्ये माणिकगड मानाजी आंग्रेकडून पेशवेंनी घेतला. १८ ऑगस्ट १८१३ मध्ये रास्तेंकडे असणारा हा किल्ला आंग्रेंनी घेतला. या किल्ल्यावर ज्याचा ताबा तो या सभोवती असणाऱ्या गावांकडून वसूल घेत असे. (ऐतिहासिक पत्र क्र १) या पत्रावरुन असे दिसते की सत्ताधीश कोणीही असो वरसई येथील इनामदारांकडेच या भागातील कर वसूलीची जबाबदारी दिलेली असे.

## कर रचनेमधील राज्यकर्त्यांचे धोरण –

कोकण प्रांतामधील आंग्रेंच्या आणि पेशवेंच्या वर्चस्वाखाली असणाऱ्या प्रदेशामध्ये सर्वसाधारणपणे लोकांच्या हिताला महत्व दिलेले दिसते. कोकण प्रांतामध्ये असणारा समाज पावसावर आधारीत शेती करणारा असल्याने त्याची आर्थिक परिस्थिती बेताची असणारा आहे. बारमाही पिके घेण्यासारखी जमीन आणि पाण्याची व्यवस्था नसल्याने कोकणातील समाज काही अंशी गरीब राहिलेला दिसतो. या सर्व गोष्टींचा विचार मराठा काळात पेशवे आणि आंग्रे यांनी केलेला असल्याचे त्यांनी अवलंबिलेल्या धोरणातून आढळते.

१. **लोकांचे हित** - पेशवे आणि आंग्रे यांची सत्ता अस्तित्वात असणाऱ्या या प्रांतामध्ये त्या त्या ठिकाणच्या इनामदारांकडे त्यांच्या आजूबाजूला असणारी गावे सुपूर्द केलेली दिसतात. त्यामुळे या इनामदारांना (त्याच परिसरातील असल्याने) शेतकऱ्यांचे प्रश्न, वार्षिक स्थिती याची जाणीव होती. परिस्थितीप्रमाणे आपल्याकडे देण्यात आलेल्या गावांचा वसूल जमा करण्याचे काम चोखपणे इनामदार करत असत. आंग्रेंनी पडीक जमीन नव्याने लागवडीस आणणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी सुरुवातीची काही वर्षे त्या जमीनीवरील सारा पूर्ण साऱ्यापेक्षा कमी लावून मग दरवर्षी वाढवून घेतलेला दिसतो. राघोजी आंग्रे यांनी वरसई येथील वेदमूर्ती राजश्री गोविंदभट व रामभट व सदाशिवभट भावे यांना सन१७७४ मध्ये अभयपत्र दिलेले होते.

---

२१. श्री वैजनाथ देवस्थान (वरसई) – वार्षिकांक १९९८ मधील डॉ. विजय भावे यांचा "वरसई परिसरातील इनामे व इनामगावे" हा लेख.

या अभयपत्राप्रमाणे भावे यांना दिलेली जमीन इस्तावा पध्दतीने (नवीन जमीन लागवडीस देते वेळी काही वर्षेपर्यंत भर साऱ्यापेक्षा कमी, परंतू दरसाल वाढत्या साऱ्याने जमीन देणे ) दिलेली दिसते. (ऐतिहासिक पत्र ५) साऱ्याच्या ओझ्याखाली शेतकरी दबला जाऊ नये यासाठी अशी पध्दत स्विकारण्यात आलेली दिसते. यातून राज्यकर्त्यांनी लोकांच्या हिताला महत्व दिलेले दिसते.

आंग्रेनी कर वसूली करताना प्रत्येक उत्पन्न देणाऱ्या घटकांचा विचार केलेला दिसत असला तरीही ज्याला कर देणे शक्य नाही त्याला त्यातून सूटही दिलेली दिसते. उत्पन्नाच्या छोटया छोटया घटकांवरही आंग्रेंनी कर लावलेले असूनही ते जाचक असलेले दिसत नाहीत म्हणजेच कर पध्दती शिवकाळासारखी लवचिक होती असेही म्हणता येईल.

२. **सरकारच्या सेवेबद्दलचा मोबदला** - आंग्रे आणि पेशवे यांनी कोकण प्रांतात काही इनामदारांकडे सभोवतालची गावे, गावांचा वसूल जमा करण्याचे अधिकार दिलेले दिसतात. या वसूलीतून मिळणारा पैसा या इनामदारांच्या चरितार्थासाठी वापरण्याचे अधिकार त्यांना देण्यात आलेले दिसतात. सरकारला विशिष्ट प्रकारची मदत करण्याप्रित्यर्थ, सरकारची सेवा केल्याबद्दल हे अधिकार इनामदारांना दिलेले दिसतात. अशा प्रकारची इनामे आणि ती वापरण्याचे अधिकार मराठा काळाच्याही आधीपासून प्रचलित असलेली पद्धत दिसते.युद्धाच्या प्रसंगी किंवा सरकारच्या कोणत्याही प्रकारच्या कार्यात एखाद्याची मदत झाली असल्यास त्याला असे इनाम दिले जात असे. ज्या इनामाच्या वसूलीमधून इनामदार, वतनदार आपला चरितार्थ चालवित असे.

म्हणजेच आंग्रे, पेशवे या सत्ताधिशांनी वेतनाच्या स्वरुपात वतनदारांना, पाटील, देशपांडे, कुलकर्णी यांना नेमलेले दिसत नाही. शिवकाळात मात्र अशा नेमणूका केलेल्या आढळून येतात आणि या वतनदारांना सध्याचे आणि पुढील काळातील असे अधिकार देवून त्यांच्या चरितार्थाची जबाबदारी स्विकारलेली दिसते.

३. **धर्म रक्षण** - आंग्रे आणि पेशवे या राज्यकर्त्यांनी कोकण प्रांतामध्ये असणाऱ्या गरीब ब्राम्हणाच्या चरितार्थासाठी त्यांना काही गावे दिलेली आढळतात. तसेच देवस्थानाची व्यवस्था व्हावी, त्याची स्वच्छता राखली जावी, पंडित विद्वानांचे शिक्षण व्हावे त्याचा समाजाला फायदा व्हावा यासाठी ब्राम्हण कुटूंबाना इनाम जमिनी किंवा गावे दिलेली आढळतात.

तसेच, सांकसईमध्ये ब्राम्हण कुटूंबांचे पालनपोषण करण्याची जबाबदारी राज्यकर्त्यांनी स्विकारलेली आढळते. ज्यांच्या जवळ उत्पन्नाचे साधन नाही त्यांना जमीन

किंवा जमीनीपासूनचे उत्पन्नाचे साधन मिळवून दिलेले दिसते. अशा प्रकारचे धोरण आखण्याचे आंग्रे आणि पेशवे यांचे धोरण धर्मरक्षणाचे असलेले दिसते.

४. **<u>विशेष सन्मानाप्रित्यर्थ</u>** - आंग्रे आणि पेशवे यांनी आपल्या सेवेमध्ये असणाऱ्या व्यक्तींना विशेष सन्मान म्हणूनही काही गावे इनाम म्हणून दिलेली दिसतात. कोकण प्रांतातील काही व्यक्तीचे विशेष कर्तृत्व लक्षात घेवून, सरकारला झालेली विशेष मदत लक्षात घेवून अशी इनामे दिलेली दिसतात. (ऐतिहासिक पत्र २)

५. **<u>सवलती</u>** - आंग्रे आणि पेशवे यांनी त्यांच्या राजवटीमध्ये अनेक गरीब कुटूंबांना सवलती दिलेल्या दिसतात. या सवलती विशेषतः कराबाबत असलेल्या दिसतात. आंग्रेनी त्यांच्या राजवटीमध्ये अनेक प्रकारचे कर लोकांकडून घेतलेले दिसतात. पण या प्रत्येक प्रकारच्या करामध्ये सवलतीही दिलेल्या दिसतात. म्हणजेच करपद्धती जाचक स्वरुपाची आणि अन्यायकारक असलेली दिसत नाही.

## ऐतिहासिक पत्रे -

**पत्र १.**

पुरवणी श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे सेवेशी. १०-७-१७४७

विज्ञापना. तागायत छ १२ रजेब. किल्ले माणिकगड सरकारात आला त्यास किल्ल्याचे तनख्याच्या तर्फा च्यार वनखल व चिमनखल व अंजुरवलीत व तुंगारतन हया चार तर्फा. एक तर्फी आंगरियाकडील आहे तेथील वसूलवासूल प्यादाजवादा अंगारकाचा उठवावा. त्यास स्वामींचे आज्ञापत्र सादर जाले कीं, मुलकांत चिठी मसाला अगर आंगरियाकडील अमलास येथील आज्ञेविना तोसीस न लावणे.त्यास प्रस्तुत आंगरियो वरातदार चोरीनीं येऊन घरपटटीचा वसूल घेतात. काही काही घेतला आहे. आम्ही परिछिनवादे वरातदार फितेन द्यावे तरी स्वामींची आज्ञा नाही. ते तरी वसूल घेतात. पुढे घरपट्टीचा वसूल व पाहणी घराची व म्हैसीची पाहणी जाहाली पाहिजे. त्यास आमची दखलगिरी करावी. याज वर आंगरियासी वसूल घेऊ द्यावा की न द्यावा ते आज्ञा केली पाहिजे. आम्ही उगीच मनाई करवितो, परंतु आज्ञेविना निष्ठूर करवत नाही. आज्ञा ते सिरसा.
सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

(कुलाबकर आंग्रे सरखेल :दा.गो.ढबू.शं.ना.जोशी, कर्नाटक प्रि. प्रेस, मुंबई शके १८६१. पान नं.४०.)

**पत्र २**. सातारकर इनामदार जोशी यांचे पूर्वज आबाजी नारायण यांस बाबूरावांची सनद शके १७३५ (इ.स. १८१३)

> “आज्ञापत्र समस्त राजकार्य धुरंधर विश्वासनिय राजमान्य राजश्री बाबूराव आंग्रे वजारत माब सवाई सरखेल बनाम राजश्री आबाजी नारायेण उपनाम जोशी गोत्र शांडिल्य सूत्र आश्वलायन व ।। मौजे वायंगणी तालुके रत्नागिरी सु।। आर्बा असर मयातैन व अलफ शके १७३५ श्री मुखनाम संवत्सरे दिल्हें आज्ञापत्र ऐसाजें, तुम्हीं सरकारांत बहुत उपयोगी पडलां, तुमचे चालवणे आवश्यक जाणून तुम्हांवर कृपाळू होउन कुटुंबाचे बेगमीस नूतन इनाम मौजे मोहिली तर्फ चिमणसाल परगणे सांकसे तो माणिकगडपैकीं नख्त नेमणूक रु.५० करुन दिले असत तरी सदरहु पन्नास रुपये मौजे मजकूरपैकीं दरसाल तुम्ही व तुमचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेने इनाम घेउन सुखरुप राहणें. साल दरसाल तुमचे नांवें इनाम खर्च पडत जातील. जाणिजे छ. २५ साबान.

(कुलाबकर आंग्रे सरखेल :दा.गो.ढबू.शं.ना.जोशी, कर्नाटक प्रि. प्रेस, मुंबई शके १८६१. पान नं.२६७.)

**पत्र ३.**

> आज्ञापत्र समस्त राजकार्य धुरंधुर विश्वासनिधी राजमान्य राजश्री मानाजी आंग्रे वजारत माब सरखेल बनाम राजश्री आबाजी नारायण उपनाम जोशी गोत्र शांडिल्य, सूत्र आश्वलायन व।।. (वस्ती) मौजे वायंगणी तो रत्नागिरी, सु।।. खमस अशर मयातेन व आलफ शके १७३६ भाव नाम संवत्सरे दिल्हे आज्ञापत्र ऐसाजे तुम्ही सरकारांत बहुत उपयोगी पडला, तुमचे चालवणें आवश्यक जाणून तुम्हांवर कृपाळू होऊन कुटुंबाचे बेगमीस मौजे करोडी ता।।. चिमणसाल पेटा साकसे (सालसे) तो माणिकगड हा गांव कुलबाब कुलकानू हल्लीपट्टी व पेस्तरपट्टी जल, तरु, तृण, काष्ठ, पाषाण निधी निक्षेपसहित खेरीज हकदार व इनामदार व नेमणुकी करुन दरोबस्त साल मजकूरापासून नूतन इनाम करार करुन दिल्हें असे. तरी मौजे मजकूर हा गांव तुम्ही व तुमचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें इनाम अनुभवून राहणें. साल दरसाल मौजे मजकूरचा आकार तुमचे नावें इनामखर्च पडत जाईल. जाणीजे.
>
> छ. २२ रमजान मोर्तबसुद.

(कुलाबकर आंग्रे सरखेल :दा.गो.ढबू.शं.ना.जोशी, कर्नाटक प्रि. प्रेस, मुंबई शके १८६१. पान नं.२७१.)

**पत्र ४.**

यादी विश्वास खंडेराव रास्ते यांजकडे व मंडळीकडे “आंग्रे” यांचे सरकारांतून इनाम गांव व जमिनी चालक आहेत. सु ।।. सन इहिदे अशरीन मयातैन व आलफ.

| गांव | जमिनी व खारी |
|---|---|
| ४ तर्फ वाकरुळ | १ खार सिमादेव तर्फ आउरवलीत रू २०० |
| १ कसबे मजकूर | १ मौजे कोपरोली तर्फ आतुरवलीत रू ५० |
| १ मौजे कुरमुरली | १ मौजे देवकेली तर्फ तुंगारतन रू ५० |
| १ मौजे सापवली | |
| १ पिंपळगाव | |
| ----- | |
| ४ | |
| ४ तर्फ चिमणखळ | |
| १ मौजे गागोदे बुदरुख | |
| १ ” करोडी | |
| १ ” मोहिली | |

१ ” आष्टे
-----
४
२ तर्फ आउतुरवलीत
१ मौजे जितें
१ ” दुसवी
-----
२
१ तर्फ तुंगारतन
मौजे कांबे
२ तर्फ दुर्ग हवेली
१ मौजे बेलवडे
१/२ मौजे दवणसर
-----
१३

५२०० विश्वासराव खंडेराव रास्ते

५००० जातीस सन समान मयातैनापासून खंडेराव नीळकंठ यास दिल्हे. ते गाव सन आर्बा मयातैनापासून विश्वासराव खंडेराव यांच जातीकडे लागले ते.

१ कसबे वाकरूळ तर्फ मजकूर
१ मौजे जीते तर्फ आतुरवलीत
१ मौजे दुस्वी तर्फ आतुरवलीत
-----
**३**

२०० खार सिमादेव तर्फ आतुरवलीत व कसबे वाकरूळ येथे ब्राम्हणाची वसाहत नवीन करणार सबब सन खमस मयातैन.

---- -----
**५२००**

(कुलाबकर आंग्रे सरखेल दा.गो.ढबू.शं.ना.जोशी, कर्नाटक प्रि. प्रेस, मुंबई शके १८६१. पान नं.२७१.)

## पत्र ५

वेदमूर्ती राजश्री गोविंदभट व रामभट व सदाशिवभट उपनाम भाव्ये वास्वव्य मौजे वरसई तो। चिमणखळ प्रा.सांकसे. सन खमस पांचवे साल पेस्तर जमेस येणे त्याचा आकार जमाबंदीत बंद घ्यावयाची आज्ञा होऊन हाली इस्तावा पेशजीचे नगदी सिरीस्ते प्रो। शा सन खमस पेस्तर साल तागांईत सन तिसा समानीन साले पांच करार करुन अभयपत्र सादर केले असे तर पेस्तर सालापासून दरसाल पाहाणी करून पाहीणीस जमीन मामुरा लागत जाईल. त्यास नगदी सिरस्ता रुपये

१ प्रथम साली दर बिघा रू. एक
२ दुसरे साली दर बिघा रू. दोन
३ तिसरे साली दर बिघा रू. तीन
४ चवथे साली दर बिघा रू. चार
५ पाचवे साली दर बिघा रू पाच

येणेप्रमाणे उगवणी करीत जाऊन सेत मामुरी करणे. अभय असे. जाणिजे .
जमादिलारवर मोर्तब छ २२.

(हे अभयपत्र वरसई येथील डॉ. विजय भावे यांचेकडे सापडले. हे मोडीमध्ये आहे.)

……………………..

## iv) अर्थ व महसूलविषयक निवडक ऐतिहासिक पत्रे

**शिवकालीन पत्र सार संग्रह-**

पत्र २३४५ - इ.स. १५६४ ऑगस्ट९- १५६५ जुलै २८- चोलराज बिन कवनसिंघ बिन अखयसिंघ (घोरपडे) यास पहिला अली आदिलशहाने लिहिलेले पत्र- अली आदिलशहाने मोठया लढाईत शौर्य दाखवून शत्रूला पळवून लावण्याचा प्रयत्न केला आणि शत्रूला मारताना चोलराजचे वडील मृत्यूमुखी पडल्याने त्यांना रायबाग व हुकेरी सह ८४ गावांचा भत्ता, मुधोळ, आणि वाई परगण्यातील चाळीस गावे, तोरगळ हा किल्ला दिला. त्यांना सात हजारी सरदार केले आणि नेमलेल्या फौजेच्या खर्चासाठी मुद्गल परगणा व कल्लूरच्या भोवतीची खेडीही दिली.

पत्र २३४८ - अली आदिलशाहाने तपे सालसीच्या ठाणेदार खानास लिहिलेले पत्र- अली आदिलशाह यास कुकदे प्रभु बिन भाइदे प्रभु देसाई तपे सालसी यांनी विनंती केली की तप्यातील इतर देसायांस गावे इनाम आहेत यांना इनाम नाही म्हणून मौजे ओटव इनाम मिळावे त्याबद्दल ते चौथाई २५० होन देण्याचे कबूल करतात. याप्रमाणे आदिलशाहाने त्यांना इनाम दिले आहे.

पत्र २३६६- इ.स. १५९७ ऑगस्ट १५- येकतारखान याने परगणे न्यामताबादचे कारकून व खोत यांना लिहिलेले पत्र- दतंभट बिन पदमाकर भट कसबे चांदवड यांना परगणे न्यामताबाद जकातीपथक केडवणेचे इनाम दररोज नख्त रुके ६ (सहा) तेल वजन १ दिले आहे.

पत्र २३४९- तपे खारेपाटण मामले मुजफराबादचे दिवाण (१५७२ सप्टें २७) याने गोपाळ कृष्ण जोशी, पोंबुर्ले तपे खारेपाटण यास लिहिलेले पत्र- कृष्ण जोशी यांनी जोशीपणाचे अधिकार मिळविण्याची विनंती केली आणि त्याप्रमाणे त्याला जोशीपण देण्यात आले.

पत्र २३५८- किल्ले स्यादुर्गचे मुधाजी विश्वासराव देशमुख यांनी सर्जाराव काटे (मुकादम) मौजे मंगळूर यांना, लिहिलेले पत्र - मौजे मंगळूरची मोकदमी खरीद केली. तूम्हास

किल्याच्या नैबगैबत साहेबाचा कौल व मोकासा पाठविण्याचे कळविले आहे आणि मंगळूरची कीर्द मामुरी करुन मोकदमी चालविण्यास सांगितले आहे.

<u>पत्र २३६७</u>- बऱ्हानपूरचा हुद्देदार व कारकून (जिझिया खाते) यांस दत्ताजी महाद नाईक आंधारे याने कळविले की आपले वडिल, चुलते मुहम्मदशाहाच्या वेळेस या मुलूखात आले. मुहम्मद शाहाने त्यांच्यावर कृपा करुन जिझिया माफ केला होता. त्यानंतरच्या काळातही हीच पद्धत होती. या खात्याचे हुद्देदार ३ वर्षापासून दरसाल १२।। मुजाफरी व २८ चितळ याप्रमाणे जिझिया घेत आहेत. या पत्रावरुन दत्ताजी नाईक यास जझिया माफ केला.

<u>पत्र २३६८</u>-इ.स.१५९८ऑक्टो २-दुसरा इब्राहीम आदिलशाह याने लिहिलेले पत्र-राजा चोलराज घोरपडे यांचा मुलगा पिलाजी घोरपडे याने राज्याची उत्तस चाकरी केली व तो मृत्यू पावला.त्याचा मुलगा प्रताबसिंघ घोरपडे हा ही शूर व निष्ठावार आहे. त्याची व त्याच्या वडिलांची चाकरी लक्षात घेऊन ८४ गावांसह मुधोळ कर्यात आणि वडिलांची सात हजारी मनसब व जागीर बक्षीस देतो.

<u>पत्र २४०८</u>- इ.स. १६२५ सप्टें २३- कोबाजी राजे खडाडे यांनी मौजे कापसी, परगणे फलटणचे हुद्देदार व मोकदम यांना लिहिलेले पत्र- खंडोजी व बाजी घोरपडे पटेल मौजे कापसी यास पूर्वीपासून कदीम चावर .।।. ज्याजती मऱ्हामती चावर.।।. बिघे वीस जिराती २० .। १० महसूल व रोख रक्कम इतर कायद्याने दिले आहे.

<u>पत्र २४१७-</u> कौलनामा इ.स. १६२८ऑगस्ट १९- खुदावदखान याने बावाजी जुझारराऊ देशमुख तपे कानदखोरे यास लिहिलेले पत्र- आधीच्या वर्षाची काही रक्कम बाकी राहिली असल्याचे पत्र दिले आहे. जी बाकी रयतेकडून राहिली तिच्याकडून ती घेणे. देशमुखाकडे ३००० टक्यांची जबाबदारी आहे. इनाम, इतर बाबी, हक्क दिले आहेत. यातून ६०० टक्के इनामपट्टी माफ केली आहे.

<u>पत्र २४२३</u>- परगणे निवासे (नेवासे) चे दिवाण यांनी मुकादम, चौगले, देसक (अधिकारी) महाजन कसबे सोनई परगणे नेवासे यास लिहिलेले पत्र- गेल्यावर्षी वारंवार झालेल्या मुघलांच्या स्वाऱ्यांमुळे शेताचे नुकसान झाले आहे. लोक पळून गेले आहेत. म्हणूनच एकाचा

दुसऱ्यावर भार पडण्यापेक्षा मक्ता माफ करणे. प्रजा येईल तर निम्मी माफी द्यावी व निम्मे वसूल करावे.

पत्र २४२६- इ.स. १६३० जून १३- शाहजहान बादशहाने अधिकाऱ्यास लिहिलेले पत्र- धारगीरबारच्या देशमुखीची चाकरी भिकुजी चव्हाण याच्या असावी त्याने चाकरी व्यवस्थित करावी. वर्तमान व भावी अधिकाऱ्यांनी आणि शेतकऱ्यांनी त्याला देशमुख समजून त्याच्या हुकूमानुसार राहावे.

पत्र २४३४- इ.स. १६३२-३३- तिभाजी गंगाधर याने तुबाजी दादा यास लिहिलेले पत्र- आपल्या हवेलीमध्ये २ कुळकर्णी असणारी ९ गावे आहेत. तेथील हक्क, इनाखती, खणवार याखेरीज आणखी उत्पन्नापैकी दर टक्यास .। ६(१८) रुके तुबाजी दादाने घेणे व ३० टक्के तिमाजीकडे देणे याखेरीज नागोजीचे ८ गावे खरेदी केली त्यापैकी एकोजीची ४ गावे याचे ४।। होनु वाटून घेणे.

पत्र २४३५- इ.स. १६३२ जुलै १३- इस्लामाबाद व कसबे हुरुवाड देऊचे कारकून, देशमुख, महालदार यांना लिहिलेले पत्र- त्रिंबक मोरेश्वर गोसावी अकोले सध्या मुक्काम उझर, यांचा चरितार्थ चालला पाहिजे म्हणून कृपेने दिलेले बक्षीस दररोज १ लारी १ दस्ती (पट्टी) जागा कसबे हुरुवाड (देऊचे) चे महसूल व जरिबे, जकाती, हर एक दस्त जागापैकी देणे आहे.

पत्र २४३८- इ.स. १६३३ ऑगस्ट १८- तपे खारेपाटणचे दिवाण यांनी खोत, गावकरी व बितिंकांना दिलेले पत्र- गोपाळ जोशी तपे खारेपाटण यास गावगन्ना इनाम म्हणून दर गावचा सालिना १ लारी पूर्वीपासून चालू आहे तो तसाच चालू ठेवणे.

पत्र २४३९- चिं राय यासी सनद- मालोजी नरसिंगराव वा विठोजी सितोला देशमुख मामले दौलत मंगल यांनी माहित केल्याप्रमाणे जकाती मामले दौलत मंगल यावर आमचा विश्वास आहे. चौत्रे दौलतमंगल, चौत्रे लोहगाव, चौत्रे चिंचोली व मार्ग भरे व मार्ग अगळंबे, चौत्रे पाटस वा राजोरी येथील १ उभा मार्ग व थलभरीत, थलमोड मीठ आणि इतर किराणा, कापड व इतर बाबींवर निजामशाहीपासून जे अधिकार चालू आहेत. तसेच चालवणे अशी सनदेत दुरुस्ती व्हावी.

पत्र २४४०- मुरार जगदेराऊ यांनी मालोजी नरसिंगराव व सितोले देशमुख मामले दौलतमंगलयांस लिहिलेले पत्र- दिनकर काकडे यास मोकासा दिला आहे. पण जावजी बिन बालोजी काकडा मौजे दौलत मंगल पैसे सुरळीत देत नाहीत विरोध करतात तरी तूम्ही ताकीद करुन पैसे सुरळीत मिळण्याची व्यवस्था करावी.

पत्र २४४१- मुदम्मद आदिलशहाने राजगड किल्ल्याचा हवालदार मूरबदेव सरनौबत व नायकवाडी यांना दिलेले पत्र- किल्याची डागडुजी व दाणागोटा, रसर इ.साठी मलिक अंबर व निजामशहाच्या कारकिर्दीपासून जो मुकासा चालू आहे. त्या मुकाशाला जो जमाव दिला आहे तो जमाव व मुकासा आजही कायम आहे.

पत्र २४४४- मुरारी देगदेवराव यांनी मालोजी सितोले देशमुख मामले दौलत अंमल यास पत्र लिहिले- साईव येथील मोकदमी देशमुखांची आहे तिथे रायाजी सितोळा हा मुतालीक ठेवला आहे तो काही पैसे टके देत नाही. तरी तूम्ही देशमुख त्या मामल्याचे मोकदम असून आपल्या मुकासियाचे पदरी साईवचे टके जमा करणे.

पत्र २४४५- शहाजी राजांनी अमिनाबाद/पालीच्या कारकूनास लिहिलेले पत्र- रा. मोरेश्वर गोसावी यास दररोज १ लारी इनाम दिला आहे. पण कारकुनांने ते माणसे पाठवूनही दिला नाही. तरी गोसावी यास त्रास देऊ नये व दररोज १ लारी खारीज व जकाती, महसूल इ. देत जाते.

पत्र २४५०- मुहम्मद आदिलशाहाने कोल्हापूर परगण्याच्या कारकूनास लिहीलेले पत्र- कोन्हेरी त्रिमल याने परगणे कोल्हापूरच्या देशकुळकर्ण्यांच्या मिराशी आपणास मिळाव्यात यासाठी दोन सालाचा वसूल, म्हणजे एका वर्षाचा नजराणा, १०० होन देण्याचे कबूल केले आहे. तरी ही मिरासी त्यावरील हक्कांसह चालू ठेवावी. नजराण्यांपैकी अर्धा हिस्सा बादशाही खजिन्यात व अर्धा हिस्सा व्यवस्थेच्या खात्यात जमा करावा. या वर्षाचे ५० होन वसूल झाले असून पुढच्या वर्षीचे ५० होन वसूल करुन खात्याला द्यावेत.

पत्र २४५६- परगणे इंदापूर ठाणे बायेवडेचे दिवाणाने मोकदमास लिहिलेले पत्र- काजी अबन बिन काजी हापीज परा यास ३ चावर दररोज तेल पूर्वीपासून चालेले आहे. भोगवटयाच्या कागद हरवल्यामुळे त्यांनी पुन्हा अर्ज केला तरी इनामदारास सांगून त्यांचे इनाम चालविणे.

पत्र २४५७- मुहम्मद आदिलशहाने तपे रोहिडयाच्या कारकूनास पत्र दिले-कानोजी जेधे देसाई तपे भोर किल्ले रोहिडा यांनी भरपूर मेहनत केली म्हणून त्यांना मौजे चिखलगाव इनाम दिला आहे.

पत्र २४७८- मुहम्मद आदिलशाहाने परगणे कऱ्हाडच्या देसायास लिहिलेले पत्र- कऱ्हाड परगण्यातील तांबवे कर्यातीपैकी वेन्हे गावचा कुळकर्णी नारो विश्वनाथ याने बादशहाला विनंती केली की, या गावाचे कुळकर्ण पिढी दर पिढी माझ्याकडे आहे. पूर्वी सय्यद हुसेन याच्याकडे या गावची मोकाशी असताना त्याने लोकांवर जुलूम केल्याने लोक गाव सोडून गेले होते. पण त्या नंतर माझ्या चुलत्याने गाव परत आणला. गावकऱ्यांनी नंतर मला कुळकर्ण दिले. तसा करारनामाही लोकांनी दिला पण तूमचे फर्मान पाहिजे होते. त्याप्रमाणे आदिलशाहाने फर्मान दिले.

पत्र २५६९- राजेश्री सिवाजीराजे यांनी कानद खोऱ्याचा कारकूनास (सध्या व नंतरच्या) लिहिलेले पत्र -बाबाजी झुंझारराव देशमुख तपे कानद खोरे यांस मौजे कोंढावले बुद्रुकचा नख्त महसूल दहा टक्के २४०।। ५ आहे. याशिवाय नख्त १०० टके करुन त्याचे इनाम मौजे साकरनावे द्यावे.

पत्र २५६३- मिसली (सनद, हुकूमपत्र) तपे खारापाट उर्फ नागोठाणेच्या दिवाणाने देसाई, अधिकारी, खोत, सिलोतरी, मढवी व इतर मिरासदारांना लिहिलेली सनद- मलिक अंबर व मराठे कारकीर्दीत बावाजी कृष्ण कुलकर्णी याला कुलकर्णीपणाचा अधिकार देऊन त्याप्रमाणे १०० सेरणी कबूल केली आहे. पण महालाचा कारकूरांनी मिरास साबाजी अनंत अंताजी यांचे हवाला केली तरी कुलकर्णी यांची मिरास त्यांच्या हवाली करुन निवाडयाप्रमाणे करारनाम करुन १५० लारी सिरणी देणे. (आनंदाप्रित्यर्थ द्यावयाची रक्कम)

पत्र २५४८- रा. त्रिंबक राजे यांनी कर्याती वायेवाडे परगणे इंदापूर च्या कारकून, देशमुख, हुद्देदार, मुकासे, मोकदमास लिहिलेले पत्र- काजी अबन काजी हाजीज इनामदार परगणे इंदापूर यास मशीदी करता ३ चावर जमीन व रोज तेल इनाम दिले आहे. त्याप्रमाणे चालविणे.

---

(शिवकालीन पत्रसार संग्रह, खंड ३, संपादक शंकर नारायण जोशी, भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे, स्वीय ग्रंथमाला, क्र. ४४, १९३७, किं. २।। रु.)

**औंध संस्थान –**

१. वेदमूर्ति नारायणभट बिन आमणभट उपनाव गलंडे वास्तव्य मौजे खेड यांना श्री राजा शाहू छत्रपतिंनी अव्वल, दूम, सीम तीन प्रतिची २० बिघे जमीन कुलबाब, कुलकानूसह हल्लीपट्टी, पेस्तरपट्टी स्वराज्य व मोगलाई अंमल एकूण दुतर्फा खेरीज इनाम दिली.

२. विसोबा नाईक, प्रभावळी, दाभोळ मामल्याचे सरदेसाई यांनी सरदेशमुखीचे जुने वतन तसेच चालू राहण्याबद्दल केलेल्या अर्जाला उत्तर देवून त्याद्वारे जुने वतन चालू असल्याप्रमाणे आणि दर शेकडा (दरसदे) मालाच्या किंवा इमारतीच्या किंमतीवर घेण्यात येणारा शेकडा ५ टक्के कर (पंचोत्रा) हे हक्क देण्यात आले.

३. माहुली येथील श्री विश्वेश्वर देवळाचे पुजारी अनंतभर बिन शिवभट पाणदरे यांना सन १८१२-१३ मध्ये देवस्थानाच्या खर्चासाठी सहा गावांमधील शेरी (राजाची खाजगी जमीन) व बागा जमीनीवरील सर्व रक्कम दिलेली आहे.

४. शाहू महाराजांनी राजश्री सदाशिव परशराम यांना श्री निवासराव यांच्याकडे असणारा पूर्वीचा सरंजाम दिलेला दिसतो. (सरंजाम-लष्करी कामासाठी लावून दिलेला मुलूख). छत्रपतींकडून श्रीनिवास परशुराम उर्फ श्रीपतराव यांना इनाम मिळालेली गावे (सरदेशमुखीचे उत्पन्न)

५. श्रीनिवासराव पंडित प्रतिनिधी यांनी श्री आनंदेश्वर (गोटे) व श्री संगमेश्वर (कराड) या देवस्थानाचा जीर्णोधार व स्थापना करुन त्या देवस्थानांच्या खर्चासाठी देशमुख व देशपांडे प्रांत कऱ्हाड यांना राजा शाहू छत्रपतिंनी आज्ञा केली व दोन चावर जमीन इनाम दिली.

६. राजश्री द्वारकोजीराऊ बिन हणमंतराऊ पाटणकर गोसावी यांना श्रीनिवास परशुराम प्रतिनिधींनी तीन गावांचे इनाम दिलेले पत्र. (राज्यातील पुरातन सेवक निष्ठेने सेवा करिता म्हणून तूमचे चालवणे आवश्यक जाणून इनाम दिले.)

७. जगजीवन परशुराम यांना अंताजी नाईक प्रभावली मामल्याचे सरदेसाईंनी ताा. संगमेश्वर व कोडीवरे येथील पड जमीन त्यांचेकडे इनाम असून त्याच्या तिजाई माफीबद्दल विनंती केली होती. त्यावरुन इनाम तिजाईचे माफी देणारे पत्र (३०-१२-१७२४)

८. जगज्जीवन पंडित प्रतिनिधी यांनी श्री शाहू महाराजांकडे प्रतिनिधी पदासंबंधी फौजेचा

व हुजूर खर्चाच्या नेमणूकीचा सरंजाम पूर्वीपासून चालत आल्याप्रमाणे लावून द्यावा अशी विनंती केल्यानंतर श्री शाहू महाराजांनी हे पत्र पूर्वीपासून सरंजाम तूमच्याकडे आहे त्याप्रमाणे दिला आणि निष्ठेने सेवा करण्यास सांगितले. (१९-१२-१७४६)

९. दादशेट वायकूळ बिन गोविंदशेट वायकूळ यांना रा. परशुराम पंडित प्रतिनिधींनी विशाळगडच्या वेढयात विशेष मदत केली म्हणून त्यांना सरमहाजनची पेटा व कसबे महालनिहायत खिळणा ( विशाळगड) वतन करुन दिले आहे.

१०. श्रीनिवास प्रतिनिधींनी वनवडी सैदापूर शिवेच्या कब्जात होता. त्यास कराडचे दिवटे व सैदापूरचे वाडीचे जुने वतन चालविणे आणि नवीन दोन्ही गावांची कीर्द करणे.

११. परशुराम श्रीनिवास प्रतिनिधी यांचे उमाजी गोपाळ गोसावी यांना लिहिलेले पत्र. - गंगाधन दिक्षीत (वाई) यांनी सांगितल्याप्रमाणे मौजे दरजाई प्रांत खटाव येथील दहा बिघे इनाम जमीन उमाजीस देण्यात आली आहे. पण गावकरी त्या जमीनीचा वसूल सुरळीतपणे देत नाहीत म्हणून मागील बाकी आणि पुढील वसूल सुरळीतपणे गावकऱ्यांनी द्यावा त्यासाठी हे आज्ञापत्र प्रतिनिधींनी दिलेले दिसते. पुढचा सर्व वसूल ही या गोसावींकडे दिला जावा अशी ताकीद केलेली दिसते.

१२. परशुराम श्रीनिवास प्रतिनिधींनी विटयाच्या देशमुख व देशपांडेंना एक पत्र लिहिले आहे. - सिदोजी जानकर याच्याकडे वनांची मामलत दिलेली आहे. तरी कसबे विटेमधील गावगना वनचराईचा आणि मेंढरे बसविण्याची (कर)टीप जानकर घेतील. त्यास दर शेकडा रुपये सव्वासहा ६ ४ प्रति आकाराबद्दल वसूल देणे असे स्पष्ट केले आहे.

१३. हे आज्ञापत्र मातुश्री यमुनाबाईंनी राजाराम लक्ष्मण यांचे नावे आधी सरकारने पाठविलेल्या पत्राप्रमाणे दिले आहे. - श्री कृष्णाबाईचा उत्सव व बारमाही खर्च चालण्यासाठी एकूण जमा पैशांवर दर शेकडा चार आणे कच्चा आकार साल दरसाल दिला जावा अशा आशयाच्या पत्रावरुन हे आज्ञापत्र रा। अंताजी भैरव यांना मौजे केसे ता। हवेली प्रांत कराड यांच्याकडे ही रक्कम पोच करावी. हे गाव सादिलवार दरात लिहून साल मजकूरापासून देत जाणे. असे या पत्रात स्पष्ट केले आहे.

१४. राजश्री चिटको आबाजी व लक्ष्मण आबाजी रेणावीकर गोसावी यांस, नारो शंकर प्रतिनिधींनी दिलेले इनामपत्र- मौजे रेवणगाव कर्यात खानापूर प्रांत मिरज हा गाव पूर्वीपासून

त्यांच्याकडे इनाम आहे याचे नवीन पत्र देवून भोगवटा करुन द्यावा अशी त्यांनी विनंती केली. म्हणून त्यांच्या श्रम साहसाप्रित्यर्थ त्यांच्या चरितार्थासाठी रेवणगावची कुलबाब कुलकानु हालीपट्टी व पेस्तरपट्टी, इनाम तिजाई, सरदेशमुखी व चौथाई (साहोत्रा भत्ता) यांना इनाम दिले**.**

१५. भगवंतराव त्र्यंबक प्रतिनिधींनी वेदमूर्ति राजश्री माणिक जोशी/जनार्दन जोशी ता. कुडाळ यांना इनामपत्र दिले. **–** जोशी यांनी विनंती केल्याप्रमाणे त्यांचे कुटुंब चालावे यासाठी नवीन इनाम करुन दिले. यात १ मौजे बेलवडे १ मौजे मोरघर याची सरदेशमुखी मौजे मरळीमुरा ता. कुडाळ येथील स्वराज्यातील इनाम कुलबाब, कुलकानू हालीपट्टी व पेस्तारपट्टी, इनाम तिजाई व सरदेशमुखी खेरीज याचा हकदार करुन इनाम दिले. एकूण २ गावांची सरदेशमुखी व एक गाव अंमलदाराकडून काढून पूर्ण जोशी यांना इनाम करुन दिला.

१६. काही वतनदारांना १/३ इनामातील द्यावा लागत असे तो माफ करण्यास वर्धाचे पत्र **-** राजश्री कृष्णाजी परशराम प्रतिनिधी ता. कमाविसदार मौजे राजापूर ताा संगमेश्वर राजश्री अंतोबा नाईक (सरदेसाई प्रभावली व दाभोळ) यांच्याकडे धामापूर हा गाव वतनासंबंधी इनाम होते. पण तेथील तिजाईचा वसूल त्यांना भरावा लागत असे तो माफ करण्याची विनंती केल्याप्रमाणे तिजाई सालदरसाल माफ केली असे या पत्रात नमूद केले आहे.

१७**.**ता. १४-११-१७१४ मधील ता. परळी, सुभा प्रांत, सातारा येथील देशमुख, देशपांडे यांना परशराम त्र्यंबक यांनी लिहिलेले पत्र. **–**वेदमूर्ती राा विश्वनाथ भट बिन केशवभट दिवेकर यांना मौजे अरे तर्फ मार येथील अव्वल जमीन १५, दुम जमीन १० सीम जमिन ५ एकूण पाव चावर जमीन इनाम दिली. या जमिनीवरील कुलबाब कुलकानु हालीपट्टी पेस्तरपट्टी देखिल तिजाई यांस देऊन त्यांचे चालविणेसाठी त्यांना त्यासंबंधीचे पत्र दिले.

१८.२४-६-१७०४ राजश्री अप्पाजी विश्वनाथ नामजाद व कारकून (सध्या व भविष्यातील) ता. संगमेश्वर यांस परशुराम त्र्यंबक प्रतिनिधींनी दिलेले पत्र**–**गणोबा नाईक, प्रभानवली व दाभोळ मामल्याचे सरदेसाई एकनिष्ठपणे स्वामी सेवा करतात. त्यांच्या चरितार्थाकरिता पडजमीन, भात जमीन, पडीची राजभाग-१०वी खंडी, २५ खंडीची जमीन नूतन इनाम करुन दिली. जमीन नेमून देवून इनाम चालविणे.

(सातारच्या प्रतिनिधी घराण्याचा इतिहास, ग्रंथांक १,२,३, रा अनंत नारायण भागवत व रा वामन परशुराम मेहेंदळे, औध स्टेट प्रेस.)

**छत्रपती शिवाजी महाराजांची पत्रे –**

१. पत्र क्र. ४ - मौजे रांजे तर्फ खेडेबारेच्या बाबाजी बिन भिकाजी गुजर या मुकादमाने व्यभिचार (बदअमल) केला म्हणून त्याचे हात पाय तोडून त्याला मुकादमीपासून दूर केले. त्यावेळेस सोनजी बिन बनाजी गुजर याने (पुरंदर किल्ला) जनांत गोत (एकाच कुळातले) म्हणून मुकादमीचा अर्ज केला आणि बावाजी गुजर यास शिक्षा म्हणून पातशाही तीनशे होन लावले. जे सोनजी मजकूर याने भरण्याचे कबूल करुन मौजें रांजेची मुकादमी (पुदारपण) मागितली तशी त्यास दिली.

२. पत्र क्र. ७ - प्रांत इंदापूर येथील संभाजी भोसले देशमुख यांस मौजे बोरी या गावाचा मोकासा (एक वसुली हक्क) कृपा बक्षीस म्हणून दिलेला दिसतो. महसूल, बाजेपट्टी, तूप सैल बैल, वाजे बाब (अवांतर बाबी) वेठबिगारी, सर्व बाबी व सर्व कायदे बघून मुलगा किंवा मुलीला वंशपरंपरेनेही द्यावे.

३. पत्र क्र. ८ - प्रांत इंदापूर येथील संभाजी भोसले देशमुख यांस पावणे पाच चावर जिरायती जमिन इनाम दिली आणि प्रांत इंदापूरमधील बाजेपटिया, महसूल, व उंट व कडबा व बाजे बाब, वेठबिगारी सर्व बाबी, कायदे प्रमाणे भोगपटा (मिरासी) अधिकार दिला आहे. (मुकादमास पत्र)

४. पत्र क्र. ९ - प्रांत इंदापूर मधील संभाजी भोसले देशमुख यांस काही गावांमधील जिरायती २२ चावर आणि बागायती १५ चावर जमीन यावरील गावगनासह इनाम बक्षीस दिलेले दिसते.

५. पत्र क्र.१० - राजश्री शिवाजी राजे यांनी लोणी बाराऊ कर्डियाची परगणे सुपे यांच्या हुद्देदारांना दिलेले पत्र- प्रांत सुपे मधील लोणी येथील मोरेश्वर गोसावी यांनी स्वारीच्या धामधुमीत त्यांची भोगवटयाची पत्रे हरवली म्हणून ती नवीन करण्याची विनंती केली. त्याप्रमाणे महसूल, वेठबिगारी, बेलकटी, जंगमपट्टी, पायपोसी, मेजवानी, मोहीमपटी, खर्चपट्टी, फसेली (फसकी-बाजारातला कर), सादिलवार, हकलवाजिम देसाई व शेटे व बाजे (इतर), कुलबाब कुलकानु दुमाले करण्याचा भोगवटा दिला. (इ. १६४६)

६. पत्र क्र. ११ - राजश्री शिवाजी राजे यांनी लोणी बाराऊ कर्डियाची परगणे सुपे यांच्या हुद्देदारांना दिलेले पत्र -प्रांत सुपेमधील लोणी येथील मोरेश्वर गोसावी (इ. १६४६) यास देण्यात आलेल्या मुकादमीत १ चावर जमीन दिलेली होती. त्यावर तेजीपट्टी आकारली आहे. तीचा पाठपुरावा करण्याची विनंती केल्याने तेजीपट्टीची (टंचाई कर) तरतुदीचा पाठपुरावा केला आहे.

७. पत्र क्र. १२ - राजश्री शिवाजी राजे यांनी लोणी बाराऊ कर्डियाची परगणे सुपे यांच्या हुद्देदारांना दिलेले पत्र -एप्रिल १६४७ मध्येही इ. १६४६ मधील पत्र क्र. १० प्रमाणेच स्वारीच्या धामधुमीत भोगवटयाचे पत्र हरवल्याने नवीन करण्याच्या विनंतीवरुन वरील प्रमाणेच पत्र असलेले दिसते. काही काळ त्यामुळे भोगवटा तुटण्याचा यात उल्लेख आहे. पूर्वीप्रमाणे सर्व हक्क व भोगवटा इनाम मोरेश्वर गोसावी यास देवून साहाय्य करावे असा उल्लेख.

८. पत्र क्र. १३ - राजश्री शिवाजी राजे यांनी प्रांत पुण्याच्या कारकुन व देशमुखांना दिलेले पत्र - महादभट बिन मुदगलभट पुरंदरे यास राजेश्री शिवाजी राजे यांनी इ.स. १६४७ जुलै १९ रोजी मौजे पर्वती, पिंपरी आणि पिंपळे सौदागर येथील इनाम चालविणेबाबतचे पत्र (मौजे पिंपरी — १ चावर, मौजे परवती १ चावर, पिंपले सौदागर १ चावर जमीन व दिवाबत्ती वर महाल जकाती प्रमाणे दररोज ३ रुके ३)

९. पत्र क्र. १४ - (१६४७ आक्टो १५) राजश्री शिवाजी राजे यांनी प्रांत पुण्याच्या कारकुनांना दिलेले पत्र — ता कडे पठार प्रांत पुणे येथील गणेश भट बिन मल्लारिभट भगवंत मोरया यांस मौजे मोरगाव येथील जमीन चावर निमे .।।. इनाम दिली.

१०. पत्र क्र. १५ - राजश्री शिवाजी राजे यांनी प्रांत पुण्याच्या हवालदार व कारकुनांना दिलेले पत्र - विनायक भट ठकार यांस पुणे प्रांतातील अकरा गावांचे कुलकर्णी व जोतीसपणाची बादशाही सनद (महजर) असून पर्वतीच्या मुकादमास याचा मुतालीक ठेऊन कुळकर्णीपणाचे काम घेत जाणे असा उल्लेख.

११. पत्र क्र. १६ - राजश्री शिवाजी राजे यांनी प्रांत पुण्याच्या कारकुन व देशमुखांना दिलेले पत्र - प्रांत पुणे येथील महादभट बिन मुदगलभट पुरंदरे यास मौजे पर्वती येथील १ चावर

जमीन मलिक अंबरपासून इनाम दिली आहे.ती तशीच राहिल असे स्पष्ट करण्यात आले आहे.

<u>१२. पत्र क्र. १७ -</u> इ.स. १६४७ नोव्हें २७- शिवाजी राजांनी परगणे, पुणे तर्फ कऱ्हेपठारच्या कारकूनास लिहिलेले पत्र - मोरेश्वर गोसावी यास नीमे चावर (मोरगावमधील) जमीन इनाम (पट्टयांसह) आहे. पण हुद्देदार व मोकदम मात्र १० पट्टया त्यांच्याकडे मागत होते. म्हणून पंडितांनी (दादोजीनीं) सनद दिली आणि सध्या व भविष्यातील पट्टया माफ केल्या.

<u>१३. पत्र क्र. १८ -</u> इ.स. १६४७ डिसें १६ — शिवाजीराजे यांनी परगणे, पुणे, तर्फ कऱ्हेपठार मौजे मोरगावच्या मोकदमास पत्र- मोरेश्वर गोसावी यास वाट वडगौव जवळचे शेत कास रुकेइ१ इनाम दिले आहे. नख्त गला व कडबा दुमाले केले दिल्याचा उल्लेख आहे.

<u>१४. पत्र क्र. १९ -</u> शिवाजीराजे यांनी तर्फ कऱ्हेपठारच्या कारकूनास पत्र- मोरेश्वर गोसावी यास मौजे मोरगावचे कास ७ मायेवाडी ½ चावर निमे एकूण कास रुक ६. नायगाव ४।।, मायेवाडी ५।।।, एकूण टके १०।। ८।। टक १०, व आठ बत्तीस रुके दुमाले केले.

<u>१५. पत्र क्र. २० -</u> राजश्री शिवाजी राजे यांनी प्रांत पुण्याच्या कारकुन व देशमुखांना दिलेले पत्र - मोरेश्वर गोसावी यांस दिलेल्या इनाम जमिनीचा तपशील जिराइत व बागाईत उत्पन्नासंबंधी मार्गदर्शनाच्या बाबी आहेत. त्या स्पष्ट केल्या आहेत.

<u>१६. पत्र क्र. २१</u> - राजश्री शिवाजी राजे यांनी प्रांत पुण्याच्या कारकुन व देशमुखांना दिलेले पत्र - मोरेश्वर गोसावी यास वडगावची ३ रुके जमीन गायरान म्हणून दिली. लागवडीस नसणारी ३ रुके जमीन सर्व पट्टयांसह दिली आहे. महाराजांनी पत्रात ‘गोब्राह्मण प्रतिपालक’ उल्लेख करुन “गाईचा प्रतिपाल केल्यास बहुत पुण्य आहे” असे स्पष्ट केले आहे.

<u>१७. पत्र क्र. २२ -</u> राजश्री शिवाजी राजे यांनी प्रांत पुण्याच्या कारकुन व देशमुखांना दिलेले पत्र - पुणे प्रांतातील मौजे भांबवडे येथील मुला अली बिन मुला अबदुला खिजमतगार मसीद यास इनाम दिला. इनाम जमीनीच्या आणि पैशाच्या स्वरुपात दिला होता. तसेच

रोशनाईसाठी मशीदीला दररोज पावशेर तेल जकातीतून मिळण्याची ही तजवीज केली होती.

१८. पत्र क्र. २३ - राजश्री शिवाजी राजे यांनी प्रांत पुण्याच्या कारकुन व देशमुखांना दिलेले पत्र - पुणे प्रांत माहादभट बिन मुदगलभट, पुरंदरे यास १ चावर जमीन इनाम दिलेली होती. काही काळ पुरंदरे वाराणसीस गेल्यामुळे इनामतीचे शेत पडून होणे. पण त्यानंतर मात्र या जमीनीस कीर्द लावून घेतली.

१९. पत्र क्र. २४ - राजश्री शिवाजी राजे यांनी प्रांत पुण्याच्या कारकुन, देशकुलकर्णी व देशमुखांना दिलेले पत्र - ताा खेडबारेचे भिकाजी बिन सूर्याजी डिमला मोकदम मौज सिवरे व मौजे कल्याण येथील १२ बिघे जमीन इनाम दिली होती.

२०. पत्र क्र. २५ - राजश्री शिवाजी राजे यांनी कर्यात बारामतीच्या कारकुनास दिलेले पत्र- कर्याती बारामती येथील अनाजी दतो मुतालीक धर्मोजी काटे यास २ चावर जमीन व कास रुका १ इनाम दिले असे.

२१. पत्र क्र. २६ - राजश्री शिवाजी राजे यांनी तिमाजी वापूजी तरफदार कऱ्हेपठार यांना दिलेले पत्र- तर्फ कऱ्हेपठार प्रांत पुणा येथील मोरेश्वर गोसावी यास मौजे नायगाव व मौजे मायेवाडी यास कृपेने बक्षीस म्हणून इनाम दिल्याचे पत्र आहे.

२२. पत्र क्र. २७ - राजश्री शिवाजी राजे यांनी प्रांत पुण्याच्या कारकुन व देशमुखांना दिलेले पत्र - प्रांत पुणे कसबे पुणे येथील श्री विनायक भट बिन रामकृष्ण भट ठकार यास मौजे सुंस कर्यात मावळ इनाम कृपा बक्षीस (अजरा मऱ्हामती) दिले आहे.

२३. पत्र क्र. २८ - राजश्री शिवाजी राजे यांनी प्रांत पुण्याच्या कारकुन व देशमुखांना दिलेले पत्र - श्री मोरेश्वर गोसावी यांना मौजे मोरगाव ६ रुके पडजमीन धर्मादाय चालविण्यासाठी दिले होते.

२४. पत्र क्र. २९ - इ.स. १६४८-४९- शिवाजी राजे यांनी पुणे परगण्याच्या कारकून व देशमुखांना दिलेले पत्र- मोरेश्वर गोसावी यास १ चावर गजशरायेनी एकूण कास रुके १२ मायेवाडी व नायेगावची जमीन दिली. कारकूनाने या कासेवर जी रोख रकमेची वाटणी बाकी

काढली ती महाराजांचे देणे आहे. गोसावी यांना सर्व पट्टया माफ केल्या. त्यांना दिलेल्या शेताशी तुमचा काही संबंध नाही.

<u>२५. पत्र ३० -</u> राजश्री शिवाजी राजे यांनी प्रांत चाकणच्या कारकुन व देशमुखांना दिलेले पत्र - कृष्णभट बिन मुरारीभट ब्रम्हे कसबे चाकण यांना १ चावर जमीन, बागायती थल नाणेकर ९ खंडीपैकी ३ खंडी इनाम दिलेले दिसते. त्यात नख्तयाती, महसूल, सैलबैल, पायपोसी, व खर्चपट्टी वाजे उंटपट्टी, वेठबिगारी इ. वाटून घेणे. इनाम जमीनीवर आंबे व चिंचा, झाडझाडोरा लावून त्याच राजभाग सध्या आणि पुढेही देणे.

<u>२६. पत्र क्र. ३१</u> - राजश्री शिवाजी राजे यांनी प्रांत पुण्याच्या कारकुन व देशमुखांना दिलेले पत्र - श्री मोरेश्वर क्षेत्री माहादजी गोसावी यांनी श्री देवाच्या देवळाजवळ फुलझाडे लावण्यासाठी जमीन बिघे ३ आणि विहिरीसाठी बिघे ३ इनाम द्यावी अशी विनंती केल्यावरुन शिवाजींनी ती इनाम दिली आहे.

<u>२७. पत्र ३२ -</u> राजश्री शिवाजी राजे यांनी प्रांत सुप्याच्या कारकुन व देशमुखांना दिलेले पत्र - श्री मोरेश्वर गोसावी (क्षेत्र मोरगाव) यांस धर्मादाय इनाम जमीन कास रुका ६१ आणि राजशेरायनी चावर १ दिली यात महसूल, सैलबैल, सरदेशमुख पट्टी, व मोईनी, सादिलवार व पोडवारी, हकदार, खर्चपट्टी, पायपासी, बाबे जमा, भेटी, तेजीपट्टी, मोहिमपट्टी व बेलेकटि, जंगीपटी, तूप व कडबा, खरीफ, वेठी व रबी बिगारी व फर्मासी ज्या पट्टया जमा होतील त्याचे सरकारला माहिती असे. हे इनाम गोपाजी धनगर मौजे मुंजेरीस दिले आहे.

<u>२८. पत्र ३३</u> - राजश्री शिवाजी राजे यांनी प्रांत पुण्याच्या कारकुन, देशपांडे व देशमुखांना दिलेले पत्र- श्री माहादजी गोसावी (मोरगाव) यांनी सांगितल्याप्रमाणे गणो तिमाजी जनाबेदार यास १ चावर जमीन, दररोज राजमुरा (रोजगार) रुके , व तेल रोशणाई वजन ।। आदसेर, सादिलवारी होत ३ इनाम दुमाले केले होते.

<u>२९. पत्र क्र. ३७ -</u> राजश्री शिवाजी राजे यांनी प्रांत पुण्याच्या कारकुन व देशमुखांना दिलेले पत्र -मौजे मोरगाव ता. कऱ्हेपठार येथील जमीन निमे चावर शेत विहिरटिक निमे चावर, कळस रुके ३।।. (साडेतीन) देखिल नख्तयाती, महसूल, सैलबैल, पायपोसी, खर्चपट्टी,

तोरणभेटी, मोईन, सादिलवार व सरदेशमुखपटी, स्थलजकाती, भेटी उल्फापटी, बकरीद, देशकुलकर्णी व गावकुलकर्णी व बाजे हकलाजिमेदारानी, तूप बकरे, कडबा व नव्या पटया दुमाले केल्या.

<u>३०. पत्र क्र. ३९</u> - राजश्री शिवाजी राजे यांनी परगणे पुण्याच्या कारकुन व देशमुखांना दिलेले पत्र -नारायणे त्रिमल दीक्षित यांस मौजे बाजेरे तर्फ हवेली, परगणे पुणे येथील १ देह (खेडे) - नख्तयाती, महसूल बाजे उजबत्ती देखिल, सैलबैल, मोईन, सादिलवार व खर्चपट्टी, पायपोसी व दसरा पट्टी, ठागेभेट्टी, हुजूरभेटी, मोहीमपट्टी, वेलकटी, तंबाखू, बागाईत, आश्वजाकानी, व ठाणबंदी आडपाली (एक कर) कानू इ. सध्या व पुढील काळासाठी कृपेने बक्षीस इनाम केले आहे.

<u>३१. पत्र क्र. ४१ -</u> राजश्री शिवाजी राजे यांनी परगणे सुप्याच्या कारकुन व देशमुखांना दिलेले पत्र -मोरेश्वर गोसावी यांस धर्मादाय इनामाबद्दल पणदरे परगणे सुपे येथील जमीन १ चावर, कास १ रुक्का आणि काळी जमीन (गोपाजी धनगर मुंजेरी, मौजे पणदरे) शेतापैकी देणेसाठी खंडोजी राजी व बाजी राजे घोरपडे यांनी सुचविले प्रमाणे शिवाजी राजांनी त्याप्रमाणे केले. महसूल, नख्तयाती, सैलबैल, सरदेशमुखपट्टी, मोइनी, सादिलवार व पाडेवारी, हक्कदार व खर्चपट्टी व पायपोसी व बावेजम व शेटी, तेजीपट्टी व मोहिमपट्टी व हेलेकट्टी, वांजतीपट्टी व कुलकानू नकदी व जिनसी व कलमी, कदमी व इस्ती व इस्मी, तूप व कडबा, गल्ला व खरीप व रबी वेठी बिगारी फर्मायसी व आवजेवा कुलबाब, कुलकानू तर्फ ठाणे व तर्फ देहाय दिले आहे असे दिसते.

---

(छत्रपती शिवाजी महाराजांची पत्रे, प्र.न. देशपांडे, सुषमा प्रकाशन, धुळे, पहिली आवृत्ती, १९८३, किं. ६५ रु.)

**जिजाबाईकालीन कागदपत्रे-**

<u>पत्र २४४</u>- २४-२-१७६९- प्रसिद्ध गडच्या लढाईत संताजी जाधव हवालदार याचा मुलगा भैरवजी जाधव हा मृत्युमुखी पडला. म्हणून राणी जिजाबाईने संताजी जाधव यास मौजे लिंगनूर प्रांत रायबाग हा गाव इनाम दिला. त्यासंबंधीचे मोकदमास लिहिलेले पत्र.

<u>पत्र २४६</u>- ३०-८-१७६९- किल्ले समानगड व नरसिंगराव शिंदे यांच्यात झालेल्या लढाईत सुभानजी देसाईचे वडिल नरसोजी व भाऊ मानाजी हे दोघे ठार झाले आणि सुभानजी

देसाई पळून गेला (परागंदा) होता. त्याला राणोजी शिंदे (पद नाही) यांनी गावचे वतनदार म्हणून परत आणून मौजे हिरलग पैकी ठोंबरेवाडी हे गाव इनाम करुन दिले.

<u>पत्र २४७</u>- १०-१०-१७६९- केदारजी यादव यांच्या मौजे बावडे येथील पाटिलकीस मेटकुडो (मेटकुडो- या शब्दाचा अर्थ केळकर यांनी आपल्या ऐतिहासीक शब्दकोशात दिला नाही. शब्दापुढे प्रश्नचिन्ह आहे. हा एक पाटीलकी वतनाचा जमिनीबाबतचा हक्क असल्याचे या सनदेवरुन दिसते.) नव्हता. तो मिळावा म्हणून त्यांनी मातुश्री जिजाबाईनां अर्ज केला होता. तो छत्रपती शिवाजी तिसरे यांनी मंजूर केला. या वतनास मेटकुडो दर बिघा १ (१ पाइली) करार करुन दिला आहे. आणि सेरणी रुपये ५०० चा वसूल मान्य झाला आहे. (केदारजीचे वडिल द्वारकोजी यांनी राजाची निष्ठेने सेवा केल्याबद्दल हे वतन असा उल्लेख.)

<u>पत्र २५०</u>- ६-३-१७७०- बाळाजी केशव व रामचंद्र महादेव यांनी गोपाळभट कवठेकर व विठ्ठल महादेव यांच्या मध्यस्थीने प्रांत हुकेरी व मनोळी तालुका येथील वेगवेगळे उत्पन्न यशवंतराव शिंदे सुभेदार यांच्याकडे रुजू करुन द्यावे असे महाराणी जिजाबाईंनी म्हटले आहे- ही यादी ३ कलमी असून त्यातील सूचना पार पाडल्यास यशवंत रावांमार्फत शिबंदी १६ हजार रु. व एक हर गाव नेमून १२ हजार रुपयांचा तनखा ठरवून दिला जाईल असे म्हटले आहे.

<u>पत्र २५१</u>- २९-३-१७७०- विठ्ठल गोविंद हवालदार कसबा पाटगाव यांचे पतकी डांगी (घाटातील जकातदार) महाल जकात पाटगाव यास आज्ञापत्र आहे की नारायण भट श्रोत्री या ब्राह्मणास समाईक महालावर पाच रु. धर्मादाय करुन दिला आहे. तो साल-दरसाल देत जाणे.

<u>पत्र २५२</u>- ५-६-१७७०- उत्तरेकडील फौजांनी मौजे रुकडीवर केलेल्या हल्ल्यात पीरगोंडा पाटील याची पुष्कळ हानी झाली होती. राणोजी माने, अंबाजी जगताप, जगन्नाथ पांडुरंग यांच्या विनंतीवरुन महाराणी जिजाबाई यांनी पाटील यास अबदागिरी व पाच बिघे जमीन इनाम दिली.

<u>पत्र २६४</u>- २७-३-१७७१- चालीस बूम हा जिजाबाईना लिहितो की, करवीर राज्याकडून कंपनी सरकारला जी रक्कम मिळायची आहे त्यात १ पैची देखील सूट दिली जाणार नाही.

असे मुंबईहून आपणास कळविण्यात आले असून रक्कम फारीख केली नसल्यास करवीर राज्यावर 'जोरा' करुन ती वसूल केली जाईल.

पत्र ३१४- २९-११-१७७१- जिजाबाई यांनी भुसाजी हणबर खोत यास नवीन वाडी वसविण्याबाबत दिलेली ही सनद आहे. हयात हणभर खोत याने पाळावयाच्या बऱ्याच अटींचा आणि हक्कांचा यात समावेश आहे. खोताला खर्च/दंड ७५ रु. सरकारला द्यावे लागत होते. त्या बदल्यात खोतला इनाम पड व नवीन लागवडीसाठी ५ बिघे जमीन, १ घर, १ म्हैस आणि लक्ष्मीदेवीच्या पूजेबद्दल पडत व जमीन १ बिघा दिलेली दिसते.

पत्र ६- २४-७-१७५०- आमणभट जेरे मौजे शिरोळे ब्राह्मणास उपाध्यपनाबद्दल महाराणी जिजाबाई यांजकडून जमीन इनाम (५ बिघे) जमीन कसबा सिरहटी प्रांत मिरज या गावी दिली.

पत्र ७- महाराणी जिजाबाईचे 'कसबा सिरहट्टी प्रांत मिरज' येथील अधिकाऱ्यांना आज्ञापत्र (जमिनीची सनद-आमणभट बिन रामभट उपनाम जेरे कसबा सिरहट्टी, प्रांत मिरज)

पान १६ पत्र १५- मातुश्री अनुताई यांच्या नावे तर्फ आजऱ्याची सनद करवीरच्या महाराजांकडून घेऊन पाठविली आहे. म्हणून नानासाहेब पेशवे यांचे इचलकरंजीचे नारायणराव घोरपडे यांना पत्र (२४-७-१७५३)

पत्र १६- परगणे हुकेरीचे देसाई खळोजी निंबाळकर देसाई यांजकडून शेषो नारायण यांस मौजे बळकाड कसबे कबूर हा गाव इनाम (१-१०-१७५३) दिला.

पत्र २३- मौजे भिरडी परगणा रायबाग हा गाव पेशव्याकडून शेषो नारायण यास इनाम. (१४-६-१७५८) राज्यातील जुने एकनिष्ठपणे स्वामींची सेवा करणारे सेवक असल्याने स्वामींनी कृपाळू होऊन शेषो नारायण कठारे यास मौजे भिरडी, प्रांत रायबाग, सुभे विजापूर हा गाव इनाम दिला. हा गाव स्वराज्य व मोंगलाई एकूण दुतर्फादेखिल इनाम तिजाई कुलबाब कुलकानू हालीपट्टी व पेस्तरपट्टी जल तरु पाषाण निधीनिक्षेपादि करुन खेरीज हकदार व इनामदार करुन दरोबस्त इनाम करार केला.

पत्र २४- १४-६-१७५८- श्री शेषो नारायण यांना बाळाजी बाजीराव प्रधान यांजकडून मौजे बालिंगे, परगणा कागल हा गाव 'स्वराज्य व मोगलाई दुतर्फा एकूण देखिल' इनाम दिला.

पत्र २९- ३०-७-१७५९- महाराणी जिजाबाई यांचे कडून शेषो नारायण कुलकर्णी यांस एकनिष्ठ सेवा केल्या प्रित्यर्थ मौजे रुई प्रांत कागल हा गाव इनाम दिला.

पत्र ५४- २२-१२-१७६१- छत्रपती संभाजी (दुसरे) यांच्या अस्थी काशीस पाठविल्या तेव्हा त्या घेऊन जाणाऱ्याबरोबर रंभाजी चव्हाण हा गेला होता. या सेवेबद्दल त्याला पाच बिघे जमीन इनाम दिली आहे. म्हणून राणी जिजाबाई यांचे मोकदम मौजे गारगोटी यांस पत्र.

पत्र ८१- १२-२-१७६२- सेनापती राणोजी घोरपडे यांच्या हल्ल्यात पराक्रम गाजविल्याबद्दल जिवराव शिंदे (मुकादम) मौजे लिंगनूर यांजकडून कलगोंडा बिन सिदगोंडा पाटील मौजे लिंगनूर यास सहा बिघे जमीन इनाम दिली.

पत्र ८९- २३-७-१७६२- तुळजापा तेली म्हेतर किल्ले पन्हाळा शिवपूर पेठ, जुने वतनदार असल्याने त्यांना नंदादीपाच्या तेलाबाबत भात शेत जमीन ३ बिघे लावणी करण्यासाठी इनाम दिले होते.

पत्र ९६- ५-१०-१७६२- गोंदाजी बिन लिंगोजी चव्हाण यांनी दुसरे संभाजी त्यांची (अंगे) रक्षा घेऊन श्री महायात्रेस गेले. यात्रा करुन गंगोदकाची कावड घेऊन आले त्या प्रित्यर्थ मौजे माहाळुंगे कसबा हवेली कोल्हापूर या गावी बिघे ७ सात भात जमीन इनाम दिली.

पत्र ९७- १९-१०-१७६२- शिवाजी तिसरे यांच्या राज्यारोहणाप्रित्यर्थ बचभट ढवळीकर यांना किले पन्हाळा येथील ५ बिघे जमीन इनाम दिले.

पत्र १२८- २३-३-१७६३- शिव दीक्षित हे काशीस राहणारे, ते कोल्हापूरात राजाश्रयाला संभाजी महाराजांजवळ राहिले. संभाजी महाराजांचे निधन झाल्यावर महाराजांच्या अस्थी शिव दीक्षितांचे चिरंजीव शंभू दीक्षित यांनी काशीस नेल्या. त्यासाठी संभाजी महाराजांच्या ताब्यातील राज्यामध्ये दर गावास १ रुपया धर्मादाय वतन दिले.

पत्र १३७- २९-५-१७६३- मनोळी तालुका जिजाबाईंच्या खासगीकडे दिला आहे तरी परगणे बागलकोट व बदामी येथील मोकासाबाबेचा ऐवज सालाबादप्रमाणे मनोलीकडे पाठविण्याची ताकीद कमाविसदारांना करावी. म्हणून माधवराव पेशवे यांचे आनंदराव भिकाजी गोसावी यास आज्ञा.

पत्र १४७- २२-७-१७६३- (नससिंगराव दळवी नामजाद व जिवाजी रघुनाथ किल्ले पन्हाळा यांना) जिजाबाईंनी आज्ञा केल्याप्रमाणे चंद्रशेखर भट यांना मौजेचरण तालुका सातवे येथे जमीन ५ बिघे पाच पूर्वीपासून इनाम आहे. ते गावकरी सुरळीत चालवित नाहीत. ते सुरळीत चालविण्यासाठी ताकीद देणारे पत्र.

पत्र १५०- २४-९-१७६३- निळो रघुनाथ कुलकर्णी मौजे वलिवडे यास पांडुरंगाच्या उत्सवानिमित्त किल्ले प्रसिद्ध गडाच्या दिवाणाकडून दोन बिघे जमीन इनाम दिले.

पत्र १५५- जायशेट महाजन याने सरकारी सेवा निष्ठेने केल्याबद्दल त्यास कसबा वडगावचे महाजनकीचे वतन कानू काईदे करुन दिले. तरी ते वतन त्याजकडे चालविण्याविषयी वडगावच्या मुकादमास शिवाजी (तिसरे) नी दिलेले हे आज्ञापत्र आहे.

यात १३ कलमे केली आहेत. १० बिघे जमीन इनाम, जकातीस १ विश्वा व वाहतुकीचे ४ मापटे (दर गोणीस) व इतर कलमे मात बलुतांना द्यावे लागणारे कर यांचा समावेश होता. उदा. (साली कोष्टी, धनगर यास दर मागास सालिना रुक १२) असे अनेक बलुतेदारांची इनाम दिलेली दिसतात.

पत्र १६७- ५-३-१७६४- महिपतराव घोरपडे ताा वाळवे यांची देशमुखी पेशव्यांनी जप्त केली होती ती सोडविण्यासाठी जो खर्च आला त्याचा तपशील या कागदांत आहे.

पत्र १८१- ३१-११-१७६४- महाल पाटगाव येथे जकात वसुलीसाठी डांगी नव्हता, म्हणून किल्ले भुदरगडचे दिवाणांनी ती जागा आपाजी दामोदर सेणवई यास दिली. दिवाणीतून यासाठी दर माहे २ रुपये रोजगार दिला आहे.

पत्र १९३- १४-६-१७६५- आबाजी नरसगोंडा टारे यास त्याची रयतावाची ५ बिघे जमीन व बेटाचा निम्मा भाग दिल्याचे राजमंडळाचे आज्ञापत्र.

पत्र १९६- ५-८-१७६५- जिजाजी जाधव मुकादम मौजे मळगे बुद्रुक यांस पत्र की, श्रीमंतांनी जिवाजी तुकदेव कुलकर्णी मौजे मळगे बुद्रुक यास सहा बिघे जमीन दिली असून त्यास तो सहा बिघे जमीन दाखवून द्यावी.

पत्र २१४ - ९-७-१७६६- इंग्रजांनी सिंधुदुर्ग किल्ला जबरदस्तीने घेतला. तो परत घेण्याचे वेळी आपाजी जाधव यांनी अपूर्व पराक्रम गाजविला. म्हणून आपाजी जाधव यास जिजाबाईकडून मौजे बालिंगे या गावी १० बिघे भात जमीन इनाम दिली.

पत्र २३६ - १२-४-१७६८- कृष्णराव प्रतिनिधी यांनी बापू पाठक या नावाच्या ब्राम्हणास मौजे चांदोली ताा मलकापूर हा गाव इनाम देवून शिवाजी राजे यांना त्याचे दुमाळेपत्र करुन देण्याची विनंती केली होती. त्या विनंतीनुसार शिवाजी राजे यांनी दुमालेपत्र करुन दिले.

पत्र २३८ - २७-५-१७६८- लक्ष्मण जोती मगर (वाडी-मूल) यास सात बिघे जमीन इनाम दिली. तिची तिजाई मगर यांच्या विनंतीवरुन माफ केली आहे. म्हणून पंत अमात्य (रामचंद्र) यांचे मोकदम (मौजे उतरे) यांस पत्र.

पत्र २४५ - २९-८-१७६९- राणोजी घोरपडे सेनापती यांनी मिरज येथील व्यंकटराऊ नारायण गोसावी यांना मिरज येथील देशमुखी सरदेशमुखी कर्याती चार, एकूण वीस कर्यातीचे वतन व इचलकरंजी, सिरढोण ही गावे इनाम दिली आहेत. व्यकंटराऊ व त्यांचे वडील दोघांनींही दौलतीविषयी असे धारण श्रम केले. त्या प्रित्यर्थ हे वतन व इनाम दिलेले होते.

पत्र २६८ - चिमणभर नवते यांनी राणी जिजाबाईनां दिलेले पत्र- नवतेंच्या कन्येच्या विवाहाप्रित्यर्थ उभयता पाठविलेला आहेर व १० बिघे जमीनीची इनाम सनद दिल्याने आम्ही खूप समाधानी आहोत असे म्हटले आहे.

पत्र २७३ - खंडेराव गोविंद पारसनिवीस यांस जिजाबाईकडून मौजे खाटांगले येथील (कुलकर्णी यांची) दोन बिघे जमीन देण्यात आली.

(जिजाबाई कालीन कागदपत्रे, संपादक डॉ. अप्पासाहेब पवार, शिवाजी विद्यापीठ, ऐतिहासिक ग्रंथमाला, पुष्प पाचवे, १९७८, किं. १५ रु.)

**ऐतिहासिक फार्सी साहित्य - सहावा खंड**

पत्र ८४ इ.स. १६६७ ऑगस्ट २२ - अब्दुर्रहीमखानाने अर्ज केला की, सफीखानाला शिवाजीने पत्र लिहिले होते. त्यात किल्ल्यांच्या भोवतालची प्रजा त्याला पेशकशीचा योग्य पैसा देत नाही जर त्याला हुकूम झाला तर तंबी देऊन अंमल बसवीन असे लिहिले होते. यावर खानास पुढीलप्रमाणे उत्तर द्यावयास सांगितलेले दिसते. शिवाजी जर सुभ्यामध्ये किंवा औरंगजेबाकडे चाकरीच करत नाही तर त्याला जागीर आणि मनसबीचा तनखा कसा द्यायचा? किल्ल्यांची पेशकश त्याची त्यानेच घ्यावी.

पत्र ११२ इ.स.१६७० जाने २४ - खानदेशाच्या दिवाणाने (मुहम्मद अश्रफ) याचा अर्ज- शिवाजीची फौज वऱ्हाडात घेऊन लुटालूट करीत होती. बादशाही खजिन्यातील वीस लक्षांचे तांब्याचे नाणे खालसाच्या परगण्यात आहेत. यावर बादशहाने त्याला ती रक्कम बुर्हानपुरास पोचवण्यास सांगितली.

औशाचा किल्लेदार बुर्खर्दार खान याचा अर्ज आला. त्यात शिवाजीचे वीस हजार स्वार व पायदळ या प्रांतात येऊन लुटालूट करीत आहेत. चौथ वसूल करीत आहेत. बुर्खर्दार खानच्या जहांगिरीतील सर्व वसूल नेण्याची त्याला भिती असल्याने त्याने बादशहाची मदत मागितली आहे.

पत्र ११८ - (औरंगाबादच्या वृत्तपत्रावरुन) शिवाजीने चांदवडावर हल्ला केला व शहर लुटले त्यात सरकारी १ हत्ती, १२ घोडे, ४०,००० रुपये नेले.

पत्र १५० - इ.स. १६८० एप्रिल २०-औरंगाबादच्या वृत्तपत्रावरुन समजले की-शिवाजी आपल्या सैन्यासह बीदर किल्ला लुटण्यासाठी आला होता.तो परगणे फुलमरी येथे चौथ वसूल करीत आहे.

पत्र १८३ - इ.स. १६८१ मार्च १९- असदखानाने अर्ज केला की सर्व बादशाही मुलूखात जिझिया पट्टी लावली आहे.

पत्र २३१ - इ.स. १६८१ ऑगस्ट २- अश्रफखानाने केला की मुल्ला अहमद विजापुरीचा नातेवाईक मुहम्मद शरीफ याने विनंती केली की, जर राजगडची फौजदारी दिवाणी व

अमीनी नेमून दिली तर ५ वर्षात जास्तीत जास्त वसूल करुन दाखवीन असं नाही झालं तर तेवढा वसूल माझ्या जहांगिरीतून देईन.

पत्र २३५ - इ.स. १६८१ ऑगस्ट १६- शिवाजीचा मुलगा संभाजी माहोली किल्याच्या बाजूस असणाऱ्या पालीच्या किल्यात राहत आहे. त्याच्याबरोबर २०० स्वार व ८०० पायदळ असून इतरही लोक त्याच्या सेवेत रुजू आहेत. संभाजीने अकबराला आपल्या मुलूखातून लोक गोळा करण्यास मनाई केली. आणि त्याला साठ होनांचा रोजमरा नेमला.

पत्र २७१ - इ.स. १६८१ नोव्हें २०-संभाजीने अहमदनगरच्या किल्यावर हल्ला केला तेव्हा तो मुकीमखानाने परतून लावला पण अहमदनगर शहर व आजूबाजूचा प्रदेश याचे त्याने रक्षण केले नाही तो किल्ल्यातच सावध राहिला म्हणून त्याला दिलेली वाढ (५०० जात व १०० स्वार) स्थगित करण्यात आली.

पत्र २७२- इ.स. १६८१ २२- संभाजीच्या फौजा मुन्हरेकडे लुटालूट करण्यासाठी गेल्या होत्या. शिहाबुद्दीन खानाच्या नावे फर्मान काढण्यात आले की "शत्रूच्या फौजा बुऱ्हानपूरच्या आसपासच्या भागातून चौथाई वसूल करुन नेत असत. आता पाच पाचशे स्वारांच्या ३ फौजा तयार करुन १ फौज थाळनेरच्या संरक्षणासाठी पाठवावी " असे स्पष्ट करण्यात आले.

पत्र३१९-इ.स.१६८२सप्टे२३-हैद्राबादचा मालक अबुल हसन याकडून पेशकश म्हणून १८ लाख रुपये,१६ हत्ती, १जडजवाहिरांनी भरलेली पेटी आणलीजी बादशाही खजिन्यात दाखल केली.

पत्र ३५३-इ.स.१६८२नोव्हेंबर१-दिलेरखानाचा नोकर शेख बडा हा तीनशे स्वारांसहखजिना, जिन्नस कपडे वगैरे कमालुद्दीन खानाकडे आणीत असताना रस्त्यात थांबला होता. रात्री शत्रूचे लोक येऊन त्यांनी रोख पैसे, जिन्नस, सर्व लूटून शेखाबरोबर काही लोकांना मारुन पळून गेले.

पत्र ४७९- इ.स. १६८४ जानेवारी १३- शत्रूचे २ स्वार व १ पदाति पाटोद्या जिल्हयामध्ये चौथ वसूल करण्यासाठी आले होते. मी त्यांना कैद केले आहे.

पत्र ३२६ - इ.स.१६८४ऑक्टोबर २३- शिवनेरीचा ठाणेदार मुहम्मद खलील याचा अर्ज होता- शिवनेरी प्रांतातील चौथ वसूल करण्यासाठी नेमलेला शत्रूचा सरदार अढळराव हा चाकरीच्या आशेने ठाणेदाराला भेटला. त्याचे मागणे मान्य करुन त्याला बादशहाकडे पाठवावे असे

फर्माविले.काझी हैदराने अर्ज केला होता, त्याप्रमाणे १ हजार मुसलमान तिरंदाज व बर्कदाज स्वार हे संभाजीचा नोकर मलिकबेग याच्याजवळ होते. त्याला व त्याच्या बरोबरच्या शेख हुसेन याला १००० होन वर्षाचा (सालीना) मेहनाताना होता. पण त्यांना फक्त ५०० होनच मिळत असल्याने ते दोघे चाकरीसाठी बादशहाकडे येऊ इच्छितात. तसा हुकूम द्यावयाची सूचना केली आहे.

<u>पत्र ५४८</u>- इ.स. १६८५ जानेवारी १५- बहरामंदखान फौजेसह शिरवळाहून कर्डे निमोणे व शिकारपूर (शिक्रापूर) यामधून जाऊन आला.गुर्जबर्दाराने२००० बैल धान्य सरकारांतून बहरामंदखाना कडे शिरवळ येथे नेले होते. पैकी १७०० बैल धान्य शत्रूने लूटून नेले. ३०० बैल रसद सुप्यास पोहोचविली असा अर्ज आला.

इ.स. १६८० ते १८०० या कालखंडात मराठी राज्याचा विस्तार झाला. मराठी पत्रवाङ्मयात मराठयांच्या राज्यातील हालचालींचे, देवाणघेवाणीचे पडसाद उमटलेली दिसतात. मराठा कालखंडात आढळणाऱ्या ऐतिहासिक पत्रांमध्ये फारसी शब्दांचा वापर करण्यात आलेला दिसतो. ऐतिहासिक पत्रांच्या आधारे काही व्यक्तीनां अनेक इनामपत्रे देऊन मदत केलेली दिसते. या इनामपत्रांमध्ये काही वैशिष्टये आढळतात.

१) एकाच व्यक्तीला अनेक ठिकाणी जमीन दिलेली दिसते, अनेक गावांमधील जकातीचे उत्पन्न दिलेले दिसते.
२) प्रत्येक शासनकर्त्याकडून इनामे दिलेली दिसतात. इनामे वंशपरंपरागत असल्यामुळे प्रत्येक वर्षी दिली जात असावीत. म्हणजे मध्ययुगाच्या सुरुवातीला महाराष्ट्रात मुस्लिम राज्यकर्ते होते त्यांनी देखिल अशी वंशपरंपरागत इनामे दिलेली दिसतात.
३) इनामपत्र देताना ते ज्या व्यक्तीला दिले जात असे त्या व्यक्तीबरोबरच अनेक संबंधीत अधिकारीवर्गालासुध्दा ही पत्रे दिलेली दिसतात.
४) इनामपत्र देताना विचारात घेतलेल्या गोष्टींवरुन राज्यकर्त्यांचा जनतेकडे पाहण्याचा दृष्टिकोन स्पष्ट होतो. उदा. शिवाजी महाराजांनी स्वतःला "गोब्राम्हण प्रतिपालक " म्हणवून घेतल्याने मोरेश्वर गोसावी यास आणि अनेक इतर

(ऐतिहासिक फार्सी साहित्य, सहावा खंड, संपादक प्रा. ग.ह.खरे, सहसंपादक गो.त्र्यं. कुलकर्णी, भारत इतिहास संशोधक मंडळ, स्वीय ग्रंथमाला, क्र. १०६, १९७३, किं. १५ रु.)

ब्राम्हणांना गाई चरावयास लागवडीस नसणारी जमीन दिलेली दिसते. [1]

५) इनामपत्र देताना मठ चालविण्यासाठी व्यवस्था लावून देण्याची जबाबदारी देखिल राज्यकर्त्यांनी स्विकारलेली दिसते. म्हणजेच मठाच्या मदतीने समाजातील दीनदुबळया लोकांचा प्रतिपाल करण्याची जबाबदारी त्याकाळातील राज्यकर्त्यांनी घेतलेली दिसते. यासाठी लोकांना जमीनी इनाम दिलेल्या दिसतात, त्या इनाम जमीनीतून निघणाऱ्या उत्पन्नामधून मठ, धर्मादाय संस्था चालविण्याची व्यवस्था लावून दिलेली दिसते. [2]

**श्री मोरेश्वर गोसावी**

मोरया गोसावी यांचे नाव मोरेश्वर व आडनाव शाळिग्राम. हे मोरेश्वराचे भक्त असल्याने त्यांना मोरेश्वराचे म्हणजे मोरयाचे म्हणून लोक मोरया म्हणू लागले. मोरया गोसाव्यांचे मलिक अंबर, विजापूरकर व त्यांचे अधिकारी, शहाजी व शिवाजीराजे या सर्वांवर वजन असून त्या सर्वांकडून त्यास इनाम जमिनी व उत्पन्न मिळाले होते. इ.स. १६३९ पर्यंत मोरेश्वर गोसावी यांचा रहिवास चिंचवडास होता. त्या काळात त्यांनी चिंचवडास निजामशाही अधिकाऱ्यांकडून अर्धा चाहूर जमीन व २० खंडी धान्य असे इनाम मिळविले. (१२ ऑक्टोबर १६२६) चिंचवडजवळचे अकलवाडी (आकुर्डी)येथेही सैद सादत सैद हुसेन याजकडून मोरया यास इनाम होते ते शहाजी राजे यांनी पुढे चालविले.( इ.स. १६२८). गोसावी इ.स. १६३९च्या सुमारास मोरगावी राहावयास गेले. त्यांचा उद्देश चिंचवडाहून सुमारे १५ कोस असलेल्या मोरगावची दर पंधवडयाला वा महिन्याला चतुर्थीची वारी करुन शरीरास उतार

---

१. इ.स. १६४७-४८ मध्ये शिवाजी राजांचे परगणे पुणेच्या कारकून व देशमुखांस असणारे पत्र- महाराज गोब्राम्हण प्रतिपालक आहेत त्यामुळेच मोरेश्वर गोसावी यांच्याकडे दहावीस गाई आहेत त्यांना गाई चरावयास रान नाही म्हणून त्यांना कास रुके ३ लागवडीस नसणारी जमीन इनाम दिली आहे. (शि. प.सा. स. खंड ३,संपा.शं.ना. जोशी, भा.इ.सं.मंडळ पुणे इस.१९३७ पान ४९.)

इ.स. १६४६-४७ सैदसाहेबांकडून कारकून कर्यात कल्याण तर्फ अंबरनाथ यांस दिलेले पत्र- मोरेश्वर गोसावी यास दररोज १ लारी चालत होती याने गरीबंसाठी मठ टाकला आहे पण इनाम दिला पाहिजे त्यावरुन हुजुरांनी लारीचा पाव भाग म्हणजे चौथा हिस्सा दिला आहे. त्यावर एक पै हि घेऊ नये. (शि. प.सा. स. खंड ३,संपा.शं.ना. जोशी, भा.इ.सं.मंडळ पुणे इस.१९३७ पान ४९)

२. इ.स. १६४७ एप्रिल १० मूर्तजाबाद (चौल)चे कारकून व देशमुख यास- मोरेश्वर गोसावी यास रुस्तमेजमरा पासून महसूल व जकातीच्या आधारे चौलमधून गरीबांच्या मठासाठी २ लारी इनाम देण्यात आले आहे. .(शि. प.सा. स. खंड ३,संपा.शं.ना. जोशी, भा.इ.सं.मंडळ पुणे इस.१९३७ पान ५१)

इ.स. १६४७ मे २७ रणदुल्लाखान याने तपे पांच मामले मुरंजन (कल्याण) च्या कारकून देशमुख अधिका-यांना दिलेले पत्र- मोरेश्वर गोसावी यास तपे चोण मामले कल्याण पैकी १ लारी जागा नेमून देवूनही मठ-खैरातीचे काम चालविलेले नाही सरंजाम करुन देवून ते सुरु करावे याची तक्रार यावयास नको. (शि. प.सा. स. खंड ३,संपा.शं.ना. जोशी, भा.इ.सं.मंडळ पुणे इस.१९३७ पान ५१)

वयात क्लेश देण्यापेक्षा मोरगावी श्रीसानिध नित्य राहून त्यांची उपासना करावी असा असावा. [३]

इ.स.१६४४-४५ - श्री मोरेश्वर गोसावी मौजे मोरगाव यासा दादाजी कोंडदेव सुभेदार बापूजी मुदगल हवालदार व कारकून पुणे यांच्याकडून दिलेले पत्र- गोसावी यांना धर्मादाय **इनाम** जमीन ।। गजशेरायेनी देण्यात आली असली तरी त्यांच्याकडे नख्त खर्चपट्टी मोकदम मागतात यांना पट्टया माफ केल्या आहेत.- इ.स.१६४४ नोव्हेंबर २ मौजे लोणीच्या हुद्देदार, कारकून, माकदम खंडोजी घोरपडे यास दिलेले पत्र- श्री मोरेश्वर गोसावी यास १ चावर गजशेरायेनी **नख्त महसूल** दिला.

इ.स.१६४५मार्च ६ –चौल उर्फमूर्तजाबाद याचे कारकून, देशमुख अधिकारी रुस्तूजमा यांस पत्र - मोरेश्वर गोसावी यास चौल मधून **महसूल,जकाती व इतर पट्टया** प्रमाणे हुरमुजी २ लारी देणे.

इ.स.१६४५-४६ - मामले मुरंजन (कल्याण) कर्यात बदलापूर तपे चोप येथील कारकून, अधिकारी यांस- मोरेश्वर गोसावी तपे चोप येथील **पट्टयां**पैकी लारी १ देणे. दरवर्षी प्रमाणे देणे. नवीन वर्षी १ लारी म्हणजे **जकाती**तील १/२ लारी **नख्त महसूल**पैकी १/२ लारी दिली आहे.

इ.स.१६४५ -तर्फ कऱ्हेपठार सेरीकर मायेवाडी- मोरेश्वर गोसावी याचा **इनाम** बिलाकसूर त्याजकडे चालू ठेवावा. त्यांना त्रास होऊ नये.

इ.स.१६४५जून२२ -कर्याती मुरबाड देउपेचा हुद्देदार यास इस्लमाबादचे दिवाण यांनी पाठविलेले पत्र-भिऊडी (भिवंडी), कोरकडा, मुरबाड येथील प्रत्येक १ लारी प्रमाणे **इनाम** दिली आहे.ती देत जाणे.

इ.स.१६४६-४७ - परगणे सुपे मौजे लोणी बाराऊ करडियाची याचे हुद्देदार यांना शिवाजी राजेंचे पत्र- मोरेश्वर गोसावी यांस मौजे लोणीचा १ चावर **सध्या व भविष्यातील पट्टयास**ह दिली आहे. त्यात **तेजीपट्टी** ही दिली आहे.

(शिवकालीन महाराष्ट्र, वासुदेव कृष्ण भावे. वरदा प्रकाशन पुणे,दुसरी आवृत्ती, १९९८ (पहिली आवृत्ती एप्रिल १९५७) किं.४००रू)

इ.स.१६४९ सप्टेंबर २ -शिवाजीराजांनी मौजे लोणी बाराऊ करडियाचे हुद्देदारास पत्र- मोरेश्वर गोसावी यांस मौजे लोणी १ चावर जमीन **इनाम**.

इ.स.१६४६-४७ -शिवाजीराजांनी मौजे लोणी बाराऊ करडियाचे हुद्देदारास पत्र- मोरेश्वर गोसावी यांस मौजे लोणी येथील १ चावर गजशरायनी जमीन **इनाम** दिली. हुद्देदार पत्र मागतात म्हणून हे पत्र दिलेले दिसते.

इ.स.१६४७ मार्च - रणदुल्लाखान याने मामले मुरंजनच्या उर्फ कलियांनच्या ५ तपेचे कारकून, देखमुख व अधिकारी यास दिलेले पत्र-मोरेश्वर गोसावी यांस दररोज १ लारी (चोण तपे) **पट्टी** देणे.

इ.स. १६४९ ऑगस्ट ६ -आलीखान काजी याने कसबे कल्याण व तपे अंबरनाथ  मामले मुरंजन यास लिहिलेले पत्र- मोरेश्वर गोसावी यांस **इनामा**बद्दल धर्मादाय गरीबगुराबा १ लारी सालाबाद दिली आहे. या इनामापैकी **मोइन**(पगार) .।. लारी **दुबाला** केली असे.

पत्र क्र. २५१८ इ.स. १६४६-४७ - सैद साहेबांकडून कारकून कर्यात कल्याण तर्फ अंबरनाथ, यास दिलेले पत्र- मोरेश्वर गोसावी यास दररोज १ लारी चालत होती. सैद साहेब म्हणतो बंदरीच्या जागेत इनामदार व (सैदसाहेब) स्वतःला काही मिळत नाही आपण गरीबांसाठी मठ टाकला आहे पण **इनाम** दिला पाहिजे. त्यावरुन हुजूरांनी लारीचा पाव भाग म्हणजे चौथा हिस्सा दिला आहे. त्यावर एक पै ही घेऊ नये ((इ.स.१६४९-ऑगस्ट ६) आलीखान काजी याने कसबे कल्याण तपे अंबरनाथच्या कारकूनास लिहिलेले आहे. (१ लारी मुकासाई पैकी काजीसाहेबास .।. लारी मोईन (पगार) आहे ते देणे.)

पत्र क्र. २५१९ इ.स. १६४७-४८–शिवाजी राजांचे परगणे पुणेच्या कारकून व देशमुखांस पत्र - महाराज गोब्राह्मण प्रतिपालक आहेत. त्यामुळेच मोरेश्वर गोसावी यांच्याकडे १०-२०गाई आहेत. त्यांना गाई चरावयास रान नाही. म्हणून त्यांना कास रुके ३ लागवडीस नसणारी जमीन **इनाम** दिली आहे.

पत्र क्र.२५२० इ.स. १६४७-४८ – शिवाजी राजांचे परगणे पुणेच्या कारकून व देशमुखास – पत्र- परगणे पुण्यातील ७ रुके जमीन **इनाम** दिली आहे. महाराजांचे कल्याण चिंतण्यासाठी जमिनीतील धान्य ब्राह्मणमुखी घालण्यासाठी **इनाम** दिल्याचा उल्लेख आहे.

पत्र क्र. २५२४ इ.स. १६४७-४९- शिवाजी राजे यांचे पुण्याच्या देशमुखास पत्र - मोरेश्वर गोसावी यांनी मोरगावाला बाग लावली आहे. त्यासाठी त्यांना सहाय्य करणे. (**वसूलांच्या आधारे**)

पत्र क्र. २५२६ इ.स. १६४७ एप्रिल १०- मूर्तजाबाद (चौल) चे कारकून व देशमुख यास- मोरेश्वर गोसावी यास रुस्तुमेजमापासून महसूल व जकातीच्या आधारे चौलमधून गरीबांच्या मठासाठी २ लारी **इनाम** देण्यात आले आहे. (इ.स. १६४९ जून २७-अफजलखान महमदशाही याने चेऊलच्या कारकून व देशमुख रोज रे लारी इतर पट्टयांमधून देणे असा इनाम मोकासान दिले आहे.)

पत्र क्र. २५२७ इ.स. १६४७ एप्रिल २८- शिवाजी राजेंनी परगणे सुपे मौजे लोणीच्या मोकदम व हुद्देदारास लिहिलेले पत्र - मोरेश्वर गोसावी यास मौजे लोणीची १ चावर जमीन **सगळया पट्टयांसह इनाम** दिली आहे ती वंशपरंपरेने चालवावी. (इ.स. १६४४ मध्येही पत्र)

पत्र क्र. २५२९- इ.स. १६४७ मे २७ - रणदुलाखान याने तपे पांच मामले मुरंजन कल्याणच्या कारकून देशमुख अधिकाऱ्यांना दिलेले पत्र - मोरेश्वर गोसावी यास तपे चोण मामले कल्याण पैकी १ लारी जागा नेमून देवूनही मठ- खैरातीचे काम चालविलेले नाही. सरंजाम व्यवस्था करुन देवून ते सुरु करावे. याची तक्रार यावयास नको.

पत्र २५३०- इ.स. १६४७ जून-जूलै- इस्लामाबादच्या कारकूनास- मोरेश्वर गोसावी यास लारी ३ कसबे भिवंडी व तर्फ मुरबाड व परगणे कोरकोडा येथील **इनाम** दिलेले दिसते.

पत्र २५५७- इ.स. १६५० फेब्रु २- रुस्तुमेजमाने चौलच्या कारकून व देशमुख अधिकारी यास ४ रोज ३ लारी कसबे, भिवंडी, तर्फ मुरबाड, परगणे कोरकोडा येथील **इनाम** दिलेले दिसते.

पत्र २५३२- इ.स. १६४७ नोव्हें २७- शिवाजी राजांनी परगणे, पुणे तर्फ कऱ्हेपठारच्या कारकूनास लिहिलेले पत्र - मोरेश्वर गोसावी यास नीमे चावर (मोरगावमधील) जमीन **इनाम (पट्टयांसह**) आहे. पण हुद्देदार व मोकदम मात्र १० पट्टया त्यांच्याकडे मागत होते. म्हणून पंडितांनी (दादोजीनीं) सनद दिली आणि **सध्या व भविष्यातील पट्टया** माफ केल्या.

पत्र २५३३- इ.स. १६४७ डिसें १६ – शिवाजीराजे यांनी परगणे, पुणे, तर्फ कऱ्हेपठार मौजे मोरगावच्या मोकदमास पत्र- मोरेश्वर गोसावी यास वाट वडगौव जवळचे शेत कास रुकेइ१ **इनाम** दिले आहे. **नख्त गला** व कडबा **दुमाले** केले दिल्याचा उल्लेख आहे.

पत्र २५५४-इ.स.१६४९सप्टें २२- शिवाजी राजेंचे पुणे, परगण्याच्या कारकूनास पत्र - मोरगाव, मायेपाडी नायगाव- **इनाम**- मोरेश्वर गोसावी अन्नधान्य, देवचि सेवक यासाठी त्यांना दान देण्यात आल्या आहेत.

पत्र २५३४- शिवाजीराजे यांनी तर्फ कऱ्हेपठारच्या कारकूनास पत्र- मोरेश्वर गोसावी यास मौजे मोरगावचे कास ७ मायेवाडी ½ चावर निमे एकूण कास रुक ६. नायगाव ४।।, मायेवाडी ५।।।, एकूण टके १०।। ८।। टके १०, व आठ बत्तीस रुके **दुमाले** केले.

पत्र २५४०- इ.स. १६४८ ऑगस्ट २३- शिवाजी राजे यांनी परगणे पुणे कऱ्हेपठारचे तरफदार तिमाजी बापूजी यांस पत्र - मोरेश्वर गोसावी यांना मौजे नायगाव व मायेवाडी ही दोन गावे **इनाम** आहेत. गेल्यावर्षापासून ते देवून यावर्षीही त्याची तजवीज केली आहे.

पत्र २५४४- इ.स. १६४८-४९ शिवाजी राजे यांनी परगणे पुण्याच्या कारकून व देशमुखांना दिलेले पत्र- मोरगावी मोरेश्वर गोसावी यास कास रुके ६ शेत **इस्तावा माफ** करुन दिली आहे. याचा १ होनु **मक्ता** मोरेश्वर गोसावींच्या नावे **महसुलात धर्मादाय** म्हणून लिहित जाते.

पत्र २५४५- इ.स. १६४८-४९- शिवाजी राजे यांनी पुणे परगण्याच्या कारकून व देशमुखांना दिलेले पत्र- मोरेश्वर गोसावी यास १ चावर गजशरायेनी एकूण कास रुके १२ मायेवाडी व नायेगावची जमीन दिली. कारकूनाने या कासेवर जी रोख रकमेची वाटणी बाकी काढली ती

महाराजांचे देणे आहे. गोसावी यांना सर्व **पट्टया** माफ केल्या. त्यांना दिलेल्या शेताशी तुमचा काही संबंध नाही.

पत्र २५५६ - इ.स.१६४९-५०- मायेवाडी व नायगाव- गजशेरायनी १, कास रुके .।. हे कुळ पटिया **इनाम** आहे ते चालविणे.

**नारो विश्वनाथ कुळकर्णी –**

पत्र २४७८- इ.स. १६४१ मार्च ८- मुहमंद आदिलशाहने कराड परगण्याच्या देसाईस पत्र- सांबवे कर्यातीपैकी वेन्हे गावच्या नारो विश्वनाथ कुळकर्णी याने बादशहास विनंती केल्यामुळे या गावचे **कुळकर्ण** (पूर्वापार) त्याला दिले.

पत्र २४७९- इ.स.१६४१ मार्च ९- आदिलशाहने परगणे वाईच्या अधिकारी व देसापास पत्र लिहिले की टाकळे येथील **कुळकर्ण** पूर्वीपासून त्याच्याकडेच असल्याने त्यालाच मिळावे.

पत्र २४८१- इ.स. १६४१ ऑगस्ट ९- आदिलशहाने परगणे कराडच्या देसापास लिहिलेले पत्र- नारो विश्वनाथ कुळकर्णी याने किरोलींची जोंशकी व कुळकर्ण परंपरेने मला आहे व ती मिळावी अशी विनंती केली. त्याप्रमाणे **इनाम व हकलवाजिमे** इ. पण खात आल्याचे सांगितले आहे.

पत्र २४८२- इ.स. १६४१ ऑगस्ट ९- आदिलशहाने कऱ्हाडच्या देसायास पत्र- वेल्हे येथील कुळकर्ण वाडवडिलांपासून त्याची मिरास आहे. तर त्याला ते **कुलकर्णाचे** काम मिळावे.

पत्र २४८५- इ.स. १६४२ एप्रिल २५- आदिलशाहाने परगणे वाईच्या अंमलदार व देसाई यांना पत्र- मौजे टाकळे, मौजे बोरगाव संमत कोरेगाव येथील कुळकर्ण व जोशकी वाडवडिलांपासून त्याची मिरास होती. त्याच्या वडिलांनी दोन मुतालिक ठेविले होते. पण गावकऱ्यांनी शेवटी **जोशकी व कुळकर्ण** माझ्याकडेच दिले. त्याप्रमाणे फर्मात मिळणे.

पत्र २४८५- इ.स. १६४२ ऑगस्ट ४- आदिलशहाने परगणे वाईच्या अंमलदार व देसायांस पत्र- बोरगाव व टाकळे या गावी अनुक्रमे ½ व चावर १ जमीन प्रत पहिल्याप्रमाणे **इनाम** चालू ठेवण्याचे पत्र.

पत्र २४८८- इ.स. १६४२ ऑगस्ट ४- मुहमंद आदिलशाह ने कराडच्या देसाई व हवालदारास पत्र ना.वि. कुळकर्णी, मौजे देहे, कर्यात सेळगाव(शेळगाव) परगणा कराड, याने विनंती केली. वरील गावातील पहिल्या प्रतीची जमीन अर्धा चावर जमीन **इनाम** चालू आहे.

पत्र २६५९- इ.स. १६६२ फेब्रू २५- २रा अली आदिलशाह याने हवालदार, मुलकी ठाणेदार व कारकून (किल्ला) परळी. मौजे बोरगाव, परगणे, वाई येथील नारो वि. कुळकर्णी यांनी विनंती केली की मौजे मकलेरी किल्ला परळी येथील ½ चावर जमीन **इनाम** म्हणून मला ते इनाम देण्याची कृपा केली आहे. ती त्यांच्याच ताब्यात ठेवण्याचे सांगितले आहे.

**कान्होजी जेधे-देसाई-**

पत्र २४५५- इ.स. १६३७ जुलै ६- मुहम्मद आदिलशहा याने कान्होजी जेधे देसाई रोहिडा किल्ला येथे दिलेले पत्र- कान्होजी जेधे-देसाई यांनी बादशाही सत्तेमध्ये निष्ठेने काम करत असल्याचा उल्लेख रोहिडा किल्ला घेणे आणि चाकरी करावी म्हणजे **इनामाची** व्यवस्था लागण्याचे हुकूम होतील.

पत्र २४५७- इ.स. १६६३ ऑक्टो१५- कारकून तपे रोहिडा- रोहिडा किल्ल्याच्या तपे भोर मधील मौज चिखलगाव कान्होजींना **इनाम** दिला**. कुलबाब कुल कानु** वंशपरंपरेने त्यांनाचा देणे.

पत्र २४६४- इ.स. १६३८ एप्रिल १२- मुहम्मद आदिलशहा यांचे कान्होजी जेधेंस पत्र- रोहिडा किल्ल्याजवळ जाऊन शत्रूला तेथून हालू देऊ नये.या कामासाठी एक महालदार पाठविला आहे.

पत्र २४९८- इ.स. १६४४ ऑगस्ट १- मुहम्मद आदिलशाहाने कान्होजी जेधेस लिहिलेले पत्र- शहाजी भोसले अपमानीत झाला आहे. त्याचा मुतालिक दादाजी कोंडदेव कोंडाण्याकडे आहे. दादाजी कोंडदेव व शहाजी राजे यांना संपवण्यासाठी खंडोजी व बाजी घोरपडे यांच्यासह तूमची नेमणूक केली आहे. त्यांना संपविल्यास तुमची त्यातून प्रगती होणार आहे.

पत्र २६०३- इ.स. १६५५ एप्रिल५- सर्जाराऊ कान्होजी जेधे (माहालीदार) यांचे परसोजी पाटील मोकदम मौजे विंग परगणे पुणे यांना पत्र- मौजे विंगची वरात होन ८ आहे. पैकी ५

होन हवाला केला पण बाकी होन ६ राहिले त्यासाठी हवालदार पाठविला आहे. जमा करुन लवकर पाठविणे.

पत्र २६४७- इ.स. १६६० सप्टे २- राजश्री शिवाजी राजे यांनी कान्होजी जेधे देशमुख तर्फ भोर किले रोहिडा यांना पत्र- कान्होजींनी आपली ६ मुले असल्याचे सांगितल्याप्रमाणे त्यांना शिवाजींनी कान्होजीची तब्येत बरी झाल्यावर पाठविण्यास सांगितले. देशमुखी त्यांच्याकडे आहे तिचा सांभाळ करावयास सांगितला.

पत्र २६५०- इ.स. १६६० डिसें १४- राधोबलाल महालनिहाय यांचे सोमाजी विष्णू हवालदार व कारकून तपे रोहिडखोरे यांना पत्र- कान्होजी जेधे देशमुख रोहिडे किले यांचे इनामती व किरकोळ हक्क ५ हजार टके आहेत. त्यातील **इनामती, खंडणी, पेशजी** गडकरी दरसाल ३० होनु होत होते. त्याप्रमाणेच घेत जाणे. नवीन काही करु नये.

पत्र २७११- इ.स. १६६८- शिवाजी राजांचे तर्फ रोहिडखोरेच्या कारकून व देशमुखास पत्र- येसजी बिन इंद्रोजी जेधे यांना सांगण्यात येते की तर्फ रोहिडखोऱ्यातील देशमुखास इनाम चार गाव व हकालाजिमा सारा दुबाला होता त्यावेळी मौजे आंबवडे देशमुखीपैकी आपणास शेत टके ३ चे **इनाम** होते. आता मात्र देशमुखास १ गाव व **हकलजिमा दुमाले** करुन बाकी गावे जप्त केली आहेत. त्याप्रमाणे तूम्ही **महसुल** कुल ३ दुबाले करणे.

पत्र २७१२- इ.स. १६६८-६९- राजश्री शिवाजी राजेंचे तर्फ रोहिडखोरेच्या कारकूनास पत्र- सर्जेराऊ, सिवजी, चांदजी, नाइकजी, रायाजी व संभाजी बिन कान्होजी जेधे देशमुख या भावाभावांमध्ये (वाटयावरुन) हिश्यावरुन भांडण लागले. शिवाजींनी त्यांना वडिलांनी ज्याप्रमाणे वाटणी करुन कागद दिला आहे. तसेच वागावे असे सांगितले.

पत्र २७१३- इ.स. १६६९ मार्च ३०- मोरो त्रिमल यांनी सर्जेराव जेधे देशमुख तर्फ रोहिडखोरे यांना लिहिलेले पत्र- तूमचे भाऊ एक महिनाभर येऊन राहिले आहेत. निवाडयाबद्दल तूम्हाला एक दोन पत्रे पण पाठविली. तूम्ही आले नाहीत यावरुन तूम्हाला भांडण मिटवण्याचे दिसत नाही. तरी नायेकजी व सिवजी, सुभानजी हे मौजे कारी येथे घरे व शेते करतात त्यांना तिथे सुखाने राहू देत.

पत्र २७१५- इ.स. १६७० जून १३- येसाजी जेथे, निबाजी बांदल, बापुजी घोलप, सोमाजी आवळा इ. मौजे कारी तर्फ रोहिडखोरे यांस. सर्जाराऊ व सिवाजी जेधे यांचेकडे **देशमुखी** आहे. महाराजांनी सांगितल्याप्रमाणे व कान्होजी जेधेन वाटून दिल्याप्रमाणे वागावे असे असताना तूम्ही सिवाजी जेधे याला त्रास देता तरी महाराजांची याबाबत ताकीद आहे. दसरा झाल्यावर महाराज दुसऱ्या जागा देतील.

**भिकूजी हंबीरराव मोहिते-**

पत्र २४६३- इ.स. १६३८ एप्रिल १२- शहाजहान व औरंगजेब याने भिकूजी मोहिते यास पाठविलेले पत्र- मुल्हेरचा किल्ला ताब्यात घेतल्यानंतर सुलतानपूर परगणा **वतन** म्हणून देण्याचे फर्मान सुटेल.

पत्र २४६५- इ.स. १६३८ सप्टें ६- शहाजहान व औरंगजेब याने भिकूजी मोहितेस पाठविलेले पत्र- मुल्हेर किल्ला ताब्यात घेतल्याबद्दलची पसंती आणि साल्हेरचा किल्ला ताब्यात घेण्याची चाकरी आणखीन पसंदीस येईल.

पत्र २४७०- इ.स. १६३९ ऑक्टो २६- शहाजहान व औरंगजेब याने भिकूजी मोहितेस पाठविलेले पत्र- आम्ही हूकुम फर्माविला आहे की तू बागलानमध्येच चाकरीत रहावे. त्यामूळे तू आपल्या जमेतीसह (सैन्यांसह) औरंगनगरास जावून मुहम्मद ताहीरच्या विचाराने काम करावे.

पत्र २४७३- इ.स. १६४० जून-जूलै - शहाजहान व औरंगजेब याने भिकूजी मोहितेस पाठविलेले पत्र -मुहम्मद ताहीर कडून भिकूजीच्या उत्तम चाकरीची माहिती मिळाली. त्याने जास्तीत जास्त चाकरी करावी म्हणजे त्याची प्रगती होईल.

पत्र २४७५- इ.स. १६४० नोव्हेंबर १५- - शहाजहान व औरंगजेब याने भिकूजी मोहितेस पाठविलेले पत्र- बागलाण सुभ्याच्या फौजदारीवर असलेल्या सय्यिद अब्दुल वहहाव याचे आज्ञेनुसार चाकरी करावी. त्यांना सहकार्य करावे. त्याने तुझ्या सहकार्याबद्दल राजी व कृतज्ञ असावे.

पत्र २४८०- इ.स. १६३९ जून २९- - शहाजहान व औरंगजेब भिकूजी मोहितेस पाठविलेले पत्र- तूझे कार्य कतृत्व समजले या वर्षी तू हातगड किल्ल्याच्या जवळ छावणी करुन रयतेची सेवा करावी. रयत व वतनदारांना शेतीची कामे मोकळेपणाने करण्यासाठी मूठमर्द ( गुंड )नष्ट करावेत.

पत्र २४८४- इ.स. १६४१ डिसेंबर २४- - शहाजहान व औरंगजेब भिकूजी मोहितेस पाठविलेले पत्र- मुहम्मद ताहीरकडून तूझी सेवा समजली. जंग्या भिल्लाचा बंदोबस्त करावा म्हणजे प्रगती होईल.

**मालोजी राजे घोरपडे -**

पत्र २७२३- इ.स. १६७० ऑक्टोबर २०- दुसरा अली आदिलशाह याने देशमुख, देशपांडे व नाडगीर परगणे मुधोळ यांना पत्र- मुधोळ परगणा बाजीराव राजे बहादुर घोरपडे यांना इनाम होता. शिवाजीराजे भोसलेंच्याबरोबर लढाईत ते मेले त्यानंतर त्यांचा मुलगा मालोजी राजे बहादूर घोरपडे यांना नोकरी माफ करुन इनामाच्या रुपाने ५ परगणे **बक्षीस** देण्याचे फर्मान दिले आहे. तेव्हा सर्व अधिकाऱ्यांना हुकूम आहे. हकदार सोडून त्यांना **इनाम** दिले आहे.

पत्र २७२४- इ.स. १६७० ऑक्टोबर २०- दुसरा अली आदिलशाह याने मालोजी राजे घोरपडेंना पत्र- बाजी राजे घोरपडे हे शिवाजीराजें बरोबर लढाईत कामास आले. यासाठी व पूर्वीच्या चाकरीसाठी **इनाम** म्हणून मुधोळ, जमगड, ढवळेश्वर, माचकनूर व लोकापूर हे पाच परगणे देत आहे. **हक्कदारांचे हक्क** शिल्लक ठेविले आहेत. हे **वतन** पिढयानपिढया उपभोगावे.

पत्र २७५८- इ.स. १६७५ नाव्हेंबर २८- कुतूबशाहाने मालोजी राजे घोरपडे यांना लिहिलेले पत्र- तूम्ही व तूमच्या वडिलांनी आदिलशाहीत पुष्कळ काम केले. यापुढेही अशी मोठी कामे तूमच्याकडून होतील असा विश्वास आहे. तेव्हा तूम्हास हुकूम आहे की तूम्ही सरंजाम व फौज घेवून कुतूबशाहीत यावे. आदिलशाहीतील प्रधानकी मान, मुलुख, जागीर, इ. जे काही होते ते सर्व इकडे ही मिळेल.

पत्र २७७५- इ.स. १६७८ ऑक्टोबर ५- सिकंदर आदिलशाहचे देसाई व अधिकारी (मुधोळ) यांना पत्र- मालोजी घोरपडे यांना कसबे मुधोळ, शिरुल, मलली व सोरगाव ही गावे आणि मन्तूर, झुंजरमोप, मुगलखोड, बुदनी ही गावे ही हक्कांसह **इनाम** दिली आहेत.

**राजश्री शेषो नारायण -**

पत्र क्र २३ - मौजे भिरडी परगणा रायबाग हा गाव पेशव्याकडून शेषो नारायण यास **इनाम.**

पत्र क्र २४ - श्री शेषो नारायण यांना बाळाजी बाजीराव प्रधान यांजकडून मौजे बालिंगे परगणा कागल हा गाव **" स्वराज्य व मोगलाई" दुतर्फा एकूण देखील इनाम.**

पत्र क्र २९ - महाराणी जिजाबाई यांचे कडून शेषो नारायण यांस मौजे रुई हा गाव **इनाम.**

पत्र क्र ३० - इंग्रज सिंधुदुर्गवर हल्ला करण्यासाठी आरमार गोळा करीत आहेत. बावडा प्रांतात पेशवेपट्टी गोळा करण्याची धूम चालू आहे. संस्थानच्या बोलीचा ऐवज थकला आहे. मनोळी तालुक्याचा प्रश्नहि सुटलेला नाही. तरी हया गोष्टी पंतप्रधानाच्या कानी घालाव्या व सिंधुदुर्गापासून इंग्रज दूर राहतील ते करण्यास त्यांना सांगावे म्हणून संभाजी राजे यांचे शेषो नारायण याना पत्र.

पत्र क्र ३३ – कर्नाटकातील करवीर अंकित संस्थानच्या **वसुलाबाबत** छत्रपती संभाजी यांचे शेषो नारायणास पत्र.

पत्र क्र ३४ – कागलचे राणोजी घाटगे सर्जेराव हे शेषो नारायण याना बरेच देणे लागत होते. त्याची फेड करणे अशक्य झाल्याने त्यांनी शेषो नारायण यांस मौजे म्हाकवे हा गाव **इनाम** दिल्याचे हे पत्र आहे. अशा स्वरुपाचे हे एक आगळेच पत्र आहे.

पत्र क्र ४० - मौजे भिरडी हा गाव शेषो नारायण यांस इनाम दिला आहे म्हणून भरमापा सिद्राम जाधवराव देसाई नाडगौडा व व्यंकाजी कोनेर देशपांडे प्रांत रायबाग यांचे मोकदम मौजे भिरडी यांस पत्र.

पुढील तक्ता क्र ३०मध्ये विविध संदर्भग्रंथांमध्ये शिवकालीन महसूल प्रशासनातील पत्रव्यवहार किंवा आज्ञा यात वापरण्यात आलेल्या संज्ञा स्पष्ट करण्यात आल्या आहेत.या संज्ञा इनाम, वतन यासंबंधीत असलेल्या दिसतात. त्याचे विविध ग्रंथानुसार वर्गीकरणही केले आहे.

**तक्ता क्र. ३०. शिवकालीन महसूल प्रशासनातील पत्रव्यवहार/आज्ञा यात वापरलेल्या संज्ञा –**

| शब्द | पत्र क्रमांक |
|---|---|
| इनाम (चौथाई २५० होन) | २३४८ |
| इनाम (नख्त रुके ६, तेल) | २३६६ |
| इनाम (३०० टक्के) व इतर बाबी हक्क (६०० टक्के) इनामपट्टी माफ | २४१७ |
| इनाम (गावगन्ना) १ लारी | २४३८ |
| इनाम (१ लारी) खारीज व जकाती महसूल | २४४५ |
| इनाम | २४५६, २४५७, २५४८, २५०४, २५५३, २५१७, २५२०, २५३०, २५५७, २५४०, २५५६, २६५९, २४८५, २४८८, २७११. |
| इनाम (नक्त महसूल) | २५६९ |
| इनाम (धर्मादाय) नख्त खर्चपट्टी (पट्टया माफ) | २४९२, २५४५ |
| धर्मादाय इनाम (गरीब गुराबा) (इनामापैकी मोईन पगार .।. लारी) | २५५५ |
| १ लारी मुकासाई पैकी .।. लारी मोईन | २५१८ |
| प्रतिपालक (इनाम) | २५१९ |
| मठ- खैज्ञतीसाठी (सरंजाम) | २५२९ |
| इनाम (१० पट्टया माफ) | २५३२ |
| इनाम (नख्त गला व कडबा दुभाळे) | २५३३ |
| इनाम (देवीचा सेवक) | २५५४ |
| इनामाची व्यवस्था | २४५५ |
| इनाम (कुलबाब कुलकानू) | २४५७ |
| नोकरी माफकरुन इनाम ५ परगणे बक्षीस | २७२३ |
| मुधाळे, शिरुल, मलली, सोरगाव, मन्तूर, झुंजरमोप, मुगलखोड बुदनी हक्कांसह इनाम | २७७५ |
| स्वराज्य व मोगलाई दुतर्फा - इनाम | २४ (जिजा. का. का.) |
| इनाम (रुईजात) | २९ (जिजा. का. का.) ४० |
| कर्ज फेडण्यासाठी इनाम गाव | ३४ (जिजा. का. का.) |
| नख्त महसूल | २५०० |
| जकातीतील १/२ लारी नख्त महसूल १/२ लारी | २५०३ |
| वसूलाच्या आधारे साहाय्य | २५२४ |

| | |
|---|---|
| इस्तावा माफ (महसुलात धर्मादाय) | २५४४ |
| मोकदम (वरात होन जमा करुन पाठविणे.) | २६०३ |
| इनामती, खंडणी, पेशजी, गडकरी | २६५० |
| जोशीपणाचे अधिकार | २३४९ |
| देशमुखीची चाकरी | २४२६, २६४७, २७१५ |
| कुलकर्ण (मिरास) | २४८५, २४७८, २५६३, २४७८, २४७९ |
| जोशकी व कुलकर्ण (इनाम व हकलवाजिमे) | २४८१ |
| कौल व मोकासा, मोकदमी | २३५८ |
| मक्ता माफ करणे (निम्मी माफी निम्मी वसूल) | २४२३ |
| मोकासा | २४४० |
| मोकासा | २४४१ |
| मोकदम (टके जमा करणे) | २४४४ |
| वसूल - वर्षाचा नजराणी (मिरासी अर्धा हिस्सा बादशाही खजिन्यात अर्धा हिस्सा व्यवस्थेच्या खात्यात) | २४५० |
| जिझिया | २३६७ |
| १ दस्ती (दररोज १ लारी) महसूल व जरीबे, जकाती हर एक दस्त | २४३५ |
| जकाती (१ उभा मार्ग, थलभरीत, थलमोड) | २४३६ |
| महसूल, जकाती इतर पट्‌टया | २५०२ |
| महसूल व जकातीच्या आधारे (इनाम) | २५२६ |
| सात हजारी मनसब व जागीर | २३६८ |
| कदीम चावर — ज्याजती मऱ्हामती चावर बिघे २० जिराती, १९ महसूल रोख रक्कम | २४०८ |
| हक्कदारांचे हक्क शिल्लेक - वतन | २७२४ |
| हक्क, इनाखती, खणवार, उत्पन्नापैकी १८, ३० टके, ८ गावे खरेदी केली. ४।। होनु वाटून घेणे | २४२३ |
| तेजी पट्‌टी (सध्या व भविष्यातील पट्‌टयांसह) | २५१२ |
| १ लारी पट्‌टी देणे | २५१६ |
| १ चावर जमीन पट्‌टयांसह | २५२७ |
| वतन | २४६३ |
| चाकरी, प्रधानकी मान, मुलूख, जागीर | २४६५,२७५८ |

**छत्रपती शिवाजी महाराज पत्रे –**

| शब्द | पत्र क्रमांक |
|---|---|
| मुकादमी | ४ |
| मोकासा | ७ |
| इनाम (गावगन्ना) | ८,९, १२, १४, १६, १७, १८, २३, २४, २५, ३१ |
| महसूल, वेठबिगारी, बेलकट्टी, जंगमपट्टी, पायपोसी, मेजवानी, मोहिमपट्टी, खर्चपट्टी, फसेली, सादिलवार, हकल वाजिम, देसाई, शेटे व बाजे इतर कुलबाब, कुलकानू | १० |
| दुमाले | १९ |
| तेजीपट्टी | ११ |
| इनाम- महाल जकाती, | १३, २२ |
| कुळकर्ण व जोतीसपण | १५ |
| गायरान (सर्व पट्टयांसह) | २१ |
| इनाम (कृपाबक्षीस) | २६, २७ |
| धर्मादाय इनाम | २८, ३२ |
| नख्तयाती, महसूल, सैलबैल, पायपोसी, खर्चपट्टी, उंटपट्टी, वेठबिगारी, इ. वाटून घेणे. राजभाग सध्या – पुढेही देणे. | ३० |
| महसूल, सैलबैल, सरदेशमुख पट्टी, मोईनी, सादिलवार व पाडेवारी, हकदार, खर्चपट्टी, पायपोसी, बाबे जमा, भेटी, तेजीपट्टी, माहिमपट्टी व बेलेकटि, जंगीपट्टी, तूप व कडबा, खरीफ, वेठी व रबी बिगारी, फर्मासी - सर्व पट्टया जमा - इनाम. (धर्मादाय, कृपा बक्षिस) | ३२, ३७, ३९, ४१ |

**ऐतिहासिक फारसी पत्रे –**

| शब्द | पत्र क्रमांक |
|---|---|
| जागीर आणि मनसबीचा तनखा किल्ल्याची पेशकश | ८४ |
| चौथ वसूल | ११२, १५०, २७२, ४७९, ३२६ |
| जास्तीत जास्त वसूल करुन दाखवेन (नाही तर वसूल जहांगिरीतून देईल) | २३१ |
| शहर लूटले (१ हत्ती, १२ घोडे, ४०,००० रु. इ. नेले.) | ११८ |
| पेशकश (१८ लाख रु., १६ हत्ती, १ जडजवाहिर पेटी) बादशाही खजिन्यात | ३१९ |
| शत्रूने रोख पैसे जिन्नस सर्व लुटले | ३५३ |
| जिझिया पट्‌टी | १८३ |
| रोजमरा (६० होन) | २३५ |
| शत्रूच्या फौजा किल्ल्यात घूसू दिल्या नाहीत. त्यांचा पराभव केला म्हणून ५०० जात व १०० स्वार वाढ दिली. | २६९ |
| वाढ स्थगित केली (किल्ल्याव्यतिरिक्त प्रदेशाचे रक्षण केले नाही म्हणून.) | २७१ |
| रसद सुप्यास पोहचविली | ५४८ |

**औंध संस्थान –**

| शब्द | पत्र क्रमांक |
|---|---|
| कुलबाव, कुलकानू, हल्लपट्‌टी, पेस्तरपट्‌टी, स्वराज्य व मोगलाई इनाम | १, १४ |
| सरदेशमुखी खेरीज | १५ |
| तिजाई इनाम | १७, ७, १६ (माफ) |
| पंचोत्रा (शेकडा ५ टके) कर | २ |
| देवस्थानाच्या खर्चासाठी जमीन | ३, १३ (सादिलवार) |
| इनाम - सरंजाम (लष्करी कामासाठी लावून दिलेला मुलूख) | ४, ८ |
| इनाम | ५, ६, ११, १८ |
| सर महाजनकी | ९ |
| वतन – कीर्द | १० |
| टीप (जनावरांवरील कर) | १२ |

**जिजाबाईकालीन कागदपत्रे –**

| शब्द | पत्र क्रमांक |
|---|---|
| पाटील अबदागिरी इनाम | २५२ |
| पाटीलकी वतन (५०० चा वसूल) | २४७ |
| मोकासाबाबेचा ऐवज | १३७ |
| महाजनकीचे वतन कानू काईदे | १५५ |
| वसूल | २४७ |
| जकात व धर्मादाय | २५१, १२८ (१ रुपया धर्मादाय वतन) |
| शिबंदी १६ हजार रु. व १२ हजार रु. तनखा | २५० |
| जोरा करुन वसूली | २६४ |
| देशमुखी जप्त | १६७ |
| दिवाणीतून २ रु. रोजगार | १८१ |
| कुलकर्णी – जमीन | १९६ |
| कुलकर्णीची जमीन पारसनिवीस यास | २७३ |
| देशमुखी व सरदेशमुखी – वतन व इनाम | २४५ |
| जमीनीची सनद | ७ |
| सनद | १५ |
| ५ बिघे जमीन व बेटाचा निम्मा भाग (राजमंडळाचे आज्ञापत्र) | १९३ |
| इनाम | २४४,२४६,३१४,१६,२९,८१,८९, ९७,९८,१७४, १५०, २१४, २६८ |
| इनाम (दुमालेपत्र) | २८० |
| इनाम (तिजाई माफ) | २८२ |
| इनाम - स्वराज्य व मोगलाई एकूण दूतर्फा देखील, इनाम तिजाई, कुलबाब, कुलकानू हालीपट्टी व पेस्तरपट्टी जल तरु पाषाण निधिनिक्षेपादि करुन खेरीज हकदार व इनामदार करुन दरोबस्त इनाम करार. | २३, २४ |

**तक्ता क्र. ३१. शिवकालीन महसूल प्रशासनातील पत्रव्यवहारात वापरलेल्या संज्ञा व संज्ञाची संख्या -**

| संज्ञा | पत्र संख्या | संज्ञा | पत्र संख्या |
|---|---|---|---|
| इनाम २४ प्रकारे | ८१ | वेठबिगारी | ०३ |
| चौथ/चौथाई | ०६ | जंगमपट्टी | ०७ |
| मोकासा | ०५ | पायपोसी | ०६ |
| वतन | ०५ | खर्चपट्टी | ०५ |
| वसूल | ०५ | सादिलवार | ०८ |
| जकात | ११ | मिरासी | ०१ |
| जोशीपणाचे अधिकार | ०१ | तनखा शिबंदी | ०२ |
| कुलकर्ण | ०९ | किल्ल्याची पेशकश | ०२ |
| देशमुखी | ०५ | हकलवाजिमे | ०७ |
| मुकादमी/मोकदमी | ०४ | सनद | ०२ |
| सरदेशमुखी | ०२ | इस्तावा माफ | ०१ |
| महसूल | १० | मनसब व जागीर | ०२ |
| गावगन्ना | ०२ | हल्लीपट्टी, पेस्तरपट्टी | ०९ |
| धर्मादाय | १० | तेजीपट्टी | ०६ |
| तिजाई | ०४ | स्वराज्य व मोंगलाई एकूण दुतर्फा | ०४ |
| पंचोत्रा | ०१ | इनामपट्टी | ०१ |
| टीप | ०१ | सरंजाम | ०२ |
| जिझिया | ०२ | बेलकटी | ०३ |
| कुलकाब | ०८ | कुलकानू | ०८ |

वरील तक्त्यामध्ये शिवकालात वापरण्यात आलेल्या इनामा संबंधीच्या विविध संज्ञा अनेक पत्रांमध्ये वापरण्यात आलेल्या दिसतात. काही निवडक पत्रांमध्ये या संज्ञाचा खूप मोठया प्रमाणात वापर झालेला दिसतो. उदा. इनाम ही संज्ञा सर्वात जास्त म्हणजे ८१ पत्रांमध्ये आलेली आढळते. तसेच कराच्या प्रकारांपैकी काही कर उदा. टीप, मिरासपट्टी, बेलकटी या संज्ञांचाही यात संदर्भ सापडतो.

## करीमबेग मुलाणा यांना बादशहाने दिलेली इनाम जमीन व त्या संबंधातील वारसा हक्काच्या कैफियती व नोंदी- महसूल प्रशासकीय एक नमूना

करीमबेग मुलाणा यांना मौजे अवसरी बु।। तालुका पाबळ जिल्हा पुणे येथील ३ एकर १९ गुंठे जमीन आलमगीर बादशहाने गावच्या मशीदीच्या व्यवस्थापनासाठी इनाम दिलेले दिसते. वहिवाटदार करीमबेग वल्द पीरबेग मुलाणा यांचा मुलगा जानु वल्द करीमबेग मुलाणा यांनी कैफियत दिली असली तरी प्रत्यक्षात हे इनाम त्यांच्या घराण्याकडे १६० वर्षापूर्वी देण्यात आलेले दिसते. इ.स. १८५३ मध्ये या घराण्यातील ११ वी पीढी हयात होती त्यापैकी जानुबेग मुलाणा याने ही कैफियत सादर केलेली दिसते.

इनाम म्हणून देण्यात आलेली जमीन बागाईत असल्याने मुलाणी यांनी ती कुळाकडे अर्ध्या हिश्श्याने कसण्यासाठी दिलेली दिसते. या दस्ताऐवजामध्ये या जमीनीचे वहिवाटदार जानुबेग मुलाणा आणि त्यांचे इतर भाऊबंद यांनी या जमीनीवरील आपले हक्क दर्शविलेले दिसतात. इ.स. १८५३ पासून १८५८ पर्यंतच्या काळातील वहिवाटदारांनी हक्क दर्शविण्यासाठी दिलेल्या कैफियती आणि त्यासंबंधीत महालकरी, कारकून, इनाम कमिशनर यांच्या नोंदी या दस्ताऐवजामध्ये आढळतात. या दस्ताऐवजामध्ये सनद दिलेली तारीख २७ नोव्हेंबर १८६१ अशी दिसते.

मुलाणा या घराण्यातील ११ व्या वारसदाराने इंग्रजांचे राज्य सुरु झाल्यानंतर याची रितसर नोंद करुन घेतली असावी. १८६१ मध्ये लागू करण्यात आल्यानंतर अश्या प्रकारच्या सनदांचे ब्रिटिशांनी सर्व्हेक्षण केले असावे. त्यामुळे ब्रिटिश काळातील या नोंदी असलेल्या दिसतात. यात रु. ४ आणे ६ पै ७ इतकी रक्कम सरकारकडे जमा करावी अशी नोंद असलेली दिसते. पण गावातील महसूल नोंदवही मध्ये “पै” ला वगळण्यात आले आहे आणि त्यामुळे ती रक्कम रु.४ आणे ८ अशी करण्यात आली असल्याचे दिसते.

मध्युयुगीन काळातील ग्रामव्यवस्थेमध्ये मुलाणा यांचा अंतर्भाव असे. यासंबंधी डॉ.अ.रा. कुलकर्णीनी यांच्या “मध्ययुगीन महाराष्ट्र” या पुस्तकात “ग्राम प्रशासनात एका मुसलमानाचा बलुतेदार वतनदार म्हणून केला गेलेला समावेश” असा उल्लेख आढळतो. मध्ययुगीन काळात मुलाणा यांना आलमगीर बादशहाने हे इनाम दिलेले दिसते. पण तत्कालीन ग्रामीण समाजात मुसलमान कुटुंबांनासुध्दा घरे, जमीनी मंजूर केल्या जात असत. त्यासंबंधीचे इनाम तत्कालीन राज्यकर्ते त्यांना देत असल्याचे या दस्तऐवजावरुन स्पष्ट होते.

**तक्ता क्र. ३२. मौजे अवसरी बु ।। आंबेगाव जिल्हा पुणे येथील करीमबेग मुलाणा यांना बादशहाने दिलेल्या इनाम दस्ताऐवजाचे वर्गीकरण**

| पत्रकर्ता | दिनांक | पत्रामधील विषय | पत्र - प्रती |
|---|---|---|---|
| जानुबेग वल्द पीरबेग | ३० डिसेंबर १८५३ | मशीदीचे इनाम जमीनीबद्दल कैफियत | अव्वल कारकून (बलवंतराव नारायण महालकरी गावगन्ना) |
| मुराभाई मुलाणी | ९ जुलै १८५६ | जानुबेग मुलाणीकडे इनाम जमीन आहे पण तो मुंबईला गेल्याने वहिवाट मुराभाईकडे मिळावी | त्र्यंबक गोविंद (महालकरी ) |
| करीतबेग मुलाणी | ८ ऑगस्ट १८५६ | सदरबेग हा अकराव्या पिढीचा आहे करीमबेग हा त्याचा वंशज आहे. मलाण व रहीतबेग नकल आहे. | त्र्यंबक गोविंद (महालकरी ) |
| हरिकृष्ण हुजूर कारकून | ७ जून १८५५ | वंशावळ दुरुस्त करणे बाबत | इनाम कमिशनर साहेब |
| महालकरी | ९जून १८५५ | वंशावळ दुरुस्त करणे बाबत | नारायण हुजूर कारकून |
| त्र्यंबक गोविंद | १९जून १८५६ | जानुबेग मुलाणी गावी नसल्याचा पाटीलांला दाखला देणे | कारकून |
| हरिकृष्ण हुजूर कारकून | २०जून १८५६ | कैफियती बरोबर असल्या १ अवसरीला पाठवणेबाबत | नारायण हुजूर कारकून |
| नारायण हुजूर | ३०जून १८५५ | वहिवाटदार हजर नसल्यास सदर घरच्या दुसऱ्यास हक्क दयावे | महालकरी |
| महालकरी | ८ ऑगस्ट १८५५ | वहिवाटदार हजर झाल्याने त्यावी सही घेऊन त्याला शेरा दिला आहे. | मुलकी अधिकारी |

* या संदर्भातील मुळ कागदपत्रांच्या नक्कल प्रती परिशिष्ट ३ मध्ये जोडलेल्या आहेत.

**तक्ता क्र. ३३. औरंगजेबाच्या दरबारातील कार्यालयीन कामकाजासंदर्भातील अहवाल आणि नोंदी.**

| पत्र क्र. | दिनांक | पत्रामधील विषय |
|---|---|---|
| ४७ | जु.१० जिल्काद २ (श. १५८९ वैशाख शुध्द ३) इ. स. १६६७ एपिल १६ | मुसलमानांस जकात माफ व हिंदूंपासून जकात घ्यावी |
| २३१ | सिता.जु.२४ रज्जब २७ (श. १६०३ श्रावण वद्य १४) इ. स. १६८१ ऑगस्ट २ | दख्खनमधील रामगडची फौजदारी दिवाणी, अमीनी नेमून दिली तर ५ वर्षात जास्तीत जास्त वसूल करुन दाखवेन असा मुहम्मद शरीफचा विनंती अर्ज |
| ३२० | जु.२६ शब्बाल २ (श.१६०३ आश्विन शुध्द ४) इ. स. १६८२ सप्टेंबर २४ | शुकवार व ईद मुळे सेवक कचेरीत आले नाहीत. त्यांचे ५ दिवस कमी करावेत असा हुकूम |
| ३२६ | जु.२६ शब्बाल ८ (श.१६०४ आश्विन शुध्द ९) इ. स. १६८२ सप्टेंबर ३० | कान्होजीस बहादूरखानाच्या फौजेत नेमले |

**तक्ता क्र. ३४.औरंगजेबाच्या दरबारातील मंदिरे पाडण्याचा हूकूम देणाऱ्या नोंदी :**

| पत्र क्र. | दिनांक | पत्रामधील विषय |
|---|---|---|
| ३१ | सितामऊ जु ९ रखर २४(श.१५८८ आश्विन वद्य १० )इ. स. १६६६ ऑक्टोंबर १३ | देवळातील दगडी कठडा काढून टाकला. |
| २४७ | सिता जु २५ रमजान १८(श.१६२४ आश्विन वद्य ४) इ. स. १६८१ सप्टेंबर २१ | देवळे पाडून टाकावी |
| २५२ | सिता जु २५ शब्बाल १० (श.१६०३ आश्विन शुध्द ११) इ. स. १६८१ ऑक्टोंबर १३ | बंद दाराची देवळे पाडून नमाजासाठी मशीदी करणे |
| ३०६ | जु २६ रमजान २० (श.१६०४ भादपद वद्य ७)इ. स. १६८२ सप्टेंबर १३ | बनारस येथील रुफीउलअमीनने लिहिलेले- बिंदू महादेवाचे देऊळ पाडुन मशीद उभारणे |

**तक्ता क्र. ३५.औरंगजेबाच्या दरबारातील धर्मांतरासंबंधीत अहवाल आणि नोंदी :**

| पत्र क्र. | दिनांक | पत्रामधील विषय |
|---|---|---|
| ४१ | जु १० रमजान ५ (श.१५८८ भादपद शुध्द ६) इ. स.१६६७ फेबुवारी १९ | सात लोकांना सरोपा दिले. |
| ५५ | जु १० जिल्हेज १ (श.१५८९ जेष्ठ शुध्द २) इ. स. १६६७ मे १५ | १.परगणे बदायून मधील एक बाम्हणी काजीकडे जावून मुसलमानी झाली.<br>२.शिकदार याने काजीबददल अयोग्य शब्द काढले म्हणून त्याला पकडून ठार करण्याच्या भीतीने मुसलमान केले. |
| ५७ | जु १० जिल्हेज ३(श.१५८९ जेष्ठ शुध्द ४) इ. स.१६६७ मे १७ | विजयसिंग व तिमराज मुसलमान झाले त्यांना पोशाख दिले. |
| ५८ | जु १० जिल्हेज १२ (श.१५८९ जेष्ठ शुध्द १४) इ. स.१६६७ मे २६ | दूरगंज येथील वकील रुस्तम गंगाराम हा मुसलमान झाला त्याला पोशाख दिला. |
| ६१ | जु १० जिल्हेज १ (श.१५८९ जेष्ठ वद्य ५) इ. स. १६६७ जून १ | परगणे ठाणेसर येथील दोन बाम्हणांनी तकार केल्याने बादशहाने हूकूम दिला की पाण्याचे तळे फोडून टाकणे म्हणजे हिंदू लोक गोळा होणार नाहीत |
| २४७ | सिता जु २५ रमजान १८ (श.१६०३ अश्विन वद्य ४) इ.स.१६८१ सप्टेंबर २१ | बेलदारांचा दारुगा जवाहरचंद यास हुकूम झाला की, वाटेत लागणारी देवळे पाडून टाकावी. |
| २५१ | सिता जु २५ रमजान २३ (श. १६०३ अश्विन वद्य १०) इ. स.१६८१ सप्टेंबर२६ | नरबरखानाच्या जमेतीपैकी सहाशे कैदी रणथंबोर येथून आणलेल्यापैकी मुसलमांनाना सोडावे व हिंदू मुसलमान होत असल्यास सोडावे. अन्यथा कैदेत ठेवावे |

औरंगजेबाच्या दरबारचे अखबार या ऐतिहासिक फार्सी साहित्य संग्रहातून औरंगजेबाच्या दरबारातील कामकाजाचे, प्रशासनाचे स्वरुप स्पष्ट होते. दरबारामध्ये बादशहा हजर असेल तरी किंवा काही कारणांनी गैरहजर असेल तरी दररोज हे अखबार लिहिले जात असत. तसेच त्या दिवशीच्या कामासंबंधीच्या नोंदी यात केलेल्या आढळतात. यातून तत्कालीन प्रशासन व्यवस्थेला कामामध्ये सुसुत्रता राखण्यास निश्चितच मदत होत असावी.

या अखबारांपैकी काही अखबार, नोंदीमध्ये मंदिर पाडून मशीद बांधण्याचा हूकूम देणाऱ्या तर काही धर्मांतराशी संबंधीत असणाऱ्या दिसतात. या अखबार किंवा नोंदीवरुन औरंगजेबाचे प्रशासन इस्लाम धर्मावर आधारीत होते असे दिसते. आणि त्याप्रमाणेच दरबाराचे कामकाज चालत असलेले दिसते.

औरंगजेबाच्या दरबारातील ६०० पत्रांपैकी काही पत्रांचाच यात संदर्भ घेतला आहे. या पत्रांपैकी काही पत्रे वजा नोंदी या धर्मांतरासंबंधी कार्यालयीन कामकाजासंबंधी असलेल्या दिसतात. या नोंदीमध्येही इस्माल धर्माला अत्यंत महत्व दिलेले दिसते. औरंगजेबाचे धोरण जमेल त्या मार्गाने इस्लाम धर्मप्रसाराचे असलेले दिसते. इतिहास संशोधक श्री. विजय देशमुख यांनी 'शककर्ते शिवराय' या ग्रंथात स्वराज्याची अर्थव्यवस्था आणि लोकप्रशासन या संदर्भात पुढीलप्रमाणे निरीक्षण केले आहे "मोगल किंवा आदिलशाहा यांचे धोरण जमेल त्या न्यायान्याय्य मार्गाने इस्लामी धर्मप्रसाराचे तर शिवाजी महाराजांचे धोरण प्रत्येकाचे नैसर्गिक धर्म-स्वातंत्र्य कायम राखून या सर्वधर्मीय प्रजेचा सहृदयतेने प्रतिपाळ करण्याचे होते."

**संदर्भ ग्रंथांची नावे-**


१. छत्रपती शिवाजी महाराजांची पत्रे : प्र.न. देशपांडे, सुषमा प्रकाशन, धुळे, पहिली आवृत्ती, १९८३,

२. जिजाबाईकालीन कागदपत्रे : संपा. डॉ. अप्पासाहेब पवार, शिवाजी विद्यापीठ, ऐतिहासीक ग्रंथमाला,पुष्प पांचवे १९७८,

३. शिवकालीन पत्र सार संग्रह: खंड ३ : संपा. शंकर नारायण जोशी, प्रकाशक भा.इ.सं. मंडळ, पुणे इ.स. १९३७,

४. ऐतिहासिक फार्सी साहित्य सहावा खंड(औरंगजेबाच्या दरबाराचे अखबार) : संपा. प्रा. ग.ह. खरे, सहसंपादक गो. त्र्यं. कुळकर्णी, भारत इतिहास संशाधक (एकूण ६०० पत्र)/ मंडळ स्वीय ग्रंथमाला क्र. १०६. इ.स. १९७३.

५. सातारच्या प्रतिनिधी घराण्याचा इतिहास :ग्रंथांक १, २, ३ रा अनंत नारायण भागवत व रा वामन परशुराम मेंहेदळे, औंध स्टेट प्रेस, औंध.


-------♦ ♦ ♦ ♦-------

# प्रकरण ८

## सारांश व निष्कर्ष

व्यक्ति विकासासाठी, संरक्षणासाठी राज्याचे अस्तित्व आवश्यक असते. राज्य निर्माण होण्यासाठी आवश्यक असणाऱ्या घटकांमध्ये भूप्रदेश, लोकसंख्या, सार्वभौमत्व आणि शासनसंस्था यांचा समावेश होतो. यातील शासनसंस्था या घटकाचे महत्व अनन्यसाधारण आहे. शासनसंस्थेमुळेच राज्यातील विविध संस्थांचे (Institutions) व्यवस्थापन होते. राज्याची सर्व कार्ये सुरळीतपणे चालविणे सुकर होते. पण शासनसंस्था अस्तित्वात येण्यासाठी, चालविण्यासाठी आणि टिकविण्यासाठी पैसा किंवा उत्पन्नाचे स्त्रोत निर्माण करणे आवश्यक असते. म्हणजेच राज्य चालविण्यासाठी राज्याला उत्पन्न मिळविणे गरजेचे असते. त्यामुळे प्राचीन काळापासून किंबहुना राज्यसंस्थेच्या प्रारंभापासूनच महसूल प्रशासनाचीही निर्मिती झालेली दिसते. करांच्या माध्यमातून जास्तीत जास्त उत्पन्न मिळविणे आणि त्यातून राज्यशकट चालविण्याचे प्रयत्न आजवर निर्माण झालेल्या सर्व राज्यव्यवस्थांनी केलेले दिसतात. त्यासाठी प्राचीन काळापासून विद्यमान काळापर्यंत सर्व राज्यकर्त्यांनी लोकांवर अनेक छोटे-मोठे कर लादून उत्पन्न मिळविलेले दिसते आणि या उत्पन्नामधूनच राज्य चालविणे म्हणजेच लोकांच्या किंवा प्रजेच्या हिताचा विचार करणे, त्या दृष्टीने आवश्यक अशी धोरण-निश्चिती करणे, लोककल्याण साधणे याला महत्व दिले जाते. म्हणजेच कर या साधनाचा वापर करुन महसूल व्यवस्थेच्या साहाय्याने राज्य चालविण्याला सातत्याने महत्व दिलेले दिसते.

प्रस्तूत संशोधनात या विषयाचा अभ्यास करण्यासाठी ऐतिहासिक कागदपत्रे, दस्तऐवज यांचा आधार घेतलेला आहे. तसेच नागाव, वरसई(कोकण प्रांतातील) आणि औध (सातारा संस्थान) या ३ गावांच्या महसूल व्यवस्थांचा सूक्ष्म अभ्यास केला आहे. अनेक ऐतिहासिक कागदपत्रांमधून राज्याच्या अस्तित्वासाठी महसूल व्यवस्था अत्यावश्यक असल्याचे आणि त्यासाठी कर या साधनाचा आधार घेतला गेल्याचे दिसून येते. प्राचीन काळापासून विद्यमान काळातील महसूल व्यवस्था आणि कर पध्दती यांचा या प्रबंधामध्ये ऐतिहासिक आढावा घेतला आहे.या सर्व कालावधींमधील महसूल व्यवस्थेचे सर्वेक्षण यात

केले आहे. “महसूल व्यवस्था ही सर्व काळांमध्ये कायम, सातत्याने, संलग्न राहिलेली आढळते.”

राज्याचे अस्तित्व कायम राखणे, राज्य चालविणे यासाठी महसूल प्रशासन आवश्यक असते. कर आणि कर वसूली, इनाम आणि इनामदारी, प्रशासकीय यंत्रणा या महसूल प्रशासनाच्या साधनांचा वापर करुन राज्य अनेक हेतू साध्य करीत असते. राज्याचा मुख्य हेतू लोकांचे संरक्षण करणे हा असतो. लोकांचे किंवा प्रजेचे शत्रूपासून, लूटमारीपासून संरक्षण करण्यासाठी राज्य आपली लष्करी व्यवस्था निर्माण करते. ही लष्करी व्यवस्था शस्त्रांस्त्रांच्या आणि सैन्य, घोडदळ इतर अन्य साधनसामग्रीने परिपूर्ण बनविण्यासाठी राज्य करांच्या माध्यमातून मिळणाऱ्या उत्पन्नाचा विनियोग करते. लष्करी व्यवस्थेच्या साहाय्याने शत्रू पक्षाला परतवून लावणे, आक्रमणे, स्वाऱ्या, लूट यावर मात करणे राज्याला शक्य होते. लष्कर किंवा सैन्य शक्तीच्या जोरावर किंवा सामर्थ्यांवर राज्य आपला दरारा निर्माण करते. त्यामुळे आपोआपच राज्याचे बाहय शक्तीपासून संरक्षण होते आणि राज्यांतर्गत दहशत वाढते. लष्करी सामर्थ्यामुळेच प्रजेवर राज्याचा वचक निर्माण होतो आणि प्रजा राजाज्ञेचे पालन करते. त्याबरोबर प्रशासकीय व्यवस्थेमधील सेवकांमध्येही राजनिष्ठा, स्वामीनिष्ठा भाव वाढीस लागतो. त्यामागेही राज्याची दहशत कारणीभूत ठरत असते.

राज्यातील लष्करी सामर्थ्य वाढविणे, लोकांचे कल्याण साधणे, लोकांना मदत करणे या सर्व कार्यांसाठी राज्याला महसूलाची उत्पन्नाची, प्राप्तीची गरज असते. यासाठीच राज्याकडून सातत्याने उत्पन्न वाढीचे प्रयत्न केले जातात. म्हणूनच प्राचीन काळापासून प्रजेकडून अनेक मार्गांनी राज्याने कर लावून उत्पन्न मिळविलेले दिसते. या करांच्या वसूलीसाठी प्रशासकीय यंत्रणेचीही नियुक्ती केली गेलेली दिसते. प्रशासकीय यंत्रणा जशी कर वसुलीसाठी आवश्यक ठरते तशीच राज्याचे अनेक कार्ये करण्यासाठी त्यांची भूमिका महत्वाची ठरते. अगदी राजेशाही शासनव्यवस्थेत राजाज्ञा लोकांपर्यत किंवा प्रजेपर्यंत पोहचविण्यासाठी दवंडी पिटवणे, राज्यकर्त्यांची फर्माने वाचून दाखविणे यापासून ते लोककल्याणकारी कार्ये करण्यापर्यंत सर्व प्रकारची कार्ये प्रशासकीय वर्गाकडूनच केली जातात. त्यामुळे महसूल प्रशासनाचे साधन म्हणून त्याचे महत्व अनन्यसाधारण आहे

महसूल प्रशासनाचे साधन म्हणून वापरण्यात आलेले आणखीन एक साधन म्हणजे इनाम आणि इनामदारी. यांच्या साहाय्याने राज्यकर्त्यांनी लोकांचे कल्याण साधण्याचा प्रयत्न सर्व काळात केलेला दिसतो. अनेक गरजू, गरीब लोकांना इनाम देवून त्यांचा विकास

साधणे, त्यांचा चरितार्थ चालविणे यामध्ये तत्कालीन राज्यकर्त्यांच्या मनाचा कनवाळूपणा तर दिसतोच पण त्याबरोबरच "राज्याचा विकास " हा हेतूही दिसतो. व्यक्तिहितामधून राज्यहित साधण्याचा प्रयत्न आजवर अनेक राज्यकर्त्यांनी केलेला दिसतो. विद्यमान काळातही या दृष्टिकोनाला महत्व दिलेले दिसते.

**प्रबंध सारांश-**

**प्रकरण २** मध्ये **राज्य आणि महसूल व्यवस्था** यात करपध्दतीचे महत्व मांडले आहे. प्राचीन काळापासून असे दिसून येते की ज्या काळापासून राज्यसंस्था निर्माण झाली. त्या काळापासूनच राज्याची महसूल व्यवस्था निर्माण होत गेली. लोकांनी राज्य चालविण्यासाठी आपल्या उत्पन्नातील काही भाग स्वेच्छेने दिला आणि त्यातून राज्यसंस्था चालविण्यास सुरुवात झाली पण जसजसे राज्याचे कार्य वाढत गेले तसतसे राज्याला स्वेच्छेने मिळणारा उत्पन्नाचा भाग अपुरा पडू लागला. म्हणून मग राज्याने सक्तीने लोकांकडून उत्पन्नाचा काही भाग वसूल करण्यास सुरुवात केली. यातूनच हळूहळू आर्थिक प्रशासनाची निर्मिती होत गेली. शासनसंस्थेला, राज्याला विविध स्वरुपाची कार्ये पार पाडण्यासाठी पैशाची व्यवस्था करावी लागते. हा पैसा उपलब्ध करुन देण्याचे कार्य मुख्यत्वे महसूल किंवा कर व्यवस्था करत असते. त्यामुळे महसूल व्यवस्था हा राज्याचा आत्मा आहे असे म्हणता येईल.

कौटिल्याचे मत असे होते की, "राज्याची सर्व कार्ये वित्तावर अवलंबून असतात." त्यामुळे त्या काळातही कौटिल्याने राज्याला अनेक उत्पन्नाचे मार्ग सुचविले होते तसेच कर व्यवस्था विस्तारीत बनविली होती. अनेक छोटया आणि मोठया व्यवसायांवर, सेवांवर त्यांनी कर लावलेला दिसतो. समाजातील प्रत्येकाने राज्याकडे कोणत्या ना कोणत्या स्वरुपात कर द्यावा याला प्राचीन काळी महत्व देण्यात आलेले दिसते. तसेच चौल-नागावमध्ये ही प्रत्येक व्यक्तीच्या घरासमोर असणारे माड (नारळाचे झाड) याचे नारळ, सुपारीच्या सुपाऱ्या, नारळाचे झाप या स्वरुपात आंग्रे सरकारने कर जमा केल्याचे दिसते. शिवकाळात आणि पेशवेकाळातही समाजातील जवळजवळ सर्व व्यवसायांवर कमी-अधिक प्रमाणात कर लादलेले दिसतात. म्हणजेच राज्याची व्यवस्था चालविण्यासाठी पैसा, सेवा या स्वरुपात कर जमा करुन राज्यव्यवस्था वृध्दींगत करण्याचे प्रयत्न झालेले दिसतात. आधुनिक भारतीय महसूल प्रशासनात स्वतंत्र अशा महसूल विभागाची निर्मिती करण्यात आली आहे

प्राचीन काळी देखील काही अंशी अशा प्रकारच्या महसूल व्यवस्था अस्तित्वात असल्याचे दिसतात. मौर्यकाळात असा स्वतंत्र विभाग असलेला दिसतो तसेच मोगल

काळात, शिवकाळातही यासाठी स्वतंत्र यंत्रणा निर्माण केलेली दिसते. महसूल म्हणजे व्यक्तिगत स्तरावर निर्माण झालेल्या संपत्तीचा काही भाग देणे सरकारला बंधनकारक असणे. कर हे सरकारच्या उत्पन्नाचे प्रमुख साधन आहे. राज्यामध्ये राहणारा प्रत्येक जण खेडयात राहणारा असो किंवा शहरात राहणारा असो आणि त्याची इच्छा असेल अगर नसेल पण त्याला राज्याकडे कर जमा करावाच लागतो. कल्याणकारी राज्यात सरकारला अनेक गोष्टीसाठी खर्च करावा लागतो. सरकारच्या या खर्चाचा वाटा लोकांनी उचलला पाहिजे. व्यक्तीच्या कर देण्याच्या क्षमतेनुसार कर आकारणी करावी असे तत्व करदेयक्षमता तत्वात सांगितले आहे. ज्या व्यक्तीचा खर्च जास्त आहे त्या व्यक्तीची कर भरण्याची कुवत जास्त आहे असे समजले जाते आणि जास्त कर आकारला जातो. व्यक्ती जो खर्च करते त्यावरून व्यक्तीची कर भरण्याची कुवत ठरविता येते. ज्या व्यक्तीने कर भरावा अशी सरकारची अपेक्षा असते अशा व्यक्तीं कडून वसूल केला जाणारा कर म्हणजे प्रत्यक्ष कर होय. ज्या कर पध्दतीत कराघात एका व्यक्तीवर आणि करभार दुसऱ्या व्यक्तीवर पडतो त्यास अप्रत्यक्ष कर असे म्हणतात. उदा. करमणूक कर, वस्तूवरील कर ही अप्रत्यक्ष कराची उदाहरणे होत.

वैदिक काळ ते मौर्य पूर्व काळात राज्यव्यवस्थेच्या प्रारंभिक काळापासून लोक स्वेच्छेने राजाला संपत्तीचा काही भाग देत असत. आर्यकाळातही राज्यकारभाराचा खर्च भागविण्यासाठी धान्याच्या स्वरूपात व्यावसायिकांकडून आणि प्रजेकडून कर घेतला जात असे. जसजसे राज्यव्यवस्थेचे महत्व समाजात वाढत गेले तसतसे मग जनतेकडून अनिवार्य स्वरूपात वेगवेगळया सेवांच्या बदल्यात कर वसूल करण्याची व्यवस्था रूजली. प्रजेच्या खाजगी उत्पन्नातून कर स्वरूपात ठराविक वाटा घेण्याचा हक्क राजाला आहे ही भावना भारतात पूर्वापार चालत आली आहे. वैदिक काळापूर्वीही राज्याचे प्रशासन आणि महसूल ठरविणे, तो वसूल करणाऱ्या अधिकारी वर्गांची व्यवस्था असणे हे इतर सर्व बाबींपेक्षा महत्त्वाचे ठरत होते. भारतीय धर्मग्रंथ व नीतीविषयक ग्रंथामध्ये कराची संकल्पना स्पष्ट केल्याचे आढळते. राजाकडून लोकांचे संरक्षण केले जात असल्यामुळे राजाला कर लावण्याचा हक्क देण्यात आला होता. मनूस्मृतित कराचे प्रमाण भूमिच्या उत्कर्षाप्रमाणे निरनिराळे स्पष्ट केले आहे. प्रजेने राजाला धान्याचा सहावा भाग, आठवा भाग किंवा बारावा भाग द्यावा असे सांगितले आहे.रामायणात प्रजेकडून भागाच्या स्वरूपात १/४ कराचा उल्लेख आढळतो.रामायण काळातही राजा प्रजेकडून कर घेत असे आणि त्यातूनच आपला राज्य कारभार पाहीला जात असे हे स्पष्ट होते. कराचे प्रमाण १/४ किंवा १/६ असल्याचे आढळते.

महाभारतामध्ये कराच्या प्रमाणात विभिन्नता आहे. स्वतःची शेती कसणाऱ्या शेतकऱ्यांना भूमिकर १/६ (षड्भाग) द्यावा लागत असे. राजाने शेतातील उत्पन्नाचा १/६ अंश कर म्हणून घेऊन शत्रुपासून त्याचे संरक्षण करावे. कौटिल्याने कर महसूल पध्दतीचा बारकाईने अभ्यास करून अशी विस्तारीत कर पध्दती निर्माण केली होती. गुप्त काळातही आयकर हे मुख्य राजस्वाचे साधन होत. करांची संख्या १८ होती. यातील भूमि कर हा मुख्य कर होता. भूमीचे मोजमाप नियमित होत असे. सुलतानशाहीने सुन्नी न्यायपध्दतीवर आधारलेली अर्थव्यवस्था स्विकारली होती. त्यानुसार धार्मिक आणि निधर्मी अशा दोन प्रकारच्या कर प्रणालीतून शासनास महसूल प्राप्त होत असे. धल्लाबक्षी किंवा बटाई पध्दतीनुसार जमिनीतून आलेल्या उत्पन्नाचा चौथा भाग शेतसारा म्हणून वसूल केला जात असे. म्हणजे शेतकऱ्याने चौथाई सारा पैशाच्या रूपात द्यावा किंवा धान्याच्या रूपात द्यावा. विजयनगरच्या साम्राज्यात शेतकऱ्यांकडे असणाऱ्या जमीनीच्या एकूण उत्पन्नाच्या १/३ भाग महसूल ठरविण्यात येत असे. ठरविण्यात आलेला महसूल किंवा शेतसारा रोख रक्कम अथवा धान्याच्या रूपात जमा केला जात असे.

प्राचीन कालखंडापासून भारतीय प्रशासनात राजकीय व्यवस्थेचे अस्तित्व आढळते.राजकीय व्यवस्था संपूर्ण समाजाकरीता काही गोष्टी बंधनकारक ठरवू शकते व अधिकृत निर्णय घेऊ शकते.म्हणून राजकीय व्यवस्थेचे महत्व विचारात घेतले आहे. मानवाच्या प्रत्येक मागणीची पूर्तता करणे राजकीय व्यवस्थेला अशक्य असते. त्यामुळे कार्यक्षमतेच्या दृष्टीने राजकीय व्यवस्था विचार करते.

एकूणच राजकीय व्यवस्था जनतेसाठी कार्य करणारी व्यवस्था असते. त्यामुळे प्रत्येक कालखंडातील राजकीय व्यवस्थेची कार्ये निरनिराळी असलेली दिसतात प्रशासनाची कार्ये करणाऱ्या विभागांमधून खाते (Department) बनते. कोणत्याही स्वरुपाच्या कार्याच्या यशस्वीतेसाठी श्रमविभागणीच्या तत्वाचा वापर करुन कार्याचे विभाग पाडावे लागतात. शासनाची कार्ये पार पाडण्यासाठी विविध स्वरुपाचे विभाग आवश्यक असतात.म्हणूनच विभाग, खाते यांचाही विचार करण्यात आला आहे. धोरण आखणीची प्रक्रिया प्रशासनातील सतत चालणारी प्रक्रिया आहे. प्रशासनाच्या दृष्टिकोनामधून धोरण-प्रक्रिया (Policy Process) महत्वाची असते,

आधुनिक काळात लोकप्रशासन समाजाचा एक अविभाज्य घटक झाला आहे. राज्याने लोककल्याणाची जबाबदारी स्विकारल्याने लोकप्रशासन महत्वपूर्ण बनले

आहे.त्यासाठी लोकप्रशासनाचाही या प्रकरणात समावेश करण्यात आला आहे. लोकप्रशासनाच्या मदतीशिवाय कोणतेही कार्य करणे अशक्य आहे. लोकप्रशासनाचा संबंध मानवाच्या विकासाच्या विविध अंगाशी आहे. लोककल्याणाची संकल्पना स्वीकारल्यामुळे मानवाच्या स्वास्थ्याची, शिक्षणाची, खेळाची, करमणूकीची, संरक्षणाची जबाबदारी राज्यावर येऊन पडली आहे. वित्तीय प्रशासनाचा अभ्यास समाविष्ठ असलेले अर्थशास्त्र याचाही लोकप्रशासनाशी संबंध असतो.

**प्रकरण ३** मध्ये **मोगलकालीन महसूल व्यवस्थेची** माहिती विशद केली आहे. यामध्ये भारतातील मोगलपूर्व आणि मोगलकालीन महसूल व्यवस्थांचा परामर्श घेण्यात आला आहे. भारतातील मोगलपूर्व म्हणजेच सुलतानशाहीमधील महसूल व्यवस्था आणि मोगलकालीन महसूल व्यवस्था यांच्यामध्ये वैविध्य असलेले दिसते. परंतु या दोन्ही काळातील महसूल व्यवस्थांमध्ये एक सारखेपणाही आढळतो म्हणजे या काळातील महसूल व्यवस्थांमध्ये मुस्लिम धर्मीयांसाठी आणि अन्य धर्मियांसाठी वेगवेगळी कर पध्दती निर्माण केलेली दिसते.

सुलतानशाहीत जमिनीचे विविध प्रकारात वर्गीकरण केलेले दिसते. प्रत्येक जमिनीच्या प्रकारानुसार त्यावर महसूल लावण्यात आलेला दिसतो. तसेच सुलतानशाहीमधील सुलतानांनी प्रांतिक प्रशासन व्यवस्था निर्माण करण्याबरोबरच स्वतंत्र महसूल व्यवस्था निर्माण केलेली दिसते.

जमिनीच्या सुपिकतेवर जमिनीची चार भागात विभागणी केलेली दिसते. उत्तम जमीन, थोडया काळासाठी पडीक, ३ ते ४ वर्ष पडीक, ५ वर्षांपेक्षा जास्त काळ पडीक असलेली जमीन अशा पध्दतीने उत्तम, मध्यम, कनिष्ठ असे वर्गीकरण करण्यात आलेले दिसते. प्रतिबिघा उत्पन्न निश्चित करण्यात आलेले दिसते. जमिनीतून निघणाऱ्या एकंदर उत्पन्नाच्या आधारे प्रत्येक बिघ्यातून निघणारे सरासरी उत्पन्न निश्चित करण्यात येत असे. त्यानंतर महसूल ठरविण्यात येत असे.

मोगलकालीन प्रशासनामध्ये विविध स्तरांची रचना करुन महसूल वसूली केलेली दिसते. वसुली अधिकाऱ्यांना राज्यकर्त्यांनी रोख म्हणजेच पैशाच्या स्वरुपात किंवा धान्य रुपात महसूलाची वसुली करण्याच्या सूचना दिलेल्या दिसतात. तसेच राज्यकर्त्यांचा असा सतत प्रयत्न दिसतो की, आपल्या साम्राज्यातील जास्तीत जास्त जमीन लागवडीखाली आणली जावी, त्यासाठी प्रशासकीय अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांवर जबरदस्ती करावी पण जास्तीत जास्त क्षेत्र लागवडीखाली आणण्यासाठी प्रयत्न केलेले दिसतात.

मोगलकाळात जमीन महसूलाचे प्रमाण सारखेच असलेले दिसत नाही. परंतु प्रमाण वेगवेगळे असले तरी महसूल हा या काळातील अत्यंत महत्वपूर्ण आर्थिक स्त्रोत होता, जो राज्याला, सरकारला मोठया प्रमाणात उत्पन्न मिळवून देणारा होता. २ १/२, १/३, २/५, १/५, ५ टक्के अश्या वेगवेगळया प्रमाणात मोगल राज्यकर्त्यांनी लोकांकडून महसूल वसूल केलेला दिसतो. तसेच ब-याच राज्यकर्त्यांनी १० वर्षांच्या कालावधीसाठी एकदाच जमिन महसूलाचे दर ठरवून दिलेले दिसतात.

जमिन महसूलाबरोबरच मोगल राज्यकर्त्यांनी इतर काही धार्मिक कर लावलेले दिसतात. या राज्यकर्त्यांनी कर लावताना त्यात मुस्लिम व अन्य धर्मिय प्रजा असा भेदभाव केलेला दिसते. जमीन महसूलाची ठेका पध्दत करार, पट्टा मोगलकालीन राज्यकर्त्यांनी सुरु केलेली दिसते. जमिनीची प्रत व स्थान यावरुन ३ किंवा त्यापेक्षा जास्त वर्षांच्या एकूण सरासरीवरुन महसूल ठरविण्यात येत असे.

मक्ता किंवा करार, पट्टा या पध्दतीमुळे बऱ्याच ठिकाणी वतनदारी पध्दत रुढ झालेली दिसते. मुस्लिम राज्यकर्त्यांनी आपल्या साम्राज्यातील सरदार, अंमलदारांना खूष ठेवण्यासाठी जहांगिरी देण्याची पध्दत सुरु केली होती. या पध्दतीत सरंजामदार हाच त्या प्रांतातील राजा बनत गेला आणि त्याने प्रजेचे, जनतेचे प्रचंड हाल केलेले दिसतात.

शेरशहा, अकबरकालातील तोडरमल, मलिक अंबर अशा राज्यकर्त्यांनी महसूल व्यवस्थेत आवश्यकतेप्रमाणे बदल केलेले दिसतात आणि मलिक अंबर, तोडरमल यांसारख्या प्रमुखांच्या महसूल पध्दतींचा स्विकार पुढच्या काळातील राज्यकर्त्यांनी केलेला दिसतो. या राज्यकर्त्यांनी शेतक-यांच्या अडीअडचणींकडे पूर्ण लक्ष दिले. शेतकऱ्यांशी दुर्व्यवहार करणाऱ्याला दंड केला जात असे. काही राज्यकर्त्यांनी सरकार आणि रयत किंवा प्रजा यांच्यात प्रत्यक्ष संबंध प्रस्थापित केले त्यामुळे शेतकऱ्यांची पिळवणूक कमी होण्यास मदत झाली. तोरडमलसारख्या अकबराच्या दिवाणाने अत्यंत प्रगत अशी महसूल व्यवस्था बनविली. शेती योग्य जमिनींची बांबूच्या मदतीने किंवा गज, यार्ड यासारख्या मोजमापाने मोजणी करुन बिघा हे माप एकक ठरविले आणि त्यानुसार १० वर्षांच्या सरासरी उत्पन्नाप्रमाणे १/३ जमीन महसूल आकारलेला दिसतो. एकंदरीत महसूल व्यवस्थेचा विचार करता यामध्ये सारखेपणा असलेला दिसत नाही.

**प्रकरण ४** मध्ये **शिवकालीन महसूल व्यवस्थेची** सविस्तर चर्चा करण्यात आली आहे.

शिवाजी महाराजांनी मुस्लिम राजवटीत अस्तित्वात असणारे महसूल व्यवस्थेतील दोष दूर करण्याचा प्रयत्न केला. प्रजेला जर शांतता व सुव्यवस्थेचे वातावरण मिळाले तर स्वराज्य उभारणीत प्रजेची मदत होईल याची शिवाजी महाराजांना जाणीव होती. म्हणूनच लष्करी आणि मालकी या दोन्ही व्यवस्थांना महत्व दिले. राज्य विस्तार, संरक्षण यासाठी लष्करी यंत्रणा आणि स्वराज्यात सुव्यवस्थेबरोबरच, आर्थिक सुस्थिती निर्माण करण्यासाठी शिवाजी महाराजांनी प्रयत्न केले. तत्कालीन ग्राम व्यवस्था स्वयंपूर्ण होती. पण देशमुख आणि देशपांडे या महसूल नेमलेल्या अधिका-यांनी हे हक्क आपल्या वारसांना दिले आणि सरंजामशाही निर्माण झाली होती. ही व्यवस्था शिवाजी महाराजांनी मोडून काढली. देशमुख आणि देशपांडे यांच्याकडील वंशपरंपरागत अधिकार काढून घेतले आणि त्यांना फक्त महसूल जमा करण्याचे अधिकार दिले. त्यातून त्यांचा रयतेशी असलेला प्रत्यक्ष संबंध तोडल्याने रयतेवरील जुलूम कमी झाले असावेत. मुस्लिम राजवटीत या देशमुख देशपांडेनाच सर्व अधिकार मिळत असत. ते स्वराज्यात शिवाजी महाराजांनी आपल्या हातात घेतले म्हणजे स्वराज्यात राजाचे नियंत्रण प्रस्थापित झाल्याने प्रजा समाधानी असल्याचे दिसते.

मुलकी म्हणजेच महसूल व्यवस्थेची स्वराज्यात पुर्नरचना करण्यात आलेली दिसते. स्वराज्याचे ३ भाग करुन त्यावर प्रत्येकी एक सरकारकून किंवा सरसुभेदार नेमलेले दिसतात. त्या ३ भागांमधील मूलकी व्यवस्थेची जबाबदारी ३ सरसुभेदाराकडे दिलेली दिसते. या तिन्ही विभागांमध्ये सुभा, परगणा, महाल, तर्फ अशी विभागणी केली होती. शिवकालात जमिनीचा मोजणी करण्यासाठी शिवाशाही काठी वापरली जात असे. जमिनीची मोजणी म्हणजे बिघावणी करुन महसूल आकारला जात असे. एकंदर उत्पन्नाचे ३ हिस्से स्वतःकडे ठेऊन दोन हिस्से सरकारकडे द्यावेत अशी महसूलाची रचना केली जात असे. ३ वर्षे पिकांची पहाणी करुन महसूलाची निश्चित केली जात असे. शेतक-यांच्या स्थितीप्रमाणे अर्धा किंवा पाव हिस्सा पैशात किंवा सवलतीच्या दराने असा घेतला जात असे.

जमिनीच्या प्रकारानुसार धान्याच्या स्वरुपातही सारा आकारला जात असे. जमिन महसूलाची आकारणी करताना कोणत्याही एकाच ताठर पध्दतीचा वापर केलेला दिसत नाही. जमिन महसूलशिवाय शिवाजी महाराजांनी अनेक छोटया-मोठया बाबींवर कर लावले होते. इनामपटटी, देशमुखपटटी असे कर देशमुख, पाटील, कुलकर्णी यांच्याकडून वसूल

केले जात असत. तसेच सराफपट्टी, धनगरपट्टी मागटका, तेलपट्टी, पायपोसी अशा प्रकारचे व्यवसाय कर व्यावसायिकांकडून वसूल केले जात, कारागिर, व्यापारी यांच्याकडूनही कर वसूल केला जात असे. तसेच स्वराज्यात उत्पन्नाचा आणखीन एक मार्ग अस्तिवात असलेला दिसतो. तो म्हणजे चौथाई आणि सरदेशमुखी होय. चौथाई आणि सरदेशमुखी ही युध्दातील लुटीपेक्षा पूर्णपणे वेगळी होती. चौथाई म्हणजे बलवान किंवा शक्तीशाली राजांनी दुबळयांकडून वसूल केलेली खंडणी होय. या बदल्यात त्या राज्यातील लोकांचे संरक्षण केले जात असे. चौथाईमुळे दुबळया राजांचे अधिकार काढून न घेता त्यांच्याकडून कराच्या रुपात वसूली करुन सुव्यवस्था स्थापन करण्यासाठी मदत केली जात असे. चौथाई प्रमाणेच सरदेशमुखी हा ही एक हक्क शिवकाळात दिसतो. देशमुखांचा वरिष्ठ सरदेशमुख असला तरी त्यांच्या कामात वेगळेपण नव्हते. विशिष्ठ ठिकाणाचा जमीन महसूल गोळा करुन सरकारकडे जमा करणे, चोरांना शिक्षा देणे अशी कामे सरदेशमुखांसही करावी लागत. याबद्दल त्याला सरकारी साऱ्यापैकी दहा टक्के उत्पन्न मिळत असे. शिवाजी महाराजांनी सरदेशमुखी हक्क मिळवला तेव्हा हे उत्पन्न त्यांच्या खासगी उत्पन्नात जमा होत असे. त्यांनी स्वराज्य आणि मोगल साम्राज्य दोन्ही कडून हा हक्क मिळविला.

शिवकाळातील महसूल व्यवस्थेत काही वैशिष्टये आढळतात. ती म्हणजे मुलकी कारभाराला महत्व, विभागवार सारा वसूली, लवचिक सारा आकारणी पध्दत, रयतवारी पध्दत, तगाई, सूट देण्याची पध्दत, महसूल वसूली अधिकाऱ्यांची नेमणूक, अधिकाऱ्यांच्या बदली तत्वाचा वापर, धर्मादाय वतने, महालवार रचना, राजा हाच प्रमुख राज्यसंस्थेचा आधार अशी होय.

**प्रकरण ५** मध्ये **पेशवेकाळातील महसूल व्यवस्थेचा** परामर्श घेण्यात आला आहे. मराठेशाही मधील एक महसूल व्यवस्था म्हणून पेशव्यांच्या व्यवस्थेकडे पाहिल्यास यात निश्चितच वेगळेपणा आढळतो. शिवाजी महाराजांच्या प्रशासन व्यवस्थेत राजाचे असणारे सर्वश्रेष्ठ स्थान पेशवेकाळात पेशव्यांनी मिळविलेले दिसते. त्यामुळे पेशवेकालीन प्रशासन व्यवस्थेत राजा, पेशवा, सचिव यासारखे मंत्रीमंडळ बनविलेले दिसते. पेशवेकाळात यातील पेशवा हा राजापेक्षाही महत्वपूर्ण ठरला. पेशव्यांच्या महसूल पध्दतीचे मुख सूत्र म्हणजे करदात्यांची भरभराट व्हावी हे होते.

शेतजमिनीचा कस पाहून आणि लागवडीखालील जमिनीची पाहणी करुन मगच सारा वसूली ठरविण्यात यावी अशी पेशव्यांची महसूल अधिकाऱ्यांना ताकीद असे. महसूल

रोख रकमेच्या स्वरुपात किंवा धान्याच्या स्वरुपातही घेतला जात असे. पिकाप्रमाणेही महसूल आकारला जात असे आणि जमिनीच्या प्रतिप्रमाणेही महसूल आकारणी केली जात असे. सर्व गोष्टीवर जमीन महसूल लावला जात असे. उदा. नारळ, सुपारी, फणस इ. शिवकाळात राजाकडेच सर्व उत्पन्न जमा केले जात असे पण पेशवेकाळात पेशवे व इतर सरदार यांचे महत्व वाढल्याने एकंदर उत्पन्नापैकी ३४ टक्के उत्पन्न राजाकडे आणि ६६ टक्के उत्पन्न पेशवे आणि सरदारांमध्ये वाटून जात असे. यातून सहोत्रा, मोकासा यासारखे महसूल वसूलीचे अधिकार निर्माण केलेले दिसतात.

जमीन लागवडीखाली आणण्याचे स्वतंत्र धोरण पेशव्यांनी आखले होते. त्याप्रमाणे शेतक-यांना जमिन कसण्यात उत्साह वाटावा अशी परिस्थिती निर्माण करण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. त्याप्रमाणे पडीक जमिनीबददल विशेष प्रयत्न करण्यासाठी विशेष धोरण आखलेले दिसते. याप्रमाणे डोंगर फोडून किंवा समुद्रकिना-याची जमीन लागवडीखाली आणणाऱ्या व्यक्तीस अर्धी किंवा १/४ जमीन इनाम देऊन सारा आकारणीतही सूट दिलेली दिसते. जमीन महसूल हा रयतेच्या सोयीनुसार वस्तू आणि रोख रुपात घेतला जात असे.

दुष्काळ, लुटमार यासारख्या प्रसंगांचा लोकांना त्रास होउु नये यासाठी देखील पेशव्यांनी साऱ्यात सूट देण्याचे धोरण स्विकारलेले दिसते. तगाई सरकारी कर्ज देऊन शेतकऱ्यांना शेती करण्यासाठी या काळात मदत केलेली दिसते. पेशवेकाळात जमीन महसूलाशिवाय जंगले, टांकसाळ, जकात, अबकारी कर, मोहतर्फा, नव्या पेठा वसविणे, दळणवळण याबरोबरच धूकपट्टी, तगपट्टी, इनामपट्टी, मिरासपट्टी, घरपट्टी, बात छापणी, लगीनटका, म्हैसपट्टी, बकरा पट्टी असे अनेक कर आकारण्यात आलेले दिसतात.

पेशवेकाळातील महसूल व्यवस्थेचे लवचिक पध्दतीने सारा आकारणी करणे, सा-यात आवश्यकतेप्रमाणे सूट देणे, शेतीतील सुधारणांकडे विशेष लक्ष देण्याची जबाबदारी महसूल अधिका-यांकडे सोपविणे, उत्पन्नाच्या सम प्रमाणात कर आकारणी करणे, उत्पन्नाचे अनेक नवीन मार्ग निर्माण करणे, जमिन दान देण्याबाबत तसेच इनामाबाबत धोरण आखणी करणे अशी अनेक वैशिष्टये आढळतात.

**प्रकरण ६** मध्ये **ब्रिटीशकाळातील जमीन महसूल पध्दती**ची चर्चा करण्यात आली आहे. आणि **स्वातंत्र्योत्तर काळातील** (१९५० पर्यंत)महसूल व्यवस्थेतील बदलांचा परामर्श घेण्यात आला आहे. इ.स. १७६५ मध्ये ब्रिटीशांना दिवाणी अधिकार मिळाले. त्यांना

भारतातील शेतकरी हा छोटा शेतकरी असल्याचे आढळले. तसेच तो उत्पन्नातील निश्चित केलेला भाग कर म्हणून देत असल्याचेही दिसले. केंद्रीय सरकार कमकुवत झाले असले तरी प्रांतीय अधिकाऱ्यांनी कर जमा करण्याचे अधिकार स्वतःकडे घेतले होते. ब्रिटीशांनी भारतात दिवाणी अधिकार मिळविले तेंव्हा जमीनदार हे महसूल गोळा करण्याचे काम करीत असत. या जमिनदारांनाच ब्रिटीश सुपरवायझर केले. यांना तालुकादार असे म्हणत. इ.स.१७९३ मध्ये हेस्टिंग्जने सा-याबद्दल पहिला ठराव केला. रयतेकडून जमीनदारांना आलेल्या रकमेतील ८ ते ९ दशांश रक्कम सरकारला देण्यात यावी असा ठराव इ.स.१७९३ पर्यंत अस्तित्वात राहिला. हेस्टिंग्जने अंमलात आणलेल्या ठेकेदारी पध्दतीमुळे ठेकेदारांकडे पूर्वीच्या जमीनदार किंवा मालगुजारांकडे महसूल गोळा करण्याचे अधिकार दिले. या अधिकारांचा गैरवापर करुन महसूल गोळा करणारे ठेकेदार शेतकऱ्यांची आर्थिक पिळवणूक करीत असत आणि महसूल भरला नाही तर त्यांच्या जमिनी काढून घेतल्या जात असत.

वॉरन हेस्टिंग्जने ५ वर्षीय बोली लावायची म्हणजे लिलाव किंवा ठेक्याची पध्दत सुरु केली. एखाद्या भागातून सर्वात जास्त कर देण्याचे कबूल करणाऱ्यांकडे ते क्षेत्र ५ वर्षांसाठी सोपवायचे. जास्तीत जास्त बोली लावून ठेकेदार आपलाच अधिकार राखण्याचे प्रयत्न करीत असत आणि पैसे वसूल करण्यासाठी शेतकऱ्यांवर अत्याचार करीत असत. शेतकरी पिक चांगले न आल्याने आणि महसूल जास्त भरावा लागत असल्याने निर्धन बनत गेला. बोली लावण्याच्या प्रमाणात पैसे न मिळाल्याने ठेकेदार आणि कंपनी यांनाही फायदा होत नव्हता त्यामुळे या पध्दतीमधील दोष काढण्याचे प्रयत्न कॉर्नवालिसने सुरु केलेले दिसतात. याने कायमधारा पध्दत सुरु केली. या पध्दतीने जमिनदारांना शेतकऱ्यांकडून ठरवून दिलेला शेतसारा वसूल करण्याचे अधिकार दिले. जमीनदारांना शेतजमिनीचे मालक बनविले. त्यामुळे जमिनदार कंपनी सरकारने ठरवून दिलेल्या शेतसारा सरकारकडे देवुन राहिलेले उत्पन्न स्वतः घेऊ लागले. त्यामुळे शेतकऱ्यांचा जमिनीवरील मालकी हक्क नष्ट झाला. या पध्दतीत शेतसारा ११ टक्के ते १२ टक्के ठरवून देण्यात आला होता. जमिनदाराने महसूलाची रक्कम दिली नाही तर जमिनीचे लिलाव करुन जमीन विकून कंपनी सरकार पैसे मिळवित असे. यामुळे कंपनीला जास्त महसूल मिळू लागला. शेतकरी आणि जमिनदार यांच्यात आणखी एक दिवाण नेमला गेला. दिवाण जमिनदारांना महसूल वसूल करुन देते असत. जोपर्यंत ही ठराविक रक्कम जमिनदार नीटपणे देतील तोपर्यंत त्यांचा जमिनदारीचा अधिकार कायम होता. कमी उत्पन्नाशी किंवा शेतकऱ्यांकडून महसूल वसूल न होण्याचा

जमीनदारांशी संबंध नव्हता. ते सर्व दिवाण पाहात असे. यात ब्रिटीशांचा फायदाच होत असे. कंपनीच्या वर्चस्वाखालील प्रदेश वाढत असल्याने ही पध्दत भारतात बंगाल, बिहार, ओरिसा बरोबर मद्रास, बनारसपर्यंत वापरली जाऊ लागली.

कायमधारा पध्दतीतही काही दोष होते. यातील मुख्य दोष म्हणजे शेतकऱ्यांचा यात विचार केला जात नसे म्हणूनच रयतेचा विचार करणारी रयतवारी पध्दत सुरु केली गेली. जमीन कसणाऱ्याला रयत म्हणत. त्याला जमीन विकण्याचा अधिकार दिला गेला. या पध्दतीत रयत सरकारकडे शेतसारा भरु लागली. यात ४५ ते ५५ टक्के शेतसारा सरकाराला द्यावा लागत असे. २० ते ३० वर्षांसाठी जमिन महसूल ठरविण्यात आला. नैसर्गिक आपत्तीच्या काळातही शेतकऱ्यांना सारा द्यावा लागत असल्याने याचे शेतकऱ्यांवर विपरित परिणाम झाले. रयतवारी पध्दतीतही सरकारने मुळात महसूल खूपच जास्त ठरविला होता त्यामुळे शेतकऱ्यांची परिस्थिती सुधारली नाही. त्याशिवाय खेडे किंवा महाल याचा शेतसारा गावप्रमुख, नंबरदार किंवा गावकरी मिळवून ठरविण्याची एक पध्दत म्हणजे महालवारी ही सुरु करण्यात आली. कंपनीने ठरवून दिलेल्या शेतसारा वसूल करणारा अधिकारी म्हणजे नंबदार होय.

या पध्दतीत सारा देण्याची वैयक्तीक व सामूहिक जबाबदारी गावातील सर्वांवर होती. सरकारने भूमिकराची वसुली संपूर्ण महाल एक मानून केली होती. गावाच्या एकूण महसूलाचा अंदाज घेऊन महसूल निश्चित केला गेला आणि गावातील मुखिया, पाटील, ग्रामप्रमुखाची ती जबाबदारी मानली गेली. यामध्ये ३० वर्षांसाठी कर निश्चिती करण्यात आली. या पध्दतीमध्ये महसूल ठरविण्याचे अधिकार कलेक्टर व तहसीलदार यांना देण्यात आले. मध्य प्रांतातील महसूल व्यवस्था म्हणजे मालगुजारी. मालगुजारांकडे महसूल वसुलीचे सर्व अधिकार दिलेले होते त्यामुळे मालगुजारच तेथील मुखिया बनले.

याशिवाय आधीपासून अस्तित्वात असलेली खोती पध्दत कोकण प्रांतात पेशवेकाळापासून अस्तित्वात होती. ब्रिटीशांनी खोतांना अधिकार दिल्याने खोत गावाचे सुभेदार बनले. गावचा सारा देण्यास खोत जबाबदार असत.

अशा पध्दतीने ब्रिटीशांनी निर्माण केलेल्या महसूल व्यवस्थेमध्ये जमिनदार, दिवाण, पाटील, मुखिया यांच्या सहाय्याने जमीन महसूल मिळविला. त्यांनाच जमिनीचे मालक बनविल्यामुळे त्यांनी सामान्य जनतेला वेठीस धरुन महसूल जमा केला व तो सरकारला

दिला. पैशाच्याच स्वरुपात सारा देण्याची सक्ती केल्याने शेतकऱ्यांसमोर आर्थिक अडचणी उभ्या राहिल्या. त्यामुळे शेती व्यवस्थेतील स्थैर्य नष्ट होत गेले.

**स्वातंत्र्योत्तर काळात** खरंतर १९५० पर्यंतची महसूल पध्दती ही ब्रिटिशकालीन महसूल पध्दतीच होती. भारत सरकारच्या संघीय वित्त व्यवस्थेमध्ये **Govt. of India Act, 1935** नुसार संस्थानांच्या वित्तिय परिस्थितीमध्ये सुधारणा घडवून आणण्यात आली. या कायद्याने केंद्र आणि राज्यांच्या महसूल साधनांची सीमा निश्चित करण्यात आली. या कायद्याने कर विभाजन (केंद्र व राज्य) पद्धत सुरु करण्यात आली. स्वातंत्र्योत्तर भारतात त्रिस्तरीय संघीय कर रचना स्विकारण्यात आलेली आहे. (केंद्र, राज्य, स्थानिक)

करांचे वर्गीकरण करण्यात आले आहे. प्रत्यक्ष कर म्हणजे उत्पादनावरील कर. त्याचे प्रकार प्राप्ती कर, संपत्ती कर, भांडवल आणि मिळकतीवरील इतर कर, खर्च कर, व्यवसाय कर असे आहेत यांचे सविस्तर विवेचन यात आहे. खर्चावरील कर म्हणजे अप्रत्यक्ष कर. यात आयात-निर्यात कर, केंद्रीय उत्पादन शुल्क कर, सेवा कर, विक्री कर यांचा समावेश होतो ते स्पष्ट करण्यात आले आहे

सध्या राज्याच्या खात्यातील महसूल पुढील प्रमुख चार मार्गांपासून मिळतो.

१) राज्याचा स्वतःचा कर महसूल.

२) राज्याला मिळणारा केंद्रीय करातील हिस्सा.

३) राज्याचा कराव्यतिरिक्त महसूल.

४) केंद्रशासनाकडून मिळणारी साहाय्यक अनुदाने.

या मार्गांचे सविस्तर विवेचन करण्यात आले आहे.

तसेच महाराष्ट्रातील महसूल खात्याच्या प्रशासनाचे स्वरुप, महाराष्ट्रातील जमीन महसुलाची पद्धत आणि नगरपरिषदांच्या महसूल विषयक तरतूदी याविषयीचे थोडक्यात विवेचन करण्यात आले आहे.

**प्रकरण ७** मध्ये **सुक्ष्म अभ्यास**करीता निवडलेल्या औंध, नागाव, वरसई या ३ गावांच्या महसूल व्यवस्थांचा अभ्यास करण्यात आला आहे.

**१. औंध-** औंध हे पंतप्रतिनिधींचे संस्थान होते. पंतप्रतिनिधींना या संस्थानाचे अधिकार छत्रपती राजाराम महाराज व शाहू महाराज यांनी दिलेले होते. साताऱ्याचे पंतप्रतिनिधी यांची सुरुवातीस कराड ही राजधानी होती. पण काही कालावधीनंतर ती औंधला नेण्यात आली.

औंध संस्थानाच्या सभोवतीस असणाऱ्या गावांमध्ये अनेक इनामदार असलेले दिसतात. कारण ही गावे काही इनामदारांकडे इनाम दिलेली दिसतात.

**कर रचना**:-

इनामदारी व्यवस्था अस्तित्वात असल्याने या संस्थानामध्ये इनामपट्‌टी घेतली जात असल्याचा उल्लेख आढळतो. हा कर इनामदार किंवा अधिकारी वर्ग यांच्याकडून घेतला जात असे. औंधमधील पंतप्रतिनिधींनी इनाम दिलेल्या जमीनीवरील सर्व वसूल मुकादमांनी गोळा करावा आणि ज्या इनामदारांना तो ज्या प्रमाणात दिलेला आहे त्या प्रमाणात वाटून द्यावा अशी व्यवस्था केलेली दिसते.

इनामदारांना ज्या जमीनी इनाम दिलेल्या असत त्या जमीनीवरील सर्व सारा इनामदार वसूल करीत असत. पण त्या एकंदर साऱ्यापैकी १/३ कर इनाम तिजाई म्हणून सरकारकडे जमा केले जात असत. म्हणजेच इनाम दिलेल्या जमीनीतील साऱ्याचा काही भाग सरकार वसूल करीत असे. इनाम तिजाई प्रमाणे चौथाई ही वसूल केली जात असे. इनामदारांना ज्या जमीनी इनाम दिलेल्या असत त्या जमीनीवरील साऱ्यापैकी १/४ भाग इनाम चौथाई म्हणून पंतप्रतिनिधी वसूल करीत असत, कधी कधी तो १/४ भाग देखील इनामदारांना दिलेला दिसतो. एखादी नवीन बाजारपेठ निर्माण करण्याची जबाबदारी पार पाडणाऱ्याला सरकारकडून शेटेपणाचे वतन मिळत असे. शेटे महाजनांना सरकारी तिजोरीतून कसलेही वेतन न देता त्यांच्याकडून महत्वाची सेवा करुन घेता येत असे. दुकानदार आणि व्यापारी यांचेकडूनच शेटेमहाजनांना प्राप्ती मिळत असे.

गावामध्ये असणाऱ्या सरकारी कुरणांवर जनावरे चारल्याबद्दल गावकऱ्यांना कर भरावा लागत असे. त्याला वनचराई कर म्हटले जात असे. यापासून सरकारला मिळणारे उत्पन्न अनियमित असे होते. पण याचा उल्लेख औंध संस्थानात आढळतो. बकरा पट्‌टी ही पट्‌टी गावामध्ये असणाऱ्या प्रत्येक मेंढीवर लावली जात असे. ज्याच्याकडे जेवढया मेंढया असत तेवढया मेंढयाचा कर त्याला भरावा लागत असे.

**कर वसूल करणारे अधिकारी -**

पंतप्रतिनिधीच्या म्हणजेच छत्रपतींच्यावतीने या सर्व संस्थानातील करासंबंधी काम काही अधिकाऱ्यांमार्फत केले जात असलेले दिसते. या संस्थानात महसूल जमा करणारे इनामदार अनेक असलेले दिसतात. तसेच पाटील, देशमुख, देशपांडे, मुकादम या सर्वांकडून महसूल, सारा जमा करण्याचे काम केले जात असे. म्हणूनच या संस्थानातील ज्या गावांचे

इनामपत्र केले गेले ते देशमुख, देशपांडे, शेटे महाजन, मोकादम-पाटील यापैकी संबंधित अधिकाऱ्याकडे पाठविले गेलेले दिसते.

**करविषयक धोरण -** औंध संस्थानामध्ये पंतप्रतिनिधींनी अनेक लोकांना इनामेही पूर्वपरंपरेने दिलेली दिसतात. काही पत्रात इनामे आदिलशाहीपासून चालू असल्याचे उल्लेखही सापडतात. या सर्व इनामांना पंतप्रतिनिधींनी कायम केले होते.

औंध संस्थानामध्ये पंतप्रतिनिधीनी इनाम देताना अनेक बाबींचा विचार केलेला दिसतो. एखादा किल्ला शत्रूपासून सोडविणे किंवा त्याचे रक्षण करणे, शत्रूचे आक्रमण परतून लावणे, छत्रपतींच्या प्रदेशाचे रक्षण करणे अशा अनेक स्वरुपाच्या कामगिरीमध्ये या परिसरातील अनेक शूर लोकांचा सहभाग होता. अशा प्रकारे सरकारी सेवेमध्ये कार्य करणाऱ्या लढवय्यांना देखिल त्यांच्या चरितार्थासाठी इनाम दिलेले दिसते. तसेच पंतप्रतिनिधींनी अनेक ब्राम्हणांना वेगवेगळया कारणांस्तव इनामाच्या स्वरुपात मदत दिलेली दिसते. पंतप्रतिनिधिंनी जाणिवपूर्वक आपल्या संस्थानाच्या परिसरात ब्राम्हणांना, वेदशास्त्राला उत्तेजन देण्याचे प्रयत्न केलेले दिसतात. विव्दान ब्राम्हणांना शिक्षण घेता यावे, त्यांचा चरितार्थ चालावा यासाठी इनाम दिलेल्या जमीनीवर इतरांनी हक्क दाखवू नयेत यासाठीही पंतप्रतिनिधी सतर्क असलेले दिसतात.

पंतप्रतिनिधींनी सातारा परिसरातील अनेक ब्राम्हण व इतर धर्मीयांचा विचार केलेला दिसतो. शिवाजी महाराजांनी जसे सर्व धर्मीयांचा विचार केला होता. त्याप्रमाणेच पंतप्रतिनिधींनीही ब्राम्हणांना जशी धर्मादाय इनामे दिलेली दिसतात तशी काही मुस्लिमानांही त्यांच्या देवस्थांनांच्या व्यवस्थेबदद्ल इनामे दिलेली दिसतात. जमीनीवरील साऱ्याव्यतिरिक्त, औंधमध्ये व्यापाऱ्यांवर लावला जाणारा मोहतर्फा तसेच कुरणांवर आणि प्राण्यांवर (मेंढरावर) देखिल कर आकारलेला आढळतो. जकातीच्या माध्यमातून अत्यंत अल्प प्रमाणात उत्पन्न मिळत असावे. इनामपत्रातील उल्लेखाप्रमाणे जकाती पैकी काही रक्कम खोताकडून इनाम दिलेल्या व्यक्तीस दिली जात असावी असे दिसते. अनेक छोटे मोठे कर लावून राज्याकडे उत्पन्न जमा करण्याचे धोरण राज्यकर्त्यांचे असलेले दिसते.

**२.चौल-नागाव –**

पेशवाईनंतर कोकण प्रांतात वतनदारीचे खोती, शिळोत्री वतन असे काही प्रकार निर्माण झालेले दिसतात. शिलोत्तरी वतनदारी कोकण प्रांतात मुख्यत्वे अलिबाग, पेण, पनवेल व उरण तालुक्यात अस्तित्वात होती. खारे पाणी अडविण्यासाठी बांधलेल्या

बंधाऱ्याला एक द्वार असे तेथे शिळा बसविली जात असे. या दाराची व शिळेची देखरेख करण्यासाठी नेमलेल्या व्यक्तीस काही हक्क किंवा वतन दिले जात असे. त्यालाच शिलोत्तरी पाटीलकी म्हणत किंवा शिळोत्री वतन म्हणत. चौलमध्ये देखिल असे शिलोत्तरी वतन देण्याची पध्दत असलेली दिसते.

खोती पद्धत ही पेशवाई काळापासून मुख्यत्वे कोकण प्रांतात अस्तित्वात होती. ही पध्दत जहागिरी आणि इनामदारी पध्दतीतून सुरु झाली होती. गावचा सारा वसूल करण्यासाठी त्यावेळचे सरकार विशिष्ट व्यक्तींना काही हक्क देत असत. खोताने जमीन धारकाकडून वसूल करावयाचा सारा ऐनजिनसी असे. म्हणजेच जमीनीत पिकणाऱ्या पदार्थाचा प्रत्येक जमीनदाराला काही अंश सरकारकडे भरणा करावा लागे. त्याचे प्रमाण १/६ पासून १/३ पर्यंत होते.

**कर रचना –** कोकण प्रांतातील चौल सुभ्यातील नागाव महाल यात पेशवे आणि आंग्रे या दोन सत्ताधीशांच्या काळात निर्माण करण्यात आलेली कररचना एकसारखी असलेली दिसते.
नागाव महालामध्ये घेतले जाणारे कर -

घरांवर आकारलेला कर म्हणजे घरटक्का. हा महालात जमा करण्याची पध्दत होती. नागाव महालातील घरांची दरवर्षी मोजणी होत असे.

वनटक्का म्हणजे गुरांढोरांवरील कर होय. शेतीवर महसूल असल्यामुळे, शेतीचे साधन जे बैल व रेडे, त्यावर कर आकारला जात नसे. पण हा कर प्रामुख्याने म्हशींवर आकारला जात असे. मोहतर्फा म्हणजे गावातील कारागीर, दुकानदार यांवरील कर. नागाव महालांत लग्नटक्का कराची आकारणी ज्यावर होत असे,त्यात ब्राम्हण व प्रभूंशिवाय अन्य जातींच्या लोकांकडून प्रथम विवाहाच्या वेळी दोन्ही पक्षाकडून प्रत्येकी १ रुपया लग्नटक्का घेतला गेलेला दिसतो. नागावचे ब्राम्हण व प्रभू यांना लग्नटक्का माफ होता. दही-बकरे हा कर बकरी पाळणारे व गवळी यांच्या व्यवसायावरील होता. म्हैशी पाळणाऱ्यांवर दही टक्का आकारीत. नागावचे जे लोक कोंबडी पाळणारे होते त्यांना पहीण कोंबडेपट्टी हा कर द्यावा लागत असे. आंग्रे काळात साधारणपणे १२ वर्षानंतर जमीन-मोजणी करण्याची पद्धत होती. अष्टागरात पावसाचे स्वरुप लहरी होते. त्यामुळे आंग्रेंच्या राजवटीतील भाताचे ऐनजिनसी उत्पन्न दरसाल बदलणारे होते. तरीही नागाव मध्ये जमीन महसूल आकारलेला आढळतो.

**करापासून उत्पन्न देणारे घटक** - आंग्रे सरकारने नागावसारख्या बागायती क्षेत्रामध्ये निघणाऱ्या प्रत्येक उत्पन्नाच्या घटकावर कर आकारलेले दिसतात. नागावमध्ये असणा-या

अनेक घटकां पासून कर मिळविताना उत्पन्न देणारा घटक किती उत्पन्न देतो यापेक्षा तो उत्पन्न देणारा घटक आहे याकडे आंग्रेनी विशेष लक्ष दिलेले दिसते. म्हणूनच नारळाचे झाप, उंडी, फणस, सुपारी, ताग, पानवेल, तसेच म्हैशी, बकऱ्या, कोंबडया, घरे अशा सर्व घटकांवर त्यांनी कर लावलेले दिसतात.

**कर वसूल करणारे अधिकारी -** आंग्रे सरकारने (इनामदारी) वतनदारी या पद्धतीला महत्व दिलेले दिसते त्यामुळे नागाव येथे अनेक वतनदार आणि इनामदार अस्तित्वात असल्याचे दिसते. यांनाच त्या काळातील कर संकलन अधिकारी म्हटले जात असे. यांच्यामार्फत प्रत्येक उत्पन्नाच्या घटकांपासून कर प्राप्त करण्याचा प्रयत्न केला जात असे. नागावमध्ये अशी काही वतनदार, इनामदार मंडळी दिसतात. ज्यांच्यामार्फत करसंकलन केले जात असावे.

नागावचे वतनदार वर्तक, महाजन, कुलकर्णी, चौधुले, माने हे होते. त्यांची दरवर्षी महालातून नख्त नेमणूक केली जात असे.

कुलकर्णी याने महालात सर्व लिखापढीचे काम करायचे. हे काम वंशपरंपरंने चालविले जात असे.माने हे नागावचे पाटील होते. यांचे नख्त वेतन १० रु. होते. त्यांस ऐनजिनसी वेतन मिळत असे.इनामदार प्रत्येक गावात सरकारने काही इनामदारांना अधिकार दिलेले असत. त्यांना वाडया व शेते इनाम दिलेली असत. गावांत यांना प्रतिष्ठित मानले जात असे. नागावमध्येही असे इनामदार आढळतात.

**३. वरसई**

मराठेशाहीच्या काळात वरसई या गावाजवळ असणारे सांकसई व माणिकगड हे दोन किल्ले या भागातील महत्त्वपूर्ण किल्ले होते. हे पुरातन किल्ले निजामशहा, गुजरातचा सुभेदार, शिवाजी महाराज, पेशवे, आंग्रे या अनेक बदलांचे साक्षीदार आहेत.

वरसई भोवतालची जावळी, करोडी, मोहिली, अष्टे, गागोदे, वाशिवली या गावांना इनाम गावे म्हटले जाते. या गावांचे इनामदारही खुद्द वरसईत रहात असत. माणिकगडच्या प्रशासकीय सोईसाठी चिमणखळ, वनखळ, तुंगारतन, आऊरावलीत अशा चार तर्फा होत्या. यातील चिमणखळ तर्फेमध्ये वरसईचा समावेश होतो. तसेच माणिकगड तालुक्यातच इतर सर्व गावांचा अंतर्भाव होत असे.

पेशवाईनंतर कोकण प्रांतात वतनदारीचे खोती आणि शिलोत्तरी वतन असे वतनाचे काही प्रकार निर्माण झालेले दिसतात. पेशवेकाळात आंग्रे यांच्याकडे पेण, सांकसई या गावामध्ये असणाऱ्या वतनदार आणि इनामदार, खोत या सरकारी अधिकाऱ्याचे हक्क, अधिकार ऐतिहासिक पत्रांच्याआधारे आढळतात. त्यामधून कोकण प्रांतातील महसूली व्यवस्था स्पष्ट होते.

**शिलोत्तरी वतन –**

शिलोत्तरी वतनदारी कोकण प्रांतात मुख्यत्वे अलिबाग, पेण, पनवेल व उरण तालुक्यात अस्तित्वात होती. सवलतीच्या अटीवर आधारलेल्या या वहिवाटीनुसार खार जमिनी लागवडीखाली आणण्यास व त्यांची निगा राखण्यास उत्तेजन देण्यात येत असे.

**खोती पद्धत –**

ही पेशवाई काळापासून मुख्यत्वे कोकण प्रांतात अस्तित्वात होती. ही पध्दत जहागिरी आणि इनामदारी पध्दत्तीतून सुरु झाली होती. गावचा सारा वसूल करण्यासाठी त्यावेळचे सरकार विशिष्ट व्यक्तींना सनदेने काही हक्क देत असे. खोताने जमीन धारकाकडून वसूल करावयाचा सारा ऐनजिनसी देखिल असे. म्हणजेच जमिनीत पिकणाऱ्या पदार्थाचा प्रत्येक जमीनदाराला काही अंश सरकारकडे भरणा करावा लागे. त्याचे प्रमाण १/६ पासून १/३ पर्यंत होते.पूरातन काळापासून कर वसूलीसाठी अंमलदार नेमण्याची पध्दत होती. त्यात खोतांना सनद दिली जात असे.या वसूली करणाऱ्या अंमलदारास आपला मेहनताना सरकारात भरावयाच्या धान्याच्या प्रमाणातील साऱ्यातून काही प्रमाणात राखून ठेवण्याचा अधिकारही दिलेला असे.

**कर रचना -**

घरांवर आकारलेला कर म्हणजे घरपट्टी. ही या परगण्यात जमा करण्याची पध्दत होती असे दिसते. सांकसई परगण्यातील चिमणखळ म्हणजे सध्याच्या वरसई परिसरातील अनेक गावे आंग्रे यांनी इनाम दिलेली दिसतात. इनाम दिलेल्या गावातील जमीन महसूल जमा करण्याचे अधिकार इनामदारांना दिलेले दिसतात. चिमणखळ म्हणजे सध्याच्या वरसईमध्ये बाजाराच्या दिवशी जकात घेतली जात असे. सांकसई किल्ल्यावरील अधिकारी ही जकात जमा करीत असे.

**करापासून उत्पन्न देणारे घटक –**

करच्या माध्यमातून उत्पन्न जमा करत असताना आंग्रेंनी कराचा पाया विस्तारीत ठेवल्याने छोटया छोटया किंवा कमी महत्त्वाच्या वाटणाऱ्या घटकांपासूनही कर जमा केलेले दिसतात. भारतात प्राचीन काळातील कौटिल्यापासून अशा प्रकारे कराचा पाया विस्तारीत करण्याची पद्धत अनेक राज्यकर्त्यांनी स्विकारलेली दिसून येते. वरसई येथे जमीन महसूल आणि घरांवरील घरपट्टी आणि म्हैसपट्टी वसूल केली जात असल्याचे आढळते. म्हणजेच सांकसई येथे करापासून उत्पन्न देणारे जमीन, घरे आणि म्हैशी इ.घटक असल्याचे दिसून येते.

**कर वसूल करणारे अधिकारी –**

आंग्रे सरकारने (इनामदारी) वतनदारी या पद्धतीला महत्त्व दिलेले दिसते. त्यामुळे सांकसईमधील वरसई येथे अनेक वतनदार आणि इनामदार असल्याचे दिसते, ज्यांच्यामार्फत कर संकलन केले जात असे. यामध्ये भावे, जोशी, रास्ते, नातू, कानडे, सहस्त्रबुध्दे अशा इनामदार मंडळींचा समावेश असलेला दिसतो.

**करविषयक धोरण –**

कोकण प्रांतामधील आंग्रेंच्या आणि पेशवेंच्या वर्चस्वाखाली असणाऱ्या प्रदेशामध्ये सर्वसाधारणपणे लोकांच्या हिताला महत्व दिलेले दिसते. आंग्रे आणि पेशवे यांनी कोकण प्रांतात काही इनामदारांकडे सभोवतालची गावे, गावांचा वसूल जमा करण्याचे अधिकार दिलेले दिसतात. या वसूलीतून मिळणारा पैसा सरकारच्या सेवेबद्दलचा मोबदला म्हणून इनामदारांच्या चरितार्थासाठी वापरण्याचे अधिकार त्यांना देण्यात आलेले दिसतात. गरीब ब्राम्हणाच्या चरितार्थासाठी त्यांना काही गावे इनाम दिलेली आढळतात. तसेच देवस्थानाची व्यवस्था व्हावी, त्याची स्वच्छता राखली जावी, पंडित विद्वानांचे शिक्षण व्हावे त्याचा समाजाला फायदा व्हावा यासाठी ब्राम्हण कुटूंबाना इनाम जमिनी किंवा गावे दिलेली आढळतात. आंग्रे आणि पेशवे यांनी आपल्या सेवेमध्ये असणाऱ्या व्यक्तींना विशेष सन्मान म्हणूनही काही गावे इनाम म्हणून दिलेली दिसतात. वरसई येथील अनेक गरीब कुटूंबांना कराबाबत सवलती दिलेल्या दिसतात.

### ४.अर्थ व महसूल विषयक पत्रे

निवडक ऐतिहासिक कागदपत्रांच्या आधारे (अर्थात इ.स. १५६४ ते १८१२-१३ या कालखंडातील) तत्कालीन राज्यकर्त्यांची धोरण आखणी स्पष्ट होण्यास मदत होते. वेगवेगळया ऐतिहासिक पत्रांच्या आधारे मोगल काळ, मराठेशाही यामध्ये अस्तित्वात असणारी इनाम देण्याची पध्दत कशी होती हे स्पष्ट होते.या पत्रांमध्ये इनाम ही संज्ञा मोठया प्रमाणात वापरलेली दिसून येते. या पत्रांमधील मजकूरावरुन कशासाठी, कोणत्या कारणाने इनाम दिले जात असे ते स्पष्ट होते

एखादयाने लढाईत शौर्य, पराक्रम दाखविला म्हणून, राज्याची उत्तम चाकरी केली म्हणून, राज्यातील दीनदुबळयांना, ब्राम्हणांना त्यांच्या चरितार्थासाठी कृपा बक्षीस म्हणून, राज्यातील देवळांची, देवस्थानांची, मशीदींची व्यवस्था लावण्यासाठी, तसेच मठ किंवा धर्मस्थळांच्या व्यवस्थेसाठी, इनामदारांना अर्थार्जनासाठी नव्याने इनाम देण्याची पध्दत अस्तित्वात असलेली दिसते. तसेच किल्ला किंवा एखाद्या प्रांताचे रक्षण केल्याबदद्ल, लष्करी कामासाठी लावून दिलेल्या मुलुखाची म्हणजेच सरंजामाची व्यवस्था लावण्यासाठी, एखाद्या ठिकाणी नवीन वाडी वसविण्याबाबतची सनद आणि इनाम देण्याची पध्दत अस्तित्वात असलेली दिसते. याशिवाय एखादया देवस्थानाच्या उत्सवासाठी, सरदारांच्या कुटुंबातील सदस्याच्या विवाहाप्रित्यर्थ, राज्यारोहणाप्रित्यर्थ, उपाध्येपणाबदद्ल इनामदारावर किंवा सरदारावर असणाऱ्या कर्जाची फेड करण्या साठी देखील इनाम दिलेले दिसते. अशा प्रकारे इनाम देण्याच्या अनेक पध्दती या काळात अस्तित्वात असलेल्या दिसतात. महसूल प्रशासन चालविताना कर पध्दती महत्वाची असते.कराच्या माध्यमातून राज्यकर्त्यांनी उत्पन्न जमा करण्याबरोबरच राज्यातील गरजू, पीडीत लोकांना आर्थिक मदत देण्याचे प्रयत्न इनाम देण्यामधून केलेले दिसून येतात.

थोडक्यात दुसऱ्या प्रकरणात व्यक्तिगत संपत्तीचा काही भाग सरकारला देण म्हणजे कर होय. प्राचीन काळापासून आजपर्यत राज्यव्यवस्थेच्या दृष्टीने महसूल व्यवस्था अत्यावश्यक घटक आहे. प्राचीन काळापासून कर वसूलीसाठी विविध अधिकाऱ्यांची नियुक्ती केलेली आढळते. उदा.मौर्यकाळात गोप, मौयपूर्व काळात रज्जूग्राहक, गुप्तकाळात ग्रामाध्यक्ष, इ.या सर्व बाबी स्पष्ट करण्यात आल्या आहेत.

तिसऱ्या प्रकरणात मोगलपूर्व आणि मोगलकालीन महसूल व्यवस्थेमध्ये धर्मावर आधारीत कर पध्दतीला महत्व दिलेले दिसते. या काळातील महसूल वसूलीकरिता मुक्ता, पटवारी, अमीन अशा प्रशासकीय अधिकाऱ्यांची नियुक्ती केलेली दिसते.

चौथ्या प्रकरणात शिवाजी महाराजांची महसूल व्यवस्था लोक कल्याणकारी व्यवस्था होती आणि शिवाजी महाराजांनी तत्कालीन वतने रदद् केली व वतनदारी किंवा इनामदारी बंद करुन वतनदार किंवा इनामदारांना प्रशासनात सामावून घेतले. शिवाजी महाराजांनी पाटील, कुलकर्णी, देशमुख, देशपांडे या वतनदारांकडेच कर वसुलीची जबाबदारी सोपविली असे दिसते.

पाचव्या प्रकरणात पेशव्यांनी इनामदारी व्यवस्थेला अधिक महत्व दिले त्यामुळे इनामदार, वतनदारांचे महत्व वाढले. आणि पेशव्यांनी देशमुख, देशपांडे, कुलकर्णी, पाटील यांनाच कर आकारणी व वसूलीचे अधिकार दिलेले दिसतात.

सहाव्या प्रकरणात ईस्ट इंडिया कंपनीच्या काळात इनामदारी, जमीनदारी व्यवस्था कायम होती पण त्यानंतर ब्रिटिशांनी महसूल व्यवस्थेत सुधारणा केल्या.याचे विवेचन करण्यात आले आहे. जमीनदारांना, मालगुजारांना मध्यस्थ बनवून त्यांच्यामार्फत कर वसूली सुरु केली पण अनेक प्रांतात निरनिराळया कर पध्दती उदा. रयतवारी, मालगुजारी, कायमधारा पध्दत इ. निर्माण केल्या गेलेल्या दिसतात. तसेच स्वतंत्र भारतातील महसूल व्यवस्थेचा अभ्यास करण्यात आला आहे. १९३५च्या भारत सरकार कायदयामुळे केंद्र व राज्य सरकार यांची आपापली स्वतंत्र महसूल व्यवस्था निर्माण झाली आणि संपूर्ण भारतात एकच महसूल प्रशासन व कर पध्दती लागू झाली. यासाठी स्वतंत्र प्रशासकीय वर्ग नियुक्त करण्यात आला. उदा. महसूल अधिकारी.

सातव्या प्रकरणात औंध, नागाव व वरसई या तीन गावांचा सूक्ष्म अभ्यास केलेला आहे.

**१. नागावः** शिवकाळाप्रमाणेच येथेही अनेक कर वसूल केलेले आढळतात.उदा.संतोषपट्टी, मोहतर्फा, लग्नटका, जकात इ. सन १७९८-९९ मध्ये २४७ घरटका देणारी घरे नागावमध्ये होती व या घरांपासून रू ४५८ आकार प्राप्त झालेला दिसतो. तर सन १८२९-३० मध्ये ३०९ घरटका देणाऱ्या घरांपासून रू ४९७ इतका आकार मिळालेला दिसतो. तसेच सन १७९८ मध्ये ३३५ म्हशींपासून रू १०० आणे ३ एवढा वनटका आकार प्राप्त झालेला दिसतो. सरकारी कामात साहाय्य करणाऱ्या सुबुध्द ब्राम्हण व प्रभू कुटुंबांना घरटका माफ होता.

नागावप्रमाणेच औंध आणि वरसई या गावांमध्येही विविध प्रकारच्या करांपासून वसूली करण्यात आलेली आढळते.

**२. वरसईः** वरसईमध्ये इनामदारी व्यवस्था असल्याने येथे सारा किंवा महसूलाशिवाय इनामपट्‌टी, मिरासपट्‌टी यासारखे ठरावीक कर वसूल केलेले आढळतात.

**३. औंधः** औंध हे पंतप्रतिनिधींचे संस्थाने असल्याने येथे देखील इनामदारी व्यवस्था अस्तित्वात असलेली दिसते आणि मोहतर्फा व शेतसारा असे कर वसूल केलेले दिसतात.

**४. अर्थ व महसूल विषयक ऐतिहासिक पत्रेः** यामध्ये नागाव, वरसई, औंध या सूक्ष्म अभ्यासाकरीता निवडलेल्या गावांसंबधीत इनामपत्रे आणि मराठेशाहीतील तसेच औरंगजेबाच्या दरबारातील काही महसूल विषयक पत्रांचा संदर्भ घेतला आहे.तसेच मौजे अवसरी बु ||आंबेगाव ता.पुणे येथील करीमबेग मुलाणा यांना बादशहाने दिलेली इनाम जमीन व त्या संबंधातील वारसा हक्काच्या कैफियती व नोंदी या महसूल प्रशासकीय दस्तऐवजाचाही संदर्भ घेतला आहे.

मराठेशाहीत तसेच मोगल बादशहांनी देखील धार्मिक कार्यास मदत म्हणून एखादयाकडे चरितार्थाचे साधन नाही म्हणून एखादे गाव इनाम दिलेले दिसते. उदा. मोरगावचे मोरेश्वर गोसावी यांस अनेक राज्यकर्त्यांनी त्याच्या आजूबाजूची अनेक गावे इनाम दिलेली दिसतात. हे सर्व संदर्भ ऐतिहासिक पत्रांमध्ये आढळतात.

शिवकाळ ते आधुनिक काळ यामधील कर रचनेत विविध प्रकार आढळतात. शिवकाळातील अनेक प्रकारच्या करांच्या माध्यमातून उत्पन्न जमा करण्याची पध्दत यातून स्पष्ट होते. आंग्रे यांच्या काळात कोकणात शिवकाळाप्रमाणे विस्तारीत कर रचनेचा आढळ दिसतो. सर्व काळातील कर रचनेचा अभ्यास करताना असे स्पष्टपणे दिसते की, महसूल किंवा शेतसारा हे सर्व काळातील राज्यकर्त्यांचे उत्पन्नाचे प्रमुख साधन असल्याने महसूलाची आकारणी सर्व काळात केली जात असे. याशिवाय जकातीच्या माध्यमातूनही सर्व काळात उत्पन्न मिळविलेले दिसते. हे सर्व **तक्ता क्र.१** मधून स्पष्ट होते.

**तक्ता क्र. ३६. विविध काळात घेतले जाणारे कर-**

| शिवकाळ | आंग्रेकाळ | | पंत प्रतिनिधी काळ | कंपनीचा काळ (१८५९पर्यंत) | ब्रिटिश काळ (१८५९ ते १९४७पर्यंत) | स्वातंत्र्योत्तर काळ (१९४७ नंतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | नागाव | वरसई | | | | |
| इनामपट्टी | x | इनामपट्टी | इनामपट्टी | x | x | सेवा कर |
| मिरासपट्टी | x | मिरासपट्टी | मिरासपट्टी | x | x | व्यवसाय कर |
| सिंहासनपट्टी | x | x | x | x | प्राप्तीकर | बक्षीस कर (रद्द १-१०-९८) |
| सराफपट्टी | मोहतर्फा | x | x | x | x | संपत्ती कर |
| धनगरपट्टी | धनगरपट्टी | x | मेंढरावरील कर | x | x | विक्री कर |
| मात्रटका | x | x | x | x | x | x |
| पायपोसी | वनटका | x | वनचराई कर | x | x | x |
| तेलपट्टी | ठरावपट्टी | x | x | x | x | प्राप्तीकर |
| मोहतर्फा | संतोषपट्टी | x | मोहतर्फा | x | x | x |
| हेजिबपट्टी | दही बकरे | x | x | x | x | x |
| वेठबिगारी | घरटक्का | घरपट्टी | x | x | x | x |
| नुकसानपट्टी | x | x | x | x | x | x |
| सादिलवार पट्टी | x | x | x | x | x | x |
| खर्चापट्टी | x | x | x | x | x | x |
| लग्नटका | लग्नटका | x | x | x | x | x |
| जकात | जकात | x | x | जकात | जकात | जकात |
| मीठावरील कर | x | x | x | x | x | x |
| सारा | सारा | सारा | सारा | महसूल | महसूल | महसूल |

शिवकालोत्तर महसूल व्यवस्था एक तौलनिक अभ्यास या संशोधनामध्ये प्राचीन काळ, (वैदिक काळ), मौर्यपूर्व, मौर्य, गुप्त काळ याबरोबरच सुलतानशाही व मोगलकालीन महसूल व्यवस्था, मराठेशाही व ब्रिटिश कालीन महसूल व्यवस्थेबरोबर १९५० पर्यंतच्या महसूल व्यवस्थेचा आढावा घेण्यात आला आहे.

प्राचीन काळापासून आजपर्यंत सर्व काळात अस्तित्वात असणाऱ्या प्रशासन व्यवस्थेमध्ये महसूल व्यवस्था ही अत्यंत महत्वाची व्यवस्था असल्याचे दिसते. राज्याच्या उत्पन्नाचे साधन म्हणून महत्वपूर्ण असलेल्या महसूल व्यवस्थेचे अस्तित्व कर पध्दतीमधून स्पष्ट होते. त्यामुळे सर्व काळात अस्तित्वात असणारी महसूल व्यवस्था सातत्य दर्शविते. राज्यव्यवस्थेत बदल झाला तरी, राज्यकर्ते बदलले तरी महसूल व्यवस्था ही कायम राहिलेली दिसते. वैदिक काळापासून आजपर्यंत राज्यव्यवस्थेसाठी करपध्दतीची भूमिका अत्यंत महत्वाची ठरताना दिसते.

महसूल व्यवस्था ही राज्यव्यवस्थेच्या दृष्टीने अत्यंत महत्वाची असते, हे स्पष्ट झाले आहे. महसूल व्यवस्थेतूनच राज्याकडे उत्पन्न जमा होत असते. म्हणूनच महसूल व्यवस्थेला प्रशासनाचा आत्मा असे म्हटले जाते. महसूल व्यवस्थेचा प्रशासनातील सर्व अंगाशी संबंध निर्माण झालेला असतो. महसूलाच्या आधारे मिळणाऱ्या उत्पन्नातून राज्यव्यवस्थेला आपली सर्व प्रकारची कार्ये पूर्ण करता येतात. सामाजिक, आर्थिक, राजकीय उद्दिष्टे साध्य करण्यासाठी आधुनिक काळातही महसूल व्यवस्था अत्यंत महत्वपूर्ण ठरते.

प्रस्तूत संशोधनात प्राचीन काळापासून ते आजपर्यंतच्या करपध्दतीचा संघटनात्मक आढावा घेण्यात आला आहे. विविध करपध्दतींमध्ये अस्तित्वात असणारी कर व्यवस्था कशा प्रकारची आहे याचा अभ्यास करण्यात आला आहे हे या अभ्यासाचे वेगळेपण आहे. वैदिक काळापासून राज्याला करांच्या माध्यमातून मिळणाऱ्या उत्पन्नातून महसूल व्यवस्था सर्वांना मदत करणे हा हेतू ठेवत असलेली दिसते. अगदी प्राचीन वैदिक काळापासून व्यक्तीकडून कर घेताना त्याचा व्यक्तीला त्रास होणार नाही. याची बहुतांश राज्यकर्त्यांनी काळजी घेतलेली दिसते. परंतू प्राचीन काळापासून विद्यमान काळापर्यंत राज्यव्यवस्थेमध्ये महसूल व्यवस्थेचे सातत्य दिसून येते. तसेच राज्यव्यवस्था कोणत्याही पध्दतीची असो प्रत्येक राज्यव्यवस्थेत त्या व्यवस्थेच्या अस्तित्वासाठी महसूल व्यवस्था अत्यंत महत्वपूर्ण असल्याचे दिसते किंबहुना राज्याच्या उत्पन्नाचा तो एक महत्वपूर्ण स्त्रोत असलेला दिसतो. राज्याला महसूल व्यवस्थेतील कर पध्दतीतूनच उत्पन्न मिळत असते. उत्पन्न देणाऱ्या अन्य मार्गांपेक्षा

कराच्या माध्यमातून उत्पन्न मिळविण्याला आजवर सर्व काळातील व्यवस्थांनी महत्व दिलेले दिसते. करांमुळे महसूल व्यवस्थेला मूर्त स्वरुप प्राप्त होते. यासाठी प्रत्येक समाजाला एका प्रशासन व्यवस्थेची आवश्यकता असते. भारतीय प्रशासन व्यवस्था आपल्या प्राचीन संस्कृती इतकीच प्राचीन आहे. सरकारच्या आदेशांचे आणि कार्यांच्या पूर्ततेसाठी सर्व काळात लोकप्रशासनाची आवश्यकता असते. प्राचीन भारतातील प्रशासनाच्या इतिहासात वैदिक काळापासून ते मोगल काळापर्यंतच्या प्रशासन व्यवस्थेचा एक टप्पा असलेला दिसतो. त्यानंतर मध्ययुगातील प्रशासन आणि त्यानंतरचे ब्रिटिशकालीन प्रशासन असे ३ टप्पे महत्वपूर्ण ठरतात. या सर्व टप्प्यांमध्ये ज्याप्रमाणे प्रशासनाचे अस्तित्व दिसते त्याप्रमाणेच महसूल व्यवस्थेचा आढळ दिसतो कारण राज्याचे प्रशासन चालविण्यासाठी पैसा किंवा उत्पन्न अत्यावश्यक असते म्हणूनच प्रशासन आणि महसूल व्यवस्था या नेहमी एकात्मिक असलेल्या दिसतात. ही स्थिती सनातन आहे, प्रशासन आणि महसूल व्यवस्थेच्या आजवरच्या इतिहासामध्ये काही विशिष्ट टप्प्यांना विशेष महत्व आहे याचे कारण या टप्प्यांमधील प्रशासन आणि महसूल व्यवस्थेंने अत्यंत ठळकपणे दिसणाऱ्या अशा काही पध्दती, काही व्यवस्था निर्माण केल्या आहेत ज्या आजही फार महत्वपूर्ण ठरतात. त्यामुळेच महसूल व्यवस्था व प्रशासन यातील मैलाचे दगड म्हणून त्या व्यवस्थेकडे किंवा प्रशासनाकडे पाहता येते.

वैदिक काळापासूनच राज्यव्यवस्था स्थिर बनविण्याचे प्रयत्न झालेले दिसतात. रामायण, महाभारत या धार्मिक ग्रंथाच्या आधारे राज्यकारभार, व्यवस्था स्थिर झाल्याचे आढळते. त्यानंतर चंद्रगुप्त मौर्याच्या राजवटीमधील कौटिल्याने प्रशासन व्यवस्थेबरोबरच महसूल व्यवस्थेलाही महत्व दिले. राज्यातील प्रत्येकाने कोणत्या ना कोणत्या स्वरुपात कर दयावा यात तत्कालीन आश्रमातील तपस्विनीनींही कर दयावा असे त्याने “अर्थशास्त्र” या ग्रंथात स्पष्ट केलेले आढळते. तसेच पशुकर, विशेष पिकांवर लावला जाणारा हिरण्य कर, श्रमांच्या स्वरुपात घेतला जाणारा विष्टी कर, पार्श्वकर, रज्जू कर, पिंडकर, सीता, प्रतिभाग, भाग, बलि असे अनेक कर मौर्यकाळात वसूल करुन राज्याचे उत्पन्न वाढविण्याचे प्रयत्न केलेले दिसतात. कौटिल्याने सर्वप्रथम अशा अनेक छोटया-मोठया करांच्या वसूलीची विस्तारीत कर व्यवस्था निर्माण केलेली दिसते.

त्यानंतरच्या मोगल काळातील अफगाण-पठाण वंशीय व सासाराम (बिहार)येथे १४८६ मध्ये जन्मलेल्या शेरशहाने सर्वप्रथम दोरखंडांच्या मदतीने जमिनीची मोजणी

करण्याची पध्दती निश्चित केली. तसेच प्रतवारी ठरविली व त्यात उत्तम, मध्यम आणि कनिष्ठ अशी जमिनीची प्रतवारी करण्याची पध्दती सुरु केली. जमिनीच्या प्रतवारीनुसार धल्लाबक्षी किंवा बटाई, नईक किंवा मुक्ताई, आणि नगदी किंवा जप्ती या ३ पध्दतीनी शेतसारा ठरविण्याची पध्दत शेतकऱ्यांकडून करार (पट्टा) लिहून त्यांना कसण्यासाठी नवीन जमीनी देण्याची पध्दत त्याने सुरु केली. त्यावर पहिली काही वर्षे शेतसारा माफ असे. शेरशहाने तत्कालीन प्रशासन व्यवस्थेमध्ये आणखीन एका मार्गाने राज्याचे उत्पन्न वाढविलेले दिसते. शेरशहाने दळणवळणासाठी पहिल्यांदाच रस्त्यांचा विकास केला. त्यामुळे त्याला रस्त्यांचा निर्माता संबोधले जाते. शेरशहाच्या काळात जरिबाना, महसिलाना, दाहअस्त्री कर असे काही कराचे वेगळे प्रकार आढळतात. शेतकऱ्यांना हे तिन्ही कर दयावे लागत असत. जरिबाना हा कर जमीनीची मोजणी केल्याबद्दलचे शुल्क म्हणून घेतला जात असे तर महासिला हे जमीन महसूल वसूल करणाऱ्या अधिकाऱ्याला दयावे लागणारे शुल्क होते. दाहअस्त्री कर तर या दोन्ही पेक्षा वेगळाच होता. दुष्काळ आणि संकटकाळात वापरण्यासाठी धान्य रुपाने हा कर शेतकऱ्यांकडून वसूल केला जाई, जो अत्यल्प असे. पण हे धान्य सरकारी गोदामात साठवले जात असे आणि संकटकाळात कमी दराने ते पुन्हा शेतकऱ्यांना दिले जात असे. शेरशहाने आपल्या राजवटीत शेतकऱ्यांच्या हिताचा विचार केला. नियमितपणे शेतसारा भरणाऱ्या शेतकऱ्यांना त्याने शेतसाऱ्याचा काही भाग माफही केलेला आढळतो.तसेच तो अन्य धर्मीयांच्या बाबतीत खूप सहिष्णू वृत्तीचा होता.

निजामशाहीतील मलिक अंबर याने जमिनीच्या प्रतिप्रमाणे ४ प्रकार करुन, पिकांच्या अंदाजावर, जमाबंदीतून शेतसाऱ्याची निश्चिती केली. धान्यरुपाने सारा घेण्याऐवजी पैशाच्या रुपात निश्चित करुन वसूलीवर विशेष लक्ष देणे यासाठी सर्व धान्याच्या उत्पन्नाची किंमत करुन तिसरा हिस्सा रोकड किंवा रोख घेण्याची पध्दत त्याने सुरु केली. शेती व्यवस्थेला महत्व देण्यासाठीच त्याने जलव्यवस्थापनाला महत्व दिले. औरंगाबादमध्ये सर्वप्रथम जलव्यवस्थापनाची सोय केली आणि पाणीपुरवठयातून शेती बरोबरच सर्वसामान्य लोकांचेही हित साधले.

मलिक अंबरच्या विचारीपणामुळे राज्यकर्त्यांना निश्चितपणे काही प्रमाणात कर प्राप्त होऊ लागला त्यामुळे त्याचे कर व्यवस्थेतील योगदान महत्वाचे ठरते. म्हणूनच जमिनीच्या प्रतिनुसार जमिनीचे प्रकार करुन त्यानुसार शेतसाऱ्याची निश्चिती करण्याचे जमाबंदीचे तत्व मलिकअंबरच्या करपध्दतीतून शिवाजी महाराजांनी घेतलेले दिसते. पण सारा पैशाच्याच रुपात जमा करण्याऐवजी लोकहित लक्षात घेऊन तो धान्य, वस्तूंच्या रुपात जमा करण्याला विशेष महत्व दिलेले दिसते. तसेच शिवाजी महाराजांनी संकटसमयी शेतसाऱ्याचे देयत्व बंधनकारक न ठरविता लवचिक धोरण ठेवल्याने त्यांची लोककल्याणकारक वृत्ती स्पष्ट होते. प्रजेला ज्या स्वरुपात कर देणे सोईस्कर असेल त्या स्वरुपात ते प्रत्येकाकडून वसूल केलेले दिसतात. पण "राज्यातील प्रत्येकाने कर दयावा" हे कौटिल्याचे तत्व देखिल त्यांनी अनेक प्रकारच्या करांची (उदा.इनामपट्टी, तूटपट्टी, लग्नटका, मागटका, पायपोसी, तेलपट्टी, मोहतर्फा, हेजिबपट्टी, वेठबिगारी, नुकसानपट्टी, सादिलवार पट्टी, खर्चापट्टी) आकारणी करुन प्रत्यक्षात आणलेले दिसते. शिवाजी महाराजांनी वतनदारी बंद करुन वतनदारांना प्रशासकीय व्यवस्थेचा भाग बनविण्याला विशेष महत्व दिलेले दिसते.

पेशवेकाळात देखिल कर व्यवस्था विस्तारीत करण्यात आलेली दिसते. नारळाची झाडे किंवा सुपारी पेशव्याच्या खजिन्यात महसूलाच्या माध्यमातून भर टाकत असत.पेशव्यांनी शेतीच्या विकासाकडे विशेष लक्ष देऊन शेती व्यवसायाला प्रोत्साहन देण्याचे तत्व स्विकारल्याने या काळात रयत आनंदी असलेली दिसते. पण वतनदार, सरदार, जमीनदार यांच्याकडे सत्तेचे विकेंद्रीकरण केल्यामुळे हळूहळु वतनदारांची संस्थाने निर्माण झालेली दिसतात.(औंध संस्थान, कुलाबा संस्थान)

ब्रिटिशांनी या संस्थानिकांना/जमीनदारांना हाताशी धरुन प्रशासन व्यवस्थेवर ताबा मिळविला. ब्रिटिशकाळात जमीनदारी, रयतवारी, महालवारी अशा जमीन महसूलाच्या अनेक पध्दती विविध प्रांतात ब्रिटिशांनी लागू केल्या. आवश्यकतेप्रमाणे त्यात बदल घडवून आणले पण लोकहिताचा विचार त्यांच्या प्रशासकीय यंत्रणेने केलेला दिसत नाही. प्रजेला पैशाच्याच रुपात सारा देण्याची जबरदस्ती करुन मोठया प्रमाणात शोषण केलेले दिसते. पण साऱ्याच्या माध्यमातून मिळणारे उत्पन्न ब्रिटिशांना प्रशासकीय यंत्रणेसाठी आवश्यक होते. ब्रिटिश

काळापासून भारतात आयकरासारख्या कराच्या माध्यमातून उत्पन्न मिळविण्यास सुरुवात झाली.

आधुनिक काळात देखिल सातत्याने कराच्या माध्यमातून राज्य उत्पन्न वाढविण्याचा हेतू पूर्ण करीत असलेले दिसते. प्राचीन काळापासून अस्तित्वात असणारी कर व्यवस्था राज्याच्या कल्याणकारी योजनांच्या दृष्टीने आधार देणारी ठरली आहे. शिवकाळात, पेशवेकाळात ज्याप्रमाणे करांचा पाया विस्तारीत बनविण्यात आलेला दिसतो तसेच सद्यस्थितीतही अनेक प्रकारचे छोटेन्मोठे कर आकारुन कराचा पाया विस्तारीत बनविलेला दिसतो. राज्यातील सर्व उत्पादनांवर, पिकांवर, उत्पन्न देणाऱ्या प्राण्यांवर, उत्पन्नावर, बक्षीसकर, संपत्तीवर, रस्त्यांवर, पाणी पुरवठयावर, वीज पुरवठयावर, मनोरंजनावर, शैक्षणिक संस्थावर, घरांवर अशा अनेक घटकांवर कर आकारुन राज्य आपले उत्पन्न वाढविण्याचे प्रयत्न करीत असलेले दिसते. जसे कौटिल्याने मधमाशीची उपमा देऊन उत्पन्न जमा करण्याचे तत्व स्पष्ट केले आहे  तसे आजही मधमाशी प्रमाणे राज्य अनेक घटकांतून उत्पन्न जमविण्याचे प्रयत्न करीत असल्याचे दिसते.

पुढील तक्त्यामध्ये सूक्ष्म अभ्यासाकरिता निवडलेल्या ३ गावांमधील मध्ययुगीन काळ आणि स्वातंत्र्योत्तर काळ दोन्ही काळामधील कर व्यवस्थेची तुलना केली आहे. स्वातंत्र्योत्तर काळात देखिल राज्याकडून अनेक प्रकारचे कर आकारले जातात.  या ३ गावांमध्ये मध्ययुगीन काळात अस्तित्वात असणारी कर व्यवस्था वेगवेगळया स्वरुपात असलेली दिसते. यातील औंध आणि वरसईमध्ये अतिशय थोडे कर आकारलेल दिसतात. पण नागावमध्ये मात्र अनेक प्रकारचे कर घेतले जात असल्याचे दिसते. स्वातंत्र्योत्तर काळात तीनही गावांमध्ये ग्रामपंचायत असल्याने एकसारखीच व्यवस्था असलेली दिसते. ही कर व्यवस्था नागावमधील कर व्यवस्थेबरोबर साम्य दर्शविणारी असल्याचे दिसते. तसेच अनेक प्रकारचे कर आकारुन राज्याचे उत्पन्न वाढविण्याचे प्रयत्न स्वातंत्र्योत्तर काळात केले जात असलेले दिसतात.

**तक्ता क्र.३७. सूक्ष्म अभ्यासाकरिता निवडलेल्या ३ गावांमधील तुलनात्मक कर व्यवस्था-**

| मध्ययुगीन करव्यवस्था | | | स्वातंत्र्योत्तर करव्यवस्था | | |
|---|---|---|---|---|---|
| **नागाव** | **वरसई** | **औंध** | **नागाव** | **वरसई** | **औंध** |
| x | इनामपट्टी | इनामपट्टी | x | x | x |
| धनगरपट्टी | मिरासपट्टी | मिरासपट्टी | x | x | x |
| सारा | सारा | सारा | जमीन महसूल | जमीन महसूल | जमीन महसूल |
| वनटका | x | वनचराईकर | x | x | x |
| ठरावपट्टी | x | x | x | x | x |
| संतोषपट्टी | x | x | जत्रा व उत्सवा वरील कर | जत्रा व उत्सवा वरील कर | जत्रा व उत्सवा वरील कर |
| दही बकरे | x | मेंढरावरील कर | गुरांच्या बाजारातील दलाली व व्यवसायावरील कर | गुरांच्या बाजारा तील दलाली व व्यवसायावरील कर | गुरांच्या बाजारा तील दलाली व व्यवसायावरील कर |
| घरटक्का | घरपट्टी | घरपट्टी | इमारत व जमीनीवरील कर | इमारत व जमीनीवरील कर | इमारत व जमीनीवरील कर |
| लग्नटका | x | x | x | x | x |
| जकात | x | x | जकात | जकात | जकात |
| मोहतर्फा | | मोहतर्फा | शेतीव्यतिरिक्त व्यवसायांवर कर | शेतीव्यतिरिक्त व्यवसायांवर कर | शेतीव्यतिरिक्त व्यवसायांवर कर |
| x | x | x | यात्रेकरुंवरील कर | यात्रेकरुंवरील कर | यात्रेकरुंवरील कर |
| x | x | x | सुधार कर | सुधार कर | सुधार कर |
| x | x | x | दिवाबत्ती कर | दिवाबत्ती कर | दिवाबत्ती कर |
| x | x | x | सामान्य पाणीपट्टी | सामान्य पाणीपट्टी | सामान्य पाणीपट्टी |
| x | x | x | मार्केट व आठवडा बाजारावरील कर | मार्केट व आठवडा बाजारावरील कर | मार्केट व आठवडा बाजारा वरील कर |
| x | x | x | सामान्य आरोग्य रक्षण उपकर | सामान्य आरोग्य रक्षण उपकर | सामान्य आरोग्य रक्षण उपकर |

राज्यव्यवस्था कल्याणकारी धोरणाचा स्विकार करुन लोकहितासाठी लागणाऱ्या निधीची गरज करातून मिळणाऱ्या उत्पन्नातून करते. हे उत्पन्न जमा करण्यासाठी सर्व काळांमध्ये प्रशासकीय यंत्रणेची भूमिकाही अत्यंत महत्वाची ठरलेली दिसते. प्रशासकीय यंत्रणेकडून ही व्यवस्था अस्तित्वात ठेवण्याचे सर्व काळात प्रयत्न केले गेलेले दिसतात. प्राचीन काळापासून या सर्व यंत्रणेमध्ये आणि कर पध्दतीमध्ये सातत्य असल्याचे दिसून येते. एखाद्या कालावधीमध्ये राज्याला महसूल व्यवस्थेची आवश्यकताच निर्माण झाली नाही आणि राज्यकर्त्यांनी स्वबळावर राज्यव्यवस्था चालविल्याचे दिसून येत नाही. म्हणजेच सर्व काळात राज्यव्यवस्था किंवा प्रशासन महसूल व्यवस्थेवर आधारीत होते असेही म्हणता येईल.

महसूल व्यवस्थेतील कराचे महत्व सांगण्यासाठी या संशोधनात प्राचीन काळापासून शिवकालोत्तर महसूल व्यवस्थांच्या अभ्यासाबरोबरच तीन गावांचा सूक्ष्म अभ्यास केलेला आहे. यातून इनाम, वतन, सनद, विविध प्रकारचे कर हे महसूल व्यवस्थेत अत्यंत महत्वपूर्ण असल्याचे आढळते. तसेच विविध संदर्भग्रंथातून निवडक अशी महसूल विषयक पत्रे निवडून त्या पत्रांच्या आधारे तत्कालीन प्रशासन व्यवस्था आणि महसूल व्यवस्थांचा अभ्यास केला आहे. या अभ्यासातून महसूल व्यवस्थेची काही साधने स्पष्ट झाली आहेत.

१. महसूल व्यवस्थेची साधने- इनाम आणि इनामदारी
२. महसूल व्यवस्थेची साधने- कर व कर वसूली
३. महसूल व्यवस्थेची साधने- प्रशासकीय यंत्रणा किंवा अधिकारी

**१. इनाम आणि इनामदारी** –प्राचीन काळापासून मध्ययुगीन काळात आणि मराठेशाहीतही इनाम, सनद, जहागीर, वतन ही सर्व महसूल व्यवस्थेची अविभाज्य साधने असलेली दिसतात. ऐतिहासिक काळातील अनेक पत्रांमध्ये इनामाचा उल्लेख आलेला दिसतो. या इनामामध्ये अनेक भाग केलेले दिसतात. या सर्व काळांमध्ये राजेशाही शासनव्यवस्था अस्तित्वात असल्याने राजाला विशेष अधिकार असल्याचे किंबहुना राजाने असे अधिकार प्रत्यक्षात आणल्याचे दिसते. कारण या सर्व काळात सत्तेच्या केंद्रस्थानी एकमेव राजा हाच असलेला दिसतो. त्यामुळे त्याच्या ईच्छेनुसार एखादया व्यक्तीला असे इनाम दिले जात असे. आधुनिक काळात लोकशाही शासनव्यवस्था अस्तित्वात असल्याने लोकांच्या विचारातून चालणाऱ्या या व्यवस्थेत असे इनाम अथवा विशेष सवलती देण्याचा अधिकार सत्ताप्रमुखांना प्राप्त झालेला दिसत नाही.

महसूल व्यवस्था ही लोकांच्या सहकार्यातून, सहभागातून अस्तित्वात येत असलेली दिसते. त्यामुळे सर्व काळात लोकांच्या कल्याणाचा विचार करणारी महसूल व्यवस्था अस्तित्वात आणण्याचा राज्यकर्त्यांचा प्रयत्न असलेला दिसतो. लोककल्याणाच्या धोरणाला महसूल व्यवस्थेमध्ये महत्व दिले गेल्याने आजवर ती टिकून राहिलेली दिसते. म्हणजे जर महसूल व्यवस्था लोकांच्या कल्याणाला महत्व देणारी नसेल तर ती लोकांकडून स्विकारली जात नाही, तिचे पालन केले जात नाही. तसेच लोकांच्या श्रध्दांचाही आदर महसूल व्यवस्थेकडून केला जातो हे पंतजलीच्या काळातील गोमांस विक्री बंदीच्या उल्लेखावरुन दिसते.[१]

कराची सक्ती केल्यास लोकांची आर्थिक स्थितीच अशी राहात नाही की लोक कर देऊ शकतील. उदा. ब्रिटिशांनी जमीनदार, दिवाण यांच्यामार्फत महसूल वसूली करण्याचे कार्य करवून घेतले. यातील दिवाण हा मध्यस्त होता. दिवाणाला लोकांच्या उत्पन्नाशी काहीच कर्तव्य नव्हते. त्यामुळे तो शेतकऱ्यांकडून ठरावीक शेतसारा वसूल करण्याचा प्रयत्न करीत असे. जमीनदारांनी देखिल शेतसारा आणि उत्पन्नाचे प्रमाण याचा विचार केला नाही, ब्रिटीशांना देखील याची काळजी नव्हती. त्यांना साऱ्या मधून उत्पन्न मिळवायचे होते. यासर्व प्रकारात शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती बिकट झाली, शेतसारा भरण्यासाठी व्यापारी, सावकार यांची मदत घेतली गेली. त्यामुळे तर शेतकऱ्यांची स्थिती आणखीनच खालावली म्हणूनच छोटा नागपूरमधील शेतकरी महसूल व्यवस्थेला लूट पध्दत म्हणत असा उल्लेख आढळतो.[२] ब्रिटीशांनी यात लक्ष घालून महसूलाची नवीन पध्दत आणण्याचा विचार केला. प्रशासन, राज्य यांच्या मार्फत जनहिताचा विचार केला गेला तर त्यांचा फायदा राज्य अथवा प्रशासनाला होतो अन्यथा त्याचा तोटाही राज्यालाच होतो. म्हणूनच लोकप्रशासनात लोककल्याणाच्या विचाराला अत्यंत महत्व दिले जाते. कौटिल्यानेदेखिल यासाठी जळू, मधमाशी यांच्या उपमा दिल्या आहेत. ज्या मूळ घटकाला त्रासदायक न ठरता स्वतःचा स्वार्थ साधतात तसेच प्रशासनाचे महसूलाबाबत धोरण असावे असे कौटिल्य म्हणतो.

---

१. India in the time of Patanjalis: Dr. B.N. Puri, Bhartiya vidya Bhavan, Bombay, II Ed,1968, p.120. (The sale of certain articles was prohibited as for example beef could not be sold, nor was the sale of sesamum allowed.)

२. The Indian Histrical Review July 81 to Jan 82, vol. VIII, 1-2: The Chota Nagpur Zamindar in the Late Eighteenth Century, J.C. Jha, p.5 (Naturally Farmer called the Chota Nagpur revenue administration a 'plundering system'.)

महसूल व्यवस्थेमध्ये लोककल्याणाला महत्व दिले जात असल्याने सर्व राज्यकर्त्यांनी प्रशासनाच्या मदतीची गरज असणाऱ्या प्रत्येकाला मदत दिलेली दिसते. दुष्काळ, अवर्षण, लढाई, आक्रमण, लूट, स्वाऱ्या अशा अनेक बिकट प्रसंगात लोकांच्या मदतीला जाण्यात प्रशासनाची भूमिका फार महत्वाची असते. आधुनिक काळात ज्याप्रमाणे राज्याकडून शेतकऱ्यांना याबाबत मदत दिली जाते त्याप्रमाणे प्राचीन काळापासून प्रशासन लोकांना अशी मदत देत आहे, असे दिसते. अशी मदत सर्वांना मिळत असे. याशिवाय राज्यातील ज्या लोकांना अर्थाजनाचे साधन नाही, जे राज्यासाठी निष्ठेने कार्य करणारे आहेत, पराक्रमी आहेत, धर्मशास्त्राला उत्तेजन देणारे आहेत, राज्याची सेवा करणारे आहेत. अशा अनेकांना राज्याकडून इनाम, वतन देण्याची पध्दत अस्तित्वात असलेली दिसते. ज्या लोकांना राज्याच्या मदतीची गरज आहे, अशा लोकांना राज्यकर्त्यांनी इनाम, वतन, सनद देऊन मदत दिलेली दिसते. वतन, इनाम देताना ती व्यक्ती राज्याच्या मदतीसाठी उपयोगी असल्यास, चाकरी करत असल्यास, त्याने पराक्रम दर्शविला असल्यास, धार्मिक कार्याला मदत म्हणून, धार्मिक विधी, परंपरा चालू राहाव्यात म्हणून कार्य करणारी असेल तरच इनाम दिलेले दिसते. पण वतन, इनाम, सनद कोणाला तरी मेहेर होऊन दिलेले दिसत नाही. कोणालाही विनाकारण वतन दिले जावू नये. याबाबत सर्व काळात कटाक्ष पाळला गेलेला दिसतो.

एखादयाला वतन, इनाम, वृत्ति, सनद देणे याचा अर्थ त्याला काही अधिकार देणे असा होता. असे इनाम, सनद दिल्यानंतर त्यातून मिळणारे उत्पन्न त्या संबंधीत व्यक्तीला मिळत असे. एखादया गावातील सर्व सारा, कर इनामदाराला मिळत असत किंवा इनाम देताना इनाम तिजाई, चौथाई, निमाई असे प्रकार केलेले दिसतात. त्यातून असे स्पष्ट होते इनाम दिलेल्या भागातील पूर्ण उत्पन्नाच्या चौथा भाग, तिसरा भाग, अर्धा भाग उत्पन्न म्हणून संबंधीत व्यक्तीला मिळत असे आणि उर्वरीत रक्कम त्याला राज्याकडे जमा करावी लागत असे.इनाम, सनद यांचा वापर करुन लोकांना मदत दिली जात असली तरी इनामदाराकडून प्रजेला अन्यायकारक ठरणारी कृती केली गेल्यास त्याचे इनाम काढूनही घेतले जात असे.

ऐतिहासिक पत्रांमध्ये अनेक कारणांसाठी सत्ताधिशांनी इनामे दिलेली दिसतात. इनामे देताना राज्यकर्त्यांनी ती बक्षीसांच्या स्वरुपात दिलेली दिसतात. म्हणूनच इनाम मिळणाऱ्यांनाही तो आपला सन्मान वाटत असलेले दिसते. असे इनाम सरसकट सर्व गावकऱ्यांना दिलेले दिसत नाही तर ज्यांनी राष्ट्रासाठी, सत्ताधीशांसाठी, जनतेसाठी काही

महत्वपूर्ण कार्य केलेले आहे अशा लोकांना आणि ज्यांना मदतीची आवश्यकता आहे त्यांनाच हे इनाम दिले जात असे. यामध्ये कोणत्याही प्रकारच्या कायदयापेक्षा राजाची इच्छा, राजाची कृपा महत्वाची ठरलेली दिसते. यावरुन असे म्हणता येईल की, महसूल व्यवस्थेत राजाची इच्छा, राजाची कृपा याला महत्व दिले जात असे आणि या पध्दतीमधून अनेकांना करापासून सूट मिळत असे. त्यामुळे करापासून मिळणाऱ्या उत्पन्नावरही परिणाम होत असे.

इनाम देताना एखादे जमिनीचे क्षेत्र, गाव, किंवा काही हक्क दिले जात असत. असे इनाम एकाकडून काढून घेऊन दुसऱ्याकडे दिले जात असे किंवा ते वंशपरंपरेने त्याच कुटुंबाकडे ठेवलेले दिसते. हे एक प्रकारे मालकीचे हस्तांतरणच होय. यातून संपत्ती किंवा मालमत्तेवरील मालकीमध्ये बदल होताना दिसतात. परंतू हे बदल होताना कोणत्याही प्रकारचा विरोध झालेला दिसून येत नाही. ऐतिहासिक पत्रांमध्ये असे आढळते की, एखादया ठिकाणची जमिन काही कालावधी पुरती एका व्यक्तीकडे असेल तर तीच जमीन काही कालावधी नंतर दुसऱ्या कोणाला तरी दिली जात असे. पण काही वेळा असेही दिसते की, अनेक पिढयांपासून एकच क्षेत्र एकाच कुटुंबाकडे इनाम दिलेले आहे.

उदा. औंध संस्थानातील पंतप्रतिनिधींनी अनेकांना जे इनाम दिलेले दिसते त्या इनामामध्ये एक किंवा अनेक गावे इनाम दिलेली असली तर त्या गावांचे सर्व प्रकारच्या करांपासूनचे उत्पन्न त्या इनाम दिलेल्या व्यक्तीस मिळत असल्याचे दिसते. त्या बदल्यात त्याने ठरावीक रक्कम राज्याकडे किंवा संस्थानात जमा करावी असा रिवाज असलेला दिसतो. मौजे अवसरी बु।।,तालुका पाबळ (सध्याचे आंबेगाव), पुणे येथील इ.स. १८५३ मधील दस्तऐवजामध्ये मशिदीबद्दल वहिवाटदार असणारे करीमबेग मुलाणा यांना बादशहाने जमीन इनाम दिलेले दिसते पण त्यासाठी मुलाणा यांना सरकारकडे काही रक्कम पटट्री म्हणून जमा करावी लागत असे. म्हणजेच इनाम दिलेल्या जमीनीवरही पटट्री आकारली जात असे. शिवकाळात, मोगलकाळात, पेशवेकाळात तिला इनामपटट्री म्हटले जात असे. या इनामपटट्रीमधून राज्याला ठरावीक रक्कम मिळत असे.

"शिवाजी महाराजांनां "गोब्राम्हण प्रतिपालक" अशी बिरुदावली लावण्यात आलेली दिसून येते. गाय आणि ब्राम्हण हे हिंदू धर्माचे प्रतिक मानले जाते. शिवाजी महाराजांनी या दोघांचेही रक्षण केल्याचे दिसते. ऐतिहासिक पत्रांमध्ये ब्राम्हणांना चरितार्थाकरीता, आणि ब्राम्हणांकडे असणाऱ्या गाईंच्या चाऱ्यासाठी जमीनी इनाम दिलेल्या दिसतात. ज्या ब्राम्हणांना शिवाजी महाराजांकडून अशा प्रकारच्या काही अपेक्षा असत त्यांनी त्या अपेक्षापूर्ततेनंतर

महाराजांनां "गोब्राम्हण प्रतिपालक" म्हणून संबोधण्यास सुरुवात केली. त्यांच्या बिरुदावलीत याचा अंर्तभाव असलेला दिसत नाही त्यांच्या बिरुदावलीत फक्त "क्षत्रिय कुलावंतस" एवढाच उल्लेख आहे."[३]

औरंगजेबाच्या काळातील अखबारांमध्ये मात्र असे दिसते की, त्याची राज्यव्यवस्थेची पध्दत धर्मावर आधारीत होती. त्यामुळे त्याच्या प्रशासनाच्या धोरणामध्ये बळजबरीने धर्मांतर करावयास भाग पाडणे, मंदीर पाडून मशीद उभारणे यासारख्या धर्माशी निगडीत गोष्टींचा उल्लेख असलेला आढळतो.[४]

मध्ययुगीन काळात इनाम देण्यामागे राज्यकर्त्यांचे एकमेव असे धोरण दिसून येते ते म्हणजे राज्यातील जनतेचे हित साधणे, कल्याण करणे हे होय. शिवाजी महाराजांच्या राजमुद्रेत राजकारणाचे सर्व सूत्र सांगितलेले आहे. सन १६४६ च्या सुमारास किंवा त्याच्या अगोदर महाराजांची ही मुद्रा प्रचलित होती. "प्रतिपश्चंद्रलेखेय वर्धिष्णुविश्ववंदिता शाहसूनोः शिवस्यैष मुद्रा भद्राय राजते."

"विश्ववंदिता ठरेल आणि चंद्रकलेप्रमाणे वाढेल ती शिवाजी महाराजांची सत्ता कल्याणासाठी म्हणजेच राज्यातील सर्व लोकांच्या कल्याणासाठी सतत वापरली जाईल, असा राजमुद्रेचा अर्थ असलेला दिसतो."[५]

शिवकाळाप्रमाणे इनाम देण्याची पध्दत प्राचीन काळातही अस्तित्वात असल्याचे दिसते पण इनामापेक्षा कर देण्यामध्ये सवलत देणे, सूट देणे याचे प्रमाण या काळात प्रकर्षाने दिसते. मराठेशाही आणि मोगल काळात इनाम देण्याची पध्दत मोठया प्रमाणात अस्तित्वात आलेली दिसते. ब्रिटिश काळापासून संस्थानांच्या कारभाराला जसजशी खिळ बसू लागली म्हणजेच संस्थानांच्या विलिनीकरणामुळे इनाम देण्याची पध्दत बंद करण्यात आलेली दिसते. कारण संस्थांनिकांना इनाम देण्याचे अधिकारच राहिलेले दिसत नाहीत.

इनाम देण्याची पध्दत आणि त्यासाठी असणाऱ्या कारणांचा मागोवा प्रस्तुत संशोधनातील अर्थ व महसूल विषयक पत्रे या सूक्ष्म अभ्यासाअंतर्गत करण्यात आला आहे.

---

३. मराठे आणि महाराष्ट्र, अ.रा. कुलकर्णी, डायमंड पब्लिकेशन्स,पुणे, प्रथमावृत्ती, जानेवारी २००७, पा. १२१.
४. औरंगजेबाच्या दरबाराचे अखबार,ऐतिहासिक फार्सी साहित्यः ६ वा खंड,संपादक ग.ह.खरे, भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे, १९७३.(प्रकरण ७ मधील अर्थ व महसूल विषयक निवडक पत्रे यातील तक्ता क्र.३५ पहा.)
५. तत्रैव, पा. १२१.

त्यामध्ये जिजाबाईकालीन कागदपत्रे, शिवकालीन पत्रसार संग्रह, सातारच्या प्रतिनिधी घराण्याचा इतिहास, छत्रपती शिवाजी महाराजांची पत्रे या संदर्भग्रंथामधील अनेक पत्रांचे संदर्भ घेण्यात आले आहेत.[o]

एखादयाने लढाईत शौर्य, पराक्रम दाखविला म्हणून इनाम देण्याची प्रथा शिवकाळ, मोगल काळ, मराठेशाहीत अस्तित्वात असलेली दिसते. मराठेशाहीत तसेच मोगल राज्यकर्त्यांनी अनेक सरदारांना आपल्या किंवा त्यांच्या ताब्यात असणाऱ्या प्रदेशाची जबाबदारी सुपूर्द केलेली दिसते. बऱ्याच वेळा असे इनाम एखादा किल्ला, त्याच्या सभोवताली असणारा प्रदेश काही गावांमधील महसूलापासून मिळणारे उत्पन्न हे सर्व दिलेले दिसून येते.

उदा. "शिवकालीन पत्रसार संग्रह" या संदर्भग्रंथातील पत्र क्र.२३४५. इ.स. १५६५ मध्ये अली आदिलशाहाने चोलराज घोरपडे यास त्यांचे वडील लढाईत शौर्य दाखवून मृत्यूमुखी पडल्याने रायबाग व हुकेरीसह ८४ गावांचा भत्ता, मुधोळ आणि वाई परगण्यातील चाळीस गावे, तोरगळ किल्ला तसेच मुदगल परगणा व कल्लूरच्या भोवतालची खेडी **इनाम** दिलेली दिसतात.असेच आणखी एक पत्र "जिजाबाईकालीन कागदपत्रे" या संदर्भग्रंथात पत्र क्र.२४४आढळते. त्याप्रमाणे प्रसिध्दगडच्या लढाईमध्ये संताजी जाधव या हवालदाराचा भैरवजी हा मुलगा मृत्युमुखी पडला म्हणून करवीरच्या महाराणी जिजाबाई यांनी २४-२-१७६९ मध्ये मौजे लिंगनूर, प्रांत रायबाग हा गाव **इनाम** दिला. त्यासंबंधीचे पत्र त्यांनी मुकादमास लिहिलेले दिसते. अशा प्रकारेच "जिजाबाईकालीन कागदपत्रे" या संदर्भग्रंथात पत्र क्र. ८१ मध्ये कलगोंडा बिन सिदगोंडा पाटील मौजे लिंगनूर यास सेनापती राणोजी घोरपडेंच्या हल्ल्यात पराक्रम गाजविल्याबदद्ल लिंगनूरच्या मुकादमाने (जिवराज शिदें याने) सहा बिघे जमीन **इनाम** दिलेली दिसते. जिजाबाईंकडून असेच आपाजी जाधव यास मौजे बालिंगे या गावातील १० बिघे भात जमीन इनाम दिल्याचे "जिजाबाईकालीन कागदपत्रे" या संदर्भग्रंथात पत्र क्र. २१४ मध्ये दिसते. त्या पत्रातही जाधव यांनी इंग्रजांकडून सिंधूदुर्ग किल्ला परत घेण्याच्या वेळी दाखविलेल्या

---

o छत्रपती शिवाजी महाराजांची पत्रे :प्र.न. देशपांडे, सुषमा प्रकाशन, धुळे, पहिली आवृत्ती, १९८३.
o जिजाबाईकालीन कागदपत्रे :संपा. डॉ. अप्पासाहेब पवार, शिवाजी विद्यापीठ, ऐतिहासीक ग्रंथमाला, १९७८.
o ऐतिहासिक फार्सी साहित्य सहावा खंड,(औरंगजेबाच्या दरबाराचे अखबार) :संपा. प्रा. ग.ह. खरे, सहसंपा गो.त्र्यं. कुळकर्णी , भारत इतिहास संशाधक (एकूण ६०० पत्र)/ मंडळ स्वीय ग्रंथमाला क्र. १०६. इ.स. १९७३.
o शिवकालीन पत्र सार संग्रह,खंड ३ :संपा. शंकर नारायण जोशी, प्रकाशक भा.इ.सं. मंडळ, पुणे इ.स. १९३७.
o सातारच्या प्रतिनिधी घराण्याचा इतिहास ग्रथांक १, २, ३ रा अनंत नारायण भागवत व रा वामन परशुराम मेंहेदळे, औंध स्टेट प्रेस, औंध.

अपूर्व पराक्रमामुळे हे **इनाम** देण्यात आल्याचा उल्लेख आढळतो. दादशेट वायकूळ यांनी विशाळगडच्या वेढयात विशेष मदत केली म्हणून त्यांना परशुराम पंडित प्रतिनिधींनी सरमहाजनकी आणि कसबे व महाल विशाळगड हे सर्व **वतन** करुन दिलेले "सातारच्या प्रतिनिधी घराण्याचा इतिहास" या गौरवग्रंथांकात दिसते.राज्यातील ब्राम्हणांना, दीनदुबळयांना कृपा बक्षीस म्हणून इनाम देण्याची पध्दत मोगलकाळात आणि मराठेशाहीतही आढळते. "आपले राज्य म्हणजे श्रींचा प्रसाद होय" अशी भावना धर्मावरील करुन दिलेले सातारच्या प्रतिनिधी घराण्याचा इतिहास या गौरवग्रंथांकात दिसते.

राज्यातील ब्राम्हणांना, दीनदुबळयांना कृपा बक्षीस म्हणून इनाम देण्याची पध्दत मोगलकाळात आणि मराठेशाहीतही आढळते. "आपले राज्य म्हणजे श्रींचा प्रसाद होय" अशी भावना धर्मावरील श्रध्देबाबत शिवाजी महाराजांनी ठेवली होती.[६] या भावनेतूनच त्यांनी अनेकांना सनदा आणि नेमणूका दिलेल्या दिसतात. वेदमुर्तीनां, पंडितांना आपली नित्यधर्मकृत्ये निर्वेधपणे करता यावीत म्हणून त्यांच्या योगक्षेमाची काळजी सरकार घेत असे. राजाकडून जे काही मिळेल ते घेऊन त्यातून स्नान संध्या व आपला चरितार्थ चालवून राजाचे कल्याण चिंतून त्यांनी सुखरुप असावे अशी राज्यकर्त्यांची अपेक्षा असे.

औंध संस्थानामधील प्रतिनिधी घराण्यातील संस्थानिकांनी देवस्थानास मदत, जीर्णोध्दार, चरितार्थ पाहण्याचे स्विकारलेले आढळते. सातारच्या प्रतिनिधी घराण्याचा इतिहास या गौरवग्रंथातील पत्र क्र. ५ मध्ये श्री. आनंदेश्वर (गोटे) व श्री. संगमेश्वर (कराड) या देवस्थानांची स्थापना व जीर्णोध्दार करण्या साठी व खर्चासाठी देशमुख व देशपांडे यांना (कराड) शाहू छत्रपतींकडून प्रतिनिधींनी दोन चावर जमीन **इनाम** दिलेली आढळते.

"सातारच्या प्रतिनिधी घराण्याचा इतिहास" या गौरवग्रंथातील पत्र क्र. ३ मध्ये देवस्थानाच्या खर्चासाठी सहा गावांमधील राजाची खाजगी जमीन १(शेरी) व बागा या जमीनींवरील सर्व उत्पन्न माहूलीच्या श्री विश्वेश्वर देवळाचे पुजारी अनंतभट पाणदरे यांना सन १८१२-१३ मध्ये **इनाम** देण्यात आलेले दिसते. श्री कृष्णामाईचा उत्सव व बारमाही खर्च चालविण्यासाठी मौजे केसे, ता. हवेली, प्रांत कराड येथील रा. अंताजी भैरव यांच्याकडे एकूण जमा पैशांवर शेकडा चार आणे **कच्चा आकार दरसाल** दिला जावा अशा आशयाचे एक आज्ञापत्र सातारच्या प्रतिनिधी घराण्याचा इतिहास या गौरवग्रंथातील पत्र क्र१३ मध्ये

६. शिवकालीन महाराष्ट्रः डॉ. अ.रा. कुलकर्णी, राजहंस पब्लिकेशन, पुणे, १९९७, पान ४६.

दिसते. यावरुन असे म्हणता येईल की उत्सव आणि देवस्थानाच्या खर्चासाठी अशा प्रकारचा **सादिलवार कर** आकारला जावून त्यातून तो खर्च पाहिला जात असावा.

राजश्री शिवाजी महाराजांनी ज्याप्रमाणे ब्राम्हणांना अशी देवस्थानासाठी आर्थिक मदत दिली होती तशी ती मुस्लिम बांधवांनाही दिलेली दिसते. छत्रपती शिवाजी महाराजांची पत्रे या संदर्भग्रंथातील पत्र क्र.२२ प्रमाणे शिवाजी महाराजांनी पुणे प्रांतातील मौजे भांबवडे येथील मुला अली बिन मुला अब्दुला यास मशीदीच्या व्यवस्थेसाठी भांबवडे हा गाव इनाम दिलेला दिसतो. इनाम जमिनीच्या आणि पैशाच्या स्वरुपात दिला होता. तसेच रोशणाई साठी मशिदीला रोज पावशेर तेल **जकाती**तून उपलब्ध करुन देण्याची व्यवस्था करण्याच्या सुचना पुण्याच्या कारकून आणि देशमुखांना दिलेल्या दिसून येतात.

शिवकालीन पत्रसार संग्रह या संदर्भग्रंथातील पत्र क्र.२५४८ प्रमाणे त्रिंबक राजे यांनी परगणा इंदापूरच्या वायेवाडी कर्यातीच्या कारकून, देशमुख, मुकादमास लिहिलेल्या या पत्रातील तरतुदीप्रमाणे काजी अबन काजी हाजीज यास मशीदीकरीता फक्त ३ चावर जमीन व रोज तेल असे **इनाम** दिल्याचा उल्लेख सापडतो. शिवाजी महाराजांनी मोरेश्वर गोसावी (चिंचवड) चाफळचे रामदास स्वामी, पाटगावचे मौनी बाबा यांना मराठी राज्यात सनदा आणि नेमणूका दिलेल्या दिसतात. त्या सर्वांमागे एकमेव उद्देश होता तो म्हणजे "श्रींच्या ईच्छेने हे राज्य निर्माण झाले आहे" आणि श्री म्हणजेच देवाच्या सेवेत असणा-या प्रत्येकाला राज्याने मदत दयायलाच पाहिजे. अगदी यासारखाच दृष्टीकोन मुस्लिम राज्यकर्त्यांचा होता असे नाही पण मलिकअंबरच्या बरोबर आदिलशाही, कुतुबशाही मधील मोगल सत्तांधीशांनीही अशी धर्मादाय मदत दिलेली आढळते. शिवकालीन पत्रसार संग्रह या संदर्भ ग्रंथातील पत्र क्र.२५२९ प्रमाणे मोरेश्वर गोसावी या चिंचवडच्या पुजाऱ्यास इ.स. १६४७ मध्ये रणदुल्लाखान याने कल्याण मामल्यातील तपे चोण पैकी १ लारी (नाणे) **नेमून** देवून त्यांची व्यवस्था लावण्याच्या सूचना संबंधित देशमुख, कारकून अधिकाऱ्यांना दिलेल्या दिसतात. शिवकालीन पत्रसार संग्रह या संदर्भग्रंथातील पत्र क्र.२४९२ प्रमाणे दादोजी कोंडदेव यांनी इ.स. १६४४-४५ मध्ये मोरेश्वर गोसावी यांना ·॥· गजशेरायनी **नख्त खर्चपट्टी**सह धर्मादाय जमीन **इनाम** देण्यात आलेली आढळते.

खंडोजी राजे घोरपडे यांनी मौजे लोणीच्या कारकून व हुद्देदारास इ.स. १६४४ मध्ये असेच एक पत्र लिहिलेले शिवकालीन पत्रसार संग्रह या संदर्भग्रंथात (पत्र क्र.२५००) आढळते, यात मोरेश्वर गोसावी यास १ चावर गजशेरायनी जमीन **नख्त महसूलासह**

दिल्याचा उल्लेख आढळतो. शिवकालीन पत्रसार संग्रह या संदर्भग्रंथातील पत्र क्र.२५०२ प्रमाणे चौलच्या कारकूनास इ.स. १६४५ मध्ये रुस्तूमेजमाने पत्र देवून मोरेश्वर गोसावी यास मलिक सैदच्या खुर्दखताप्रमाणे **महसूल, जरिबे** (जमीनीची मोजणी)**, जकात** आणि **इतर पट्टया** यातून ३ हूरमुजी लारी देण्याच्या सूचना दिलेल्या दिसतात. शिवकालीन पत्रसार संग्रह या संदर्भग्रंथातील पत्र क्र.२५०३ प्रमाणे इ.स. १६४५-४६ मध्ये मामले मुरंजन म्हणजे सध्याचे कल्याणमधील कर्यात बदलापूरपैकी तपे चोण येथील कारकून अधिकाऱ्यास पत्राद्वारे मोरेश्वर गोसावी यास **इतर पट्टया व करांमधून** १ लारी पूर्वीप्रमाणे आणि नवीन वर्षापासून अर्धी (१/२) लारी **जकातीतील** व अर्धी (१/२) लारी **नख्त** (रोख**) महसूलातील** देण्याच्या सूचना दिलेल्या आढळतात.

शिवकालीन पत्रसार संग्रह या संदर्भग्रंथातील पत्र क्र.२५०४ प्रमाणे मौजे मायेवाडी तर्फ कऱ्हेपठार हे गाव इ.स. १६४५ मध्ये मोरेश्वर गोसावी यांच्याकडे **इनाम** असलेले दिसते. शिवकालीन पत्रसार संग्रह या संदर्भग्रंथातील पत्र क्र.२५१२ मध्ये सुपे परगण्याच्या मौजे लोणीतील बाराऊ करडियाच्या हुद्देदारास शिवाजी राजांनी लिहिलेल्या पत्रात मोरश्वर गोसावी यास मौजे लोणीची १ चावर जमीन **हल्ली** (सध्या) व **पेस्तर**(भविष्यातील) **पट्टयांसह, तेजीपट्टी** (वाढीव कर) दिलेले दिसतात. इ.स. १६४७-४८ मध्ये पुणा परगण्यातील ७ रुके जमीन मोरेश्वर गोसावी यांस **इनाम** दिल्याचे पत्र शिवाजी महाराजांनी कारकून व देशमुखास लिहिलेले शिवकालीन पत्रसार संग्रह या संदर्भग्रंथात पत्र क्र.२५२० यामध्ये दिसते. यात शिवाजी महाराजांनी कल्याण साधण्याच्या हेतूने जमिनीतील धान्य, ब्राम्हणमुखी घालण्यासाठी **इनाम** दिल्याचा उल्लेख आढळतो.

श्री. मोरेश्वर गोसावी यासारख्या ब्राम्हणांना शिवाजी महाराजांनी इनाम दिलेल्या जमिनींचे हक्क प्रत्येक वर्षी नव्याने देण्याची पध्दत असलेली दिसते. त्यामुळे निरनिराळया सत्ताधिशांनी किंवा राज्यकर्त्यांनी लिहिलेल्या पत्रांमध्ये मोरेश्वर गोसावी यांना इनाम दिल्याचा उल्लेख वर्षानुवर्षे असलेला आढळतो. एकाच ठिकाणचे इनाम एकाच व्यक्तींकडे अनेक वर्षांसाठी दिलेले या पत्रांच्या आधारे दिसून येतो.उदा.मौजे लोणी येथील १ चावर जमीन **इनाम** दिल्याचा उल्लेख इ.स.१६४४, इ.स.१६४६-४७, इ.स.१६४९ अशा अनेक वर्षांमधील पत्रे छत्रपती शिवाजी महाराजांची पत्रे या संदर्भग्रंथामध्ये सापडतात.

तपे चोण येथील १ लारी **जागा** नेमून दिल्याचा उल्लेखही असाच इ.स.१६४५-४६,मार्च १६४७, मे १६४७ मधील अनेक पत्रांमध्ये आढळतो. म्हणजेच असे इनाम देताना प्रत्येक वर्षी त्याची लेखी नोंद घेतलेली दिसते.

राज्यकर्त्यांनी काही लोकांना किंवा सरदारांना मोकासा (वसुली हक्क), मिरासीचा हक्क (मिरासीचा हक्क म्हणजे भेट म्हणून मिळालेला किंवा खरेदी केलेला पिढीजात आणि हस्तांतरणीय अधिकार) दिलेला दिसतो. याबरोबरच त्यांना कृपा बक्षीस म्हणून मोकासा व मिरासीचा हक्क किंवा गावाचे इनाम वंश परंपरेनेही दिलेले दिसतात. मराठेशाहीत व मोगल काळात समाजातील गरीब आणि दुबळया लोकांना त्यांच्या चरितार्थाकरीता असे कृपा बक्षीस देण्याची पध्दत अस्तित्वात असलेली दिसते. एखाद्या व्यक्ती अथवा अधिकाऱ्याला असे इनाम देताना बऱ्याचदा राज्यकर्त्यांनी अनेक प्रकारच्या करांपासून मिळणारे उत्पन्न आणि हक्क देखिल इनामासह दिलेले दिसतात. उदा. संभाजी भोसले या इंदापूर प्रांतातील देशमुखास श्री शिवाजी महाराज यांनी मौजे बोरी येथील **मोकासा**(सरकारी उत्पन्नावरचा हक्क) आणि पावणे पाच चावर जिरायती जमीन **इनाम** दिलेली छत्रपती शिवाजी महाराजांची पत्रे या संदर्भग्रंथातील पत्र क्र.७ प्रमाणे आढळते. या प्रांतातील **वाजेपट्टी**, (इतर पट्टया) **महसूल, वेठबिगारी** (मोबदला न देतां काम करुन घेण्याचा हक्क) इ.चे मिरासी अधिकार आणि जिरायती २२ चावर व बागायती १५ चावर जमीन दिलेली दिसते. हे सर्व बक्षीस खरंतर कृपा बक्षीस म्हणून देण्यात आलेले दिसते. छत्रपती शिवाजी महाराजांची पत्रे या संदर्भग्रंथातील पत्र क्र.२७ मध्ये कसबे पुणे येथील श्री विनायक भट बिन रामकृष्ण भट ठकार यास मौजे सुंस (मावळ कर्यात) हे गाव शिवाजी महाराजांनी कृपा बक्षीस म्हणून **इनाम** दिलेले आढळते. असेच एक पत्र छत्रपती शिवाजी महाराजांची पत्रे या संदर्भग्रंथातील पत्र क्र. ३९ प्रमाणे शिवाजी महाराजांनी नारायण त्रिमल दीक्षित यांना मौजे बाणेरे तर्फ हवेली पुणा परगणा येथील १ खेडे कृपा बक्षीस म्हणून **इनाम** दिलेले दिसते. हे इनाम देताना पुढील काही कर किंवा अधिकार दिलेले दिसतात. यात **नख्तयाती** (वस्तू किंवा रोख स्वरुपातील वसूली), **महसूल, सादिलवार**( धर्मादाय कर), **खर्चपट्टी** (सार्वजनिक कामासाठी लागणाऱ्या खर्चासाठी प्रतिवर्षी रयतेकडून वसूल केला जाणारा कर), **पायपोसी** (चांभाराकडून दरवर्षी १ पादत्राणांचा जोड मोफत देणे), **दसरापट्टी** (दसरा सणासाठी प्रत्येक घरातून कुवतीप्रमाणे वर्गणी (सार्वजनिक) गोळा केली जात असे.), **ठाणेपट्टी** (गावावरील ठाण्याचा खर्च भागविण्यासाठी बसविलेली पट्टी), **हुजूरभेटी** (उच्च अधिकाऱ्यांना देण्यात येणाऱ्या भेटी),

**मोहिमपट्टी** (मोहिमेचा खर्च भरून काढण्यासाठी गावकऱ्यांना दयावा लागणारा प्रासंगिक कर), **बेलेकटी** (व्यापारी धंदयाच्या दृष्टीने बाजारपेठेत कट्टे भाडयाने देतानाचे भाडे किंवा शुल्क), **तंबाखू** (परगण्याच्या अधिकाऱ्यांची धूम्रपानाची सोय करण्यासाठी रयतेकडून तंबाखू वसूल करणे), **अश्वजकाती** (घोडयावरून माल वाहून नेल्यास बैलावरील जकातीच्या अर्धी जकात दयावी लागत असे) **ठाणबंदी आडपाली** (एक कर) इ. सर्व अधिकार **हल्लीपट्टी** (सध्या घेतले जाणारे कर) व **पेस्तरपट्टी** (भविष्यकाळात घेतले जाणारे कर) कृपा बक्षीस म्हणून दीक्षीत यांना देण्यात आलेले दिसतात. शिवकालीन पत्रसार संग्रह या संदर्भग्रंथातील पत्र क्र. २३६६ नुसार इ.स. १५९७ ऑगस्ट १५ मध्ये येकतारखान याने परगणे न्यामताबादचे कारकून व खोत यांना स्पष्ट केले आहे. यात दंतभट बिन पद्माकर भट कसबे चांदवड यांना परगणे न्यामताबाद रूके १ नक्त व तेल वजन १ (परिमाणाचा उल्लेख नाही)असे **इनाम** दिलेले दिसते. रा. मोरेश्वर गोसावी यास दररोज १ लारी **इनाम** शहाजी राजांनी दिलेला दिसतो. हे इनाम अमिनाबाद म्हणजेच पालीच्या **खारीज**(एक कर) **जकाती, महसूल** इ. मधून देण्याच्या सूचनाही शहाजी महाराजांनी पालीच्या कारकूनास दिल्याचा उल्लेख "शिवकालीन पत्रसार संग्रह" या संदर्भग्रंथात पत्र क्र. २४४५ मध्ये आढळतो. शिवाजी महाराजांची बाबाजी झुंजारराव देशमुख तपे कानद खोरे यास मौजे कोंढावळेचा २४०।।५ हा **नख्त महसूलाच्या १०टक्के इनाम** दिलेला होता. याशिवाय नख्त १००टके देऊन मौजे साकर नावे इनाम दिलेलेही "शिवकालीन पत्रसार संग्रह"या संदर्भग्रंथात पत्र क्र.२५६९मध्ये दिसते.[७]

औंध संस्थानामधील काही जमीनीही अशाच इनाम दिलेल्या आढळतात. औंध संस्थानातील पंतप्रतिनिधींनी श्री. शाहू छत्रपतींकडून काही गरजूनां, ब्राम्हणांना असे इनाम दिलेले दिसते. म्हणजेच गरजूंना इनाम देताना पंतप्रतिनिधींनी जरी ते इनाम दिलेले दिसत असले तरी त्यावर शिक्का मोर्तब मात्र शाहू छत्रपतींचे असलेले दिसते. त्याबरोबरच या संस्थानांत इनाम दिलेल्या जमीन अथवा गावांमध्ये **"स्वराज्य व मोगलाई अंमल"** एकूण दुतर्फा खेरीज इनाम असा उल्लेख आढळतो. यातील दुतर्फा शब्दाचा अर्थ स्वराज्य व मोगलाई या दोन्ही सत्ता काळात त्या सत्ताधिशांना यावर काहीही हक्क सांगता येणार नाहीत असा असावा. मौजे खेड येथील वेदमूर्ति नारायण भट बिन आमण भट उपनाव गलंडे

७. शिवकालीन पत्रसार संग्रह,खंड ३, सं. शं. ना. जोशी, भारत इतिहास संशोधक मंडळ,पुणे,१९३७,पत्र क्र. २५६९.या पत्रात वापरलेला टके म्हणजेच टका हे या काळातील चांदीचे नाणे होते. रूपया - आणे – टका – दाम अशा प्रकारची नाणी त्याकाळी प्रचलित होती. १ टका - ४८ रूके (पे. द. ३१:१९) (शिवकालीन महाराष्ट्र, पान १७२)

यांना श्री शाहू छत्रपतींनी २० बिघे जमीन **इनाम** दिलेली दिसते. हे इनाम **सर्व कर, धारा, जकात** यांपासून मिळणाऱ्या सर्व उत्पन्नासह (**कुलबाब व कुलकानू सह**) **हल्लीपट्टी व पेस्तरपट्टी** ( सध्या आणि भविष्यकाळातील **सर्व करांसह**, **स्वराज्य व मोगलाई** या दोन्ही सत्तांमध्येही पूर्णतः गलंडे यांना दिल्याचा उल्लेख "सातारच्या प्रतिनिधी घराण्याचा इतिहास या गौरवग्रंथांकातील पत्रात आढळतो." याच गौरवग्रंथांकात पत्र क्र.११ मध्ये उमाजी गोपाळ गोसावी यांना मौजे दरजाई-खटाव प्रांतातील, दहा बिघे जमीन **इनाम** दिल्याचे आज्ञापत्र परशुराम श्रीनिवास प्रतिनिधी यांनी दिलेले दिसते. पण इनाम दिलेल्या गावाचा वसूल गावकरी व्यवस्थितपणे गोसावींकडे देत नसल्याने मागील बाकी आणि भविष्यातील वसूल गोसावींना दयावा असे ताकीद देणारे पत्र प्रतिनिधिंनी लिहिलेले आढळते. म्हणजेच प्रतिनिधींनी फक्त इनाम दिले एवढचे नव्हे तर त्याची अमंलबजावणी सुरळीत व्हावी हे देखिल पाहिलेले दिसते. दि. १४-११-१७१४ मध्ये वेदमूर्ती रा विश्वनाथ भट बिन केशवभट दिवेकर यांना मौजे अरे तर्फ मार येथील अव्वल जमीन १५, दुम जमीन १०, सीम जमीन ५ एकूण पाव चावर जमीन परशुराम त्र्यंबक यांनी **इनाम** दिलेली दिसते. या सर्व जमीनीवरील सर्व पट्टया, कर सध्याच्या आणि भविष्यातील पट्टया (**हल्लीपट्टी व पेस्तरपट्टी**), तिसऱ्या भागासह (**तिजाई**)दिवेकर यांना दिलेल्या "सातारच्या प्रतिनिधी घराण्याचा इतिहास" या गौरवग्रंथांकात पत्र क्र.१७ मध्ये दिसतात. "छत्रपती शिवाजी महाराजांची पत्रे"या संदर्भग्रंथात पत्र क्र.१३ प्रमाणे पुरंदरे यांना १९ जुलै १६४७ रोजी मौजे पर्वती बरोबरच पिंपरी आणि १ होन – १० १/२ टके किंवा १२ १/२ टके किवा १३ टके . दरातील हे फरक नाण्याचे वजन अथवा इतर काही कारणांनी होत असले तरी हे नाणे चलनात होते हे यातून स्पष्ट होते. पिंपळे सौदागर येथील प्रत्येकी १ चावर जमीन **इनाम** दिलेली दिसते. यात येथील दिवाबत्तीसाठी महालातील **जकातीपासूनचे ३ रूके** दररोज देण्याचा उल्लेख आढळतो. त्याशिवाय पत्र क्र. १६ प्रमाणे राजश्री शिवाजीराजे यांनी पुणे प्रांतातील महादभट बिन मुदगलभट पुरंदरे यास मौजे पर्वती येथील १ चावर जमीन मलिक अंबरपासून **इनाम** असल्याने तशीच इनाम दिलेली दिसते. अशाच प्रकारे याच संदर्भग्रंथात गणेश भट बिन मल्लारीभट भगवंत मोरया यांना मौजे मोरगाव येथील ·॥· (निमे) चावर जमीन इ.स. १६४७ मध्ये शिवाजी महाराजांनी **इनाम** दिलेली दिसते. ही पत्रे संबंधीत म्हणजे पुणे प्रांताच्या कारकून व देशमुखांना शिवाजी महाराजांनी लिहिलेली दिसतात. असेच

एक पत्र छत्रपती शिवाजी महाराजांनी प्रांत पुण्याच्या कारकून, देशमुख, देशकुळकर्ण्यांना दिलेले दिसते. “छत्रपती शिवाजी महाराजांची पत्रे” या संदर्भग्रंथात पत्र क्र.२४ मध्ये भिकाजी बिन सूर्याजी डिमला (ता खेडबारे) यांना मौजे सिवरे व मौजे कल्याण येथील १२ बिघे जमीन इनाम दिले असलेले आढळते. शिवाजी महाराजांनी बारामतीच्या कारकूनास लिहिलेल्या पत्रात कर्यात बारामतीच्या अनाजी दत्तो मुतालीक धर्माजी काटे यांना २ चावर जमीन व कास रूका १ **इनाम** दिलेले पत्र क्र.२५ छत्रपती शिवाजी महाराजांची पत्रे या संदर्भग्रंथात आढळते. “छत्रपती शिवाजी महाराजांची पत्रे” या संदर्भग्रंथातील पत्र क्र.३० प्रमाणे कृष्णभट बिन मुरारी भट ब्रम्हे कसबे चाकण यांना १ चावर जमीन, बागायती थल नाणेकर ९ खंडीपैकी ३ खंडी **इनाम** राजश्री शिवाजी राजे यांनी दिलेले दिसते. यात त्यांनी **महसूल** (रोख सारा),**सैलबैल** (वाहतुकीच्या कामासाठी वापरलेल्या जनावरांवरील कर), **पायपोसी** (पादत्राणांचा एक जोड देणे), **खर्चपट्टी** (सार्वजनिक कामासाठी लागणाऱ्या खर्चासाठी लावलेला कर), **उंटपट्टी** (वाहतुकी साठी वापरलेल्या दर उंटावर आकारला जाणारा कर), **वेठबिगारी** ( मोफत चाकरी करुन घेणे )इ. सर्व कर देशमुख व ब्रम्हे यांनी वाटून घेणे आणि **इनाम** जमिनीवर आंबे, चिंचा, अशी झाडे लावल्यास त्यातून **राजभाग** सध्या आणि भविष्यातही वसूल करावा असे म्हटल्याचे आढळते. महाराणी जिजाबाईंनीही आमणभट बिन रामभट उपनाम जेरे यांना कसबा सिरीहट्टी प्रांत मिरज येथील जमिनीची सनद करुन **इनाम** दिलेले “जिजाबाईकालीन कागदपत्रे” या संदर्भग्रंथातील पत्र क्र.७ मध्ये आढळते.करवीरच्या महाराजांकडून मातुश्री अनुताई यांना आजऱ्याची सनद करुन दिलेली आढळते. “जिजाबाईकालीन कागदपत्रे” या संदर्भग्रंथातील पत्र क्र.१५ मध्ये नानासाहेब पेशवे यांनी इचलकरंजीचे घोरपडे यांना २४-७-१७५३ रोजी दिलेले दिसते. याच संदर्भग्रंथात अशा प्रकारचे आणखीन एक पत्र (पत्र क्र.१६)परगणे हुकेरीच्या खेळोजी निंबाळकर-देसाई यांच्याकडून शेषो नारायण यांना दिलेले दिसते. या पत्राद्वारे मौजे बळकाड, कसबे कबूर हा गाव १-१०-१७५३ रोजी **इनाम** दिलेला दिसतो.  असेच आणखीन १ **इनाम** गाव म्हणजे मौजे बालिंगे (परगणा कागल) श्री शेषो नारायण यांना बाळाजी प्रधान यांनी दिलेले “जिजाबाईकालीन कागदपत्रे” या संदर्भग्रंथातील संदर्भातून दिसते.

दि.२२-७-१७६३ रोजी नरसिंगराव दळवी व जिवाजी रघुनाथ (किल्ले पन्हाळा) यांना महाराणी जिजाबाईंनी दिलेल्या एका पत्रात चंद्रशेखर भट यांना मौजे चरण तालुका सातवे

येथील ५ बिघे जमीन **इनाम** दिल्याचा उल्लेख आढळतो. परंतू या इनामाची वसूली गावकरी सुरळीतपणे चालवित नाहीत. म्हणून महाराणी जिजाबाईंनी ताकीदपत्र दिलेले "जिजाबाईकालीन कागदपत्रे" या संदर्भग्रंथातील पत्रातून आढळते. "जिजाबाईकालीन कागदपत्रे" या संदर्भग्रंथातील करवीर राजमंडळाच्या एका आज्ञापत्रांद्वारे १४-६-१७६५रोजी आबाजी नरसगोंडा टारे यास ५ बिघे जमीन व बेटाचा निम्मा भाग त्यांचे **इनाम** दिल्याचा उल्लेख आढळतो. "जिजाबाईकालीन कागदपत्रे" या संदर्भग्रंथातील पत्र १९६ प्रमाणे पेशव्यांनी जिवाजी तुकदेव कुलकर्णी यास मौजे मळगे बुद्रुक येथील ६ बिघे जमीन त्यांचे **इनाम** दिलेली दिसते. यासंबंधीचे पत्र जिवाजी जाधव या मुकादमास इ.स.१७६५ मध्ये दिलेले दिसते. करवीरच्या शिवाजीराजांनी मौजे चांदोली ता. मलकापूर येथील बापू पाठक यांना मौजे चांदोली हा गाव **इनाम** करुन दिलेला दिसतो. महाराणी जिजाबाईंकडून खंडेराव पारसनिवीस यांस मौजे खाटांगले येथील दोन बिघे जमीन **इनाम** देण्यात आलेली "जिजाबाईकालीन कागदपत्रे" या संदर्भग्रंथामध्ये दिसते.

पूर्वापार चालत आलेले इनाम चालू ठेवण्यासाठी दरवर्षी नव्याने इनाम करुन देण्याची पध्दत अस्तित्वात असलेली दिसते मध्ययुगीन राज्यकर्त्यांमध्ये मोगल, मराठा, पेशवे यांनी पिढीजात अधिकारांना मोठया प्रमाणात महत्व दिलेले दिसते. त्यामुळेच आधीपासून वतन किंवा इनाम एखादयाकडे असेल तर त्याच्याकडेच ठेवण्याची पध्दत मोगलांनी सुध्दा अस्तित्वात ठेवलेली दिसते. "शिवकालीन पत्रसार संग्रह" या संदर्भग्रंथात पत्र क्र. २४३९ प्रमाणे मालोजी नरसिंगराऊ वा विठोजी सितोला देशमुख यास **सनद** देण्यात आलेली दिसते. या सनदेप्रमाणे मामले दौलतमंगल येथील **जकातींतून मिळणारे उत्पन्न** त्यांना मिळत असे. तसेच चौत्रे दौलतमंगल, लोहगाव, चिंचोली, पाटस वा राजोरी याबरोबर मार्ग भरे व मार्ग अगळंबे येथील **एक उभा मार्ग व थलभरीत थलमोड किराणा, मीठ, व इतर बाबींवर** निजामशाही पासून अस्तित्वात असणारे **अधिकार** तसेच पुढे चालविण्याची दुरुस्ती करण्यात आलेली आढळते. "शिवकालीन पत्रसार संग्रह" या संदर्भग्रंथात पत्र क्र.२४३८ प्रमाणे गोपाळ जोशी तपे खारेपाटण याला **गावगन्ना इनाम** म्हणून दर गावची वर्षाची रक्कम (**सालिना**) १ लारी पूर्वीपासून चालू आहे ती तशीच चालू ठेवण्याविषयीचे पत्र खारेपाटणच्या दिवाणांनी खोत, गावकरी व बितिंक्चीनां दिलेले दिसते. "शिवकालीन पत्रसार संग्रह" या संदर्भग्रंथात पत्र क्र. २४५६ प्रमाणे इंदापूर परगण्यातील बायेवडेचे दिवाणाने मुकादमाला लिहिलेल्या

पत्रानुसार काजी अबन काजी हापीज परा याला दररोज ३ चावर तेल पूर्वीपासून दिले जात असे. त्याचा कागद हरविल्याने काजीने पुन्हा अर्ज केल्याप्रमाणे हे **इनाम** चालवण्याच्या सूचना देण्यात आलेल्या दिसतात.

ज्याप्रमाणे पूर्वीपासून असणारे इनाम नवीन राज्यकर्त्यांकडून चालविले जात असे तसेच ज्यांच्याकडे इनाम गावे नाहीत किंवा अर्थाजनाचे साधन नाही म्हणून अशा लोकांना **नव्याने इनाम देण्याची प्रथा** मराठेशाहीत आणि मोगल काळात असलेली दिसते. "शिवकालीन पत्रसार संग्रह" या संदर्भग्रंथात पत्र क्र. २३४८ प्रमाणे अली आदिलशाह यास कुकदे प्रभू बिन भाइदे प्रभू देसाई तपे सालसी यांनी विनंती केली की सालसी तप्यातील इतर देसायांकडे इनाम गावे आहेत पण भाइदे यांना इनाम नसल्याने त्यांनी मागणी केल्याप्रमाणे मौजे ओटव हे गाव **इनाम** दिलेले दिसते. या बदल्यात भाइदे यांनी २५० होन **चौथाई** देण्याचे कबूल केलेले आढळते.

एखादया ठिकाणी नवीन वाडी वसविण्याबाबतची सनद दिल्यास त्याबरोबरच इनाम देण्याची प्रथा अस्तित्वात असलेली दिसते. मराठा राज्यकर्त्यांनी अशा प्रकारे अनेकांना इनाम दिलेले दिसते. नवीन वाडी वसविण्याची जबाबदारी ज्याच्यावर असे त्याला काही पैसे खर्च करावे लागत असावेत, त्यासाठी त्याला राज्यकर्त्यांनी इनामाच्या स्वरुपात मदत दिलेली दिसून येते. ज्याला अशी सनद देण्यात येत असे त्याला जमिनीच्या इनामाबरोबरच इतर स्वरुपाची मदत केलेली ही आढळते. उदा. "जिजाबाईकालीन कागदपत्रे" या संदर्भग्रंथातील पत्र क्र.३१४ या पत्रात भुसाजी हणबर खोत यास महाराणी जिजाबाईंनी इ.स. १७७१ मध्ये नवीन वाडी वसविण्या बाबतची **सनद** दिलेली दिसते. या सनदेत खोतांनी पाळावयाच्या अटींचा आणि हक्कांचा समावेश असलेला दिसतो. खोताला यासाठी ७५ रु खर्च करावे लागले असावेत त्या बदल्यात त्याला जिजाबाईंनी पड व नवीन लागवडीसाठी ५ बिघे जमीन, १ घर, व १ म्हैस आणि लक्ष्मीदेवीच्या पूजेसाठी पड जमीन १ बिघा दिलेली दिसते.

याशिवाय एखादया सरदाराच्या कुटुंबातील कन्या अथवा पुत्र याच्या विवाहाप्रित्यर्थ **इनाम** दिलेले आढळते. महाराणी जिजाबाईंनी चिमणभर नवते यांच्या कन्येच्या विवाहाप्रित्यर्थ त्यांना आहेरा सोबतच १० बिघे जमिनीची **सनद** दिलेली "जिजाबाईकालीन कागदपत्रे" या संदर्भग्रंथातील पत्र क्र. २६८ वरुन दिसते. तसेच काही पत्रांच्या आधारे राज्यारोहणाप्रित्यर्थही इनाम दिलेले स्पष्ट होते. इ.स. १७६२ मध्ये करवीरचे शिवाजी

(तिसरे) यांच्या राज्यारोहणाप्रित्यर्थ बचंभट ढवळीकर यांना किल्ले पन्हाळा येथील ५ बिघे जमीन **इनाम** दिलेली “जिजाबाईकालीन कागदपत्रे” या संदर्भग्रंथातील पत्र क्र. ९७ मधून दिसते.

अशाच प्रकारे “छत्रपती शिवाजी महाराजांची पत्रे” या संदर्भग्रंथात पत्र क्र.३४ मध्ये काही लोकांना कर्ज फेडीसाठी देखिल इनाम दिल्याचे पुरावे ऐतिहासिक पत्रांमध्ये आढळतात. उदा. शेषो नारायण यांना कागलचे राणोजी घाटगे हे बरेच देणे लागत होते, त्याची फेड करणे त्यांना अशक्य झाल्याने घाटगे यांनी शेषो नारायण यांना मौजे म्हाकवे हा गाव **इनाम** दिल्याचे आढळते.

मराठेशाहीत आणि मोगलकाळात अस्तित्वात असणारी इनाम देण्याची पध्दत ऐतिहासिक पत्रांच्या आधारे स्पष्ट होण्यास मदत होते. इनाम देताना ते दोन प्रकारे देण्याची पध्दत अस्तित्वात असलेली दिसते. डॉ. अ.रा. कुलकर्णी यांनी या प्रकारांचे सनदी किंवा दिवाण निसबत आणि गाव निसबत असे वर्णन केलेले दिसते. “सनदी किंवा दिवाण निसबत इनाम हे राजसत्तेने सनद किंवा फर्मान यांच्याद्वारे निर्माण केलेले असे. अशा इनामांना काही वेळा संपूर्ण सरकारी शेतसारा माफ केलेला असे तर काही वेळा त्याचा काही भाग म्हणजे १/२, १/३ किंवा १/४ भाग इनामधारकाला द्यावा लागत असे. अशा तऱ्हेने जेव्हा इनाम धारकाला साऱ्याचा काही भाग द्यावा लागत असे तेव्हा त्या इनामाला **इनाम निमाई, इनाम तिजाई, इनाम चौथाई** असे म्हणत.”[८] इनामे राजाकडून किंवा राजसत्तेकडून बहाल केली जात म्हणूनच त्यांना सनदी किंवा दिवाण निसबत इनाम म्हणत. राजसत्तेत बदल झाला म्हणजे इनामदार आपल्या सनदेचे नव्या राजसत्तेकडून नूतनीकरण करुन घेत असे आणि सामान्यतः या जुन्या इनामाच्या सनदेवर नवी राजवट शिक्कामोर्तब करीत असे. आदिलशाहीकडून जो मुलूख शिवाजी महाराजांच्या ताब्यात येत असे त्या मुलूखातील इनामे त्या त्या व्यक्तींकडे चालू ठेवण्याची महाराज आज्ञा देत असत किंवा मराठा राज्यकर्त्यांकडून जो मुलूख मोगल राज्यकर्त्यांच्या ताब्यात जात असे त्या मुलूखातील इनामे त्याच व्यक्तींकडे चालू ठेवण्याची आज्ञा मोगल सत्ताधीश देत असत. म्हणूनच इनाम देताना काही ठिकाणी “स्वराज्य व मोगलाई दुतर्फा इनाम” असे शब्द वापरण्यात आलेले दिसतात. याप्रमाणे इनाम

---

८. शिवकालीन महाराष्ट्रः डॉ. अ.रा. कुलकर्णी, राजहंस पब्लिकेशन, पुणे, १९९७, पान ४७.

देताना जर मराठयांची सत्ता असेल तर किंवा मोगलांची सत्ता असेल तर इनाम दिलेल्या बाबींमध्ये बदल केला गेलेला दिसत नाही.

इनाम देण्याची पध्दत प्राचीन काळातील राजसत्तांमध्येही अस्तित्वात असलेली दिसते. पण त्याकाळी करांमध्ये सवलत देणे, सूट देणे याला महत्व दिले जात असे. शिवकाळ आणि त्यानंतर आलेला पेशवेकाळ यात इनामे मोठया संख्येने दिली गेलेली दिसतात. या इनाम देण्यामागे राज्यकर्त्यांनी “लोकांचे हित साधणे, समाजाचा विकास साधणे” या तत्वाला महत्व दिलेले दिसते. त्यासाठीच राज्यकर्त्यांनी इनाम देताना अनेक प्रकारचे अधिकार आणि आर्थिक स्वरुपात मदत देण्याचे धोरण स्विकारलेले दिसते. समाजातील ज्या वर्गाला आपला उदरनिर्वाह चालविण्यासाठी अर्थाजनाचे कोणतेच साधन नाही अशा वर्गाला, अशा लोकांना देखिल समाजात स्थान निर्माण करण्याचे काम तत्कालीन राज्यकर्त्यांनी केलेले दिसून येते.

पुढील तक्त्यात शिवकाळापासून ते स्वातंत्र्योत्तर काळापर्यंत जमीनीचे इनाम देण्याची असणारी पध्दत आणि कोणत्या कारणाने इनाम देत असत ते स्पष्ट केले आहे. या तक्त्यामधून असे स्पष्ट होते की, शिवकाळ, आंग्रेकाळ आणि पंत प्रतिनिधी काळामध्ये राज्यकर्त्यांनी निरनिराळया कारणांसाठी प्रजेला इनाम दिलेले दिसते. ज्या लोकांना राज्याच्या मदतीची गरज आहे अशा सर्वांना यात मदत दिलेली दिसते. शिवकाळाबरोबरच आंग्रे यांचे नागाव आणि वरसई तसेच पंत प्रतिनिधी यांचे औंध या गावांच्या सूक्ष्म अभ्यासातून हे स्पष्ट झालेले दिसते. ईस्ट इंडिया कंपनीनीची राजवट सुरु झाल्यावर सुरुवातीला ही इनामदारी त्यांनी पूर्वीसारखीच सुरु ठेवली पण त्यानंतर मात्र म्हणजेच ब्रिटिशकाळापासून ही पध्दत बंद करण्यात आलेली दिसते.

**तक्ता क्र. ३८.जमीनींचे इनाम आणि इनामाचे कारण –**

| शिवकाळ | आंग्रेकाळ | | पंत प्रतिनिधी काळ (औंध) | कंपनीचा काळ (१८५९ पर्यंत) | ब्रिटिश काळ (१८५९ ते १९४७ पर्यंत) | स्वातंत्र्योत्तर काळ (१९४७ नंतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | **नागाव** | **वरसई** | | | | |
| विद्वानांना | गुणवान लोक | देवस्थानां साठी | देवस्थानांसाठी | इनामदारी चालूच ठेवली | इनामदारी रद्द केली | इनामदारी रद्द केली |
| ब्राम्हण्य | गरीब ब्राम्हण | विशेष सेवेसाठी | पंडित,विद्वान यांच्या शिक्षणासाठी | x | x | x |
| विशेष सेवा | ब्राम्हण्य करणारा | सन्मान म्हणून | विशेष सेवेसाठी | x | x | x |
| सन्मान | x | x | सन्मान | x | x | x |
| | x | x | गरीब ब्राम्हण | x | x | x |

**२. कर आणि प्रशासकीय हेतूसाठी कर वसूली-**

प्रशासन म्हणजे लोकांची काळजी घेणे किंवा लोकांची सेवा करणे होय, अशी प्रशासनाची व्याख्या केली जाते. प्रशासन किंवा राज्य चालविण्यासाठी पैसा, उत्पन्न अत्यावश्यक असते. राज्याकडे किंवा प्रशासनाकडे जेंव्हा उत्पन्नाची साधने निर्माण झालेली असतात तेंव्हाच प्रशासनाला कार्य करणे शक्य होते. म्हणूनच प्रशासन चालविणे म्हणजे लोकांची काळजी घेणे, सेवा करणे यासाठी देखिल उत्पन्न अत्यावश्यक असते. हा पैसा, उत्पन्न उपलब्ध करुन देण्याचे कार्य मुख्यत्वे महसूल किंवा कर व्यवस्था करते. त्यामुळे कर व्यवस्था प्रशासनाचा महत्वाचा भाग आहे.

मराठेशाहीत व मोगलकालात अस्तित्वात असणाऱ्या महसूल व्यवस्थेचा विचार करता राज्यकर्त्यांनी समाजातील प्रत्येकाला, जो श्रीमंत आहे त्यालाही आणि जो गरीब आहे त्यालाही कोणत्या ना कोणत्या स्वरुपात महसूल किंवा कर देणे भाग पाडलेले दिसते. उदा. शिवाजी महाराजांनी गावातील वतनदार, अधिकारी, इनामदार यांच्या उत्पन्नातील काही भाग कररुपाने वसूल करण्यासाठी इनामपट्टी, मिरासपट्टी, देशमुखपट्टी, असे

नैमितिक कर वसूल केलेले दिसतात. इनामदारांना इनाम म्हणून दिलेल्या जमिनी या सारासूट स्वरुपाच्या असल्या तरी आणिबाणीच्या परिस्थितीत राज्याला जादा पैसा उभा करावयाचा असेल तर तो इनामदारांकडूनही वसूल केला जात असे.[१] म्हणजेच ज्यांना इनाम म्हणून जमिनी दिलेल्या आहेत, जे त्याचा शेतसारा भरत नाहीत आणि ज्यांना त्यांच्या जमिनीपासून भरपूर फायदा मिळतो त्यांच्याकडूनच या पट्टया वसूल केल्या जात असल्याचे दिसते.

लोकांकडून अनेक प्रकारचे कर वसूल करण्याची पध्दत मराठेशाहीत दिसून येत असली तरी ते वसूल करताना धाकदपटशा किंवा जोरजबरदस्ती केलेली दिसत नाही. परंतू लोकांच्या मनात या राज्यव्यवस्थेविषयी आदरयुक्त भिती असल्याने या काळात जोरजबरदस्ती न करताही लोकांकडून धोरणांची, कायदयाची अमंलबजावणी केली गेलेली दिसून येते. शिवाजी महाराजांचे राज्य एकसत्ताक राज्य होते. परंतु लोकांच्या सुदैवाने हे सत्ताधीश एक व्यवहार कुशल, मुत्सद्दी होते, आणि त्यांचे आचरण परोपकारी सत्ताधीशासारखे होते. त्यामुळचे या काळात लोकांचा विरोध झालेला दिसत नाही.

महसूल व्यवस्था सर्व कालखंडात सातत्याने अस्तित्वात असलेली दिसते आणि तिची काही वैशिष्टयेही सामान्यपणे आढळतात. वैदिक काळापासून कर व्यवस्थाची जबाबदारी राज्याची आणि ती भरण्याचे कर्तव्य नागरिक किंवा प्रजेचे असलेले दिसते. तसेच कराची वसूली करताना राज्याने काही विशिष्ट गोष्टी महत्वपूर्ण मानलेल्या दिसतात. राज्यातील कोणत्या ना कोणत्या स्वरुपात राज्याकडे कर जमा करावा. म्हणजेच ज्याच्या जवळ उत्पन्नाचे साधन आहे त्याने उत्पन्नातून कर भरावा अन्यथा श्रमांच्या स्वरुपात, वस्तूंच्या स्वरुपातही कर भरावा लागलेला दिसतो म्हणजेच असे म्हणता येईल की जो राज्यात राहणारा आहे अशा प्रत्येकाने कर भरावा. पण ज्याला कर भरणे अशक्य आहे, जो संन्यासी, वेदशास्त्राचा अभ्यास करणारा, धार्मिक कार्य करणारा, आहे ज्याच्याकडे कर भरण्याचे कोणतेचे साधन नाही किंबहुना त्याच्याकडे अर्थाजनाचे, स्वतःच्या चरितार्थाचेही साधन नाही अशांना राज्याने नेहमी मदतच केलेली दिसते.

याउलट ज्यांच्याजवळ अर्थार्जनाचे साधन नाही म्हणून ज्यांना इनाम दिलेले आहे अशा गोसावी किंवा ब्राम्हणांना, मठांना आणीबाणीच्या परिस्थितीतही कर देण्यास भाग पाडलेले दिसून येत नाही. परंतू ज्यांच्याकडे पैशाच्या स्वरुपात महसूल देणे अशक्य आहे अशा

१. शिवकालीन महाराष्ट्रः डॉ.अ.रा. कुलकर्णी, राजहंस पब्लिकेशन, पुणे, १९९७, पान १०७.

लोकांना महसूल किंवा कर भरण्यातून सूट दिलेली दिसत नाही, पण पैशाऐवजी त्यांना वस्तू अथवा श्रमांच्या स्वरुपातही आपले कर दयावे लागत असल्याचे दिसते. कारुक नावाचा कर गावातील कारागिरांना भरावा लागत असे. वेठबिगार हा एखाद्याकडून मोफत चाकरी करुन घेणे देखिल एक अप्रत्यक्ष करच अस्तित्वात असल्याचे दिसते. कारागीर किंवा मजूर यांच्याकडून मोफत किंवा बाजारात प्रचलित असलेल्या दरांपेक्षा कमी दराने त्यांची सेवा सक्तीने घेणे म्हणजे एका प्रकारे उत्पन्नावरील करच होय. म्हणूनच त्याची गणना डॉ. अ.रा.कुलकर्णी यांनी व्यवसाय करांमध्ये केलेली आढळते.[१०]

महसूल व्यवस्थेचा अभ्यास करताना शिवपूर्वकाळ, शिवकाळ म्हणजेच संपूर्ण मराठेशाहीचा काळ, ब्रिटिश काळ, आणि आधुनिक काळ या स्वरुपातील महसूल व्यवस्थांची वैशिष्टये स्वतंत्र स्वरुपाची असलेली दिसतात. पण या सर्व काळात महसूल व्यवस्थेचे एकमेव दिसणारे ठळक वैशिष्टय म्हणजे “राज्य चालविण्यासाठी लोकांच्या उत्पन्नातील काही भाग राज्याकडे वसूल करुन घेणे.” हे होय. ब्रिटिश काळापर्यत अस्तित्वात आलेल्या सर्व राज्यव्यवस्थांचे अस्तित्व काही अंशी अस्थिर असल्याचे दिसते. प्रत्येक काळातील राज्यसत्ता आपले राज्य टिकविण्याचे आणि वाढविण्याचे प्रयत्न करताना दिसतात. यासाठी राज्यकर्त्यांनी युध्द, लढाया, आक्रमणे यांचा वापर मोठया प्रमाणात केलेला दिसतो. आपल्या ताब्यात असणाऱ्या प्रदेशाचे रक्षण करणे आणि शेजारच्या प्रदेशावर ताबा मिळवणे यासाठी हे राज्यकर्ते सतत झगडताना दिसतात. त्यामुळे मध्ययुगीन पूर्व काळापासून ब्रिटिशांचे वर्चस्व प्रस्थापीत होईपर्यंत संपूर्ण भारतात अस्थिर राज्यव्यवस्था निर्माण झालेली दिसते. याची अनेक उदाहरणे या सर्व कालखंडात आढळतात.

शेतीमधून मुख्यतः महसूल व्यवस्था निर्माण झालेली दिसते त्यामुळे शेतीशी संलग्न असे अनेक कर महसूल व्यवस्थेत दिसून येतात. जमिनीच्या प्रकारानुसार, प्रतीनुसार अनेक राज्यकर्त्यांनी कर ठरविलेले दिसतात. तसेच ब्रिटीश काळापर्यंत राज्यकर्त्यांनी सारा, कर वस्तू किंवा पैशाच्या स्वरुपात भरावा अशी सवलत दिलेली दिसते. राज्याकडून वस्तूंच्या किंवा पैशाच्या दोन्ही स्वरुपात कराची वसूली केलेली दिसते. हे सूक्ष्म अभ्यासाकरिता निवडलेल्या ३ गावांपैकी नागावमधील कर पध्दतीतून ही स्पष्ट होते. नागावमध्ये सुपारी, नारळ, फणस, नारळाचे झाप, भात यास्वरुपात कर स्विकारलेले दिसतात.

---

१०. शिवकालीन महाराष्ट्रः डॉ.अ.रा. कुलकर्णी, राजहंस पब्लिकेशन, पुणे, १९९७, पान १११.

राज्यकर्त्यांनी शेतीला महसूल व्यवस्थेत महत्वाचे स्थान दिलेले असल्याने सर्व राज्यकर्त्यांचे एक महत्वपूर्ण धोरण अस्तित्वात असलेले दिसते ते म्हणजे शेतीसाठी आवश्यक ती मदत प्रजेला देणे म्हणजेच जमिनी लागवडी योग्य बनविणे, त्यासाठी पाण्याची सोय करणे, आवश्यकते प्रमाणे बी-बियाणे देणे आणि ती कसणे यासाठी राज्यकर्त्यांनी विशेष सवलती दिलेल्या दिसतात. उदा. पेशवेकाळात डोंगराळ अथवा खारवट असणारी जमीन लागवडी खाली आणण्यास शेतसाऱ्यापासून सूट दिलेली दिसते. शिवाजी महाराजांनी देखिल पाटील, कुलकर्णी या ग्रामधिकाऱ्यांना यासंबंधीत सूचना दिलेल्या दिसतात. याबरोबरच सर्व काळात आणखी एका वैशिष्टयाला महत्व दिलेले दिसते ते म्हणजे प्रजेवर येणाऱ्या नैसर्गिक आपत्तीचा, तत्कालीन युध्द, लढाया यांचा विचार कर वसूली बाबत केलेला दिसतो. अगदी मोगल काळातील बादशाहांनी देखिल दुष्काळ, अवर्षण, लूट या काळात शेतकऱ्यांचे झालेले नूकसान पाहून त्याप्रमाणे करातून सूट दिलेली दिसते. ब्रिटीशांनी आधीपासून अस्तित्वात असणारी ही पध्दती चालूच ठेवलेली दिसते.

मराठेशाहीत व मोगल काळातील राज्यकर्त्यांनी काही सरदारांना उत्तम चाकरी, सेवा केल्याबदद्ल इनाम दिलेले दिसते. या काळात सरदार वंशपरंपरेने या राज्यकर्त्यांना बांधिल असलेले दिसतात. पिढयान् पिढया राज्यकर्त्यांची चाकरी करणे, सेवा करणे यामध्ये त्यांची निष्ठा त्या राज्यकर्त्यांना बहाल केलेली दिसते. “शिवकालीन पत्रसार संग्रह” या संदर्भग्रंथातील पत्र क्र.२३६८मध्ये दुसऱ्या इब्राहीम आदिलशहाने चोलराज घोरपडेचा मुलगा पिलाजी घोरपडे याने राज्याची उत्तम चाकरी केली म्हणून त्याचा मुलगा प्रतापसिंघ यास ८४ गावांसह मुधोळ कर्यात आणि त्याच्या वडिलांकडे असणारी सात हजारी मनसब व जागीर **बक्षीस** दिलेली आढळते. अशा निष्ठावान सरदारांचा, मुकादम, देशमुख, पाटील यांचा योग्य तो आदरसत्कार करण्याच्या उददेशाने यांना राज्यकर्त्यांकडून असे इनाम दिले जात असे. कारण या काळात जसे निष्ठावान सरदार आढळतात. तसेच बेईमान सरदारही आढळतात. वेळ पडल्यास अशा बेईमान सरदारांना राज्यकर्त्यांकडून शिक्षाही दिलेली आढळते. म्हणजेच या काळात राज्यकर्ते जसे सरदारांचा आदरसत्कार, मानमरातब ठेवत असत तसेच जे शत्रूला सामील होतील त्यांना मात्र त्याची योग्य ती शिक्षाही देत असत.

राज्यामध्ये पिढयानपिढया एकनिष्ठपणे सेवा करणाऱ्या सरदारांना असे प्रत्येक राज्यकर्त्यांकडून इनाम स्वरुपात बक्षीसच दिले गेलेले दिसते. अशा प्रकारचे एक इनामपत्र “सातारच्या प्रतिनिधी घराण्याचा इतिहास” या गौरवग्रंथातील पत्र क्र.६मध्ये श्रीनिवास

परशुराम प्रतिनिधींनी राजश्री द्वारकोजीराऊ पाटणकर गोसावी यांना दिलेले दिसते. पत्रात त्यांना निष्ठेने सेवा करण्याबदद्ल ३ गावांचे **इनाम** दिल्याचा उल्लेख असलेला दिसून येतो. नारो शंकर प्रतिनिधींही राजश्री चिटको आबाजी व लक्ष्मण आबाजी रेणावीकर गोसावी यांना मौजे रेवणगाव कर्यात खानापूर प्रांत मिरज हा गाव **इनाम** दिलेला दिसतो. यात सध्याच्या आणि भविष्यातील सर्व पट्टया सर्व कर (हाली पट्टी व पेस्तर पट्टी) इनाम गावातील वसूलीचा तिसरा भाग (**तिजाई**), सरकारी महसूल वसूलीच्या १० टक्के रक्कम ही राज्यकर्त्यांकडे जमा करणे (**सरदेशमुखी**), वसूलीतील चौथा भाग (**चौथाई**), **साहोत्रा** भत्ता यासह हे इनाम दिल्याचा उल्लेख सातारच्या प्रतिनिधी घराण्याचा इतिहास या गौरवग्रंथातील पत्र क्र.१४ मध्ये दिसते. जिजाबाईकालीन कागदपत्रे या संदर्भग्रंथातील पत्र क्र. २३ प्रमाणे शेषो नारायण कठारे हे राज्यातील जुने एकनिष्ठेने सेवा करणारे सेवक असल्याने पेशव्यांनी इ.स.१७५८ मध्ये त्यांना मौजे भिरडी, प्रांत रायबाग, सुभे विजापूर **इनाम** दिलेले दिसते आणि याच संदर्भग्रंथातील पत्र क्र. २९ प्रमाणे महाराणी जिजाबाई यांनी प्रांत कागल मधील मौजे रुई हे गाव **इनाम** दिलेले दिसते. म्हणजेच कठारे यांना पेशव्यांनी व महाराणी जिजाबाईंनीही इनाम दिलेले दिसते. “जिजाबाईकालीन कागदपत्रे” या संदर्भग्रंथातील पत्र क्र. १५५ मध्ये शिवाजी महाराज (तिसरे) (करवीर) यांनी जायशेट महाजन यास आज्ञापत्र दिलेले दिसते. त्यांनी एकनिष्ठेने सरकारी सेवा केल्याबदद्ल कसबा वडगावच्या **महाजनकीचे वतन** दिलेले आढळते. यात १३ कलमे देवून बलुतेदारांचे हक्कही स्पष्ट केलेले दिसतात.

किल्ला किंवा एखादया प्रांताचे शत्रूपासून रक्षण केले म्हणून इनाम देण्याची प्रथा मोगलकाळ, व मराठा काळात अस्तित्वात असलेली दिसते. “जिजाबाईकालीन कागदपत्रे” या संदर्भग्रंथामध्ये पत्र क्र.२१४ मध्ये इ.स. १७६६ मध्ये इंग्रजांनी सिंधुदुर्ग किल्ला महाराणी जिजाबाईकडून जबरदस्तीने घेतला तो परत घेताना आप्पाजी जाधव यांनी अपूर्व पराक्रम केला म्हणून जिजाबाईकडून मौजे बालिंगे या गावी जाधवांना १० बिघे जमीन **इनाम** देण्यात आलेली दिसून येते.जिजाबाईकालीन कागदपत्रे या संदर्भग्रंथातील पत्र क्र.२५२ या पत्रात महाराणी जिजाबाईंनी पीरगोंडा पाटील यांची रुकडीवरील हल्ल्यात पुष्कळ हानी झाली म्हणून पाटील यांना अबदागिरी व पाच बिघे जमीन इनाम दिलेली दिसते.

लष्करी कामासाठी लावून दिलेल्या मुलुखाची म्हणजेच सरंजामाची व्यवस्था लावण्यासाठी इनाम देण्याची प्रथा ही दिसते. असे इनाम मराठेशाहीत आणि मोगल काळात

अनेक सरदारांना दिलेले दिसते. शाहू महाराज जिंजीतून कारभार पाहात असताना अनेक सरदारांना त्यांनी असा सरंजाम लावून दिलेला दिसतो. जोपर्यंत शाहू महाराज जिंजीला होते तोपर्यंत त्यांच्या राज्यात अनेक सरदारांनी कर्तृत्व गाजविले आणि राज्याचे रक्षण केलेले दिसते त्यामुळेच शाहू महाराजांनी आपल्या राज्यातील अशा कर्तृत्ववान सरदारांना सरंजाम लावून दिलेला दिसतो. उदा. "सातारच्या प्रतिनिधी घराण्याचा इतिहास" या गौरवग्रंथांकात पत्र क्र.४ मध्ये शाहू महाराजांनी राजश्री सदाशिव परशराम प्रतिनिधी यांना श्रीनिवासराव प्रतिनिधी यांच्याकडे असणारा पूर्वीचा **सरंजाम** (लष्करी कामासाठी लावून दिलेला मुलूख) दिलेला दिसून येतो. शाहू महाराजांकडून श्रीनिवासराव परशराम यांना असाच अनेक गावांचा इनाम देण्यात आलेला दिसतो. शाहू महाराजांकडून अशाच प्रकारे इ.स. १७४६ मध्ये जगज्जीवन पंडित प्रतिनिधी यांना पूर्वापासून चालत आल्याप्रमाणे सरंजाम दिलेला सातारच्या प्रतिनिधी घराण्याचा इतिहास या गौरवग्रंथांकात पत्र क्र.६ मध्ये दिसतो.

इनाम गावाबरोबर देशमुख, मुतालीक, देशपांडे, देसाई, देशकुळकर्णी यांच्या मिराशीही नव्याने दिल्या जात असाव्यात असे या पत्रावरुन दिसून येते. या मिराशी चालवित असताना त्याच्या बदल्यात काही पैसे राज्यकर्त्यांकडे जमा करावे लागत असल्याचेही आढळून येते. शिवकालीन पत्रसार संग्रह या संदर्भग्रंथात पत्र क्र.२४५० या मुहम्मद आदिलशाहने कोल्हापूरच्या कारकूनास लिहिलेल्या पत्रात कोन्हेरी त्रिमल याने देशकुळकर्ण्याच्या मिराशी आपणास मिळाव्यात यासाठी दोन वर्षाचा वसूल १०० होन देण्याचे कबूल केल्याचा उल्लेख या पत्रात दिसतो. तरीही मिरासी त्यावरील हक्कांसह चालू ठेवावी. नजराण्यातील अर्धा हिस्सा बादशाही खजिन्यात व अर्धा हिस्सा व्यवस्थेच्या खात्यात जमा करावा असेही या पत्रात नमूद केलेले दिसते. बाबाजी बिन भिकाजी गुजर या मुकादमाने बदअमल (गैरवर्तणुक) केला म्हणून त्याचे हातपाय मोडून त्याला मुकादमीपासून दूर केले. पण त्यानंतर त्याचा नातेवाईक सोनजी गुजर याने मुकादमीचा अर्ज केला आणि बाबाजी गुजरला शिक्षा म्हणून दयावे लागणारे तीनशे होन (बादशाही) भरावे लागणार होते ते सोनजीने भरण्याचे कबूल केल्याने त्याला मुकादमी दिली गेलेली छत्रपती शिवाजी महाराजांची पत्रे या संदर्भग्रंथात पत्र क्र.४ मध्ये आढळते. यावरुन वतनदारांची गय करावयाची नाही हे शिवाजी महाराजांचे धोरण अगदी प्रारंभीपासूनचे होते असे दिसते.

ऐतिहासिक पत्रांच्या आधारे मोगलकालीन आणि मराठेशाहीतील राज्यकर्त्यांनी इनाम देताना समाजाचा विचार केला त्याबरोबरच राज्याच्या उत्पन्नावर त्याचा काय आणि कसा

परिणाम होणार आहे याचा विचार केलेला आढळून येतो. म्हणूनच नवीन वतन, दान, देऊ नये असे रामचंद्रपंत अमात्यांनी सूचित केलेले दिसते कारण असे नवीन वतन, दान दिल्यास राज्याचा महसूल कमी होईल. याबाबत डॉ. अ. रा. कुलकर्णी यांच्या रामचंद्रपंत अमात्यांच्या आज्ञापत्रात पुढील प्रमाणे मुद्दा स्पष्ट केला आहे. "परंपरागत वृत्तिचा अपहार करु नये, नूतन वृत्ति करुन देऊ नये. अन्यथा राज्यलक्ष्मीचा पराभव म्हणजे सरकारी तिजोरी भरत नाही."[११]

प्राचीन भारतीय राज्यशास्त्रात "राज्य" या संज्ञेचा अर्थ "आपल्या सत्ताधिकार क्षेत्रात येणाऱ्या भूभागाचे योग्य ते रक्षण व तेथील जनतेच्या पालनपोषणाचे कार्य म्हणजे राज्य" असा आढळतो.[१२] वैदिक काळातील रामायण, महाभारत यांमध्येही राज्यसत्ता मिळविण्यासाठीचे संघर्ष लपलेले दिसतात. मौर्य, गुप्त काळातही राजांना आपल्या प्रदेशाचे रक्षण करणे आणि ते वाढविणे यासाठी लढाया कराव्या लागल्या असे दिसते. शिवाजी महाराजांना तर मोगल राज्यकर्त्यांबरोबर आपल्या ताब्यात असणाऱ्या प्रदेशाचे रक्षण करण्यासाठी सतत लढाया कराव्या लागलेल्या दिसतात. त्यामुळे एकच प्रांत, प्रदेश एकाच सत्ताधीशाच्या कायमचा ताब्यात असलेला दिसत नाही पण सत्ताधीशांचा हा सततचा प्रयत्न असलेला दिसतो की आपल्या ताब्यातील प्रदेश कायम आपल्याकडेच असावा त्यासाठी सतत आक्रमणे, लढाया, युध्द केली गेलेली दिसतात. उदा. सन १६४९ मध्ये शिवाजी महाराजांना त्यांच्या वडिलांची जहागिरी मिळाली ती पुणे, इंदापूर, बारामती, चाकण, व सुपे या प्रांतांची होती. पण त्यानंतर शिवाजी महाराजांनी कोकण प्रांतातील दक्षिण कोकण आणि मध्य कोकण मिळविले. १६५९ पर्यंत माहूलीपासून, वाईपर्यंतचा प्रदेश शिवाजी महाराजांनी मिळविला. पण १६६० मध्ये पन्हाळा सिद्दी जौहरने काबीज केला. १६६५ मध्ये पुरंदर किल्ला दिलेरखानाने मिळविला आणि पुरंदरच्या तहात शिवाजी महाराजांना २३ किंल्ले आणि त्याला लागून असणारा ४ लाख होनांचा मुलूख मुघल राज्यकर्त्यांकडे सोपवावा लागला. पण १६७० ते १६७४ मध्ये शिवाजी महाराजांनी सिंहगड, पुरंदर, माहुली, कल्याण, भिवंडी, अहमदनगर, जुन्नर, परेंडा इ. प्रांत परत जिंकून घेतले. ज्याप्रमाणे शिवाजी महाराजांच्या कारकिर्दीत त्यांना स्वराज्य टिकविण्यासाठी सतत प्रयत्न करावे लागले तसेच ते संभाजी महाराजांच्या

११. रामचंद्रपंत अमात्यांचे आज्ञापत्रः डॉ.अ.रा. कुलकर्णी, डायमंड पब्लिकेशन, पुणे, २००७ पा. ६४.
१२. प्राचीन भारतीय राजनीतीः प्रा.सुधाकर देशपांडे, दास्ताने प्रकाशन, पुणे, १९८७, प्रथमावृत्ती, पा. १४.

काळातही करावे लागलेले दिसतात. परंतु त्यानंतर राजाराम महाराज, शाहू महाराज यांच्या काळात प्रांत रचनेत फारसा बदल झालेला दिसत नाही.[१३] पेशव्यांच्या काळात विशेषतः"नानासाहेब पेशव्यांनी महाराष्ट्राबरोबर पाटणा, बिहारपर्यंत चौथाई वसूल केलली दिसते. नागपूरच्या रघुजी भोसलेंनी तर बंगालच्या नवाबावर स्वाऱ्या करुन बंगालपर्यंतचा प्रदेश काबीज केला आणि चौथाई वसूल केली."[१४]

एकूणच राज्य वाढविणे, सत्ता विस्तार करण्याच्या या सर्व प्रयत्नांमध्ये राज्यव्यवस्था अस्थिर असल्याचे दिसून येते. तसेच राज्यांच्या सीमांची निश्चिती झालेली दिसून येत नाही. कारण याकाळात शिवाजी महाराजांच्या ताब्यात असणारा प्रदेश सतत व कायम त्यांच्याच ताब्यात राहिलेला दिसून येत नाही तर कधी कधी आक्रमणामुळे तो मोगलांच्या ताब्यात गेलेला दिसतो. परंतू ब्रिटिश काळापासून मात्र संपूर्ण भारतावर ब्रिटिशांचे एकछत्री व दीर्घकालीन नियंत्रण प्रस्थापीत झालेले दिसते. त्यामुळे राज्याच्या सीमांची निश्चिती झालेली दिसून येते. आधुनिक काळात राज्यघटनेमुळे स्थिर राज्यव्यवस्था निर्माण झालेली दिसते आणि राज्याच्या सीमा निश्चित झालेल्या दिसतात. मराठेशाहीत आणि मोगलकाळात अस्तित्वात असलेल्या महसूल व्यवस्थेचा अभ्यास करताना राजसत्ता ही महसूल व्यवस्था निश्चित करीत असल्याचे दिसून येते. या काळात महसूल व्यवस्थेविषयीच्या नियमांची निश्चिती करण्याचे अधिकार राज्यकर्त्यांकडे एकवटलेले दिसून येतात. असे नियम निश्चित करण्याबाबत लोकांच्या इच्छेला महत्व देण्याची प्रथा त्याकाळी अस्तित्वात नसलेली दिसते. परंतु आधुनिक काळात राज्यसत्ता चालविण्यामध्ये लोकमताला आत्यंतिक महत्व प्राप्त झाले आहे. त्यामुळे महसूल निश्चिती करताना अथवा रद्द करताना लोकमताला महत्व देण्याची पध्दत अस्तित्वात आलेली दिसते.

पुढील तक्त्यातून शिवकाळापासून स्वातंत्र्योत्तर काळापर्यंत राज्याला उत्पन्न मिळवून देणारे घटक स्पष्ट केले आहेत. या तक्त्यातून असे स्पष्ट होते की, तुलनात्मक दृष्टिने पाहता शिवकाळात सर्वात जास्त घटक असे होते की ज्या मार्फत राज्याला उत्पन्न मिळत असे. तक्त्यामधून असेही स्पष्ट होते की, शिवकाळात जवळपास सर्व उत्पादनांवर तसेच प्राण्यांवर, जंगलांवर, गवतावर, कपडयावर कर आकारणी केली जात असे. शिवकाळाइतकी व्यापक कर आकारणी अन्य राजवटींमध्ये करण्यात आलेली दिसत नाही.

१३. मराठयांची प्रशासन व्यवस्थाः (Administrative System of the Marathas, Dr. S.N. Sen) अनुवाद विजया
कुलकर्णी, मुंबई, प्रथमावृत्ती, २००३ पा. ३४

१४. भोसल्यांच्या बंगालवरील स्वाऱ्याः बाळकृष्ण नारायण सहस्त्रबुद्धे,गोंदिया,राजवाडे संशोधन मंडळ,धुळे, १९४४,पा.८

नागावमध्ये आंग्रे यांनी अशाच पध्दतीने विस्तारीत कर रचना निर्माण केलेली दिसते. ईस्ट इंडिया कंपनीनीच्या काळापासून ठरावीक घटकांवरच कर घेतले जात असल्याचे यातून स्पष्ट होते. विद्यमान काळात मात्र अनेक घटकांमार्फत कर वसूल करण्याचे प्रयत्न केले जातात.

**तक्ता क्र. ३९.विविध काळात राज्यकर्त्यांना उत्पन्न देणारे घटक-**

| **शिवकाळ** | **आंग्रेकाळ** | | **पंत प्रतिनिधी काळ** | **कंपनीचा काळ (१८५९ पर्यंत)** | **ब्रिटिश काळ (१८५९ ते १९४७ पर्यंत)** | **स्वातंत्र्योत्तर काळ (१९४७ नंतर)** |
|---|---|---|---|---|---|---|
| | **नागाव** | **वरसई** | | | | |
| १) धान्ये- तांदूळ, वरी, नाचणी इ. | धान्ये- भात | जनावरे | जनावरे- मेंढरे | वस्तू ने-आण | जमीन | जमीन |
| २) कडधान्य-तूरडाळ, मूगडाळ, डाळ,उडीद, मसूर, | कडधान्य- उडीद | जमीन | व्यापार | जमीन | मादक पदार्थ | x |
| ३) मसाले | तूप | x | वन | x | जंगले | x |
| ४) कापड | फळे नारळ,फणस | x | जमीन | x | मीठ | x |
| ५) तेल-तूप | जनावरे | x | x | x | x | x |
| ६) फळे व भाजीपाला | नारळाचे झाप | x | x | x | x | x |
| ७) जनावरे- म्हैस,बकरी | ताग, ताड, सुपारी, पानवेल | x | x | x | x | x |
| ८) गुलाम | जमीन | x | x | x | x | x |
| ९) मीठ | x | x | x | x | x | x |
| १०) गवत | x | x | x | x | x | x |
| ११) जमीन | x | x | x | x | x | x |
| १२) मद्य (पेशवे काळ) | x | x | x | x | x | x |
| १३) जंगल (पेशवे काळ) | x | x | x | x | x | x |

सदर तक्त्यातून शिवकाळापासून स्वातंत्र्योत्तर काळापर्यंत राज्याला उत्पन्न मिळवून देणारी जकात पध्दत स्पष्ट करण्यात आली आहे. प्रत्येक काळात राज्यकर्त्यांनी जकातीला महत्व दिलेले यातून स्पष्ट होते. शिवकाळात ज्याप्रमाणे अनेक घटकांवर जकात आकारणी केली जात असे तशीच जकात आकारणी आधुनिक काळात केली जात असल्याचे यातून स्पष्ट होते. ईस्ट इंडिया कंपनीच्या काळात देखिल अनेक घटकांवर जकात आकारणी केली जात असे. मराठेशाहीत आणि आधुनिक काळात जकात हे राज्याला उत्पन्न मिळवून देण्याचे एक महत्वाचे साधन असल्याचे यातून स्पष्ट होते.

**तक्ता क्र. ४०.जकातीमधून राज्यकर्त्यांना उत्पन्न देणारे घटक-**

| शिवकाळ | आंग्रेकाळ | | पंत प्रतिनिधी काळ | कंपनीचा काळ (१८५९ पर्यंत) | ब्रिटिश काळ (१८५९ ते १९४७ पर्यंत) | स्वातंत्र्योत्तर काळ (१९४७ नंतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | **नागाव** | **वरसई** | | | | |
| धान्ये | भात | अफू | X | धान्य- तांदूळ | धान्य | धान्य |
| मसाले व इतर जिन्नस | नारळ | X | X | X | X | फळे व भाजीपाला |
| कापड | मोहाची फुले | X | X | सूत | X | औद्योगिक कामासाठी वापरल्या जाणाऱ्या वस्तू |
| फळे व इतर | X | X | X | लोखंड, रेल्वेचे सामान | X | मध |
| इतर वस्तू – काच, चंदन, बांबू | X | X | X | अफू, दारु | X | तेल व तूप |
| मद्य (पेशवे काळ) | X | X | X | पेट्रोल (दर ग्यालन अर्धा रुपया) | X | पक्षी,प्राणी (जनावरे) |
| तेल व तूप | X | X | X | X | X | इमारती व इतर सामग्री |

मध्ययुगीन काळात राजेशाही व्यवस्था अस्तित्वात असल्याने राजा हाच राज्याचासर्वेसर्वा किंवा निर्णायक मत देणारा असलेला दिसतो. त्यामुळे धोरण निश्चिती किंवा कायदा निर्मिती करताना लोकांची मते अजमावण्याची पध्दत त्या काळात प्रत्यक्षात आणलेली दिसत नाही. त्यामुळे या काळातील राज्य विद्यमान व्यवस्थेतील कायदयाचे राज्य या सारखेच होते असे म्हणता येत नाही. प्राचीन काळात मनुस्मृति, रामायण काळात महसूल जमा करताना तो लोकांना जाचक ठरणार नाही अशा पध्दतीने वसुली करण्यावर भर दिलेला दिसतो. म्हणजे लोकांच्या हिताचा विचार करणारी व्यवस्था प्राचीन काळापासून अस्तित्वात असलेली दिसते. तसेच शिवाजी महाराजांकडून आखले जाणारे धोरण लोकांच्या कल्याणाला महत्व देणारे असल्याचे दिसते. "शिवाजी महाराजांनी काही मूलभूत स्वरुपाचे कायदे केले असे म्हणता येणार नाही, कारण अशा कामासाठी लागणारे स्वास्थ त्यांना कधीच मिळाले नाही, तरीही त्यांनी आपल्या पूर्वजांच्या सर्वोत्तम नियमांची अमंल बजावणी करुन त्यात सुधारणा केलेल्या दिसतात. शिवाजी महाराजांचे कायदेकानू देशाच्या गरजांना उपकारक होते".[१५] शिवकाळात धोरण निर्मीती करताना जरी राजाकडून लोकांच्या मताला महत्व दिले जात नसले तरी गावातील एखादा वतनदार किंवा प्रशासकीय अधिकारी बदलायचा असल्यास किंवा एका कडून दुसऱ्याकडे ते अधिकार दयावयाचे असल्यास गावातील लोकांच्या मतानुसार ते निश्चित केले जात असत. म्हणजेच प्रशासकीय अधिकाऱ्यांचा प्रत्यक्ष संबंध असणाऱ्या लोकांना विश्वासात घेऊनच अशी प्रशासकीय अधिकाऱ्यांची बदली केली जात असे.

### ३. **प्रशासकीय यंत्रणा किंवा अधिकारी-**

ऐतिहासिक पत्रांवरुन मराठेशाही अर्थात शिवकाल व शिवकालोत्तर काळातील प्रशासन व्यवस्थेचे चित्रण होते. १७ व्या शतकातील निजामशाही, आदिलशाही, कुतुबशाही मधील सत्ताधाऱ्यांना त्यांचे शासन अखंडित चालू राहावे या करिता दक्षिणेतील वतनदारांवर अवलंबून राहावे लागत असे. नवीन आलेल्या सत्ताधाऱ्यांनी वतनदाऱ्यांच्या वतनात ढवळाढवळ केलेली चालत नसे. कधी कधी तर एकाच प्रदेशावर दोन अथवा अधिक सत्ताधाऱ्यांचा हस्तक्षेप असला तर त्याकडे वतनदार दुर्लक्ष करीत असत आणि कसेतरी निभावून नेत असत.

---

१५ मराठयांची प्रशासन व्यवस्थाः (Administrative System of the Marathas, Dr. S.N. Sen) अनुवाद विजया कुलकर्णी, मुंबई, प्रथमावृत्ती, २००३ पान ४६.

उदा. १६३६साली निजामशाहीचा अस्त झाल्यावर पुणे परगण्याचा काही भाग आदिलशाहीकडे व दुसरा भाग मोगलांच्या ताब्यात गेला होता. त्यामुळे पुण्याचे देशमुख अंशतः आदिलशाही व मोगल अधिकाऱ्यांच्या नियंत्रणाखाली कार्य करत होते.[१६] पण परगणा अधिकारी असा त्यांचा दर्जा कायम राहिला. त्यांच्या अधिकाराविषयी दोन्ही सत्ताधीशांना आदर वाटत असे. म्हणजेच प्रशासकीय अधिकाऱ्यांची सत्ता कायम स्वरुपाची असे. पण त्याच वेळी प्रस्थापित सरकारचे वर्चस्व तात्पुरते मानले जात असे. हे अधिकारी परगण्यातील पदाधिकारी म्हणून लोकांच्या विश्वासातले मानले जात असत आणि सरकारचा अधिकारी असे त्यांचे नाते गौण समजले जात असे. त्यामुळे त्याला पहिल्यांदा परगण्याशी आणि नंतर राज्यकर्त्यांशी एकनिष्ठ राहावे लागत असे.

पैसा आणि प्रशासन या दोन्ही गोष्टी स्वतंत्र करता येत नाहीत. करांच्या माध्यमातून जमा होण्याऱ्या पैशाचे व्यवस्थापन वित्त व्यवस्थेकडून केले जाते. वित्त व्यवस्था प्रशासनाचा एक महत्वाचा भाग आहे. वित्त व्यवस्थेमार्फत करांची आकारणी करणे आणि करांची प्रत्यक्ष वसूली करणे या संबंधीची कार्ये आधुनिक काळात राजस्व विभाग आणि केंद्रीय राजस्व विभाग हे दोन स्वतंत्र विभाग अस्तित्वात आहेत. प्राचीन काळापासून अशाच प्रकारे प्रशासनात करांची आखणी, आकारणी करणे, त्यांची प्रत्यक्ष वसूली करणे यासाठी व्यवस्था अस्तित्वात असलेली दिसते.

प्राचीन भारतातील मौर्यकाळ, मध्य युगातील मोगल काळ, मराठेशाही यात देखिल स्वतंत्र यंत्रणा असलेल्या दिसतात. प्रशासनाबरोबर लोकप्रशासनामध्येही लोकांसाठी कार्य करणारी व्यवस्था अस्तित्वात असलेली दिसते. म्हणूनच लोकप्रशासन, प्रशासन यांना महसूल व्यवस्था असे म्हणता येते. लोकप्रशासनाच्या दृष्टीने सर्वांत महत्वपूर्ण जबाबदारी महसूल व्यवस्थेमार्फत पार पाडली जात असल्याने महसूल व्यवस्था हा लोकप्रशासनाचा महत्वपूर्ण भाग बनलेली आहे आणि सर्व काळात महसूल व्यवस्थेचे महत्व अनन्य साधारण असलेले दिसते. नागाव-चौल, वरसई, औंध या गावांमध्ये असणाऱ्या महसूल व्यवस्थांमध्येही राज्यकर्त्यांनी अशा प्रकारे अनेकांना इनाम दिलेले दिसते. इनाम देताना अनेक बाबींचा विचार राज्यकर्त्यांनी केलेला दिसतो. तसेच इनाम दिल्यानंतर त्याची लेखी नोंद ठेवणे,

---

१६ मध्ययुगीन महाराष्ट्रः डॉ. अ.रा. कुलकर्णी, डायमंड पब्लिकेशन, पुणे, २००७, पान१११.

ठरावीक कालावधीनंतर ते इनाम पुन्हा नोंदविणे, त्या इनामाची स्थानिक प्रशासकीय अधिकाऱ्यांकडे एक प्रत देणे, राज्यकर्ता बदलल्यानंतर ते इनाम नवीन राज्यकर्त्यांकडून पुन्हा रीतसर चालू करुन घेणे या सर्व कागदोपत्री महत्वपूर्ण असणाऱ्या बाबींदेखील इनामपत्रांच्या आणि ऐतिहासिक पत्रांच्या आधारे स्पष्ट होतात. यावरुन असे स्पष्ट होते की, प्राचीन काळापासून प्रशासन व्यवस्थेत एका विशिष्ट पध्दतीने प्रशासन चालविण्याला महत्व दिलेले दिसते. तसेच प्रशासकीय व्यवस्थेत प्रशासन चालविताना राज्यकर्त्यांनीही प्रशासकीय अधिकाऱ्यांना प्रशासनाच्या कामाची व्यवस्था लावण्याची सवय निर्माण केलेली दिसते.

महसूल व्यवस्था चालविताना खेडे, मौजे, गाव किंवा तर्फ इ. निम्न स्तर हाच सर्व व्यवस्थेचा प्रमुख आधार होता असे लक्षात येते. करसंकलनासाठी या स्तरांवरुन कारभार करणे राज्याला सोईस्कर होते असे दिसते. शेती व्यवसाय हाच प्रमुख व्यवसाय असल्याने बहुतांशी लोक त्यावरच अवलंबून असलेले दिसतात. त्यामुळे खेडे किंवा गाव, मौजे याला सतराव्या शतकात आणि त्यापूर्वीही आर्थिक व्यवहारात महत्वाचे स्थान असलेले दिसते. गावाचे सुध्दा छोटे छोटे भाग केलेले असत यांना मजरा किंवा वाडी म्हटले जात असे. गावातून काही लोक मळयात किंवा शेतात जाऊन राहत,त्या ठिकाणच्या वस्तीला वाडी, पाडी, मजरा म्हटले जात असे. इतर सर्व स्तरांपेक्षा गावातील लोकांची संख्या दाट असलेली दिसते. यात कारागीर, शेतकरी, कलाकार, छोटे व्यावसायिक यांचा गावात अंतर्भाव होत असे. गावचा कारभार पाहण्यासाठी कायम स्वरुपाच्या ग्रामाधिकाऱ्यांची आवश्यकता असल्याचे दिसते. हे ग्रामाधिकारी म्हणजेच वतनदार होय. त्यामुळेच राजवटीत जरी बदल झाला तरी वतनदार बदलत नसत. या वतनदारांकडूनच खरेतर गावाची सर्व व्यवस्था पाहिली जात असे. सारावसुली आणि शेती विकास या संदर्भातही राज्यकर्ते आणि जनता यांच्या मध्यस्थांची भूमिका या वतनदारांकडून पूर्ण केली जात असे. त्यामुळेच सतराव्या शतकात किंवा त्यापूर्वीपासूनच गावाच्या वरचे सर्व स्तर अस्तित्वात असले तरी गाव, खेडे याचे महत्व अनन्य असल्याचे दिसते.

**तक्ता क्र. ४१. क्षेत्रनिहाय व्यवस्था :-**

| **गुप्त काळ** | **सुलतान शाही** | **मोगल काळ** | **शिवकाळ** | **पेशवे काळ** | **स्वातंत्र्योत्तर काळ** |
|---|---|---|---|---|---|
| प्रांत (भुक्ति) | प्रांत | प्रांत | सरसुभा | सुभा / प्रांत | केंद्र |
| जिल्हा(विषय) | सरकार | जिल्हा | सुभा /प्रांत | तर्फ/परगणा /महाल | राज्य |
| मंडल | परगणा | परगणा/महाल | परगणा/महाल | ग्राम / गाव | जिल्हा |
| भोग | मौजे (ग्राम) | ग्राम | तर्फ /कर्यात | x | तालुका |
| ग्राम (ग्राम) | x | x | मौजे /खेडे/गाव | x | गाव/खेडे |

वरील सर्व काळात प्रांत, जिल्हा, परगणा, महाल, सुभा अशा प्रकारे कार्यक्षेत्राचे विभागीकरण करण्यात आलेले दिसते. पण त्यामध्ये भौगोलिकदृष्टया एकसारखेपणा असलेला दिसत नाही. या सर्व काळात ग्राम, गाव, खेडे, मौजे हा कार्यक्षेत्राच्या दृष्टीने सर्वात निम्न स्तर असलेला दिसतो. परंतू त्या पेक्षा वरच्या स्तरांवर वैविध्य आहे असे दिसते. जसे शिवकाळात अनेक तर्फांचा मिळून परगणा किंवा महाल बनविण्यात आलेला होता तसाच तो इतर सर्व काळात बनविण्यात आलेला दिसत नाही. त्यामुळे या सर्व संज्ञांचा अर्थ लावताना आधुनिक काळातील विभागवार स्तररचना लक्षात घेता येणार नाही.

मराठेशाहीत आणि मोगल राज्यात वतनाचे हक्क हे पाटील (किंवा मुकादम), कुलकर्णी (गावचा तलाठी), चौगुले (पाटलाचा सहाय्यक), शेटे महाजन (बाजार अधिकारी), आणि महार (गावाचा सेवक) यासारख्या ग्रामाधिकाऱ्यांकडे होते. ऐतिहासिक पत्रांमध्ये त्यांना इनामदार, वतनदार (प्रशासकीय प्राधिकृत अधिकारी) म्हटलेले आढळते. देशमुख-देशपांडे हे परगण्याचे (ग्रामसमूहाचे) वतनदार, त्यांच्या अधिकारक्षेत्रात येणाऱ्या गावातील पाटील आणि कुलकर्णी यांच्या कामावर देखरेख करत असत. वतनाचा हक्क वंशपरंपरेने असे आणि वतनदार जोपर्यंत त्याचे कर्तव्य चोख पार पाडत असे तोपर्यंत तो हक्क त्यांच्या कुटुंबाकडे राहत असे. वतन किंवा इनाम याला मराठेशाहीत फार महत्व दिलेले दिसते. कारण राज्यसत्ता ही अस्थिर होती, पण वतन किंवा इनाम मात्र कायमचे होते. राजसत्ता बदलली तरीही ते वतनावर किंवा इनामावर राहू शकत होते. ऐतिहासिक पत्रांमध्ये याचे अनेक पुरावे सापडतात. पूर्वापार चालत आलेले इनाम नव्याने येणाऱ्या सत्ताधीशांकडून कायम करुन

असो कि मराठेशाहीतील प्रशासकीय अधिकारी कायमचे असल्याने त्यात एक सातत्य राहिलेले आढळते. त्यामुळे त्या त्या भागातील सत्ताधीश जरी बदलला तरीही तेथील महसूल त्या त्या व्यवस्थेने जमा करण्याची प्रथा या काळात अस्तित्वात असलेली दिसते. म्हणूनच असे म्हणता येईल की, या काळात अस्तित्वात असणारे प्रशासन आणि प्रशासकीय अधिकारी स्थिर स्वरुपाचे होते. अंतिम सत्ता मोगलांची गावांवर फारसा परिणाम झालेला दिसून येत नाही. राजसत्ता अस्थिर असली तरीही स्थानिक व्यवस्थांवर त्याचा परिणाम होऊन ही व्यवस्था क्षीण झालेली आढळत नाही.

**तक्ता क्र. ४२.विविध काळातील प्रशासकीय अधिकारी-**

| **कालखंड** | **प्रशासकीय अधिकारी** |
|---|---|
| मौर्यपूर्व काळ | रज्जूग्राहक,द्रोणमापक, ग्रामभोजक |
| मौर्य काळ | गोप |
| गुप्त काळ | उपरिक, विषयपती, ग्राम्यक |
| सुलतानशाही काळ | चौधरी किंवा मुकादम |
| मोगल काळ | करौडी, अमील, बितिक्ची |
| मराठेशाही | पाटील, कुलकर्णी, देशमुख, देशपांडे |
| ब्रिटिश काळ | जमीनदार,मालगुजार, खोत |
| आधुनिक काळ | महसूल अधिकारी,कमीशनर |

प्राचीन काळात देखिल महसूल व्यवस्थेचे काम पाहण्यासाठी प्रशासकीय अधिकारी नेमण्यात आलेले दिसतात. मौर्यपूर्व काळात रज्जूग्राहक, द्रोणमापक, ग्रामभोजक, मौर्यकाळात गोप(खेडयातील अधिकारी), तसेच गुप्तकाळात उपरिक, विषयपती, ग्राम्यक असे प्रशासकीय अधिकारी असलेले दिसतात. मध्ययुगीन काळात मुक्ता, मुकादम, पटवारी, पोतदार, कानुंगो, अमीन, बितिक्ची असे पदाधिकारी नेमलेले दिसतात. हे सर्व जमिनीची मोजणी करणे, महसूल ठरवून देणे आणि वसूली करणे या स्वरुपाची कार्ये करताना दिसतात. ऐतिहासीक पत्रांच्या आधारे असे स्पष्ट होते की, मराठेशाहीत तसेच मोगल व पेशवे काळात प्रशासकीय अधिकारी म्हणजेच कुलकर्णी, पाटील, देशमुख-देशपांडे यांच्यामार्फत महसूल व्यवस्थेचे काम पाहिले जात असल्याने त्यांना राज्यकर्त्यांकडून सर्व सूचना मिळत असत. पण कधी कधी एकाच प्रांतावरील अधिकाऱ्यांना अनेक सत्ताधीशांच्या

आज्ञांचे पालन करण्याची जबाबदारी येत असे. अशा वेळी हे अधिकारी दोन सत्ताधिशांपैकी कोणत्याही एकाच सत्ताधिशाच्या आज्ञांचे पालन करीत असत. यावरुन असे दिसते, एकाच वेळी अनेकांचे सार्वभौमत्व निर्माण झालेले दिसते. शिवकाळात देशमुख-देशपांडे, कुलकर्णी, पाटील यासारखे मुलकी अधिकारी परगणा, प्रांत, किंवा ग्रामाधिकारी असत. यांचे नाव जसे वतनदारांच्या यादीत समाविष्ट केलेले असायचे तसेच ते राजमंडळातही असे. उदा. देशमुखांना त्यांच्या अधिकाराबाबत स्वतंत्रपणे शिक्का दिलेला असे.[१७] तो परगण्याचा पदाधिकारी समजला जात असे आणि सरकारचा अधिकारी हया नात्याने त्याचे स्वरुप गौण असे, त्यामुळे त्याला प्रथम परगण्याशी एकनिष्ठ राहावे लागत असे. त्यानंतर संबंधीत राज्यकर्त्यांशी ते पदाधिकारी एकनिष्ठ राहात असत. म्हणजेच शिवाजी महाराज आणि मोगल राज्यकर्ते यांची आलटून पालटून दक्षिणेत असणारी सत्ता यामध्ये राज्यकर्त्यांपेक्षा पदाधिकारी हे त्यांच्या मुलुखाला किंवा स्थानिक प्रदेशातील लोकांना एकनिष्ठ असलेले दिसतात. सत्ताधीश सतत बदलणारे असल्याने अधिकारी एकालाच एकनिष्ठ राहू शकत नव्हते. त्यांच्या निष्ठा विभाजीत झालेल्या दिसतात.

पुढील तक्त्यात शिवकाळापासून ते ब्रिटिश काळापर्यंत वतनदारांचे अस्तित्व स्पष्ट करण्यात आले आहे. प्रशासकीय व्यवस्थेमध्ये महत्वपूर्ण जबाबदारी असणारा वतनदार वर्ग शिवकाळापासून ते पंतप्रतिनिर्धी काळापर्यंत अस्तित्वात असलेला आढळतो. वतनदार आणि इनामदार वर्गामार्फत शिवकाळापूर्वीपासून महसूल व्यवस्था चालविली जात असे. शिवाजी महाराजांनी या इनामदारांचे पिढीजात अधिकार काढून घेऊन त्यांना प्रशासकीय व्यवस्थेचा एक भाग बनविले आणि त्या अंतर्गत यंत्रणा चालविण्याची जबाबदारी टाकली. त्यामुळे शिवकाळात आढळणारे पाटील, कुलकर्णी, देशमुख आणि देशपांडे हे वतनदार आंग्रेकाळातही अस्तित्वात असलेले दिसतात. ईस्ट इंडिया कंपनीनी आपले प्रशासकीय अधिकार चालविण्यासाठी याच वतनदारांना हाताशी धरलेले दिसते. ब्रिटिश काळापासून मात्र वतनदार आणि इनामदारांचे महत्व कमी होत गेलेले दिसते कारण ब्रिटिशांनी संस्थाने खालसा करुन सर्व अधिकार स्वतःच्या हातात घेतले.

---

१७. मध्ययुगीन महाराष्ट्रः डॉ. अ.रा. कुलकर्णी, डायमंड पब्लिकेशन, पुणे, २००७, पान१११.

**तक्ता क्र. ४३. सर्व काळात आढळून येणारे वतनदार –**

| शिवकाळ | आंग्रेकाळ | | पंत प्रतिनिधी काळ | कंपनीचा काळ (१८५९ पर्यंत) | ब्रिटिश काळ (१८५९ ते १९४७ पर्यंत) | स्वातंत्र्योत्तर काळ (१९४७ नंतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | नागाव | वरसई | | | | |
| पाटील | पाटील | अंमलदार | देशमुख | प्रत्येक प्रांतातील वतन दारांना आधी होते तसेच अधिकार दिले. | वतनदारी बंद केली गेली. (संस्थाने खालसा केली गेली) | वतनदारी बंद केली गेली. |
| कुलकर्णी | माने | इनामदार (भावे, जोशी) | देशपांडे | | | |
| चौगुला | कुलकर्णी | x | सरदेसाई | | | |
| शेटे-महाजन | वर्तक | x | कराडकर | | | |
| देशमुख | महाजन | x | ब्राम्हण | | | |
| देशपांडे | चौगुले | x | x | | | |

प्राचीन काळापासून आजपर्यंत अस्तित्वात असणाऱ्या निरनिराळया राज्यकर्त्यांनी आपल्या राज्याची व्यवस्था सुरळीत चालावी. राज्याकडे उत्पन्न जमा व्हावे यासाठी महसूलाची व्यवस्था केली होती. महसूलाच्या माध्यमातून आणि इतर अनेक माध्यमातून राज्यामध्ये उत्पन्न मिळविण्याचा प्रयत्न राज्यकर्त्यांकडून केला जाताना दिसतो. प्राचीन काळापासून राज्यकर्त्यांनी राज्यामध्ये महसूल वसूली करताना वस्तूरुपाने वसूली केलेली दिसते. काही राज्यकर्त्यांनी विशेषतः मोगल राज्यकर्त्यांनी, ब्रिटीशांनी मात्र महसूल वसूली करताना रोख पैशाच्या रुपात वसूली केलेली दिसते. अकबराच्या काळात त्याने शेतक-यांकडून रोख पैसे घेण्याच्या सुचना शेतसारा जमा करणा-या अमीलाला दिलेल्या दिसतात. पण जर शेतकरी पैसे देण्यास नाखुश असेल तर धान्यरुपाने वसूली करावी असेही स्पष्ट केल्याचे दिसते. अकबराने पैशाच्या रुपात शेतसाऱ्याची मागणी केलेली दिसते. अकबराच्या राज्यातील एकूण जमा महसूल ५,१३१,३५३,००० दाम एवढा होता.

शिवाजी महाराजांनी महसूल वसूली करताना ती धान्याच्या आणि वस्तूंच्या रुपात केलेली दिसते. काही वेळा ही वसूली अर्धी धान्य रुपाने आणि अर्धी पैशाच्या रुपात वसूल केलेली दिसते. महसूल वसूली बरोबरच शिवकाळात जकातीपासूनही उत्पन्न जमा केले जात

असे. वरघाटाकडील उंबरे या गावाला रु.नऊ लाख एक जकात मिळत असे. म्हणून त्याला नऊ लाख उंबरे असे म्हटले जात असे. शिवाजी महाराजांच्या राज्यात महसूल, जकात इतर काही कर याबरोबरच चौथाई आणि सरदेशमुखी मधूनही उत्पन्न मिळत असे. शिवाजी महाराजांच्या राज्याचा एकंदर महसूल १ कोटि होन आणि चौथाई पासून ८० लाख होन असे उत्पन्न होते. जदुनाथ सरकार यांनी शिवाजी महाराजांच्या राज्याचे उत्पन्न रु. ७ कोटी मात्र असल्याचे म्हटले आहे.(पहा पान नं.११६)

प्राचीन काळापासून आजवर सर्व कालखंडात प्रजेने कराचे देयत्व मान्य केलेले दिसते. कर देयत्व लोकांकडून मान्य केलेले असण्याचे कारण कर हे लोकांना त्रासदायक ठरतील, जाचक ठरतील अशा पध्दतीने लावण्यात आलेले दिसत नाहीत. अगदी मनूस्मृतित देखित राजाने कर घेण्याबाबतचे जे वर्णन केलेले दिसते ते म्हणजे मधमाशी ज्याप्रमाणे फुलाला इजा न पोहचविता मध जमा करते त्याप्रमाणे राजाने कर वसूल करताना ते प्रजेला जाचक ठरणार नाहीत याची काळजी घ्यावी असे प्रतिपादन केले आहे. वैदिक काळापासून प्रशासनात या तत्वाचा वापर करुनच करांची आकारणी आणि वसूली केली जात असल्याने लोकांकडून कर व्यवस्थेला आणि कर वसूलीला विरोध झालेला दिसत नाही. तसेच नागरिक म्हणून राज्यात राहताना त्याचे संरक्षण, जनहित यासाठी राजाकडून, प्रशासनाकडून प्रयत्न केलेले दिसतात. त्याचे उत्तरदायित्व म्हणूनही प्रजेकडून कर देयत्व मान्य केलेले दिसते. परंतू जो पर्यंत कर पध्दत लोकांवर अन्यायकारक ठरत नाही तोपर्यंतच लोकांकडून ती मान्य केली जाते. महसूल व्यवस्थेमध्ये असणाऱ्या करपध्दतीला राज्यकर्त्यांच्या धोरणानुसार मान्यता किंवा विरोध केला जातो. ब्रिटीशांनी लोकांवर पैशाच्याच स्वरुपात कर भरण्याची सक्ती केल्यामुळे लोकांच्या आर्थिकतेवर त्याचा विपरीत परीणाम झाला आणि ब्रिटीशांना कर पध्दतीमध्ये वारंवार सुधारणा कराव्या लागल्या. मुलकी व्यवस्थेबरोबरच राज्यकारभारामध्ये जनतेच्या कल्याणाचा विचार प्रशासकीय प्रमुखाकडून केला जातो. शिवाजी महाराजांनी प्रजेचे हित लक्षात घेऊन लढाया, युध्द, शत्रूचे आक्रमण झाल्यास त्या प्रदेशातील लोकांना त्या काळापुरती सारा सुट दिलेली आढळते. तसेच ज्यांना वस्तू अथवा पैशाच्या स्वरुपात कर जमा करणे शक्य नाही त्यांनाही सवलत आणि प्रसंगी मदत दिलेली दिसते.

प्राचीन काळापासून अस्तित्वात असलेल्या महसूल व्यवस्थेमध्ये करांबाबत राज्य आणि नागरिक यांच्यात वेगवेगळया स्वरुपाचे संबंध निर्माण झालेले दिसतात. महसूल व्यवस्था निर्माण करुन त्या आधारे मिळणारे उत्पन्न राष्ट्रहित, जनहित यासाठी वापरण्याचा बहुतांशी सर्व काळातील राज्यकर्त्यांचा प्रयत्न असलेला दिसतो. राज्याने आखून दिलेल्या

करपध्दतीचा स्विकार करुन त्याप्रमाणे वेळोवेळी कर भरण्याचे कर्तव्य लोकांना पार पाडावे लागते.

नागाव, औंध, वरसई या तीन गावांमधील महसूल व्यवस्थांचा अभ्यास करताना आंग्रे काळात, पेशवे काळात आणि औंधमधील पंतप्रतिनिधी काळात इनामदारी व्यवस्था अस्तित्वात असलेली दिसते. तत्कालीन काळात अस्थिर राजसत्तेमुळे प्रशासकीय वर्गाची भूमिका अत्यंत महत्वपूर्ण ठरली होती. गावोगावी असणाऱ्या इनामदारांनी आपल्या चरितार्थासाठी, कल्याणासाठी, धर्म रक्षणासाठी व वाढविण्यासाठी, धर्मशाळा, मठ यांच्या व्यवस्थापनासाठी सारा वसूल करण्याचे कार्य नियमितपणे केलेले दिसते. या इनामदारांना रोख किंवा वस्तू रुपात याचा मोबदला मिळत असे. तसेच काही हक्क देखिल मिळत असत. त्यामुळे गावोगावच्या वतनदार, इनामदारांनी आपआपली इनामे कायम चालूच ठेवली. इनामातून मोबदल्याबरोबरच मान-मरातब, हक्क मिळत असल्याने तत्कालीन समाजात या वतनदार इनामदारांचे समाजातील स्थान ठळकपणे दिसते.

राज्यकर्त्यांनी वतने, इनामे देऊन त्या गावांची जबाबदारी वतनदारांवर टाकल्याने समाजातील प्रत्येकाला राज्यव्यवस्थेशी जोडण्याचा प्रयत्न अप्रत्यक्षपणे झालेला दिसतो. तसेच ज्या घटकापासून व्यक्तीला फायदा मिळतो अशा प्रत्येक घटकावर कर लावून राज्यातील “ज्यांचे उत्पन्न जास्त त्यांच्याकडून वसूली जास्त” या तत्वाचा वापर तत्कालीन व्यवस्थेत झालेला दिसतो. म्हणजेच आधुनिक काळातील “उत्पन्नाच्या प्रमाणात कर” या तत्वाचा वापर तत्कालीन व्यवस्थेत झालेला दिसतो. वतनदार आपल्याकडे जमा होणारा सर्व सारा, महसूल गोळा करुन व श्रीमंत होऊन राजसत्तेला आव्हान देणारा ठरु नये म्हणून त्याला त्याच्या वतन, इनामातील अर्धा, तिसरा, चौथा हिस्सा राज्याच्या खजिन्यात जमा करण्याची तरतूद केली असावी. याप्रकारे असे इनामदार, वतनदार राज्यव्यवस्थेला जोडले गेलेले दिसतात. अन्यथा एकदा वतन मिळाले की पुन्हा राज्यकर्त्यांकडे येण्याचा त्यांना बांधील राहण्याचा प्रयत्नच झाला नसता. म्हणूनच काही ठरावीक वर्षांनी किंवा दुसऱ्या पिढीतील सदस्यांनी वतन, इनाम चालू ठेवण्यासाठी राज्यकर्त्यांकडून नोंदवून घेण्याची प्रथा असलेली दिसते.

प्रशासकीय व्यवस्थेच्या दृष्टीने एखादे गाव, प्रांत कोणत्या वतनदाराकडे आहे त्याचा फायदा तो वतनदार घेतो किंवा नाही याची लेखी स्वरुपातील नोंद ठेवण्याचा प्रयत्न केला गेलेला दिसतो. म्हणजेच प्रशासन अत्यंत बारकाईने सर्व कार्ये करीत असल्याचे दिसते. अशा

स्वरुपात लेखी नोंदी, सनदा नव्याने करुन घेणे या सर्व प्रथांमुळे प्रांतांच्या अंतर्गत भागातील छोटया-छोटया गावांपर्यंत राज्यकर्त्यांच्या वतीने प्रशासन व्यवस्थेचे अस्तित्व राहिलेले दिसते.

शिवाजी महाराजांना स्वराज्याची उभारणी करताना अनेक लोकांनी सहकार्य दिलेले दिसते. तसेच प्रजेलादेखिल स्वराज्य हा राष्ट्रधर्म वाटत असल्याने शिवाजी महाराजांच्या स्वराज्य उभारणीच्या कार्यात त्यांची भूमिका महत्वाची होती. स्वराज्यातूनच लोकांचे कल्याण आणि संरक्षण साधणार असल्याने स्वराज्यासाठी सर्व काही करण्याची भावना प्रजेमध्ये असलेली दिसते. त्यासाठी काहींनी आपला लढाऊ बाणा, काहींनी आपले व्यवहार चातुर्य, काहींनी प्रत्यक्ष कार्य, काहींनी उत्पन्न या सर्व गोष्टींमधून स्वराज्य उभारणे आणि टिकविणे याकरिता आपआपले सहकार्य दिलेले दिसते.

तत्कालीन व्यवस्थेमध्ये लोक राजालाच राज्य मानत. त्यामुळे राजा म्हणजे राज्य जनतेच्या हिताचा सर्वप्रथम विचार करणार आणि त्याप्रमाणे कृती करुन लोकांचे संरक्षण साधणार असा दृढ विश्वास प्रजेमध्ये असलेला दिसतो. लोकहित साधण्यामधून राज्याचे हित साधले जाते. त्यामुळे व्यक्तिहितातून लोकहित आणि लोकहितातून राज्याचे हित साधण्याला विशेष महत्व दिले जात असल्याचे दिसते. लोकांना न्याय देणे, लोकांचे संरक्षण करणे, लोकांचे कल्याण साधणे हा राजाचा राजधर्म असल्याने राज्यातील प्रत्येकाला न्याय, संरक्षण मिळवून देण्याचे प्रयत्न राजा करीत असल्याचे दिसते. राजाबरोबर तत्कालीन प्रशासन व्यवस्थेतील पाटील, देशमुख, देशपांडे यांनी गावातील अनेक छोटया-मोठया संघर्षाबाबत, वैयक्तिक तंटे-बखेडयांबाबत निवाडा केलेला दिसतो. गावातील लोकांमध्ये होणारे शेतजमीनीच्या हद्दीबाबतचे, कौटुंबिक प्रश्नाबाबतचे, मालमत्ता, वारसा हक्क याबाबतचे अनेक तंटे हे प्रथम इनामदारांसमोर मांडले जात असत. इनामदारांकडून केलेला निवाडा जर संबंधितांना मान्य नसला तर मग तो प्रश्न किंवा समस्या राजासमोर किंवा अष्टप्रधानातील न्यायाधीश यांच्या समोर मांडली जात असे. पण इनामदारांना न्याय निवाडयाचे अधिकार असल्याने महसूलाबरोबरच न्याय व्यवस्थेचेही विकेंद्रीकरण झालेले दिसते. पेशवेकाळात न्याय निवाडयाचे अंतिम अधिकार पेशव्यांकडे होते. सवाई माधवरावांच्या काळात परराष्ट्र धोरण याबरोबरचे वैयक्तिक न्याय निवाडयाचे काम बारभाई व्यवस्थेमार्फत झालेले दिसते. म्हणजेच महसूल व्यवस्था आणि न्यायव्यवस्था या दोन्ही व्यवस्थांमध्ये प्रशासनाची भूमिका अत्यंत महत्वपूर्ण असलेली दिसते.

-------♦ ♦ ♦ ♦-------

परिशिष्ठ:१ ऐतिहासिक दस्तऐवजातील शब्दार्थ.

परिशिष्ठ:२ संदर्भ ग्रंथ-सूची.

परिशिष्ठ:३ करीमबेग मुलाणा सनद (इनाम **A** कमीशन) दस्ताऐवज.

परिशिष्ठ:४ नकाशे.

## परिशिष्ठः१

## ऐतिहासिक दस्तऐवजातील शब्दार्थ

१. अजरा मऱ्हामत - कृपेने दिलेले बक्षीस.

२. अगोट - पावसाळयाचा प्रारंभकाल., शेतीच्या हंगामाची सुरुवात.

३. अजीपाल - अजी - यापासून, पुढे, पूर्णपणें, अगदी. पाल – कराची सूट, माफी.

४. अडशेरी-अडीसेरी - अडीच शेरांचे माप किंवा वजन. (पूर्वी पांच शेरांची पायली असे, त्याचा अर्ध). नोकरास दररोज किंवा महिन्याच्या महिन्याला दिलें जाणारें धान्य.

५. अपायभूत - अपायकर्ते, नाशाला.

६. अबादान (आबादान) - उत्तम स्थितीत, भरभराटीचे.

७. अमीन – विश्वासू आमदार.

८. आफ्तफितरत - आफत = संकट, आपदा, अरिष्ट. फितरत = बखेडा.

९. इस्तावा – नवीन जमीन कीर्दमामुरीस येतेवेळीं कांही वर्षेपर्यंत भर साऱ्यापेक्षा कमी, परंतु दरसाल वाढत्या साऱ्याने देण्याची पद्धती - अशा तऱ्हेने वाढणारा सारा.

१०. इस्तावा – नवीन जमीन लागवडीस देतेवेळी काही वर्षेपर्यंत भर साऱ्यापेक्षा कमी, पण दरसाल वाढत्या साऱ्याने जमीन देणे.

११. इजारती – जबाबदारी.

१२. इसापती - इनामाखेरीज मिळकतीच्या जादा बाबी.

१३. इस्तकबाल - सामोरे.

१४. उपराहा - साहय.

१५. उभा मार्ग - रहदारीचा रस्ता, हमरस्ता.

१६. उस्तवारी – डागडुजी, दुरुस्ती, व्यवस्था.

१७. उजुहाती - हुजुरात.

१८. एकतारी - अखत्यारी.

१९. ऐनकबज – ऐन = मुख्य, मूळ. कबज = लेखी पावती, पोच.

२०. ऐन नख्त – पैशांच्या रुपांत येणारा सारा, ऐनजिनसी साऱ्याची पैशात किंमत.

२१. कलित – नजर पाहणी, अंदाजी पाहणीं, (हा शब्द शब्दकोशांत नाहीं. शब्दकोश कलतर देतो = पिकाचा अंदाज करुन बसविलेला धारा).

२२. कदीम – जुना (कदीम घातला –प्रवेश केला).

२३. कसबा – परगण्याचे मुख्य ठिकाण, गांव.

२४. कलमबंदी - अनेक प्रकारची अनेक कलमें निर्णयपूर्वक ज्यांत बांधून दिलीं आहेत तो लेख, सर्व तपशिलांच्या बाबींच्या एकाखाली एक क्रमाने केलेली नोंद.

२५. कारसाई - रयतेला दिलेली तगाई, ही सुगीच्या वेळीं धान्याच्या रुपाने परत करण्याच्या बोलीवर देतात, किल्ल्याच्या घेरांवरील खेडयांतील लोकांकडून किल्ल्यावर असलेल्या सरकारी इमारतींच्या शाकारणीसाठी बसविलेला सरकारी कर, यांत गवत, नारळीच्या झावळया, पानें, काठया, बांबू वगैरे सामान असतें.

२६. कारखाना – खाते, कार्यालय, राज्यात असे अठरा कारखाने असत, (उंट, कबूतर, जवाहीर, जामदार, जकीरा, तालीम, तोफ, पट्टी, दप्तर, दादीवान, नगार, पील, फरास, बंदी, मोदी, शिकार, जनान, मुदपाक इ. कारखाने.)

२७. कारखाना - म्हणजे प्रशासन विभाग, प्रा. यदुनाथ सरकार यांच्या 'मोंगल प्रशासन' वरुन त्याचा अर्थ उद्योग स्थळ

२८. कारखाननीस (कारखाननवीस)- सरकारी धान्याच्या कोठावरील अधिकारी, कारखान्याचा हिशेब ठेवणारा अमलदार.

२९. किल्ल्याचे मामले – किल्ल्याच्या परिसरात, आसमंतात, हद्दीत.

३०. कीर्द मामुरी – किरकोळ शेत जमीन

३१. कौल - ठराव करामदार.

३२. कौल - अभयपत्र, परवाना, आमंत्रण, अभयवचन.

३३. कुइटारु – गवताच्या, माडाच्या, पोफळीच्या सावळयांनी शाकारलेलें, जूनें छप्पर.

३४. कुलारगवार - (कुळारग – खेडयांतील शेतसारा देणारीं कुळें.) प्रत्येक कुळामागे, दर कुळागणिक.

३५. कुणबीण – दासी, मोलकरीण.

३६. कुलबाब - वतनदारांचे हक्क म्हणून सरकारने गोळा केलेले सर्व कर.

३७. कुसुर - भांडण, दावा.

३८. कुलकानू - सर्व कर आणि पट्टया आणि बाजारांचे सर्व हक्क घेण्याचा अधिकार दिले आहेत, अशा अर्थाचा सनदेंत येणारा शब्द.

३९. खरीप – हिवाळी पिकांचे दिवस, कापणीचा हंगाम.

४०. खार - मीठ, खनिज किंवा भाजीपाला.

४१. खिजमतगार - सेवक.

४२. खेलत - मानाचा पोषाख.

४३. खेरीजकबज — खेरीज = विरहित. कबज = लेखी पावती, पोच.

४४. खेरीज मुशाहिरा - मासिक वेतन, पगार, रोजमुरा, मजुरी यांव्यतिरिक्त मिळणारी रक्कम.

४५. गावगना — एक प्रकारचा महसूल.

४६. गादीतंबाकू - सरकारी नोकरांशिवाय इतर सर्वांकडून सरकारला लागणाऱ्या तंबाकूसाठी घेतलेला कर.

४७. गोडे - गडावरील एक अधिकारी.

४८. गोदी - साक्ष

४९. गुराब, गुबारा - मोठे लढाऊ जहाज, गलबत, एका प्रकारचे तारु.

५०. गुन्हेगारी — दंड.

५१. गुलाम - बटकीचा मुलगा, दासीपुत्र, कामासाठी विकत घेतलेला माणूस.

५२. घालमेल — गोंधळ, धामधूम, उलाढाली करणें.

५३. घासदाणा - मराठा सरदारांनी आकारलेल्या चौथाई सारखी खंडणी.

५४. घेरिया, घेरा - सभोवतालचा प्रदेश.

५५. चावर — १२० चौ. बिघे, १ बिघा म्हणजे १/२ एकर.

५६. चौगुले (चौगुला, चौघुला) - बारा वतनदारांपैकी एक अधिकारी, पाटलाच्या हाताखालील एक गाव कामगार, ग्रामणी (रा.को.).

५७. चौतर्फा — चारही बाजूनी.

५८. जमीदार-जमीनदार — जमी = जमीन. जमीदार = जमिनीचा मालक वतनदार. इंग्रजी-पूर्वीच्या राज्यांतील सनदी, सरंजामी माणसें.

५९. जहाज फर्माविस — जहाज — तारुं, गलबत. फर्माविस = एक प्रकारचा कर.

६०. जरीबे — जमीनीची मोजणी,

६१. जामा

६२. जमेत — जमाव, जमात.

६३. ज्याजती - बढती, अधिक.

६४. जंजिरा (जझिरा) - बेट.

६५. जाबता – कायदे काने, ठराव, माहिती पत्रक, कायदा विषद करणारे विधान.

६६. जित्रब-जितरब – जीवनाला आधार असें जमिनीचें उत्पन्न, पिकलेलें उभें शेत, बागाईत व तें करणारीं जनावरें.

६७. जिनजित्रब - शेतांतील, बागेंतील उभी पिके.

६८. तसरुफाती - अधिकार, ताबा, भोगवटा

६९. तट सरनोबत – तटाचे संरक्षण करणारा सैन्याधिकारी.

७०. तनखा – पगार, वेतन.

७१. तहशील – प्राप्त करुन घेणे, उत्पन्न.

७२. तकसीम – तक्शीम - वाटणी – हिस्सा.

७३. तहवेल - उष्टरखाना, पीलखाना इ. अठरा कारखान्यांवर झालेला खर्च. राजव्ययस्तथा विज्ञेस्तहवलिरिति स्मृतः। (राजव्य. कोश श्लोक २२१).

७४. ताबिनाती – तैनाती, व्यवस्था, चाकरी.

७५. थटी – थट्टी – गोशाला, जनावरांचे खातें, गुरें बांधण्याची जागा.

७६. दरकदार - वंशपरंपरागत प्रशासकीय पदाधिकारी, विशेषतः दिवाण, मजुमदार, फडणीस, सबनीस, कारखानीस, चिटणीस, जामदार, पोतनीस.

७७. दर्यागर्क - समुद्राने बुडविलेली जमीन, गाव.

७८. दरीबा - (हिंदी) पानांच्या विक्रीचें बाजारांतील दुकान. माडीविक्रीचें ठिकाण.

७९. दस्ती - सरकारी कर बसविण्यास योग्य.

८०. दस्तवाब - इतर पट्टया

८१. दस्त - सारा पट्टी, अधिकार.

८२. दहशत – दरारा, जरब, भीती.

८३. दहीं-बकरें –गाईविरहित गुरें व बकरीं पाळण्याचा व्यवसाय करणाऱ्यांकडून घेतलेले कर

८४. दास्तान – धान्य साठविण्याची कोठी, कोठार.

८५. दिवाण महसूल - राज्याचं उत्पन्न.

८६. देशाधिकारी - सुभेदार.

८७. देशमुखपट्टी – देशमुखाने अगर देशमुखाकरिता बसविलेली पट्टी.

८८. देहेनगी - बक्षीस, इनाम, देणगी.

८९. दुमाले – पाठपुरावा, सहाय्य, इनामाचा प्रकार.

९०. नगदी जमीनशिरस्ता - रोख नाण्याच्या स्वरुपांतील वसुलाचा ठराव.

९१. नवदाई – विरोध.

९२. नजर - वरिष्ठांना दिलेली भेट.

९३. नाजीरपट्टी – पाहणी किंवा रक्षण करण्याबद्दल घेतलेला कर.

९४. नातवानी – गरिबी, असमर्थता.

९५. निखर – कनिष्ट प्रतीची जमीन.

९६. निगादास्त – देखरेख, जपणूक, काळजी.

९७. नाईकवाडी (नायकवाडी) – पायदळातील दहा किंवा वीस शिपायांवरचा अधिकारी.

९८. निर्वाह - उपाय, व्यवस्था.

९९. निसबत (निस्बत) - योग्यता, दिमत, संबंधी, तर्फेचा.

१००. निसबतीच - संबंधी, शिफारशी, त्या बाजूचे.

१०१. निसबत - वशिला, भीड (निसबती – गरज, संबंध)

१०२. परवारी – खेडयाचा रखवालदार, दरवान किंवा देवडीवाला.

१०३. परभारा खर्च – खर्चाची रक्कम स्वतः न देतां दुसऱ्यास ती देण्याचा हुकूम (वरात) देऊन भागविलेला खर्च.

१०४. पंचकेण्याचें दुकान – छोटेसें किराणा मालाचें दुकान, (केणें = मसाल्यांतील मिरीं, मोहरी, जिरें, हिंग, दगडफूल इ. पदार्थ)

१०५. पाट – कनिष्ठ जातीतील विधवांचा पुनर्विवाह.

१०६. पोळा - शेतकऱ्यांचा सण. त्यादिवशी बैलांना विश्रांती देण्यात येते आणि सुशोभित करुन त्यांची मिरवणूक काढली जाते.

१०७. पाखाडी – गावाचा एक भाग.

१०८. पारपत्य - शासन (शिक्षा).

१०९. पारिपत्येगार – शिक्षा करणारे, शिक्षाधिकारी.

११०. पाळेगार – कर्नाटकातील देशनायक, (पाळेदारी) मामलेदाराच्या दर्जाचे लुटारु बंडखोर, पुढे ते मुसलमानी राज्यात स्वतंत्र जहागीरदार झाले.

१११. पैबस्तगी – पोहोचवणूक.

११२. फर्मान - शाही हुकूम, मुखत्यारनामा. अधिकार पत्र.

११३. फडफर्मास - राजे किंवा अधिकारी यांच्या हुकुमाप्रमाणे ते गावीं आले असतां घेतलेला नजराणा, भेट, ऐनजिनसी नजर.

११४. फरोख्त — विकलेलें.

११५. फकीर फुकीराना — गरीब.

११६. बदअमली — ककर्मी, वाईट मार्गी.

११७. बरकंदाज - बंदूकधारी.

११८. बंदेज — जमवाजमव.

११९. बाजे - इतर

१२०. बाकाईत - शूरशिपाई.

१२१. बारगीर — पगारी घोडेस्वार, ज्याला धन्याने वापरावयास घोडा दिलेला असतो तो स्वार.

१२२. बाबती - वसुलाची कोणतीही बाब, एखाद्या विशिष्ट बाबीवर आकारलेला जादा कर., देशमुख, देशपांडे इत्यादींकांचे मुलखावर असणारे हक्क.

१२३. बिघावणी — बिघ्याच्या मापाने केलेली जमिनीची मोजणी, बिघ्याच्या मापाने बसविलेला शेतसारा.

१२४. बेल भंडार - बेल आणि हळदीच्या पानावर हात ठेऊन घेतलेली शपथ. परंतु अशी शपथ देखील एका प्रसंगी क्षुल्लक मानून ‘बेलाचे पान म्हणजे एका साध्या झाडाचे पान आणि भंडार तर रोजच्याच खाण्यातले, असे उपहासाने बोलून एका मराठा सरदाराने धुडकावून लावली.

१२५. भंडारा — गोसावी किंवा बैराग्याना दिलेली मेजवानी.

१२६. मक्ता

१२७. मजालसी - राजदरबार किंवा राजसभा किंवा विद्वान आदरणीय व्यक्तींची सभा.

१२८. मजरा (मुजरा) — खर्ची घातलेला, दिलेला.

१२९. महसूल - उत्पन्न, आवक.

१३०. मऱ्हामती — कपादान, दान.

१३१. मजुरा - (मूळ शब्द मजरा.) संमत, माफ.

१३२. महामूर-महामुरी — धान्यादिकांची विपुलता, समृद्धि, पेरणी इ.चें पूर्ण झालेलें काम, लागवड.

१३३. महजर — करारनामा.

१३४. मामुरी — किरकोळ. (मामुर - वस्त् करविणे, आबाद, सुसंपन्न.)

१३५. मामूल — वहिवाट.

१३६. मामलेदार - अधिकारी, कार्यकर्ता.

१३७. मिसेली - सनद, पत्र, हुकूम.

१३८. मिरास — एक वंशपरंपरा जमीन.

१३९. मिरासी - वंशपरंपरा हकदार.

१४०. मेटे — चौक्या, पहारे, गस्तीचे ठाणे, उपरक्षक (रा.को.), नाके.

१४१. मेवा जिन्नस - फळफळावळ व तत्सम वस्तु.

१४२. मेहमान — अतिथि, सत्कार करण्याकरिता बोलावलेला किंवा अवचित आलेला मनुष्य.

१४३. मोर्तब - अनुमतिदर्शक शिक्याचा ठसा.

१४४. मोहतर्फा — खेडयांतील दुकानदार व कारागीर यांचेवरील कर, गवंडी, सुतार इ. त्यांच्या कसबासंबंधीं सरकारास जो कर भरावा लागतो तो.

१४५. मोईन - वार्षिक नेमणूक, तैनात, ठराव, नियम.

१४६. मोकादम किंवा मुकादम - म्हणजे पाटील किंवा गावचा कारभार पाहणारा ग्रामप्रमुख.

१४७. मोकाशी - मोकासा म्हणजे करमुक्त जमिनीचा मालक किंवा मोकाशाने नेमलेला किंवा प्रशासनाचा महसूल अधिकारी.

१४८. मुजावर - मशीद झाडणारा सेवक.

१४९. मुशाहिरा - वेतन किंवा पगार.

१५०. मुतालिक — नायब, प्रतिनिधी, उपमंत्री, दुय्यम अधिकारी.

१५१. मुलुखगिरी - स्वारी, आक्रमण.

१५२. मुलुख मारावा — प्रदेश लुटावा.

१५३. मुशाहिरा — नक्त नेमणूक.

१५४. मुशारखोर — नोकर, चाकर, पगार देऊन ठेवलेला मनुष्य.

१५५. मुकासा — एक  वसूली हक्क.

१५६. रबी - उन्हाळी पीक.

१५७. राबता — वहिवाट, परिपाठ.

१५८. रोखा - आज्ञापत्र, साऱ्याचा अथवा मालपुरवठयाचा सरकारी हुकूम, कराराप्रमाणें तगादा अगर सख्त हुकूम, मागणीपत्र, ताकीदपत्र, जरुरीचा हुकूम.

१५९. रोजमरा - रोजचे वेतन, पगार.

१६०. लंगर - होडीचा नांगर, मठ.

१६१. लागवड खर्च - शेतीचा खर्च, जमीन लागवडीस आणणें, पेरणीचा खर्च.

१६२. वतन - वारसदारीने प्राप्त झालेली मालमत्ता. अधिकार, हक्क, कर्ज., वारसा हक्क जमिनीसंबंधीचा किंवा पदाधिकाराचा.

१६३. वरात — गावच्या वसूलावर किंवा सरकारी खजिन्यावर काढलेली हुंडी.

१६४. वरकस जमीन — तांदूळ, गहूं, बाजरी, गोंधळा इत्यादि मुख्य धान्यें व तूर, हरभरा, मूग, मठ हीं कडधान्यें सोडून इतर नाचणी, वरी, हरिक वगैरे हलकीं पिकें ज्यांतून काढतात, ती कनिष्ट प्रतीची जमीन, भाताभोंवतालची गवताळ जमीन.

१६५. वर्तक - बेलिफासारखा एक गावकामगार, ग्रामपंचायतीच्या ठरावांची अंमलबजावणी करणारा अधिकारी, सरकारी वजनें, मापें पाहणारा अधिकारी.

१६६. वानगी — नमुना, मासला, जकातीच्या नाकेदारानें जकातीशिवाय कोणत्याहि मालाचा नमुन्याकरिता, चव पाहण्याकरिता म्हणून घ्यावयाचा अंश, शेतात पिकलेल्या पदार्थाचा खंडकऱ्याकडून मालकास मिळावयाचा नमुन्यादाखल अंश.

१६७. वेठबे (बि) गार - मोबदला न देतां काम करुन घेण्याचा हक्क.

१६८. वेतनात खर्च — (वेतन = केलेल्या कामाचा मोबदला.) बिदागी, मजुरी, यांसाठी झालेला खर्च.

१६९. वेठी बिगारी - वेठया, बोजे वाहणारा भारवाहक

१७०. विऱ्हेगर्क - ओढा, नाला, प्रवाह, पऱ्हया यांत बुडालेली.

१७१. शिलेदार - स्वतःचे घोडे व शस्त्र घेऊन लढणारा.(विरुद्ध - बारगीर), स्वतःचा घोडा ठेवून धन्याची नोकरी करणारा.

१७२. शिरपाव - मानाचे प्रतीक म्हणून राजा किंवा श्रेष्ठी यांनी दिलेला फेटा.

१७३. शिराळ शेट — धान्याच्या व्यापाऱ्याला राजा मानून त्याची मातीची मूर्ती करुन पूजा करण्यात येते व नंतर ती मूर्ती विहीरीत किंवा तलावात फेकण्यात येते.

१७४. शिक्का — नाण्यावरील छाप, मुद्रा, ठसा, राज्यकर्त्याचा छाप.

१७५. शिवार - शेतीचा प्रदेश.

१७६. शेरनी - यशस्वी पक्षकाराने कृतज्ञतेचे प्रतीक म्हणून न्यायालयात भरलेली रक्कम.

१७७. सबनीस - सेना लेखक, लष्कराचा हिशेबनवीस, दप्तरदार, सैन्यात पगार वाटणारा.

१७८. सरकारकून - वरिष्ठ अधिकारी, प्रधान.

१७९. सरनोबत - मुख्य सैन्याधिकारी.

१८०. सलूख — तह, मैत्री.

१८१. सदका — दानधर्म.

१८२. सरंजाम - लष्कराच्या खर्चासाठी गाव इनाम देण्यात येते.

१८३. सरसुभेदार - सुभेदारांवरील मुख्य अंमलदार.

१८४. सल्ला करुन — तह करुन.

१८५. सादिलवार — धर्मदाय व गावकीचा.

१८६. साल्हेरी - बागलाणच्या टोकास असलेला किल्ला.

१८७. साहुकार — पेढीवाला, भांडवलदार, मोठा व्यापारी. सावकार.

१८८. सादिलवार पट्टी — गावच्या नैमित्तिक, आगंतुक खर्चासाठी आकारलेला कर.

१८९. सेरणी — ज्याच्या बाजूने न्याय झाला त्याने आनंदाप्रित्यर्थ द्यावयाची रक्कम.

१९०. हवालदार — किल्ल्याचा प्रशासक, रक्षक, सेनाधिकारी.

१९१. हशम (हषम) — पायदळ, लढाऊ चाकर, शिपाई, प्यादा.

१९२. हरकी — खटला दाखल करणाऱ्या आणि जिंकलेल्या पक्षकारांनी कृतज्ञतेचे प्रतीक म्हणून कोर्टात दिलेली रक्कम.

१९३. हासिल — कर किंवा जकात.

१९४. होन - सोन्याचे नाणे, याला पगोडा असेही म्हणतात.

१९५. हुकुमतपनाह — ताब्यातील प्रजेचा रक्षणकर्ता.

१९६. हुकुमबारदार - आज्ञाधारक, (बर्दार - राहणार) हुकुमाप्रमाणे वागणारे.

१९७. हुजुर सेवा — खाशांची चाकरी.

१९८. हुजुराचा मामला — खाशांची, राजांची सेवाचाकरी, काम.

१९९. हुडे - बुरुज, तट किल्ले.

२००. हुजूर - राजाचा दरबार, त्याचप्रमाणे स्वतः महाराजा किंवा त्याचा प्रतिनिधी

२०१. हुरमुजी - भगव्या रंगाचा, मोत्याचा एक प्रकार.

२०२. होन - शिवकाळातील सुवर्ण नाणे ( शिवराई ).

-------♦ ♦ ♦ ♦-------

# परिशिष्ट २

## संदर्भ ग्रंथ-सूची

### A) ग्रंथ :


1 ऐतिहासिक संकीर्ण साहित्य, खंड १ ला, खंड ५ वा व ८ वा, भारत इतिहास संशोधन मंडळ, स्वीय ग्रंथमाला क्र. ३५, क्र. ६१, व क्र. ८५, पुणे.

2 ऐतिहासिक फार्सी साहित्य, खंड १ ते ११, संपादक ग.ह. खरे, भारत इतिहास संशोधन मंडळ, स्वीय ग्रंथमाला, १९७३, पुणे.

3 ऐतिहासिक चरित्र साहित्य, खंड ३ रा, शं.ना. जोशी, चित्रशाळा प्रेस, पुणे, १९३०.

4 ऐतिहासिक संकीर्ण निबंध, खंड ५ वा, शं.ना. जोशी, भारत इतिहास संशोधन मंडळ, स्वीय ग्रंथमाला, क्र. ५५, पुणे, १९५२.

5 छत्रपती शिवाजी महाराजांची पत्रे, प्र.न. देशपांडे, सुषमा प्रकाशन, धुळे, पहिली आवृत्ती, १९८३, किं. ६५ रु.

6 जिजाबाईकालीन कागदपत्रे, संपादक डॉ. अप्पासाहेब पवार, शिवाजी विद्यापीठ, ऐतिहासिक ग्रंथमाला, पुष्प पाचवे, १९७८, किं. १५ रु.

7 शिवकालीन पत्रसार संग्रह, खंड ३, संपादक शं. ना. जोशी, भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे, स्वीय ग्रंथमाला, क्र. ४४, १९३७, किं. २।। रु.

8 शिवचरित्रप्रदीप, स.म. दिवकर, द.वि. आपटे, भारत इतिहास संशोधन मंडळ, पुरक ग्रंथमाला क्र. ४, पुणे, १९२५.

9 शिवचरित्र साहित्य खंड १ ते ११ भारत इतिहास संशोधन मंडळ, स्वीय ग्रंथमाला, पुणे.

10 शिवचरित्र निबंधावली, न.चिं. केळकर, द.वि. आपटे, पुणे, १९२९.

11 शिवाजी निबंधावली, न.चिं. केळकर, द.वि. आपटे, पुणे, १९३०.

12 पेशवे दफ्तर, खंड ३१, गो.स. सरदेसाई, जमाव, पुणे, १९३३.

13 पेशवेकालीन डायरी, खंड ६.

14 संभाजीकालीन पत्र सार-संग्रह, संपादक शं. ना. जोशी, भारत इतिहास संशोधन मंडळ, स्वीय ग्रंथमाला, पुणे, १९४९.

15 श्री. शिवभारत, संपादक द.वि. आपटे, स.म. दिवेकर, भारत इतिहास संशोधन मंडळ पुरस्कृत ग्रंथमाला, पुणे, १९२७.

16. अष्टागरातील क्रमवंत घराण्याचा इतिहास, ग.दा. टिल्लू, को.ए.सो. प्रिटिंग वर्क्स, अलिबाग,१९२८.

17. आधुनिक भारत, प्रा. नी.सी. दिक्षित, पिंपळापूरे अँड पब्लिशर्स, नागपूर, प्रथमावृत्ती, जून, २००३.

18. आज्ञापत्र – शिवाजी राजांची राजनिती, संपादक श्री. ना. बनहट्टी, सुविचार प्रकाशन मंडळ, नागपूर, चौथी आवृत्ती, १९७४.

19. आंगरेकालीन अष्टागर, संपादक व प्रकाशक शां.वि. आवळसकर, यशोदा चिंतामणिनिधी पुरस्कृत ग्रंथमाला क्र. १६, अ.वि. गृह पुणे, १९४७.

20. आंगरेकालीन पत्रव्यवहार, शां.वि. आवळसकर, जनार्दन सदाशिव लिमिटेड, पुणे, १९४८.

21. ऐतिहासिक पोवाडे अथवा मराठयांचा काव्यमय इतिहास, संपादक य.न. केळकर, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे, १९६९.

22. काही विचारवंत काही इतिहास, प्र.ज. जागीरदार, परिमल पब्लिकेशन, राधेय, नागपूर,१९८६.

23. कुलाबकर आंगरे सरखेल (आंगरे शकावली), दा.गो. ढबू, शं.ना. जोशी, कर्नाटक, प्रि.प्रेस, मुंबई, शके १८६१.

24. कौटिल्यीय अर्थशास्त्र, भट्टस्वामी, जैसवाल, बॅनर्जी, १९२५.

25. कौटिल्यीय अर्थशास्त्र, प्रा. र.प. कंगाले, प्रकाशन महाराष्ट्र राज्य साहित्य मंडळ, पुणे, द्वितीयावृत्ती, मे १९९५.

26. कृष्णाजी अ. सभासद विरचित छत्रपती शिवाजी महाराज यांची बखर, शं.ना. जोशी, चित्रशाळा प्रकाशन पुणे, १९६०.

27. नरहर शुंभराव भावे, विजय प्र. दिवाण, साहित्य प्रकाशन, मुंबई, १९८९, किं. ३० रु.

28. नागाव : आर्थिक-सामाजिक जीवन, १७६० ते १८४०, शां.वि. आवळसकर, गोखले अर्थशास्त्र संस्था, पुणे, १९६८.

29. छत्रपती शिवाजी महाराजांचे आद्यचरित्र, कृष्णाजी अनंत सभासद, संपादक भिमराव कुलकर्णी, अनमोल प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, १९७७.

30. छत्रपती शाहूंचे आर्थिक धोरण, डॉ. वि.रा. घुगे, फडके प्रकाशन कोल्हापूर, प्रथमावृत्ती १९७५.

31. थोरले शाहू महाराज यांचे चरित्र, का.ना. साने, शके १८१५ ची आवृत्ती.

32. पर्णालपर्वतग्रहणाख्यान, संपादक स. म. दिवेकर, भारत इतिहास संशोधन मंडळ पुरस्कृत, पुणे, १९२३.

33. प्राचीन भारत, डॉ. रा.श्री. मोरवंचीकर, पिंपळापूरे प्रकाशन, नागपुर, १९९०.

34. प्राचीन भारताचा इतिहास, प्रा. र.ना. गायधनी, के. सागर पब्लिकेशन, पुणे, २००१.

35. प्राचीन भारतीय राजनिती, प्रा. सुधाकर देशपांडे, दास्ताने प्रकाशन, पुणे, १९८७, किं. २०.

36. प्राचीन व मध्ययुगीन भारत, प्रा. चंद्रशेखर फडनाईक, प्रिया प्रकाशन, नागपूर, ऑगस्ट २०००.

37. प्राचीन व मध्ययुगीन भारत, प्रारंभापासून ते १७०७ पर्यंत, प्रा. नी.सी. दिक्षित, पुरंदरे अँड कंपनी पब्लिशर्स, नागपूर, प्रथमावृत्ती १९८८, पाचवी आवृत्ती, जून, २००१.

38. पेशवेकालीन महाराष्ट्र, वासुदेव कृष्ण भावे, वरदा प्रकाशन पुणे, दुसरी आवृत्ती, १९९८.

39. पोर्तुगीज व मराठे संबंध, पा.स. पिसुर्लेकर, पुणे, १९६७.

40. भारत में राज्य प्रशासन, डॉ. हरिश्चंद्र शर्मा, कॉलेज बुक डेपो, १९३१.

41. भारताचा इतिहास (प्राचीन व मध्ययुगीन), डॉ. शं.गो. कोलारकर, श्री मंगेश प्रकाशन नागपूर, द्वितीयावृत्ती, २००१.

42. भारतीयांच्या शासनपद्धती, परशुराम म. लिमये, आर्य संस्कृती, पुणे, १९२८.

43. भोसल्यांच्या बंगालवरील स्वाऱ्या, बाळकृष्ण नारायण सहस्रबुद्धे, (गोंदिया), राजवाडे संशोधन मंडळ, धुळे, १९४४, किं. २ रु.

44. मध्यकालीन भारत का इतिहास, शिवकुमार गुप्ता, पंचशील प्रकाशन, जयपूर, प्रथमावृत्ती,१९९९.

45. मध्यकालीन भारतीय सभ्यता एवं संस्कृती, डॉ. बिपिन बिहारी सिन्हा, ज्ञानदा प्रकाशन, नई दिल्ली, संस्करण २००४.

46. मध्ययुगीन भारत, प्रा. अनिल कठारे, कल्पना प्रकाशन, नांदेड, प्रथमावृत्ती. (१००० ते १७०७).

47. मध्ययुगीन भारत (सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक इतिहास) प्रा. गजानन भिडे, प्रा. वैजयंती नाईकनवरे, डॉ. विजया नलावडे, फडके प्रकाशन, कोल्हापूर, द्वितीयावृत्ती, २००२.

48. मराठा आणि महाराष्ट्र, डॉ. अ.रा. कुलकर्णी, डायमंड प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, २००७.

49. मराठी रियासत, इतिहासकार गो.स. सरदेसाई, केशव ढवळे, गिरगाव प्रकाशन, १९३६.

50. मराठी सत्तेचा विकास आणि ऱ्हास, प्रा. सासवडकर, फडके प्रकाशन, कोल्हापूर.

51. मराठेकालीन संस्था व विचार, प्रा. गायकवाड, प्रा. सरदेसाई, प्रा. थोरात, प्रा. हनमाने, फडके प्रकाशन, १९९०.

52. मराठे व औरंगजेब, संपादक स.म. दिवेकर, भारत इतिहास संशोधन मंडळ पुरस्कृत, पुणे, १९६३.

53. 'मराठे व ब्रिटिशकालीन भारत', प्रा. नी. सी. दिक्षित, पिंपळापुरे प्रकाशन, नागपूर, १९९२.

54. मराठे आणि महाराष्ट्र, डॉ. अ.रा. कुलकर्णी, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, प्रथमावृत्ती, जानेवारी २००७, किं.२६५/-.

55. मराठे व इंग्रज, संपादक न.चि. केळकर, पुणे, १९१८.

56. मराठयांचा इतिहास, डॉ. अ.रा. कुलकर्णी, ग.ह. खरे, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथसंपदा निर्मिती, पुणे,१९१८

57. मराठयांचा सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक इतिहास, डॉ. बी.एन. सरदेसाई, फडके प्रकाशन, कोल्हापूर. १९३५

58. मराठयांची प्रशासन व्यवस्था, (Administrative System of the Marathas, Dr. S.N. Sen) अनुवाद विजया कुलकर्णी, मुंबई, प्रथमावृत्ती, २००३.

59. मराठयांचे स्वातंत्र्ययुद्ध, डॉ. जयसिंगराव भाऊसाहेब पवार, सुमेरु प्रकाशन, प्रथमावृत्ती, जुलै २००६.

60. मलिक अंबर, वि.स. वाकसकर, पुरुषोत्तम चित्रे, बडोदा, १ ली आवृत्ती, १९४१.

61. महाराष्ट्राचा पत्ररुप इतिहास, द.वि. आपटे, रा.वि. आतुरेकर, पुणे, १९४१.

62. मराठयांच्या सत्तेचा उत्कर्ष, मराठी रुपांतर, रा.मो. आपटे, विजापूरकर, इनामदार, १९६३

63. महाराष्ट्राचा इतिहास - मराठा कालखंड - शिवकाल (१६३०-१७७३), डॉ. वि.गो. खोबरेकर, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृति मंडळ, मुंबई, २००६, किं. २७५.

64. महाराष्ट्र इतिहासकाळातील राज्यकारभाराचा अभ्यास, शं.ना. जोशी, पुणे विद्यापीठ, प्रथमावृत्ती, १९५९.

65. महाराष्ट्रातील परिवर्तनाचा इतिहास (१८१८-१९६०) प्रा. गणेश, द. राऊत, ज्योती ग. राऊत.

66. महाराष्ट्रातील दप्तरखाने (वर्णन व तंत्र), वि.गो. खोबरेकर, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, द्वितीयावृत्ती, सप्टेंबर १९८८, किं. ५२ रु.

67. महाराष्ट्र राज्याची संघटना, डॉ. सूर्यकांत गडकरी, अनुवाद श्री. वि. खांदेवाले, हिमालया, मुंबई, प्रथमावृत्ती, १९९५, किं १०० रु.

68. महाराष्ट्र शासन आणि स्वरुप, मुळीक, नागपूर, १९९२.

69. मुघल भारत, प्रा. य.ना. कदम, प्रा. प्र.न. देशपांडे, प्रा. श्या.र. कायंदे, मेहता पब्लिकेशन पुणे, प्रथमावृत्ती,१९९२

70. मोगलकालीन भारताचा इतिहास (१५२६-१७०७), डॉ. दिनकर खाबडे, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद, १९९७

71. मोगल मराठा संघर्ष, संपादक पगडी सेतुमाधवराव, जोशी-लोखंडे प्रकाशन, पुणे, १९६२.

72. मोगल साम्राज्याचा इतिहास, प्रि.आर.डी. गायकवाड, प्रा. डी.डी. थोरात, फडके प्रकाशन, कोल्हापूर, जुलै २००१ (१५२६ ते १७०७).

73. मौर्यकाळ में वित्तीय अर्थशास्त्र, शशि आनंद, प्रभा क्लासीकल, नवी दिल्ली, १९९७.

74. रामचंद्रपंत अमात्यांचे आज्ञापत्र, संपादक डॉ. अ.रा. कुलकर्णी, डायमंड, पुणे, ऑक्टोबर २००७, किं. ३०० रु.

75. राजस्व, प्रा.सु.रा. ओझरकर, विद्या प्रकाशन, नागपूर, १९६९.

76. राजनितीची मुलतत्वे, हेन्री सिजविक, वासुदेव बळवंत पटवर्धन, प्रो. धोंडो केशव कर्वे.

77. रायगडची जीवनकथा, शां.वि. आवळसकर, महाराष्ट्र शासन, मुंबई, १९६२.

78. लोकप्रशासन, डॉ. ना. र. इनामदार, दास्ताने प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, १९९७.

79. शिवकालीन महाराष्ट्र, अ.रा. कुलकर्णी, राजहंस पुणे, १९९७, किं. १२० रु.

80. शिवकालीन महाराष्ट्र (महाराष्ट्राचा सामाजिक इतिहास), वा.कृ. भावे, वरदा, पुणे, पहिली आवृत्ती, एप्रिल, १९५७, द्वितीयावृत्ती, १९९८, किं. ४०० रु.

81. शिवाजी व शिवकाल, डॉ. जयसिंग पवार, फडके प्रकाशन, कोल्हापूर, १९८७.

82. शिवाजी व शिवयुग, प्रा. सदाशिव आठवले, कोल्हापूर, १९७१.

83. शिवचरित्र, प्रदीप, द.वि. आपटे, स.म. दिवेकर, भा.इ.सं.मं., पुणे, १९२५.

84. समग्र भारताचा इतिहास, प्रा. य.ना. कदम, फडके प्रकाशन, कोल्हापूर, प्रथमावृत्ती,१९९०.

85. हिंदुस्थानची राज्यव्यवस्था व लोकस्थिती, (१८९१-९२ अखेर हिंदूस्थानचे हालहवाले पार्लमेंटमध्ये मांडलेल्या रिपोर्टच्या आधारे),आर्यविजय, पुणे, १८९६.

86. हिंदवी स्वराज्य आणि मोगल, पगडी सेतू माधवराव, पुणे, १८६६.

87. श्री. शिवछत्रपती संकल्पित शिवचरित्र, (प्रस्तावना, आराखडा व साधने), मराठा मंदीर, मुंबई, १९६४.
88. श्री. छत्रपती शिवाजी महाराज, वा.सी. बेंद्रे, चेंबूर, मुंबई, १९७२
89. श्री. राजा शिवछत्रपती (भाग १ व २), गजानन भास्कर मेहेंदळे, डायमंड पब्लिकेशन, पुणे, पुर्नमुदांकन २००७ मार्च.
90. श्री. छत्रपती शिवाजी महाराज यांचे विचिकित्सक चरित्र, पूर्वार्ध-उतरार्ध, वा.सी. बेंद्रे, मुंबई, १९७२.
91. A History of Medieval India, Satish Chandra, Orient Longman, Hyderabad, Republication 2008, pri. 340.
92. Administration of the East India Company, John William Kaye, K.M. Publication, Alahabad, 1966.
93. Administration Organization – A Comparative Study of the Organization of Public Administration, Mayer, Stevens & Sons, London, 1957.
94. Administrative History of India (1834-1947) B.B. Mishra, Oxford University Press, 1970.
95. Administrative System of the Marathas, Dr. S.N. Sen., University of Calcutta, Calcutta, 1925.
96. Aspect of political Ideas and institution in Ancient India, Ram Sharan Sharma, Motilal Banarasidass Publication, Delhi, I$^{st}$ Edition 1959, Fifth revises Edition. 2005.
97. Arian's Ambassi Indica, English Translation, E. Hif. Robson, London, 1954.
98. Arth Sastra of Kautilya, Dr. Shama Shastri, Mysour, 5$^{th}$ Edition, 1956.

99. Administrative History of India (1834-1947), B.B. Misra, Oxford University Press, 1970.

100. Center State Relations & Sarkaria Commission, H.A.. Gani, Deep & Deep Publication, Delhi, 1996.

101. Civic Administration – Since Vedic Age., J.N. Singh, Ess Pulication, New Delhi, 1972.

102. Contribution to the History of the Hindu Revenue System, Dr. U.N.Ghoshal, Calcutta, 1929.

103. Contemporary issue in Indian Administration, R.B. Jain, Vishal Publication,1976.

104. Development Administration in India, V.A. Pai Panandikar, Mac Milan, Delhi,1978.

105. Foreign biographies of Shivaji, Dr. S.N. Sen, Book Co. Ltd; Calcutta, 1931, Reprint 1976.

106. Government in Rural India, D.G. Potter, Bell & Sons Ltd; Londan, 1954.

107. History of Indian Administration, B.N. Puri, Vol. I, II, III., Bharti Vidya Bhavan, Bombay, I$^{st}$ Edition .

108. History of India – I, Thaper Romila, Pengvin Books, England, 1966.

109. History of Medieval Deccan (1295-1724), H.K. Sherwani, P.M. Joshi, A.P Government, Hydrabad, 1973.

110. History of the Marathas, Grant Duff, S.M. Edwardes Oxford, 1921.

111. Income Tax law & Practice, R.R. Gupta, V.S. Gupta, Mira Prakashan, educational Publishers, Agra, 31$^{st}$ Edition.

112. Indian Public Finance, S.N. Agarwala, Vora and company publication, Bombay, I st Edition, 1967.

113. Land Revenue & Public Finance in Maratha Administration, H.B. Vashishta, Oriental Publishers Delhi, I st Edition, 1975.

114. Land Revenue Code, Hari Vinayak Sathe, Indira Printing Press, Mumbai, 2nd Edition, 1897.

115. Land and Sovereignty in India, Andre Wink, Orient Longman, Delhi, 1986.

116. Local Self-Govt. in India, M.P. Sharma, Kitab Mahal, Allahabad, 1965.

117. Maharashtra in the Age of Shivaji, Dr. A.R. Kulkarni., R.J. Deshmukh and Company; Pune, 1969.

118. Main Current of Maratha History, G.S. Sardesai, Mumbai, 1923.

119. Manu Smruti, Deepali Bhargava, Rawat Publication, Jaipur, 1952.

120. "Manus's code of Law", Prof. Patrick Ollivellc, Oxford University Press, New Delhi, 2006.

121. Maratha's and Their Administration, Om Prakashan, Anmol, Delhi, 2004.

122. Medieval India - A Miscellany, Vol. II, Qeyamuddin Ahmad., Alighar, Muslim University, Asia publication House, Bombay, 1972.

123. Memoir of Central India, Vol. I, Major General Sir John Malcolm, 1880.

124. Military System of the Marathas, Dr. S.N. Sen., Calcutta 1928.

125. New History of the Marathas, Vol – II, G.S. Sardesai, Phoenix, Mumbai,1957.

126. Organization of State Govt. and Maharashtra, Dr. S.S. Gadkari, Indian Public Addministration Institute (Maharashtra), Mumbai, 1990.

127. Panchayati Raj and Bureaucracy – A study of Relationship Patterns, V.R. Gaikwad, NTCD, Hydrabad, 1969.

128. Panchayati Raj - A study of rural local govt. in India, Madlick Herry, Longman Group Ltd; London, 1970.

129. Panchayati Raj in India, Rajeshwar Dayal, Metro Polition Book co. Ltd; New Delhi, 1970.

130. Principles & Methods of Taxation, John Murray, Londaon, 1906.

131. Public Administration in Ancient India, Pramathanath Banerjee, College Book Depo, Jaipur,1988.

132. Public Finance and Financial Administration in India, G.S. Lal., H.P.J. Kapoor, New Delhi, $2^{nd}$ Edition, 1976.

133. Reorganization of Maharashtra Administration, Vol I, & II, Heble, International Book house, New Delhi,1993.

134. Revenue System in Post Maury, D.N. Jha, Gupta Times, Calcutta, 1951.

135. Rise of the Maratha Power, M.G. Ranade, Mahiti Prasaran Mantralay, Government of India, New Delhi, 1967.

136. Rural Development Administration in India, P.R. Dubhashi, Bombay Popular Prakashan, 1970.

137. Shivaji - The Great, Parts I and II, Dr. Bal Krishna, Taraporewala and Sons, Bombay, 1932.

138. Shivaji – The Pragmatist, K.L. Mahaley, Vishwa Bharti Park, Nagpur, $I^{st}$ Edition, June 1969.

139. Shivaji & His Times, Dr. B.K. Kamble, Publishers : Shivaji University Kolhapur, 1982.

140. Shivaji & His Times, Sir Jaduntha Sardar, Orient Longman Ltd., Bombay, 1973.

141. House of Shivaji, Sir Jaduntha.N. Sarkar, 3rd edition, Calcutta, 1955.

142. Social Cultural Economic History of India, S.C. Raychaudhary, Surjit Publication, Delhi, 1978.

143. State & Local Politics – The Gread Entanglement, Robert S. Lorch, Attontic Publication, New Delhi, 1995

144. State Taxation in India, Dr. Rajendra Jain, Progress Publication, Bhopal, Ist Edition, 1972.

145. Taxation in India, Edited By M.R. Pai, Popular, Bombay, 1968.

146. Tax Rate & Tax Revenue, P.R. Panchmukhi, Har Anand Publication, New Delhi, 1996.

147. The Administrative of the East India Company (A History of Indian progress), John William Kaye, K.M.P.L., Alahabad, 1964.

148. 'The Administration of the Mughal Empire', I.H. Qureshi, N.V. Publication, Lohanipur, Patna, 3.

149. The Creation of Wealth, R.M. Lala, I.B.H. Publication, Mumbai, 1981.

150. The economic History of Ancient India, Das Santosh Kumar, Hawora, 1925.

151. The History Of Vijaynagar Empire, M.H. Ramshrama, ed. M.H. Gopal, Popular, Bombay, 1978.

152. The Judicial system of the Marathas, Deccan College, Pune, 1953.

153. The Resource of Indian Taxation System (1960-61-73-74), V.G. Rao, Allied Publication, Bombay, I[st] Edition, 1979.

154. The Statistical survey of Kokuan – Jervis.

155. Travels in the Mogul Empire. François Bernier, Tr. Annotated by Mr. Archibald constable (A.C. 1891).

156. Union Taxes in India, Usha Bishnoi, CHUGH Publication, Alahabad, 1980.

B) **अप्रकाशित कागद पत्रे** -

1. सातारच्या प्रतिनिधी घराण्याचा इतिहास, ग्रंथांक १,२,३, रा अनंत नारायण भागवत व रा वामन परशुराम मेहेंदळे, औध स्टेट प्रेस. औंध.
2. पेशवे दप्तरांतील रुमाल, (उत्तर कोकण).
3. कोकण प्रांत अजमास, रुमाल.
4. कोकण प्रांत जमाव, रुमाल.
5. आंगरे दप्तर, रुमाल.
6. महाल नागाव अप्रकाशीत कागद.
7. करीमबेग मुलाणा  सनद (इनाम Aकमीशन) १८५३ दस्ताऐवज.

C) Journals:

i) Economic & Political Weekly, Bombay.

ii) Nagarlok, IIPA, New Delhi.

iii) Occasional Paper- 'Tax System and Tax Reforms In India,' Luigi Bernardi and Angela Fraschini, Uni. of Pavia and University of Eastern Piedmont. Italy.

D) Internet –

wikipedia, the free encyclopedia.

http:// www.bbc.co.uk

Encyclopedia Britanica

http://en.wikipedia.org/wiki/

-------♦ ♦ ♦ ♦-------

# परिशिष्ठ ३

## करीमबेग मुलाणा सनद (इनाम कमीशन) दस्ताऐवज

पारिशिष्ट : 3 , (.3)

Register of Alienated Villages and Lands in the Khed. Taluka Poona, District.

| Name of Village | Name of the Present Alienes. | Class of Alienation. | PARTICULARS OF THE SANAD. Number. | Date Moth and Year | Name and Office the Officer Signing it | Name of the Holder. | Name of the Taluka & District, in which it is entered | Number of Form of the Sanad annexed to the Register. | Duration of tenure. i.e. whether continable Permanent or hereditaril for more lives than one or Felif for what Peric. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 2. | 3. | 4. | 5. | 6. | 7. | 8. | 9. | 10. | 11. |
| 22. ...sari Bu-rug. | Masjid Manager, Janu valad Karimbeg Mulane. | Class.-III.-Devasthan. | 322. | 27th November. 1861. | His Excellency the Honourable Sir George Russel Clerk Governor of Bombay. | Kasambeg valad Aminbeg. | Taluka Pabal District. Poona. | 2. | Permanent. |

I. H. Imamdar Mulani
I - B 41
22-08-2005
6/10/2005

Compared by

Archivist,
PUNE ARCHIVES, PUNE.

Received ( 104/- ) Rupees One hundred four Only as fee (including Searchfee) for this Certified extract.

Pune :-

Date :-

Archivist,
PUNE ARCHIVES PUNE

PUNE ARCHIVES PUNE ★ GOVT. OF MAHARASHTRA ★

Kept under Section 53 of the Bombay Land Revenue Code (Bombay Act V of 1879) as it stood on. 1886-87.

| ...LARS OF THE VILLAGES OF LANDS ALIENATED | | | | LAND REVENUE PAYABLE TO GOVERNMENT | | | | Land Revenue Alienated | REMARKS. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| village | If part Only of the village, the Survey Number. | Area | Survey Assessment | Amount of old judi or Salami | Addition Quit-rent if any payable under the Sanad: Rate | Addition Quit-rent if any payable under the Sanad: Amount. | TOtal | | |
| 12. | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 29 | 21. |
| | | A. g. | Rs. a. p. | Rs. a. p. | Rs. a. p. | Rs. a. p. | Rs. a. p. | Rs. a. p. | |
| .... | 279 | 39 19 | 12 0 0 | 4 8 0 | 0 4 0 | 1 14 0 | 6 6 0 | 5 10 0 | The amount of mam judi is shown at Rs.4-7-7 in the Sa The pies have however been omitted the village Regis and Rs.4.8.0 are actually levied. |

PUNE ARCHIVES, PUNE ★ GOVT. OF MAHARASHTRA ★

INAM
A
COMMISSION

[illegible]

[illegible]

R 62 | 7 | 7

੪ ੴ[illegible]

ਪਤੀ ੪੮੦੭੦ [illegible]

੫ ੴ[illegible]

੬ ੴ[illegible]

[illegible]

੭ ੴ[illegible]

[illegible]

੮ ੴ[illegible]

ਕੀਤੀ।

੯ ੴ[illegible]

[illegible]

62 | 2 | P

2

INAM A COMMISSION

[illegible]

[illegible]

[illegible]

११ [illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

१२ [illegible]

१३ [illegible]

[illegible]

१४ [illegible]

[illegible]

१५ [illegible]

[illegible]

| R | 62 | 2 B | [illegible] |
|---|---|---|---|

[illegible]

[illegible] 3

| 62 | 2 | 5 |
| --- | --- | --- |

[illegible]

INAM A COMMISSION

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]


[illegible]

अभिलेखाधिकारी,
पुणे पुरालेखागार, पुणे

INAM
A
COMMISSION

| | | |
|---|---|---|
| R 62 | 2 | 6 |

अभिलेखाधिकारी,
पुणे पुरालेखागार, पुणे



अभिलेखाधिकारी,
पुणे पुरालेखागार, पुणे

R 62 | 7 | 8

५

[illegible]

पुणे पुरालेखागार, पुणे

अभिलेखाधिकारी,
पुणे पुरालेखागार, पुणे

[illegible]

| 62 | 7 | 9 |
|---|---|---|

पुणे पुराभिलेखागार, पुणे
महाराष्ट्र शासन

| | | | | |
|---|---|---|---|---|
| [illegible] | [illegible] | [illegible] | | |
| | | [illegible] | [illegible] | [illegible] |
| [illegible] | [illegible] | १ | १ | २ |

[illegible]

[signature]

अभिलेखाधिकारी,
पुणे पुराभिलेखागार, पुणे

62 2 14

INAM A COMMISSION

पुणे पुराभिलेखागार, पुणे

अभिलेखाधिकारी,
पुणे पुराभिलेखागार, पुणे

अर्जदाराचे नाव : ईस्माईल इब्राहिम इनामदार मुलाणी

प्रमाणित नकला/उतारा आकार। 29 रु.10/- प्रमाणे रु. 290/-

आलेला अर्ज दिनांक : 22-08-2005

नकला/उतारा दिल्याचा दिनांक। 6/10/2005

पुरी नकल/नग उतारा १

अभिलेखाधिकारी,
पुणे पुरालेखागार, पुणे

INAM A COMMISSION

R. 62 | 2 | 11

अभिलेखाधिकारी,
पुणे पुरालेखागार, पुणे

[illegible]

| R 62 | Z | 12 |
|---|---|---|

[illegible]

INAM A COMMISSION

1 [illegible]

2 [illegible]

3 [illegible]

[illegible]

R 62 | 2 | 13

[illegible]

अभिलेखाधिकारी,
पुणे पुरालेखागार, पुणे

90

INAM A COMMISSION

[illegible]

[illegible]

[illegible]

| | | |
|---|---|---|
| 62 | 7 | 65 |

१ [illegible]

[illegible]

२ [illegible]

[illegible]

[illegible]

३ [illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

INAM A COMMISSION

अभिलेखाधिकारी,
पुणे पुराभिलेखागार, पुणे

429

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

| | | |
|---|---|---|
| 62 | 2 | 17 |

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

INAM
A
COMMISSION

| 62 | 2 | 18 |

अभिलेखाधिकारी,
पुणे पुराभिलेखागार, पुणे

430

| | | |
|---|---|---|
| 62 | 7 | 19 |

Asstt. Inam Comm.

अभिलेखाधिकारी,
पुणे पुरालेखागार, पुणे

मौजे अवसरी बुद्रुख तर्फ मजकुर

हजरी बुकातील रोज नंबर ५७

तालुके पाबळ

सन १२६० फसलीचे हिशोबास जमिन दाखल आहे ती —

| जमिन कदिम मापा प्रमाणे | प्रतबंद नंबर | एकर गुंठे | आकार रुपये | इसमाचे नाव | सरकार घेण्याचे इस्तकबिल किती |
| --- | --- | --- | --- | --- | --- |
| ·१२० सन १२३८ फसलीचे हिशेबाने बिघे पनास | २०३ | ३७,६१२ | १२ | म्हसीदी बद्दल वहिवाटदार करीमबेग वा परीबेग मुलाणा | ४६७ ६७ |

सरहद्द म्हसीदीबद्दल वहिवाटदार करीमबेग वगैरे परीबेग मुलाणा मैत सबब त्याचा वारसदार असिस्टंट कलेक्टर याचे हुकुमाने ठरलेला जानु वगैरे करीमबेग मुलाणा याची कैफियत घेण्याची

तारिख ३० माहे डिसेंबर सन १८५३ इसवी
मुक्काम पेठ अवसरी खुर्द

बळवंतराव नारायण आ। अवल कारकुन पेठ मजकुर
साक्षकरी गावगना

इसम मजकुर याचे लिहिणे खाली लिहिल्या प्रमाणे

१ माझे नाव जानु बेग माझे बापाचे नाव करीमबेग आज्याचे नाव परीबेग आडनाव मोगल जात मुसलमान कसब मुलाणकीचे काम करावयाचे उमर वर्षे २५

२ माझा जन्म मौजे अवसरी बुद्रुख तर्फ मजकुर पेठ अवसरी खुर्द तालुके पाबळ जिल्हा पुणे

येथे जाला व मुख्य वतनाची जागा मौजे मजकुरच आहे.
३ मौजे मजकुरी मस्जिदीस कदीम मापा प्रमाणे ॥५० पनास बिघे जमिन च्यालत आली आहे.

४ सदरहू जमीन दिवाय इनाम मस्जीदी कायम आहे तो पावेतो चालावयाची याजबद्दल सरकारास परी ४८७८७ ठ्यावी लागली

५ सदरहू जमीन जिरायत आहे इनाम मिळाल्या पासून तशीच आहे

६ सदरहू इनाम जमीन आलमगीर बादशाहा यांनी दिली ही सरकार खालसा तुन इनाम दिली असे आमचे वडिल व गाववाले लोकु सांगत आले त्याजवरून माहीत आहे.

७ सदरहू जमीन कोणते साली मिळाली ते साल ठाउक नाही परंतू अजमासे २०० देनसे वर्षे जाली याची माहिती वडिल सांगतात यावरुन आहे

८ सदरहू इनाम जमिनीचा संपादक सदरबो मुल्ला होता तो आमचे वंशीचा मुख्य पुरुष होता.

९ सदरहू इनाम जमीन मस्जिदीकडे आम्हांस खर्च फकीर फुकरा कोन्ही येतील त्यास जेवू घालण्यास व ताकूद करण्या करिता मिळाली आहे त्याप्रमाणे मी खर्च करून जमिनीची वहिवाट करीत आहे.

१० माजी आमल दूर जाल्या ते दिवसी सदरहू जमीनीची वहिवाटदार माझा आजा पीरबा वल्द भाउबा मुल्ला होता.

११ सदरहू वहिवाटदार मेल्यास सुमारे १२ बारा वर्षे होन आली नंतर वहिवाट मासे बापाचे हातात येउन तोही वहिवाट करीत आला आणि तोही मेत होउन दोन वर्षे होत आली. त्या दिवसा पासून वहिवाट माझे हाताल वारसपणाचे योगाने येउन यावरहल सरकारची परवानगी मजकडे चालविण्याविसी जाली आहे.

१२ सदरहू जमिन मुळी मिळाल्या पासून मांनी आंमल अखेर पर्यंत जप्ती वौगेरे हिरून जाली नाही

१३ ज्या दिवसी कुंपणी सरकारचा आमल सुरु म्हणजे सन १२२७ फसली पासून सदरहू जमिनिसि जप्ती वौगेरे न होता बिनदिकत चालत आली असे आमचे वडिल सांगत आहे.

१४ सदरहू जमिनी पैकी काही जमिन अगर दरोबस्त जमिन आम्ही आगर आमचे वडिला पैकी कुणाच्यास कोणी पोट इनाम दिल्ही नाही व सरकारने परत काही घेतली नाही

१५ सदरहू इनाम जमिनिचा तपसील लिहिला त्याची लावणी कुणा कडून नीमे हिस्याने करवितो त्याचे उत्पन्न येईल ते घेउन मसीदिस खर्च करितो त्याचा जमा खर्च

जमा

खर्च

१० सदरहू जमीनीची लागवड खर्च वजा जाता उत्पन्न रुपये

२ फकीर कुबरा मसीदीत येतील ते जेउ घालण्यास

० ला

४६७६७ सरकारची परीस द्यावे लागतात

१०

३८८८५ ताबुत व लोबा करिता खर्च लागतो याजबद्दल

१०

येकुण होट्र रुपये खर्च गेला बाकी जमा काही राहल नाही व यासिवाये काही मिळत नाही

१४ सद्दरहू पंधरा कलमाच्या मजकुर खरा करण्याविसी आम्हापासी समरूपण काही येकु नाही व आम्ही देण्याची नाही व पुराव्याच्या मजकुर जाहिर करावयाच्या नाही


येणे प्रमाणे सवालाच्या जबाब मातालकरी पेश अवसरी बुद्रुक यांचे कचेरीत लिहून देण्यास प्रारंभ केला तारिख ३० माहे डिसेंबर सन १८५३ इसवी पुरी केली तारिख मजकुर
हस्तुर रामचंद्र गोपाल कारकुन निसबत देसमुख

हे निसाणी जानुबेग बापाचे नाव करीमबेग आज्याचे नाव पीरबेग मुभाणा मौजे अवसरी बुद्रुक याचे हातचे लेखणी खरून केली असे हस्तुर सद्दर

सद्दरहू कैफियतीत जो मजकुर लिहून दिल्हा तो खरा आहे यात काही कमजास्ती करावयाच्या नाही म्हणोन इसम मजकुर यांच्ये समोर आज तारिख ३० माहे डिसेंबर सन १८५३ इसवी रोजी कबुल जाल्या वरून त्याजला आजरोजी परवानगी दिल्ही असे तारिख मजकुर हस्तुर रामचंद्र गोपाल कारकुन निसबत देसमुख

बळवंतराव नारायण आ। अवल कारकुन
पेश मजकुर
मालमकरी गावगनो

तपासणार रामचंद्र बापुराव कारकुन तारिख २० जानेवारी १८५४


मोडी, मराठी लिप्यंतरकार

वंशावळ जानु बेग वल्लद ~~करिमबेग~~ पीरबेग मुलाणा मौजे अवसरी बुद्रुख थाणी मौजे मजकुरचे म्हसीदीचे इनाम जमिनी बद्दल कैफियत लिहून देऊन त्याजबरोबर ही वंशावळ अंपादनुयांचे आज्ञा पासून लिहून दिली असे तारीख ३० माहे डिसेंबर सन १८५३ इसवी हस्तुर रामचंद्र गोपाल कारकुन निसबत देशमुख

बळवंतराव नारायण आ। अवल कारकुन
मामलकरी गावगना।

सदरहू वंशावळ लिहून दिली आहे आणि माझा बाप मयत असोन मी त्याचा वारसपुत्र वंशावळ ऐकून इसम लिहून दिली ही खरी असोन असे केली असे तारीख ८ आगष्ट सन १८५५ इसवी हस्तुर कृष्णराव चिंतामण लिहरे कारकुन पेरा अवकरी

ही निशाणी जानु वल्लद करिमबेग मुलाणा याने आपले हाताने निशाणी धरून केली असे हस्तुर सदर

समक्ष लिहून दिली।

हाजरी बुक पेठ अवसरी खुर्द तालुके पाबळ जिल्हा पुणे येथील मामलकरी कचेरीत इनामदार लोक नेटिवीती देण्या करिता हजर जाल्या बद्दल नेटिवीती पुण्या नेऊन आजाना जिरीप देण्या बद्दल

| नंबर | हजर जाले इसमाचे नांव | हजर जाल्याची तारिख | ज्या दिवशी हजर होऊन त्याच दिवशी द्यावी ते | मामलकरी याची तारिख सही | नेटिवती पुण्या नेऊन आजाला जिरीप दिल्याची तारिख | नेटिवती पुणे आपली दिवस लागल्याची सबब |
| --- | --- | --- | --- | --- | --- | --- |
| ५७ | जानुबी वलद करीमबी मुलाना मौजे अवसरी खु॥ | तारिख ३० माहे डिसेंबर सन १८५३ | इ निशाणी जानुबी वलद करीम मुलाना याचे सांगणे लेखणी करून केली हस्तुर रामचंद्र मापाले कुलकर्णी मि॥ देशमुख | तारिख ३० डिसेंबर सन १८५३ इसवी बलवंतराव नारायण कारकुन आ॥ अवल कारकुन मामलकरी तालुका | ३० डिसेंबर सन १८५३ इसवी | |

तपासणार रामचंद्र बाबुराव कारकुन ता॥ १० जानेवारी सन १८५४

हुजूर सुपरीटेंडंट कप्तान कीमकोर्ट बाहादूर असिस्टंट इनाम कमिशनर यांजकडे मामलकरी पेठ अवसरी खुर्द यांजकडून रिपोर्ट नंबर ९ बरोबर रवाना

तारिख २ माहे जानेवारी सन १८५४ इसवी

हस्तुर रामचंद्र गोपाल कारकुन निसबत देशमुख

बलवंत नारायण कारकुन आ॥ अवल कारकुन पेठ अवसरी मामलकरी तालुका

434

माहे जानेवारी सन १८५४ इसवी मुक्काम

पेठ ऊवसरी खुर्द तालुके पाबळ जिल्हा पुणे

फेरिस्त इनामदार भिकु यांनी कैफियती व वंशावळी इनाम जमिनी बा॥ दिल्हा कागद

| गांवाचे नांव | इसमाचे नांव | माहाली रामचंद्र गोपाल कारकुन निसबत देशमुख | | |
| --- | --- | --- | --- | --- |
| | | कैफियती | वंशावळी | कागद |
| ऊवसरी बुद्रुक | जानुजी वलद करिमजी मुलाणा | १ | १ | २ |

हुजूर खुदावंत मेहेरबान क्लेपर कोर्ट बाहादूर असिस्टंट इनाम कमिशनर जिल्हा पुणे यांजकडे माहालकरी पेठ ऊवसरी यांजकडून रपोर्ट नंबर १ बरोबर रवाना तारीख २ माहे जानेवारी सन १८५४ इसवी

तपासणार रामचंद्र बाबुराव कारकुन तारीख २० जानेवारी १८५४

रुजू रामचंद्र गोपाल कारकुन निसबत देशमुख

बळवंतराव नारायण आ॥ अवल कारकुन माहालकरी पेठ मावळ

दाखला पाटील मौजे आवसरी बु॥ तर्फ मजकुर सन १२६६ फसली पेश्याहुन गोविंदराव जगताप सिपाई जानुबा मुभाने यास न्यावया करिता आले त्यास जानुबा मुभाना हा गावी तमाम माहित मुबरिस आहे कळावे तारिख १४ जून सन १८५५ इसवी

अर्जी गोविंद २ २ २

दाखल तारिख १४ जून १८५५

कैफियती सोबत रवाना

२ २ २

## जबानी - न्हनू मुरा मुलाने याची

जबानी कीा मी न्हनू वलद मुराभाई मुलाचे मौजे अवकरी बुद्रुख
पेठ अवकरी खुर्द तालुके पाबळ जिल्हा पुणे सन १९५५ फसली
मालगवरी पेठ मजकूर याचे समोर विद्यार्थ्याला वरून लिहून
देतोजे मौजे मजकुरची जाणुनी मुलाना याचे नावे इनाम जमिन
असे पडत असेल तो ममईस जाऊन येऊ वर्षे लोक आले तेथे
खरल्या सुद्धा राहण्यास गेला परत येण्या आरखा नसोन तेथे
सत्रयास गेला आहे त्याजला मी आणण्यास ममईस जाऊन
आजपासून त्याजला पंधरा दिवसांनी आणोन पेश्यास हजर
करीतो कारण इनाम जमिनीस माझा हिस्सा असोन जमिनीची
वहिवाट मीच करीतो त्याजला आणण्यास मी ममईस जाईन
उशीर जाला. हि जबानी लिहून दिली असे तारीख
९ माहे जुलई सन १९५६ इसवी

सही रघ न्हनू वलद मुरा भाई याचे
हातची असे

साक्ष

१ अनंतराव चिमाजण
कुलकर्णी २ २
इस्पुर खुद

२ शंभो नरहर कुलकर्णी
२ २ २

समक्ष लिहून दिली
शिवकु गोविंद

६

## पुरवणी जबाब जानु करीमबेग.

पुरवणी जबाब जानु वलद करीमबेग मुसलमान मौजे अवसरी बुद्रुख तर्फ मजकुर पेटा अवसरी खुर्द तालुके पाबळ जिल्हा पुणे सन १२५५ फसली कारणे पुरवणी जबाब लिहून देतो जे मौजे मजकुरी मशीदीचे इनाम जमीन आहे त्या विषयी मी कैफियत लिहून दिली आहे त्यात विसाशिवाय वरून लिहून देतो की मी अजपर्यंत गावी हजर नव्हतो मुंबईस माझी आई दुखणी पडली होती म्हणोन मुंबईस गेलो होतो कालरोजी मुंबईहून अवसरी बुद्रुख येथे आलो आणि पाहिले त्याचे पश्चात हजर होणे विषयी हुकुम आणिल्यावरून हजर जालो.

१ माझे बापाचे नाव अवसरी बुद्रुखचे आहे कैफियतीतील कलम २ च्या जबाबा आहे.

२. कैफियतीतील कलम ८च्या जबाबा की मुल पुरुष फैजुद्दिन वल्द यांचे हे मजपासून अवराचे पिढीचा येत आहे असी माहिती मजला आहे

३ कैफियतीतील कलम १० च्या जबाबा की पूर्वी जाले कैफियतीचे जबाबात वहिवाटदार आजा परिबा वलद लाडुबा मुसलमान म्हणोन लागले ते मी गैरसमजुतीने आणिल्यामुळे लागले वंशावळीत शेटबा म्हणोन लिहून दिले तेच खरे आहे लाडु बेग खरे नाही

४ कुतुबबेग याचे नाव वंशावळीत दाखल आहे आणि तो नागपुरकडे गेला तिकडे त्याचा वंश आहे किंवा नाही हे समजत नाही व तो सुद्धा कायम नाही असत आहे इतके मात्र माहित आहे मला व रहिमबेग याची नक्कल आहे इतकी नाही.

सदरहू कलमवार लिहून दिले असे तारिख ८ माहे अगस्त सन १८५६ हुजूर दस्तुर कृष्णराव चिंतामण शिरुरे कारकुन पेटा अवसरी.

साक्षीदार निशाणी अमानी जानु वलद करीमबेग मुसलमान मौजे मजकुर याणे आपले हाताने लेखणी धरून केली असे हुजुर कृष्णराव चिंतामण कारकुन

समक्ष लिहून दिले
त्रिंबक गोविंद मावळकर

४३६

पौ।। तारिख ७ जून सन १८५६

हुजरत खुदावंद ग्राफीन साहेब बाहादूर
इनाम कमिशनर साहेबाचे खिजमतीस

अर्जदास्त हरिकृष्ण हुजूर कारकून सलाम बाजद सलाम नागारिन तारिख ७ जून सन १८५५ इसवी हिंगर पेरा अवसरी तालुके पाबळ येथील जमिनी बद्दल कैफियती आल्या त्या दुरुस्त करावयाच्या

१ मौजे चिंचोडी येथील कृष्णाजी खंडेराय देशमुख यांनी कैफियतीबरोबर वंशावळ दिल्ही त्यात राजाराम सखाराम हे इसम कायम किंवा मयत हे कळत नाही याजबद्दल पुरवणी जबाब व्हावा।

२ मौजे चिंचोडी येथील लक्ष्मणराव देशमुख यांनी कैफियत दिल्ही त्यात आडनाव दाखल केले नाही व जमीन पोट इनाम किंवा कसे याजबद्दल ४/६ प्रमाणे पुरवणी जबाब घेऊन वंशावळीत रूपादक यास दिली नाही व सदरहू वंशावळीवर मालकाची सही आली नाही हे दुरुस्त व्हावी।

मौजे अवसरी बु।। येथील जानुबेग वलद करीमबेग मुलाणा यांनी ८८ दिल्ही त्यात ती पूर्वी रामचंद्र बाबुराव कारकून यांनी ८८ केली परंतु त्यात उघड चुक्या नजरेस आल्यावरुन पुन्हा तपासणी आली त्याजबद्दल

१ सदरहू इसमाचे राहण्याचे गाव कोण व रूपादक किती पिढीचा पुरुष होता आहे याजबद्दल २८ कलमावर पुरवणी जबाब व्हावा

२ सदरहू कै० राणोबा जबाबात लिहीले वहिवाटदाराचे बापाचे नाव भाऊबा दाखल केले परंतु वंशावळीवरून पाहता राणोबाचा भागाने आहे त्यास खरे नाव कोणते याजबद्दल पुरवणी जबाब व्हावा।

३ सदर हुकमाने वंशावळ तयार केली त्याजवर त्याने आपली काही केली नसोन या वंशावळीत रूपाद्कु यारु केरा नाही आणी रुस्तुमबा यांची ~~अलिम~~ नकल आहे किंवा पुढे रहाती आहे हे कळत ~~नाही~~ असून मलाण व रहिमबा यांची नकल आहे किंवा पुढे रहाती आहे हे ही कळत नाही ते दुरुस्त करावे

येणेप्रमाणे मजकुर जाहिर केला आहे तरी सदरहूची तजवीज हुजूरहुन व्हावी हा अर्ज

हुजूर आपाजी हुजूर कारकुन

हरिकृष्ण हुजूर कारकुन

पान १४ तालुके पावड जिल्हा पुणे

२५५८

अन्न मातालकरी पेश अवसरी खुर्द

मौजे चिंचोडी येथील जमिनी बद्दल कृष्णाजी खंडेराव देशमुख यांची लक्ष्मणदास बैरागी यांची मौजे अवसरी बु॥ येथील जानुबा वल्द ~~[illegible]~~ करिमबा यांची कैफियती वंशावळी लागत आले कागद मुद्दा शिके करून या हुकमा बरोबर तुम्हाकडे पाठविले आहेत तरी सदरी हरिकृष्ण हुजूर कारकुन यांनी पहिल्या कलमात लिहिल्याप्रमाणे कैफियत देणार याजकडून पुरवणी जबाब लिहून वंशावळीत दुरुस्त केला आहे. दुसरी कलमात लिहिल्याप्रमाणे कैफियत देणार याजकडून पुरवणी जबाब घेऊन वंशावळीस सही व शेरा लिहून . तिसऱ्या कलमात लिहिल्याप्रमाणे पोट कलम १।२।३ अन्वये पुरवणी जबाब सदर हुकमा करून घेऊन वंशावळीत दुरुस्त करून कागद लौकर या खाली रुपेरा बराबर पाठवावे पेरी कैफियती ३ असत ता ९ जून सन १८५५ इसवी

नारायण हुजूर कारकुन

माधवराव मोरेश्वर हुजूर कारकुन

~~नं. १७~~

~~हुजूर अर्ज~~

(

पान - १७

हुजूरास अर्ज

तारिख १४ माहे ११

सन १८५५

पै।। तारिख १७

अर्जदार हुकुमाप्रमाणे पुरवणी जबाब मौजे चिंचोडी येथील बैरागी
याने कैफियतीचे कलम १६ बद्दल पुरवणी जबाब घेऊन
वंशावळीस इनाम संपादन करणार यांनी शेरा लिहिला व सही घेतली
कुळकर्णी खंडेराव चिंचोडीकर यांची पुरवणी जबाब वंशावळी बद्दल
घेऊन कैफियती भात ठेविला = मौजे अवसरी बुद्रुक येथील आनुबेग
मुलाणा हा गावी जमीन असमर्थ आहे म्हणून मौजे मंजुरचे पाटील
याजकडून दाखला आला तो भात कैफियतीस ठेविला आहे
गावी हजर नाही कारणावरून त्याची जबाब आला नाही आवदाचे
खिजमतीस शेषन होते ज्यादा अनरूप तपास नाकद नाही हा अर्ज
कागद ३

दस्तूर रघुनंद गोपाल गु।। हरिभुध पेरा मजकूर
दाखल तारिख २० जुन सन १८५५

त्रिंबक गोविंद

हरि कृष्ण हुजूर कारकुन यांस

हुकूम होऊन आलेल्या २ कैफियती पाहून बरोबर असल्यास
ठेवाव्या आणि येकु अवसरी गावचे जमिनीची परत पाठवावी
येरी कागद ३ ता।। १५ जून सन १८५६ इसवी

नारायण हुजूर कारकुन

माधवराव मोरेश्वर कारकुन

T-१८

हुजूर अर्जी तारिख २० माहे जून सन १८५५

हुकुमा प्रमाणे मौजे चिंचोडी येथील कैफियत माहून येऊन रुजू केली आणि मौजे आवरसरी गावचे जमिनीची कैफियत खावंदाचे हुजुरास पाठविली असे जाहिर व्हावे हे अर्जी पेरी कैफियत १
हरि कृष्ण हुजूर कारकुन यास

ता. पावक जिल्हा मनजुर

अर्जी माताळकरी पेरा आवरसरी थुंद यास

मौजे आवरसरी गावचे जमिनीची कैफियत १ परत पाठविली असे तरी कैफियत खेर जाबुता मुबारीक पुढे गेला बवरल पुढे खेर भोवसूर थावयाजोगा असल्यास वार पाहून येताच हरदहू प्रमाणे जबाब घेऊन पाठवावा सोनूर येथ्या जोगा नसल्यास जमिनीचे वहिवाटदार किंवा सदरचे घरी कुकरे कोणी असेल सदर ज्या मुखत्यार पत्र किंवा मालकु असल्यास कोणीन नजरेत असावे मालकीच हजर नसल्यावर काही अडचण पडणार नाही कळावे पेरी कागद कैफियत १ ता. 30 जून सन १८५५ रवाना.

नारायण हुजूर कारकुन

पा
माधवराव मारेश्वर रु.

दाखल तारिख ४ जुलै १८५५ इसवी

पैश तारिख १३ आगष्ट

अवसरी बुद्रुक मिरासी अक्क

ता। पाबळ अ. नंबर
८४५

अवसरी बु॥ येथिल इसम आजरोजी अमर जाब्या नरेन पुरवणी जबाब त्यांचा घेउन दाखल केला आहे त्याजवरुन जाहिरात येथिल वंशावळीवर त्याची सही घेतली व रुपादकारक केरा लिहिला आहे जाहिर व्हावे ता अर्जी तारिख ८ आगष्ट सन १८५५ इसवी कागद कैफियती समेत ४

त्रिंबक गोविंद मातालकरी

दाखल तारिख १३ आगष्ट सन १८५५

हरि कृष्ण हुजूर कारकुन यास

दुरुस्त होउन कैफियत पाठविली आहे पाहून बराबर असल्यास ठेवावी सदरी लिहिले तीनी कैफियतीचे वंशावळीत दुरुस्त करावयाचे असेल ते कलम २ करावे पोरी कागद ३ ता १४ आगष्ट सन १८५६ इसवी

नारायण हुजूर कारकुन यास
माधवराव मोरेश्वर हुजूर ता। सदर

इंग्रजी सही
२ २ २
अ. इनाम कमिशनर

तयार करणार –

[signature] 30/12/06

४३१

बागणबेग

|

पीरबेग

|

शाहबेग

|

पीरबेग

|

करीमबेग

|

जानुबेग १८५३ रोजी वृत्तिपत्र दिली

हसनबेग भाऊ

सन - १८६१ जानु करीम बेग व्यवस्थापक मस्जिद यांजकडे इनाम चालू
जमीन :- ३७ एकर १७ गुंठे.

# परिशिष्ट ४

## नकाशे


### मुस्लिम इंडिया -१२०० ते १५००



मोगल एम्पाअर


0 100 200 300 mi
0 200 400 km
Srinagar
KASHMIR
Kabul
Ghazni
Qandahār
Indus
Jhelum
Mankot
KĀNGRA
Amritsar
Beās
Lahore
Sutlej
Jalandhar
PUNJAB
Sirhind
Multān
Ajodhan
Yamuna
Ganges
GREAT HIMALAYA RANGE
KUMAUN
Brahmaputra
BALUCHISTĀN
Uch
Pānīpat
Delhi
Sambhal
Bīkāner
Narwaul
DOAB
Ghāghara
AYODHYA
Bhakkar
RĀJPUTĀNA
Āgra
Kannauj
Fatehpur Sīkri
ASSAM
Jaisalmer
Ajmer
Amber
Lucknow
COOCH
SINDH
Jodhpur
Gwalior
Jaunpur
Chausa
Ganges
BIHĀR
MĀRWĀR
Ranthambor
Allahābād
Patna
Gaur
Thatta
Chitor
BUNDELKHAND
Benares
BIHĀR
Bihār
BENGAL
MEWAR
Chanderi
Kālinjar
JHARKHAND
Dacca
KUTCH
AHMAD SHĀHĪ
MĀLWA
Palāmau
Ahmadābād
GONDWĀNA
Chittagong
Navanagar
GUJARAT
Baroda
Narmada
Mahānadi
KĀTHIĀWĀR
Asīrgarh
Junāgadh
QHĀNDESH
Burhānpur
ORISSA
BERĀR
Daulatābād
NIZĀM SHĀHĪ
Ahmadnagar
DECCAN
Godāvari
Bay of Bengal
Sārtāra
Golconda
'ADIL SHĀHĪ
Bījāpur
QUTH SHĀHĪ
Arabian Sea
Krishna
MARĀTHĀ
Kāveri
Jinji
CEYLON
MUGHAL EMPIRE 1526-1707
Extent of Mughal Empire in 1530
Expansion of Mughal Empire to 1605
Expansion of Mughal Empire to 1707
Mughal expansion into Bābur's Afghan kingdom
Boundary of Suri empire
Routes of Mughal expansion campaigns
© 1994 Encyclopaedia Britannica, Inc.

**मराठा राज्य १६८०**



शिवाजीचे राज्य १६८०
नर्मदा न.
सुरत
तापी न.
बुऱ्हाणपूर
साल्हेर
दमण
चांदवड
दौलताबाद
औरंगाबाद
गोदावरी न.
वसई
कल्याण
जुन्नर
शिवनेरी
मुंबई
अहमदनगर
लोहगड
चाकण
चौल
जंजिरा
तोरणा
पुणे
सिंहगड
सुपे
रायगड
प्रतापगड
इंदापूर
सोलापूर
दाभोळ
सातारा
संगमेश्वर
हैद्राबाद
रत्नागिरी
पन्हाळा
विजापूर
कोल्हापूर
विजयदुर्ग
राजापूर
सिंधुदुर्ग
मालवण
खारेपाटण
वेंगुर्ला
सावंतवाडी
गदग
गोवा
हुबळी
बेल्लारी
कारवार
होस्कोट
बंगलोर
वेल्लोर
जिंजी
कावेरी न.
तंजावर
शहाजीची मूळ जहागीर
स्वराज्य
कर्नाटकातील राज्य
व्यंकोजीचा प्रदेश
कर्नाटक मार्ग
महाराष्ट्र राज्य
किल्ले
शहरे
मैल
0 50 100 150
N

मराठा राज्य १६८०



Cambay
Narmada
SĀTPURA RANGE
BERĀR
Bālāghāt
Mahānadi
Surat
BĀGLANĀ
Burhānpur
Nāgpur
Gulf of Khambhāt
Mulher
Tāpi
Mahuli
Sālher
Chāndūr
KHĀNDESH
Chanda
Dindori
Kalyān
Aurangābād
Bhiwandi
Junnar
Bombay (Br.)
Ahmadnagar
Rājmachi
Godāvari
Chaul (Port.)
Poona
Sinhgarh
Rājgarh
Kalyān
Wai
Hyderābād
Javli
Sātāra
Bhīma
KONKAN
GOLCONDA
Krishna
Rājāpur
Panhāla
Vijayadurg
Masulipatam
Mālvan
Vengurla
Tungabhadra
Goa (Port.)
Bellary
Penneru
Kārwār
BIJĀPUR
Madras (Br.)
Vellore
Bay of Bengal
Bangalore
Arni
Arabian Sea
Jinjī
Kāveri
Tanjore
Cochin (Dutch)
0 100 200 mi
0 100 200 300 km
Quilon
Gulf of Mannār
© 1994 Encyclopaedia Britannica, Inc.
CEYLON
Śivājī's territories
Mahārāshtra


**मराठा साम्राज्य १७२०ते १७४०**



## ब्रिटिश एम्पाअर १७९६ ते १८०५



ब्रिटिश इंडिया १९४७



# भारत


AFGHANISTAN
Kabul
Peshawar
Islāmābād
Srinagar
JAMMU AND KASHMIR
Jammu
A
B
C
Ⓐ Administered by Pakistan
Ⓑ Administered by India
Ⓒ Administered by China
CHINA
PAKISTAN
Lahore
Amritsar
Faisalābād
HIMACHAL PRADESH
PUNJAB
CHANDIGARH
Ludhiana
Chandigarh
Bhatinda
Ganganagar
Karnal
Dehra Dun
HARYANA
DELHI
UTTARANCHAL
Delhi
Meerut
Moradabad
Bhiwani
New Delhi
Bulandshahr
Bikaner
NEPAL
SIKKIM
BHUTAN
ARUNACHAL PRADESH
Longju
Thimphu
Sibsagar
Kathmandu
RAJASTHAN
Alwar
Agra
UTTAR PRADESH
Jodhpur
Jaipur
Lucknow
Gwalior
Kanpur
Shiliguri
ASSAM
NAGALAND
Kohima
Hyderābād
Bhilwara
Allahabad
Ara
Darbhanga
MEGHALAYA
Imphal
Kota
Varanasi
Patna
Balurghat
BIHAR
BANGLADESH
MANIPUR
Rewa
Dhākā
Tropic of Cancer
GUJARAT
JHARKHAND
Asansol
MIZORAM
Jamnagar
Ahmadabad
Bhopal
Jabalpur
Ranchi
Bhatpara
Navadwip
Rajkot
Baroda
Indore
MADHYA PRADESH
Howrah
Kolkata (Calcutta)
Chittagong
Junagadh
Kharagpur
TRIPURA
Mandalay
Surat
CHHATTISGARH
South Suburban
MYANMAR
Nagpur
Raipur
Sambalpur
Malegaon
DAMAN AND DIU
Nasik
MAHARASHTRA
ORISSA
WEST BENGAL
DADRA AND NAGAR HAVELI
Bhiwandi
Puri
Mumbai (Bombay)
Ahmadnagar
Brahmapur
Pune
Sholapur
Vishakhapatnam
Hyderabad
Sangli
Bijapur
Kolhapur
ANDHRA PRADESH
Eluru
KARNATAKA
PONDICHERRY
Guntur
ARABIAN SEA
GOA
Hubli-Dharwad
Bellary
Anantapur
Davangere
Cuddapah
Shimoga
Tirupati
Bangalore
Chennai (Madras)
PONDICHERRY
TAMIL NADU
PONDICHERRY
Coimbatore
Tiruppur
PONDICHERRY
Palghat
Thanjavur
KERALA
Dindigul
Cochin
Madurai
ANDAMAN AND NICOBAR ISLANDS
LAKSHADWEEP
Quilon
Tuticorin
Trivandrum
Tirunelveli
Nagercoil
SRI LANKA
Colombo
MALDIVES
Male
INDIAN OCEAN
INDONESIA
BOUNDARIES
International
Disputed
Lines of control
0 200 400 mi
0 300 600 km
68° 72° 76° 80° 84° 88° 92° 96°
36° 32° 28° 24° 20° 16° 12° 8° 4°
© 2001 Encyclopædia Britannica, Inc.